सत्यमेव जयते

महाराष्ट्र सरकार

# कार्यक्रमाची रूपरेखा

## १९५९-६० व १९६०-६१

सरकारी मुद्रणालय, कोल्हापूर.

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठें |
|---|---|---|
| १. गृह विभाग | .... ... | १--३२ |
| २. सामान्य प्रशासन विभाग | .... ... | ३३--४३ |
| ३. अर्थ विभाग | .... .... | ४५--५८ |
| ४. महसूल विभाग | ... ... | ५९--६४ |
| ५. नागरी विकास आणि लोकस्वास्थ्य विभाग | ... | ६५--७६ |
| ६. सहकार आणि ग्रामीण विकास विभाग | ... | ७७--१०५ |
| ७. कायदा आणि न्यायदान विभाग | ... ... | १०७--११६ |
| ८. कृषि आणि वन विभाग | ... .... | ११७--१४८ |
| ९. शिक्षण आणि समाजकल्याण विभाग | .... | १४९--१६६ |
| १०. उद्योग आणि कामगार विभाग | ... .... | १६७--१९१ |
| ११. जलसिंचन आणि विद्युत् विभाग | ... | १९३--२०६ |
| १२. इमारती आणि दळणवळण विभाग | .... | २०७--२१४ |

# गृह विभाग

## तुरुंग

कैद्यांची सुधारणा करणें आणि तुरुंगांतून त्यांची सुटका झाल्यानंतर त्यांच्या पुनर्वसाहतीकरितां त्यांना उपयोगी पडेल अशा धंद्याचें त्यांस प्रशिक्षण देणें ही तुरुंग विभागाचीं मुख्य कामें होत.

तुरुंगांतील उद्योगाच्या पुनर्घटनेच्या प्रश्नावर सरकारचा विचार चालू आहे. ह्याबाबतींत एक समिति स्थापन करण्यांत आली आहे. तसेंच तुरुंगांतील दीर्घ मुदतींचे गुन्हेगार, सराईत गुन्हेगार, बाल-गुन्हेगार, अल्प मुदतीचे गुन्हेगार आणि स्त्री कैदी असें कैद्यांचें वर्गीकरण करण्यासाठीं राज्यांतील तुरुंगांचें परत वर्गीकरण करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे. मुंबई तुरुंग नियमावलीचीही दुरुस्ती करण्यांत येत आहे.

अकोला जिल्हा तुरुंगांत बालगुन्हेगारांसाठीं सुतारकाम विभाग सुरू करण्याचें योजिलें आहे. त्यासाठीं रु. ३९,३२० खर्च येईल असा अंदाज आहे. तसेंच अंदाजें रु. ३९,००० खर्च येणारा नागपूर मध्यवर्ति तुरुंगांतील सुतारकाम विभाग वाढविण्याचेंदेखील योजिलें आहे. धुळें येथील जिल्हा तुरुंग हा बालगुन्हेगारांचा जिल्हा तुरुंग म्हणून समजला जाणार असल्यामुळें धुळें येथें तंत्रज्ञांच्या जागा निर्माण करण्याचें व तेथें साधनसामुग्री ठेवण्याचें योजिलें आहे. अंदाज तयार करणाऱ्या समितीच्या शिफारशींचा परिणाम म्हणून येरवडा मध्यवर्ति तुरुंगात आणखी तीन वेगळीं स्वयंपाकगृहें बांधण्याचें काम चालू आहे.

### II-द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजना

ही योजना विदर्भ विभागांतील कैद्यांच्या कल्याणाबाबतची आहे. कैद्यांना साबण व तेल पुरविणें, चार शिक्षकांची व शुश्रुषा करणाऱ्या सहा पुरुष ऑर्डर्लींची नेमणूक करण्याच्या योजना पुढें चालू ठेवण्यास मंजुरी मिळविण्यांत आली आहे. तुरुंगांच्या विद्युतीकरणासाठीं रु. १६,४०० च्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे. योजनांतर्गत योजनेसंबंधीं १९६०-६१ सालीं अन्दाजपत्रकांत एकूण रु. ४२,४०० ची तरतूद करण्यांत आली आहे.

या योजनेनुसार खालील नवीन योजनांची अंमलबजावणी करण्यासाठीं, दि. २-२-१९६० चा गृहविभागाचा सरकारी ठराव क्र. पी. १५४/६७४५६-IV याअन्वयें मंजुरी मिळविण्यांत आली आहे.

(१) नागपूर येथील मध्यवर्ति तुरुंगांत टर्नर केंद्र
(२) ,, ,, ,, ,, फिटर केंद्र
(३) ,, ,, ,, ,, वायरमन व लाईनमन केंद्र
(४) अमरावती जिल्हा तुरुंगांत शिवणकाम केंद्र
(५) अकोला ,, ,, मोची केंद्र
(६) नागपूर येथील मध्यवर्ति तुरुंगांत स्त्रियांकरितां शिवणकाम केंद्र.

या पांच योजनांकरितां वार्षिक रु. १,४६,२६० एवढा खर्च येईल असा अंदाज आहे. चालू आर्थिक वर्षी ह्या योजना चालू आहेत. विदर्भ विभागांतील सर्व तुरुंगांच्या विद्युतीकरणास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे आणि सुमारें १,४५,००० च्या खर्चाच्या ह्या योजनेची अंमलबजावणी करण्याचें योजिलें आहे. बालगुन्हेगारांकरितां नागपूर येथील मध्यवर्ति तुरुंगांत सुतारकाम विभाग देखील उघडण्यांत आला आहे. विदर्भ विभागांतील कैद्यांची विमुक्ति नंतर काळजी घेण्याकरितां रु. ५०,००० च्या रकमेचा उपयोग

करण्याचें योजिलें आहे. पंचवार्षिक योजनेंतील रु. ५,८४,००० च्या संपूर्ण तरतुदीचा पूर्णतया उपयोग करावा लागेल, असा अंदाज आहे.

## महाराष्ट्र राज्य, सैनिक, नाविक व वैमानिक मंडळ, पुणें

सैनिक सेवेंतील आजी व माजी नोकरवर्ग आणि/अथवा त्यांचीं कुटुंबें यांच्या हिताच्या व कल्याणासंबंधींच्या बाबी हाताळण्यासाठीं या राज्यांत अस्तित्वांत असलेल्या संघटनेंत, महाराष्ट्र राज्य सैनिक, नाविक व वैमानिक मंडळ, पुणें १७, जिल्हा सैनिक, नाविक व वैमानिक मंडळें आणि मुंबई शहर सैनिक, नाविक व वैमानिक मंडळ यांचा समावेश होतो. मुख्यमंत्री हे राज्य मंडळाचे अध्यक्ष असून, पुणें विभागाचे कमिशनर हे त्यांच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष आहेत. संबंधित जिल्ह्यांचे कलेक्टर आणि मुंबईचे कलेक्टर हे अनुक्रमें जिल्हा मंडळाचे आणि शहर मंडळाचे अध्यक्ष आहेत.

जिल्हा व शहर सैनिक, नाविक व वैमानिक मंडळांच्या कामांवर देखरेख ठेवणें व त्यांचा समन्वय करणें ह्या कामांशिवाय राज्य मंडळ पुढील कामे करतें :-

(१) आजी व माजी नोकरवर्ग आणि/अथवा त्यांचीं कुटुंबें यांच्या कल्याणासंबंधींची उपाय-योजना करणें.

(२) देशांतील सशस्त्र दलासंबंधींच्या माहितीचा जनतेंत प्रसार करून जनतेच्या मनांत सशस्त्र दलाविषयीं आस्था निर्माण करणें, आणि-

(३) सैनिक-सेवा युद्धोत्तर पुनर्रचना निधि, होमी मेहता व्हिक्टरी थँक्स गिव्हिंग फंड, परोपकार निधि, शौर्याबद्दलचीं बक्षिसें ( डेकोरीज फंड ) व राज्य वसतिगृह निधि यांची व्यवस्था पाहणें.

२. भारतीय सैनिक, नाविक व वैमानिक मंडळानें १९५३-५४ या वर्षापासून पुणें येथील राज्य मंडळाच्या सेवकवर्गावरील खर्चापैकीं कांहीं भाग सोसण्याचें कबूल केलें आहे. मात्र या राज्यांतील १७ जिल्हा मंडळें व एक मुंबई शहर सैनिक, नाविक व वैमानिक मंडळ याकरितां मंजूर केलेल्या नोकरवर्गाचा खर्च या सरकारकडून व भारत सरकारकडून ५० : ५० या प्रमाणांत केला जातो. आतापर्यंत जिल्हा मंडळें हीं भारतीय सैनिक, नाविक व वैमानिक मंडळाच्या प्रशासकीय व आर्थिक नियंत्रणाखालीं होतीं. ऑगस्ट १९५५ पासून भारत सरकारनें जिल्हा मंडळांवरील आर्थिक नियंत्रण बऱ्याच प्रमाणांत राज्य सरकारकडे सोंपविलें आहे.

३. राज्य मंडळ हें त्याच्या हातीं असलेल्या निधीमधून आपलीं कार्यें पार पाडतें. सैनिक सेवेंतील आजी व माजी नोकरवर्गाच्या मुलांकरितां व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांकरितां शैक्षणिक सोयींची सोय करण्याच्या राज्य मंडळाच्या धोरणानुसार महाराष्ट्र राज्यांत आतापर्यंत १७ वसतिगृहें ( मुलांकरितां १६ व मुलींकरितां १ ) उघडण्यांत आलीं आहेत. कलेक्टरांजवळ असलेल्या जिल्हा वसतिगृह निधींतील चालू शिल्लक ३१ ऑक्टोबर १९५९ रोजीं रु. ५,८८,७८६·३६ इतकी होती. सध्यां ५०२ विद्यार्थ्यांना वसतिगृहाचा फायदा मिळत आहे. निवासी व सहाय्यक वसतिगृह अधीक्षक यांच्या पगाराप्रीत्यर्थ येणारा कांहीं खर्च भागविण्यासाठीं व निवासी वसतिगृह अधीक्षक यांना द्यावयाचा महागाई भत्ता आणि वसतिगृहाच्या इमारतींचें भाडें यांकरितां येणारा संपूर्ण खर्च भागविण्यासाठीं या १७ वसतिगृहांपैकीं प्रत्येकाला राज्य सरकारकडून अनुदान सहाय्य मिळतें. सवलती मिळालेल्या व वसतीगृहांत रहाणाऱ्या विद्यार्थ्यांचा वसतिगृहाचा खर्च, फी भागविण्यासाठीं शैक्षणिक सवलती, प्रासंगिक खर्च व भोजन-खर्च हा खर्चहि राज्य सरकारकडून दिला जातो.

शिवाय माजी सैनिकांना निरनिराळ्या कारणांकरितां साधारणत: ज्या कांहीं ठिकाणीं जावें लागतें अशा ठिकाणीं २१ विश्रांतिगृहें बांधण्यांत आलीं आहेत. माजी सैनिक व त्यांचीं कुटुंबें जेव्हां जेव्हां त्या ठिकाणीं जातात, तेव्हां त्या विश्रांतिगृहांचा ते उपयोग करतात. जेव्हां हीं विश्रांतिगृहें माजी सैनिकांना नको असतात, तेव्हां कामावर असलेल्या सरकारी नोकरांना किंवा भाडें घेऊन इतर लोकांना तीं वापरण्याची परवानगी मिळते. विश्रांतिगृहांवर लक्ष ठेवणाऱ्या १८ पहारेकऱ्यांच्या पगाराचा खर्च भागविण्यासाठीं राज्य सरकार या मंडळास अनुदान सहाय्य देतें.

४. माजी सैनिकांना एखादा फायदेशीर उद्योग मिळवितां यावा म्हणून त्यांना कापड विणणें, लोकरीचें विणकाम, सुतारकाम आणि फिटर्स पाठ्यक्रम यांसारख्या व्यवसायांचें प्रशिक्षण देण्याकरितां सातारा येथें एक प्रशिक्षण व उत्पादन केन्द्र उघडलें आहे. वर उल्लेखिलेल्या व्यवसायांचें प्रशिक्षण प्रत्येक व्यवसायांत १२ विद्यार्थी याप्रमाणें कुशल शिक्षकांच्या देखरेखीखाली घेत आहेत–हें केन्द्र संपूर्णपणें राज्य मंडळाच्या अधिकाराखालीं राहील आणि पहिल्या तीन वर्षांचा खर्च सैनिक सेवा युद्धोत्तर पुनर्रचना निधि आणि सरकार यांमध्यें ५०:५० या प्रमाणांत विभागला जाईल. त्यानंतर हें केंद्र स्वयंपूर्ण होईल अशी आशा आहे.

५. १९५९-६० या वर्षाकरितां मंजूर झालेल्या व १९६०-६१ या वर्षाकरितां मंजुरीसाठीं सादर केलेल्या रकमा दर्शविणारें विवरण-पत्रक पुढीलप्रमाणें आहे :-

| बाब | १९६०-६१ करितां मागितलेलें अनुदान |
|---|---|
| २५- सामान्य प्रशासन | रु. |
| क्यू- जिल्हा प्रशासन | १,९५,००० |
| क्यू- सामान्य सेवकवर्ग | |
| (एक) क्यू ३- जिल्हा सैनिक, नाविक व वैमानिक मंडळें | |
| (दोन) क्यू ४- मुंबई राज्य सैनिक, नाविक व वैमानिक मंडळ, पुणें. | ५८,००० |
| (तीन) क्यू ४- मुंबई राज्य सैनिक, नाविक व वैमानिक मंडळ, पुणें. क्यू - ४ (५) अनुदान सहाय्य, वर्गण्या इ. (१) सैनिकांची मुलें / मुली यांच्या वसतिगृहा-करितां अनुदान सहाय्य (२) माजी सैनिकांच्या मुलांना युद्धकालीन सवलती. | ३४,००० |
| एकूण... | २,८७,००० |
| **४३ उद्योग** | रु. |
| माजी सैनिकांसाठीं सातारा येथें प्रशिक्षण व उत्पादन केंद्र. | ५५,५५० |
| एकूण... | ५५,५५० |

# दारूबंदी आणि अबकारी विभाग

दारुबंदी आणि अबकारी विभागामध्यें खालील अधिनियमांची अंमलबजावणी केली जाते:--

(१) मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९.

(२) मुंबई अफूसेवन अधिनियम, १९३६.

(३) हानीकारक औषधि अधिनियम, १९३०

(४) मुम्बई औषधि नियंत्रण अधिनियम, १९५९

(५) वैद्यकीय व प्रसाधनीय पदार्थ तयार करण्याबाबत [अबकारी कर] अधिनियम, १९५५ [ संबंध महाराष्ट्र राज्यास लागूं आहे ]

(६) मद्यार्कयुक्त पदार्थ ( आंतरराज्यीय व्यापार आणि वाणिज्य ) नियंत्रण अधिनियम, १९५५ ( संबंध महाराष्ट्र राज्यास लागूं आहे ).

लायसेन्स देणें, लायसेन्सची तपासणी करणें आणि वर दर्शविलेल्या, विशेषत: मुम्बई दारूबंदी अधिनियमाखालील निरनिराळ्या स्वरूपाच्या नियंत्रणांची अंमलबजावणी करणें, हीं या विभागाचीं प्रमुख कामें आहेत.

२. मराठवाडा आणि विदर्भ प्रदेशांपर्यंत चांदा जिल्ह्यांतील "दारू गाळण्यास परवानगी असलेला प्रदेश" ह्मणून ओळखला जाणारा पूर्व भाग वगळून मुम्बई दारूबंदी अधिनियम १९४९ चा विस्तार केल्यामुळें, त्या प्रदेशांत १-४-१९५९ पासून संपूर्ण दारूबंदी सुरूं करण्यांत आली होती. चांदा जिल्ह्यांतील दारू गाळण्यास परवानगी दिलेल्या प्रदेशांत संपूर्ण दारूबंदी टप्याटप्यानें करण्याचा कार्यक्रम आंखण्यांत आला असून तो १-४-१९६२ रोजीं पूर्ण होईल. गांवठी मद्यार्कयुक्त पदार्थ जवळ बाळगण्याची व त्यांची किरकोळ विक्री करण्याची मर्यादा १९५९-६० पासून ८ ड्रॅमपासून ४ ड्रॅमपर्यंत कमी केलो आहे, व १-४-६० पासून ती अधिक कमी करून २ ड्रॅम्सवर आणण्यांत आली आहे. ताडी जवळ बाळगण्याची व तिची किरकोळ विक्री करण्याची मर्यादा १-४-५९ पासून १६ ड्रॅमवरून ८ ड्रॅमपर्यंत कमी करण्यांत आली आहे व १९६०-६१ मध्येंहि ती तशीच ठेवण्यांत आली आहे. १-४-१९६० पासून सर्व दुकानांचें रूपांतर 'चालूं दुकानांत' करण्यांत आलें, आणि फक्त लायसेन्स मिळालेल्या जागांमध्येंच ताडीच्या विक्रीला परवानगी देण्यांत आली आहे. १९६० मध्यें, गांवठी दारूच्या दुकानांना दुपारी ३ ते रात्रीं ८ पर्यंत विक्री करण्यास परवानगी दिली आहे, आणि गांवठी मद्यार्कांची व ताडीचीं दुकानें गुरुवारीं, शनिवारीं आणि रविवारीं बंद ठेवण्यात येतात. मधल्या दिवसांत दारू गाळण्यास परवानगी असलेल्या प्रदेशांत संपूर्ण दारूबंदीची तयारी करण्यासाठीं दारूबंदीविषयक भरीव आणि विस्तृत प्रचार करण्यांत येत आहे.

३. विभागीय अवैतनिक दारूबंदी संघटक, दारूबंदी प्रचार अधिकारी, जिल्हा विकास मंडळाच्या दारूबंदीविषयक उपसमित्या, तालुक्यांतील दारूबंदी मोहीमविषयक समित्या, ग्रामपंचायतीच्या दारूबंदीविषयक उपसमित्या इत्यादि मार्फत दारूबन्दीविषयक प्रचार भरीव स्वरूपांत करण्यांत आला. दारूबंदीचा अधिक जोरांत प्रचार करण्यासाठीं समाज कल्याण संघटनेचेंहि साहाय्य घेतलें होतें. व्यसनी लोकांना दारू पिण्याच्या आणि अंमली द्रव्यांचें सेवन करण्याच्या संवयीपासून मुक्त करण्यासाठीं सत्कार

केन्द्रामध्यें दारू पिणाऱ्यावर प्रतिक्रियात्मक परिणाम घडवून आणणारे मनोरंजन कार्यक्रम करण्यांत आले. हे कार्यक्रम अधिक तीव्रतर करण्यांत येतील आणि १९६०-६१ मध्येंहि ते चालू राहील.

४. दारूबंदीमुळें नुकसान झालेल्यांचें पुनर्वसन करण्याची योजना १९५९-६० मध्यें पुढें चालू करण्यांत येऊन विदर्भ व मराठवाडा प्रदेशापर्यंत तिचा विस्तार करण्यांत आला होता. दारूबंदीमुळें नुकसान पोहोंचलेल्या इसमांकरितां २९ फेब्रुवारी १९६० पर्यंत संपर्क अधिकाऱ्याची एक जागा निर्माण करण्यांत आली होती. या संपर्क अधिकाऱ्यानें विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशांत बरेच दौरे काढून लोकांना पुनर्वसन पद्धतीचें फायदे समजावून देण्याचें काम केलें. ह्या योजनेला भरपूर प्रसिद्धि देण्यांत आली आणि योजनेंतील प्रमुख विशेषांची व तिच्या कामकाजाच्या पद्धतीबाबतची माहिती दारूबंदीमुळें नुकसान पोहोंचलेल्या लोकांना देण्यांत आली. दारूबंदीनें नुकसान पोहोंचलेल्या लोकांना कर्जें देण्याच्या नियमांनुसार दारूबंदीने नुकसान पोहोंचलेल्या लोकांना कर्जे देण्यासाठीं १९६०-६१ मध्यें तरतूद करण्यांत आली आहे.

१९५९-६० मध्यें, सरकारी खात्यांत नोकरी देणें, एका ठराविक किंमतीनें जंगलकूप देणें, व्यापारविषयक उपक्रम अथवा लहान प्रमाणावरील उद्योगधंदे इत्यादी सुरू करण्यासाठीं किंवा, त्यांचा विस्तार करण्यासाठी कर्जें देणें या मार्गानें पुनर्वसनासाठीं साहाय्य देण्यांत आलें.

## पोलीस विभाग

### (एक) पुनर्रचना :—

(१) १९५९–६० मध्यें, मनुष्यबलाचें वाजवीकरण व समान वांटणी करण्याच्या दृष्टीनें राज्यांतील पोलीस दलाची पुनर्रचना करण्याच्या प्रस्तावांवर सरकारनें विचार करून त्यांना मंजुरी दिली आहे. ह्या कामासाठीं सरकारनें एक समिति नेमली होती- ह्या समितीनें मनुष्य-बलाबाबतच्या गरजा भागवण्यासाठीं कांहीं परिमाणांची शिफारस केली होती. कांहीं योग्य बदल करून सरकारनें ह्या परिमाणांना मंजुरी दिली व पोलीस दलाची पुनर्रचना करण्यास मंजुरी देण्यासाठीं आधारभूत प्रमाण म्हणून त्यांचा स्वीकार केला. हीं परिमाणें लागू केल्यामुळें समान तत्त्वावर विविध पोलीस पथकांच्या गरजा भागविणें आतां शक्य झालें आहे.

(२) नागपूर रेंजच्या पुनर्रचनेच्या प्रस्तावामध्यें सरकारनें १९५९–६० यावर्षांत ६ पोलीस इन्स्पेक्टर, ३३ सब् इन्स्पेक्टर, १६० हेड् कॉन्स्टेबल्स्, आणि १२९ पोलीस कॉन्स्टेबल्स् इतकी सेवक संख्या मंजूर केली होती. १९६०–६१ मध्यें, १६५ हेड् कॉन्स्टेबल्स् आणि १८८ पोलीस कॉन्स्टेबल्स् इतकी जादा सेवक संख्या मंजूर करण्याचें योजिलें आहे.

### (दोन) मोटार वाहतूक आणि बिनतारी पथकें :—

(१) फिरत्या पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीनें, जुनीं वाहनें बदलून नवीन मोटारी व मोटार सायकल्सूची खरेदी करण्यासाठीं सरकारनें १९५९–६० मध्यें [रु. ८,५०,००० ] चा निधि मंजूर केला होता. ह्या निधींतून खालील प्रकारचीं वाहनें खरेदी करण्यांत आलीं व तीं महाराष्ट्रांतील जिल्ह्यांना व एस. आर. पी. एफ. गटांना पुरविण्यांत आलीं.

| | | |
|---|---|---|
| फॅक्टरींत बांधलेल्या स्टेशन वॅगन | ... | ६ |
| ३ टनर्स [पेट्रोल] | ... | ६ |
| ३ टनर्स [डीझेल] | ... | ३ |
| १ टनर लाईट व्हॅन | ... | ६ |
| जीप्स् | ... | ९ |
| मोटर सायकल्स | ... | ५ |
| | | ३५ |

(२) त्याचप्रमाणें विदर्भ व मराठवाडा प्रदेशांतील पोलीस वाहनांच्या मोठ्या दुरुस्त्यांविषयींच्या गरजा भागविण्यासाठीं नागपूर व औरंगाबाद येथें मध्यवर्ति पोलीस वर्कशॉप्स् स्थापन करण्यासाठीं सरकारनें अंशत: मंजुरी दिली आहे. आवश्यक तीं हत्यारें व साधनसामुग्री विकत घेण्यांत आली आहे.

(३) ह्याशिवाय सरकारनें (ए) नवीन प्रदेशांत मोटार वाहतूक करणाऱ्या नोकरवर्गांच्या जादा जागांना आणि (ब) नवीन प्रदेशांतील जिल्ह्यांमधील जुन्या वाहनांची तावडतोब दुरुस्ती करण्यासाठीं आवश्यक तीं हत्यारें व साधनसामुग्री ह्यांची खरेदी करण्यासाठीं आवश्यक असलेल्या निधीला मान्यता दिली आहे.

(४) नागपूर व सोलापूर येथें, १९५९ मध्यें गस्त घालणाऱ्या फिरत्या बिनतारी संदेश पथकांची योजना लहान प्रमाणावर सुरू करण्यांत आली. जादा निधि न मागतां, मंजूर झालेल्या रकमेमधूनच वाहनें, नोकरवर्ग आणि साधनसामुग्री उपलब्ध करण्यांत येऊन अकोला, कोल्हापूर, सातारा, कल्याण, नाशिक आणि अमरावती येथें व्ही. एच्. एफ्. गस्त घालण्याची पद्धति सुरू झाली आहे. गुंड व चोरटा व्यापार करणारे यांना आळा घालण्याच्या बाबतींत ह्या पद्धतीला उत्तम यश येत आहे.

(५) गेल्या वर्षी, कांहीं लाऊड-स्पीकर व प्रोटोफोन्स यांच्या खरेदीला सरकारनें मान्यता दिली होती. महाराष्ट्र राज्यांतील जिल्ह्यांना त्यांपैकीं २२ लाऊडस्पीकर्स व १२ प्रोटोफोन्स पुरविण्यांत आले. या संचांची खरेदी केल्यामुळें आतां प्रत्येक जिल्ह्याला ह्या साधनसामुग्रीचा निदान एकतरी संच मिळाला आहे. यात्रा, उत्सव, जाहीर सभा अशा ठिकाणीं पोलिसांच्या व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविण्यासाठीं, व अशा प्रसंगीं वाहतुकीवर नियंत्रण घालण्यासाठीं ह्या संचांची मदत होत असे.

बिनतारी संदेश पोलीस विभागांतील सामानसुमानाची व्यवस्था ठेवण्यासाठीं व त्या विभागाचा हिशेब ठेवण्यासाठीं जादा नोकरवर्गाची निर्मिति करण्याच्या प्रस्तावावर सरकारचा विचार चालू आहे.

**(तीन) राज्य वाहतूक शाखा:—**

(१) धुळें येथील वाहतूक पथकाकरितां १ सब्-इन्स्पेक्टर, २ हेड कॉन्स्टेबल्स, आणि ३ कॉन्स्टेबल्स [यांत एका ड्रायव्हरचा समावेश होतो] या जादा नोकरवर्गाला व एका स्टेशन वॅगनला सरकारनें मंजुरी दिली होती.

(२) ट्रॅफिक इंजिनिअरिंग व राजमार्गांचें संरक्षण यासाठीं 'इकेफ' सप्ताह मुंबईमध्यें २४-१०-१९५९ ते ३०-१०-१९५९ पर्यंत साजरा करण्यांत आला. निरनिराळ्या देशाचे आणि भारताच्या जवळजवळ सर्व राज्यांचे प्रतिनिधि या सप्ताहाला उपस्थित होते. इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस आणि इतर पोलीस अधिकारी यांनीं चर्चेमध्यें प्रत्यक्ष भाग घेतला आणि ह्या चर्चेमध्यें घेण्यांत आलेल्या विविध निर्णयांवर विचार चालू आहे.

(३) अति वेगानें जाणारीं वाहनें शोधून काढण्यासाठीं, मोटार अपघातांत जखमी झालेल्यांवर प्रथमोपचार करण्यासाठीं, अपघातांत सांपडलेल्या आणि रस्त्यावर मोडलेल्या वाहनांना मदत करण्यासाठीं मुंबई-पुणें रस्त्यावर, ६ ठिकाणीं वाहतूक विषयक मदत करणारी केंद्रें स्थापन केली असून तीं बिनतारी यंत्रानें माहिती कळवितात. हीं केंद्रें फार उपयुक्त आहेत असें आढळून आलें आहे.

**(चार) गुन्हे:—**

महाराष्ट्र राज्यांतील (बृहन्मुंबई धरून) १९५७, १९५८, १९५९ मधील गुन्ह्यांचे आंकडे खालीलप्रमाणें आहेत :—

| | वर्ग १ ते ५ | वर्ग ६ | खून | दरोडे | लूट | घरफोडी आणि चोऱ्या | चोऱ्या | दंगे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५७ | ७४९५९ | ४७५११२ | १२१९ | ६३० | १६०२ | १३३३९ | ३५१०८ | १३५४ |
| १९५८ | ७२२१९ | ५११४८५ | १२०६ | ४९० | १५०४ | ११२०७ | ३३३१० | ११११६ |
| १९५९ | ६८२०९ | ५७०६९९ | ११६८ | ३९१ | १२६९ | ११२६५ | ३१०७४ | १६५७ |

ह्या आंकड्यांवरून असें स्पष्ट होतें कीं, १ ते ५ या वर्गातील गुन्ह्यांच्या चढत्या प्रमाणाला व एकंदरींत गंभीर गुन्ह्यांच्या सदरांत येणाऱ्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या गुन्ह्यांच्या वाढीला आळा घालण्यांत पोलीस विभाग यशस्वी झाला आहे. वर्ग ६ च्या गुन्ह्यांत जी वाढ झाली आहे तीवरून गौण अधिनियमांची, विशेषतः दारूबंदी अधिनियमाची अंमलबजावणी पोलीसांनीं अधिक चांगल्या रीतीनें केली पाहिजे असें दिसून येतें.

**दारूबंदी अधिनियमाची अंमलबजावणी :—**

राज्यामध्ये छापा घालणारी दलें कधींच स्थापन करण्यांत आलीं आहेत. हीं पथकें, बेकायदा दारू तयार करणारे, चोरटी आयात करणारे, दारूबाज इत्यादींचा उपद्रव असणाऱ्या भागांतून अविरत छापे घालीत असतात. दारूबंदीची अंमलबजावणी परिणामकारकपणें व्हावी म्हणून छापा घालणाऱ्या दलामध्यें ४ पोलीस डेप्युटी सुपरिंटेंडेंटची नेमणूक करण्यांत आली असून त्यांचीं मुख्य कार्यालयें पुणें, औरंगाबाद, नागपूर व मुंबई येथें आहेत.

दारूबंदी अधिनियमांत सुधारणा करण्यांत आली असून, तो सर्व राज्याला सारखाच लागूं केला आहे. ( चांदा जिल्ह्यांतील दारू गाळण्यास परवानगी असलेला प्रदेश सोडून ).

**राज्य गुप्तपोलीस विभागांत पोलीस संशोधन केंद्राची स्थापना :—**

गुन्ह्यांच्या आकड्यांचा शास्त्रीय अभ्यास करण्याचें काम हातीं घेण्याच्या दृष्टीनें, राज्य गुप्तचर विभागांत एक पोलीस संशोधन केंद्र स्थापन केलें असून त्यांत एक डेप्युटी पोलीस सुपरिंटेंडेंट, २ पोलीस सबइन्स्पेक्टर्स, २ हेड् कॉन्स्टेबल्स आणि एक आंकडेवारी साहाय्यक एवढा नोकरवर्ग आहे. देशांतील सामाजिक व आर्थिक विकासाचा, त्यांचा देशांतील कायदा व सुव्यवस्था यांवर होणाऱ्या परिणामाच्या संदर्भानें व मुख्यतः गुन्ह्यांच्या संदर्भानें अभ्यास करणें व त्यांच्या उद्भवाला आळा घालण्यासाठीं मार्ग व

साधनें शोधून काढणें, हा या केन्द्राचा मुख्य उद्देश आहे. आवश्यक ती आकडेवारी जमा करणें, संशोधनानें हातीं आलेले निकाल जाहीर करणें, आणि विशिष्ट जिल्ह्यांत आणि विशिष्ट प्रदेशांत एकाद्या विशिष्ट प्रकारच्या गुन्ह्याची वाढ कां होते याबद्दलचीं कारणें व परिस्थिति शोधून काढणें, हीं कामें केन्द्राला करावयाचीं आहेत.

**(पांच) टेलिफोन्स :—**

१९५९-६० मध्यें, पोलीसांचीं निवासस्थानें आणि निवासस्थानें नसलेलीं ठिकाणें धरून एकूण १७ ठिकाणीं टेलिफोनची व्यवस्था करण्यांत आली आहे.

**(सहा) अश्वधूर पथकें:-**

१९५९-६० सालीं महाराष्ट्र राज्याच्या खाली दर्शविलेल्या जिल्ह्यांत, सरकारनें ५ अश्वधूर पथकें स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे.

[१] भंडारा, [२] चांदा, [३] औरंगाबाद, [४] नांदेड, [५] एस. आर. पी. एफ्. जी. आर. I, पुणें.

**(सात) पोलिसांसाठीं घरें:—**

पोलीस अधिकारी आणि पोलीस लोक यांची घरें बांधण्याबाबतची परिस्थिति बिकटच होत चालली आहे. आणि राज्याची स्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें, राज्य सरकार पोलीसांसाठीं घरें बांधण्याच्या योजनेकरितां दरवर्षीं फंड मंजूर करीत आहे. त्यानुसार १९५९-६० सालीं सरकारनें, चालू कामाशिवाय महाराष्ट्र राज्यांतील १४५ अधिकारी व २६९१ पोलीसलोक यांच्या वसतिस्थानाचा समावेश असलेल्या वेगवेगळया बांधकामाकरितां एकूण रु. ९८,८४,७०० पर्यन्त फंड मंजूर केला आहे. महाराष्ट्र राज्यांतील २०३ अधिकारी व ४१२५ पोलीस यासाठीं वसतिस्थानें बांधणें, इ. चालू कामासाठीं व नवीन कामासाठीं १९६०-६१ सालीं रु. १,५५,९७,००० ची तरतूद केलेली आहे.

पोलीसांसाठीं घरें बांधण्याचें काम दृत गतीनें होण्याकरितां भारत सरकार देखील राज्य सरकारला दरवर्षीं समान तत्वावर (५०:५० टक्के) कर्ज मंजूर करीत आहेत आणि आतापर्यंत ही मदत [आर्थिक मदत] उपयोगी पडली असल्याचें दिसून येतें.

**(आठ) नवीन भरती केलेल्यांचे प्रशिक्षण:—**

१९५९-६० वर्षांत प्रादेशिक तत्त्वावर आधारलेली नवीन भरती केलेल्यांना प्रशिक्षण देण्याची योजना

नवीन भरती झालेल्यांना प्रशिक्षण देणाऱ्या शाळा पुणें व जालना येथें सुरू करण्यासाठीं सरकार-कडून मंजूरी देण्यांत आली आहे. ह्या शाळा खालील जिल्ह्यांच्या गरजा भागवितात.

**(१) पुणें :—** पुणें आणि मुंबई क्षेत्रांमधील सर्व जिल्हे.

**(२) जालना:—** औरंगाबाद क्षेत्रांमधील सर्व जिल्हे.

नागपूर येथें पूर्वीच एक नवीन भरती झालेल्यांना प्रशिक्षण देणारी शाळा आहे आणि ती विदर्भाच्या गरजा भागविते.

## नगरसेना-महाराष्ट्र राज्य

१९४६ च्या डिसेंबर महिन्यांत भूतपूर्व मुंबई राज्यांत नगरसेना संघटना सुरू झाली. पोलीसांची इतर क्षेत्रांतील कार्ये वाढल्यामुळें त्यांना अडचणीच्यावेळीं मदत करण्याचा या संघटनेचा मुख्य उद्देश होता आणि कायदा आणि नियम यामुळें निर्माण होणाऱ्या अडचणीतच मदत करण्यास हे नगरसैनिक जात नसून ते पूर, आग लागणें आणि इतर सामाजिक कामांतहि अडचणीच्यावेळीं मदत करण्यास धांवून जातात.

मुंबई नगरसेना अधिनियम हा विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशांपर्यंत वाढविल्यामुळें, या नवीन प्रदेशांत नगरसेना संघटनेची प्रसिद्धि होण्याच्या दृष्टीनें योग्य ती उपाययोजना करण्यांत आली

आहे आणि ती (संघटना) मुंबईच्या धर्तीवर संघटित करण्यासाठीं चार अवैतनिक जिल्हा कमांडंटस्‌ची नेमणूक पूर्वीच विदर्भांत करण्यांत आली आहे. मराठवाडा प्रदेशांत त्याच प्रकारची कामें हातीं घेतलीं आहेत. मराठवाडा जिल्ह्यांत अशा प्रकारची संघटना नसल्यामुळें तेथें अशी नगरसेना संघटना सुरू करण्यासाठीं सध्यां नगरसेना संघटनेचे अधिकारी प्रसार करण्याचें काम करीत आहेत.

**संघटना :–**

नगरसेनेचे कमांडंट जनरल, ह्यांच्या सर्वसाधारण देखरेखीखालीं आणि नियंत्रणाखालीं नगरसेना संघटना आहे. तसेंच नगरसेना संघटनेबाबतचा सगळा खर्च करण्यासाठींही हा नियंत्रण अधिकारी आहे. प्रशासन संचालक, पुरवठा संचालक, हिशेब व हिशेब तपासणी संचालक, नोकरवर्गाचा संचालक, परिवहन संचालक, कायदा विभागाचा संचालक इ. इतर कित्येक अवैतनिक अधिकाऱ्यांची त्याला मदत मिळते. प्रत्येक अधिकारी कमांडंट जनरलला त्याच्या विभागासंबंधी जबाबदार असतो.

जिल्ह्यांतील नगरसेना त्या त्या जिल्ह्यांतील कमांडंटच्या नियंत्रणाखालीं आणि देखरेखीखाली असते आणि ते कमांडंट जनरलला जबाबदार असतात.

अनुक्रमें कमांडिंग अधिकारी आणि प्रभारी अधिकारी यांच्या नियंत्रणाखालीं व अधिकाराखालीं प्रत्येक जिल्ह्यांत तालुका नगरसेना व त्यांची उपकेंद्रें आहेत. हे अधिकारी त्यांच्या जिल्हा कमांडंटच्या नियंत्रणाखाली असतात.

**मध्यवर्ति नगरसेना मुख्यालय:—**

नगरसेनेचें मुख्यालय मुंबई येथें आहे. कमांडंट जनरलच्या नोकरवर्गापैकीं अधिकारी प्रशासन आणि इतर बाबतींतील जिल्ह्याच्या अडचणींबाबत मदत करण्यासाठीं आणि मार्गदर्शन करण्यासाठीं मधूनमधून निरनिराळ्या जिल्ह्यांतून तपासणीचे दौरे काढतात.

त्याचप्रमाणें जिल्हा कमांडंटसुद्धा आपापल्या तालुक्यांत आणि उप-केंद्रांत तपासणीचे प्रासंगिक दौरे काढतात.

**प्रशिक्षण :–**

सबंध राज्यांतील नगरसेनेकरितां सामान्यत: खालील प्रशिक्षण पाठ्यक्रम नेमण्यांत आले आहेत:—

(१) पायाची कवायत, (२) पथक कवायत, (३) हाताची कवायत, (४) जुजुत्सू, (५) अश्रुधुराचा वापर, (६) निरनिराळ्या प्रकारच्या शस्त्रांचा उपयोग, (७) प्राथमिक कायद्यासंबंधीची माहिती.

निवडक नगरसैनिकांना खालील विषयांतील विशेष प्रशिक्षणदेखील देण्यांत येतें :—

(१) रहदारी नियंत्रण, (२) ट्राम चालविणें, (३) अवजड वाहनें चालविणें, (४) हायड्रॉलिक क्रेन्स चालविणें, (५) पोलीस स्टेशनवरील स्टेशनगृहाबाबतचीं कामें, (६) आग विझविणें, (७) प्रथमोपचार आणि रुग्णवाहिका यांबाबतचीं कामें, (८) टेलिफोन एक्स्चेंजचें प्रशिक्षण, इ. सह बिनतारी दळणवळणाचें प्रशिक्षण.

**मध्यवर्ती प्रशिक्षण मुख्यालय:–**

सबंध राज्यांतील नगरसेनेला निवडक तुकड्या करून मध्यवर्ती प्रशिक्षण मुख्यालयांत खास प्रशिक्षण मिळतें.

घाटकोपर येथें सुरुंगाचीं कामें चालू असल्यामुळें मध्यवर्ती प्रशिक्षण मुख्यालयाला आपली नेहमींचीं कामें करणें कठीण झालें आहे आणि म्हणून पाठ्यक्रम सध्यां बंद करावा लागला. असें असलें तरी १९५९ सालांत सहा सामान्य पाठ्यक्रम आणि आग विझविण्यासंबंधीचे तीन खास पाठ्यक्रम सुरू करण्यांत

आले होते. राष्ट्रीय छात्रसेनेचे ४०६ अधिकारी आणि दिल्लीच्या नगरसेनेचे ७४ सदस्य धरून जिल्ह्यांतील नगरसैनिक या पाठ्यक्रमास हजर होते.

वरील पाठ्यक्रमांत खालील विषयांबाबतचेंहि प्रशिक्षण देण्यांत आलें:--

(१) वैयक्तिक आरोग्य, (२) अडचणीच्या वेळीं उपयोगी पडणारे प्रथमोपचार, (३) नि:शस्त्र झुंज, (४) जमाव नियंत्रण, (५) दारूबंदीचे छापे, (६) दंगल झाली असतां करावयाचीं कामें, (७) आग विझविण्याच्या बाबतींतील कामें, (८) जबाबदारीचीं (जोखमीची) कामें आणि (९) जनतेच्या हिताबाबतच्या इतर पद्धति.

### १९५९ मध्यें पार पाडलेलीं कामें :—

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या कामीं सर्व राज्यांतील नगरसेनेनें पोलीस दलास पूर्वीप्रमाणेंच साहाय्य दिलें. गुन्ह्यास प्रतिबंध करणें व रात्रींच्या गस्तीच्या वेळीं दुर्वृत्त इसमांना पकडून देणें, तसेंच, जुगार, सट्टे, खिसेकापू इ. गुन्ह्यांना आळा घालण्याचे कामीं त्यांनीं पोलिसास मदत केली आहे.

अहवालानुसार पाहतां जत्रा, उत्सव, मिरवणुका, प्रजासत्ताक दिन, म्युनिसिपल मतदान, मोहरम, गणपति उत्सव, मोठमोठ्या व्यक्तींच्या सभा, अति महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटी, प्रदर्शनें आणि अशींच, सरकारकडून आणि स्थानिक अधिकाऱ्यांकडून व्यवस्था ठेवली गेलेली इतर ठिकाणें, वगैरेसारख्या प्रसंगीं, सबंध वर्षांत त्यांनीं खूप कामगिरी बजावली आहे. पिकांचें संरक्षण करण्याच्या कामीं विदर्भांतील नगरसेनेचा उपयोग करून घेण्यांत आला.

### अग्निप्रतिबंधक व संरक्षक कार्य :-

मुंबई फायर ब्रिगेडला आग विझविण्याच्या कामीं नगरसेनेनें मदत केली आहे. १ जुलै १९५९ ते १७ ऑक्टोबर १९५९ पर्यन्त नगरसैनिक हे रात्रींच्या वेळीं आगीची वर्दी आल्यास तेथें जाण्यासाठीं हजर रहात. ज्या ज्या वेळीं फायर ब्रिगेडला आवश्यकता वाटली त्या त्या वेळीं आग विझविण्याच्या प्रमुख कामालाहि ते हजर राहिले.

सबंध वर्षाचें अवलोकन केलें तर, १ जुलै १९५९ ते १७ ऑक्टोबर १९५९ पर्यन्त, १७५ अधिकारी आणि इसम जोखमीच्या कामाच्या वेळीं हजर होते. घरें कोसळण्याच्या बाबतींत ६ वेळां जोखमीचें काम करण्यासाठीं ते हजर होते, आणि सांताक्रूझ विमानतळावर कोसळून पडलेल्या विमानाच्या वेळीं मदत करण्यास ते हजर राहिले. नगर सैनिकांनीं पुराच्यावेळींसुद्धां जबाबदारीचें काम केलें आणि सुरतेमध्यें पूर आला त्यावेळीं मुंबईचे नगरसैनिक तिकडे धांवून गेले.

खर्च :- नगरसेना संघटना ही एक ऐच्छिक संघटना असल्यामुळे सेनेंतील सदस्यांना कोणताहि मेहेनताना देण्यांत येत नाहीं. मात्र जे नगरसैनिक संचालनाच्या आणि इतर कामाच्या वेळीं नियमितपणें हजर राहतात त्यांना द. म. रु. २ वाहनभत्ता आणि द. म. रु. १ धुलाईभत्ता देण्यांत येतो. ज्यावेळीं नगरसैनिकांना कामासाठीं बोलावण्यांत येतें त्यावेळीं त्यांना रोजीं रु. २·५० इतका कामाचा भत्ता मिळतो. प्रशिक्षणाच्या शिबिरांत हजर असतांना नगरसैनिकाच्या कामाच्या भत्त्याशिवाय रोजीं रु. १ शिबिरभत्ता मिळतो. ही रक्कम त्यांना प्रत्यक्षांत देण्यांत येत नाहीं परंतु त्यांची जेवणाची व इतर व्यवस्था करण्यासाठीं ती रक्कम खर्च केली जाते.

प्रशिक्षणाकरितां नगरसैनिकांना पुरविण्यांत येणारे गणवेष, तसेंच शस्त्रें आणि दारूगोळा यासाठीं मुख्यत: खर्च येतो. तसेंच त्यांना देण्यांत येणारें काम आणि शिबिरभत्ते यासंबंधींदेखील खर्च होतो.

## १९६०-६१ या वर्षांत हातीं घ्यावयाचा नियोजित कार्यक्रमः—

(१) (१) जोखमीचें काम (२) आग विझविण्याचें काम, (३) प्रथमोपचार (४) ॲम्ब्युलन्स इ. बाबतींतील खास प्रशिक्षण पाठ्यक्रम बृहन्मुंबईतील नगरसैनिकांसाठीं सुरू करणें.

(२) दरवर्षी १ जुलै ते ऑक्टोबर मध्यापर्यंत सुरू असणाऱ्या पावसाळी मोसमांतील जोखमीचीं कामें करण्याकरितां कांहीं निवडक ३०० अधिकारी आणि माणसें मुद्दाम पाठविलीं जातात. घरें कोसळून पडणें, आग लागणें आणि इतर आकस्मिक हानीच्या कामाच्या बाबतींतील जोखमीचीं कामें ते पार पाडतात.

(३) विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशांत नगरसैनिकांची चळवळ पुनर्संघटित आणि लोकप्रिय करणें.

(४) मध्यवर्ती प्रशिक्षण मुख्यालयांतील प्रशिक्षणाच्या इतर निरनिराळ्या प्रकारांसंबंधीं प्रशिक्षणाचें क्षेत्र वाढविणें आणि मध्यवर्ती प्रशिक्षण मुख्यालयांकरितां कायमची जागा मिळवणें.

(५) नगरसैनिकांना खेड्यांत जास्तींत जास्त समाजसेवा करण्यास प्रोत्साहन देणें.

(६) ग्रामीण प्रतिकार पक्षाला नगरसेना संघटनेंत सामावून घेणें आणि राज्यांतील खूप दूरच्या खेड्यांतमुद्धां नगरसैनिकांचें कार्य वाढविणें.

(७) एकत्रित प्रदेशांत नवीन केंद्रें निर्माण करणें.

(८) नगरसंरक्षणाबाबतचें प्रशिक्षण.

### अनुदानें:—

१९६०-६१ करितां मंजूर झालेली अनुदानें खालीलप्रमाणें आहेत :—

| बृहन्मुंबई | १९६०-६१ करितां अनुदानें |
|---|---|
| | रु० |
| १. अधिकाऱ्यांचा पगार ... ... ... | २४,४०० |
| २. सेवकवर्गाचा पगार ... ... ... | २,४०,७०० |
| ३. भत्ते, मानवेतनें इ. ... ... ... | २,८९,२०० |
| ४. नैमित्तिक खर्च ... ... ... | ३,१०,००० |
| | ८,६४,३०० |
| **एच्—नगरसेना-जिल्ह्यांतील :-** | रु० |
| १. अधिकाऱ्यांचा पगार ... ... ... | ३७,७९० |
| २. सेवकवर्गाचा पगार ... ... ... | १,९७,८०० |
| ३. भत्ते, मानवेतनें इ. ... . ... | ६,३०,८२० |
| ४. नैमित्तिक खर्च ... ... ... | १,३२,३५० |
| | ९,९८,७६० |

## मुंबईचा गुन्हेगार परिवीक्षा अधिनियम, १९३८, आणि मुंबईचा सराईत गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्याबाबतचा अधिनियम, १९४७

मुंबई गुन्हेगार परिवीक्षा अधिनियम, १९३८ यामध्यें गुन्हेगारांना तुरुंगांत पाठविण्या-ऐवजीं योग्य त्या प्रकरणीं त्यांना परिवीक्षाधीन किंवा देखरेखीखालीं ठेवण्यांत यावें अशी तरतूद केली आहे. परिवीक्षा अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखालीं जर अशा लोकांना त्यांची वागणूक सुधारण्याची संधि दिली तर ते प्रामाणिक जीवन जगूं शकतील, तसेंच आणि साहजिकच समाज विरोधी वर्तन करण्याचें सोडून देतील अशी शक्यता आहे.

(२) सामाजिक न्याय सुरूं करण्याच्या दृष्टीनें, द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या योजनेच्याद्वारें हें काम करणें आवश्यक झालें आहे. मुंबई गुन्हेगार परिवीक्षा अधिनियमाचें काम करण्याकरितां जादा नोकरवर्ग नेमणें आणि प्रौढ परिवीक्षा बाबतींत गुणांचा दर्जा वाढवणें हें या योजनेचे उद्देश आहेत. याकरितां द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजनेखालीं, आधींच नेमणूक केलेले चार परिवेक्षक अधिकारी आणि योजनेखालीं नेमणूक केलेला नवीन नोकरवर्ग यांच्या-सहित, जादा जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर हें काम संघटित करण्याचें ठरविलें आहे.

**(३) द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजना:—**

मुंबई परिवीक्षा अधिनियम, १९३८ यानुसार कामाचा विस्तार करणें आणि नोकरवर्गाची नेमणूक करणें.

मुंबई गुन्हेगार परिवीक्षा अधिनियम, १९३८ याअन्वयें काम सुरूं करण्यासाठीं नोकरवर्गाची नेमणूक करण्याकरितां ह्या योजनेंत तरतूद केली आहे. हें काम अतिशय जबाबदारीचें असल्यामुळें आणि संघटनात्मक चातुर्याचें असल्यामुळें, प्रौढ परिवीक्षेच्या बाबतींत ज्यांना पुरेशी पात्रता आहे किंवा ज्यांना पुरेसा अनुभव आहे अशा लोकांना ( इसमांना ) या कामासाठीं नेमणें आवश्यक झालें आहे. याकरितां रु. २२०-१५-३२५ या वेतनमानांत, मुख्य अधिकारी नेमण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक मुख्य-अधिकारी एका जिल्ह्यांत काम सुरूं करील आणि जेव्हां कामांत सुधारणा होईल तेव्हां त्याला एक जिल्हा परिवीक्षा अधिकारी मदत करील. समन्वय आणि मार्गदर्शन याद्वारें जिल्ह्यांतील कामाचा योग्य पद्धतीनें विकास करण्याच्या दृष्टीनें मुख्य कार्यालयांत खालील नोकरवर्गाची नेमणूक करण्याचें योजिलें आहे.

(१) एक परिवीक्षा सुपरिंटेंडेंट ( राजपत्रित वर्ग दोन-रु. ३००-६०० ).

(२) एक कनिष्ठ कारकून ( रु. ४६-३-८५- रोध -४-१२५-५-१३० ).

(३) एक पट्टेवाला ( रु. ३०-½-३५ ).

**(४) १९६०-६१ मधील कामें :—**

पश्चिम खानदेशांतील जिल्ह्यासहि हा अधिनियम लागूं करण्याचें योजिलें आहे. धुळें येथें मुख्यालय ठेवण्यांत येऊन सबंध जिल्ह्यांत काम सुरूं करण्यासाठीं एक मुख्य अधिकारी आणि १ पट्टेवाला यांची नेमणूक करण्यांत येईल. आतांपर्यंत पुणें, नाशिक, उत्तर सातारा, दक्षिण सातारा, ठाणें, कोल्हापूर आणि पूर्व खानदेश या जिल्ह्यांत ७ मुख्य अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली आहे. पुणें आणि नाशिक येथील प्रत्येक मुख्य अधिकाऱ्याला एक जिल्हा परिवीक्षा अधिकारी मदत करतो.

दोन जादा जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्यांनीं सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यांत स्वतंत्रपणें काम संघटित करणें सुरू केलें आहे. ७ मुख्य अधिकारी, चार जिल्हा परिवीक्षा अधिकारी आणि नऊ पट्टेवाले यांच्या जागा १९६०-६१ या वर्षांत चालू राहतील.

परिवीक्षा सुपरिंटेंडेंट हा, मुंबई गुन्हेगार परिवीक्षा अधिनियमाच्या कामासाठीं, नेमण्यांत आलेले मुख्य अधिकारी आणि जिल्हा परिवीक्षा अधिकारी यांच्या कामाचा समन्वय करील आणि त्यावर देखरेख ठेवील. प्रशासकीय स्वरूपाच्या कार्यालयांतील नेहमींचें काम करण्यासाठीं मुख्य कार्यालयांत आवश्यक असे कनिष्ठ कारकून आणि पट्टेवाला यांची नेमणूक करण्याचें योजिलें आहे.

(५) १९६०-६१ मध्यें, महाराष्ट्रांत सध्यां अस्तित्वांत असलेला स्थानिक अधिनियम, म्हणजेच 'मुंबई गुन्हेगार परिवीक्षा अधिनियम' याऐवजीं, गुन्हेगार परिवीक्षा अधिनियम, १९५८, (मध्यवर्ति अधिनियम २०) हा अंमलांत येण्याची शक्यता आहे. मध्यवर्ति अधिनियमांची अंमलबजावणी करण्यात आल्यामुळें कामाचा बोजा वाढेल असा संभव आहे. चौकशी आणि अहवाल यांकरितां अठरा वर्षे वयाच्या वरील सर्व संशयित गुन्हेगारांचीं प्रकरणें न्यायालयाला परिवीक्षा अधिकाऱ्यांकडे सोपवावीं लागतील. ह्यामुळें, ह्या कामाकरितां, जिल्हा कार्यालयांत कारकून आणि परिवीक्षा अधिकारी यासारख्या जादा नोकरवर्गास मंजुरी देणें आवश्यक झालें आहे.

(६) द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधीच्या अखेरीस, मुंबई गुन्हेगार परिवीक्षा अधिनियमासंबंधींचें काम फक्त ११ जिल्ह्यांत चालू होईल. तृतीय पंचवार्षिक योजनेच्या कालांत, महाराष्ट्राच्या उरलेल्या जिल्ह्यांतील हें काम संघटित करावें लागेल.

(७) सन १९६०–६१ च्या अंदाजपत्रकांत, योजनांतर्गत योजनांकरितां रु. ९६,१०० इतक्या रकमेची अंदाजपत्रकीय तरतूद करण्यांत आली आहे. अधिनियमांखालील योजनेतर कामाकरितां १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत रु. १९,८३० इतक्या रकमेची तरतूद करण्याचें योजिलें आहे.

" ४७-संकीर्ण विभाग-एच-संकीर्ण-एच–११–सराईत गुन्हेगार आणि गुन्हेगार परिवीक्षा यासंबंधींची योजना " ह्या हिशेबाच्या सदरांमध्यें हा खर्च खर्चखातीं टाकण्यांत आला आहे.

**दोन. मुंबईचा सराईत गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्याबाबतचा अधिनियम, १९४७ः—** ह्या अधिनियमानुसार, कांहीं विशिष्ट प्रदेशांत सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर निर्बंध घालणें, आणि त्याचप्रमाणें, सरकारनें ह्या कारणासाठीं स्थापन केलेल्या वसाहतींत त्यांस किंवा तिला ठेवणें यासंबंधींची तरतूद करण्यांत आली आहे. गुन्हेगार जमातींबाबतच्या अधिनियमाप्रमाणेंच मुंबईत सराईत गुन्हेगारावर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम सर्व जमातीच्या आणि जातीच्या लोकांना लागू करण्यांत आला आहे. हीं बंधनें केवळ क्रमप्राप्त म्हणून लादण्यांत येत नाहींत तर अधिनियमान्वयें, विहित केलेली न्यायविषयक चौकशी पूर्ण झाल्यानंतरच तीं लादण्यांत येतात.

२. ह्या अधिनियमानुसार, वसाहतींमध्यें राहणाऱ्यांना योग्यशा व्यवसायांचें व उद्योगधंद्यांचें प्रशिक्षण देण्याची तरतूद करण्यांत आली आहे. वसाहतींत राहणाऱ्या इसमांना योग्य देखरेखीखालील शिक्षणामुळें प्रामाणिक आणि उद्योगी जीवन जगणें शक्य व्हावें, म्हणून त्यांना पुरेसें कौशल्य प्राप्त करून घेतां येतें.

३. वसाहतीमधील, गुन्हेगारांना व्यक्तिगत सहाय्य करणारे लोक, योग्य नोकऱ्या शोधणें, त्यांच्या कुटुंबियांमध्यें सलोखा निर्माण करणें इ. बाबतींत गुन्हेगारांना मदत करतात, व त्याशिवाय, त्यांना उपयुक्त नागरिक म्हणून स्थायिक होण्यासाठीं मदत करतात.

४. योग्य त्या प्रकरणीं, वसाहतींत राहणाऱ्यांना, त्यांच्याबरोबर राहण्यासाठीं, त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांना आणि कुटुंबियांना आणण्यासाठीं परवानगी देण्यांत येते. अशा वसाहतीमध्यें कामाच्या आवश्यक त्या सोयी, अन्नधान्य, हत्यारें, अवजारें, शिक्षण, औषध इत्यादि गोष्टींसाठीं अर्थसहाय्य मिळूं शकतें. वसाहतीमध्यें नेहमींच्या कौटुंबिक जीवनाची सोय केल्यामुळें, सराईत गुन्हेगारांना त्यांच्यावरील निर्बंधाची मुदत संपल्यावर समाजांत पुनर्वसन करतां येण्यास फार मदत होते.

५. ह्याप्रमाणें, अधिनियमाचा उद्देश, गुन्ह्यापासून परावृत्त करण्याचा नसून सुधारणा करण्याचा आहे. सराईत गुन्हेगारांना, त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाची शक्यता दृढ करून, सर्वसाधारण कायदा पाळणाऱ्या नागरिकांप्रमाणें त्यांना समाजांत जीवन जगतां यावें म्हणून, त्यांची सुधारणा आणि पुनर्वसन करण्याचा ह्या अधिनियमाचा उद्देश आहे.

६. विजापूर आणि खानापूर येथें स्थापन केलेल्या दोन वसाहती, १९५६ च्या राज्य-पुनर्रचनेमुळें, म्हैसूर राज्यांत गेल्या आहेत. म्हैसूर सरकारशीं खास वाटाघाटी केल्यामुळें, महाराष्ट्र राज्यांतील सराईत गुन्हेगारांना, विजापूर येथील वसाहतींत पाठविण्यांत आलें असून त्याकरितां, महाराष्ट्र सरकार म्हैसूर सरकारला त्या प्रमाणांत, दरडोई खर्च देतें. ही व्यवस्था १-११-६१ पर्यंत मान्य झालेली आहे आणि म्हैसूर सरकारला ही मुदत १-११-६१ पासून ३ वर्षें वाढविण्याची विनंति करण्यांत आली आहे.

७. चालू स्थानिक अधिनियमाऐवजीं, बहुतकरून सन १९५९ चा, मुंबई सराईत गुन्हेगारांसंबंधीं सुधारलेला अधिनियम, सन १९६०-६१ मध्यें, अंमलांत आणण्यांत येईल.

८. सन १९६०-६१ करितां रु. ५३,६०० इतक्या रकमेची, मागणी करणारें अंदाजपत्रक, सरकारला सादर करण्यांत आलें आहे. ह्या राज्यांतून विजापूर वसाहतीमध्यें पाठविण्यांत आलेल्या लोकांसाठीं लागणारा खर्च म्हणून म्हैसूर सरकारला द्यावा लागणाऱ्या दरडोई खर्चाच्या रु. १४,४०० इतक्या रकमेचा ह्या अंदाजपत्रकांत समावेश केला आहे.

९. "४७-संकीर्ण विभाग-एच-संकीर्ण-एच-११-सराईत गुन्हेगार आणि गुन्हेगार परिवीक्षा यासंबंधींच्या योजना" ह्या हिशोबाच्या सदराखालीं हा खर्च खर्चखातीं घालण्याजोगा आहे.

## मुंबईतील सरकारी वाहतूक सेवा

मुंबई शहराला भेट देणाऱ्या शिष्टमंडळांची आणि सन्माननीय पाहुण्यांची संख्या वाढत आहे. जरी अशा सन्माननीय पाहुण्यांसाठीं सरकारी वाहतूक सेवेकडे योग्य अशा गाड्यांची संख्या मर्यादित असली तरी, जास्त संख्येनें येणाऱ्या शिष्टमंडळांकरितां वाहतुकीची व्यवस्था करण्याकरितां विचारणा करण्यांत येते. अशा शिष्टमंडळांसाठीं ठरविलेले कार्यक्रम भरगच्च असतात आणि सरकारी वाहतूक सेवेला नेमून दिलेलीं कामें योग्य तऱ्हेनें पार पाडावीं लागतात व वाहनें वेळेवर ठरलेल्या ठिकाणीं हजर होतात कीं नाहीं व तीं योग्य तऱ्हेनें चालतात कीं नाहीं तें पहावें लागतें. कांहीं प्रसंगीं सरकारी वाहतूक सेवेला बाहेरच्या संस्थांकडून वाहनें भाड्यानें घ्यावीं लागतात व त्यांना मार्गदर्शन व सूचना द्याव्या लागतात आणि अशा-प्रकारची जबाबदारीची कामगिरी ड्रायव्हर्स सहसा करीत नाहींत. सरकारी वाहतूक सेवेला प्रत्येक वेळीं योग्य ती देखरेख व नियंत्रण ठेवावें लागतें. मुंबई शहराला तात्पुरती भेट देणाऱ्या महत्त्वाच्या आणि श्रेष्ठ व्यक्तींच्या आणि परदेशी शिष्टमंडळांच्या वाहतुकीची सोय करणें, हें सरकारी वाहतूक सेवेच्या मुख्य

कार्यांपैकीं एक कार्य आहे. त्याचप्रमाणें, निरनिराळ्या सरकारी विभागांना आणि सरकारी अधिकाऱ्यांना व भेट देणाऱ्या केंद्रीय आणि राज्य मंत्री यांना त्यांच्या वाहतुकीची सोयही सरकारी वाहतूक सेवा करते.

२. वर दिलेल्या कामाशिवाय, सरकारी वाहतूक सेवेला करावयाचें प्रमुख कार्य खालीं दर्शविल्याप्रमाणें आहेः—

(१) भेट देणाऱ्या निवडक लोकांसाठीं मोटार गाड्या, सरकारी-वाहतूक-सेवा वाहनें व विकास विभागाच्या जीप गाड्यांची व्यवस्था व दुरुस्ती.

(२) महाराष्ट्र राज्यांतील मंत्री, विधानपरिषदेचे अध्यक्ष व विधानसभेचे सभापति यांच्या गाड्यांची व्यवस्था व दुरुस्ती.

(३) शक्य असेल त्या त्या वेळीं इतर सरकारी विभागांच्या व सरकारी अधिकाऱ्यांच्या मालकीच्या वाहनांची दुरुस्ती.

(४) दुरुस्तीच्या अंदाजे खर्चाला आळा बसावा म्हणून सरकारी विभागाच्या मालकीच्या वाहनांची पाहणी.

(५) सरकारी विभागाच्या मालकीच्या वाहनांची तपासणी करणें व त्यांच्या स्थितीबद्दल अहवाल सादर करणें, वगैरे.

(६) जिल्ह्यांत दुरुस्त केलेल्या सरकारी वाहनांच्या दुरुस्ती-बिलांची आणि बिलांतील आकार योग्य असल्याबद्दलचा दाखला देण्यासाठीं पाठविण्यांत आलेल्या बिलांची छाननी.

## मुंबई राज्य पथ परिवहन कॉर्पोरेशन, मुंबई

कांहीं किरकोळ मार्ग सोडून मुंबई राज्य पथपरिवहन संस्थेच्या कार्यक्षेत्राखालील भागांतील उतारूंच्या वाहतुकीचें राष्ट्रीयीकरण द्वितीय पंचवार्षिक योजनाकालांतील पहिल्या वर्षी तत्त्वत: पूर्ण करण्यांत आलें. त्यामुळें, द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या उरलेल्या कालावधींत सदरहू संस्थेचें कार्य मुख्यतः विद्यमान सेवा दृढ पायावर उभी करणें तिची सुधारणा करणें, यापुरतेंच मर्यादित राहतें. सन १९५९-६० ह्या वर्षाच्या अखेरीस कॉर्पोरेशनजवळ महाराष्ट्र प्रदेशांतील, ४३,१४८ मैल अंतराच्या १,३५६ मार्गासाठीं एकूण १,८७० बसेस होत्या. संयुक्त मुंबई राज्य पथपरिवहन कार्पोरेशन्साठीं द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधींतील, रु.७४६·००लाख इतक्या एकूण भांडवली खर्चापैकीं रु. ५२९·४४ लाख इतकी रक्कम योजनेच्या पहिल्या चार वर्षांत खर्च करण्यांत आली असून, १९६०–६१ ह्या वर्षासाठीं रु. २१६·५६ लाख इतकी रक्कम शिल्लक उरली आहे. ह्या रकमेपैकीं, रु. १५०·३७ लाख इतकी रक्कम महाराष्ट्र प्रदेशासाठीं खर्च करण्यांत येईल.

१९६०–६१ ह्या आर्थिक वर्षी, कोणतीहि प्रमुख स्वरूपाची वाढ करण्याचा कॉर्पोरेशनचा विचार नाहीं. ह्याचा परिणाम म्हणून विद्यमान सेवेचें दृढीकरण आणि सुधारणा करणें आणि नवीन किरकोळ मार्ग हातीं घेणें यापुरतेंच या संस्थेचें कार्य मुख्यतः चालू राहील. ह्या वर्षाकरिता नियोजित केलेल्या विस्तारीत कार्यक्रमानुसार, महाराष्ट्र प्रदेशांतील ६५ जादा मार्गांवर जादा ८० वाहनें सुरू करणें आवश्यक आहे. त्याशिवाय, संस्थेनें, जुन्या २३८ बसेस ऐवजी नवीन डीझेल बसेस सुरू करण्याचे योजिले आहे आणि त्याकरितां जुन्या बसेसपेक्षां, नवीन बसेसच्या वाढलेल्या किंमतीमुळें होणारा जादा खर्च भागविण्यासाठीं सुद्धां तरतूद करण्यांत आली आहे. १९६०-६१ ह्या वर्षी, ३१८ चेसिसवर वाहनें बांधण्याचा कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. महाराष्ट्र प्रदेशांतील वाहनांकरिता एकूण रु. ६६·१८ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे.

सन १९६०–६१ च्या अन्दाजपत्रकांत महाराष्ट्र प्रदेशाकरितां तरतूद करण्यांत आलेल्या बांधकामाच्या कार्यक्रमांत चालूं कामाचा उदा०, १ कारखाना, १ डेपो, ५ सब डेपो, १ विभागीय नियंत्रकाचें कार्यालय आणि १६ बस स्टेशनें, ह्यांचा समावेश करण्यांत आला आहे; ह्यापैकीं ३ सब डेपो आणि ६ बस स्टेशनें ह्यांचें बांधकाम या वर्षी पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. सन १९६०–६१ च्या अन्दापजत्रकांत, ह्या बांधकामासाठीं रु. ५८·४३ लाखाची तरतूद करण्यांत आली आहे. यंत्रसंच, यंत्रें आणि साधनसामुग्री यांकरिता रु. ६·७२ लाख इतक्या रकमेची आणि कॅनेडियन सहाय्यामधून दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या जबाबदारीसंबंधी रु. १९·०४ लाख इतक्या रकमेची तरतूद केलेली आहे.

ह्याप्रमाणें, महाराष्ट्रांतील प्रदेशाकरिता एकूण रु. १५०·३७ लाख भांडवली खर्चयेईल ह्यापैकीं, राज्य सरकारचा हिस्सा रु. ४१·०३ लाख इतका असून केंद्र सरकारचा हिस्सा रु. १८·१७ लाख इतका असेल उरलेली रु. ९१·१७ लाख इतकी रक्कम कॉर्पोरेशनच्या स्वतःच्या उत्पन्नांतून भागविण्यांत येईल.

## प्रादेशिक वाहतूक सेवा, नागपूर

राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेली विदर्भामधील उतारूं वाहतूक सेवा, ही राज्य सरकारच्या मालकीच्या, व्यवस्थापक मंडळामार्फत चालविण्यांत येत असलेल्या प्रादेशिक वाहतूक सेवा, नागपूर ( यु. जी. ओ. ) म्हणून माहीत असलेल्या संस्थेकडून चालविण्यांत येत आहे.

वाहतुकीच्या विकासाकरितां, पूर्वीच्या मध्य प्रदेश सरकारनें, द्वितीय पंचवार्षिक योजनेंत कांहींच तरतूद केली नसल्यामुळें, नागपूर येथील प्रादेशिक वाहतूक सेवेला, ह्या प्रदेशांतील वाहतुकीचा विकास करण्याकरितां, मुख्यत: आपल्या स्वतःच्या उत्पन्नावर अवलंबून राहावें लागलें आहे आणि ह्याचा परिणाम म्हणून विदर्भ प्रदेशांतील उतारू–वाहतूक सेवेच्या राष्ट्रीयीकरणाचें काम मंदगतीनें होत आहे. खरें पाहूं गेल्यास मुंबई सरकार द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत भांडवली खर्चासाठीं रु. ३० लाख ( १९५७–५८ मध्यें १० लाख व १९५९–६० मध्यें २० लाख ) इतकी रक्कम वर्गणी रूपानें देण्यास तयार असतांहि, सध्यां ह्या प्रदेशांतील मार्गांचें राष्ट्रीयीकरण फक्त चालूं मार्गांच्या २९ टक्के इतकेंच आहे.

प्रादेशिक वाहतूक सेवा, नागपूर या संस्थेच्या अधिकार क्षेत्राखालीं ३१-३-१९६० रोजीं असलेली मार्गांची संख्या, दर दिवशीं तोडण्यांत येणारें अंतर, वाहनांची संख्या इत्यादि दर्शविणारा तक्ता खालीं दर्शविला आहे:—

| क्रमांक | तपशील | ३१–३–१९६० रोजीं असलेली परिस्थिति |
|---|---|---|
| १ | मार्गांची संख्या | ९४ |
| २ | दर दिवशीं तोडण्यांत येणारे अंतर | २१,०८५ |
| ३ | वाहनें | २५७ |
| ४ | दर दिवशीं रस्त्यावरील वाहनांची सरासरी संख्या | १९० |

१९६०-६१ या वर्षाकरितां ठरविलेले प्रत्यक्ष उद्दिष्ट दाखविणारा तक्ता खाली दिला आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मार्गांची संख्या | ४० |
| २ | मार्गांची लांबी | १,१९८ |
| ३ | वाहनें | |
| | (अ) वाढ करावयाचीं | २० |
| | (ब) बदली करावयाचीं | ११ |
| ४ | डेपो | ३ |
| ५ | बस स्टेशनें | ४ |
| ६ | कारखाना | १ |

१९६०-६१ ह्या वर्षाकरितां, अंदाजपत्रकांतील रु. २७·०६ लाख इतक्या रकमेची तरतूद खालीं दिल्याप्रमाणें केली आहे.

| | | लाख रुपयांत |
|---|---|---|
| १ | जमीन | १·४९ |
| २ | इमारती | ११·३० |
| ३ | वाहनें | १२·३७ |
| ४ | यंत्रसंच, यंत्रसामुग्री आणि साधनसामुग्री | १·९० |
| | | २७·०६ |

**जमीन व इमारती :-**

ह्या मुख्य सदराखालीं तरतूद करण्यांत आलेली रु. १२·७९ लाख इतकी रक्कम वर्धा, नागपूर, नळेगांव, कटोल, कारंजा, बोरी, पुलगांव, कळंब इत्यादीसारख्या १४ ठिकाणीं जमीन खरेदी करण्याकरितां आणि तेथें डेपो आणि बस स्टेशनें बांधण्यासाठीं उपयोगांत आणण्याचें योजिलें आहे.

इमारती दाखलच्या तरतुदीचा बराचसा भाग, नागपूर येथें आधींच सुरू करण्यात आलेल्या कारखान्याच्या बांधकामावरील खर्चासाठीं म्हणून देण्यांत आला आहे.

**वाहनें :-**

ह्या वर्षी ३१ वाहनें खरेदी करण्याचें योजिले असून त्यापैकीं २० वाहनें ही विस्ताराकरितां आणि ११ जुनीं बदलण्याकरितां आहेत आणि त्याकरितां भांडवली अंदाजपत्रकांत रु. १२·३७ लाखाची तरतूद करण्यांत आलेली आहे.

**यंत्रसंच, यंत्रसामुग्री आणि साधनसामुग्रीः—**

चालू वर्षामध्यें बांधावयाचे नवीन डेपो आणि बस स्टेशन या करितां आवश्यक असलेला यंत्रसंच, यंत्रसामुग्री आणि साधनसामुग्री खरेदी करण्याकरितां 'यंत्रसंच आणि यंत्रसामुग्री' या सदराखालीं रु. १·९० लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

**राज्य वाहतूक ( मराठवाडा ), औरंगाबादः—**

मराठवाड्यांतील सार्वजनिक बांधकाम विभागांतील रस्ते आणि प्रमुख जिल्हा रस्ते यावरील उतारू-वाहतूक सेवेचें संपूर्णपणें राष्ट्रीयीकरण झालेलें आहे.

मराठवाडा प्रदेशांतील पथ परिवहन विकासासाठीं, द्वितीय पंचवार्षिक योजनेंत कांहींच तरतूद करण्यांत आलेली नाहीं आणि राज्यपुनर्रचनेनंतर राज्य-परिवहन [ मराठवाडा ]च्या मागील वर्षातील सर्व भांडवली खर्च राज्यसरकारनें वर्गणीरूपानें दिला आहे.

वर विवरण केल्याप्रमाणें, सार्वजनिक बांधकाम विभागांतील रस्ते आणि प्रमुख जिल्हा-रस्ते यावरील बहुतेक सर्व मार्गांचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें असलें तरी, मराठवाड्यांतील मार्गांचें राष्ट्रीयीकरण, एकूण चालू मार्गांच्या फक्त ६६ टके इतकेंच झालें आहे; कारण सध्यां बरेचसे मार्ग खाजगी संस्थांकडून वापरले जात असून ते कच्च्या मार्गावरील आहेत.

३१-३-१९६० रोजीं राज्य परिवहन सेवेच्या अधिकार-क्षेत्राखालीं असणाऱ्या मार्गांची संख्या, दर दिवशीचें अंतर, वाहनांची संख्या इ. गोष्टी दाखविणारा तक्ता खालीं दिला आहे.

| अनुक्रमांक | तपशील | ३१-३-१९६० रोजीं असलेली परिस्थिति |
|---|---|---|
| १. | मार्गांची संख्या | १२१ |
| २. | दरदिवशीं तोडण्यांत येणारें अंतर | २५,८८२ |
| ३. | वाहनांची संख्या | २६७ |
| ४. | दरदिवशीं रस्त्यावरील वाहनांची सरासरी संख्या | १६८ |

१९६०-६१ करिता ठरविलेलें प्रत्यक्ष उद्दिष्ट दर्शविणारा तक्ता खालीं दिलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मार्गांची संख्या | १४ |
| २. | मार्गांचें अंतर | ३७९ |
| ३. | वाहनांची संख्या | १५ |
| ४. | डेपो | १ |
| ५. | बस स्टेशनें | ५ |
| ६. | बस स्टँड | ३९ |
| ७. | कारखाना | १ |
| ८. | मुख्य कार्यालय | १ |
| ९. | नोकरवर्गाकरितां राहण्याचीं घरें | ५२ |
| १०. | दवाखाने | २ |

सन १९६०-६१ ह्या वर्षाकरितां खालीं दर्शविल्याप्रमाणें अंदाजपत्रकांत रु. २३·४६ लाख इतक्या रकमेच्या खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे.

| | | लाख रुपयांत |
|---|---|---|
| १. | जमीन | १४·९० (१ व २ मिळून) |
| २. | इमारत | |
| ३. | वाहनें | ७·५० |
| ४. | यंत्रसंच, यंत्रसामुग्री आणि साधनसामुग्री | ०·६० |
| | एकूण... | २३·६० |

**जमीन आणि इमारती :-**

औरंगाबाद, नांदेड, जालना आणि पुरली येथें जमीन खरेदी करण्याकरितां आणि महत्त्वाच्या १८ वाहतूक केंद्रांच्या ठिकाणीं बस स्टेशनचें बांधकाम करण्याकरितां, ह्या मुख्य सदराखालीं रु. १४·९० लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

'इमारती' ह्या सदराखालील तरतुदीचा बराचसा भाग, औरंगाबाद येथें अगोदरच सुरू केलेल्या विभागीय कारखाना आणि कार्यालय यांच्या बांधकामांचा खर्च म्हणून अंदाजपत्रकांत दाखविण्यांत आला आहे.

**वाहनें :-**

चालू वर्षांत विस्ताराच्या कामांकरिता १५ वाहनें खरेदी करण्याचें योजिलें आहे आणि ह्या उद्देशाकरितां भांडवली अंदाजपत्रकांत रु. ७·५० लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

**यंत्रसंच आणि यंत्रसामुग्री :–**

औरंगाबाद येथें बांधावयाच्या विभागीय कारखान्याकरितां आणि कार्यालयासाठीं आणि बस स्टेशन-करितां आवश्यक असलेली यंत्रसामुग्री, यंत्रसंच आणि साधनसामुग्री खरेदी करण्याकरितां रु. ०·६० लाख इतक्या रक्कमेची तरतूद करण्यांत आली आहे.

सध्यां प्रादेशिक वाहतूक सेवा (नागपूर) आणि राज्य वाहतूक सेवा (मराठवाडा) ह्यांच्या नियंत्रणाखालीं असलेल्या प्रदेशांत मुंबईराज्य पथ परिवहन कॉर्पोरेशनच्या नियंत्रणाच्या प्रदेशाचा विस्तार करण्याची योजना, १९६०–६१ मध्यें अंमलांत आणण्यासंबंधीं सरकारचा विचार चालू आहे.

**मोटार वाहतूक विभागः—**

१. ह्या विभागाला मोटार वाहतूक विभाग असें म्हणतात. ह्या विभागास (१) मोटार वाहतूक अधिनियम, १९३९ आणि मुंबई मोटर वाहनांसंबंधींचे नियम १९५९, (२) मुंबईचा मोटार वाहनांवरील कराबाबत अधिनियम १९५८, आणि मुंबईचे मोटर वाहनांवरील कराबाबत केलेले नियम, १९५९, (३) मुंबई मोटर वाहनें (उतारूंवरील दर आकारणी) अधिनियम आणि नियम १९५८ आणि (४) मोटर गाड्या (वांटप आणि विक्री) नियंत्रण आदेश १९५९, ह्यांत केलेल्या तरतुदींची, महाराष्ट्र राज्याकरितां अंमलबजावणी करावी लागते. हा विभाग दळणवळण संचालक, मुंबई यांच्या नियंत्रणाखालीं आहे.

२. ह्या विभागाचा कारभार सुरळीत चालावा व मोटारींतून प्रवास करणाऱ्या लोकांची सोय व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्याची पांच प्रदेशांत विभागणी करण्यांत आली आहे. त्याच कारणांकरितां, सहाय्यक प्रादेशिक वाहतूक अधिकाऱ्यांची ३ कार्यालयें सुद्धां स्थापन करण्यांत आली आहेत.

प्रादेशिक वाहतूक कार्यालयांचीं मुख्यालयें मुंबई, ठाणें, पुणें, नागपूर आणि औरंगाबाद येथें आहेत आणि सहाय्यक प्रादेशिक वाहतूक कार्यालयांचीं मुख्यालयें नाशिक, कोल्हापूर आणि अमरावती येथें स्थापन करण्यांत आलीं आहेत. हीं प्रादेशिक कार्यालयें, प्रादेशिक वाहतूक अधिकाऱ्यांच्या अधिकाराखालीं असून हे अधिकारी, त्यांच्या संबंधित प्रदेशाकरितां असलेल्या, प्रादेशिक वाहतूक प्राधिकारी, नोंदणी करणारे प्राधिकारी, कर बसविणारे प्राधिकारी आणि लायसेन्स देणारे प्राधिकारी ह्यांचे चिटणीस म्हणून सुद्धां काम करतात. सर्व उप-प्रदेश हे सहाय्यक प्रादेशिक वाहतूक अधिकाऱ्यांच्या अधिकाराखालीं असून, हे अधिकारी त्यांच्या नियंत्रणाखालीं असलेल्या जिल्ह्यांचें नोंदणी प्राधिकारी, कर बसविणारे प्राधिकारी आणि लायसेन्स देणारे प्राधिकारी म्हणून काम पाहतात.

३. महाराष्ट्र राज्याचे वाहतूक संचालक हे राज्य वाहतूक प्राधिकाऱ्यांचें चिटणीस आणि कार्यकारी अधिकारी म्हणून काम करतात. सन १९३९ च्या मोटर वाहतूक अधिनियमाच्या कलम ४४ (३) या अन्वयें राज्य वाहतूक प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य, यांना देण्यांत आलेल्या अधिकारांनुसार, राज्यांतील प्रादेशिक वाहतूक प्राधिकाऱ्यांच्या कार्यक्रमांचा समन्वय करतात. राज्य वाहतूक प्राधिकाऱ्यांमध्यें, चार सरकारी आणि सहा बिनसरकारी चिटणीस, असा एकूण १० सभासदांचा समावेश होतो. महाराष्ट्र सरकारचे कृषि आणि वनविभागाचे सचिव हे प्राधिकारांचे अध्यक्ष आहेत. ह्याशिवाय, वाहतूक संचालक हे मोटार वाहतूक अधिनियम १९३९ च्या भाग ३ याअन्वयें नोंदणी करणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून संमत केलेल्या आदेशानुसार अपिलेट प्राधिकारी म्हणून आणि मुंबई मोटार वाहनांच्या करांसंबंधींचा अधिनियम १९५८ याअन्वयें शंभराहून कमी वाहनें असलेल्या मालकांच्या बाबतींत कर आकारणी करणाऱ्या प्राधिकाऱ्यांनीं संमत केलेल्या आदेशा-नुसारहि अपिलेट प्राधिकारी म्हणून काम करतात. वाहतूक संचालक हे, मुंबई मोटर वाहनांच्या करांसंबंधीं अधिनियम १९५८, यानुसार कर आकारणी करणारे प्राधिकारी म्हणून आणि मुंबई मोटर वाहतूक (उतारूंची कर आकारणी) अधिनियम, १९५८, यानुसार अनेक स्टेज कॅरेजीसचे मालकासंबंधीं कर आकारणी करणारे

प्राधिकारी म्हणून काम पाहतात. त्याशिवाय, वाहतुकीचे संचालक हे, मोटर गाड्या [वाटप आणि विक्री] नियंत्रण आदेश १९५९ ह्यानुसार उक्त आदेशांच्या कक्षेत येणाऱ्या गाडयांची पुन्हा विक्री करण्यास परवानगी देण्याकरितां नेमलेले अधिकारी म्हणून काम पाहतात. वाहतूक संचालक हे सरकारी वाहतूक संघटनेचे प्रमुख नियंत्रक आहेत. ही संघटना, सरकारी वाहनांची व्यवस्था राखणारा सेवा विभाग म्हणून काम करते; विभागाच्या कामकाजांमध्यें, वाहतूक संचालकांना उप संचालकाकडून साहाय्य मिळतें.

४. १९५६ मध्यें मुंबई राज्याची पुनर्रचना करण्यांत आल्यानंतर, राज्याच्या निरनिराळ्या प्रदेशांना लागू असणारे कर आकारणी संबंधींचें अधिनियम एकत्रित करण्यांत आले आणि त्यावेळच्या संपूर्ण मुंबई राज्याला लागू असणारा, मुंबई मोटर वाहनासंबंधी कर आकारणी अधिनियम १९५८, असा एकच अधिनियम, १ एप्रिल १९५८ पासून अंमलांत आणला गेला. त्यानंतर मुंबई मोटर वाहनासबंधीच्या कर आकारणीचे नियम १९५९, ह्या नावानें संबोधिले जाणारे कर आकारणीचे एकत्रित नियम, १-४-१९५९ पासून अंमलांत आणले. राज्याचें द्विभाषिक झाल्यानंतर तेच कर आकारणीसंबंधींचे अधिनियम आणि नियम महाराष्ट्र राज्यांत अंमलांत आणले आहेत.

१०० किंवा त्याहून अधिक वाहतुकीची वाहनें असणाऱ्या मालकाशिवाय, फक्त संबंधित प्रदेशांत किंवा उपप्रदेशांत धांवणाऱ्या मोटर वाहनांसंबंधीं कर आकारणी करण्याचे आणि मोटर वाहन कर वसूल करण्याचे प्राधिकार, प्रादेशिक वाहतूक अधिकाऱ्यांना आणि सहाय्यक प्रादेशिक वाहतूक अधिकाऱ्यांना देण्यांत आले आहेत. हे अधिकारी, नियमितपणें मुख्यालयांत आणि जिल्ह्यांतील ठिकाणीं त्याचप्रमाणे मोटारींतून प्रवास करणाऱ्या लोकांना सोयिस्कर व्हावें म्हणून कांहीं निवडक ठिकाणीं कर गोळा करतात. कर आकारणी करण्यापूर्वी तीन महिने अगोदर मोटारीच्या मालकांना त्यांच्याकडून मोटारीबाबतचा कर येणें असल्याबद्दल, प्रादेशिक भाषेंत स्थानिक वर्तमानपत्रांत नियमितपणें सूचना देण्यांत येतात, व ज्या वाहनांच्या बाबतींत कर देण्यांत आला आहे त्या वाहनांकरितां प्रतीकें देण्यांत येतात.

कर चुकविण्याच्या प्रकरणांना आळा घालण्यासाठीं "कर-सूचि" कार्डांचें वेळोवेळीं परीक्षण करण्यांत येते. अशा बाबतीत वाहनांच्या मालकांना, दंडासहित कर भरण्याबाबत आदेश देणाऱ्या सूचना देण्यांत येतात. जे कर भरत नाहींत, किंवा अपराधाबाबत तडजोड करण्याचें कबूल करीत नाहींत अशा इसमांवर न्यायालयांत खटले भरण्यांत येतात. सर्व प्रदेशांमध्यें पोलिसांच्या साहाय्यानें दर तीन महिन्यांनीं अचानक तपासणी करण्यांत येते. संबंधित प्रदेशांतील किंवा उपप्रदेशांतील कार्यकारी नोकरवर्ग, मुंबई येथील वाहतूक संचालकांच्या कार्यालयाशीं संलग्न असलेले अंमलबजावणी करणारे पर्यवेक्षक यांच्याकडून देखील हें अचानक तपासणीचें काम करण्यांत येतें, व जर दोषी असणाऱ्या इसमांनीं, मागणी केलेली कराची व दंडाची रक्कम भरली नाहीं तर त्यांच्यावर खटले भरण्यांत येतात. जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणेंच येणें असलेली कराची थकबाकी देखील संबधित जिल्ह्याच्या कलेक्टरामार्फत वसूल करण्यांत येते.

मुंबईचा मोटर वाहनांबाबत अधिनियम १९५८, याअन्वयें १०० किंवा अधिक वाहनें असणाऱ्या इसमांकरितां मुंबई येथील वाहतूक संचालक हे कर वसूल करणारे प्राधिकारी आहेत. त्यानुसार १-४-५९ पासून महाराष्ट्र राज्यांतील फ्लीट-ओनर्सना वाहतुकीच्या वाहनावरील कर मुंबई येथील वाहतूक संचालकांच्या कार्यालयांत भरावा लागतो. या राज्यांत ८ फ्लीट-ओनर्स आहेत. वाहतूक संचालकांच्या कार्यालयाला फ्लीट-ओनर्सच्या मालकीच्या जवळ जवळ ६,५०० वाहनांबाबतचें काम बघावें लागतें.

## मोटर वाहनांबाबत अधिनियम १९३९, व मुम्बईचे मोटर वाहनांबाबत नियम १९५९

५. मोटर वाहतूक [सुधारणा] अधिनियम १९५६ या अधिनियमाची परिणामकारक रीत्या अंमलबजावणी व्हावी म्हणून सध्यांच्या मोटर वाहनांबाबतच्या नियमांच्या उपबंधामध्यें सुधारणा करणें प्राप्त झालें व नियमांचें एकत्रीकरण करण्याच्या वेळीं या सुधारणा विचारांत घेण्यांत आल्या

प्रादेशिक वाहतूक अधिकारी व साहाय्यक प्रादेशिक वाहतूक अधिकारी हे आपापल्या अधिकारक्षेत्रांतील नोंदणी अधिकारी आहेत. मोटर वाहनांच्या नोंदणीबाबत ह्या वर्षामधील महत्त्वाचें वैशिष्ट्य असें कीं, मोटर वाहनांबाबत अधिनियम १९३९ याचे कलम ३६ (१) याअन्वयें महाराष्ट्र सरकारनें नुकतीच एक अधिसूचना काढली असून या अधिसूचनेअन्वयें, कारखानदारांना वाहनांच्या प्रमाणित केलेल्या स्थूल वजनांत वाढ करण्याची परवानगी दिली आहे. १९५२ पर्यंतच्या नमुन्याच्या वाहनांच्या बाबतीत नोंदणी केलेल्या टराविक वजनांत १२½% वाढ व १९५३ व त्यानंतरच्या नमुन्याच्या वाहनांच्या बाबतीत नोंदणी केलेल्या टराविक वजनांत २०% वाढ याप्रमाणें व्हावयाची आहे. या आदेशाची अंमलबजावणी नोंदणी प्राधिकाऱ्यांच्याकडून होत आहे. वाहतुकीचा धंदा करणाऱ्या लोकांना नोंदणी केलेल्या टराविक वजनांत वाढ केल्याचा फायदा मिळावा म्हणून रस्त्यांवरील वाहतुकींबाबतचे सध्यां असलेले निर्बंधहि सैल करण्यांत आले आहेत. मुंबई ते नाशिक व मुंबई ते पुणें ह्या दोन राष्ट्रीय राजमार्गांवरील कांहीं भागांत निश्चित केलेली २७,००० पौण्ड माल नेण्याची मर्यादा आतां ३२,००० पौण्डापर्यंत वाढविण्यांत आली असून इतर राष्ट्रीय राजमार्ग व राज्यांतील इतर रस्त्यांसाठीं निश्चित केलेली १९,००० पौंड माल नेण्याची मर्यादा २०,०८० पौण्डांपर्यंत वाढविण्यांत आली आहे.

प्रादेशिक वाहतूक अधिकारी व सहाय्यक प्रादेशिक वाहतूक अधिकारी हे आपापल्या प्रदेशांतील व उप-प्रदेशांतील लायसेन्स देणारे प्राधिकारी असून मोटर वाहनांबाबत अधिनियमाचा भाग २ यांत व या अधिनियमान्वयें केलेल्या नियमांत दिलेलीं कर्तव्यें पार पाडतात. त्यांच्या हाताखालील कार्यकारी नोकरवर्ग हा प्रादेशिक वाहतूक अधिकाऱ्यांना व साहाय्यक प्रादेशिक वाहतूक अधिकाऱ्यांना लायसेन्स देणारे प्राधिकारी म्हणून कामें पार पाडण्यास मदत करतो. लायसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आदेशांविरुद्ध केलेल्या अपिलांच्या सुनावणीच्या बाबतींत मुंबई शहरामध्यें, मुंबईचे पोलीस कमिशनर आणि अन्यत्र जिल्हा फौजदारी न्यायाधीश हे मोटर वाहनांबाबत अधिनियम याचें कलम १३ (२) व कलम १५ (३) याअन्वयें, अपील स्वीकारणारे प्राधिकारी म्हणून काम पाहतात. हे आदेश (ए) वाहनें चालविण्याबाबतचीं लायसेन्सें देणें व त्यांचें नूतनीकरण नामंजूर करणें किंवा तीं तात्पुरतीं काढून घेणें किंवा (बी) आरोपीस वाहनें चालविण्याबाबतचीं लायसेन्सें धारण करण्यास अपात्र ठरविणें या बाबतचे असतात. तसेंच कलम १३ (२), १६ (२) आणि १२१ एफ् (४) या अन्वयें वाहतुकीचीं सार्वजनिक वाहनें चालविण्याचीं लायसेन्सें किंवा कंडक्टरचीं लायसेन्सें, इत्यादि धारण करण्याबाबत मंजुरी अगर नामंजुरी देणें किंवा तीं तहकूब करणें इत्यादींसंबंधींच्या अपिलाच्या सुनावणीसाठीं मुंबई राज्य वाहतूक प्राधिकारी हे अपील स्वीकारणारे आधिकारी म्हणून काम करतात. याबाबतचे त्यांचे अधिकार त्यांनीं चार सभासदांच्या एका समितीकडे सोंपविले आहेत.

### वाहनें हांकण्यासंबंधींची चांचणीः—

मोटर वाहनांचे निरीक्षक हे मोटर वाहनांबाबत अधिनियम, १९३९ च्या तिसऱ्या अनुसूचींत विहित केलेल्या पद्धतीनुसार, मोटर वाहनें चालवण्यास लागणाऱ्या लायकीबाबत चांचणी घेतात.

प्रादेशिक वाहतूक अधिकारी हे ( त्या त्या ) प्रदेशांतील मोटर वाहतूक धंद्यावर नियंत्रण ठेवतात आणि मोटर वाहनांबाबत अधिनियम व नियम यांच्या उपबंधानुसार, किंवा राज्य वाहतूक प्राधिकारी

किंवा राज्य सरकार यांनीं आखलेल्या धोरणानुसार आणि राज्य वाहतूक प्राधिकाऱ्यानें मोटर वाहनांबाबत अधिनियमांचे कलम ४४ (१) याअन्वयें वेळोवेळीं दिलेल्या निर्देशानुसार निरनिराळ्या वर्गांतील वाहनांना परवाने देण्याचें काम करतात. राज्य वाहतूक प्राधिकरणाच्या सदस्यांची संख्या ही प्रदेशाच्या विस्ताराप्रमाणें ६ पासून १३ पर्यंत वाढली जाते. हे सदस्य सरकारी व बिनसरकारी दोन्ही मिळून असतात. मोटर वाहनांबाबत अधिनियम, १९३९, याच्या प्रकरण ४ अन्वयें प्रादेशिक वाहतूक अधिकारी यांना दिलेल्या आदेशाविरुद्ध त्याच अधिनियमाच्या ६४ व्या कलमान्वयें, राज्य वाहतूक प्राधिकारी यांच्याकडे अपील करतां येतें प्रादेशिक वाहतूक प्राधिकाऱ्यांनीं दिलेल्या आदेशाविरुद्ध कोणतेंहि अपील करतां येत नसेल अशा बाबतींत, अधिनियमांच्या ६४-ए या कलमान्वयें राज्य वाहतूक प्राधिकाऱ्यांकडे फेरविचार करण्याबाबतचा अर्ज करतां येतो. राज्य वाहतूक प्राधिकाऱ्यानें आपल्या अपील स्वीकारण्याबाबतचे फेरविचार करण्यासंबंधींचे अधिकार पांच सदस्यांच्या एका समितीकडे सोंपविले आहेत.

प्रादेशिक वाहतूक प्राधिकाऱ्यांच्या अधिकाराखालीं लायसेन्स देणारे प्राधिकारी म्हणून काम करणारे प्रादेशिक वाहतूक अधिकारी हे सार्वजनिक वाहनें चालविण्यासंबंधींचीं अधिकारपत्रें देतात. मोटर चालविण्याचें शिक्षण देण्यासाठीं, सन १९५९ च्या मुंबईच्या मोटर वाहनासंबंधींच्या नियमांतील २० व्या नियमान्वयें लायसेन्स दिलेल्या, मोटर चालविण्याचें शिक्षण देणाऱ्या एकूण जवळजवळ ६० शाळा महाराष्ट्र राज्यांत आहेत.

ज्या ज्या वेळीं मोटर वाहनांबाबत अधिनियम व त्याअन्वयें केलेले नियम यांचा भंग झाल्याचें आढळून येतें, त्या त्या वेळीं प्रादेशिक वाहतूक प्राधिकारी हे सार्वजनिक वाहनें चालविणाऱ्या विरुद्ध योग्य ती कारवाई करतात. सन १९३९ च्या मोटार वाहनांबाबत अधिनियमाच्या १७ व्या कलमान्वयें जिल्हा फौजदारी न्यायाधिशांनाहि, या अधिनियमान्वयें दोषी ठरविलेल्या इसमांना, सार्वजनिक वाहतुकीची वाहनें चालविण्याची लायसेन्सें धारण करण्यास किंवा मिळविण्यास कांहीं मुदतीपुरते अपात्र ठरविण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. त्या अधिनियमाची कलमें ८७ व ८९ याअन्वयें न्यायालयांकडून अपात्र ठरविण्यांत आलेल्या इसमांच्या लायसेन्सांवर त्याप्रमाणे शेरे मारण्यांत येतात.

### ६. वाहतुकीच्या गाड्यांचें नियंत्रणः—

प्रादेशिक वाहतूक अधिकारी हे राज्य वाहतूक अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण निदेशांनुसार आपापल्या पांच प्रदेशांत वाहतुकीच्या वाहनांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवतात.

प्रादेशिक वाहतूक अधिकारी, प्रादेशिक पर्यवेक्षक व मोटर वाहनांचे अधीक्षक हे मार्गावर दौरे काढतात व मोटर वाहनांबाबतच्या अधिनियमाच्या उपबंधांचा भंग करणाऱ्या वाहनांची अचानक तपासणी करतात. अशा तपासणींत मोटर वाहनांत जादा वजन भरणें, परवाने धारण करण्याबाबतच्या अटींचा भंग करणें, कर न भरणें इत्यादि गोष्टींवर विशेष भर देण्यांत येतो; आणि परवाने धारण करणारे, मोटर चालवणारे व कंडक्टर ह्यांच्याविरुद्ध योग्य ती उपाययोजना करण्यांत येते. अशाच तऱ्हेची अचानक तपासणी वाहतूक संचालकाच्या कार्यालयाशीं संलग्न असलेल्या एन्डॉर्समेंट सुपरवायझरकडूनहि करण्यांत येते. वाहनें मार्गस्थ असतांनाच त्यांची तपासणी करण्यासाठीं व्यापक स्वरूपाचे दौरे काढण्याकरितां या पर्यवेक्षकांची खास नेमणूक केलेली असते व त्यांनीं शोधून काढलेलीं अशा प्रकारचीं वाहनांचीं प्रकरणें, तीं ज्या प्रादेशिक वाहतूक अधिकाऱ्याच्या अधिकारक्षेत्रांत सांपडली असतील, त्याच्याकडे खटले भरण्यासाठीं व आवश्यक ती विभागीय उपाययोजना करण्यासाठीं पाठविण्यांत येतात.

वाहनांची, विशेषतः वाहतुकीच्या वाहनांची रात्रंदिवस तपासणी करणें शक्य व्हावें म्हणून कळवा व कशेळी येथें वजन करण्याच्या यंत्रांनीं सुसज्ज अशीं दोन तपासणी केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत.

७. प्रवाशांची वाहतूक —

स्टेज कॅरेजस्

मुंबई शहरांत बस वाहतूक ही बी. ई. एस्. टी. उपक्रमाकडून करण्यांत येते. बृहन्मुंबई मधील थोड्या मार्गावर, खाजगी वाहतूक करणाऱ्यांकडून तात्पुरत्या तत्त्वावर बस वाहनें चालविण्यांत येतात. पुणें व सोलापूर शहरांतहि बस वाहतूक ही तेथील नगरपालिकांच्या अधिकारांत आहे.

महाराष्ट्र राज्यांतील पुनर्रचनेपूर्वीच्या प्रदेशांतील जवळजवळ सर्व मार्ग मुंबई राज्य रस्ता वाहतूक कॉर्पोरेशननें व्यापले आहेत. नागपूर व औरंगाबाद प्रदेशांतील मार्ग हळूंहळूं राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेल्या उपक्रमांकडून ताब्यांत घेतले जात आहेत.

८. टॅक्सीखेरीज करून इतर कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेसः—

अनेक स्टेज कॅरेजेस असलेल्या मालकांना कॉंट्रॅक्ट कॅरेजेससंबंधीचे परवाने देण्यांत येतात. अशा तऱ्हेचे परवाने शाळांच्या बसेसकरितां सरकारमान्य शैक्षणिक संस्थांकरिता देण्यांत येतात. लग्नकार्य, यात्रा इत्यादि प्रसंगींहि कॉंट्रॅक्ट कॅरेजेसचे परवाने देण्यांत येतात.

९. मोटार कॅब्ज :—

ज्या इसमांना सार्वजनिक वाहनें चालविण्याबाबतची अधिकारपत्रें देण्यांत आली आहेत व सार्वजनिक मोटर वाहनाचे ड्रायव्हर्स म्हणून ज्यांची नोंद समाधानकारक आहे अशा इसमानाच टॅक्सी चालविण्याचे परवाने देण्यांत येतात. मुम्बई शहरांतील टॅक्सीच्या धंद्याची पुनर्घटना करण्याच्या कार्यातील एक उपाययोजना म्हणून व ह्या कामाचा दर्जा वाढवण्याच्या दृष्टीनें महाराष्ट्र सरकारनें भारत सरकारकडून दर तीन महिन्यांनी ३० ह्या प्रमाणें खास नवीन मोटारी टॅक्सी म्हणून चालविण्यासाठीं मिळविल्या असून टॅक्सी ड्रायव्हर्सनीं स्थापन केलेल्या सहकारी संस्थेला ह्या नवीन मोटारी देण्याचें ठरविलें आहे. कांहीं विशिष्ट बाबतींत सध्याच्या जुन्या मोटारीऐवजीं नवीन मोटारी वापरण्यासाठीहि या मोटारींपैकी कांहीं मोटारी देण्यांत येतील.

मुम्बई शहरांत सुखसोयींनी युक्त अशा टॅक्सी सुरू करण्याच्या योजनेचें प्रवाशांकडून, विशेषतः हौशी प्रवाशांकडून स्वागत झालें आहे.

१०. खाजगी वापराचीं वाहनें:—

ड्रायव्हर सोडून ९ माणसें नेलीं जाऊं शकतील अशा रीतीनें ज्या मोटारीची रचना केली असेल किंवा जिच्यांत अशी सोय होऊं शकत असेल, साधारणतः मालकाच्या, भाडें किंवा बक्षीस या कारणांखेरीजकरून इतर धंद्यासाठीं जिच्या मालकाकडून किंवा त्याच्यामार्फत, जिचा उपयोग करण्यांत येत असेल, अशा कोणत्याहि मोटारीची खाजगी वापराचें वाहन म्हणून नोंदणी करण्यांत येते. अशा वाहनाबाबतचा परवाना सन १९५९ चे मुंबईच्या मोटर वाहनांबाबत नियम यांतील नियम ७८ या अन्वयें देण्यांत येतो.

११. मालांची वाहतूक :—

मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचे दोन वर्ग आहेत (१) खाजगी वाहनें आणि (२) सार्वजनिक वाहनें व अशा वाहनांना दिलेले परवाने ५ वर्षांपर्यंत वैध म्हणून चालू शकतात.

(१) खाजगी वाहनें :—

स्वतःच्या उद्योगधंद्यासाठ स्वतःच्या मालाची वाहतूक करतां यावी म्हणून अर्जदारांना, त्यांच्या अर्जाच्या खरेपणाबद्दल खात्री करून घेऊन खाजगी वाहनें चालविण्याबाबतचे परवानें देण्यांत येतात.

(२) सार्वजनिक वाहनें :—

मालाची वाहतूक करणें सुलभ व्हावें व माल वाहतूक करणाऱ्यांना माल वाहतूक करण्याच्या बाबतींत अधिक स्वातंत्र्य मिळावें म्हणून राज्याच्या प्रादेशिक वाहतूक प्राधिकाऱ्याकडून, सार्वजनिक वाहनें चालविण्याबावतचे परवाने देण्यांत येतात. राज्यांतील इतर प्रादेशिक वाहतूक प्राधिकरणांनी दिलेल्या सार्वजनिक

वाहनें चालविण्यांबाबतच्या परवान्यांवर ह्या परवान्यांच्या खरेपणाबद्दल संबंधित प्रादेशिक वाहतूक अधिकाऱ्यांकडून मुक्तपणें जोड सह्या देण्यांत येतात. सन १९५९ च्या मुंबईच्या मोटार वाहनांबाबत नियमांमधील ७९ व्या नियमानुसार, १० मोटारीपेक्षां कमी नसतील इतक्या मोटारींच्या मालकांना सार्वजनिक वाहनें चालविण्याबाबतचे परवाने मिळण्याच्या बाबतींत अग्रहक्क देण्याची तरतूद केली आहे.

## १२. हंगामी परवाने :–

कोणत्याहि तात्पुरत्या अगर खास गरजा भागविण्यासाठीं मोटार वाहनाबाबतच्या अधिनियमाच्या ६२ व्या कलमानुसार हंगामी परवाने देण्यांत येतात. निकडीच्या बाबतींत आंतरराज्यीय वाहतुकीसाठींहि हंगामी परवाने देण्यांत येतात. मात्र त्या दुसऱ्या राज्याचा संपूर्ण कर आगाऊ भरावा लागतो. जर दोन राज्यामध्यें वाहतुकीबाबत अन्योन्य करार झाले असतील तर त्या व्यवस्थेस अनुसरून हंगामी परवाने देण्यांत येतात. दोन राज्यामध्यें वाहतुकीबाबत असे अन्योन्य करार झाले नसतील अशा बाबतींत, संबंधित राज्यांच्या वाहतूक प्राधिकाऱ्यांकडून संमति मिळविण्यांत आल्यानंतर असे परवाने देण्यांत येतात.

## १३. विभागीय उपाययोजना:–

चौकशी केल्यानंतर आणि संबधित अधिकाऱ्यांपुढे आपली बाजू मांडण्याची योग्य ती संधि दिल्यानंतरच प्रादेशिक वाहतूक प्राधिकाऱ्यांकडून नियमभंग करणाऱ्या सार्वजनिक वाहनांच्या ड्रायव्हर्स विरुद्ध मोटार वाहनाबाबतच्या अधिनियमाच्या १६ व्या कलमान्वयें विभागीय कारवाई केली जाते. मोटार वाहनांबाबत अधिनियमाच्या ६० व्या कलमान्वयेंहि परवाना धारण करणाऱ्यांविरुद्ध उपाययोजना करण्यांत येते. शिक्षा झालेल्या परवाना व लायसेन्स धारण करणाऱ्यांची यादी मुंबईच्या वाहतूक प्राधिकाऱ्याकडून पोलीस विभागाच्या माहितीसाठीं मुंबई पोलीस गॅझेटमध्यें प्रसिद्धीकरितां पाठविण्यांत येते.

## १४. राज्याराज्यांमधील वाहतुकीची अन्योन्य व्यवस्था :–

आंतरराज्यीय मार्गावर वाहनें चालवीत असलेल्या मुंबई राज्य रस्ता वाहतूक कॉर्पोरेशनच्या वाढलेल्या कार्याच्या दृष्टीनें व आंतरराज्यीय वाहतुकीस उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें शेजारच्या राज्याशीं वाहतुकीचे अन्योन्य करार राज्याच्या विभाजनानंतर चालू ठेवण्यात आले आहेत. हे करार, उतारूंचीं वाहने, मालाची वाहतूक व तत्संबंधिन बाबी यांच्या बाबतीत मुंबई राज्याकडून म्हैसूर, आंध्रप्रदेश व मध्यप्रदेश या शेजारच्या राज्याशीं पूर्वीच करण्यांत आले होते. आंतरराज्यीय वाहतूक सुलभ व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य व वरील राज्यें यांच्यामध्यें सुधारलेले करार करण्याच्या दृष्टीनें तसेच पूर्वीच्या करारामध्यें सुधारणा करून नवीन गुजराथ राज्याशींहि करार करण्याच्या निबंध प्रश्नावर विचार चालू आहे. १९६०–६१, या चालू वर्षांत नवीन करार पूर्ण करण्यांत येतील अशी आशा आहे.

## १५. मुंबई मोटर वाहनाबाबत (उतारूंवरील कर) अधिनियम, १९५८ :–

मुंबई मोटर वाहनाबाबत (उतारूंवरील कर) अधिनियम, व नियम, १९५८ हे दि. १५-१०-१९५८ पासून अंमलांत आले असून ते महाराष्ट्र राज्यांतहि चालू आहेत. हा उतारूंवरील कर, राज्यांतील रस्त्यांवर वापरल्या जाणाऱ्या स्टेज कॅरेजेसच्या बाबतींत (कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस म्हणून उपयोगांत आणावयाच्या स्टेज कॅरेजेस धरून) गोळा झालेल्या एकूण भाड्याच्या रकमेवर १०% या दरानें बसवितां येतो. तथापि सरकारनें, संपूर्णपणें नगरपालिकेच्या हद्दींत चालणाऱ्या स्टेज कॅरेजेसना उतारूंवरील कर देण्यांतून वगळलें आहे. त्याचप्रमाणें, अधिनियमाच्या २१ व्या कलमान्वये, नगरपालिका क्षेत्राच्या अगदीं जवळ असलेल्या कोणत्याहि विशिष्ट आंतरराज्यीय रस्त्यावरून किंवा अशा इतर रस्त्यांवरून जाणाऱ्या वाहनांना जेव्हां अशी वाहनें शैक्षणिक, वैद्यकीय, परोपकारी किंवा इतर हेतूनें चालविण्यांत येत असतील तेव्हां त्यांना असे कर देण्यांतून मुक्त करण्याचा सरकारला अधिकार आहे.

**१६. मोटार वाहन ( वांटप व विक्री ) नियंत्रण ठेवण्याबाबत आदेश, १९५९ :-**

हा आदेश १-५-५९ पासून अंमलांत आणण्यांत आला. वाहतूक संचालक हा महाराष्ट्र राज्याचा नियंत्रण आदेशांतील कंडिका ८ हिच्या कारणांसाठीं नियुक्त केलेला प्राधिकारी आहे. ही कंडिका नियंत्रित मोटारांची, २ वर्षे संपण्यापूर्वी फेरविक्री करण्याकरितां परवाने मंजूर करण्याबाबत आहे.

**१७. योजना:-**

प्रादेशिक वाहतूक अधिकाऱ्याच्या कार्यालयाची इमारत बांधण्याची एकमेव योजना द्वितीय पंच-वार्षिक योजनेमध्यें समाविष्ट केलेली असून ती सरकारनें पूर्वीच संमत केली आहे. आवश्यक ते नकाशे व अंदाज लवकरच सरकारकडे सादर करण्यांत येतील.

१८. [१] मोटार वाहनांबाबत अधिनियम, [२] मुंबई मोटार वाहनांवरील कराबाबत अधिनियम आणि [३] मुंबई मोटार वाहनांबाबत ( उतारूंवरील कर ) अधिनियम यांची अंमलबजावणी करण्यासाठीं सदर "१२ वाहनावरील कर" या मुख्य सदराखाली आणि सरकारी वाहतूक सेवेकरितां "४७-संकीर्ण विभाग", ह्या मुख्य सदराखालीं मागणी करण्यांत आलेल्या अनुदानांची रक्कम दर्शविणारें विवरणपत्रक सोबत जोडलें आहे

भारतीय मोटर वाहनांबाबत अधिनियम, मुंबई मोटर वाहनांवरील कराबाबत अधिनियम आणि मुंबई मोटर वाहनांबाबत ( उतारूंवरील कर ) अधिनियम, १९५८ यांची अंमलबजावणी करण्यासाठीं "१२ वाहनांवरील कर" या सदराखालीं १९६०-६१ (१-५-१९६० ते ३१-३-१९६१ या मुदतीकरितां) या वर्षाकरितां केलेली अंदाजपत्रकांतील तरतूद दाखविणारें विवरणपत्रक.

| | | |
|---|---|---|
| १. भारतीय मोटर वाहनांबाबत अधिनियम<br>मुंबई मोटर वाहनांवरील कराबाबत अधिनियम | ...<br>... | १५,५९,३०० |
| मुंबई मोटर वाहनांबाबत ( उतारूंवरील कर ) अधिनियम, १९५८. | ... | १,१६,५०० |
| २. सरकारी वाहतूक सेवा ( "४७-संकीर्ण विभाग" ) | ... | १,९९,३०० |

## बृहन्मुंबई-पोलीस

बृहन्मुंबई पोलीस विभाग हा निरनिराळ्या विभागांच्या व शाखांच्या द्वारें, बृहन्मुंबईच्या परिसरांत पोलिसांना करावीं लागणारी कामें पार पाडतो. १९५९-६० मध्यें या सर्व विभागांनी केलेलीं कामें तसेच त्यांच्या हालचाली व योजना यांचा तपशील दिला आहे.

**विभागीय पोलीस :—**

विभागीय पोलिसांची मुख्य कार्यें पुढीलप्रमाणें आहेत:— (१) कायदा व सुव्यवस्था राखणें, (२) गुन्ह्यांना प्रतिबंध करणे व ते शोधून काढणें, (३) दुर्वर्तनी व्यक्तींपासून होणाऱ्या उपद्रवास नियंत्रण घालणें इत्यादि. समालोचनाखालील काळांत विभागीय पोलिसांच्या बाबतींत कोणतीही नवी योजना हाती घेतली नव्हती.

**दारूबंदी विभाग :—**

**१९५९-६० या वर्षात दारूबंदी कायद्याची अंमलबजावणी:-**

बृहन्मुंबईमध्यें, दारूबंदी विभागाच्या सर्व शाखांकडून, दारूबंदी कायद्याची जारीनें अंमलबजावणी करण्यांत आली व बऱ्याचशा प्रकरणांची दखल घेण्यांत आली.

नेहमीं उपयोगांत आणलेल्या उपायांनी म्हणजे किनाऱ्यावरील भाग, रेल्वे स्टेशन व सरहद्दीवरील भाग यांच्यावर रात्रंदिवस दारूची आयात होऊं नये म्हणून टेहळणी, अंमली द्रव्याची आयात शोधून काढण्यासाठीं, जनरल पोस्ट ऑफिस व इतर उपपोस्ट ऑफिसेस यांच्यावर नजर ठेवण्यांत आली व त्यांमुळें बरीचशीं प्रकरणें उघडकीस आली. सर्व ज्ञात दारूबाजांविरुद्ध उपाययोजना करण्यांत आली.

योजिलेल्या कार्यक्रमाप्रमाणें बेकायदा दारूभट्टीसाठीं कुप्रसिद्ध असलेल्या जागांवर सतत धाडी घालण्यांत येऊन तेथील कच्चा माल व तयार दारू जप्त करून त्यांचा नाश करण्यांत आला. गेल्या वर्षापासून एक सब-इन्स्पेक्टर व कांहीं निवडक माणसें असा एक "टास्क फोर्स" तयार करण्यांत आला होता. हा "टास्क फोर्स" प्रत्येक दिवशीं खाड्या, जंगलें व इतर मोकळ्या जागांवर धाडी घालून बेकायदेशीर दारू गाळलेला कच्चा माल व दारू इत्यादींचा नाश करतो. ह्या "टास्क फोर्सची" योजना १९६०-६१ सालीं सुद्धां चालू राहील.

पोलीस लॉंचेस्च्या साहाय्यानें पोर्तुगीज व इतर परकी मुलखांतून होणारी परदेशी दारूची चोरटी आयात हुडकून काढून तिला प्रतिबंध करण्याकरितां मुंबईच्या किनारपट्टीवर सतत गस्त घालण्याचें काम सुरू आहे.

वर वर्णन केलेल्या कामगिरीशिवाय कुप्रसिद्ध भाग निवडून त्यावर खास लक्ष दिलें जातें. दादर मधील प्रभादेवी भाग असा विभाग म्हणून निवडण्यांत आला व त्या ठिकाणी सतत कारवाई करण्यांत आल्यामुळे पूर्वी कुप्रसिद्ध असलेला हा विभाग आतां तसा राहिला नाहीं. १९६०-६१ सालाकरितां माहीम हा दुसरा असाच कुप्रसिद्ध विभाग खास लक्ष पुरविण्याकरतां निवडण्यांत आला आहे.

६ ते १२ एप्रीलपर्यंत दारूबंदी सप्ताह साजरा करण्यांत आला व त्याची अंमलबजावणी सर्व बाजूंनीं नेटानें करण्यांत आली. पहिल्यांदाच, पोलीस दलातील लोकांनी, मद्यपान निषेधावर आधारलेले करमणुकीचे कार्यक्रम योजिले होते. याचे जनतेनें व पोलीस दलांतील लोकांनी चांगलेच स्वागत केलें व त्याचा चांगलाच शैक्षणिक उपयोग झाला.

१९५९-६० मध्यें दारूबंदी विभागांत एक सब्-इन्स्पेक्टर व ६ निवडक माणसें यांचें एक खास पथक निवडण्यांत आलें होतें. ह्या पथकानें प्रशंसनीय कार्य करून दाखविलें होतें. एक सब्-इन्स्पेक्टर व १० इसम यांचे दुसरें एक खास पथक रेल्वेतील व पोस्टांतील पार्सलांमधून मादक पदार्थांची चोरटी आयात उघडकीस आणण्यासाठीं, तयार करण्यांत आलें होतें. १९६०-६१ च्या वर्षांत हें मादक पदार्थांची आयात हुडकून काढणारें खास पथक चालू ठेवण्यांत येणार आहे.

### शस्त्रें आणि दारूगोळा विभाग :-

शस्त्रें व दारूगोळा विभाग हा वेगवेगळे अधिनियम व नियम यांच्या अंमलबजावणीबाबत जबाबदार आहे; ते म्हणजे (१) शस्त्राबाबतचे अधिनियम व नियम (२) विषांबाबतचा अधिनियम (३) स्फोटक द्रव्यांबाबतचा अधिनियम व नियम (४) विद्युत् अधिनियम (५) विमानांबाबतचा अधिनियम व नियम (६) पेट्रोल अधिनियम व नियम (७) सिनेमा फिल्मच्या बाबतचे नियम (८) कार्बाइड ऑफ कॅल्शमबाबतचा नियम (९) मुंबई चित्रपट नियम (१०) चित्रपट विनियम व अधिनियम (११) मुंबई करमणूक कर अधिनियम व नियम (१२) मुंबई पोलीस अधिनियमाखालील कांहीं तरतुदी, आणि (१३) वन्य पशु-पक्षी संरक्षण अधिनियम इत्यादि. विभागानें या कोणत्याहि नवीन योजना वा कार्यक्रम हातीं घेतलें नाहींत. नित्याचें कामकाज चालू आहे.

### सार्वजनिक लायसेन्स व वाहनांचे लायसेन्स यांचा विभाग :-

सार्वजनिक वाहनांचें म्हणजे व्हिक्टोरिया, माल ओढावयाच्या गाड्या व हातगाड्या, मालक व ड्रायव्हर यांना लायसेन्स देण्याचें कार्य या विभागामार्फत चालतें.

१९५९-६० मध्यें भाड्यानें मिळणाऱ्या पण न नोंदविलेल्या हातगाड्यांविरुद्ध व परवाना न घेतलेल्या त्यांच्या गाडींच्या ड्रायव्हरांविरुद्ध सतत मोहीम चालू ठेवली होती. याचा परिणाम म्हणूनच गेल्या वर्षापेक्षां जास्त, म्हणजेच २०० बैलगाड्या आणि ६०० हातगाड्या इतक्या गाड्या यावर्षी जास्त नोंदवल्या गेल्या. चालू वर्षी अदमासें ८०,००० रुपयें इतका महसूल मिळेल. ह्या विभागांतील जास्त वाढलेलें काम करण्याकरतां सरकारनें एक सब्-इन्स्पेक्टर व दोन कॉन्स्टेबल्स व एक कारकून इतका जास्त नोकरवर्ग नेमला आहे.

व्हिक्टोरियावाल्यांच्या व हातगाडीवाल्यांच्या परवान्यांचें पुढील वर्षाकरितां नूतनीकरण करण्याच्या अगोदर त्यांचा हाताचा ठसा घेऊन ठेवण्याची पद्धत फारच उपयोगी वाटली; ह्या वर्षी २० व्हिक्टोरियावाल्यांचे व १२ हातगाडीवाल्यांचे परवाने ते जुनी शिक्षा झालेले गुन्हेगार आहेत असें आढळून आल्यानें एकतर रद्द तरी करण्यांत आले किंवा परवाना देणें नामंजूर करण्यांत आले.

सरकारनें मंजूर केलेले हातगाडीसंबंधींचें नियम लवकरच अंमलांत येतील.

मुंबई शहरांतून व्हिक्टोरियांचे हळूहळू निर्मूलन करण्याच्या प्रश्नावर सरकारी विचार चालू आहे.

### पोलीस बिनतारी संदेश विभाग :-

मुंबईच्या बिनतारी संदेश विभागाचें नित्याचें कामकाज, म्हणजेच, शहरांत गस्त घालणाऱ्या फिरत्या बिनतारी गाड्यांशीं, तसेंच, या राज्यांतील जिल्ह्यांशीं बिनतारी दळणवळण चालू ठेवणें, सदरहू वर्षांत चालूं होतें. चालू वर्षी, बिनतारी संदेश विभागानें, आपल्या नित्याच्या कामाखेरीज खालील महत्त्वाचे कार्य पार पाडले.

### १९५९ मधील कार्यक्रम :-

( १ ) बी. ई. एस्. टी. च्या कामगारांच्या संपाच्या वेळीं कडक बंदोबस्त (दोनदा)

( २ ) भारतांतील व परदेशांतील महत्त्वाच्या व श्रेष्ठ व्यक्तींच्या भेटीच्या वेळीं, राजकीय पक्षांनीं काढलेले मोर्चे व निदर्शनें, स्वातंत्र्यदिन सोहळा व गणपति विसर्जनाच्या वेळींचा रहदारीचा बंदोबस्त ह्यावेळींसुद्धां बिनतारी संदेश विभागाच्या गाड्या वापरण्यांत आल्या.

(३) ह्या विभागानें, १९५९ च्या इकेफ च्या अभ्यास सप्ताहांत, रस्त्यावर चालणाऱ्या रहदारीचे एक आकृतीरेखन तयार केले होते व यांत निरनिराळे रस्ते मिळणाऱ्या चौकामध्यें रस्त्यावरील रहदारीचे नियंत्रण कशा समन्वित रीतीनें करण्यांत येतें ह्यावर भर दिला होता. दीपांचे स्वयंचलित व समन्वित कार्य दाखविण्यासाठीं क्वीन्स रोड, केम्प कॉर्नर व संबंधित केंद्रांचे नमुने तयार करण्यांत आले व ते 'इंडिया कॅन मेक इट' ह्या प्रदर्शनांतहि दाखविण्यांत आले.

सुरत शहरामध्यें पुरामुळे इतर सर्व प्रकारचीं वाहतुकीची साधनें बंद पडली असतां वाहतूक सुरू ठेवण्यासाठीं, ह्या शहरामधून बिनतारी साधनसामुग्री असलेलें एक पथक रवाना झालें होतें.

ह्याच काळामध्यें, मुंबई सरकारच्या महसूल मंत्र्यांच्या उपयोगाकरतां गाडीमध्यें एक बिनतारी संदेशवाहक केंद्र उघडण्यांत आलें होतें.

भारताच्या राष्ट्राध्यक्षांनी पुण्याला भेट दिली तेव्हांसुद्धां त्यांच्या खास गाडीमध्यें बिनतारी संदेश-वाहक केंद्र उघण्यात आलें होतें

या विभागानेंच, निरनिराळ्या खेळाच्या चढाओढी, पोलीस प्रमुख केन्द्रावर व वल्लभभाई पटेल स्टेडियमवर होणारे सांस्कृतिक कार्यक्रम, व निरनिराळ्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठकी यांमध्यें लोकांना आदेश देण्याचें काम केलें. इकेफ सदस्यांना मुंबई-पुणें रस्त्यावर "प्रत्यक्ष स्थळांवरील" अभ्यास करण्यासाठी नेण्यांत आलेल्या मोटारींवर या विभागातर्फे बिनतारी "पी. ए." पद्धतीची योजना करण्यांत आली होती.

मुंबई शहरांतील गस्त घालणाऱ्या बिनतारी गाड्यांच्या धर्तीवरच ठाणे जिल्ह्यांतील उल्हासनगर येथें सुरू करण्यांत आलेल्या शाखेची व्यवस्था ह्याच विभागाकडून होत आहे. तसेच मुंबई-पुणें रस्त्यावर ठाणे पनवेल वाहतूक नियंत्रण करणारीं सहाय्यक केंद्रें सुद्धां याच विभागाकडून संभाळलीं जातात.

**बिनतारी संदेश विभागाचा १९५९ मधील विस्तारः-**

ऑक्टोबर १९५९ मधील आंतरराष्ट्रीय वाहतूक अभ्यास सप्ताहांत बृहन्मुंबई पोलीस दलाच्या वाहतूक नियंत्रण अधिकाऱ्यांच्या कार्यालयांत बिनतारी वाहतूक नियंत्रण खोली उघडण्यांत आली. "इकेफ" च्या सदस्यांनीं ह्या खोलीला भेट दिली असतां तेथे चालणारे कामकाज त्यांना दाखवण्यांत आले.

गर्दीच्या वेळांत तुफान वाहतूक असलेल्या रस्त्यावर गस्त घालण्यासाठीं सहा मोटर सायकलवर फिरते ध्वनिक्षेपक संच बसवण्यांत आले, ह्याच कामाकरितां बिनतारी संदेश देऊं शकणाऱ्या दोन जीप गाड्या वापरण्यांत येतात.

**गुप्त पोलीस विभाग :—**

गुप्त पोलीस विभागाची [१] गुन्हे विषयक शाखा [२] खास शाखा—एक आणि [३] खास शाखा -दोन अशा तीन प्रमुख शाखांमध्यें विभागणी झाली आहे. गुन्हे शोधून काढणें व त्यांना प्रतिबंध करणें आणि नियंत्रणाबाबतच्या हुकमांची अंमलबजावणी करणें याला गुन्हें शाखा प्राधान्येंकरून जबाबदार असते. १९५९--६० सालांत गुन्हे शाखेनें पुढील योजना हातीं घेतल्या होत्या :—

**(१) गुन्हेविषयक शाखाः—**

गेल्या वर्षी नरे पार्क, परळ येथें सुरू झालेल्या 'बॉईज क्लब' नें ह्या वर्षीहि चांगल्या प्रकार काम केलें.

बालगुन्हेगारांना मदत करणाऱ्या पथकानें महत्त्वाचीं रेल्वे स्टेशनें असलेल्या शहरांत 'बालगुन्हेगार मार्गदर्शन सेवा' या नांवाची एक नवीन योजना सुरू केली आहे. गेल्या चार महिन्यांत सुमारें ७५ मुलांना मार्गदर्शन करण्यांत आले.

सावधगिरी शाखेनें, हरवलेल्या मुलांचा आणि प्रौढांचा शोध करून त्यांना त्यांच्या पालकांकडे पोंहोंचविण्यासाठीं एक 'हरवलेल्या लोकांना शोधणारें पथक' स्थापन केलें आहे. १९५९ मध्यें मदतीस पात्र असलेल्या सुमारें ३२ स्त्रिया व मुली यांची मुक्तता ह्या पथकानें केली; व त्यांना एकतर त्यांच्या पालकांकडे देण्यांत आलें किंवा; त्यांना दाखल करून घेणाऱ्या केन्द्रांत पाठविण्यांत आलें.

**मोडस् ऑपरेंडी (कार्यपद्धतीविषयक) ब्यूरोः—**

मोडस् ऑपरेंडी ब्यूरोच्या मंत्रालयीन नोकरवर्गाऐवजी कार्यकारी नोकरवर्ग नियुक्त करण्याची, तीन वर्षांचा कालावधि लागणारी योजना सुरू झाली आहे; आणि एका विभागाच्या नोकरवर्गाऐवजी १ इन्स्पेक्टर, १ सिलेक्शन ग्रेड सब्-इन्स्पेक्टर, २ सब-इन्स्पेक्टर यांची नेमणूक केली आहे.

**(२) विशेष शाखा क्र. १:—**

विशेष शाखा क्र. १ ही मुख्यतः राष्ट्रीय सुरक्षिततेसंबंधीचें कामकाज पाहतें. कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठीं ही शाखा आगाऊ माहिती गोळा करते. संरक्षण, सेवा, इत्यादींसारख्या विविध सरकारी विभागांत नोकरीसाठीं आलेल्या उमेदवारांचें चारित्र्य आणि पूर्वायुष्य ह्याविषयीं ही शाखा चौकशी करते; आणि त्याचबरोबर दंगेखोर व चोरटा व्यापार करणारे सराईत लोक इ. ना अडकवून ठेवण्याचें काम करते. ही शाखा मंत्री व अतिशय महत्त्वाच्या व्यक्ति यांना साध्या कपड्यांतील लोकांकडून संरक्षण देतें. ह्यावर्षी कोणत्याहि उल्लेखनीय नवीन योजना ह्या विभागानें सुरू केलेल्या नाहींत.

**(३) विशेष शाखा क्र. २:—**

विशेष शाखा क्र. २ ही मुख्यतः परदेशीयांची नोंदणी करणें व माहिती गोळा करणें याकडे लक्ष देतें. त्याशिवाय, बृहन्मुंबईला भेट देणाऱ्या महत्त्वपूर्ण व्यक्ति व परदेशी प्रतिनिधी मंडळें ह्यांना आवश्यक त्या सोयी व मदत देते. भारतातून म्हणजेच मुंबई सोडून जाणारे व येणारे प्रवासी व बोटी यांचे पासपोर्ट काळजीपूर्वक तपासून ते अस्सल आहेत किंवा काय हें पाहिलें जातें. भारतीय आंतरराष्ट्रीय पासपोर्ट, भारत-सिलोन परवाने, नेपाळ परवाना व ओळखीचीं प्रमाणपत्रें यांसाठीं केले जाणारे अर्ज विशेष शाखा क्र. २ च्या पासपोर्ट शाखेकडून तपासले जातात. अर्जदारांच्या राजकीय व गुन्हेगारीविषयक पूर्वायुष्यासंबंधींचें अहवाल आणि कागदपत्रांचा अस्सलपणा मुम्बईच्या पासपोर्ट विभागाच्या कचेरींत तपासले जातात. विमानें व सागरी बंदरें यामधून चोरटा व्यापार करणाऱ्यांचा शोध लावण्यांच्या कामींहि ही शाखा कस्टम अधिकाऱ्यांना मदत करते.

**वाहतूक विभागः—**

शहरांतील वाहतुकीचें नियंत्रण करणें व जनतेला रहदारीच्या नियमांचें शिक्षण देणें ह्या बाबतींत वाहतूक विभाग जबाबदार असतो. वाहतुक सुव्यवस्थितपणें चालू रहावी यासाठीं भारतीय मोटार वाहनें अधिनियम, मुंबई मोटार वाहनें नियम, आणि मुंबई पोलीस अधिनियमांखालीं असलेले नियम ह्याअन्वयें, वाहतुकीचें नियम व नियंत्रण मोडणाऱ्यांवर हा विभाग उपाययोजना करतो. समालोचनाखालील काळांत, मोटार वाहनें अधिनियम व त्यामधील नियम, त्यांच्या विविध भागांअन्वयें, वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्यांना १,३९,०९८ सूचना देण्यांत आल्या. वेगाची मर्यादा उल्लंघन केल्याबद्दल ४९५० खटले भरण्यांत आले व त्यापैकीं ३०७१ दोषी ठरविण्यांत आलें.

रहदारीच्या नियमांचें शिक्षण जनतेला देण्यांसाठीं, सिनेमा स्लाईड्स, भित्तिपत्रकें, छापील पत्रकांचें वांटप, ध्वनिक्षेपक असलेल्या गाड्यामधून प्रचार करणें इ. द्वारां प्रचारविभाग त्याचें नेहमीचें प्रचारकार्य करीत आहे. एकाच मार्गानें वाहतूक करण्यास परवानगी असलेले रस्तेहि अधिक विभागांत ठेवण्यांत आले आहेत.

आणखी एके ठिकाणीं म्हणजेच केम्पस् कॉर्नर येथें स्वयंचलित दिवे बसविण्यांत आले आहेत.

मार्च १९५९ मध्यें मागील वर्षाप्रमाणेंच 'वाहतूक सप्ताह' साजरा करण्यांत आला. शाळांमधून चांगलें सहकार्य मिळालें. आकर्षक गणवेश चढविलेल्या शाळेंतील मुलांमुलींनीं रहदारीचें नियंत्रण केलेलें रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांनीं पाहिले. घोडेस्वार व नाचगाण्याचें पथक ह्यासारखीं नेहमीचीं प्रात्यक्षिकेंहि होती.

वर्षाच्या सुरुवातीला मास्टर प्लॅनच्या धर्तीवर शहराच्या आखणींत सुधारणा करण्यासाठीं श्री. एस्. जी. बर्वे, आय्. सी. एस्. ह्यांच्या अध्यक्षतेखालीं 'बृहन्मुंबई अभ्यास मंडळ' या नांवाचें एक मंडळ स्थापण्यांत आलें. अभ्यास मंडळानें शोधून काढलेल्या माहितीबरहुकूम सूचना करण्यासाठीं वाहतूक विभागाला त्यांचा एखादा प्रतिनिधि ( डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस ) पाठविण्याबद्दल विनंति केली गेली.

वाङ्मयाच्या द्वारें शिक्षण देण्यासाठीं, वाहतूक विभागाच्या एका इन्स्पेक्टरनें लिहिलेल्या 'रस्त्यावरील सुरक्षिततेचें प्रशिक्षण' ह्या छोटेखानी पुस्तकास मंजुरी देण्यांत आली व तें संचालक, प्रकाशन विभाग यांच्याकडून प्रसिद्ध करण्यांत आलें.

'रास्ते की रोशनी' ह्या रहदारीवरील चित्रपटाची निर्मिति चित्रपट विभागाच्या द्वारें, वाहतूक विभाग व संचालक-प्रकाशन विभाग यांच्याकडून एकत्रितपणें करण्यांत आली आणि तो चित्रपट मुंबईतील सर्व चित्रपटगृहांतून दाखविण्यांत आला. भारत सरकारच्या गृहविभागाच्या ग्रंथालयाकडून आलेल्या सूचनेप्रमाणें वाहतूक विभागानें लिहिलेल्या एका कथेवर आधारलेल्या 'टीच देम यंग' ह्या चित्रपटाच्या निर्मितीची तयारी जोरांत चालू आहे.

आशियाई आणि पूर्वेकडील अति दूरचे देश आणि स्थानिक संघटना ह्यांच्या अधिकाराखालीं ऑक्टोबर १९५९ मध्ये मुंबईत साजरा करण्यांत आलेला 'इकेफ' सप्ताह हें वाहतूक विभागाचें एक अभिमानास्पद कार्य आहे. वाहतूक विभागानें मिळविलेल्या विस्तृत माहितीचा स्वीकार चर्चा मंडळाने केला. ट्रॅफिक इंजिनीअरींग व राजमार्गाची सुरक्षितता यावर एक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें; आणि संघटक प्रतिनिधी व ज्यांनी तें पाहिले अशी जनता यांच्याकडून ह्या प्रदर्शनाची प्रशंसा करण्यांत आली. सुरक्षित रीतीनें मोटार हांकण्याच्या संवयी, अपघात, वाहनांची योग्य निगा ह्यांवर अधिक भर दिलेल्या विविध प्रदर्शनी वस्तू व तक्ते दिसून येत होते.

वाहतूक कचेरी उघडण्यांत आलेले 'बिनतारी नियंत्रण गृह' हा अिकेफ सप्ताहांतील महत्त्वाचा कार्यक्रम होता. मोटार सायकली व मोटारी ह्यामधून शहरांत व राज्याच्या राजमार्गावर फिरणाऱ्या फिरत्या पोलीस वाहतूक पथकाशीं जोडलेल्या वरील नियंत्रक गृहामध्यें व निरनिराळ्या केंद्रामध्ये सहकार्य राहील. दाट वस्तीच्या भागांत आणि अपघाताच्या प्रसंगी पोलिसांची मदत आतां अगदी थोड्या वेळांत पोहोंचूं शकेल.

मुंबंइत डिसेम्बर १९५९ मध्ये भरलेल्या, 'अिंडिया कॅन मेक इट' ह्या प्रदर्शनामध्यें वाहतूक विभागानें त्याच्या कार्यक्रमांना प्रसिद्धि देण्याची संधि घेतली. अधिकारी आणि रस्त्यावरून गस्त घालण्याच्या योजनेचें सभासद ह्यांनी स्टॉलला भेट देणाऱ्या लाखो लोकांना प्रदर्शनांत ठेवलेल्यां वस्तूंबाबत स्पष्टीकरण केलें.

**मोटार वहातूक विभाग :-**

बृहन्मुंबई पोलीस दलाच्या रस्यावरील व समुद्रावरील हालचालीची व्यवस्था ठेवणें ही या विभागाची जबाबदारी आहे.

निरनिराळ्या प्रकारच्या २४५ वाहनांची ह्या विभागाकडून व्यवस्था राखण्यांत येते. पोलिसांकडे चालू स्थितींत असणाऱ्या मोटर लॉंचेस असून त्यापैकीं ३ डीझेल तेलावर चालणाऱ्या आहेत. त्याचप्रमाणें तेथें ५ लहान होड्या असून त्यापैकीं २ सिंगल सिलींडर आऊटबोर्ड इंजिनें असणारी आहेत.

वरील पोलीस वाहनांशिवाय, नगरसेना, सरकारला विमान वाहतुकीचा सल्ला देणारा अधिकारी, आणि मुंबईत असणारी इतर पोलीस पथकें ह्यांच्या वाहनांची दुरुस्ती आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी, मोटर वाहतूक विभागाकडे आहे. क्रँक शाफ्ट कटिंग, मोल्डिंग आणि कास्टिंग शिवाय, इतर बहुतेक सर्व दुरुस्तीची कामें मोटर वाहतूक विभाग कारखान्यांत केलीं जातात.

ह्या विभागाच्या कारखान्यांत १ पोलीस इन्स्पेक्टर, फोरमन आणि ३ पोलीस सब-इन्स्पेक्टर्स असून ते सर्व तंत्रज्ञ आहेत. पोलीस सुपरिंटेंडंट ह्या सर्व अधिकाऱ्यांवर देखरेख ठेवतो. हा पोलीस सुपरिंटेंडेंट निरनिराळीं पोलीस स्टेशनें, दारुबंदी नियंत्रण विभाग, गुप्त पोलीस विभागाच्या शाखा यांकडून करण्यांत येणारी वाहनांची मागणी, उपलब्ध असलेल्या पुरवठ्याप्रमाणें पुरी करण्याचा समन्वय करतो. हा सुपरिंटेंडेंट, इतर कार्यालयीन आणि प्रशासकीय गोष्टींवर सुद्धां देखरेख ठेवतो.

सन १९५९-६० ह्या वर्षात खालील प्रस्ताव पूर्ण करण्यांत आले :-

१. २६ जुनी वाहनें बदलणें, वाहनें बदलण्याचें काम चालूं असून तें लवकरच पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

२. सुटी इंजिनें खरेदी करणें;

३. हत्यारे आणि यंत्रसंच यांची खरेदी;

४. "मनोरी" मोटार लॉंचची खरेदी;

"भवानी II" ह्या दुसऱ्या मोटार लॉंचचे बांधकाम चालू आहे.

५. मोटार वाहतूक विभागाच्या पुनर्रचना योजनेबरोबरच (तीन भागांपैकीं पहिल्या) डेप्युटी अकौन्टंट आणि वरिष्ठ कारकून यांची कार्यालयांत आणि मोटार वाहतूक विभाग कारखान्यांत दोन पोलीस सब-इन्स्पेक्टर

तंत्रज्ञ आणि बरेचसे पोलीस जमादार तंत्रज्ञ इत्यादींची जादा भरती करण्याचें काम पूर्ण झालें आहे. डेप्युटी अकौन्टंट आणि वरिष्ठ कारकून यांनी पोलीस सुपरिंटेडंटला नेहमीच्या कार्यालयीन कामांतून मुक्त केल्यामुळें पोलीस सुपरिंटेन्डटला आतां कारखान्यांतील कामावर आणि भांडारावर नीट देखरेख ठेवतां येणें शक्य झालें असून, कार्यालयाच्या, भांडाराच्या आणि कारखान्याच्या कामांत सुधारणा झाली आहे आणि बिघडलेल्या वाहनांची दुरुस्ती तावडतोब करण्यांत येत असून ती पूर्वीपेक्षां कमी वेळांत दळणवळणासाठीं आणलीं जातात.

### (६) मोटार चालविण्याच्या पाठ्यक्रमाचें प्रशिक्षण.

ह्याबाबतची प्राथमिक तयारी पूर्ण झाली आहे आणि मोटर वाहतूक विभागांत ड्रायव्हर म्हणून काम करण्यास तयार असलेल्या पोलिसांना चालू वर्षामध्यें, मोटर ड्रायविंगच्या पाठयक्रमांचें प्रशिक्षण देण्यास सुरवात होईल

### सशस्त्र-पोलीस.

बृहन्मुंबई सशस्त्र पोलीस दलांची तीन तुकड्यांमध्यें विभागणी करण्यांत आली असून प्रत्येक तुकडी शहर पोलीस सुपरिन्टेंडच्या ताब्यांत असते सरकारी इमारती, बँका आणि खाजगी कंपन्या यांना रकमा नेण्याकरितां लागणारे रक्षक आणि कैद्यांना नेण्याकरितां लागणारे रक्षक, यांची सशस्त्र पोलीस दलांतून तरतूद करण्यांत येते. याशिवाय, निरनिराळ्या प्रसंगीं बंदोबस्ताकरितांसुद्धां सशस्त्र पोलीस पुरविण्यांत येतात. सशस्त्र दलाच्या मुख्यालयांत नवीन उमेदवारांना प्रशिक्षण देण्याचें काम आणि जमावावर नियंत्रण ठेवण्याबाबतचें आणि बृहन्मुम्बई पोलीस दलाची भांडारें आणि शस्त्रागार यांची व्यवस्था राखण्याबावत अधिकारी आणि इतर नोकरवर्गांना उजळणी पाठयक्रम देण्याचें काम करण्यांत येतें.

समालोचनाखालील कालावधीमध्यें "एल" विभागाच्या भरती केलेल्या उमेदवारांना राहण्यासाठीं लांब बराकी आणि जिल्ह्यांतून भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांकरितां जादा राहण्याच्या जागा बांधण्यांत आल्या.

लोकांना राहण्यासाठीं घराचें बांधकाम चालू आहे. जमाव नियंत्रण करण्यासाठीं एक उजळणी पाठ्यक्रम घेण्यांत आला होता.

### (नवीन भरती केलेलें) लोक आणि त्यांचीं कुटुंबें यांच्या कल्याणासंबंधींचीं पूर्वी सुरू केलेलीं कामें:-

### प्रमुख गौण कामें :-

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खालील प्रमुख कामें हाती घेण्यात आलीं आणि प्रत्येक प्रमुख कामासमोर त्याचा अंदाजी खर्च देण्यांत आला आहे.

| प्रमुख कामें- | अंदाजी खर्च |
|---|---|
| [१] तपासणी करणाऱ्या ६ पोलीस अधिकाऱ्यांसाठीं नायगांव पोलीस मुख्यालयांत उपाहारगृहाच्या आणि भोजनगृहाच्या वरच्या मजल्यावर, घरें बांधणें. | रु. ७०,१८५ |
| [२] नायगांव येथें योजना क्र. ५७ प्लॉट नं. ४ या जागीं कॉंस्टेब्युलरी पोलिसांकरितां घरें बांधणें. | रु. ३७,२९,३४२ |
| [३] वाडी बंदर चाळ येथें ए आणि बी घराच्या आर. सी. सी. चें काम नवीन करणें. | रु. ८२,३४२ |

**गौण कामें:--**

रु. १,७०,००० इतका अन्दाजी खर्च असलेली वाढ, फेरबदल, दुरुस्त्या इ. सारखीं गौण स्वरूपाचीं अनेक कामें या काळांत हातीं घेण्यांत आलीं. चालू आर्थिक वर्षांत खालील योजना किंवा प्रस्ताव हातीं घेण्याचें योजिलें आहे.

**विभागीय पोलीस.**

[१] सर्व पोलीस स्टेशनांस वांटून दिलेल्या पोलीस संख्येची पुनर्संघटना करणें.

[२] सांताक्रूझ आणि घाटकोपर येथें सब-टेलिफोन एक्सचेंज उभारणें.

**शस्त्रें आणि दारुगोळा विभाग**

एक पोलीस सुपरिंटेंडेंट आणि इतर नोकरवर्ग यांच्या जादा भागांची निर्मिति करून या विभागांचें पुनर्संटवन करणें.

**बिनतारी पोलीस विभाग :—**

[१] जी. एम्. आणि पी. विभागांत जादा फिरत्या गाड्यांची सोय करणें.

[२] सांताक्रूझ येथें बिनतारी संदेश पाठविणाऱ्या स्टेशनची तरतूद करणें.

**गुप्त पोलीस :—**

गुप्त पोलिसांच्या मोडस् ऑपरेंडी ब्युरोमधील (कार्य पद्धतीविषयक ब्युरो) जुन्या कारकुनांच्याऐवजीं नवीन कारकून घेणें.

**रहदारी विभाग:-**

चार जंक्शनच्या ठिकाणीं आपोआप सूचना दाखवणाऱ्या दिव्यांची तरतूद करणें.

**मोटार वाहतूक विभाग:-**

(१) रु. ३,९८,५०० इतक्या एकूण खर्च असलेल्या २२ जुन्या वाहनांऐवजीं नवीन वाहनें आणणें.

(२) बृहन्मुंबईच्या प्रदेशाचा विस्तार झाल्यामुळें रु. १,०३,३०० इतक्या एकूण खर्चाचीं ४ नवीन वाहनें खरेदी करणें.

(३) मोटार चालविण्याच्या प्रशिक्षणाचा पाठ्यक्रम.

**प्रमुख गौण कामें :-**

१९६०-६१ या आर्थिक वर्षांत खालील कामें हातीं घेण्याचें योजिलें आहे :—

**प्रमुख कामें.**

(१) किंग्ज सर्कल, माटुंगा येथें ७ अधिकारी आणि ९३ पोलिसांकरितां प्लॉट नं. ६६, ६७, ६८, ६९ आणि ७० वर घरें बांधणें.

(२) वरळी येथील पोलीस विभागाने ताब्यांत घेतलेल्या झोपड्यांचे नूतनीकरण करणें आणि त्यांची स्थिति बदलणें.

(३) महंमदअली रोड येथें पोलीस अधिकारी आणि पोलीस यांच्यासाठीं घरें बांधणें.

(४) नवरोजी हिल, डोंगरी येथें पोलीस अधिकारी आणि पोलीस यांच्यासाठीं घरें बांधणें.

(५) माझगांव येथें प्लॉट नं. १६७ वर पोलीस अधिकारी आणि पोलीस यांच्यासाठीं घरें बांधणें.

# सामान्य प्रशासन विभाग

राजनैतिक व सेवा विभाग हा सरकारचे मुख्य सचिव व मुख्य मंत्री ह्यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालीं कार्य करीत असतो. सचिवालयीन विभाग म्हणून त्याजकडे सोपविलेला विशिष्ट कामांशिवाय हा विभाग सरकारच्या आणखी कित्येक विभागांच्या कार्यांचा समन्वय साधणारा विभाग म्हणून काम करतो. हा विभाग सेवा, नोकरींत भरती करण्याबाबतचे नियम, राज्यघटना, संसद व राज्य विधानमंडळांच्या निवडणुका इत्यादींबाबतचें कामकाज, तसेंच परदेशी इसम व परराष्ट्रीय संबंध यांबाबतचे प्रश्न, समारंभ, शिरगणती, सुट्ट्या, आय्. ए. एस्. व आय्. पी. एस्. अधिकाऱ्यांच्या नेमणुका व नियुक्ति, तसेंच विलीन झालेलीं संस्थानें व राज्यपुनर्रचनेविषयींच्या सर्व बाबीं या संबंधींचीं कामें करतो. या विभागाच्या नियंत्रणाखालीं १९५४-५५ मध्यें निर्मिलेला संघटना व पद्धति विभागहि काम करतो. वेगवेगळ्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांतील या विभागाच्या कार्याचें थोडक्यांत वर्णन पुढील परिच्छेदांत केलें आहे.

## निरीक्षण, संघटना व कार्यपद्धति

प्रशासकीय कार्यक्षमता सुधारणें, सरकारी कार्यालयांतील काम जलद उरकतांना येणारे टाळतां येण्याजोगे विलंब दूर करण्यास प्रोत्साहन देण्यासाठीं आस्थापूर्वक प्रयत्न सुरू करून ते चालू ठेवणें हें या शाखेच्या कार्याचें उद्दिष्ट आहे.

२. १९५९-६० या वर्षाच्या पहिल्या सहामाहींत सचिवालयीन विभागांचें निरीक्षण करण्याच्या पद्धतीमध्यें एकजिनसीपणा आणण्यांत आला व नियमित अंतरानें शाखांचें निरीक्षण करण्यांत आलें. त्यामुळें कामकाजाची गति कांहीं प्रमाणांत वाढविण्यांत येऊन कामांतील ज्या दोषांवर उपाययोजना करणें आवश्यक होतें असे मुख्य दोष शोधून काढण्यास मदत झाली. सचिवालयीन विभागांतील सरकारी पत्रव्यवहार, कॅश सेक्शनची तपासणी इत्यादींत वापरलेल्या संक्षिप्त शब्दांची एक संयुक्त यादी तयार करण्याचें काम यासारख्या, कार्यपद्धतींतील कांहीं इतर सुधारणा करण्याचें कामहि हातीं घेण्यांत आलें. महाराष्ट्र व गुजराथ या नवीन राज्यांच्या निर्मितीबाबतच्या प्राथमिक कामांमुळें, १९५९–६० या वर्षाच्या दुसऱ्या सहामाहींत विभागाचें काम फक्त विहित पत्रकांची सूक्ष्म तपासणीपुरतेंच मर्यादित राहिलें.

३. नवीन महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीबरोबरच, आपलीं उद्दिष्टें शक्य तितक्या लवकर साध्य करण्याच्या दृष्टीनें अधिक निकडीचीं कामें करण्याकरितां प्रशासकीय यंत्रणेची गतिमानता वाढविणें आवश्यक आहे. हें उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून, सचिवालयीन विभागाच्या संघटना व कार्यपद्धति यांबाबतच्या कार्यक्रमाचें पुनरुज्जीवन करण्याचें व विभाग प्रमुखांच्या कार्यालयापर्यंत ह्या कार्यक्रमांचा विस्तार करण्याचें योजिलें आहे.

## राज्यपुनर्रचना

सन १९५६ च्या राज्यपुनर्रचना अधिनियमान्वयें झालेल्या राज्यपुनर्रचनेंतून निर्माण होणारे व राज्य पुनर्रचनेसंबंधीचे प्रश्न हाताळण्यासाठीं राज्य पुनर्रचना विभागाची निर्मिति करण्यांत आली. १९५९–६० या वर्षांत पूर्वीचें मुंबई राज्य, मध्य प्रदेश, हैद्राबाद, सौराष्ट्र

कच्छ ह्यांच्याकडून मुंबई राज्याच्या वांटणीस आलेल्या नोकरवर्गाचें एकत्रीकरण करण्याचें काम जवळजवळ पूर्ण करण्यांत आलें होतें. राज्याच्या वांटणीस आलेल्या सरकारी नोकरवर्गापैकीं ९४ टक्के नोकरवर्गाचें अंतर्लयन करणें व पगार ठरविणें याबाबतचे आदेश देण्यांत आले होते. वांटणी केलेल्या सरकारी नोकरांची वरिष्ठता ठरविण्याबाबतच्या आदेशांत फेब्रुवारी १९६० मध्यें बदल केल्यामुळें सर्वसामान्य श्रेणीव्यवस्था निदर्शक यादी तयार करण्याचें काम, त्यासाठीं लागणारी प्रारंभिक माहिती गोळा करण्यांत आली असून देखील, पूर्ण होऊं शकलें नाहीं. उरलेलें काम लौकरच पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

राज्य सरकारच्या नोकरींत असलेल्या अनुक्रमें राजपत्रित व अराजपत्रित नोकरवर्गाच्या विनंतिअर्जाबाबत भारत सरकारला सल्ला देण्यासाठीं भारत सरकारनें स्थापन केलेल्या दोन वैधानिक समित्यांखेरीज, महाराष्ट्र सरकारनें या राज्याच्या वांट्यास आलेल्या सरकारी नोकरां-कडून येणाऱ्या विनंतिअर्जांचा सर्वांगीण व न्याय्य विचार केला जावा म्हणून एक समिति नेमली असून मुख्य सचिव हे ह्या समितीचे चेअरमन व निरनिराळया घटक प्रदेशांतील प्रशासनाचा अनुभव असलेले वरिष्ठ अधिकारी तिचे सभासद आहेत. सरकारकडे सादर कर-यांत आलेले विनंतिअर्ज सल्ला देण्यासाठीं ह्या समितीपुढें ठेवण्यांत येतात व तदनंतरच सरकार आपला निर्णय देतें.

३. १९५९–६० या वर्षांत या राज्यासाठीं नियुक्त केलेल्या सरकारी नोकरांकडून मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश किंवा म्हैसूर या राज्यांमध्यें फेरवांटणी करण्याकरितां जवळजवळ २,६०० अर्ज सरकारकडे आले होते. हे अर्ज संबंधित सल्लागार समितीपुढें ठेवण्यांत आले; अजून या अर्जांबाबत भारत सरकारचे अखेरचे निर्णय बाहेर पडावयाचे आहेत.

४. खास संस्थांना मिळणाऱ्या सवलती पुढें चालूं ठेवणें, मालाची व भांडाराची विभागणी करणें, इत्यादींसारख्या राज्यपुनर्रचना अधिनियम, १९५६ यामधील इतर तरतुदींच्या अंमलबजावणीचें कार्यहि अधिनियमांतील तरतुदीनुसार किंवा संबंधित राज्य सरकारशीं झालेल्या तडजोडीनुसार किंवा भारत सरकारच्या निवाड्याबरहुकूम चालू आहे.

## निवडणुका

ह्या विभागांतील निवडणूक-शाखा ही संसदेतील व राज्य विधान मंडळ यांतील निवडणुकांसंबंधीचीं शिरगणती, विधानमंडळ, प्रसिद्धि व घटना यासंबंधींचीं कामें करते.

मतदारांची वार्षिक यादी तयार करण्याचें काम चालूं आहे. श्री. तोडूरवार यांच्या निधनामुळें रिकामी झालेली जागा भरण्यासाठीं चांदा जिल्ह्यांतील आरमोरी मतदारसंघांत एक पोट-निवडणूक लढविण्यांत आली. लोकसभेच्या जालना मतदार संघांतून एक व विधान-सभेच्या तुमसर मतदारसंघांतून दुसरी अशा दोन पोटनिवडणुका अजून व्हावयाच्या असून ह्या निवडणुका पावसाळ्यानंतर लढविण्याचें योजिलें आहे. राज्यसभेच्या मतदार संघाच्या द्वैवार्षिक निवडणुका आतां संपलेल्या असून विधानसभेच्या राज्यांतील सभासदांकडून लढविल्या जाणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या निवडणुका ६ जुलै १९६० रोजीं लढविण्यांत

येतील; त्याचप्रमाणें मुंबई पुनर्रचना अधिनियमानुसार वांटणीस आलेल्या राज्यसभेच्या एका जादा जागेची निवडणूक दि. ६ जुल १९६० रोजीं घेण्याचें योजिलें आहे.

**शिरगणती**

शिरगणतीसंबंधींच्या कामांच्या तपशीलवार कार्यक्रमाबाबत चर्चा करण्यासाठीं दि. १ एप्रिल १९६० रोजीं मुंबईमध्यें सर्व कलेक्टरांची परिषद् भरविण्यांत आली होती. या कामकाजावर सर्व तऱ्हेनें देखरेख ठेवण्याचें काम जिल्हा कलेक्टरांकडे सोंपविण्यांत आलें आहे.

**समारंभ, दौरे, राजकीय निवृत्तिवेतनें, इत्यादिः-**

स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन यांसारखे समारंभ साजरे करण्याची व्यवस्था करणें हें ह्या विभागाच्या कार्यांपैकीं महत्वाचें कार्य असून या समारंभांची व्यवस्था करण्याव्यतिरिक्त ह्या विभागाला परदेशी पाहुण्यांचें आगतस्वागत व व्यवस्था करणारा विभाग म्हणूनहि काम करावें लागतें. १९५९-६० या वर्षी अत्यंत महत्त्वाच्या अशा पुष्कळ परराष्ट्रीय व्यक्तींनी व प्रतिनिधिमंडळांनीं मुंबईला भेटी दिल्या; त्यांत पुढील व्यक्तींचा समावेश होतो. रशियाचे अध्यक्ष व्होरोशिलॉव, डॉ. व्ही. जे. सक्सेलिनन, फिनलंडचे पंतप्रधान, स्वीडनचे पंतप्रधान, मंगोलियाचे पंतप्रधान, नेपाळचे महाराज, नेपाळचे पंतप्रधान, इराणचे युवराज गुलाम रोझा, इथिओपियाचे युवराज, बेल्जियमचे भूतपूर्व महाराज लिओपोल्ड, बर्माचे यु. नू., राष्ट्रकुटुंब संबंधविषयक मंत्री श्री. सी. जे. एम. अलपोर्ट, टी. डी., एम्. पी; युगोस्लाव्हियाच्या फेडरल एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद श्री. मायलेंटिज पोपोव्हिक, मोरोक्को येथील मोठी बेन बारका, घानाच्या परराष्ट्रीय संबंधविषयक मंत्रालयाचे कायम सचिव, श्री. एफ्. देई अनंग, न्यूझीलंडच्या वनविभागाचे मंत्री माननीय इ. टी. तिरिकातेन, रशियाच्या कृषि विभागाचे मंत्री श्री. व्ही. व्ही. मॅटकेव्हिच, रशियन न्यायाधीश व वकील यांचे प्रतिनिधिमंडळ, रशियाच्या भूगर्भशास्त्र व खनिज संपत्ती खात्याचे मंत्री श्री. अँट्रोपॉव्ह, रशियाच्या आर्थिक संबंधाबाबतच्या राज्यसमितीचे अध्यक्ष श्री. स्कॅचकॉव्ह, पोलिश परराष्ट्रीय व्यापारमंत्री श्री. ट्रॅझुस्की, झेकोस्लोव्हाकियन संसदीय प्रतिनिधिमंडळ, कायद्याचा अभ्यास करणारे पोलिश प्रतिनिधिमंडळ व युगोस्लाव्हियाचे संसदीय प्रतिनिधिमंडळ.

प्रवासाच्या प्रवृत्तीचा विकास करणें हाहि या विभागाचा दुसरा प्रमुख कार्यक्रम आहे. परदेशी व आपल्या देशांतील हौशी प्रवाशांची रहदारी वाढविणें हें सरकारचें धोरण आहे. परदेशी प्रवाशांची रहदारी हा परदेशी चलन मिळविण्याचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. प्रवाशांच्या निरनिराळया केंद्रांचा विकास करण्यासाठीं धक्के बांधणें, घारापुरी येथें उपाहार व विश्रामगृहें आणि सामान ठेवण्याच्या खोल्या बांधणें, अजिंठा येथें उपाहार व विश्रामगृह व बस स्टेशन बांधणें, अजिंठा येथें उपाहारगृह बांधणें व उद्यान तयार करणें, जळगांव येथें एक स्वागतकेंद्र बांधणें व औरंगाबाद येथें एक विश्रामगृह बांधणें यांसाठीं तरतूद करणाऱ्या योजनांचा द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समावेश केलेला असून अशाच योजनांचा तृतीय पंचवार्षिक योजनेंतहि समावेश करावयाचें योजिलें आहे.

ह्या विभागाच्या इतर कार्यांमध्यें सल्ला घेण्याजोग्या बाबी, राजकीय निवृत्तिवेतनें, राष्ट्रीय पुरस्कार, विशेषाधिकार, खाजगी मालमत्ता, संस्थानिकांना वार्षिक तनखे व त्यांचे कौटुंबिक विवाद, संस्थानिकांच्या नातेवाइकांना भत्ते, विलीन संस्थानांच्या गादीचे वारस, सेवे दाखलची कोल्हापूरचो जहागीर, विलीन संस्थानांच्या शिलकी रकमा, इत्यादि महत्त्वाच्या प्रश्नांचा विचारहि समाविष्ट केलेला आहे.

## प्रसिद्धि संचालनालय

प्रसिद्धि संचालनालयानें लोककल्याणाच्या व प्रशासनाच्या बहुविध क्षेत्रांतील सरकारच्या कार्याची माहिती लोकांस देण्याचें व सरकारला लोकमत आणि लोकांच्या गरजा आणि गाऱ्हाणीं यांची माहिती करून देण्याचें द्विविध काम चालू ठेवलें आहे. वर्तमानपत्रें हीं सरकारला लोकमताची दिशा दाखविणारीं प्रमुख साधनें ठरलीं आहेत. परंतु प्रशासनाच्या विविध क्षेत्रांतील सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची व धोरणांची माहिती लोकांना देण्यासाठीं मुद्रित साहित्य, चित्रपट, रेडिओ आणि इतर दृश्य-श्राव्य यांसारख्या प्रसिद्धीच्या सर्व साधनांचाहि उपयोग करण्यांत आला. वस्तुस्थितीवर आधारलेली माहिती लोकांना देणें, हें या बाबतींतील धोरण आहे.

१९५९–६० हें द्वितीय पंचवार्षिक योजनेचें चौथें वर्ष होतें. पूर्वीच्या वर्षांप्रमाणेंच पंचवार्षिक योजनेला, विशेषतः राज्य योजनांना प्रसिद्धि देण्यासाठीं सर्व महत्त्वाच्या साधनांचा उपयोग करून योजना चालू ठेवण्यांत आल्या.

खालीं प्रत्येक योजनेच्या १९६०-६१ या वर्षांमधील कार्यक्रमांची संक्षिप्त माहिती दिली आहे.

### १. ग्रामीण ध्वनिक्षेपणाचा विस्तार करणें:—

रेडिओ हें जनतेशीं संपर्क साधण्याचें अत्यंत जलद व कार्यक्षम साधन असल्यामुळें ग्रामीण ध्वनिक्षेपण योजनेला अग्रस्थान देण्यांत आलें आहे. ह्या योजनेनुसार अंशदानाच्या तत्त्वावर म्हणजे अंशतः सरकारकडून व अंशतः या योजनेंत भाग घेणाऱ्या खेड्यांकडून खर्च सोसला जातो. खेड्यांत रेडिओ सेट बसविण्यांत येऊन त्यांची व्यवस्था पहाण्यांत येते. हे रेडिओ सेटस् भारत सरकार खरेदी किंमतीच्या अर्ध्या किंमतींत पुरवितें. १९५९-६० या वर्षांत बसविण्यास मंजुरी मिळालेल्या २२९० रेडिओ सेट्सपैकीं जवळ जवळ १४५० रेडिओ सेटस् डिसेंबर १९५९ अखेरपर्यंत मिळाले होते. सप्टेंबर १९५९ अखेरपर्यंत बसविलेल्या रेडिओ सेटस्‌ची एकूण संख्या ९४९ इतकी होती. डिसेंबर १९५९ पर्यंत बसविलेल्या रेडिओ सेटस्‌ची एकूण संख्या ३९२४ इतकी होती. या योजनेला खेड्यामधून चांगला प्रतिसाद मिळत असून, १९६०-६१ मध्यें आणखी २१०० रेडिओ सेटस् बसविण्याचा कार्यक्रम आंखण्यांत आला आहे.

### २. सचित्र लेखांद्वारें प्रसिद्धि:—

ह्या योजनेची हळू हळू प्रगति झाली आहे. सचित्र लेख व योजनेबाबतची इतर माहिती वृत्तपत्रांना साप्ताहिक आवृत्तीसाठीं किंवा विकासकार्याला वाहिलेल्या विशेषांकांत व पुरवणी अंकांत प्रसिद्ध करण्यासाठीं पाठविणें हें या योजनेचें उद्दिष्ट आहे.

**३. मुद्रित साहित्य व चित्रें यांच्याद्वारें प्रसिद्धिः—**

या वर्षात प्रसिद्ध करण्यांत आलेल्या प्रकाशनांमध्यें अल्पबचत, गंगापूर व घोड नदी प्रकल्प, ग्रामीण स्वास्थ्य व आरोग्य व पशुसंवर्धन यांबाबतच्या पुस्तिकांची मालिका महत्त्वाची होय. योजनेच्या कार्यासंबंधींच्या स्लाईड्स व भित्तिपत्रकेंहि या वर्षी तयार करण्यांत आली.

**४. माहिती केंद्रेंः—**

पंचवार्षिक योजनेचे उद्देश व त्याबाबत साध्य केलेलें यश याबाबत जनतेला अधिक चांगली माहिती करून देण्यासाठीं माहिती केंद्रें स्थापन करण्याचें योजिण्यांत आलें. मुंबई, नागपूर व राजकोट येथें तीन प्रमुख केंद्रे व उरलेल्या ४० जिल्ह्यांत एकेक केंद्र स्थापन करण्याचें योजिलें होतें. या तीन प्रमुख केंद्रांवर केल्या जाणाऱ्या खर्चापैकीं अर्धा खर्च भारत सरकारकडून सोसला जात आहे. राजकोट येथील एक प्रमुख केंद्र गुजराथ राज्यांत गेलें आहे. योग्य त्या जागेच्या अभावीं मुंबई व इतर जिल्हे येथील केंद्रें स्थापन करण्यास विलंब लागत आहे. यावर्षी (१९६०-६१) शक्यतोंवर सर्व केंद्रें सुरूं करण्याची पराकाष्ठा करण्यांत येत आहे.

**५. प्रदर्शनेंः—**

या योजनेंत, पंचवार्षिक योजनेतील निरनिराळ्या विकास योजना व प्रकल्प यासंबंधीच्या प्रतिकृति, सचित्र व इतर तक्ते आणि त्यासारख्याच इतर गोष्टी तयार करून त्या अखिल भारताच्या राज्य, प्रादेशिक व जिल्हा पातळीवरील प्रदर्शनांमध्ये दाखविण्याच्या कामाचा समावेश होतो. जलसिंचन, विद्युत् व इतर प्रकल्प यांपैकीं कांही प्रकल्पांच्या प्रतिकृति व इतर सामग्री मिळविण्यांत आली असून ती हातीं असलेल्या त्या स्वरूपाच्या इतर वस्तूंबरोबर राज्यांतील व राज्याबाहेर भरविण्यांत येणाऱ्या महत्त्वपूर्ण प्रदर्शनांमध्यें मांडण्यात येते.

समालोचनाखालील वर्षाच्या कालावधींत राज्य सरकारच्या वतीनें संचालनालयानें खालील प्रदर्शनांत भाग घेतला. तीं प्रदर्शनें म्हणजेच बंगलोर येथें ६५ व्या कॉंग्रेस अधिवेशनानिमित्त भरलेलें प्रदर्शन व एस्. एस्. ज्योति या जहाजावर भरलेलें प्रदर्शन. हें जहाज मध्यपूर्वेकडील कांहीं बंदरांत गेलें होतें. हें प्रदर्शन निर्यात उत्तेजन मोहिमेच्या मदतीकरितां भरविण्यांत आलें होतें. चालू वर्षी मुम्बई शहरांत भरलेल्या महाराष्ट्र राज्य प्रदर्शनामुळें संचालनालयाच्या या क्षेत्रांतील कीर्तींत भरच पडली व शहरांत एक "कायम" प्रदर्शन भरविण्याचा मार्ग त्यामुळें सुकर झाला.

**६. पत्रकारांचे दौरेः—**

पंचवार्षिक योजनेखालीं कितपत विकास घडून आला आहे, ह्याची वृत्तपत्रांद्वारें स्वतंत्रपणें माहिती मिळवून तिचें मूल्यमापन करणें लोकांना शक्य व्हावें म्हणून, जेथें महत्त्वाचें जलसिंचन, विद्युत् आणि इतर विकास प्रकल्प चालू करण्यांत आले आहेत, त्या ठिकाणीं व प्रदेशांमध्यें पत्रकारांचे दौरे आखण्यांत आले आहेत. असे अनेक दौरे या वर्षात काढण्यांत आले. ही योजना चांगलीच लोकप्रिय झाली असून तीमुळे वर्तमानपत्रांतून पंचवार्षिक योजनेची उत्स्फूर्तपणें प्रसिद्धि होत आहे.

७. चित्रपटांद्वारें प्रसिद्धि :–

पंचवार्षिक योजनेंवरील माहितीपट व योजनेशीं संबधित विषयाना वाहिलेले चित्रपट तयार करण्याचा या योजनेचा हेतू आहे. हे माहितीपट चित्रपट योजनेंत समाविष्ट नसलेल्या इतर विषयांवरील नेहमीचे माहितीपट व दरमहा तयार होणारे वार्तापट यांना जोड देण्यासाठी तयार केले जातात. जिल्ह्यांमध्यें दौऱ्यावर असणाऱ्या संचालनालयाच्या फिरत्या प्रसिद्धि-व्हॅनद्वारें हे चित्रपट दाखविले जातात. भारत सरकारच्या चित्रपट-सल्लागार-मंडळानें मान्य केलेले यांपैकी कांहीं माहितीपट भारत सरकारच्या चित्रपट मंडळाद्वारें चित्रपट-गृहांतहि दाखविले जातात. प्रथम आणि द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील कितीतरी वस्तुस्थितिविषयक माहितीपट आणि विषयविशिष्ट चित्रपट तयार करून दाखविण्यांत आले आहेत आणि आणखीहि चित्रपटांची निर्मिती चालू आहे.

८. मनोरंजनाद्वारें प्रसिध्दि [गीत व नाटकें] :–

मनोरंजनाच्या कार्यक्रमाद्वारें प्रसिद्धी देण्याच्या योजनेचे दोन उद्देश आहेत. ते म्हणजे गाणें, नाटक व मनोरंजनाचे इतर प्रकार यांच्या माध्यमाद्वारें पंचवार्षिक योजनेचा संदेश प्रसृत करणें व आपल्या पारंपारिक कला प्रकारांचें पुनरुज्जीवन करणें. नाटकें, पोवाडे व इतर गाणीं तयार करून त्यांचे प्रयोग करून दाखविण्यासाठीं सृजनशील लेखक व कलाकार यांचें सहकार्य मिळवून त्यांच्या सेवेचा उपयोग करून घेणें हा या योजनेचा हेतू आहे. हें साहित्य प्रसिद्ध करण्यांत येत असून तें प्रयोगांकरितां किंवा गाण्याकरितां मोठ्या प्रमाणावर वांटण्यांत येतें. कांहीं कीर्तनकारांचीहि नियुक्ति केली असून ते खेड्यांत फिरून कीर्तनें करतात. या योजनेनुसार कवी व शाहीर यांची संमेलनेंहि भरविण्यांत येतात.

९. प्रसिद्धिच्या फिरत्या मोटारी :–

खेड्यांत राहणाऱ्या लोकांबरोबर प्रत्यक्ष संपर्क प्रस्थापित करण्याकरितां, संचालनालयाकडे, प्रसिद्धीच्या ४७ फिरत्या मोटारी आहेत. १ साऊंड फिल्म प्रोजेक्टर, ग्रामोफोन आणि लोकांना फुकट वांटण्यासाठीं अगर नाममात्र किंमत घेऊन विकण्यासाठीं पंचवार्षिक योजनेसंबंधींचीं व सरकारच्या इतर कार्याची माहिती देणारें छापलेलें सचित्र प्रसिद्धि-साहित्य प्रत्येक फिरत्या मोटारींत ठेवण्यांत येतें. अगोदर संमत केलेल्या कार्यक्रमानुसार प्रत्येक महिन्यांत ह्या मोटारी २० ते २५ खेड्यांना भेटी देतात आणि खेडुतांच्या घराजवळच योजनेची माहिती देतां देतां त्यांचे मनोरंजनहि करतात. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमाव्यतिरिक्त काम करणाऱ्या ३२ मोटारींखेरीज आजपर्यंत आणखीं १५ मोटारींची भर टाकण्यांत आली आहे. ह्या जादा मोटारी मुख्यत्वेंकरून मराठवाडा व विदर्भांतील जिल्ह्यांसाठीं वापरण्यांत येतील. राज्यांतील प्रत्येक जिल्ह्यास एक व मोठ्या जिल्ह्यास दोन मोटारी असाव्यात असा उद्देश आहे.

१० दुरुस्तीसाठीं व व्हॅन्ससाठीं लागणाऱ्या साधनसामुग्रीसाठीं वर्कशॉप :–

संचालनालयाच्या फिरत्या प्रसिद्धि गाड्यांमधील प्रोजेक्टर्स, जनरेटर्स, यंत्रसामग्री, गॅझेटस् इत्यादींची वेळच्यावेळीं दुरुस्ती करण्याचीं व निगा ठेवण्याबाबतची कामें पार पाडणे हा या योजनेचा प्रधान उद्देश आहे. पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमानुसार मुंबई,

राजकोट व नागपूर येथें प्रत्येकीं एक याप्रमाणें तीन कारखाने स्थापन करण्यांत आले आहेत.

राजकोट येथील कारखाना आतां गुजराथ राज्यांत गेला आहे. १९६०–६१ सालीं हे कारखाने जास्त उपयुक्त व कार्यक्षम व्हावेत या दृष्टीनें प्रयत्न करण्यांत येतील.

## वृत्त वितरण

१९५९ सालीं १,९९६ प्रेसनोट्स् व २,०९७ वृत्त–विशेष प्रसिद्ध करण्यांत आले. दिवसांतून तीन वेळां मुंबईतील वृत्तपत्र कार्यालयांत खास दूतांद्वारें प्रेसनोट्स् पाठविण्यांत येतात. तसेंच अखिल भारतीय आकाशवाणीला प्रादेशिक बातमीपत्रें प्रसृत करतां यावीत आणि टेलिप्रिंटर सर्व्हिस योजनेनुसार वेगवेगळ्या जिल्हा केंद्राकडे बातम्या पोहोचत्या व्हाव्यात म्हणून प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाकडे वृत्तनिवेदनें पाठविलीं जातात. विभागीय भाषेंतील वृत्तनिवेदनें पोस्टामार्फत न पाठवितां मुंबईहून निघणाऱ्या पहिल्या व जलद गाडीनें पार्सलद्वारां पाठविलीं जातात आणि प्रादेशिक प्रसिद्धि अधिकारी तीं स्थानिक वर्तमानपत्रांना वांटून देतात.

याशिवाय वृत्तपत्र परिषदा भरवून आणि पत्रकारांचे दौरे नियोजित करून त्याद्वारें सरकारी कार्याची प्रसिद्धि केली जाते. पत्रकार परिषदेंत निरनिराळ्या विभागांचे मंत्री एकाद्या किंवा अनेक विषयांबाबतचें धोरण अथवा योजना पत्रकारांना तपशीलवार समजावून सांगतात. पत्रकारांसाठीं आंखण्यांत आलेल्या दौऱ्यामुळें त्यांना विविध प्रकल्पांबाबत प्रत्यक्ष माहिती मिळते आणि अशा तऱ्हेनें त्यांनीं गोळा केलेल्या माहितीला वृत्तपत्रांच्या स्तंभांतून प्रसिद्धि दिली जाते.

मंत्री आणि सरकारी विभाग यांच्या मागणीनुसार त्यांच्या उपयोगाकरितां अथवा संदर्भाकरितां संचालनालयांकडून त्यांना वृत्तपत्रांचीं कात्रणें पुरविण्यांत येतात. याशिवाय पत्रकारांना सरकारी धोरण, कार्यक्रमांची यशस्विता अथवा प्रशासनदृष्ट्या महत्त्वाच्या विषयासंबंधीची आवश्यक तो पार्श्वभूमि अथवा संशोधनात्मक माहिती त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनांत उपयोगी पडावी या दृष्टीनें पुरविण्याचें कामहि संचलनालयाकडून केलें जातें.

निमसरकारी अथवा सरकारपुरस्कृत संस्थांनी सुरू केलेल्या प्रसिद्धि कार्यास संचालनालय सहकार्य देत असतें.

## प्रकाशनें

'लोकराज्य' (साप्ताहिक) हें साप्ताहिक इंग्रजी, मराठी व हिंदी या तीन भाषांतून प्रसिद्ध होतें. त्यामधून 'प्रशासना'च्या निरनिराळ्या क्षेत्रांतील सरकारी कार्याची माहिती पुरवली जाते. ज्या विभागांत इतर वर्तमानपत्रें पुरेशा प्रमाणांत मिळूं शकत नाहीत, त्या विभागांत प्रथमतः लोकराज्याचा प्रसार करणें हा ह्या साप्ताहिकाचा मुख्य उद्देश आहे.

'शेतकरी' हें मासिक शेतकऱ्यांना शेतीच्या आधुनिक पद्धति शिकविणें व ग्रामीण जनतेचें लक्ष ग्रामीण विकासावरील प्रश्नावर केंद्रीभूत करणें ह्या विषयाला वाहिलेलें आहे. तें मराठी व इंग्रजी या भाषांतून प्रसिद्ध होतें.

सर्वोदय कार्यकर्त्यांना साहाय्य करण्याच्या हेतूनें जानेवारी १९५७ पासून 'सर्वोदय' नांवाचें एक मासिक सुरू करण्यांत आलें आहे. या मासिकांत हिंदी व मराठी भाषेंतील लेख प्रसिद्ध होतात. 'विकास' नांवाचें मराठी मासिक मुख्यतः विकासकार्यास वाहिलेलें आहे.

अल्प बचत मोहिमेला मदत करण्यासाठीं व तिचा प्रसार करण्यासाठीं 'स्मॉल सेव्हर' नांवाचें एक नवीन मासिक सुरूं करण्यांत आलें आहे.

"मुंबई सरकारची कृति आणि उक्ति" या त्रैमासिकांत वृत्तनिवेदन व वृत्तसमाचार ह्यांचें संकलन केलेलें असून. तें सरकारी विभागांना व वृत्तपत्रांना तत्कालिक संदर्भप्रकाशन म्हणून मुख्यतः उपयोगी पडतें.

"पोलिस" या त्रैमासिकाचा उद्देश राज्यांतील पोलिसवर्गाला गुन्हे शोधून काढण्याच्या अगदीं अद्यावत पद्धति, कायद्याची अम्मलबजावणी इत्यादि विषयासंबंधी परिपूर्ण माहिती देणें हा आहे.

## इतर प्रकाशनें

या नियतकालिकांशिवाय संचालनालय वेळोवेळीं विविध विषयांवर खास पुस्तिका प्रसिद्ध करतें. भित्तिपत्रकें, स्लाइडस्, हस्तपत्रकें, पुस्तिका इत्यादींच्या द्वारें प्रसिद्धि मोहिम चालूं ठेवतें. महाराष्ट्र सरकारच्या महत्त्वाच्या कामांचा आणि कार्यांचा वार्षिक आढावा घेणारा एकत्रित संदर्भ-ग्रंथ हा सुद्धा संचालनालयांतील प्रसिद्धि विभागाच्या प्रकाशनाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

१९५९-६० मध्यें संचालनालयानें इंग्रजी व प्रादेशिक भाषेंत सरकारच्या निरनिराळ्या कार्यक्रमासंबंधीच्या ८६ पुस्तिका प्रसिद्ध केल्या आहेत. भारत सरकारकडून मिळालेलीं किंवा खरेदी केलेली वा इतर ठिकाणाहून मिळविलेलीं प्रकाशनें एकूण ९९ होतीं. प्रदर्शनाकरितां स्लाइडस् देखील तयार करण्यांत आल्या.

## "प्रेस टुडे"

संचालनालय "प्रेस टुडे" या नांवाचें रोजच्या बातम्यांचें एक संक्षिप्त संकलन तयार करतें. सरकारशीं संबंधित असलेल्या बातम्या आणि टीका हिंदी, मराठी, गुजराथी, उर्दू आणि इंग्लिश या भाषांमधील महत्त्वाच्या आणि प्रातिनिधिक वर्तमानपत्रांकडून मागविल्या जातात. हिंदु, स्टेटस्मन्, हिंदुस्थान टाईम्स, नॅशनल हेराल्ड, इत्यादि राज्याबाहेरून प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांचाहि यांत समावेश केला जातो. आपापल्या विभागाशीं संबंधित असलेल्या बाबींची तत्परतेनें दखल घेतां यावी म्हणून मंत्री, उपमंत्री व सचिवालयांतील विभागांना या प्रती सादर करण्यांत येतात.

## वर्तमानपत्रांची सूक्ष्म तपासणी

वर्तमानपत्रांची सूक्ष्म तपासणी करणें व आवश्यक असेल त्यावेळीं जें वृत्त प्रसिद्ध झालें असेल त्याच्याशी संबंधित असलेला विभाग व अधिकारी यांच्याकडून माहिती मिळविणें, हें संचालनालयाच्या महत्त्वाच्या कामांपैकीं एक काम आहे. तपासणीनंतर चुकीचा किंवा दिशा-भूल करणारा मजकूर छापणाऱ्या वृत्तपत्रांना त्याचें निराकरण करणारें वृत्त पाठविलें जातें.

संबंधित विभाग किंवा कार्यालय यांच्या सूचनेनुसार इन्कार करणारें वृत्त अथवा स्पष्टीकरण पाठविले जातें. कांहीं बाबतींत संपादकांना अथवा स्वत: पत्रकारास व्यक्तिगत पत्रें पाठविली जातात.

## आकाशवाणीद्वारें प्रसिध्दी

अखिल भारतीय आकाशवाणीशीं विचारविनिमय करून संचालनालय प्रशासकीय कार्य व सरकारनें साध्य केलेल्या गोष्टी यासंबंधांतील निरनिराळया विषयांवर वळोवेळीं सरकारी अधिकाऱ्यांचीं भाषणें ठरवितें. संचालनालय वक्ते शोधून काढते, व्याख्यानांचे विषय सुचवितें, तीं भाषणें राज्यांतील आकाशवाणी केंद्रावरून ध्वनिक्षेपित झालीं म्हणजे वृत्तपत्रांतून प्रसिध्द केलीं जातात. सामुदायिक श्रवणयोजनेच्या कार्यक्रमांचें एक जाळें निर्माण करून सरकारचा ग्रामीण व औद्योगिक कार्यक्रम जनतेपर्यंत पोहोंचविण्यांत येतो व हे कार्यक्रम लोकोपयोगी करण्याकरितां अखिल भारतीय आकाशवाणीला सर्व प्रकारचें साहाय्य दिलें जातें.

महत्त्वाच्या समारंभाच्या आकाशवाणीवरून प्रसृत व्हावयाच्या वृत्तांताचा कार्यक्रम अखिल भारतीय आकाशवाणी अधिकाऱ्यांच्या सहकार्यानें वेळोवेळी आंखला जातो.

## माहिती

संचालनालयाला लोकांकडून सरकारचें मध्यवर्ती चौकशी कार्यालय म्हणून मानलें जात असल्यानें राज्यांतील आणि इतर ठिकाणच्या लोकांकडून पत्रव्यवहाराचा नित्यनियमित प्रवाह संचालनालयाकडे चालू असतो; प्रतिवर्षी शेंकडों बाबींची लेखी किंवा तोंडी माहिती विचारली जाते. ज्यावेळीं संचालनालयामधून माहिती देणें शक्य नसतें, तेव्हां त्या पृच्छा संबंधित विभागाकडे पाठविल्या जातात.

## ( जनता ) संपर्क कार्यालय

सचिवालयाचें चौकशी कार्यालय असलेल्या संपर्क कार्यालयांत दररोज सरासरी १०० लोक येतात. दररोज तेवढेच टेलिफोन येतात. येणाऱ्या लोकांत सर्व दर्जाचे लोक असतात.

हें कार्यालय लोकनृत्यासाठीं पथकांची निवड करणें व दिल्ली व मुंबई येथील प्रजासत्ताक-दिनासाठीं प्रसंगदर्शन करणारे ताफे तयार करणें यांजकडे लक्ष पुरवितें. तसेंच माहिती व मार्गदर्शन याच्या अपेक्षेनें पाठविलेल्या बऱ्याचशा पत्रांकडेदेखील कार्यालयाला लक्ष पुरवावें लागतें.

## संयुक्त राष्ट्र-दिन समारंभ व परदेशी शिष्टमंडळें

नित्यरिवाजाच्या कामाखेरीज संचालनालयानें आक्टोबर २४ ला बृहन्मुंबईत आणि मुंबई राज्यांतील इतर १३ निवडक ठिकाणीं झालेल्या संयुक्त राष्ट्र-दिन समारंभाची व्यवस्था पाहिली. ह्याखेरीज परदेशी शिष्टमंडळांची व इतर पाहुण्यांची व्यवस्था करणें आणि त्यांच्यासाठीं सांस्कृतिक आणि करमणुकीचे कार्यक्रम करणें हीं कामेंहि सरकारनें संचालनालयावर सोंपविलीं.

## चित्रपट निर्मिति व प्रसिद्धि

१९५९-६० मध्ये संचालनालयानें अकरा माहितीपट व पूर्ण लांबीचे सहा प्रतीकात्मक चित्रपट प्रसिद्ध केले. याशिवाय संचालनालयाकडून वार्षिक वार्तापट देखील प्रसिद्ध करण्यांत आले. या संचालनालयानें निर्माण केलेले चित्रपट सर्व चित्रपटगृहांतून

दाखविलें जाण्यासाठीं त्यांचा समावेश मान्यता मिळालेल्या चित्रपटांत करण्यासाठीं भारत सरकारच्या चित्रपट सल्लागार मंडळाकडे सादर केले जातात. त्याबरोबरच संचालनालयाच्या प्रसिद्धीच्या खास गाडीच्या द्वारें ते जिल्ह्यांतील ग्रामीण प्रदेशांत प्रदर्शित केले जातात. १९६०–६१ सालीं देखील हाच कार्यक्रम सुरू राहील.

## सचिवालय मध्यवर्ति ग्रन्थालय

सचिवालयांतील विभागाच्या व या विभागांतील अधिकाऱ्यांचा संदर्भ ग्रंथाबाबतच्या व इतर प्रकाशनांबाबतच्या गरजा भागविण्याचें काम हें ग्रंथालय करीत असतें. ग्रंथालयाचें धोरण आणि कारभार यांबाबत मार्गदर्शन करण्यासाठीं एक व्यवस्था समिति नेमण्यांत आली आहे. या ग्रंथालयाचा जनतेस मुख्यत्वेंकरून राज्यकारभार व सरकारी कार्यक्रम यासंबंधीं माहिती पुरविणारें संदर्भ ग्रंथालय म्हणून उपयोग होतो. ग्रंथालयांत दर महिन्यास भर घातल्या जाणाऱ्या पुस्तकांची यादी सचिवालयांतील विभागांत व त्यांतील अधिकाऱ्यांकडे पाठविली जाते- त्यामुळें त्यांना पुस्तकांची निवड करणें सोईचें जातें. या ग्रंथालयाची कार्यकारी व्यवस्था प्रसिद्धि संचालकाच्या कार्यालयाकडे आहे. १९५९-६० मध्यें वाचनालयांतील पुस्तकें व प्रकाशनें मागील वर्षाच्या २३,००० पासून २४,८०० पर्यंत वाढली आहेत.

## प्रादेशिक प्रसिद्धि

प्रसिद्धि-संचालनालयास जिल्ह्यांतील वर्तमानपत्रांशीं प्रसिद्धीच्या दृष्टीनें निकट संबंध राखतां यावा म्हणून राज्यांतील प्रत्येक विभागासाठीं प्रत्येकीं एक प्रादेशिक प्रसिद्धि अधिकारी असतो. संबंधित प्रदेशांतील वृत्तपत्रांस सरकारसंबंधी वस्तुस्थितीवर आधारलेली माहिती पुरविणें, स्थानिक वृत्तपत्रांशीं संपर्क राखणें आणि वृत्तपत्रांत सरकारसंबंधी गैरसमज पसरविणारी कोणतीहि बातमी प्रसिद्ध झाल्यास तिचें निराकरण करणें, स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांशीं संबंध ठेवणें आणि त्यांच्या विभागाच्या आवश्यक त्या प्रसिद्धीची सोय करणें, थोडक्यांत म्हणजे विभागीय वृत्तपत्रांना 'संपर्क कार्यालय' म्हणून मदत करणें हीं या प्रादेशिक कार्यालयांचीं मुख्य कामें आहेत.

प्रादेशिक प्रसिद्धि अधिकारी आणि त्यांच्या हाताखालीं काम करणारे जिल्हा प्रसिद्धि अधिकारी हे सरकारी कार्यक्रम मंत्र्यांचे दौरे, त्यांनीं पत्रकारांना दिलेल्या मुलाखती इत्यादींविषयीं, प्रादेशिक व स्थानिक बातम्या पुरविणारे मुंबई येथील मुख्य कार्यालयाचे वार्ताहर म्हणून काम पाहतात आणि प्रादेशिक घडामोडी व मतप्रवाह याविषयींची सविस्तर माहिती ते मुख्य कार्यालयांस कळवीत असतात.

## १९६०–६१ चा कार्यक्रम

पूर्वीच ठरविल्याप्रमाणें ग्रामीण ध्वनिक्षेपण योजनेनुसार २,१०० रेडिओ सेटस् उभारण्याचें ठरविण्यांत आलें आहे. संचालनालयाचे चित्रपट, प्रकाशनें व प्रदर्शनें इत्यादि इतर कार्यक्रमाची हल्लींची गति कायम राखण्यासाठीं व शक्य असल्यास ती वाढविण्यासाठीं प्रयत्न करण्यांत येत आहेत.

द्वितीय पंचवार्षिक योजनेचें हें शेवटचें वर्ष असल्यामुळें योजनेचीं उद्दिष्टें व यशस्विता यांना प्रसिद्धि देण्याच्या कार्यावर व तृतीय पंचवार्षिक योजनेंतील अधिक मोठ्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठीं लोकांना तयार करण्यावरच्या कामावर साहजिकच भर देण्यांत येईल.

टीप-- रेडिओ सेटस्, खास प्रसिद्धि गाड्या इ. च्या संख्येचा उल्लेख पूर्वीच्या मुंबई राज्याच्या संबंधांतील आहे. महाराष्ट्रराज्यनिर्मितीनंतर, फिरत्या प्रसिद्धि गाड्यांची संख्या ४७ ची २८ पर्यंत आलेली आहे. उरलेलीं वाहनें गुजरातच्या वांट्याला गेलेली आहेत. त्याचप्रमाणें उभारलेल्या किंवा उभारण्याचें ठरविलेल्या रेडिओ सेटस्च्या संख्येंतहि त्याच प्रमाणांत घट झालेली आहे.

### संकीर्ण

राजकीय, सामाजिक आणि धर्मादाय संस्था यासारख्या निरनिराळ्या क्षेत्रांद्वारें ज्यांनीं राष्ट्राची सेवा केली आहे अशा आणि ज्यांना साहाय्याची गरज आहे अशा इसमांना व त्यांच्या कुटुंबियांना साहाय्य देण्याच्या दृष्टीनें व सामाजिक हिताच्या व शौर्याच्या कृत्याबद्दल कार्यालयांतील व इतर इसमांना पारितोषिकें देण्याची एक योजना सरकारनें मंजूर केली आहे. वरील कारणांकरितां एक इच्छा निधि उभारण्यांत आला आहे व त्यासाठीं मुख्यमंत्री, इमारती व दळणवळण मंत्री, महसूलमंत्री व ग्रामीण विकास मंत्री व वनमंत्री ह्यांची एक समिति नेमली आहे. चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत ह्यासाठीं रु. ४७,००० ची तरतूद करण्यांत आली आहे.

# अर्थ--विभाग

## प्रास्ताविक

राज्याच्या आर्थिक साधनसंपत्तीच्या प्रशासनाची जबाबदारी अर्थ विभागाची आहे. सरकारच्या सर्वसाधारण धोरणाप्रमाणें आणि अत्यंत काटकसरीनें सार्वजनिक महसूल खर्च होत आहे याची खात्री करणें आणि आवश्यक तो महसुली निधि उभारणें हें त्या विभागाचें कार्य होय. तदनुसार, अंदाजपत्रक तयार करणें, विनियोग विधेयकें, करयोजना, सार्वजनिक कर्जे, हिशेब तपासणी, पगार व भत्ते आणि सरकारी नोकरांच्या सेवाविषयक अन्य शर्ती यांच्याशीं या विभागाचा संबंध येत असून आर्थिक संबंधांत विचारांत घेतल्या जाणाऱ्या सर्व बाबतींत हा विभाग सरकारला सल्ला देत असतो. सार्वजनिक महसुलांतून होणाऱ्या कोणत्याहि खर्चाबाबत अर्थविभागाची संमति आवश्यक असते. प्रशासक विभागाकडून खर्चाचे प्रस्ताव मांडले जातात व त्यांच्या सूक्ष्म तपासणीची जबाबदारी अर्थ विभागाची असते. सर्वसाधारणपणें अर्थविभाग आपण होऊन कोणत्याहि खर्चाचा प्रस्ताव मांडीत नाहीं. याशिवाय, व्यापार, उद्योग, बँक व्यवहार, कंपनीविषयक कायदा, रोखे बाजार आणि वायदे बाजार इ. विषय ज्या मर्यादेपर्यंत राज्याच्या अधिकार कक्षेखाली येतात, त्या सर्व बाबतींत अर्थविभाग जबाबदार असतो. ह्यापैकीं कांहीं बाबतींत, मध्यवर्ति सरकारचा प्रतिनिधि म्हणून, अर्थविभागास कार्य करावें लागतें.

## विमा निधि

सरकारी मालमत्तेचा विमा उतरण्यासाठीं उपयोगांत आणला जाणारा विमा निधि हा देखील अर्थ-विभागाच्या अधिकाराखालीं आहे. सर्वसामान्य व्यापारी रिवाजानुसार, विमा उतरविण्याजोग्या व्यापारी व औद्योगिक उपक्रमांच्या सरकारी मालकीच्या मालमत्तेस विमाविषयक संरक्षण देतां यावें म्हणून प्रथमतः हा निधि सुरू करण्यांत आला. पूर्वी ज्या मालमत्तेवर विमा उतरविण्याचा प्रघात असे त्या मालमत्तेसहि या निधींतून विमाविषयक संरक्षण देण्यांत येत आहे. विमा निधि सुरू केल्यानंतर, निरनिराळ्या विभागांकडून चालू करण्यांत आलेले सर्व लहानसहान विमा निधी ह्या सर्वसामान्य विमा निधींत विलीन करण्यांत आले.

२. या निधींतून केले जाणारे विमाविषयक मुख्य व्यवहार असे आहेतः— (ए) आगीचा विमा, (बी) सागरी विमाः— [१] देशी (मालवाहू) जहाजाचा विमा, [२] (मालवाहू) आगबोटींचा विमा, [३] गलबतांच्या सांगाड्यांचा विमा; (सी) मोटार वाहनांचा विमा; (डी) ने-आणीचा विमा. ह्या निधीनें स्वीकारलेल्या इतर जोखमींमध्यें, विश्वासाबद्दलच्या हमीचा विमा, विमान-विमा, मालकांच्या जबाब-दारीसंबंधींचा विमा, बॉयलर स्फोटाबाबतचा विमा, यंत्रसामुग्रीचा विमा आणि रोकड रकमेच्या ने-आणी-बाबतचा विमा, या सर्वांचा अंतर्भाव होतो. या निधीखालील कार्यक्रमांत समाविष्ट होणाऱ्या महत्त्वपूर्ण सरकारी योजना पुढीलप्रमाणें आहेतः- (ए) आरे गौळीवाडा, (बी) [१] सरकारी वाहतूक सेवा व [२] दूध वाहतूक सेवा, (सी) मुंबई राज्य विद्युत् मंडळ; (डी) कृषि संचालकाच्या नियंत्रणाखालील यांत्रिक शेती विभाग (इ) बियाणें व खतें याबाबतच्या योजना; (एफ) मुलकी पुरवठा विभाग योजनेनुसार अन्नधान्य; (जी) हाफ्किन संस्था, मुंबई; (एच्) मत्स्योद्योग तंत्रविषयक प्रयोगशाळा; (आय्) कोयना जलविद्युत् प्रकल्प; (जे) सरकारी मध्यवर्ति कारखाने आणि भाण्डारें, नागपूर; (के) अलपल्ली सॉ मिल्स् बल्लारशा; (एल्) श्री शाहू छत्रपति मिल्स् लिमिटेड, कोल्हापूर; (एम्) बेकारी निवारण योजनेनुसार सरकारनें हातीं घेतलेल्या सक्सेरिया कॉटन् मिल्स्, मुंबई; नरसिंगगिरजी मिल्स्, सोलापूर; आणि धनराज मिल्स्, मुंबई; ज्यामध्यें सरकार, शेअर धारण करणारे म्हणून हितसंबंध ठेवूं इच्छितें अशा सहकारी साखर कारखान्यांतून उत्पन्न होणारे उद्योगहि सरकारी विमानिधीमध्यें समाविष्ट करून घेण्यांत आले आहेत.

३. निर्धीकडून आकारण्यांत आलेले हप्त्याचे दर, भारतीय विमा कंपन्यांच्या संस्थांचा संघ आणि अन्य खाजगी विभागांतील दुसऱ्या प्रमुख विमा कंपन्या, यांच्ेशीं तुलना करतां योग्य आहेत. योग्य अशा प्रकरणांमध्यें, ज्या जोखमींबद्दल पुन्हां विमा उतरवावा लागतो, तो भारतीय विमा कंपनी असोशिएशन पूल किंवा अन्य मान्यताप्राप्त खाजगी विमेदाराकडून उतरविला जातो.

४. मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या आणि मुंबई राज्य विद्युत् मंडळाच्या मालमत्तेचा विमा सध्यां विमानिधिमार्फत उतरविण्यांत आला आहे. मुंबई राज्य वाहतूक मंडळाच्या मालमत्तेच्या विमाविषयक गरजा भागविण्यासाठीं करावयाच्या व्यवस्थेबाबत विचार चालू आहे. मत्स्योद्योग संचालकांच्या हाताखालील कोळ्यांच्या मच्छीमारी बोटींचा विमा उतरविण्याच्या व विदर्भ गृहनिर्माण मंडळाच्या विमाविषयक गरजा भागविण्याच्या प्रश्नांचाहि विचार चालू आहे.

## भांडार तपासणी संघटना

अहवालाखालील वर्षांत, अर्थविभागांतील भांडार तपासणी संघटनेला विविध विभागांखालील, अनेक संस्थांच्या व कार्यालयांच्या सांठ्यांची व भाण्डारांची तपासणी करणें शक्य झालें.

| विभाग | संस्था किंवा कार्यालयें |
|---|---|
| (१) कृषि विभाग ... ... | ३२ |
| (२) वैद्यकीय विभाग ... ... | २५ |
| (३) जलसिंचन आणि विद्युत् विभाग | २७ |
| (४) इमारती आणि दळणवळण विभाग | १९ |
| (५) शिक्षण विभाग ... ... | १६ |

२. नेहमींच्या कामांशिवाय, ह्या संघटनेला, अर्थ विभागाच्या, रोकड विभागाची हिशेब तपासणी व तपासणी करणें व तसेंच संस्थानांच्या विलीनीकरणानंतर, राज्य सरकारच्या हातीं आलेल्या रकमेच्या निरनिराळ्या प्रकारच्या रोख्यांचें हिशेबहि तपासणें शक्य झालें.

३. प्रशासकीय सोयीच्या दृष्टीनें, सांठ्यांच्या तपासणीचें काम, मुंबई, पुणें आणि नागपूर ह्या तीन मंडलांत विभागण्यांत आलें होतें. ह्या संघटनेच्या कामाचें प्रत्यक्ष प्रशासकीय अधिकार हिशेब अधिकारी (भांडारें) यांच्या हातीं आहेत.

४. चांगल्या रीतीनें प्रशिक्षण घेतलेला नोकरवर्ग, पुरेशा संख्येनें मिळविण्याची अडचण सध्यां ह्या संघटनेपुढें उभी आहे. रिकाम्या जागा भरून काढण्यासाठीं प्रयत्न केले जात आहेत आणि बहुधा लवकरच, प्रशिक्षित व अनुभवी नोकरवर्गाच्या नेमणुकीनें बऱ्याचशा रिकाम्या जागा भरल्या जातील. बाहेर काम करणाऱ्या नोकरवर्गाची संपूर्णपणें नेमणूक झाल्याबरोबर, तपासणीचें प्रमाण बऱ्याच मर्यादेपर्यंत वाढविणें, संघटनेला शक्य होईल व त्यामुळें राज्याच्या कांहीं विभागाच्या भांडारामध्यें सध्यां आढळून येणाऱ्या असमाधानकारक परिस्थितीमध्यें सुधारणा करतां येईल.

## वायदे बाजार

१९४७ चा मुंबईचा वायदे करार नियंत्रण अधिनियम याअन्वयें, सोन्यचांदीच्या वायदे-बाजाराचे मुंबई सरकार नियमन करीत असतें. ह्याच हेतूनें मुंबई बुलियन असोसिएशन लिमिटेड या संस्थेस वरील अधिनियमानुसार मंजूरी देण्यांत आली आहे. १९५२ च्या वायदे करार (नियंत्रण) अधिनियमाखालीं भारत सरकारकडून इतर वायदे-बाजारांचें नियमन होत असते. बहुधा सोन्याचांदीच्या वायदे–बाजाराचें नियमनहि हातीं घेण्याचा भारत सरकारचा विचार आहे.

## कापूस नियंत्रण आदेश १९५५

भारत सरकारच्या, १९५५ च्या कापूस नियंत्रण आदेशाची कालमर्यादा १९५९–६० पर्यंत वाढविण्यांत आली आहे व त्यानुसार कापसाच्या व्यापाराबद्दलच्या लायसन्सचें 'ए', 'बी' व 'सी' अशा तीन प्रकारांत वर्गीकरण केलें आहे. 'ए' वर्गाची लायसन्सें भारताच्या सर्व प्रदेशांत चालू शकतात व तीं

टेक्स्टाईल कमिशनरकडून दिलीं जातात. बी व सी वर्गाचीं लायसेन्सें फक्त राज्यांत व्यापार करण्यासच चालूं शकतात व तीं राज्य सरकारकडूनच दिलीं जातात. ह्या कामासाठीं सरकारनें जिल्हा मॅजिस्ट्रेटांना त्यांच्या संबंधित जिल्ह्यांमध्यें लायसन्सें देणारे प्राधिकारी म्हणून व तसेंच अर्थ विभागांतील सहाय्यक सचिवांना बृहन्मुंबईतील लायसेन्सें देणारे प्राधिकारी म्हणून नेमलें आहे. नवीं लायसेन्सें देण्याच्या जोडीला, गेल्या वर्षी राज्यामध्यें दिलेल्या लायसेन्सचें नूतनीकरणहि करण्यांत येत आहे. या सर्व लायसेन्स धारण करणाऱ्या इसमांकडून कापसाच्या सांठ्याबद्दल मासिक माहिती मिळविली जाते व एकत्रित जमा केलेली माहिती, सांठ्याच्या परिस्थितीची कल्पना देण्यासाठीं, चिटणीस, भारतीय मध्यवर्ति कापूस समिति व संचालक गणनाशास्त्र, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे पाठविली जाते

## कंपनी कायद्याचें प्रशासन

१९१३ च्या भारतीय कंपनी अधिनियमांत तरतूद केलेल्या उद्दिष्टांप्रमाणें राज्य सरकार मुंबई राज्यापुरत्याच असलेल्या बिनव्यापारी संस्थांची नोंदणी करीत असे. या अधिनियमाऐवजीं १९५६ चा कंपनी अधिनियम लागू करण्यांत आला व तो १ एप्रिल १९५६ पासून अंमलांत आला. मुंबई राज्याच्या मर्यादेंतील उद्दिष्टांत बसेल अशा तऱ्हेच्या बिन-व्यापारी कार्पोरेशन्सची नोंदणी व्हावी या दृष्टीनें साधे व सुटसुटित कायदे करण्याचे ठरविलें होतें. त्याप्रमाणें १९५९ चा मुंबई बिन-व्यापारी-कार्पोरेशन्स अधिनियम ( सन १९५९ चा मुंबई अधिनियम २६ ) अंमलांत आला. ह्या अधिनियमानुसार आवश्यक ते नियम तयारहि केले आहेत. ( पहा—मुम्बई बिन-व्यापारी कार्पोरेशन नियम १९५९ )

## १९३२ च्या भारतीय भागीदारी अधिनियमाचें प्रशासन

१९३२ च्या भारतीय भागिदारी अधिनियमाची मुम्बई विभागांत अंमलबजावणी करणें, हें रजिस्ट्रार ऑफ फर्म्स, मुम्बई यांचें मुख्य कार्य आहे. नागपूर व औरंगाबाद विभागांत ह्या अधिनियमाचें प्रशासन करण्यासाठीं नागपूर व औरंगाबाद येथें रजिस्ट्रार ऑफ फर्म्स कार्य करीत आहेत.

# अर्थ गणनालय

## ए १९५९–६०

## प्रास्ताविक

अर्थगणनालय ही एक मध्यवर्ति संस्था आहे. ती वेगवेगळ्या विभागांकडून आलेल्या गणनाविषयक माहितीचें एकत्रीकरण करते व ती प्रसारित करते व निरनिराळ्या विभागांना गणनाशास्त्रविषयक मार्गदर्शन करते आणि राज्यामध्यें दिसून येणाऱ्या गणनाविषयक अचूकतेत वाढ करण्यास ती सर्वसाधारणपणें जबाबदार आहे. पंचवार्षिक योजना व विकास गट यासंबंधांतील प्रशासकीय गणनाशास्त्राच्या कांहीं प्रकारांची माहिती ही संस्था गोळा करते. समाज व अर्थविषयक विविध विकासांच्या संबंधींची माहिती गोळा करण्यासाठीं हें मंडळ नमुना पहाणी करतें. १९५९–६० मध्यें ह्या मंडळाची कार्यें निश्चितपणें विस्तारित झालीं आहेत.

### (१) अभ्यासगटांना दिलेली मदतः—

तृतीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करावयाच्या योजनांची आंखणी करण्याकरितां व ह्या कामामध्यें विविध विभागांना गरज भासेल तेव्हां गणनाशास्त्रविषयक मदत करण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेल्या सर्व अभ्यासगटांच्या कार्याशीं ह्या मंडळाचा निकटचा संबंध होता. ह्या शिवाय, गणनाशास्त्राच्या क्षेत्रांत, येत्या १५ वर्षांकरितां गणनाशास्त्र व माहिती आणि विकासाची आंखणी करण्याच्या कार्यक्रमाकरितां असलेल्या अभ्यासगटाशींहि ह्या मंडळाचा प्रत्यक्ष संबंध होता.

### (२) विभागांना दिलेला सल्लाः—

गुरांची सुधारणा करण्यासाठीं हातीं घेतलेल्या योजनांसाठीं विकास गटांची निवड करणें, कोंबड्या-बदकें पाळण्याच्या व्यवसायाचा विकास इत्यादि विशिष्ट योजनांकरितां विकास गटांची निवड करण्याच्या

बाबतींत ह्या मंडळानें विभागांना वेळोवेळीं मदत केली आहे. लहान प्रमाणावरील व कुटीर उद्योगधंदे, इमारती व दळणवळण विभाग, कमिशनर ऑफ लेबर इ. यांसारख्य विभागांना गणनाविषयक कार्यामध्यें सल्ला देण्यांत आला आहे.

**(३) एकत्रित केलेल्या आंकडेवारीचा समन्वयः-**

ठराविक कालानें माहिती मागवून व ती मंडळातर्फे निघणाऱ्या त्रैमासिक पत्रिकेंत प्रसिद्ध करून विविध विभागानें एकत्रित केलेल्या आकडेवारीचा समन्वय केला. याशिवाय, चर्चेच्याद्वारें अनिर्णित प्रश्न सोडविण्याकरितां, ह्यावर्षी आंकडेशास्त्रज्ञांची एक परिषद भरविण्यांत आली.

**(४) द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या योजनाः-**

द्वितीय पंचवार्षिक योजनेंमध्यें समाविष्ट केलेल्या मंडळाच्या योजनांचे योजनाविषयक आंकडेशास्त्र, प्रशासनविषयक माहितीची आंकडेवारी यांची माहिती गोळा करणें, राज्याच्या उत्पन्नाची गणना करणें, आंकडेशास्त्र विषयक जिल्हा यंत्रणा उभारणें, नोकरवर्गास आंकडेशास्त्राचें प्रशिक्षण देणें, राष्ट्रीय बचत योजना, अल्प प्रमाणावरील व कुटिर उद्योगधंद्यांची विशेष पाहणी करणें आणि प्रदर्शनाचे तक्ते तयार करणें व त्यांची पाहणी करणें हे उद्देश आहेत.

(ए) ह्या वर्षांमध्यें द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या योजनांच्या प्रगतिची मागणी ठराविक कालानें म्हणजेच त्रैमासिक व वार्षिक केली गेली व नियोजन मंडळाच्या व सरकारच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीनें तिचें पृथक्करण केलें गेले. अंमलबजावणीची प्रगति त्वरित होण्याच्या दृष्टीनें ह्याचा उपयोग झाला. शिवाय, अन्नोत्पादन, नोकऱ्या, खर्चाच्या वाढीचें प्रमाण इ. विशिष्ट बाबींवर वेळोवेळीं टिपणेंहि तयार केली. योजनेची अंमलबजावणी वेगाने व्हावी म्हणून उपाययोजना करण्यासाठीं त्रुटीच्या कारणांचाहि अभ्यास करण्यांत आला.

**(बी) विकास गटाशीं संबंधित असें गणनाविषयक कामः-**

समाज विकास राष्ट्रीय विस्तार सेवा गटांमध्यें हाती घेण्यांत आलेल्या खर्चाच्या व कार्यक्रमाच्या प्रगतीचा अहवाल वर्षांमध्यें ठराविक कालावधीनें म्हणजे मासिक, त्रैमासिक व वार्षिक ह्याप्रमाणें देण्यांत आला. गटांचें वर्गीकरण झालेल्या खर्चाच्या व ते 'ए' वर्ग, 'बी' वर्ग किंवा 'सी' वर्ग ह्यापैकीं कोणत्या वर्गांतील आहेत ह्या प्रत्यक्ष परिस्थितीच्या आधारावर प्रथमतः करण्यांत आलें. गटांमधील कार्ये गतिमान होण्यासाठीं वरील गोष्टीचा उपयोग झाला.

**(सी) मूल्यांकन विषयक पहाणीः-**

प्रायोगिक तत्वांवर, ग्रामीण हस्तव्यावसायिकांच्या साक्षरतेचें प्रमाण, नोकऱ्या व बेकारी यांवर कांहीं विकास गटांमध्यें मूल्यांकन विषयक पहाणी करण्यांत आली. साक्षरतेबाबतच्या पहाणीवरील अहवाल सादर केला आहे. त्याशिवाय, ह्या वर्षी खालील पहाण्या करण्यांत येतील. [१] ग्रामपंचायतीच्या कामाची पहाणी; [२] सरकारनें काढलेल्या प्रसिद्धी पत्रकांप्रमाणें विकासगटांमध्यें केलेल्या कार्याची पहाणी.

**(डी) राज्याच्या उत्पन्नाचा संग्रहः-**

द्वैभाषिक मुम्बई राज्याचें १९५४-५५ चें राज्याचें उत्पन्न एकत्र करण्यांत आलें परंतु, विभाजनामुळें, राज्याच्या उत्पन्नाची विभागणी दोन भागांत करण्यांत आली आणि महाराष्ट्र व गुजराथ यांच्यासाठीं निरनिराळे अहवाल करण्यांत आले. १९५५-५६ व १९५६-५७ चें उत्पन्नाचें अंदाजहि एकत्रित करण्यांत आले. नंतरच्या वर्षांचें आंकडे तयार करण्यांत येत होते.

**(इ) तक्ते, नकाशे इ. तयार करणेः-**

प्रदर्शनगृह उघडण्याच्या योजनेनुसार विविध विभागांकरितां तक्ते, नकाशे तयार करण्यांत आले. विविध विभागांकरितां व "सारांशरुप अंदाजपत्रक" प्रकाशित करण्यासाठीं आवश्यक असलेले तक्ते व नकाशे तयार करण्याचें काम हें पथक करते.

**(एफ) प्रशिक्षणः—**

[समाज विकास/ राष्ट्रीय विस्तार सेवा] गटांकरितां भरती करण्यांत आलेल्या गणनाविषयक सहाय्यकांसाठीं ह्या वर्षी, दोन प्रशिक्षण कार्यक्रम केले ह्याशिवाय विभागीय परीक्षेकरितां, गणनाविषयक सहाय्यकांसाठीं आणि कारकुनांसाठीं, प्रशिक्षण कार्यक्रम भरविण्यांत आला होता.

नवी दिल्ली येथील मध्यवर्ति आंकडेशास्त्र संस्थेमध्यें एका मानचित्रकारासुद्धां ( ड्राफ्टस्मन ) प्रशिक्षण देण्यांत आले होतें, त्याचप्रमाणें, मध्यवर्ति आंकडेशास्त्र संस्थेमध्यें प्रशिक्षण घेण्याकरितां वर्ग २ च्या एका अधिकाऱ्यास नियुक्त करण्यांत आलें होते आणि एका संशोधनविषयक सहाय्यकास, कलकत्ता येथें, ९ महिन्याच्या मुदतीच्या प्रशिक्षण पाठ्यक्रमाकरितां, प्रशिक्षण घेण्यासाठीं पाठविले होतें.

**(जी) हातीं घेण्यांत आलेलीं पाहणीसंबंधींचीं कामें—**

राष्ट्रीय नमुनेविषयक पाहणीच्या संचालनालयाच्या मदतीनें योजनेखाली, राज्यामध्यें चालू वर्षी राष्ट्रीय नमुनेविषयक पाहणी आणि नोकरीविषयक आणि बेकारीसंबंधींचीं पाहणीचीं कामें करण्यांत आली त्याचप्रमाणें लहान प्रमाणावरील उद्योगधंदे आणि कुटीरोद्योगाबाबतची पाहणी करण्याचें कामसुद्धां सुरू करण्यांत आलें असून तें आतां पूर्ण झालें आहे.

**(एच) जिल्ह्यांतील आंकडेशास्त्र विषयक यंत्रणा उभारणें:—**

राज्यांतील प्रत्येक जिल्ह्यांत, जिल्हा आंकडेशास्त्र विषयक यंत्रणा स्थापन करणें हे ह्या योजनेचें उद्दिष्ट आहे. जिल्हा आंकडेशास्त्र विषयक अधिकाऱ्यांकडे इतर कामाबरोबरच, नियोजनाबाबत आंकडेवारी आणि जिल्हा पातळीवरील इतर आंकडेवारी विषयक माहिती मिळविण्याच्या कामांत सुधारणा करणें, त्याचा दर्जा पाहणें आणि त्यांत वक्तशीरपणा आणणें; ब्यूरोला टाईप स्टडीज किंवा नमुने विषयक पाहणी करण्याच्या कामांत मदत करणें, जिल्ह्यांकरितां सामाजिक व आर्थिक पाहणीची तयारी करणें, जिल्हा आंकडेवारीविषयक गोषवारा तयार करणें, योजनेबाबतचें अवलोकन करणें इत्यादि कामें सोपविण्यांत आली आहेत. वर्षअखेरपर्यंत, १२ जिल्हा आंकडेशास्त्रविषयक कार्यालयें स्थापन करण्यांत आली. महाराष्ट्रांतील ८ जिल्ह्यांची, सामाजिक व आर्थिक पाहणी आणि जिल्हा आंकडेवारीविषयक गोषवारा तयार करण्यांत आला होता. आणि उरलेल्या जिल्ह्यांतील ह्याविषयींचें काम चालू आहे. पुढील वर्षाकरितां कार्यक्रम आंखण्यासाठी आणि जिल्ह्यांतील आंकडेवारी विषयक माहिती गोळा करण्याच्या पद्धतींचा समन्वय करण्यासाठी वर्षाच्या अखेरीस, जिल्हा आंकडेशास्त्र विषयक अधिकाऱ्यांची परिषद भरविण्यांत आली होती.

**(५) योजनेतर पाहणीची हातीं घेतलेलीं कामें—**

विक्रीकराबाबत पाहणींचीं आणि जलसिंचन प्रकल्पाखालील खेड्यांतील लोकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितिबद्दल पाहणी करण्याची कामें ह्या वर्षांत चालू ठेवलेलीं होतीं.

**(६) प्रकाशित झालेलीं प्रकाशनें-**

(अ) महाराष्ट्र आणि गुजरात करितां मूलभूत आंकडेवारी विभाजन झाल्यानंतर, महाराष्ट्र आणि गुजराथ ह्या दोन्हीं राज्यासंबंधींची, सामाजिक व आर्थिक परिस्थिति थोडक्यांत वर्णन करणारें आणि त्याचप्रमाणें काहीं मूलभूत आंकडेशास्त्र विषयक माहिती प्रसिद्ध करणारें एखादें प्रकाशन चालू करावें, अशी आवश्यकता वाटूं लागली. ही माहिती गोळा करण्यांत येऊन, ती प्रकाशित करण्यांत आली.

**(बी) त्रैमासिक पत्रक ( बुलेटिन )-**

ह्या वर्षामध्यें, चार त्रैमासिक पत्रकें ( बुलेटिन ) प्रकाशित करण्यांत आलीं.

**(बी) १९६०-६१.**

१९५९-६० ह्या वर्षी करण्यांत आलेलीं सर्व कामें पुढें चालू ठेवण्याचें आणि एकत्रित करण्याचें १९६०-६१ च्या कार्यक्रमाचें उद्दिष्ट आहे. खालील कामांचा विशेषें करून निर्देश करावा लागेल :-

**(ए) नियोजन-**

योजनेच्या प्रगतीचा अहवाल तयार करणें, विकास गटांतील कार्यक्रमांची प्रगति आणि त्यावर येणाऱ्या खर्चाबद्दलची स्थिति, तदर्थ टिप्पणें तयार करणें इत्यादि कामें चालू ठेवण्यांत येतील. राष्ट्रीय नमुनेविषयक पाहणी, नोकरी आणि बेकारीविषयक पाहणी, लहान प्रमाणावरील उद्योगधंदे आणि कुटीर उद्योगासंबंधीची पाहणी यासारखी पाहणींची कामें सुद्धां चालू ठेवण्यांत येतील आणि नवीन उद्योगधंदे हातीं घेण्यांत येतील.

(बी) योजनेतर कार्ये–

(१) विक्रीकरासंबधी पाहणी, जलसिंचनाबाबत पाहणी आणि किंमत ठरविण्याबाबत पाहणीची कामें सुद्धां चालू ठेवण्यांत येतील. किंमत ठरविण्याच्या पाहणीनुसार, राज्यांतील सुधारलेल्या जातीच्या बियाणांच्या उत्पादनाचा आणि त्याबाबतच्या उपयोगाचा अभ्यास ठरविण्याचं योजिलें आहे. ह्या दिशेनें, आवश्यक त्या प्राथमिक उपाययोजना करण्यांत आल्या आहेत.

(२) १९६०-६१ ह्या वर्षाकरितां थोडक्यांत अंदाजपत्रक तयार करण्याचें आणि त्रैमासिक पत्रकें (बुलेटीन) काढण्याचें योजिलें आहे

(सी) प्रशिक्षणाबाबतचे कार्यक्रम—

समाजविकास/राष्ट्रीय विस्तार सेवा गटांत नियुक्त करावयाच्या आंकडेशास्त्रविषयक सहाय्यकांकरितां, दोन प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यांत येतील आणि विभागीय आंकडेशास्त्रविषयक सहाय्यकांकरितां आणि कारकुनांकरितां एक कार्यक्रम आंखण्यांत येईल.

## विक्रीकर विभाग

### १. विक्रीकर विभागाकडून अंमलबजावणी करण्यांत येणारे अधिनियम—

खालील अधिनियमांची अंमलबजावणी करणें हें विक्रीकर विभागाचें कार्य आहे.

(१) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ ( सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्र. ५१ )
(२) केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ ( सन १९५६ चा अधिनियम क्र. ७४ )
(३) मुंबई मोटार स्पिरीट विक्रीकर अधिनियम, १९५८ ( सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्र. ६४ )
(४) मुम्बई उंसपट्टी अधिनियम; १९४८ ( सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्र. ५४ )
(५) आधी करण्यांत आलेले कायदे.

### २. व्यापाऱ्यावरील करआकारणी—

मुंबई विक्रीकर अधिनियम १९५९, या अन्वयें नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यावरील करआकारणी मे १९६१ पर्यंत पक्की होईल. रद्द करण्यांत आलेल्या विक्रीकर कायद्यानुसार, बऱ्याचशा व्यापाऱ्यांवरील कर आकारणी अजून व्हावयाची आहे. रद्द करण्यांत आलेल्या अधिनियमानुसार कर आकारणी करण्याचें काम पूर्ण करण्यासाठीं विभागाकडून ठराविक काल मर्यादा घालण्यांत आली आहे. मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५३, मध्य प्रदेश आणि वऱ्हाड विक्रीकर अधिनियम १९४७ आणि हैद्राबाद सामान्य विक्रीकर अधिनियम १९५० ह्या अन्वयें अनुक्रमें भूतपूर्व मुंबई राज्यांतील प्रदेशांत, विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशांत निरनिराळ्या वर्षाकरितां १ जानेवारी १९६० पर्यंत करआकारणी करावयाच्या उरलेल्या व्यापाऱ्यांची संख्या पुरवणी "ए" मध्यें दर्शविल्याप्रमाणे आहे.

### ३. अपील आणि फेरतपासणी—

३१ डिसेंबर १९५९ पर्यंतच्या कालावधीत साहाय्यक कमिशनर आणि डेप्युटी कमिशनर यांनी निर्णीत केलेल्या फेरतपासणी करितां आलेल्या अपीलांच्या अर्जांची संख्या आणि १ जानेवारी १९६० पर्यंत निकालांत न काढलेल्या अर्जांची संख्या खालीलप्रमाणें आहे.

| | विक्रीकरांचें सहाय्यक कमिशनर | विक्रीकराचें डेप्युटी कमिशनर |
|---|---|---|
| १९५९-६० ह्या वर्षी निकालात काढलेल्या अपीलांची संख्या [ ३१ डिसेंबर १९५९ पर्यंत ] .................. | ९,८८२ | ६७ |
| १ जानेवारी १९६० पर्यंत निकालांत न काढलेल्या अपीलांची संख्या....... ...................... ...... | ११,५५३ | २४३ |
| १९५९-६० पर्यंतच्या मुदतींत निकालांत काढलेल्या फेर-तपासणीकरितां आलेल्या अर्जांची संख्या [ ३१ डिसेंबर १९५९ पर्यंत ]...................................... | | १२८२ |
| १ जानेवारी १९६० पर्यंत निकालांत न काढलेल्या फेर-तपासणीच्या अर्जांची संख्या.......................... ... | | २६१६ |

४. कर आकारणींची आणि अपीलाबाबतच्या आदेशांची सतत टक्केवारीनें पाहणी करण्याच्या पद्धतीनें, ह्या विभागाच्या प्रशासनाचा दर्जा वाढविण्याचें प्रस्ताव विचारांत घेण्यांत आलें आहेत.

## पुरवणी "ए"

१ जानेवारी १९६० रोजीं, असलेली व्यापाऱ्यांची संख्या, प्रत्येक वर्षाकरिता याप्रमाणें कर आकारणी करण्याचीं उरलेलीं वर्षें किंवा १९४६-४७ ते १९५८-५९ पर्यंतचा भाग, याबद्दलची परिस्थिति दर्शविणारें विवरण पत्रकः—

| १ | १९४६-४७ २ | १९४७-४८ ३ | १९४८-४९ ४ | १९४९-५० ५ | १९५०-५१ ६ | १९५१-५२ ७ | १-४-५२ ते ३१-१०-५२ ८ | १-११-५२ ते ३१-३-५३ ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जुनें मुंबई राज्य [उत्तर विभाग वगळून] [मुंबई विक्रीकर अधिनियम १९५३.] | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| विदर्भ [मध्यप्रदेश आणि वऱ्हाड विक्रीकर अधिनियम १९४७.] | | ४ | ४ | ११ | २ | १५ | ३२ | ... |
| मराठवाडा [हैद्राबाद सामान्य विक्रीकर अधिनियम १९५०.] | ... | ... | ... | ... | १० | १२ | २९ | . |

| १ | १९५३-५४ १० | १९५४-५५ ११ | १९५५-५६ १२ | १९५६-५७ १३ | १९५७-५८ १४ | १९५८-५९ १५ | मध्यप्रदेश आणि वऱ्हाड विक्रीकर अधिनियम १९४७ च्या कलम ११[५] या अन्वयें. १६ | एकूण १७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जुनें मुंबई राज्य [उत्तर विभाग सोडून] मुम्बई विक्रीकर अधिनियम, १९५३. | १५९ | ५९० | २,७६० | १३,७०९ | ३६,५११ | २७,७७६ | ... | ८१,२८३ |
| विदर्भ [ मध्यप्रदेश आणि वऱ्हाड विक्रीकर अधिनियम, १९४७]. | ६९ | ८३ | १२४ | २८५ | २,६७४ | ८,९३३ | १५९ | १२,४१६ |
| मराठवाडा [हैद्राबाद सामान्य विक्रीकर अधिनियम, १९५०.] | १९ | ४३ | ५६ | ४५८ | १,५९६ | ४,८७३ | ... | ७,०९६ |

## अल्प बचत संचालनालय

राज्यांत अल्प बचत संचालनालय स्थापन झाल्यामुळें अल्प बचत मोहिमेला मिळालेली गति, गेल्या आर्थिक वर्षी चालूच होती आणि पहिल्याच वेळीं, राज्यानें ठरविलेल्या रु. २६ कोटी इतक्या रकमेच्या उद्दिष्टाऐवजीं, रु. ३१ कोटी इतकी रक्कम जमा झाली. विशेषतः ग्रामीण आणि औद्योगिक प्रदेशांत, अल्प बचत मोहिम जोरदार करण्याकरितां, योजिलेल्या निरनिराळ्या प्रशासकीय उपाययोजनांमुळें, शेतकऱ्यांकडून आणि औद्योगिक कामगारांकडून, एकूण बचतीच्या उद्दिष्टाच्या जवळजवळ ५० टक्के इतकी रक्कम जमा करण्यांत आली.

२. चालू असलेल्या एजन्सी पद्धतीनुसार सध्यां ६ एजन्सी पद्धति अंमलांत आहेत. एजन्सी पध्दतींची संख्या जास्त असल्यामुळें एरव्ही टाळतां येणाऱ्या कारकुनी कामाची फार गरज लागते असें अधिकृत एजंटांनीं वारंवार सुचविलें होतें. विद्यमान एजन्सी पध्दति ज्यामध्यें समाविष्ट करून घेतां येतील अशी एखादी एकसूत्री एजन्सी पध्दत स्वीकारण्यासाठीं, राज्य सरकारनें केंद्र सरकारला सूचना केली होती. केंद्र सरकारनें आतां, त्याप्रमाणें प्रमाणित एजन्सी पद्धत सुरू केली असून, त्याखालीं एक संस्थेद्वारें आणि दुसरी व्यक्तिद्वारें अशा एजन्सीच्या फक्त दोनच पध्दति राहतील. ही एजन्सी पध्दति १ ऑक्टोबर १९६० पासून अंमलांत येईल.

३. " प्रमाणित एजन्सी पध्दति " नुसार, कलेक्टर आणि मामलेदार हे नेमणूक करणारे अधिकारी म्हणून काम करतील. महसूल आणि खजिना विभागाकडून करण्यांत येणारें उरलेलें नोंदणी करणाऱ्या, तपासणी करणाऱ्या आणि रकमा देणाऱ्या अधिकाऱ्यांचें काम हें टपाल आणि तार खात्यांकडून ताब्यांत घेण्यांत येईल. मात्र हें काम १२ वर्षें मुदतीच्या राष्ट्रीय योजना बचत सर्टिफिकिटांच्या बाबतींतच असेल. १ ऑक्टोबर १९६० च्या सुमारास निरनिराळ्या टपाल कार्यालयांत आवश्यक त्या जादा नोकरवर्गाची भरती करण्याचें, त्यांना प्रशिक्षण देण्याचें आणि त्यांची नेमणूक करण्याचे टपाल व तार खात्यानें कबूल केलें आहे. सध्यांच्या एजन्सी पद्धती ऐवजीं नवीन पद्धत अंमलांत आणल्यामुळें कांहीं त्रास होणार नाहीं अशी अपेक्षा आहे.

४. अधिकृत एजंटांना हितकारक असणारा दुसरा बदल म्हणजे, पावतीच्या पुस्तकाचा ३ वेगवेगळ्या पावत्यांसह असणारा सध्यांचा प्रकार नष्ट करण्यांत येईल. आणि त्याऐवजीं १ ऑक्टोबर १९६० पासून पावती आणि त्याच्याखालीं जोड पावती असलेलें नवीन पावती पुस्तक वापरांत आणण्यांत येईल. कार्बन कागद वापरून ह्या पावती पुस्तकाचा उपयोग करण्यांत येतो. ही सोय करण्यांत आल्यामुळें, अधिकृत एजंटांचें काम त्वरित दोन तृतीयांशानें कमी होईल. पावती पुस्तकाच्या आकारांत सुधारणा केली असून, त्यांत साधेपणा आणला आहे. पावती पुस्तकें मराठीमध्यें छापण्यांत येतील, आणि तीं टपाल व तार विभागातर्फे अधिकृत एजंटांना वांटण्यांत येतील.

५. सध्यां, अधिकृत एजंटांना देण्यांत येणारें कमिशन कलेक्टर आणि मामलेदारांकडून मंजूर करण्यांत येतें आणि तें खजिन्यांतून त्यांना देण्यांत येतें. हें कमिशन चार महिने मुदतीच्या आंत मागितलें पाहिजे. भारत सरकारनें, कमिशन देण्याचें काम टपाल प्राधिकाऱ्यांकडे सोपविलें असून, मुदतबाह्य झालेल्या मागण्या मंजूर करण्याचें अधिकार, बऱ्याचशा अधिकाऱ्यांना देण्यांत आलें आहेत.

६. निरनिराळ्या अधिकृत एजंटांनीं विशेषतः ग्रामीण प्रदेशांतील-अनेक वेळां असें निदर्शनास आणून दिलें आहे कीं, जेव्हां हे लोक तालुका आणि महाल मुख्यालयांत येतात आणि त्यांच्या अल्प बचतीच्या कामासंबंधींचे व्यवहार करण्यासाठीं तेथील टपाल कार्यालयांत जातात, तेव्हां अनेक वेळां तेथें कामाची गर्दी असल्यानें त्यांचे फॉर्म स्वीकारले जात नाहींत. यामुळें त्यांना त्यांच्या गांवाला पुन्हां पैसे घेऊन परत जावें लागतें आणि स्वतःच्या खर्चानें पुन्हां एकदां तालुका महाल मुख्यालयांत परत यावें लागतें.

७. या बाबतींत सरकारनें दोन सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. अधिकृत एजंटांना पैसे आणि अर्ज हे दोन्हीं एका पाकिटांत बंद करून त्यावर सही करून आणि नंतर तें (पाकिट) मामलेदार / महालकरी यांच्या हातीं, तालुका / महाल उप-खजिन्यांत सुरक्षित ठेवण्याकरितां देतां येतील. टपाल विभागाला, तालुका सभेच्या तारखेनंतर, सकाळीं ८ ते १० पर्यंत तालुका / महाल मुख्यालयांतील पोट टपाल कार्यालय उघडें ठेवण्याची विनंति केली आहे. या दोन सोयींमुळें ग्रामीण एजंटांना सोसाव्या लागणाऱ्या अडचणी कमी होतील अशी अपेक्षा आहे.

अंतर्गत एजंटांची नेमणूक करण्याच्या बाबतींतील जुन्या नियमानुसार सरकारी कार्यालयांतील कारकून किंवा खजिनदार म्हणून काम करणाऱ्या इसमांचीच अंतर्गत एजंट म्हणून नेमणूक करतां येत होती. राज्य सरकारनें केलेल्या विनंतीनुसार भारत सरकारनें आतां अंतर्गत एजन्सी पध्दतींचें क्षेत्र वाढवून कोणत्याहि कार्यालयांत काम करणाऱ्या कोणत्याहि अराजपत्रित सरकारी नोकरांची नेमणूक करण्याची सोय केली आहे.

८. राष्ट्रीय बचत योजना सर्टिफिकेट धारण करणाऱ्या मृत इसमांच्या वारसांना तसेंच पोस्ट ऑफिस सेव्हिंग बॅकेंतील खातेदारांना येणें असलेल्या रकमेवर हक्क सांगण्याच्या बाबतींत बऱ्याच अडचणींना तोंड द्यावें लागत असे आतां भारत सरकारनें एक. कायदा मंजूर केला असून त्याअन्वयें राष्ट्रीय बचत योजना सर्टिफिकेट धारण करणाऱ्या किंवा पोस्ट ऑफिस सेव्हिंग बॅकेंत खातें असणाऱ्या इसमास स्वतःचा अकाली मृत्यु झाल्यास ज्याला पैसे द्यावयाचें त्या वारसाचा नामनिर्देश करतां येईल.

या कायद्याखालीं नियम तयार करण्यांत येत असून ही सवलत १ जुलै १९६० पासून अंमलांत येईल अशी अपेक्षा आहे. १ जुलै १९६० ह्या तारखेस किंवा त्याच पूर्वी सर्टिफिकेट खरेदी करणारे तसेंच पोस्ट ऑफिस सेव्हिंग बॅंकेंत खातें उघडणाऱ्या लोकांपुरतीच ही सवलत मर्यादित नसून, सर्टिफिकेटस् धारण करणारे विद्यमान लोक तसेच पोस्ट ऑफिस बॅंकांचे चालू खातेदार यांना सुध्दां या सवलतीचा फायदा घेत येईल.

९. अल्प बचत संचालनालय सुरू केल्यानंतर राज्य सरकारनें सुरू केलेली प्रकाशन मोहीम मागील आर्थिक वर्षापासून जोरदार करण्यांत आली होती. "स्मॉल सेव्हर" (अल्प बॅचतकार) नांवाचें मासिक सरकारकडून छापलें जात आहे. जुलै १९६० पासून हें मासिक इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांत स्वतंत्रपणें काढण्यांत येणार असून त्याची किंमत आणि वार्षिक वर्गणी निम्म्यानें कमी करण्यांत येईल.

१०. राज्य सरकारच्या ह्या प्रकल्पित प्रकाशन कार्यक्रमांत, अल्प बचत योजनेचा प्रसार करण्यास अतिशय उपयुक्त ठरलेले अल्प बचतीवरील लघुपट आणि लघु चित्रपट निर्माण करणें या गोष्टींचा समावेश केला आहे. शिवाय पत्रक, बचत पेट्या आणि प्लॅस्टिकचे बचत लिफाफे काढण्यांत आले आहेत. तसेंच, रकमा गुंतविणारे आणि अधिकृत एजंटस् या दोघांकरितां अल्प बचत योजनेसंबंधी उपयुक्त माहिती असलेल्या अल्प बचत रोजनिशा काढण्यांत आल्या आहेत. दूरवरच्या खेड्यांत नेतां येणाऱ्या छोट्या संचाखेरीज प्रत्येक विभागास एक याप्रमाणें विजेवर चालणारे फिरते प्रदर्शन संच राज्यांतील प्रत्येक जिल्ह्यास पुरविले आहेत. मुंबई, नागपूर आणि अहमदाबाद येथील जनरल पोस्ट ऑफिसांत कायमचीं प्रदर्शन पथकें स्थापन करण्यांत आलीं आहेत.

११. सरकारी नोकर असलेल्या व सरकारी नोकर नसलेल्या अधिकृत एजंटांचा गेल्या कांहीं वर्षा पासून घेण्यांत येत असलेला नियमित उजळणी पाठ्यक्रम मागील आर्थिक वर्षांतहि चालू ठेवण्यांत आला. गेल्यां आर्थिक वर्षांत मेहसाणा (विसनगर), भावनगर, नांदेड आणि अमरावती येथें ४ प्रशिक्षण शिबिरें आणि समन्वय परिषदा भरविण्यांत आल्या होत्या.

याशिवाय भडोच, जुनागड, भुज, यवतमाळ, अकोला, ठाणें, (पालघर), रत्नागिरी, दक्षिण सातारा, अहमदनगर (शिरडी), सोलापूर, कोल्हापूर, खेडा (नडियाद), धुळे, मुंबई, कुलाबा (रोहे), बुलढाणा,

भंडारा आणि पंचमहाल येथें जिल्हा शिबिरें भरविण्यांत आली. या शिबिरांपैकीं, ४ शिबिरांत, जवळच्या जिल्ह्यांतून अधिकृत एजंटांना बोलाविण्यांत आलें होतें.

बंगलोरमध्यें नुकत्याच भरलेल्या, राष्ट्रीय बचत सल्लागार समितीकडून ह्या शिबिरांची संघटना अत्यंत वाखाणली गेली. या समितीनें इतर राज्य सरकारांना या शिबिरांच्या कामाबाबतचा अभ्यास करून तशींच शिबिरें त्यांच्या राज्यांत सुध्दां सुरू करण्यातें सुचविलें आहे.

१२. जनतेचा पाठिंबा मिळविणें, निरनिराळया कार्यक्रमांचा समन्वय करणें आणि सबंध राज्यांत या चळवळीचा प्रसार करणें या कामांत मदत करण्यासाठीं सरकारनें विविध समित्या निर्माण केल्या आहेत. राज्यपातळीवर एक राज्य सल्लागार मंडळ आहे. प्रत्येक विभागांत एक विभागीय समिती आहे. प्रत्येक जिल्ह्यांत जिल्हा सल्लागार समित्या आहेत. बृहन्मुम्बईत एक स्वतंत्र शहर सल्लागार समिती आहे. त्याचप्रमाणे एक लाखांवर लोकसंख्या असलेल्या शहरांत शहर सल्लागार समित्याहि आहेत.

गेल्या अर्थवर्षात, तीन महिन्यांनीं एकदां अशी नियमितपणें, पोस्टांच्या मंडळ पातळीवर पोस्टाच्या समन्वय समितीची सभा घेण्यांत आली. या समितीमध्यें पोस्ट आणि तार या विभागाशीं संबंधित असलेल्या अडचणींची चर्चा केली गेली आणि जिथें शक्य होतें तिथें लगेच त्यांचे निराकरण करण्यांत आलें.

१३. ३१ मार्च १९६० रोजीं मुंबई राज्यांत एकूण एजंटस्‌ची संख्या २२८४९ इतकी होती. या एजंटांपैकीं बरेचसे एजंट ग्रामीण विभागांतून आलेले असून त्यांनीं बचतीची योजना खेड्यापाडयांत पोंहोंचविण्यांत यश मिळविलें आहे.

१४. १९५९–६० सालांतहि अल्प बचत योजनेखालीं झालेल्या निरनिराळया रोख्यांचो स्थूल व नक्की विक्री खाली दिली आहे. मागील वर्षाचे तुलनात्मक आंकडे खालीं कंसांत दिले आहेत—

( आंकडे लक्ष रुपयांत )

| | | एकूण | नक्की |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रीय बचत योजना सर्टिफिकिटें— | ३०४१·४७ (२९९४.२४) | १८३२·७० (१७७१·८५) |
| २. | पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक | ३४१५·८१ (२९४५·५६) | ४७८·७४ (१८१·४४) |
| ३. | खजिना बचत ठेवी सर्टिफिकिटें | ५३६·२४ (२५३·८०) | ५२९·६७ (२५०·७५) |
| ४. | ए. सी. एस्. | ३४·६२ (३३·०२) | २८·०८ (२७·३८) |
| ५. | सी. टी. एस्. | १२·४७ (०·६८) | १२·४७ (०·६८) |
| | एकूण... | ७०४०·६१ (६२२६·३०) | २८८१·६६ (२२३२·१०) |
| | पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेवरील व्याज... | | २१८·३४(सुमारें) |
| | एकूण नक्की बेरीज... | | ३१००·०० |

गेल्या आर्थिक वर्षात अशा तऱ्हेनें मागच्या वर्षाच्या नक्की वसुलीपेक्षां रु. ६·४९ लाख एवढ्या जास्त रकमेची वसुली होऊन सुधारणा झाली आहे. मुदत न भरलेल्या सर्टिफिकिटांची विक्री फक्त ०·०८७० इतकी होती आणि नक्की जमेच्या ५० टक्के जमा शेतकरी वर्गाकडून झाली आहे. मुंबई राज्यानें देशांतील कोणत्याहि राज्यापेक्षां फक्त जास्तींत जास्त नक्की जमा गोळा केली नसून त्यानें अखिल भारतीय एकूण नक्की जमेच्या ४० टक्क्यापेक्षां जास्त रकमच गोळा केली आहे.

१९५७–६० मध्यें संयुक्त मुंबई राज्यांतील खालील जिल्ह्यांनीं त्यांचे वार्षिक उद्दिष्ट मागें टाकले आहे.

| | महाराष्ट्र जिल्हें | लाख रुपयांत नक्की जमा | केलेल्या कामाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बीड | ३२·२६ | ३२१·७० |
| २ | दक्षिण सातारा | ५४·५४ | २१८·१६ |
| ३ | परभणी | २४·३० | १८६·९२ |
| ४ | रत्नागिरी | २८·३५ | १६६·७६ |
| ५ | नांदेड | २७·८० | १५४·४४ |
| ६ | उत्तर सातारा | ३६·६९ | १४६·७६ |
| ७ | अहमदनगर | ४३·६७ | १४५·५० |
| ८ | ठाणें | ५९·३५ | १३१·८९ |
| ९ | कोल्हापूर | ५०·५१ | १२६·२७ |
| १० | कुलाबा | १७·६३ | १२५·९३ |
| ११ | नाशिक | ४३·४४ | १२४·११ |
| १२ | औरंगाबाद | २३·४५ | ११७·२० |
| १३ | बृहन्मुंबई | १२२०·४३ | ११०·९५ |
| १४ | उस्मानाबाद | १९·६५ | १०९·१७ |
| १५ | सोलापूर | ४४·७९ | १०१·८० |
| १६ | पश्चिम खानदेश | ३०·०० | १००·०० |
| | **गुजरात जिल्हे** | | |
| १ | बनासकांठा | ४३·३१ | ३३३·१५ |
| २ | डांग | ३·३३ | २२२·६० |
| ३ | मेहसाणा | ४९·४२ | २१६·६० |
| ४ | अमरेली | २९·८० | १९२·२५ |
| ५ | भडोच | २१·१५ | १४०·७५ |
| ६ | साबरकांठा | २३·५९ | १३८·७६ |
| ७ | जामनगर | ४१·४१ | १२७·४१ |
| ८ | पंचमहाल | २४·२४ | १२१·२० |
| ९ | राजकोट | ५२·३१ | १११·०७ |
| १० | खेडा | १३३·३५ | ११०·६५ |
| ११ | सुरत | १४२·१७ | १०९·३० |
| १२ | बडोदे | ५७.८८ | १०५·२० |
| १३ | अहमदाबाद | १५३·१० | १०२·०६ |

१५. जिल्ह्यांना आपलीं उद्दिष्टें मागें टाकण्यास वाढती चालना मिळावी म्हणून आणि योजनेला जनतेनें दिलेल्या पाठिंब्याची खास नोंद घेण्यासाठीं सरकारनें ज्या जिल्ह्यानीं १९५८–५९ सालीं आपल्या उद्दिष्टाच्या १४०% पेक्षां जास्त रक्कम गोळा केली अशा पुढील जिल्ह्यांना एकंदर रु. १० लाखाची तदर्थ अनुदानें दिली आहेत.

| जिल्ह्याचें नांव | | अनुदानाची रक्कम |
|---|---|---|
| | | रु. |
| १ साबरकांठा | ... | ३ लाख |
| २ बीड | ... | २ ,, |
| ३ परभणी | ... | २ ,, |
| ४ अहमदनगर | ... | २ ,, |
| ५ डांग | ... | १ ,, |

सर्वसाधारण जनतेला उपयुक्त ठरतील अशीं कामें करण्यासाठीं या अनुदानांचा उपयोग करावयाचा आहे. १९५८–५९ सालीं मंजूर करण्यांत आलेल्या अनुदानांच्या धर्तीवर लोकांकडून वर्गणी मिळण्याची अट घालण्यांत आली नाहीं. रु. १७ लाख एवढया रकमेची तदर्थ अनुदानेंसुद्धा १९५९-६० सालांत केलेल्या कार्यासाठीं खालीलप्रमाणें मंजूर करण्यांत आली आहेत.

| गुजराथ जिल्हे | रु. | महाराष्ट्र जिल्हे | रु. |
|---|---|---|---|
| १ बनासकांठा | ३ लाख | १ बीड | ३ लाख |
| २ मेहसाणा | २ ,, | २ दक्षिण सातारा | २ ,, |
| ३ डांग | १ ,, | ३ परभणी | १ ,, |
| ४ अमरेली | १ ,, | ४ उत्तर सातारा | १ ,, |
| | | ५ रत्नागिरी | १ ,, |
| | | ६ अहमदनगर | १ ,, |
| | | ७ नांदेड | १ ,, |

१६. जिल्हा अल्प बचत सल्लागार समितींच्या सल्ल्यानें सबंध राज्यांत अल्प बचत पंधरवडेसुद्धां साजरे करण्यांत आले. जोरदार मोहिम सुरू करण्यास योग्य काळ कोणता ते लक्षांत घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनीं हे पंधरवडे साजरे करण्याचो वेळ ठरवावयाची आहे.

गेल्या कांहीं वर्षात बृहन्मुंबईंत सुरू केलेली ही मोहीम इतकी यशस्वी ठरली कीं, गेल्या आर्थिक वर्षी बृहन्मुंबईनें ११ कोटी रुपये जमविण्याचें आपले उद्दिष्टयच केवळ साधलें नसून प्रत्यक्ष १२·२० कोटि रुपये जमा केले.

१७. भारत सरकारच्या मंजुरीखालीं गेल्या वर्षी सुरु केलेली "पगारांतून बचतीची रक्कम कापून घेण्याची पद्धत" अहमदाबादच्या औद्योगिक क्षेत्रांत विशेष यशस्वी झाली. इतर कापड गिरण्यांत त्याच-प्रमाणें इतर उद्योगधंद्यांत आतां ही योजना उत्साहानें हातीं घेण्यांत येत आहेत.

१८. विद्यमान महाराष्ट्र राज्यांत भारत सरकारकडून हातीं घेतलेली बक्षिसांच्या रोख्याबाबतची नवीन योजना, प्रमाणाबाहेर यशस्वी झाली आहे. एप्रिल आणि मे महिन्याचे कांहीं दिवस या कालावधींत गुन्तवलेली अंदाजी रक्कम रु. २ कोटी इतकी आहे. अल्प बचत योजनेखालील इतर रोख्यांच्या नेहमीच्या विक्रीवर बक्षिसांच्या रोख्यांचा तितकासा परिणाम झालेला नाहीं. शहरांत बक्षिसांचें रोखे कदाचित इतर रोख्यांच्या विक्रीवर परिणाम करतील असें वाटलें होतें. एप्रिल आणि मे १९६० चे बृहन्मुम्बईचें आंकडे खालीं दिले असून त्यांचें खालीं मागील वर्षाचें आंकडे कंसांत दिलेलें आहेत.

| एप्रिल<br>रु. लाखांत | | मे<br>रु. लाखांत | |
|---|---|---|---|
| स्थूल | नक्की | स्थूल | नक्की |
| २४४·५८ | १०४·६६ | २२७·२८ | ११८·२२ |
| (२०३·४८) | (४०·७२) | (२३८·२४) | (१२२·४९) |

ह्या आंकड्यांवरून असें दिसून येईल कीं, अल्पबचत योजनेखालील दुसऱ्या कोठल्याहि तारणपत्रांच्या विक्रीवर बक्षिसाच्या रोख्यामुळें परिणाम झालेला नाहीं.

चालू वर्षाकरितां शिबिर-कार्यक्रम आंखला गेला असून तो जून १९६० मध्यें सुरू होईल. कार्यक्रमांत १० शिबिरें व ४ समन्वय परिषदा यांचा समावेश होतो.

## अर्थ विभाग ( नियोजन )

पुनर्रचित महाराष्ट्र राज्यामध्यें नियोजन हा विषय अर्थविभागाकडे सोंपविण्यांत आला आहे. हा नियोजन विभाग, सर्व विभागांच्या विकास कार्यांचा समन्वय करणें, राज्यासाठीं समन्वित विकासयोजना तयार करणें, नियतकालिक पुनरवलोकनाद्वारें योजनेच्या प्रगतीची पाहणी करणें, योजनेमध्यें कोणताहि मेळ घालावयाचा असल्यास, तदनुसार विभागांना सल्ला देणें इत्यादि कार्यें पार पाडण्यासाठीं मुख्यतः एकसूत्रीकरण करणारी संस्था म्हणून काम करीत आहे. या विभागाच्या (१) नियोजन व (२) आर्थिक कार्यें अशा दोन शाखा करून या विभागाची आतां पुनर्रचना केली आहे. सरकारी उद्योगधंदे, गुंतविलेल्या रकमा व कर आकारणी यांच्या बाबतींतील धोरणांवर निर्णय घेणें सुलभ व्हावें म्हणून राज्यांतील सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा सतत अभ्यास करणें, हा आर्थिक कार्यें या शाखेचा उद्देश आहे.

२. नवीन महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर, राज्य पातळीच्या, निरनिराळ्या सल्लागार व इतर समित्या पुन्हां स्थापन करणें आवश्यक झालें आहे. त्याप्रमाणें खालील राज्य समित्यांची पुनर्रचना केली आहे:-

(१) राज्य जलोपयोग समिति.

(२) राज्य मनुष्य-बळ समिति.

(३) नियोजन चर्चा मंडळांसाठीं राज्य समिति.

खालील परिच्छेदांमध्यें ह्या समित्यांच्या कामाचें वर्णन केलें आहे:—

### राज्य जलोपयोग समितिः—

निरनिराळ्या जलसिंचन विषयक कामामुळें निर्माण झालेल्या जलसिंचन विषयक क्षमतेचा पूर्ण उपयोग करण्यामध्यें येणाऱ्या अडथळ्यांचा अभ्यास करणें, त्यांचें पृथक्करण करणें व ते दूर करणें या कामांसाठीं राज्य जलोपयोग समिति स्थापन झाली आहे. सरकारच्या मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखालीं व संबंधित अधिकाऱ्यांच्या सभासदत्वाखालीं, मे १९६० मध्यें महाराष्ट्र सरकारनें ह्या समितीची पुनर्रचना केली असून संबंधित अधिकारी हे तिचे सभासद आहेत. ह्या समितीमध्यें विकास कमिशनरच्या अध्यक्षतेखालीं एक स्थायी समिति नेमली आहे. जलोपयोगाच्या बाबतींत उद्भवणाऱ्या अडचणींसंबंधीं प्रत्यक्ष माहिती मिळविण्यासाठीं स्थायी समितीच्या सभासदांना, जरूर पडल्यास वेगवेगळ्या विभागांना भेट द्यावी लागते.

### ४. राज्य मनुष्य-बळ समितिः—

राज्य मनुष्यबळ समिति ही १९५७ च्या जानेवारींत प्रथमतः स्थापन झाली असून मे १९६० मध्यें तिची पुनर्रचना करण्यांत आली आहे. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या उरलेल्या काळांत व तृतीय पंचवार्षिक योजनेमध्यें निरनिराळ्या विभागीय विकास कार्यक्रमासाठीं आवश्यक असणारा प्रशिक्षित नोकरवर्ग व सोयी यांची अजमावणी करण्याच्या कामासाठीं ह्या समितीनें अनेक अभ्यास मंडळें बनविलीं होतीं. ह्या विविध अभ्यास मंडळांचे अहवाल राज्य मनुष्यबळ समितीनें निरनिराळ्या सभांतून विचारांत घेतले होते. ह्या अहवालांत मराठी आणि गुजराथी भाषिक प्रदेशांचें मिळून होणाऱ्या मुंबई राज्याच्या मनुष्यबळाच्या आवश्यकतेचा विचार करण्यांत आला असल्यामुळें, नवीन महाराष्ट्र राज्याच्या मनुष्यबळाची आवश्यकता नजरेस आणण्यासाठीं हे अहवाल पुन्हां तयार करण्याचा प्रश्न सरकारचें लक्ष वेधून घेत आहे. मनुष्यबळ

समितीच्या सूचनेवरून राज्यातील प्रशिक्षणाच्या सोयींची माहिती देणाऱ्या हस्त-पुस्तिकेची ( हँड-बुक ) सुधारणा करण्याचें काम व्यवसाय संचालकानें हातीं घेतलें होतें व सुधारलेल्या हस्त-पुस्तिकेच्या ( हँड-बुक ) छापील प्रती लवकरच मिळतील.

**५. नियोजन चर्चा मंडळाची राज्य समिति :—**

योजनेंतील आपला वांटा उचलण्याच्या उद्देशानें विकासावर परिणाम करणारे निरनिराळे प्रश्न विचारांत घेण्यासाठीं आणि योजनेवरील संकलित माहितीचा प्रसार करण्यासाठीं शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना संधि देतां यावी म्हणून राज्यांतील विविध विश्वविद्यालयें आणि संलग्न महाविद्यालयें, यांनीं त्यांची नियोजन चर्चा मंडळें तयार केलीं आहेत. विश्वविद्यालयें व महाविद्यालयें यांचे प्रतिनिधि व संबंधित अधिकारी यांच्या समवेत मुख्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालीं नियोजन चर्चा मंडळांची राज्य समिति स्थापन करण्यांत आली आहे. तृतीय पंचवार्षिक योजना कशी हाताळावी आणि त्यांत शेतकी व समाजसेवा वगैरेंसाठीं अग्रहक्क कसे द्यावेत या गोष्टींचा विचारविनिमय करण्यासाठीं पुणें येथें १९५९ च्या जूनमध्यें नियोजन मंडळाचा चर्चात्मक परिसंवाद घडवून आणण्यांत आला.

**६. प्रादेशिक विकास मंडळें :—**

योजनेसाठीं असलेल्या इतर सल्लागार संस्थांपैकीं, विभागीय विकास मंडळांशीं अर्थ विभागाचे संबंध आहेत. राज्याच्या त्या त्या विभागांतील विकास विषयावर सरकारला सल्ला देण्यासाठीं विभागीय कमिशनरांच्या अध्यक्षतेखालीं हीं मंडळें स्थापन करण्यांत आलीं असून त्या त्या विभागांतील सरकारी व बिनसरकारी अधिकारी हे त्यांचे सभासद आहेत. भारतीय घटनेच्या कलम ३७१(२) खालील तरतुदीनुसार प्रादेशिक विकास मंडळें स्थापन करण्याबाबत विचार चालू आहे. कायदेशीर प्रादेशिक मंडळें शक्य तितक्या लवकर स्थापन करण्यांत येतील.

**७. तृतीय पंचवार्षिक योजनेची तयारी :-**

राज्यासाठीं तृतीय पंचवार्षिक योजना तयार करण्याचें काम गेल्या वर्षी सुरू झालें. १५ ते २० वर्षे इतक्या दीर्घ कालावधींतील अवश्यकतेची पद्धतशीर अजमावणी करण्यासाठीं आणि तृतीय पंचवार्षिक योजनेंत दूर दृष्टीनें सूचना तयार करण्यासाठीं पूर्वीच्या मुंबई सरकारनें निरनिराळ्या विकासविभागांसाठीं अनेक अभ्यास मंडळें स्थापन केलीं होतीं. ह्या अभ्यास मंडळांचे हातीं आलेले अहवाल एकत्रित मुंबई राज्यासंबंधीं आहेत. या राज्याच्या विभाजनामुळें, अभ्यास मंडळांनीं मांडलेले प्रस्ताव महाराष्ट्र राज्याकरितां योजनेच्या रूपरेषेचा मसुदा तयार करता यावा म्हणून विभागून घेतले पाहिजेत.

अभ्यास मंडळांनीं सादर केलेल्या अहवालांचा नवीन महाराष्ट्र राज्याशीं संबंध असेल त्या बाबतींत त्या अहवालांचा योग्य रीतीनें स्वीकार करण्यांत येऊन हें काम पार पाडण्यांत येत आहे. राज्यांतील निरनिराळ्या जिल्ह्यांकरितां व विभागांकरितां ज्या योजना तृतीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करावयाच्य आहेत त्यासंबंधीं कांहीं सूचना सरकारकडे पाठविण्याची विनंति त्या त्या ठिकाणच्या जिल्हा विकास मंडळांना आणि विभागीय विकास परिषदांना करण्यांत आलेली आहे. कांहीं जिल्ह्यांनीं व विभागांनीं त्यांच्या सूचना ह्यापूर्वीच पाठवेल्या आहेत. राज्याच्या तृतीय पंचवार्षिक योजनेच्या रूपरेषेचा मसुदा तयार करतांना या संस्थांकडून आलेल्या सूचनाहि विचारांत घेण्यांत येतील.

**८. तांत्रिक व आर्थिक पाहणी :—**

राज्याची तांत्रिक व आर्थिक पाहणी करण्याचें काम राष्ट्रीय व्यावहारिक अर्थव्यवस्था संशोधन परिषदेकडे [ नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च ] गतवर्षी सोपविण्यांत आलें होतें. राष्ट्रीय परिषदेनें पाहणीचा मध्यंतरींचा अहवाल अगोदरच सादर केला असून सप्टेंबर १९६० अखेर पर्यंत पाहणीचा संपूर्ण अहवाल उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे.

# महसूल विभाग

महसूल विभागांत मुख्यत्वेंकरून जमीनधारा पद्धति आणि जमीन महसुलाचा कारभार, महसूल दप्तराची व्यवस्था ठेवणें, जमीन सुधारणा अंमलांत आणणें, मालमत्तेचें संपादन किंवा तिची मागणी करणें, अबकारी कर, प्रादेशिक फेरबदल, आणि करमणूक कर, स्टँप कर, इत्यादींसारख्या कांहीं संकीर्ण करां-बाबतचा कारभार पाहणें, हीं कामें करण्यांत येतात. मुंबई राज्याच्या विभाजनानंतर नवीन महाराष्ट्र राज्याचे मुंबई, नागपूर, औरंगाबाद आणि पुणें असे चार विभाग होतात. ह्या ठिकाणचीं मुख्यालयें अनुक्रमें मुंबई, नागपूर, औरंगाबाद आणि पुणे येथें असून, प्रत्येक विभाग, विभागीय कमिशनरांच्या हाताखालीं आहे. कलेक्टर हा प्रत्येक जिल्ह्याचा मुख्य असून, त्याच्या हाताखालीं (१) प्रांताधिकारी–उपविभागाचा प्रभारी, (२) मामलेदार किंवा तहसिलदार – तालुक्याचा प्रभारी, (३) मंडलाधिकारी आणि मंडल निरीक्षक—मंडलाचा प्रभारी आणि शेवटीं (४) तलाटी किंवा पटवारी आणि पाटील — गांवांचे प्रभारी, असे अधिकारी असतात. भू–व्यवस्था कमिशनर आणि जमीन दप्तर संचालक हे जमीन दप्तर विभागांचे प्रमुख आहेत. इन्स्पेक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन ह्यांच्या हाताखालीं असलेले जिल्हा रजिस्ट्रार, इन्स्पेक्टर ऑफ रजिस्ट्रेशन आणि सब-रजिस्ट्रार हे नोंदणी विभागाचे प्रमुख आहेत. १० जून १९६० पासून, भू-व्यवस्था कमिशनर आणि जमीन दप्तर संचालक व इन्स्पेक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन ह्यांच्या दोन जागा एकत्रित करण्यांत आल्या आहेत.

स्टँप विभागांत, बृहन्मुंबई खेरीज करून ( राज्याच्या बाबींकरितां ) सर्व राज्यांत इन्स्पेक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन हा मुख्य महसूल नियंत्रक अधिकारी आहे. बृहन्मुंबईकरितां स्टँपाचा अधीक्षक मुख्य महसूल नियंत्रक अधिकारी आहे. कमिशनर हे त्यांच्या अधिकाराखालीं असलेल्या प्रदेशाकरितां मध्यवर्ती बाबींसाठीं, मुख्य महसूल नियंत्रक अधिकारी आहेत.

(२) ह्या विभागानें हाताळलेल्या महत्त्वाच्या योजना व कार्यक्रम खालीं नमूद केले आहेत:-

**(ए) द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या योजना :—**

| | | |
|---|---|---|
| (अ) | क्र. ५९ (५) | प्राथमिक निवेदन करणाऱ्या संस्थांचें जास्त काम कमी करणें. |
| (ब) | क्र. ६१ | पाहाणी व भू–व्यवस्था |
| (क) | क्र. ६२ | जमीनींचें एकत्रीकरण. |
| (ड) | क्र. ६५ | हक्क नोंदणी दप्तर ठेवण्यास प्रारंभ. |
| (इ) | क्र. ६६ | विदर्भ प्रदेशांतील भूमिहीन मजुरांची पुनर्वसाहत. |

**(बी) इतर बाबी:–**

(१) नैसर्गिक आपत्तींच्या प्रसंगीं साहाय्य.
(२) जमीन सुधारणा.
(३) नवीन कायदे करण्याबाबतचा कार्यक्रम.

वर दिलेल्या योजनांचें खाली क्रमवार वर्णन दिलें आहे:—

**३. (ए) द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजना:—**

(ए) योजना क्र. ५९ (५) प्राथमिक निवेदन करणाऱ्या संस्थांचें जास्त काम कमी करणें.

ही योजना विदर्भ प्रदेशासाठीं असून जमीनीचा उपयोग, दरएकरीं उपज व उत्पादन इत्यादीं विषयीं जास्त अचूक माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीचे पिकें कापण्याचें प्रयोग, हंगामापूर्वीचे अंदाज, इत्यादींच्याद्वारा शेतकीविषयक आंकडेवारींत सुधारणा करणें हा तिचा उद्देश आहे; पटवारी आणि महसूल निरीक्षक यांनी गोळा केलेल्या कृषिविषयक आंकडेवारीचा दर्जा आणि त्यांतील विषय यांची

सुधारणा करण्यासाठीं पटवारी व महसूल निरीक्षक यांच्यावरील निरनिराळ्या चौकशा आणि पाहणी याबाबतच्या बाहेरील कामाचा ताण कमी करण्यासाठीं त्यांची संख्या वाढविण्यांत आली आहे. ह्या योजनेकरितां ६ महसूल निरीक्षक आणि १६६ पटवारी एवढ्या नोकरवर्गाची २८ फेब्रुवारी १९६१ पर्यंत मुदतवाढ करण्यांत आली आहे आणि सध्यां ह्या नोकरवर्ग विद्यमान जमीन दप्तर विभागांतील नोकरांना मदत करीत आहे. ह्या योजनेकरितां पंचवार्षिक योजनेंत रु. ८·९८ लक्ष एवढी रक्कम नियुक्त केली आहे. रु. १,४६,००० ह्या एकूण वांटपामधून मागील आर्थिक वर्षांत (१९५९--६०) रु. १,२९,६११ इतका खर्च करण्यांत आला आहे. चालू आर्थिक वर्षाकरितां रु. १,८५,००० इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

(बी) **योजना क्र. ६१ भू-व्यवस्थेची पाहणी.**

योजनेंत खालील बाबीं अंतर्भूत केलेल्या आहेत :--

(१) राज्यांत विलीन केलेल्या भागांत हक्कांचें दप्तर व वर्गीकरण यासाठीं पाहणीचा प्रारंभ करणें. ही योजना पूर्वीच्या संस्थानी प्रदेशांतील ४,०१५ खेड्यांतील जमिनीची पाहणी करण्यासाठीं व ४,३३८ खेड्यांतील जमिनींचें वर्गीकरण करण्यासाठीं १९५४–५५ यावर्षी मंजूर करण्यांत येऊन अंमलांत आणली गेली. खास भू-सत्ता प्रकार नष्ट केल्यामुळें भूमि व्यवस्थेच्या कामांत दुरुन गतीनें प्रगति झाली आहे. पाहणी आणि वर्गीकरण या दोन्ही बाबींचा एकत्र विचार केल्यास उद्दिष्ट ठराविक काळांत साध्य झाल्याचें दिसून येतें. पूर्वी योजिल्याप्रमाणें मे १९६० अखेरपर्यंत ही योजना पूर्ण करावयाची होती. तथापि, ह्या योजनेसाठीं नेमलेल्या कांहीं सेवकवर्गाचा भाग दुसऱ्या कामासाठीं वापरल्यामुळें ही योजना १९६०-६१ सालासाठीं चालू करणें भाग आहे.

(२) मराठवाडा प्रदेशांत फेर पाहणी आणि वर्गीकरण यांची सुरुवात द्वितीय पंचवार्षिक योजनेंत, १९५८-५९ सालापासून ही योजना नव्यानेंच समाविष्ट केली आहे, आणि बाहेरील काम १ नोव्हेंबर १९५८ पासून सुरू झालें आहे. १५३ खेड्यांतील १,९६,६७८ सर्व्हे क्रमांकांच्या फेरपाहणीचें काम व ८,९२८ सर्व्हे क्रमांकांचें वर्गीकरण ३१ मार्च १९६० पर्यंत पूर्ण झालें आहे. १२७ खेड्यांतील १६,५१० सर्व्हे क्रमांकांची पाहणी आणि १०,००० सर्व्हे क्रमांकांचे वर्गीकरण चालू आर्थिक वर्षांत पूर्ण करावयाचें असून राहिलेलें काम तृतीय पंचवार्षिक योजनेंत पुढें चालू ठेवलें जाईल. जरी काम उशीरानें सुरू झालें तरी तें कार्यक्रमांनुसार चालू आहे.

(३) विदर्भांतील पाहणी न केलेल्या भागांतील व्यक्तिगत-भू-मापनाची योजना.

पूर्वीच्या मध्य प्रदेश सरकारच्या, द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील योजनांपैकीं ही एक असून कायद्यांतील एकसूत्रीपणाच्या विलंबामुळें ह्या योजनेचें काम स्थगित केलें होतें, पण १ डिसेम्बर १९५८ पासून तें काम हातीं घेतलें आहे. तो प्रदेश डोंगराळ व जंगलव्याप्त असल्यामुळें आणि मजूर मिळविण्यासारख्या इतर अंगभूत अडचणींमुळें या कामाची प्रगति मंदच आहे.

(४) मूळ व फेर भूमिव्यवस्था. ही योजना १ जून १९५९ पासून बंदच केली आहे.

(५) पाहणी केलेल्या खेड्यांतील पोट–हिस्सा मोजणी. सुधारलेल्या कूळ वहिवाट अधिनियम आणि जमिनींचें एकीकरण करण्याबाबतचा अधिनियम यांची अंमलबजावणी सुलभ व्हावी म्हणून पोट-हिश्यांच्या मोजणीचें काम अत्यावश्यक झालें असून १९५६ सालीं खास सेवक वर्ग मंजूर करून त्याबाबतचें काम हातीं घेतलें आहे आणि ही योजना द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केली आहे. ३० जून १९५९ पर्यंत एकूण १७,३४,५६८ हिश्यांची मोजणी पूर्ण झाली असून हें काम कार्यक्रमांनुसार चालू आहे.

योजनेंत नियुक्त केलेल्या रु. १९०·२५ लक्ष या रकमेपैकीं रु. १८२·७४ लक्ष एवढ्या रकमेचा १९५९–६० पर्यंतचा खर्च झाला आहे. महाराष्ट्र राज्याच्या सुधारलेल्या अंदाजपत्रकांत १९६०–६१ सालाकरितां रु. १२,६८,००० ची तरतूद केली आहे.

(सी) योजना क्रमांक ६२ : जमिनींचें एकत्रीकरण.

जमिनीचे तुकडे करण्यास प्रतिबंध करणें व ठिकठिकाणीं पसरलेले तुकडे एका जोड गटाखालीं आणणें या उद्देशानें राज्याच्या पुष्कळ खेड्यांतून जमिनींचें एकत्रीकरण करणाऱ्या अनेक योजना अंमलांत आणलेल्या आहेत. या संबंधांतील जुन्या मुंबई राज्याच्या व मराठवाड्याच्या अधिनियमान्वयें सरकारला तसें करण्याचा आपला इरादा जाहीर करून कोणत्याहि प्रदेशांतील धारण केलेल्या जमिनींचें एकत्रीकरण करतां आलें असतें, परंतु विदर्भ प्रदेशांत ज्या गांवांतील जमीन धारण करणाऱ्यांपैकीं २/३ किंवा त्याहून अधिक इसमांनीं या योजनांसाठीं अर्ज केले असते त्याच गांवांत एकत्रीकरण हातीं घेतां आलें असतें. तथापि, सन १९५८ चा मुंबईचा जमिनीचे तुकडे करण्यास प्रतिबंध करण्याबाबत व जमिनींचें एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम ( विस्तार आणि सुधारणा ) या अन्वयें सन १९४७ चा मुंबईचा जमिनीचे तुकडे करण्यास प्रतिबंध करण्याबाबतचा व जमिनींचें एकत्रीकरण करण्याबाबतचा अधिनियम यांत योग्य ते फेरफार करून तो सर्व नवीन प्रदेशांत लागू केल्यामुळें आतां ही अडचण उरली नाहीं. जुन्या मुंबई राज्याच्या प्रदेशांत या कामाबाबत बरीच प्रगती झाली आहे, परंतु विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशांत हें काम उशीरा सरू करण्यांत आल्याकारणानें तें प्रयोगावस्थेंत आहे. जुन्या मुंबई राज्याच्या प्रदेशाव्यतिरिक्त राज्याच्या इतर प्रदेशांतसुद्धां एकत्रीकरणाचें काम द्रुतगतीनें होण्यासाठीं सन १९४७ च्या मुंबईचा जमिनीचे तुकडे करण्यास प्रतिबंध करण्याबाबतचा व जमिनीचे एकत्रीकरण करण्याबाबतचा अधिनियम यांचे कलम १५ खालीं नवे प्रदेश अधिसूचित केले आहेत आणि या कामासाठीं अवश्यक तो नोकरवर्ग देखील मंजूर केला आहे. ह्या एकत्रीकरण योजनांचा खर्च सरकार सोसणार आहे. ही योजना पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनांत समाविष्ट केली होती. महाराष्ट्र राज्याच्या सुधारलेल्या अंदाजपत्रकांत १९६०–६१ या आर्थिक वर्षाकरितां ह्या योजनेसाठीं रु. १०,८८,५०० ची तरतूद केली आहे आणि जमिनींच्या एकत्रीकरणाच्या योजना राज्याच्या सर्व भागांत अंमलांत आणण्यासाठीं योग्य ती उपाययोजना करण्यांत आली आहे.

( डी ) योजना क्र. ६९ : हक्क नोंदणी पद्धतीस आरंभ.

ही योजना पूर्वीच्या मुंबई राज्यांतील प्रदेशासंबंधींची असून, तिच्याद्वारें खोतीच्या व पहाणी न केलेल्या इनाम गांवांचा पद्धतशीर विकास व्हावा म्हणून त्या गांवांत हक्क-दप्तर पद्धतीचा आरंभ करावयाची तरतूद केलेली आहे. पूर्वीच्या मुंबई राज्यांतील ज्या खेड्यांतून हक्क-दप्तर पद्धति अंमलांत नव्हती अश ठिकाणीं हक्क-दप्तर सुरू करणें, आणि ज्या ज्या ठिकाणीं ही पद्धति आधींच चालू आहे, तेथें हक्क-दप्तर अद्यावत् करणें याबाबतदेखील तिच्यांत तरतूद केली आहे. सुधारलेला कूळ वहिवाट अधिनियम व भूसत्ताप्रकार नष्ट करणारे इतर अधिनियम सुरळीतपणें अंमलांत आणण्याच्या दृष्टीनें, ३,८०८ खेड्यांतून हक्क-दप्तर सुरू करण्याचें काम पूर्ण करण्याचें व १८,७५० खेड्यांतून आधींच चालू असलेले हक्क-दप्तर अद्यावत् करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्या योजनेनुसार, अनुक्रमें २,८८४ आणि १६,७६४ खेड्यांतून १९५९ सालीं काम पूर्ण झालें आहे. द्वितीय पंचवार्षिक योजनेंत नियुक्त केलेल्या २४·५५ लक्ष रुपयांपैकीं ९·३२ लक्ष रुपये एवढा खर्च १९५९–६० सालापर्यंत झालेला आहे. उरलेलें काम पुरें व्हावें म्हणून १९६०–६१ सालीं महाराष्ट्र राज्याच्या सुधारलेल्या अंदाज-पत्रकांत रु. २,५८,५०० ची तरतूद करण्यांत आली आहे.

( ई ) योजना क्र. ६६ : विदर्भ प्रदेशांतील भूमिहीन मजुरांना स्थायिक करणें.

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेली ही योजना विदर्भांतील चांदा, यवतमाळ आणि अकोला जिल्ह्यांतील खेड्यांमधील भूमिहीन शेतकी मजूरांना स्थायिक करण्यासंबंधींची आहे. ह्या योजनेला १९५९ सालच्या डिसेंबर महिन्यांत मंजुरी मिळाली होती. प्रत्येकीं १०० एकर या गटांप्रमाणें भूमिहीन मजुरांना स्थायिक करण्याची तरतूद त्या योजनेंत केली असून प्रत्येक भूमिहीन कुटुंबास एका बैल-जोडीनें

नांगरली जाईल एवढी जमीन, म्हणजे भातशेतीसाठीं १० एकर, कापूस, गहूं किंवा ज्वारीच्या शेतीकरितां १५ एकर आणि हलक्या प्रतीची जमीन २० एकर द्यावयाची आहे. भूमिवांटप केलेल्या अशा मजुरांना बैल व अवजारें घेण्यासाठीं रु. ७०० आणि घरें बांधण्यासाठीं रु. १,०१० अशा स्वरुपांत कर्ज द्यावयाचें होतें. जरुरी पडल्यास, सरकारी पडित जमीन सरकारी खर्चानें लागवडीस योग्य करून नंतर ती वांटून द्यावयाची होती.

ह्या योजनेस १९५९ सालच्या डिसेंबरमध्यें मंजुरी मिळाली होती आणि अन्दाजपत्रकांत रु. ३,६२,००० ची तरतूद करण्यांत आली होती. परंतु गेल्या आर्थिक वर्षांत, अल्पमुदतींत कमिशनरांना काम करावयाचें असल्यानें अदमासे ६७,४९० रुपये एवढाच खर्च होऊ शकला. तरतूद केलेली बाकीची रक्कम सरकारकडे परत द्यावी लागली. तथापि वांटप करावयाच्या भूमिगटांची संख्या वाढवून ह्या योजनेला नवीन स्वरूप देण्यांत आले असून १९६०-६१ च्या आर्थिक वर्षांत अन्दाजपत्रकांत रु. ३,८०,००० ची तरतूद करण्यांत येऊन ती पुढें चालू ठेवली आहे. वरील तरतूद खालीं दिल्याप्रमाणें विभागली जाईल:—

| | | मुख्य सदर | तरतूद |
|---|---|---|---|
| १ | नोकर वर्गावरील व पडित जमीन लागवडीस योग्य करण्याचा खर्च. | ७, जमीन महसूल | रु. १,८४,५०० |
| २ | बैल व अवजारें यांची खरेदी आणि घरें बांधणें यांसाठीं कर्जे. | पी-कर्जे व आगाऊ रकमा | रु. १,९५,५०० |
| | | | रु. ३,८०,००० |

## (बी) इतर महत्त्वाच्या बाबी

### ३. दुष्काळ व टंचाई :-

दुर्दैवानें राज्यांतील कांहीं भागांत गतवर्षी अतिवृष्टी झाल्यामुळें किंवा तुरळक पाऊस पडल्यामुळें त्यापूर्वीच्या वर्षाच्या मानाने शेती चांगली झाली नाहीं, म्हणून खालील जिल्ह्यांतून दुष्काळी परिस्थिति जाहीर करण्यांत आली आहे:—

| अनुक्रमांक | जिल्ह्याचें नांव | दुष्काळी परिस्थिति जाहीर केलेल्या खेड्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | यवतमाळ | ८४६ |
| २ | अकोला | ४२२ |
| ३ | वर्धा | १९८ |
| ४ | अमरावती | १७६ |
| ५ | बुलढाणा | २८१ |
| ६ | नाशिक | ४४ |

त्यांतून (१) शेतमजुरांना रोजगार पुरविण्यासाठीं दुष्काळी मदतीचीं कामें सुरू करणें, (२) चारा व पिण्याचें पाणी पुरविणें, (३) उपदानाच्या स्वरूपांत मदत देण्यासाठीं रोख रकमा वांटणें, (४) शेतकऱ्यांना तगाई कर्जे देणें आणि (५) पूर व आग यांपासून त्रस्त झालेल्या लोकांना कृषिव्यतिरिक्त कर्जे देणें, याबाबतचा खर्च भागविण्यासाठीं संबंधित कलेक्टर व कमिशनर यांजकडे पुरेसा निधि सोंपविण्यांत आला आहे. एकंदर परिस्थितीचें बारकाईनें निरीक्षण करण्यांत येत असून पीडित लोकांना मदत करण्याच्या दृष्टीनें आवश्यक ते उपाय केले जात आहेत.

## ४. जमीनविषयक सुधारणा (कूळ वहिवाट) :—

राज्यपुनर्रचनापूर्व मुम्बई राज्यांत, कूळ वहिवाट अधिनियमाची अंमलबजावणी दुसऱ्या अवस्थेत होती व त्यावेळीं या अधिनियमाखालीं कुळांनीं सक्तीनें जमिनीची खरेदी करावयाची योजना अंमलांत होती. कलम ३२-जी खालीं न्यायाधिकरणांनी चौकशीचें काम पूर्ण करणें, हें ह्या अवस्थेतील मुख्य काम होतें. आतापर्यंत न्यायाधिकरणांनी २,१७,३०५ चौकशींचीं कामें पुरीं केली असून, ९,६८,५८४ कामें शिल्लक आहेत. ज्या तालुक्यांतील व महालांतील चौकशींचीं कामें बऱ्याच प्रमाणांत मागे राहिली आहेत अशा तालुक्यांतील व महालांतील ही चौकशींचीं सर्व कामें १ एप्रिल १९६२ पूर्वी पुरीं होण्याच्या दृष्टीनें, सरकारनें त्याठिकाणीं आणखी ८७ न्यायाधिकरणें नेमली आहेत. स्वतः शेती करण्यासाठीं जमीन परत घेतां यावी म्हणून लहान जमीन मालकांना एक नवीन संधि देण्याच्या दृष्टीनें आणि ह्या जमीनमालकांच्या कुळांना त्यांच्याकडे असलेल्या परत न करतां येण्यासारख्या जमिनीच्या खरेदीचा हक्क मिळावा ह्या दृष्टीनें येत्या अधिवेशनांत कूळ वहिवाट अधिनियमामध्यें सुधारणा करण्याचें योजिले आहे.

राज्याच्या विदर्भ भागांत १९५८ चा मुम्बईचा कूळवहिवाट व शेतजमीन विषयक अधिनियम [ विदर्भ प्रदेश व कच्छ भाग ] याची कसोशीनें अंमलबजावणी केली जात आहे. ह्या कारणासाठीं खास नेमलेल्या दोन समित्यांच्या शिफारशीनुसार, अधिनियमाप्रमाणें चालू वर्षी एका कुटुंबाच्या मालकीच्या वेगवेगळ्या भागांत असलेल्या जमिनी निश्चित करण्यांत आल्या आहेत. सदरहू अधिनियमाच्या कलम ८ नुसार, ह्या भागांतील कुळांची यादी तयार करण्यांत आली आहे. स्वतः शेती करण्यासाठीं जमिनी परत मिळाव्या म्हणून जमीनमालकांनीं केलेले अर्ज निकालांत काढण्याचें काम चालू असून, आणखी कांहीं काळ तें काम चालू राहील. १९६०-६१ सालीं अधिनियमांच्या अंमलबजावणींचा दुसरा टप्पा सुरू होईल, आणि त्याअन्वयें १ एप्रिल १९६१ ला जमीन खरेदी करणें कुळांना भाग पडेल. ह्या प्रयोजनासाठीं आवश्यक ते कागदपत्र तयार करण्याच्या कामांत महसूल अधिकारी गुंतले राहतील. प्रशासन विषयक कांहीं अडचणी दूर करण्यासाठीं, सदरहू अहवालाच्या वर्षांत या अधिनियमांत सुधारणा करण्यांत आल्या आहेत.

मराठवाडा प्रदेशांत हैद्राबाद कूळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९५०, जारी आहे. संरक्षित कुळांनीं कलम ३८ ई व ३८ एफ् यानुसार सक्तीनें जमिनी विकत घेण्याबाबतच्या योजनेची अंमलबजावणी समाधानकारकपणें चालू आहे. जमीनमालकांनीं जमीन परत मिळविण्यासाठीं कलम ४४ खालीं केलेले अर्ज निकालांत काढण्याचें काम, आणि अधिनियमाच्या कलम ९८ ए व ९८ सी प्रमाणें जमिनीच्या कांहीं तबदिली वैध करण्यासंबंधींचें काम, खास कूळवहिवाट नोकरवर्ग करीत आहे. कांहीं प्रशासनविषयक अडचणी दूर करण्यासाठीं चालू वर्षी हैद्राबाद कूळवहिवाट अधिनियमांत सुधारणा करण्यांत आल्या आहेत.

## ५. वैधानिक कार्यक्रम:—

१९६०-६१ सालीं, विधानसभेंत खालील विधेयकें सादर करण्याचें योजिलें आहे: —

(१) मुंबई शहरांतील इनामें व खास सत्ताप्रकार नष्ट करण्यासंबंधीं विधेयक.

(२) मुम्बईचा वैयक्तिक इनामें नष्ट करण्याच्याबाबत अधिनियम, १९५२ च्या तरतुदीत सुधारणा करणारें विधेयक.

(३) १३५९ फसलीचा हैदराबादच्या जहागिरीऐवजीं तनखे देण्याबाबतच्या विनियमांच्या कलम ४ ची सुधारणा करणारे विधेयक.

(४) हैदराबादचा रोख अनुदानाबाबतचा अधिनियम याची सुधारणा करणारें विधेयक.

(५) शेतजमिनींची कमाल मर्यादा ठरवून देणारें विधेयक.

(६) १९५८ चा मुम्बई स्टँप अधिनियम याची सुधारणा करणारें विधेयक आणि

(७) १९०६ चा भारतीय नोंदणी अधिनियम याची सुधारणा करणारें विधेयक.

खालील अधिनियमांतील तरतुदींची १९६०–६१ साली अंमलबजावणी सुरू करण्यांत येईल.

१. १९५८ चा मुंबईचा कनिष्ठ ग्रामवतनें नष्ट करण्याबाबतचा अधिनियम.

२. १९५९ चा हैदराबादचा इनामें नष्ट करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, आणि १९५४ चा हैद्राबादचा इनामें आणि रोख अनुदानें नष्ट करण्याबाबत अधिनियम.

१ च्या संबंधांत सांगावयाचें तर १९५८ चा मुंबई कनिष्ठ ग्रामवतनें नष्ट करण्याबाबतचा अधिनियम १ ऑगस्ट १९६० पासून सोलापूर, पश्चिम खानदेश, नांदेड, ठाणें आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांतून अंमलांत आणला जाईल. हा अधिनियम परभणी, दक्षिण सातारा, सोलापूर, नाशिक, पुणें, कुलाबा, उत्तर सातारा व औरंगाबाद या जिल्ह्यांतून आधींच अंमलांत आहे.

हा अधिनियम अंमलांत आणण्यासाठीं जो खर्च येईल, तो योजनेतील एक बाब म्हणून मानला जाईल, परंतु तो योजनेच्या कमाल मर्यादेबाहेरचा राहील.

२ च्या संबंधांत सांगावयाचें तर १९५९ चा हैद्राबादचा इनामें नष्ट करण्याबाबतचा [सुधारणा] अधिनियम, मुख्य अधिनियमाच्या सध्यां अंमलांत असलेल्या कलमांसहित १ जुलै १९६० पासून अंमलांत येईल.

सध्यां चालूं असलेले भू-सत्ताप्रकार नष्ट करण्याबाबतचे अधिनियम अंमलांत आणण्याचें काम चालूं वर्षी अधिक वेगानें करण्यांत येईल. भरपाईच्या मागणीबद्दल निवाडा देणें आणि ज्या ज्या बाबतींत नुकसानभरपाईच्या रकमा निश्चित केल्या असतील, त्या चुकत्या करणें, हें ह्या अधिनियमाच्या अंमलबजावणीचें मुख्य स्वरूप राहील. चालूं वर्षी, ह्या दोन्ही बाबतींतलें काम झपाटयानें होण्यासाठी उपाययोजना करण्यांत येईल. सत्ताप्रकार नष्ट करणाऱ्या कायद्यामुळे नुकसान झालेल्या इनामदारांचें व जमीन वहिवाटदारांचे पुनर्वसन करण्यासाठीं अनुदानें द्यावयाच्या योजनेची सुद्धां अंमलबजावणी करण्यांत येईल. आलेल्या अर्जांची चौकशी करण्यांत सध्यां कलेक्टर गुंतले आहेत.

# नागरी विकास व लोकस्वास्थ्य विभाग

## वैद्यकीय

ह्या राज्यांतील वैद्यकीय संघटना ही लोकस्वास्थ्य संघटनेहून भिन्न असून ती मुख्यत्वें रुग्णालय-संघटना आहे. ह्या संघटनेकडून बहुजन समाजाला रोगनिवारक वैद्यकीय मदत दिली जाते. त्यासाठीं, वैद्यकीय मदत, वैद्यकीय शिक्षण आणि प्रशिक्षण, परिचारिका आणि सुईणी, क्ष-किरण आणि प्रयोग शाळा तंत्रज्ञ यांचें प्रशिक्षण आणि संशोधन इत्यादी आनुषंगिक गोष्टींची सोय असलेल्या विभागांचा तिच्यांत अंतर्भाव होतो. निरनिराळ्या कार्यांच्या विकासासाठीं वैद्यकीय विभागानें हातीं घेतलेल्या योजनांची माहिती पुढें दिली आहे:—

### द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या योजना किंवा प्रकल्प

**जे. जे. हॉस्पिटलची पुनर्रचना:—**

ह्या योजनेनुसार, जे. जे. हॉस्पिटलसाठीं नवीन इमारती बांधण्याचें काम चालूं आहे. तेथें पदव्युत्तर प्रयोगशाळा, प्राणिगृह आणि गुप्तरोग व क्षयरोग चिकित्सालयें आणि बहिर्रुग्ण विभागाचा विस्तार यासाठीं इमारती देखील बांधण्यांत येत आहेत. बहिर्रुग्ण विभागाचें काम पूर्ण झालें असून इतर कामें जोरांत चालूं आहेत. या योजनेकरितां पंचवार्षिक योजनेंत करण्यांत आलेली रु. १ कोटींची तरतूद बहुधा संपूर्णपणें उपयोगांत आणली जाईल. चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत रु. २३·४२ लाखांची तरतूद केली आहे.

**मुलकी रुग्णालयें व दवाखाने यांचा विस्तार:—**

ह्या योजनेनुसार अहमदनगर आणि सांगली येथील रुग्णालयासाठीं नवीन इमारतींच्या बांधकामाची आणि रत्नागिरी व चांदा येथील मुलकी रुग्णालयांच्या विस्ताराच्या कामाची प्रगती होत असून पुणे येथील ससून हॉस्पिटलमध्यें ९५ जादा रुग्णशय्या आणि सातारा येथील मुलकी रुग्णालयामध्यें २५ जादा रुग्णशय्यांची अगोदरच सोय करण्यांत आली आहे. मराठवाडयामध्यें, नांदेड, परभणी, जालना, मोमिनाबाद आणि उस्मानाबाद येथें क्ष-किरण चिकित्सा शाखा स्थापन करण्यांत आल्या आहेत. औरंगाबाद, नांदेड, परभणी आणि मोमिनाबाद येथें रोग चिकित्सा प्रयोगशाळा स्थापन करण्यांत आल्या आहेत. बीड येथील मुलकी रुग्णालयाच्या नकाशांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. चालूं वर्षाच्या अंदाजपत्रकांत ह्या योजनेकरितां रु. १६·८९ लाखांची तरतूद केली आहे.

**सरकारी वैद्यकीय संस्थांमध्यें योग्य जलनिस्सारणाची व्यवस्था, पाणी व वीज पुरवठा नोकरवर्गासाठीं घरें इत्यादींची तरतूद करणें:—**

१९६०-६१ मध्यें ह्या योजनेकरितां रु. ०·४५ लाखांची तरतूद केली आहे.

**विद्यमान वैद्यकीय संस्थांमध्यें जादा नोकरवर्ग आणि साधनसामुग्री, यांची सोय करण्यासाठीं व त्यांच्या इमारतींत फेरबदल करण्यासाठीं तरतूद करणें:—**

ही एक सर्वसाधारण योजना आहे. १९६०-६१ मध्यें ह्या योजनेकरितां रु. ४३·७१ लाखांची तरतूद केली आहे.

**खासगी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीचे दवाखाने ताब्यांत घेणें:—**

ह्या योजनेनुसार बुलढाणा व भंडारा येथील जिल्हा मुख्यालय रुग्णालयें सरकारनें आपल्या ताब्यांत घेतलीं आहेत. सरकारने ताब्यांत घेतलेलीं विदर्भ प्रदेशांतील, पांच डफरिन फंड व स्त्रियांची रुग्णालयें यांची व्यवस्था ठेवण्यांत येत आहे. मराठवाडयांमध्यें हिंगोली, आर्वी, देगलूर, औसा, उदगीर, उम्री, आणि तुळजापूर, येथें प्रसूति विभाग उघडले आहेत. चालू वर्षीच्या अन्दाजपत्रकांत ह्या योजनेकरितां रु. ५·२५ लाखांची तरतूद केली आहे.

**कुटीर रुग्णालयांची स्थापनाः-**

ह्या योजनेनुसार ६ कुटीर रुग्णालयें बांधावयाची होती. आतांपर्यंत ३ कुटीर रुग्णालयें उघडली आहेत. उरलेल्या ३ रुग्णालयांच्या इमारतींच्या बांधकामांची प्रगति होत आहे. चालू वर्षी, रु. ७·४९ लाखांची तरतूद केली आहे.

**वेड्यांच्या रुग्णालयांचा विस्तारः-**

ठाणें येथील एन्. एम. वेड्यांच्या रुग्णालयामध्यें आणखी ४८ वेड्यांकरितां आणि येरवडा येथील सी. एम्. रुग्णालयामध्यें आणखी ७० वेड्यांकरितां, जागेची सोय करण्यासाठीं इमारती बांधण्याचें काम चालू आहे. रत्नागिरी येथील वेड्यांच्या रुग्णालयामध्यें आणखी ५० वेड्यांकरितां जागेची सोय करण्यासाठीं इमारती बांधण्याचें काम पूर्ण झालें आहे, आणि ५० वेड्यांकरितां जादा जागेची सोय अगोदरच करण्यांत आली आहे. नागपूर येथील वेड्यांच्या रुग्णालयांतील जादा नोकरवर्गाची मुदत वाढ करण्यांत आली आहे. चालू वर्षीच्या अंदाजपत्रकांत ह्या योजनेकरितां रु. २·३९ लाखांची तरतूद केली आहे.

**प्रशिक्षित औषधतज्ञांची (फार्मसिस्ट) नेमणूकः-**

महाराष्ट्रांतील विविध रुग्णालयांतून प्रशिक्षित औषधतज्ञांच्या २९ जागांसाठी सरकारनें अगोदरच मंजुरी दिली आहे. परंतु प्रशिक्षित औषधतज्ञ मिळत नसल्यानें ह्या जागा अद्याप भरल्या गेल्या नाहींत. ह्या जागा भरण्यासाठीं आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत आहे.

**मुंबई वैद्यकीय सेवा वर्ग ३ च्या जागांचे क्रमाक्रमाने वर्ग २ च्या जागांमध्यें रूपांतर करणेंः-**

ह्या योजनेनुसार मुंबई वैद्यकीय सेवा वर्ग ३ च्या ८५ जागांचे वर्ग २ च्या जागांमध्यें रूपांतर करावयाचें आहे· आतांपर्यंत ७० जागांचें रूपांतर केलें आहे. उरलेल्या जागांचें रूपांतर चालू वर्षी करण्यांत येईल. चालू वर्षी रु. ०·३६ लाखांची तरतूद केली आहे

**खाजगी रुग्णालयें व दवाखाने ह्यांना अनुदानें :-**

अनुदानें देण्याची ही एक सर्वसाधारण योजना आहे. चालू वर्षी रु. ०·६६ लाखांची तरतूद केली आहे·

**मराठवाड्यांतील वैद्यकीय व्यावसायिकांची अर्थसहाय्यित केंद्रे :-**

ह्यायोजनेनुसार, जरी वैद्यकीय व्यावसायिकांची ८ अर्थसहाय्यित केंद्रे मंजूर केली असलीं तरी व्यवसायी इसम उपलब्ध न झाल्यामुळे फक्त एकच केंद्र उघडणें शक्य झालें आहे. रु. ०·२० लाखांची तरतूद केली आहे.

**मराठवाड्यांतील रुग्णालयें आणि दवाखाने यांना देण्यांत येणारीं औषधें उपकरणें आणि साधनसामुग्री इत्यादींमध्यें वाढ करणेंः-**

ही एक सर्वसाधारण योजना आहे. चालू वर्षी रु. ०·५० लाखांची तरतूद केली आहे.

**क्षयरोग नियंत्रणः-**

ह्या योजनेनुसार, नाशिक, सोलापूर, यवतमाळ, वर्धा; अकोला, जालना औरंगाबाद आणि परभणी येथें क्षयरोग चिकित्सालयें उघडण्याबाबत सरकारनें अगोदरच उपाययोजना केली आहे. औंध कॅंप येथील छातीच्या विकाराच्या रुग्णालयामध्यें आणखी १७५ रुग्णशय्यांची सोय करण्यांत आली आहे आणि गोंदिया येथील क्षयरोग रुग्णालयांत ५० क्षयरोग्यांच्या कायम रुग्णशय्या ठेवण्याची सोयहि करण्यांत आली आहे. वर्धा, चांदा आणि अमरावती येथील मुलकी रुग्णालयांत क्षयरोग्यांच्या रुग्णशय्यांची सोय करण्यासाठीं इमारती बांधण्याचें काम चालू आहे. अकोला येथील मुलकी रुग्णालयांत, ५० क्षयरोग रुग्णशय्यांची सोय बहुधा लवकरच करण्यांत येईल. यवतमाळ येथील मुलकीं रुग्णालयांत क्षयरोग रुग्णशय्या ठेवण्यासाठीं बांधण्यांत येणाऱ्या इमारतींचे नकाशे व अंदाज यांना प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

**गुप्तरोग चिकित्सालयेंः-**

चांदा येथें, १९६०-६१ मध्यें गुप्तरोग चिकित्सालय स्थापन करण्यांत येईल. अमरावती येथें गुप्तरोग चिकित्सालयाची इमारत बांधण्याचें काम लवकरच सुरु करण्यांत येईल. चालू वर्षी, ह्या योजनेसाठीं रु. ०·४६ लाखांची तरतूद केली आहे.

**प्रयोगशाळेचीं बांधकामेंः-**

कोल्हापूरच्या मुलकी रुग्णालयांतील लोकस्वास्थ्य प्रयोग शाळेचे नकाशे व अंदाज यांना प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे. जागेच्या प्रश्नावर विचार चालू आहे. वर्धा, बुलढाणा

आणि यवतमाळ येथें जिल्हा प्रयोगशाळांच्या इमारती बांधण्याचें काम चालू आहे. चालू वर्षी ह्या योजनेकरितां रु. १·४७ लाखांची तरतूद केली आहे.

**सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांतील अवैतनिक जागांचें पूर्णकालिक जागांत रूपांतर करणें:—**

ह्या योजनेनुसार, अवैतनिक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या १२ जागांचें पूर्णकालिक डॉक्टर व शिक्षक ह्यांच्या जागांत रूपांतर केलें आहे. ह्यांपैकीं ६ जागा पुणें येथील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय व ६ जागा मुम्बईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजांतील आहेत. सदरहू जागांवर नेमणुका करण्याच्या प्रश्नांवर विचार चालू आहे. यासाठीं चालू वर्षी रु १·२१ लाखांची तरतूद केली आहे.

वैद्यकीय संशोधनासाठीं वैद्यकीय महाविद्यालयें व रुग्णालयें ह्यांतील विभागांचा दर्जा वाढविणें.

मुम्बईचें ग्रँट मेडिकल कॉलेज व पुणें येथील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, ह्यांना जोडलेलीं वैद्यकीय महाविद्यालयें आणि रुग्णालयें यांमधील रोगनिदान विभागांचा दर्जा वाढविण्यांत आला असून तो कायम राखण्यांत आला आहे. चालू वर्षी, रु. ०·५३ लाखांची तरतूद केली आहे.

**पुणें येथील वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय यांच्या इमारतींचें बांधकाम पूर्ण करणें:—**

चालू वर्षी ह्या योजनेकरितां रु. १·३३ लाखांची तरतूद केली आहे.

**औरंगाबाद येथें वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करणें:—**

औरंगाबाद येथें वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्यांत आली आहे. नवीन वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतींचें बांधकाम चालू आहे. चालू वर्षी ह्या योजनेकरितां रु. ३१·४० लाखांची तरतूद केली आहे.

**एम्. बी. बी. एस्.ची अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठीं परीक्षोत्तर प्रशिक्षण देण्याच्या सोयी:—**

ही योजना मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजांत सुरू करण्यांत आली असून ती पुण्याच्या बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयांत सुरु करण्यांत येईल. चालू वर्षी, रु. १·५२ लाखांची तरतूद केली आहे.

**मुंबईमध्यें परिचर्या महाविद्यालयाची स्थापना:—**

२१ जून १९६० रोजीं केंद्रीय स्वास्थ्य मंत्र्यांच्या हस्तें महाराष्ट्रांत पहिल्या राज्य परिचर्या महाविद्यालयाचें उद्घाटन करण्यांत आलें. भारतांत याप्रकारचें हें तिसरें महाविद्यालय आहे.

परिचारिका, सहाय्यक परिचारिका-सुईणी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आणि क्ष-किरण तंत्रज्ञ, इत्यादींचें प्रशिक्षण निरनिराळ्या वर्गांत मोडणाऱ्या वैद्यकीय नोकरवर्गाला प्रशिक्षण देण्याचें कार्य या वर्षांत चालू ठेवलें जाईल.

**फार्मसीविषयक डिप्लोमा मिळविण्यासाठी तद्विषयक इंटरमिजिएट पाठ्यक्रमाची संस्था:—**

मुम्बईत हा पाठ्यक्रम अगोदरच सुरू करण्यांत आला आहे. चालू वर्षी, रु. ०·३० लाखांची तरतूद केली आहे.

### केंद्रपुरस्कृत योजना

**नागपूर येथें मॅक्सिलोफेशियल शस्त्रक्रिया केंद्र:—**

हें केंद्र अगोदरच स्थापन करण्यांत आलें आहे. चालू वर्षी, ह्या योजनेकरितां रु. ०·७९ लाखांची तरतूद केली आहे.

**क्षयरोग्यांना वेगळे ठेवण्यासाठीं रुग्णशय्या:—**

औंध कॅंप येथील छातीच्या रोगांच्या रुग्णालयांत क्षयरोग्यांसाठीं ५० वेगळ्या रुग्णशय्यांची व्यवस्था केली आहे. सोलापूर येथील मुलकी रुग्णालयांत ५० रुग्णशय्या ठेवण्यांत येतील. चालू वर्षी, रु. १·५१ लाखांची तरतूद केली आहे. सोलापूरच्या मुलकी रुग्णालयांतील बांधकाम सुरू आहे.

**दंत महाविद्यालय:—**

मुंबई येथील सर सी. इ. एम्. दंत महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचें बांधकाम चालू आहे. नागपूर येथील दंत महाविद्यालयाच्या इमारतीचे सुधारलेले नकाशे व अंदाज यांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत सरकारचा विचार चालू आहे. ह्या योजनेकरितां रु. १८·९० लाखांची तरतूद केली आहे.

**मुंबईच्या जे. जे. ग्रूप ऑफ हॉस्पिटलमध्यें बाल मार्गदर्शन चिकित्सालय आणि बालरोगचिकित्सा केंद्र स्थापन करणें :—**

मुम्बई येथील ग्रँट मेडीकल कॉलेजामध्यें बालरोग चिकित्सेच्या दर्जा वाढविलेल्या विभागांत संचालकाची नेमणूक करण्यांत आली आहे. केंद्राच्या इमारतीचें बांधकाम चालू आहे. चालू वर्षी त्यासाठीं रु. ४·९९ लाखांची तरतूद केली आहे.

**मुंबईच्या जे. जे. ग्रूप ऑफ हॉस्पिटलसमध्यें आहारतज्ञांची नेमणूक व नियताहार-स्वयंपाक-गृहाची स्थापना :—**

स्वयंपाकगृहाचें बांधकाम अद्याप सुरू झालेलें नाहीं. चालू वर्षी रु. १८,००० इतक्या रकमेची तरतूद केली आहे.

## आयुर्वेदाचा विकास

ह्या, आयुर्वेदासारख्या देशी औषधी पद्धतीला उत्तेजन देण्यासाठीं योजनेंत समाविष्ट केलेल्या कांहीं प्रमुख योजनांत आयुर्वेदिक वस्तुसंग्रहालय, औषधी द्रव्यांचें संशोधन करण्याची प्रयोगशाळा स्थापन करणें, एम्. ए. पोद्दार हॉस्पिटलकरितां ग्रन्थालय, आयुर्वेदाच्या शिक्षण संस्थांना अनुदानें, आयुर्वेदीय औषधी द्रव्यांचा व वनस्पतींचा औषधें तयार करण्याठीं सांठा करणें आणि आयुर्वेदाची पाठ्यपुस्तकें तयार करणें या योजनांचा समावेश होतो.

एम्. ए. पोद्दार हॉस्पिटलच्या आवारांत आयुर्वेदीय वस्तुसंग्रहालय, प्रयोगशाळा, व संदर्भ ग्रंथालय, यांच्यासाठीं इमारत बांधण्याचें काम चालू आहे. आयुर्वेदाचें शिक्षण देणाऱ्या संस्थांना त्यांच्या कार्याचा विस्तार करण्यासाठीं सरकारकडून अनुदानें देण्यांत येतात. जागतिक स्वास्थ्य संस्थेमध्यें पंचकर्म उपचार पद्धतीवर चिकित्साविषयक संशोधन चालू ठेवलें आहे. नागपूर येथें १०० रुग्णशय्यांची सोय असलेलें आयुर्वेदिक रुग्णालय सुरू करण्याचें योजिलें आहे. रुग्णालयाचें काम सुरू आहे. नांदेड येथील आयुर्वेदिक महाविद्यालय यापूर्वीच सुरू करण्यांत आलें आहे. आयुर्वेदिक विभागाच्या विविध कार्यासाठीं रु. १८·२५ लाखांची तरतूद केली आहे.

## इतर योजना

गरीबांच्या घरापर्यंत निष्णात तज्ञांचा वैद्यकीय सल्ला पोहोंचविण्यासाठीं सरकार नेत्रोपचार, शस्त्रक्रिया व दंतोपचार शिबिरें भरवीत आहे. ही शिबिरें आजूबाजूच्या प्रदेशांतून सहज जाण्यायेण्याच्या सोयी असलेल्या एखाद्या मध्यवर्ती म्हणून निवडलेल्या शहरांत भरविलीं जातात. ह्या शिबिरांमुळें स्थानिक जनतेंत बराच उत्साह निर्माण झाला आहे व तीं फार लोकप्रिय झालीं आहेत. चालू वर्षी, अशाच प्रकारचीं शिबिरें भरविण्यांत येतील.

**कामगार राज्य विमा योजना:—**

कामगार राज्य विमा योजना अधिनियम सध्यां बृहन्मुंबई, नागपूर, अकोला व हिंगणघाट या ठिकाणीं लागू केलेला आहे. ह्या योजनेन्वयें (१) खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांकडून घरी जाऊन उपचार करण्याच्या कार्याचा अंतर्भाव असलेली सर्वसाधारण वैद्यकीय सेवा (२) औषधांचा मोफत पुरवठा (३) रुग्णालय-विषयक सोय इ० सर्वसमावेशक वैद्यकीय सोयींदाखलच्या आणि कामगार राज्य विमा अधिनियमान्वयें विमा उतरविलेल्या औद्योगिक कामगारांना रोख रक्कम देण्यादाखलच्या तरतुदी करण्यांत आल्या आहेत. ही योजना सोलापूर येथील कामगारांना आणि मुंबई व सोलापूर येथील विमा उतरविलेल्या कामगारांच्या कुटुंबियांनाहि लागू करण्याचें योजिलें आहे. बृहन्मुंबई आणि विदर्भ प्रदेशांतील अनुक्रमें, सुमारें ५०,००० आणि ३४,००० कामगारांना ही योजना लागू आहे. या योजनेनुसार, विमा उतरविलेल्या कामगारांवर उपचार करण्यांसाठीं मुंबई येथें अंदाजें रु. १ कोटी इतका खर्च करून प्रत्येकीं १५० रुग्णशय्या असलेली दोन सर्वसाधारण रुग्णालयें आणि सुमारें २५० रुग्णाशय्यांची सोय असलेलें एक क्षयरोग रुग्णालय, ह्याप्रमाणें तीन रुग्णालयें बांध-यांची तरतूद केली आहे. योजनेखालील वैद्यकीय मदतीचा आवर्तक खर्च कामगार राज्य विमा

कॉर्पोरेशन व राज्यसरकार ह्यामध्यें ३:१ ह्या प्रमाणांत सध्यां वाटून घेण्यांत येतो, आणि कामगारांच्या कुटुंबांना ही योजना लागू झाल्यावर तो ७:१ ह्या प्रमाणांत वाटून घेण्यांत येईल.

बृहन्मुंबई आणि त्याच्या आसपासच्या प्रदेशाकरितां, कामगार राज्यविमा योजनेनुसार विमा उतरविणाऱ्या, क्षयरोग झालेल्या लोकांकरितां, २५० रुग्णशय्या राखून ठेवण्यास सरकारनें मंजुरी दिली आहे. गरजा भागविण्यासाठीं २५० रुग्णशय्या अपुऱ्या असल्यामुळें, आतां अशा इसमांकरितां आणखी २५० क्षयरोग रुग्णशय्याकरितां मंजुरी दिली असून, रुग्णशय्यांची एकूण संख्या आतां ५०० इतकी झाली आहे.

## अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व मागासलेले वर्ग यांचें कल्याणः—

ह्या योजनेनुसार, ६ फिरत्या दवाखान्याद्वारें वैद्यकीय मदतीची सोय करण्याचें आणि वैद्यकीय मदतीचें काम स्वेच्छेनें करणाऱ्या संस्थांना अनुदान सहाय्य देखील देण्याचें योजिलें आहे. सर्व ६ दवाखाने उघडण्यांत आले आहेत. चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत आवश्यक ती तरतूद करण्यांत आली आहे.

## लोकस्वास्थ्यः—

सांथीच्या व जंतुमुळें प्रसार होणाऱ्या रोगांचें नियंत्रण, कांहीं रोगांची प्रतिबंधक लस टोंचणें व विशेषतः प्रसूति, बालस्वास्थ्य व कुटुम्ब नियोजन आदि करून रोगनिवारक व प्रतिबंधक वैद्यकीय सहाय्यासाठीं एकत्रित तरतूद करणें, कुष्ठरोगनियंत्रण, पाणीपुरवठ्याचें निर्जंतुकीकरण, सभोंवतालची साफसफाई, यात्रा व उत्सवप्रसंगीं साफसफाई, जन्ममृत्यूंच्या आंकडेवारीची सुधारणा, निरनिराळ्या वर्गांच्या आरोग्यविषयक नोकरवर्गाचें प्रशिक्षण, अन्नभेसळीला प्रतिबंध, हीं लोकस्वास्थ्य विभागाची मुख्य कार्यें आहेत.

ह्या विभागानें, निरनिराळ्या कार्यांचा विकास करण्याकरितां हातीं घेतलेल्या योजना, खालीं थोडक्यांत वर्णन केल्याप्रमाणें आहेतः—

## द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजना किंवा प्रकल्प

### जिल्हा स्वास्थ्य केंद्राबाबतच्या योजनांची पुनर्घटनाः—

पश्चिम महाराष्ट्राच्या दोन जिल्ह्यांत, विदर्भाच्या आठ जिल्ह्यांत आणि मराठवाड्याच्या ४ जिल्ह्यांत ही योजना सुरू करण्यांत आली आहे. मराठवाड्याच्या उरलेल्या जिल्ह्यांत म्हणजेच उस्मानाबाद जिल्ह्यांत ही योजना सुरू करण्यांत येईल. चालू वर्षामध्यें, ह्या योजनेकरितां रु. ५·८८ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

### फिरत्या रुग्णालय पथकांची स्थापनाः—

ह्या योजनेनुसार, आतांपर्यंत विदर्भांत २ पथकांची आणि मराठवाड्यांत एका पथकाची स्थापना करण्यांत आली आहे. चालू वर्षामध्यें आणखी एका पथकाची स्थापना करण्यांत येईल. सन १९६०–६१ करितां रु. ३·४१ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

### प्राथमिक स्वास्थ्य पथकेंः—

प्राथमिक स्वास्थ केंद्रासंबंधीं, राज्य योजनेनुसार उघडण्यांत आलेली १९ केंद्रें चालू ठेवण्यांत येतील. समाज विकास कार्यक्रमानुसार १९६०-६१ मध्यें १४ केंद्रें उघडण्यांत येतील अशी अपेक्षा असून, समाज विकास कार्यक्रमानुसार उघडण्यांत आलेल्या केंद्रांची एकूण संख्या २५२ इतकी भरेल. ह्या योजनेकरितां रु. १४·८३ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

बी. सी. जी. लस टोंचण्याबाबतच्या कार्यक्रमानुसार, अगोदरच स्थापन केलेली बी. सी. जी. गट आणि ३ प्रसिद्धी पथकें चालू ठेवण्यांत येतील. ह्या योजनेकरिता रु. ६·०४ लाख इतक्या रकमेची तरतूद केलेली आहे.

### कुष्ठरोगाबाबत सुधारलेली योजनाः—

कुष्ठरोग नियंत्रणाच्या योजनेनुसार, अगोदरच स्थापन करण्यांत आलेली, १७ कुष्ठरोग निवारक आणि ६३ एस. इ. टी. पथकें, चालू ठेवण्यांत येतील. त्याशिवाय, १९६०-६१ मध्यें, ५ उपकेंद्रें आणि ५३ एस. इ. टी. पथकें स्थापन करण्यांत येतील. वैद्यकीय पदवीधरांना कुष्ठरोगाबाबत उच्च प्रशिक्षण देण्याच्या कार्यक्रमाची व्यवस्था नागपूर येथील मेडिकल कॉलेजमध्यें करण्यांत

आली आहे. कुष्ठरोगाबाबतच्या योजनाकरितां एकूण रु. १५·२६ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

**मलेरिया निर्मूलन कार्यक्रमः—**

भारत सरकारनें आंखून दिलेल्या धोरणानुसार, सुरू करण्यांत आलेल्या मलेरिया निर्मूलनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमानुसार, महाराष्ट्रांत, सांथीची २२ पथकें व १० हायपोएन्डेमिक पथकें आधींच स्थापन करण्यांत आली आहेत. ही सर्व ३२ पथकें चालूं ठेवण्यांत येतील आणि १९६०–६१ मध्यें पाहणी करणारी १३ पथकें स्थापन करण्यांत येतील. याशिवाय पाहणी करणाऱ्या संघटनेंखालीं संपूर्ण महाराष्ट्र व्याप्त व्हावा म्हणून, योग्यवेळीं आणखी १९ पाहणी करणारी पथकें स्थापन करण्यांत येतील. मनुष्याच्या शरीरांतील उरल्यासुरल्या मलेरियाच्या जंतूंचें निर्मूलन करण्याच्या दृष्टीनें ते शोधून काढणें, हें ह्या पाहणी करणाऱ्या संघटनेचें प्राथमिक उद्दिष्ट आहे.

चालूं वर्षामध्यें, ह्या कार्यक्रमाकरितां रु. ६१·१० लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

**हस्तिरोग नियंत्रणाचा राष्ट्रीय कार्यक्रमः—**

ह्या कार्यक्रमानुसार आधींच स्थापन करण्यांत आलेली ४ आणि ३ पथकें चालूं ठेवण्यांत येतील. अंदाजपत्रकांत रु. ३·०४ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

**स्वास्थ्यविषयक नोकरवर्गाचें प्रशिक्षणः—**

प्रशिक्षणाच्या कार्यक्रमानुसार, नागपूर येथील स्वास्थ्य निरीक्षकांची शाळा चालूं ठेवण्यांत येईल. पालघर, शिरपूर आणि सावनेर येथील प्रशिक्षण स्वास्थ्य पथकांत देण्यांत येणारे लोकस्वास्थ्याभिमुख प्रशिक्षण चालूं ठेवण्यांत येईल. निरनिराळ्या प्राथमिक स्वास्थ्य केंद्रांत दायांना प्रशिक्षण देण्याची योजना आणि त्याचप्रमाणें पुणें आणि नागपूर येथील आरोग्य निरीक्षकांकरितां उघडण्यांत आलेल्या वर्गामध्यें आरोग्य निरीक्षकांच्या प्रशिक्षणाची योजना सुद्धां चालूं ठेवण्यांत येईल. औरंगाबादच्या वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ग्रामीण औषधोपचार व स्वच्छता यांचें प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीनें खुल्दाबाद येथें एक स्वास्थ्य पथक स्थापन करण्याचें योजिलें असून त्या पथकाच्या इमारतीचें बांधकाम १९६०-६१ मध्यें हातीं घेण्यांत येईल.

लोकस्वास्थ्य प्रशिक्षणाच्या निरनिराळ्या कार्यक्रमाच्या गरजा भागविण्यासाठीं, नागपूर येथें लोक-स्वास्थ्यविषयक संस्था स्थापन करण्यांत आली आहे. लोकस्वास्थ्याभिमुख प्रशिक्षण, आरोग्य निरीक्षकांचें प्रशिक्षण आणि स्वास्थ्यविषयक प्रशिक्षण देण्याचें काम या संस्थेनें सध्यां हातीं घेतलें आहे. १९६०-६१ मध्यें, लोकस्वास्थ्यांतील पदव्युत्तर डिप्लोमाकरितां प्रशिक्षण देण्याचें काम ही संस्था हातीं घेईल. ह्या योजनेकरितां एकूण ०·७८ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**स्वास्थ्य शिक्षणाबाबतच्या सोयींची वाढ करणेंः—**

नागपूर येथील स्वास्थ्य शिक्षण ब्यूरो आणि स्वास्थ्य विषयक वस्तुसंग्रहालय, आणि औरंगाबाद येथील स्वास्थ्य शिक्षण पथक आणि मराठवाडा प्रदेशांतील शालेय स्वास्थ्य सेवा याद्वारें स्वास्थ्य शिक्षणाच्या कार्यक्रमाचा विस्तार करण्याची योजना चालूं ठेवण्यांत येईल.

चालूं वर्षाच्या अंदाजपत्रकांत रु. ०·२० लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

**जन्ममृत्यूंची आंकडेवारी ठेवणाऱ्या आणि सांथीच्या रोगांबाबत अभ्यास करणाऱ्या ब्यूरोची स्थापना :—**

जागतिक स्वास्थ्य संघटना, भारत सरकार नागपूर कॉर्पोरेशन आणि राज्य सरकार ह्याच्या सहकार्यानें, नागपूर येथील जन्ममृत्यूंची आंकडेवारी ठेवणारा आणि सांथीच्या रोगाबाबत अभ्यास करणारा ब्यूरो, कार्य करीत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेंमधील आणि निरनिराळ्या राज्य सरकारच्या हाताखालील नोकरवर्गास, जन्ममृत्यूची आंकडेवारी गोळा करण्याच्या आणि तीं एकत्रित करण्याच्या शास्त्रशुद्ध आणि सुधारलेल्या पद्धतीचें प्रशिक्षण देण्याचें काम ह्या ब्यूरोकडून हातीं घेण्यांत येतें.

**कुटुंब नियोजनः-**

कुटुम्ब नियोजन कार्यक्रमानुसार, अगोदरच सुरू करण्यांत आलेल्या ८३ केंद्रांच्या जोडीस आणखी ६२ नवीन ग्रामीण केंद्रें १९६०-६१ मध्यें सुरूं करण्यांत येऊन ती पुढें चालूं ठेवण्यांत येतील. पालघर, शिरुर, सावनेर येथील स्वास्थ्य पथकांतील, पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई येथील वैद्यकीय महाविद्यालयांतील आणि पुणे, नागपूर येथील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रामधील, कुटुम्ब नियोजन केंद्रें चालूं ठेवण्यांत येतील. याशिवाय शस्त्रक्रियेद्वारें कुटुम्ब नियोजन करण्याची योजना लोकप्रिय करण्यासाठीं, शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या इसमांना उत्तेजन देण्याची योजना सुरूं केली जाईल. चालूं वर्षाकरितां रु. ९·८३ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

**प्रयोगशाळेबाबतची कामेंः—**

पुणे आणि नागपूर येथें लोक स्वास्थ्यविषयक प्रयोगशाळा आणि अमरावती येथें अन्नविषयक प्रयोगशाळेची स्थापना करण्यांत आली असून त्या चालूं ठेवण्यांत आल्या आहेत. ह्या प्रयोगशाळांत पाण्याच्या नमुन्याचें आणि अन्नामधील भेसळी करण्यास प्रतिबंध करण्यासाठीं अन्नाच्या नमुन्याचें पृथःक्करण करण्याकरितां प्रयोगशाळेंतील आवश्यक त्या सोयी उपलब्ध आहेत. पुणें येथील लोकस्वास्थ्य प्रयोगशाळा ही देखील पाणी आणि अन्न यांच्या नमुन्यांचें पृथःक्करण करण्याच्या पद्धतीबाबत आणि तंत्राबाबत संशोधन करतें.

## पाणीपुरवठा

**पाणीपुरवठ्याबाबत नगरपालिकांच्या योजनाः—**

ह्या योजनेकरितां पंचवार्षिक योजनेंत रु. २७५·६७ लाख इतकी तरतूद केली आहे. ही योजना जुन्या मुंबई प्रदेशास लागूं आहे. पूर्वीच्या मध्यप्रदेश आणि हैद्राबाद सरकारच्या योजनेमध्यें अशा तऱ्हेची तरतूद करण्यांत आली नव्हती. ह्या योजनेनुसार, जुन्या मुंबई राज्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांना, पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण योजना यांसाठीं त्यांनीं केलेला खर्च भागविण्यासाठीं, बरो नगरपालिकांना खर्चाच्या ३३⅓ टक्के, जिल्हा नगरपालिकांना आणि ग्रामपंचायतींना ५० टक्के या दरानें अनुदानें आणि कर्जे देण्यांत येतात. आणि ज्या संस्थांना त्यांच्या खर्चाचा हिस्सा पुरा करणें शक्य होत नाहीं त्यांना आवश्यक असेल त्यावेळीं कर्जे देण्यांत येतात. मध्य प्रदेश सरकारनें अशा योजनाकरितां कोणतीहि अनुदानें दिली नव्हती. हैदराबाद सरकार, अशा योजनांची अम्मलबजावणी संपूर्ण सरकारी खर्चानें करून त्यानंतर अशा योजना संबंधित नगरपालिकेच्या हातीं सोंपवीत असें आणि खर्चाचा कांहीं भाग कर्ज मानून तो संबंधित नगरपालिकेकडून वसूल करीत असे. पूर्वीच्या मुंबई सरकारचेसुध्दां असेंच धोरण चालूं होतें.

सध्यां जुन्या मुंबई राज्याच्या प्रदेशांतील महाराष्ट्र प्रदेशांत रु. ४९३·३८ लाख इतक्या अंदाजे खर्चाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणीपुरवठा आणि जलनिस्सारणाच्या ८९ योजनांची आणि विदर्भात रु. १५० लाखापेक्षां जास्त खर्च येणाऱ्या नगरपालिकेच्या १४ पाणींपुरवठ्याच्या योजनांची अंमलबजावणी चालूं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नांतून किंवा खुल्या बाजारांत कर्जे उभारून तरतूद केलेल्या रकमा वगळतां, नवीन मुंबई राज्यांतील सर्व प्रदेशांतील संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदानें आणि कर्जे देण्याकरितां, सरकारला सुमारें रु. ३·६५ लाख इतका खर्च करावा लागला. ह्या योजनांवरील खर्च पंचवार्षिक योजनेमधील तरतुदींपेक्षां जास्त होण्याचा संभव होता म्हणून, पूर्वीच्या मुंबई सरकारच्या मंत्रिमंडळानें आणखी कोणत्याहि योजनेसंबंधी अनुदान किंवा कर्ज यांपैकी कोणत्याहि रीतीनें कसलाच व्यवहार करावयाचा नाहीं असा निर्णय नोव्हेंबर १९५८ मध्यें घेतला होता. तथापि, रु. ७०० लाखांहून अधिक खर्च अपेक्षित असलेल्या पाणीपुरवठ्याच्या आणि जलनिस्सारणाबाबतच्या नगरपालिकेच्या ५३ योजना आणि ग्रामपंचायतीच्या ३० योजनांना स्वास्थ्य मंडळाची संमति मिळाली होती, प्राथमिक तयारी झाली होती. परंतु कर्ज किंवा अनुदानाच्या स्वरुपांत निधी उपलब्ध न झाल्यामुळें त्या योजना अंमलांत येण्यांचे राहिले होते.

त्या योजनासाठीं कांहीं स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या वांट्याचा खर्च देण्यास तयार होत्या. यामुळें त्या योजनाबाबत गेल्या ऑक्टोबरमध्यें मंत्रिमंडळाकडून फेरविचार करण्यांत आला. परंतु सरकारची आर्थिक परिस्थिती आणि द्वितीय पंचवार्षिक योजनेंत तरतूद केल्यापेक्षां, ह्या योजनेवरील झालेला जादा खर्च लक्षांत घेतां; मंत्रिमंडळानें द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत ह्या सर्व योजना गाळून टाकण्याचें ठरविलें आहे.

१३. वर उल्लेख केलेल्या पूर्वीच्या हैद्राबाद सरकारच्या धोरणानुसार, मराठवाड्यांतील नगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी जलसिंचन आणि विद्युत विभागांकडून करण्यांत येते.

महानगरपालिकांना अशा योजनांकरितां, राज्य सरकारकडून कोणतेंही कर्ज किंवा अनुदान देण्यांत येत नाहीं तथापि कॉर्पोरेशनकरितां असलेल्या भारत सरकारच्या राष्ट्रीय पाणी पुरवठा आणि आरोग्यविषयक कार्यक्रमानुसार, भारत सरकारनें पुणें कॉर्पोरेशनच्या आणि नागपूर कॉर्पोरेशनच्या पाणी पुरवठा योजनांना मान्यता दिली आहे. ह्याकरितां, नागपूर कॉर्पोरेशनला पाणी पुरवठ्याच्या योजनेकरितां मंजूर केलेल्या रु. ५५ लाख इतक्या रकमेपैकीं आतां पर्यंत रु. ४० लाख इतक्या रकमेचें कर्ज दिलें असून पुणें कॉर्पोरेशनला रु. २० लाख इतक्या रकमेचें कर्ज देण्यांत आलें आहे. पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारनें कबूल केल्याप्रमाणें नागपूर कॉर्पोरेशनला त्यांच्या जलनिस्सारणाच्या योजनांबाबत रु. ५० लाख इतके अनुदान सहाय्य द्यावयाचें आहे. आतांपर्यंत आम्हीं रु. ३० लाख इतकी रक्कम दिली आहे आणि रु. २० लाखापर्यंतची रक्कम, दर वर्षी लागणाऱ्या खर्चाच्या आधारावर देण्यांत येईल. विदर्भामधील ४ नगरपालिकांना, त्यांच्या पाणी पुरवठ्याच्या योजनांकरितां रु. ४७·६० लाख इतकें कर्ज देण्यांत आलें आहे.

अगोदरच कबूल केल्याप्रमाणें द्यावयाचीं कर्जे आणि अनुदानें यांच्याकरिता १९६०–६१ मध्यें केलेली तरतूद खालील प्रमाणें आहे:—

| | | | रु. |
|---|---|---|---|
| (१) | पाणीपुरवठा आणि जलनिस्सारणाकरितां जुन्या मुम्बई प्रदेशांतील नगरपालिकांना अनुदानें | ... | २३·९० लाख |
| (२) | पाणीपुरवठा आणि जलनिस्सारणाकरितां जुन्या मुम्बई प्रदेशांतील नगरपालिकांना कर्जे | ... | १०·०० लाख |
| (३) | सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंमलबजावणी करण्यांत आलेल्या विदर्भांतील नगरपालिकांना त्यांच्या पाणीपुरवठा योजनांकरितां अनुदानें | ... | ०·४० लाख |
| (४) | नागपूर जलनिस्सारण योजनेकरितां अनुदान | ... | ५·०० लाख |
| (५) | महानगरपालिकांना त्यांच्या पाणीपुरवठा आणि जलनिस्सारणाच्या योजनांकरितां कर्जे | ... | ६०·०० लाख |

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत अंमलबजावणीसाठी "स्वीकृत केलेल्या' आणखी कांहीं योजनांचा त्यांत समावेश करावा कीं नाहीं ह्या प्रश्नानें सध्यां सरकारचें लक्षवेधून घेतले आहे.

**योजनांतर्गत योजना क्र. ६४४:—**

विकास योजनांची तयारी जुन्या मुंबई प्रदेशांतील आणि विदर्भ प्रदेशांतील स्थानिक स्वराज्य संस्थांना, शहरांच्या विकास योजनांची तयारी करण्यांकरितां मदत व्हावी ह्या उद्देशानें, नगर रचना आणि मूल्यांकन विभागांत नोकरवर्ग नेमण्याकरितां पंचवार्षिक योजनेत वांटा म्हणून रु. १८,९८,५०० इतकी रक्कम मंजूर करण्यांत आली आहे. १ एप्रिल १९५७ पासून अंमलांत आलेल्या, १९५४ च्या मुंबई नगर रचना अधिनियमाच्या तरतुदीनुसार, अशा तऱ्हेच्या योजना तयार करण्याकरितां महाराष्ट्रांतील ४५ शहरांची निवड करण्यांत आली आहे. दरवर्षी १० योजना तयार करण्याचें योजिलें आहे. आतांपर्यंत २४ योजना पूर्ण झाल्या असून २१ योजनांचें काम चालू आहे. शहरांची पाहणी इत्यादी बाबतच्या तांत्रिक अडचणीमुळें विदर्भ प्रदेशांतील कामांत अडथळा आला आहे. ह्या योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी

महाराष्ट्र सरकारच्या सल्लागार सर्व्हेअरकडे आहे. ह्या योजनेकरितां १९६०-६१ ह्या अंदाजपत्रकांत रु. २१,१६,४०८ अितक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

**योजनांतर्गत योजना क्र. ७३५--**

महानगरपालिका बरो, आणि जिल्हा नगरपालिका अित्यादींनी प्रस्तावित केलेल्या विकास योजना.

ज्या योजनांकरितां, अितर कोणत्याहि योजनांतर्गत योजनेखालीं सरकारकडून आर्थिक सहाय्य देण्याचें योजिलें नाहीं, अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, विकास योजनांकरितां सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना (महानगरपालिका धरून) कर्जे देण्यासाठीं पंचवार्षिक योजनेमध्यें रु. ५,५४,२६,००० अितक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

अशा प्रकारच्या योजनांतर्गत योजनेनुसार, कर्जे देण्यांस पात्र असलेल्या योजनांचे प्रकार खालील-प्रमाणें आहेत:--

(१) गलीच्छ वस्त्यांचें निर्मूलन करण्याची योजना.

(२) हरिजनांसाठीं गृहनिर्माण योजना.

(३) वैद्यकीय योजना.

(४) लोकस्वास्थ्य योजना.

(५) संकीर्ण योजना.

वर निर्देश केलेल्या (१) आणि (२) या योजनांचा कारभार आतांपर्यंत कामगार आणि समाज कल्याण विभागाकडून पाहिला जात होता. आणि रु. ३,४०·८० लाख रुपयांची रक्कम त्या विभागाकडे सुपूर्त करण्यांत आली होती, बाकीची २१३·४६ लाख रुपयाची रक्कम ह्या विभागाकडे सुपूर्त करण्यांत आली होतीं. वर निर्देश केलेल्या बाब (३) ते (५) करितां असलेल्या २१३·४६ लाख रुपयांपैकीं आतांपर्यंत सर्व प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्जे देण्यासाठीं दरवर्षी खालील खर्च करण्यांत आला आहे :—

| | रुपयें |
|---|---|
| १९५६-५७ | २८,१०,९५७ |
| १९५७-५८ | २८,९२,४८० |
| १९५८-५९ | २७,६०,५२३ |
| १९५९-६० | ५८,००,००० |
| | १,३८,६३,९४० |

महाराष्ट्रांतील स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्जे देण्याकरितां, १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत रु. १६,००,००० इतक्या रकमेची तरतूद केलेली आहे. वरील ('अ'मध्यें) निर्देश केलेल्या योजनान्तर्गत योजना क्र. ५६४ यावरील झालेला जादा खर्च भागविण्याकरितां, नोव्हेंबर १९५८ मध्यें पूर्वीच्या मुंबई सरकारच्या मंत्रीमंडळानें घेतलेल्या निर्णयानुसार रु. ८० लाख इतकी रक्कम अगोदरच राखून ठेवण्यांत आली आहे.

**योजनान्तर्गत योजना क्र. ७३८:-**

**नगररचनेसाठीं नगरपालिकांना कर्जे (विदर्भ)—**

ह्या योजनेकरितां पंचवार्षिक योजनेंत नियुक्त केलेली रक्कम रु. १,१३,२४,००० इतकी आहे. या योजनेखाली विदर्भ प्रदेशांतील नगरपालिकाना त्यांच्या खालील योजनांकरितां कर्जे दिली जातात :-

( १ ) विद्यमान रस्ते रुन्द करणें आणि रस्ते जोडण्याची योग्य ती तरतूद करणें.

( २ ) बागांची आणि खेळण्यासाठीं मैदानांची तरतूद करणें.

( ३ ) खडीचें रस्ते तयार करणें आणि उघडया गटारांची व्यवस्था करणें.

( ४ ) नळाद्वारें पाणी पुरवठा करण्याची तरतूद करणें आणि जमिनीखालील जलनिस्सारणाची व्यवस्था करण्याच्या योजनेबाबत तरतूद करणें.

विदर्भ प्रदेशांतील नगरपालिका या कर्जाचा लाभ घेण्यास पुढें येत आहेत. गेल्या वर्षी कर्जे देण्याकरितां रु. २९ लाख इतका खर्च झाला या कारणाकरितां १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत १७ लाख इतक्या रकमेची तरतूद केलेली आहे.

## गृहनिर्माण

### I कमी उत्पन्नाच्या गटासाठीं गृहनिर्माण योजना–

१९५४ च्या अखेर ही योजना भारत सरकारकडून पुरस्कृत करण्यांत आली आणि व्यक्तींना, स्थानिक स्वराज संस्थांना, सहकारी गृहनिर्माण मंडळाच्या सदस्यांना, शैक्षणिक व लोकस्वास्थ संस्थांना घरें बांधण्यासाटीं कर्ज देणें हें या योजनेचें उद्दिष्ट आहे. ६,००० रु. च्यावर वार्षिक उत्पन्न नसणाऱ्या लोकांपुरतीच ही योजना मर्यादित करण्यांत आली आहे. राज्य सरकारला आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना विकण्यासाठी किंवा आपल्या नोकरांना किंवा ' ना नफा ना तोटा ' या तत्वावर लोकांना भाड्यानें देण्यासाठीं घरें बांधण्याकरितां परवानगी देता येईल, अशी १९५७ मध्यें भारत सरकारनें या योजनेंत सुधारणा केली आहे. याबाबत कर्जरूपानें देण्यांत येणारी जास्तींत जास्त मदत घराच्या अंदाजे खर्चाच्या ८० टक्केपर्यंत किंवा ८००० रुपये इतकी मर्यादित असून या ८००० रुपयांत जमिनीच्या किंमतीचा अंतर्भाव केलेला आहे. कर्जाच्या परतफेडीची कमाल मुदत ३० वर्षांची आहे.

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत भाड्यानें द्यावयाची घरें बांधण्याबाबतच्या योजनेखालीं मंत्रीमंडळाच्या गृहनिर्माण उपसमितीनें मंडळाकडून मुंबईत २,००० घरें आणि पुणें येथें ७०० घरें बांधण्याची शिफारस केली आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळानें मुंबईत " तुम्हींच घरमालक व्हा " या योजनेखाली ११८ घरें आणि " ठेवी व भाडें " पद्धतीच्या गृहनिर्माण योजनेखालीं ५,००० घरें बांधली आहेत. चालू वर्षांत, गोरेगांव येथें ३२८ घरें बांधण्याकरितां रु. २९·३२ लाख एवढ्या रकमेची तरतूद केली आहे. (काम चालू आहे.) आणि पुणें येथें २९६ घरें बांधण्याची तरतूद केली आहे, त्यांपैकीं पुणे येथील ९६ घरांना आतापर्यंत मंजुरी देण्यांत आली आहे.

आतापर्यंत ही योजना सुरू झाल्यापासून ५,६१९ घरें बांधून झाली असून त्यांच्यासाठीं सप्टेंबर १९५९ पर्यंत रु. ५,०५९·१२ लाख इतका खर्च झाला आहे. चालू वर्षी एकूण रु. ६०·५० लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे. (त्यांपैकीं खाजगी व्यक्तीकरितां, संस्था, सहकारी संस्था इत्यादी करितां रु. ३१·२५ लाख इतके रुपये आहेत आणि महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाकरितां २९·३२ लाख रुपये आहेत.) या रकमेंतून चालू वर्षांत ७५.७ घरें बांधली जाण्याची शक्यता आहे.

### औद्योगिक गृहनिर्माण :—

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधींतील अर्थ सहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजनेची समाधानकारक प्रगति झाली आहे. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या चार वर्षांच्या कालावधींत एकूण रु. ५,६०·७३ लाख एवढा खर्च करून जवळ जवळ १०,७९४ घरें बांधून पूर्ण झाली आहेत. १९६०–६१ मध्यें ४,६७२ घरें बांधण्याचें योजिलें आहे आणि जर भारत सरकारनें, द्वितीय पंचवार्षिक योजनेंत नियुक्त केलेली कमाल मर्यादा वाढविण्यास संमति दिली तर, या योजनेखालीं जादा घरें बांधण्याचें काम देखील हातीं घेण्यासाठीं रु. २७१·६० लाख एवढ्या रकमेची तरतूद केलेली आहे.

खाजगी मालकांनी सुरू केलेल्या प्रकल्पासंबंधीत अर्थ सहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजनेची अंमलबजावणी, सप्टेंबर १९५८ मध्यें भारत सरकारकडून या सरकारकडे तब्दील करण्यांत आल्यामुळें, या सरकारनें महाराष्ट्रांत २,३२२ गाळे बांधण्याची तरतूद केलेले १४ प्रकल्प आणि त्यासाठीं रु. १२४ लाख एवढा खर्च मंजूर केला आहे, रु. ६६·६७ लाख एवढ्या अंदाजी खर्चाचे १,८४१ गाळे बांधण्याकरितां तरतूद असलेल्या आणखी १४ प्रकल्पासंबंधी विचार चालू आहे. १९६०-६१ च्या अंदाज पत्रकांत कर्ज म्हणून २५·५० लाख रुपये अर्थ सहाय्य आणि १२·९४ लाख रुपये देण्याकरितां तरतूद करण्याचें योजिलें आहे. या निधीसाठीं सरतेशेवटीं भारत सरकारकडून तरतूद केली जाईल.

**गलिच्छ वस्त्यांचें निर्मूलन करण्याची भारत सरकारची योजना :—**

गलिच्छ वस्त्यांचें निर्मूलन भारत सरकारच्या करण्याच्या योजनेन्वयें, संयुक्त मुंबई राज्याच्या द्वितीय पंचवार्षिक योजनेंत नकाशे आणि अंदाज मंजूर करण्यासाठीं केलेली ४२९ लाखाची तरतूद ६२९·३३ लाख रु. पर्यंतची वाढविली आहे. मात्र, द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालांत प्रत्यक्ष खर्च हा पूर्वीच्या रु. ४२९ लाखाच्या तरतुदीहून जास्त होता कामा नये.

महाराष्ट्र राज्याकरितां रु. ५३३·६४ लाख एवढ्या खर्चाचें १२,२८८ गाळ्यांचें बांधकाम करण्याकरितां आणि १,२२८ प्लॉट्सचा विकास करण्याकरितां या योजनेखाली प्रकल्प मंजूर केले आहेत.

१९६०–६१ च्या अंदाज पत्रकांत या योजनेखाली स्थानिक स्वराज्य संस्थांना दान देण्याकरितां ५६·१६ लाख रू. कर्ज म्हणून आणि ७१·७८ लाख रु. अर्थसहाय्य म्हणून देण्यासाठीं तरतूद केली आहे. गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करण्याच्या योजनेच्या शर्तीनुसार, भारत सरकारकडून ५६·१६ लाख रु. कर्ज म्हणून आणि ५६·३० लाख रु. अर्थ सहाय्य म्हणून मिळण्याची अपेक्षा आहे. यामुळे राज्य सरकारला अर्थ सहाय्याबाबत रु. १५·४८ लाख एवढा नक्की खर्च येईल.

**(२) झोंपड्यांत रहाणाऱ्यांसाठीं घरें बांधण्याची योजना :—**

मुंबई शहरांत आणि उपनगरांत बरीच ( जवळ जवळ २५,००० ) कुटुंबें ही; मुंबई महा नगरपालिकेच्या किंवा सरकारच्या मालकीच्या जमिनींवर अनधिकृतपणें बांधलेल्या झोंपड्यांत रहात असतात. या कुटुंबांची परिस्थिती ही नेहमी शहराच्या गलिच्छ वस्त्यांत रहाणाऱ्या कुटुंबांसारखीच आहे. परंतु त्यांची आर्थिक परिस्थिती इतकी वाईट आहे कीं, गलिच्छ वस्त्यांचें निर्मूलन करण्याच्या भारत सरकारच्या योजनेखालीं ठरविण्यांत आलेले अर्थसहाय्यित भाडें देणेंहि त्यांना शक्य होत नाहीं. या जमीनींवर अनधिकृतपणें उभारलेल्या झोपडयांत या कुटुंबांना बेमुदत राहू देता येणार नाहीं.

या कुटुंबांना स्वस्त भाडयाच्या जागेची सोय करण्याकरितां, गलिच्छ वस्त्यांचें निर्मूलन करण्याच्या योजनेची १ ली अवस्था म्हणून या झोपडयांत रहाणाऱ्यांसाठीं ५,९६६ गाळे बांधण्याकरितां रु. २०९ लाख एवढ्या रकमेचे अंदाज व नकाशे ह्यांस, सरकारनें नुकतीच मंजुरी दिली आहे. तृतीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत बाकी राहिलेले १९,००० गाळें बांधण्याचें काम हातीं घेण्याचें योजिलें आहे. हे गाळे बांधण्याचें काम महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाकडे सोपविण्यांत आलें आहे. आणि त्यासाठीं या योजनेखाली मिळू शकणारे अर्थसहाय्य आणि कर्ज त्या मंडळास देण्यांत येईल. हे गाळें बांधण्याचें काम पूर्ण झाल्यानंतर, झोपड्यांत रहाणाऱ्यांना, या नवीन, स्वच्छ व हवेशीर बांधलेल्या गाळ्यांमध्यें हालविण्यांत येईल आणि त्याचें भाडें कामाचा खर्च सोडून द. म. रु. १३ इतकें पडेल.

**(३) नगरपालिकेच्या हद्दीतील अतिवृष्टी आणि पूर यामुळें पडझड झालेल्या घरांची फेरबांधणी करण्याची योजना :—**

गेल्या कांहीं वर्षांत, राज्याच्या निरनिराळ्या जिल्ह्यांत भयंकर पूर आले. त्याचा परिणाम असा झाला कीं, नगरपालिकेच्या आवारांतील हजारों घरें मोडकळीस आल्यामुळें आणि वाहून गेल्यामुळें,

त्यामध्यें रहाणारे लोक निराधार झाले. या लोकांची आर्थिक परिस्थिती सर्वसाधारणपणें गरीब असल्यानें, त्यांना अशा परिस्थितींत आपलीं घरें पुन्हां बांधणें शक्य नव्हतें. या करितां सरकारनें नुकतींच "नगरपालिकेच्या हद्दीतील, अतिवृष्टी व पूर आल्यामुळें पडझड झालेली घरें पुन्हां बांधण्याची योजना," या नांवाची एक योजना मंजूर केली आहे. त्या खालीं, अशा भागामध्यें घरें बांधण्याचें काम हातीं घेण्यास तयार असलेल्या संबंधित नगरपालिकांना, घरें नष्ट झाल्यामुळें निराधार झालेल्या कुटुंबांसाठीं पुन्हा घरांचीं तरतूद करण्याकरितां ५० टक्के कर्ज आणि ५० टक्के अर्थसहाय्य परस्पर या योजनेखालीं मिळूं शकेल.

१९६०-६१ सालच्या अंदाजपत्रकांत या योजनेखालील संबंधित नगरपालिकांना रु. ५०,००० कर्ज आणि रु. ५०,००० अर्थसहाय्य देण्याची तरतूद केलेली आहे.

**(४) घरांची पडझड, आग लागणें, स्फोट इ. नैसर्गिक आपत्ति यामुळें निराधार झालेल्या लोकांकरितां घरें बांधण्याची योजना [द व. २००]:—**

गेल्या १०-१२ वर्षांत असें दिसून आलें कीं, बृहन्मुंबईत जवळ जवळ १०० खाजगी मालकांच्या इमारती ह्या त्यांच्या अत्यंत मोडकळीस आलेल्या अवस्थेमुळें कोसळल्या. केवळ यामुळेंच दरवर्षी सुमारें हजार कुटुंबांना निराधार व्हावें लागतें. व याशिवाय, बऱ्याचश्या कुटुंबांना आगी, स्फोट आणि सारख्या व इतर नैसर्गिक आपत्तीमुळें व सार्वजनिक कारणाकरितां सरकारनें सुरूं केलेल्या जमीन संपादनाच्या कामांमुळें निराधार व्हावें लागलें आहे. बृहन्मुंबईत सर्वसाधारणपणें पूर्वीपासूनच रहात असलेल्या या कुटुंबांसाठीं राहण्याची दुसरी कांहींतरी तरतूद करणें जरूर आहे. याकरितां द्वितीय अशा लोकांची राहण्याची व्यवस्था करण्याकरितां पंचवार्षिक योजनेच्या ४थ्या किंवा ५ व्या वर्षांच्या कालावधींत दरवर्षी २०० गाळे बांधण्याचा कार्यक्रम मंजूर करण्याचें सरकारने ठरविलें आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाकडे हें काम सोपविण्यांत आलें असून त्यासाठीं आवश्यक असणारा निधी, त्या मंडळाला कर्ज म्हणून देण्यांत येईल. हीं घरें जे घेतील त्यांना सवलतीच्या दराने संपूर्ण भाडे द्यावें लागेल. या योजनेखाली बांधावयाच्या गाळ्याकरितां साधारणपणें अंदाजे रु. ६,५०० इतका खर्च येईल.

या योजनेखालीं महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाला कर्ज देण्याकरितां, १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत रु. १० लाख एवढ्या रकमेची तरतूद करण्याचें योजिलें आहे.

# सहकार आणि ग्रामीण विकास विभाग

## समाज विकास कार्यक्रम

**सर्वसाधारण :**—समाज विकास कार्यक्रम हा जवळजवळ ८ वर्षांपासून चालूं आहे. या ८ वर्षांत या कार्यक्रमाचें काम संथपणें चालूं असून त्यामुळ नवीन मूल्यें, नवी भौतिक संपदा, नवीन सामाजिक दृष्टिकोन, निर्माण होत असून त्यामुळें ग्रामीण भागांत सर्वसामान्यत: चैतन्य व अधिकाधिक भरभराट प्रत्ययास येत आहे. सरकारच्या दृष्टीनें कित्येक प्रशासकीय समस्या व अडचणी यांचें निराकरण झालें असून विकास गटाचें काम लवकर करण्याच्या दृष्टीनें कार्यपद्धतीत व्यवस्थितपणा आला आहे. अलिकडेच प्रसिद्ध करण्यांत आलेल्या समाज विकास पुस्तिकेमुळे याबाबत अत्यंत मदत झाली आहे.

राज्यांतील समाज विकास कार्यक्रमाचा विस्तार हा एप्रिल १९५८ पासून बऱ्याच जलद गतीने चालू आहे. भारत सरकारकडून मंजूर झालेल्या कोणत्याहि प्रकारच्या विकास गटाखालीं येत नसलेल्या बहुतेक भागांत राज्याकडून विस्तारपूर्व विकास गट सुरू करण्याचा टप्पाटप्प्याचा कार्यक्रम सुरू करण्याचें त्यावेळीं ठरविण्यांत आले होते.

महाराष्ट्र राज्यांतील सध्यां अस्तित्वांत असलेले निरनिराळया प्रकारचे विकास गट खालील प्रमाणें आहेत :—

| | गटांचे प्रकार. | गटांची संख्या |
|---|---|---|
| [१] | समाज विकास गट | १३ |
| [२] | प्रथमावस्थेंतील गट | १३८ १/४ |
| [३] | द्वितीयावस्थेंतील गट | ६४ १/४ |
| [४] | समाज विकास मंत्रालयाचे विस्तारपूर्व गट | ४१ |
| [५] | विस्तारपूर्व अवस्था गट | १०३ १/२ |
| [६] | बहुउद्देश्य विकास प्रकल्प | ४ |
| | | ३६४ |

आतां फक्त २६ गट हातीं घ्यावयाचें राहिले आहेत आणि ते पुढच्या ऑक्टोबर १९६० मध्यें हातीं घेण्यांत येतील.

**खर्चांतील वाढ :—**

एकत्रित मुंबई राज्याकरितां (द्विभाषिक) समाज विकास कार्यक्रमासाठीं द्वितीय पंचवार्षिक योजनेंत रु. ३०·७५ कोटी एवढ्या रकमेची तरतूद केलेली आहे. त्यांपैकीं, योजनेच्या पहिल्या ४ वर्षांच्या कालावधींत रु. २०·७५ कोटी एवढा खर्च करण्यांत आला आणि योजनेच्या उरलेल्या शेवटच्या (१९६०–६१) या वर्षाकरितां, रु. ९·१२ कोटी इतकी रकम बाकी राहिली आहे. १९६०–६१ या वर्षाकरितां महाराष्ट्र राज्याच्या सुधारलेल्या अंदाजपत्रकांत रु. ४·९७ कोटी इतक्या रकमेची तरतूद, केलेली आहे. "६३–बी" खालीं महसुली हिशेबांत ३·२७ कोटी रुपये आणि "पी-कर्जे व आगाऊ रकमा" या खालीं १·७० कोटी रुपये संपूर्ण मुंबई राज्याकरितां (द्विभाषिक), समाज विकास कार्यक्रमासाठीं, १९५९–६० सालच्या अंदाजपत्रकांत एकूण रु. ७·८० कोटी एवढ्या रकमेची तरतूद केली होती. त्यांपैकीं, महाराष्ट्रासाठीं रु. ४·९० कोटी एवढा आलेला खर्च धरून, प्रत्यक्ष खर्च रु. ७·४५ कोटी एवढा झाला आहे. अशा तऱ्हेनें खर्चाच्या दृष्टीनें पहातां या कार्यक्रमाची प्रगति फारच चांगली झाली आहे.

**विकास गटांचे वर्गीकरण :—**

झालेल्या खर्चाच्या आधारावर महाराष्ट्रांतील गटाचें मार्च १९६० मधील वर्गीकरण खाली दिल्याप्रमाणें आहे :—

| विभाग | अ-वर्गांतील गट (शेंकडा ७५ च्या वर) | ब-वर्गांतील गट (शेंकडा ५० ते ७५) | क-वर्गांतील गट (शेंकडा ५० च्या खाली) | बेरीज |
|---|---|---|---|---|
| मुंबई | १५ | ८ | — | २३ |
| पुणें | १४ | — | — | १४ |
| नागपूर | ३४ | ६ | — | ४० |
| औरंगाबाद | १७ | १६ | १ | ३४ |
| बेरीज... | ८० | ३० | १ | १११ |

वर्गीकरण केलेल्या गटांमध्यें अवस्था-१ समाज विकास आणि बहुउद्देश विकास प्रकल्प यांचा अंतर्भाव होतो अवस्था २ व विकास-पूर्व गट यांचें वर्गीकरण केलें नाहीं.

**साध्य झालेलें प्रत्यक्ष उद्दिष्ट घटक :–**

महाराष्ट्रांतील विकास कार्यक्रमांतील कांहीं निवडक बाबींची त्यांच्या सुरवातीपासून १९५९ च्या ३१ डिसेंबर पर्यंत साध्य झालेली प्रत्यक्ष उद्दिष्टें खालीं दर्शविल्या प्रमाणें आहेत :–

| अनुक्रम क्र. | बाब | साध्य झालेलें उद्दिष्ट |
|---|---|---|
| | **I—कृषि** | |
| (१) | वांटप केलेली रासायनिक खतें ( बं. मण ) | ३८,५०,३३६ |
| (२) | वांटप केलेली सुधारलेलीं बी-बियाणें ( बं. मण ) | १०,७१,६७६ |
| (३) | पुरवठा केलेले पैदाशीचे वळू ( संख्या ) | १,९९४ |
| | **II—जलसिंचन व पडीत जमिनी लागवडीयोग्य करणें** | |
| (४) | लागवडीयोग्य केलेल्या व बांध घातलेल्या जमिनी (एकर) | ५,१६,९७० |
| (५) | जलसिंचनाखाली आणलेल्या जादा जमिनी (एकर) | २,७६,०७२ |
| | **III—स्वास्थ्य व स्वच्छता व्यवस्था** | |
| (६) | बांधण्यांत आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या विहीरी ( संख्या ) | ३,८५७ |
| | **IV—समाज शिक्षण** | |
| (७) | साक्षर केलेले प्रौढ इसम ( संख्या ) | १,७५,३८५ |
| (८) | सुरूं करण्यांत आलेलीं युवक मंडळें | ७,२५६ |
| (९) | सुरूं करण्यांत आलेले शेतकऱ्यांचे संघ | ९,१४१ |
| (१०) | सुरूं केलेल्या महिला समित्या | २,९७३ |

**लोकांकडून मिळालेल्या वर्गण्याः—**

उद्घाटनापासून ३१ डिसेंबर १९५९ पर्यंत लोकांकडून ४,३२,७३,००० रुपये वर्गणी मिळाली.

**स्थानिक विकास कार्याचा कार्यक्रमः—**

जनतेमध्यें पंचवार्षिक योजनासाठीं उत्साह यावा ह्या मुख्य उद्देशानें राज्यामध्यें १९५३-५४ पासून स्थानिक विकास कार्याचा कार्यक्रम सुरूं करण्यांत आला. लोकांकडून जमा झालेल्या वर्गण्या व स्वेच्छेनें काम करण्याची तयारी ह्यामुळे खालीं नमूद करण्यांत आलेल्या प्रकारच्या योजना पूर्णत्वाला येऊन लोकांना त्याचा परस्पर फायदा मिळालाः

(१) पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना.

(२) शेती सुधारण्यासाठीं कायम स्वरूपाचीं कामें.

(३) ग्रामीण आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठीं कायम स्वरूपाचीं कामें.

(४) लहान लहान पूल व गटारें यांसह खेड्यांतील रस्ते.

(५) ग्रामीण शाळा व सध्यां अस्तित्वांत असलेल्या व अपुरी जागा असलेल्या शाळांच्या व दवाखान्यांच्या इमारतींची सुधारणा.

(६) लोकांना जर सर्वसाधारणपणें फायदा होत असेल तर मालांचा सांठा करण्यासाठीं गोदामें बांधणें.

२. स्थानिक विकास कार्याचा खर्च खालीं नमूद केल्याप्रमाणें भागविला जातोः—

( i ) जनतेकडून व जिल्हा लोकलबोर्ड व ग्रामपंचायती इत्यादि स्थानिक संस्थांकडून ५० टक्के खर्च.

( ii ) राहिलेला ५० टक्के खर्च केन्द्राकडून.

लोकांकडून येणारी ५० टक्के वर्गणी पैसा, माल किंवा मजूरीच्या रूपानें स्वीकारण्यांत येते. मागासलेल्या विभागांना कमी प्रमाणांत वर्गणी गोळा करण्याची सवलत दिली असून प्रत्यक्ष खर्चाच्या २० टक्के इतक्या मर्यादित प्रमाणांत प्रत्यक्ष वर्गणी गोळा करावी लागते. समाज विकास गटांखालीं असलेलीं क्षेत्रें आणि २०,००० आणि त्यापेक्षां जास्त लोकसंख्या असलेली नगरपालिकांचीं शहरें यांना या कार्यक्रमांतून वगळण्यांत आलें आहे.

३ १९५९-६० पासून भारत सरकारनें या कार्यक्रमास अर्थसहाय्य देण्याचें बंद करण्याचें योजिलें होतें. परंतु, राज्य सरकारच्या विनंतीवरून चालू वर्षामध्यें अर्थसहाय्य चालू ठेवण्याचें ठरविलें आहे. मात्र एकेका खेड्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याच्या योजनांचें अर्थसहाय्य देण्याइतपत ही योजना मर्यादित केली आहे. चालू १९६०–६१ वर्षामध्यें केन्द्रानें खालील प्रकारच्या योजनांना अर्थसहाय्य देण्याचें ठरविलें आहे :—

(१) एकेका खेड्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याच्या योजना.

(२) सर्वांत जवळच्या मुख्य रस्त्याला किंवा रेल्वे स्टेशनला जोडणारे ग्रामीण रस्ते.

(३) खेड्यांतील शाळा.

तथापि भारत सरकार ज्या कामांसाठीं कोणतीहि मदत देत नाहीं अशा कामांकरितां स्वतःच्या महसूलांतून अनुदान देऊन मूळच्या प्रमाणांत कार्यक्रम सुरू ठेवण्याचें राज्य सरकारनें ठरविले आहे. या कार्याकरतां चालू वर्षामध्यें २४·०८ लाखाची तरतूद करण्यांत आली आहे.

४. भूतपूर्व मुंबई राज्यासाठीं, स्थानिक विकास कार्यांच्या कार्यक्रमासाठीं, १९५८–५९ सालीं ७५·५७ लाख रुपये मंजूर करण्यांत आले होते. त्यांपैकीं ५४·७९ लाख रुपयांचा प्रत्यक्ष खर्च करण्यांत आला. गेल्या १९५९-६० च्या अर्थवर्षांत भूतपूर्व मुंबई राज्यासाठीं तरतूद करण्यांत आलेल्या ७४·८५ लाख रुपयांपैकीं ६०·१४ लाख रुपये (अदमासें) खर्च करण्यांत आले आहेत. १९६०–६१ च्या चालू वर्षी, भारत सरकारच्या नियोजन मंडळानें, वर नमूद करण्यांत आलेल्या तीन प्रकारच्या योजनांसाठीं २५·२३ लाख रुपये मंजूर केले आहे. ही मंजूरी संयुक्त मुंबई राज्यासाठीं आहे व महाराष्ट्र राज्यांकरतां किती मंजूरी आहे तें निश्चित करण्यांत येत आहे. वर नमूद केल्याप्रमाणें, राज्याच्या हिशेबांत येणाऱ्या योजनांच्या खर्चासाठी २४·०८ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

५. पूर्वी, जे विभाग, सामाजिक विकास गटाच्या खालीं येत नव्हते किंवा ज्या विभागांतील विभागगट तीव्रतापूर्व अवस्थेंत होते, अशा विभागांतच स्थानिक विकास कार्यें हातीं घेण्यांत येत असत. १) आतां भारतसरकारने, स्थानिक विकास कार्यांच्या कार्यक्रमासाठीं विभाग निवडण्याबद्दल खालीलप्रमाणें विभागांना अग्रहक्क देण्यांत यावा अशा सूचना दिल्या आहेत.

(१) मागासलेले विभाग;

(२) सामाजिक विकास कार्यक्रमाखाली न येणारे विभाग;

(३) विस्तारपूर्व गट आणि

(४) समाज विकास कार्यक्रमांतील पहिली किंवा दुसरी अवस्था पूर्ण झालेले गट.

६. ग्रामीण विकासाच्या स्वरूपाच्या खाली दिलेल्या आणखी कांही योजना १९६०-६१ च्या विकास कार्यक्रमांमध्यें समाविष्ट करण्यांत आल्या आहेत.

(१) सर्व सामान्यतः शेतीची व विशेषतः गुरांची सुधारणा करण्यास उत्तेजन देण्यासाठीं जिल्हा विकास मंडळ दरवर्षी कृषि विषयक व गुरांची प्रदर्शने भरवीत असते. त्याकरितां सरकार योजनेअन्वयें त्यांना प्रत्येकी १,५०० रु. चे ठराविक अनुदान देते. आणि तितकीच रक्कम ते स्थानिकरित्या गोळा करतात. याशिवाय, कृषिविषयक प्रात्यक्षिकें व प्रदर्शने, निरनिराळ्या उपयुक्त अशा स्पर्धांना बक्षिसे देणे आणि

ग्रामीण शिक्षण, स्वास्थ्य, साफसफाई रस्तें इ. सुधारणांसाठी कलेक्टरांना १,९०० रु. चें वार्षिक इच्छानुदान देण्यांत येते. १९६०-६१ मध्यें हे कार्यक्रम चालू ठेवणे आवश्यक आहे.

(२) द्वितीय पंचवार्षिक योजनेतील कोणत्याहि सर्वसाधारण योजनेंत अंतर्भूत न होणाऱ्या जिल्हा विकास मंडळांनी नियोजित केलेल्या स्थानिक महत्वाच्या योजनांच्या अंमलबजावणीकरितां द्वितीय पंचवार्षिक योजनेंत रु. ७६·४९ लक्ष इतक्या ठोक रकमेची तरतूद करण्यांत आली आहे. सध्यां ही तरतूद खाली दर्शविल्याप्रमाणे दोन प्रकारच्या योजनाकरितां उपयोगांत आणली जात आहे. या योजनांचे थोडक्यांत वर्णन पुढें दिले आहे:—

## (ए) जिल्हा विकास मंडळाच्या संकीर्ण योजना :—

१९५८–५९, १९५९–६० व १९६०–६१ ह्या तीन वर्षांत स्थानिक महत्व असलेल्या पुढील प्रकारच्या योजना अंमलांत आणण्यासाठी प्रत्येक जिल्हा विकास मंडळास सरकारनें रु. १ लाखाचें अनुदान मंजूर केले आहे. ठराविक दराने सार्वजनिक वर्गणी गोळा करून ही कामें हाती घेण्यांत येतात. १९५८–५९ मध्यें वर उल्लेखिलेल्या अनुदानांचा भाग म्हणून सुरवातीला प्रत्येक जिल्हा मंडळास रु. २५,००० ची रक्कम देण्यांत आली होती. १९५८-५९ साली कांही मंडळांना, त्यांच्या जरूरीप्रमाणे आणखी अनुदान देण्यांत आले आहे. १९५९–६० मध्यें सुद्धां अशीच अनुदाने देण्यांत आली आहेत. तथापि पुष्कळशी जिल्हा विकास मंडळें, अनुदानांचा पूर्णपणे उपयोग करूं शकली नाहीत. १९६०-६१ मध्यें, मंडळांना सुरवातीला दिलेले अनुदान, गेल्या दोन वर्षांत त्यांनी केलेला खर्च, त्यांना मिळू शकणाऱ्या अनुदानांमधून राहिलेली शिल्लक, त्याचा १९६०-६१ चा कार्यक्रम आणि अनुदानें देण्यांकरितां अंदाजपत्रकांतील केलेली तरतूद ही लक्षांत घेऊन बऱ्याचशा मंडळांना प्रारंभिक अनुदाने देण्यांत आली आहेत. ही मंडळें त्याचा कार्यक्रम जोमदारपणे अंमलात आणून त्यांना १९६०-६१ मध्यें मंजूर करण्यांत आलेल्या अनुदानांचा पूर्णपणे उपयोग करतील अशी आपेक्षा आहे. असे जर झालें तर, १९६०-६१ मध्यें मंजूर केलेल्या रकमेपेक्षां, जास्त रक्कम वर्षाच्या शेवटी त्यांना लागेल.

## (बी) ग्रामीण प्रदेशांतील हंगामी बेकारीचें निवारण :—

हंगाम नसलेल्या ऋतूंत शेतमजुरांना व इतरांना, यांत ग्रामीण विभागांतील सुशिक्षित बेकारांचाहि अंतर्भाव होतो. लाभदायक रोजगार मिळवून देण्याकरितां रस्ते बांधणें, जलसिंचनाचीं छोटी बांधकामें, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणें, इत्यादीसारखीं कामें हातीं घेण्याचे अधिकार कलेक्टरांना देण्यांत आले आहेत. जेव्हां व ज्या ठिकाणी लाभदायक रोजगारासाठीं निदान ५० इसमांकडून मागणी होईल तेव्हां व त्या ठिकाणी अशी कामें सुरूं करण्यांत येतील. शक्यतोंवर योजनांतर्गत योजनांचा भाग म्हणून अंदाजपत्रकांत पूर्वीच तरतूद करण्यांत आलेलीं कामें, हंगामी बेकारीचें निवारण करण्याकरितां ज्या प्रदेशांत लाभदायक रोजगारांची आवश्यकता आहे अशा प्रदेशांतच हातीं घेण्यांत यावयाची आहेत. जेथें अशा योजना नाहींत त्या प्रदेशांत या योजनेसाठीं तरतूद करण्यांत आलेल्या निधींतून खर्च भागवावयाच्या विकास कार्यांची रूपरेषा आंखण्यांस व तीं तयार ठेवण्यास कलेक्टरांना अधिकार देण्यांत आला आहे. १९५९-६० मध्यें बऱ्याचश्या जिल्ह्यांत बेकारीची तीव्र परिस्थिती उद्भवली नाहीं; परंतु, इतर कांहीं जिल्ह्यांमध्यें, पूर व गारपीट यामुळें उद्भवणाऱ्या बेकारीच्या परिस्थितीमुळें पुष्कळशी कामें सुरू करणें आणि दिलेल्या मूळ निधीमध्यें वाढ करणें आवश्यक ठरलें. १९५९-६० मध्यें, एकूण खर्च ६ लाख रुपयांवर होता. १९६०-६१ च्या सुरवातीस बऱ्याचशा कलेक्टरना मोठ्या खर्चांची कामें हातीं घ्यावीं लागली म्हणूनच, १९५९-६० मध्यें झालेल्या खर्चा इतकाच खर्च १९६०-६१ मध्ये देखील होईल अशी अपेक्षा आहे. ह्याबाबतची परिस्थिति वर्षाच्या शेवटीं अधिक स्पष्ट होईल.

## (एक) ग्रामपंचायती

ग्रामपंचायती ह्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे मूलभूत घटक आहेत. प्रत्येक खेडें हे स्थानिक लोकांच्या गरजा भागविण्याच्या बाबतींत तसेच सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बाबतींत देखील स्वंयपूर्ण केन्द्र बनावें असा सरकारचा उद्देश आहे महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक खेड्यांत ग्रामपंचायत स्थापण्याचा सरकारचा उद्देश आहे. स्थापन झालेल्या ग्रामपंचायतीची संख्या व त्याच्या अधिकार क्षेत्रांखाली येणारी लोकसंख्या खाली नमूद केल्याप्रमाणें आहे :—

| विभाग | स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींची संख्या | ग्रामपंचायतीच्या अधिकार क्षेत्रांखाली येणाऱ्या ग्रामीण लोकसंख्येचें शेंकडा प्रमाण |
|---|---|---|
| औरंगाबाद | २,८६६ } ३१ मार्च १९६० पर्यंत | ६०·४० |
| मुंबई | ३,४०९ } ३१ मार्च १९६० पर्यंत | ९९·४० |
| पुणें | ३,६०५ } ३१ मार्च १९६० पर्यंत | ९५·०५ |
| नागपूर | ५,७७३—मे १९५९ पर्यंत | ९१·५० |
| | १५,६५३ | ८६·५९ |

३१ मार्च १९६१ अखेरपर्यंत सर्व खेडीं ग्रामपंचायतीच्या अधिकार क्षेत्रांखाली येतील अशी अपेक्षा आहे.

२. १ जून १९५९ पासून ग्रामपंचायतीकरिता १९५८ चा मुंबईचा ग्रामपंचायतीचा अधिनियम ( १९१९ चा मुंबईचा अधिनियम क्र. तीन ) या नांवानें ओळखला जाणारा एकीकृत ग्रामपंचायत अधिनियम अंमलांत आला आहे. या नव्या अधिनियमाप्रमाणें, ग्रामीण लोकांच्या सामाजिक व आर्थिक विकासाकरितां ग्रामपंचायतींना करतां येण्यासारख्या विस्तृत व निरनिराळ्या प्रकारच्या कामांची तरतूद करण्यांत आली आहे. त्यात ग्रामपंचायतींना देण्यात यावयाच्या समप्रमाणांतील आर्थिक सहाय्याची देखील या एकीकृत अधिनियमांत तरतूद करण्यांत आली आहे. आणि आपल्या महसुलाच्या बाबी वाढविण्यासाठीं ग्रामपंचायतीना अधिकार देण्यांत आले आहेत. न्यायदानाच्या जास्त अधिकारांची देखील तरतूद करण्यांत आली आहे. या नवीन अधिनियमानुसार, ग्रामपंचायतीकडे जमीन महसूल गोळा करण्याचे काम सोपविण्याचा सरकारला अधिकार आहे.

नवीन अधिनियमान्वयें बरेचसे महत्वाचे नियम तयार करण्यांत आले आहेत.

३. सरकार प्रत्येक ग्रामपंचायतीला, प्रत्येक ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्यें, मागील वर्षांत वसूल करण्यांत आलेले सामान्य जमीन महसुलाच्या २५% पेक्षां कमी नाहीं व ३०% पेक्षां जास्त नाही इतकें अनुदान देतें.

४. नवीन ग्रामपंचायत कायद्याप्रमाणें ग्रामपंचायतीचे कार्यवाह हे सरकारी नोकर झाले असून त्यांचे पगार व इतर भत्ते सरकारकडून देण्यांत येतात. तलाठी व ग्रामपंचायत कार्यवाह ह्या दोहोंचा सामान्य संवर्ग करण्यांत यावा असें ठरविण्यांत आलें आहे. या संवर्गामध्यें तलाठी व ग्रामपंचायत कार्यवाह यांच्या अदमासे १४,४६० जागाची भरती करण्याची आवश्यकता असेल. ग्रामपंचायतीच्या चिटणीसांना महसूलविषयक कामांचें आणि तलाठ्यांना ग्रामपंचायतीच्या कामाचें प्रशिक्षण देण्यासाठीं अशा

तऱ्हेच्या संवर्गाची स्थापना करण्याची आवश्यकता होती. यासाठीं, राज्यांत १२ प्रशिक्षण केंद्रें स्थापन करण्यांत आली आहेत आणि ९०० पेक्षां जास्त लोकांना आतांपर्यंत प्रशिक्षण दिलें गेलें आहे.

५. पूर्वीच्या मुंबई राज्याच्या आदेशाप्रमाणें प्रत्येक वर्षी, ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी आणि पंचांची ३ ते ५ दिवसांची प्रशिक्षण शिबिरें प्रत्येक तालुक्यांत/महालांत/गटांत भरविलीं जातात.

६. ग्रामपंचायतीचें वाढतें कार्य पार पाडण्यासाठीं विभागीय, जिल्हा, तालुका/महाल यांच्या पातळीवर नोकरवर्गाच्या व्यवस्थेची सुधारणा करण्यास देखील सरकारनें मंजुरी दिली आहे.

७. ग्रामपंचायत आणि विकास गटाच्या कार्याचा जास्त समन्वय साधण्यासाठीं, गट विकास अधिकाऱ्यांना पदसिद्ध सहाय्यक जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी आणि प्रकल्प अधिकारी आणि प्रांत व प्रकल्प अधिकाऱ्याला पदसिद्ध जादा जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी ह्याप्रमाणें घोषित करणारे आदेश सरकारनें काढले आहेत, आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चें कलम १३६ आणि १९५९ चे जिल्हा ग्रामपंचायत (अधिकाऱ्यांचीं कार्ये) नियम याअन्वयें जिल्हा ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे सर्व अधिकार बजावण्याचा आणि त्यांनी पार पाडावयाचीं सर्व कामें पार पाडण्याचा अधिकार ह्या अधिकाऱ्यांना दिला आहे.

८. अंदाजपत्रकांत १९६०-६१ करितां पंचायतीसाठीं, रु. १,९३,९५,७०१ ची तरतूद केली आहे. त्यापैकीं रु. १,१८,६३,५०१ जमीन महसूल फक्त अनुदानाकरितांच आहे.

## दोन (१) ग्रामीण पाणीपुरवठा योजना.

महाराष्ट्राच्या ग्रामीण प्रदेशांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याकरितां निरनिराळ्या प्रकारचे कार्यक्रम हातीं घेण्यांत आले आहेत. यासाठी पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजना अशा आहेत:--

(१) कुलाबा जिल्ह्यांतील खेडयांच्या गटांना प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजना क्र. ५६८ (अ)

(२) विदर्भामध्यें ग्रामीण पाणीपुरवठा योजना-योजना क्र. ५६८ (ब)

(३) सध्यांच्या महाराष्ट्र राज्यांतील, पुनर्रचनापूर्व मुंबई राज्याच्या ११ जिल्ह्यांचा समावेश असलेली ग्रामीण पाणीपुरवठा योजना क्र. ५६९ (अ)

(४) विदर्भाच्या ग्रामीण प्रदेशांत विहिरीद्वारे पाणीपुरवठा योजना क्र. ५६९ (ब)

(५) मराठवाड्यांत विहिरी खोदण्याचा कार्यक्रम, योजना क्र. ५६९ (अ)

(६) विदर्भामध्यें जलांकरितां संरक्षित पाणी पुरवठा योजना क्र. ५६७.

खेड्यांच्या गटांच्या प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनेनुसार कुलाबा जिल्ह्यांत, तिनिविरा पाणी पुरवठा योजना आणि शहापाडा पाणीपुरवठा योजना ह्या दोन योजना सरकारनें मंजूर केल्या आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये ह्या दोन योजनांकरितां रु. ३७·७१ लाखांची रक्कम नियुक्त केली आहे. या योजनांचा खर्च संपूर्णपणें राज्य सरकारनें करावयाचा आहे. आणि त्यासाठीं राष्ट्रीय पाणीपुरवठा व पाहणी कार्यक्रम यानुसार भारत सरकारकडून ५० टक्के अनुदान सहाय्य मिळेल. कुलाबा जिल्ह्याच्या खारापाट प्रदेशांतील ३१ खेड्यांच्या गटाला, आवश्यक असणाऱ्या पाणीपुरवठ्याकरितां तिनिविरा पाणीपुरवठा योजना आंखली आहे. ह्या योजनेकरितां रु. १८,९६,२२२ (स्थूल) इतका खर्च येईल असा अंदाज आहे. ही योजना जवळजवळ पूर्ण झाली आहे आणि प्रथमतः १९६० च्या मे व जून ह्या दोन महिन्यांत खेडयांतील लोकांना पाणी देण्याचें आदेश देण्यांत आले आहेत. पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या ३ वर्षांत, या योजनेवर रु. ११,९९,५०२ इतका खर्च झाला आहे. १९५९-६० मध्यें डिसेंबर १९५९ पर्यंत रु. १,२६,०९३ इतका खर्च करण्यांत आला आहे.

कुलाबा जिल्ह्याच्या, खारापाट प्रदेशांतील ७५ खेड्यांच्या पाणीपुरवठाविषयक गरजांसाठी शहापाडा पाणीपुरवठा योजना आंखली आहे. ह्या योजनेकरितां रु. ४१,७९,०६२ (स्थूल) इतका खर्च-

येईल असा अंदाज आहे. ह्या योजनेसंबंधांतील, घरें व जाण्यायेण्याचे रस्ते बांधण्याचें काम पूर्ण झालें आहे आणि धरण व इतर संबंधित बांधकामें सुरू आहेत. या योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत ह्या योजनेवर रु. ८,८८,२६४ इतका खर्च झाला आहे. १९६०–६१ च्या अंदाजपत्रकांत दोन योजनांचा [ क. ५६८ (ए) ] खर्च भागविण्या-साठीं रु. ७,२०,००० इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे. १९५९–६० मध्यें, डिसेंबर १९५९ पर्यंत रु. ४,२१,१४७ इतका खर्च झाला. तिनिविरा आणि शहापाडा ह्या दोनहि योजनांच्या बाबतींत खर्चांत बचत झाली नाहीं व त्या आंखलेल्या कार्यक्रमानुसार पार पाडल्या जात आहेत.

(२) विदर्भातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनेनुसार [ क. ५६८ (डी) ] चांदा आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्यें नलिका विहिरी खणण्याच्या आणि दुय्यम स्वरुपाचीं कामें करण्याच्या दोन कार्यक्रमांना मंजुरी देण्यांत आली आहे. ह्या कार्यक्रमांचा खर्च भागविण्यासाठीं रु. १२·२१ लाखांइतकी रक्कम योजनेंत नियुक्त केली आहे. या योजनांचा संपूर्ण खर्च राज्य सरकारनें करावयाचा असून त्यासाठीं राष्ट्रीय, पाणीपुरवठा व पाहणी कार्यक्रम ( ग्रामीण ) यानुसार भारत सरकारकडून ५० टक्के अर्थसहाय्य मिळेल, चांदा जिल्ह्याच्या कार्यक्रमांत ८१ खेड्यांचा समावेश होतो व त्याचा खर्च अंदाजे रु. २५,६४,००० ( स्थूल ) इतका आहे. डिसेंबर १९५९ पर्यंत चांदा जिल्ह्यातील ७५ खेडयांत ८५ नलिका विहिरी पूर्ण बांधून झाल्या आहेत. ह्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत रु. ६,९२,१९२ व १९५९-६० मध्यें ( डिसेंबर १९५९ पर्यंत ) रु. २८,२०२ इतका खर्च झाला आहे. यवतमाळ जिल्ह्यांतील कार्यक्रमांत ७१ खेड्यांचा समावेश असून त्याचा खर्च अंदाजे रु. २२,३१,३५० ( स्थूल ) इतका आहे. डिसेंबर १९५९ पर्यंत, यवतमाळ जिल्ह्याच्या ५५ खेड्यांमध्यें ५५ नलिका विहिरी खोदण्यांत आल्या आहेत. ह्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत, रु. ६,८८,६१७ व १९५९–६० मध्यें, डिसेंबर १९५९ पर्यंत रु. ३८,७४८ इतका खर्च झाला आहे. योजना क. ५६८ (डी) साठीं १९६० ६१ मध्यें, रु. ७,२३,००० इतका खर्च करण्याचें योजिलें आहे. ह्या योजनेंतील उद्दिष्टाहून कमी खर्च केला जात नाहीं.

(३) ग्रामीण पाणीपुरवठा योजना [ योजना क. ५६९ (ए) ] महाराष्ट्र राज्यांत राहिलेल्या, पुनर्रचनापूर्व मुंबई राज्याच्या ११ जिल्ह्यांचा समावेश असलेली ही योजना १९४७ पासून अस्तित्वांत आहे. ११ जिल्ह्यांच्या मागासलेल्या प्रदेशांतील १०० आणि त्यापेक्षां जास्त लोकसंख्येच्या इतर प्रदेशांतील २०० आणि त्यापेक्षां जास्त लोकसंख्येच्या प्रत्येक खेड्यांत एकेक सार्वजनिक विहीर खोदण्याचा ह्या योजनेचा उद्देश आहे. जनतेकडून २५ टक्के वर्गणी मिळाल्यास व खरोखरच दुसऱ्या विहिरीची गरज असल्यास दुसरी विहीर बांधण्याचें काम हातीं घेतां येईल. पहिल्या सार्वजनिक विहिरीचा संपूर्ण खर्च सरकार सोसील. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत त्या योजनेसाठीं एकत्रित मुंबई राज्याचा वाटा रु. १००,८०,००० इतका होता व त्यापैकीं रु. ६७·२० लाख इतकी रक्कम महाराष्ट्र राज्याच्या वांट्यास येईल. ह्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांमध्यें रु. ५६·६३ लाख आणि १९५९--६० मध्यें रु. १४,९९,५०० इतका खर्च झाला आहे. हा खर्च एकत्रित मुंबई राज्याबाबतचा आहे. महाराष्ट्राच्या ११ जिल्ह्यांच्या वेगळ्या खर्चाचे आंकडे ताबडतोब उपलब्ध नाहींत. योजना क. ५६९ (ए) चा खर्च भागविण्यासाठा १९६०--६१ च्या अंदाज पत्रकांत रु. १२,१०,००० ची तरतूद प्रस्तावित केली आहे.

(४) विदर्भांतील, ग्रामीण प्रदेशांत विहिरी खोदण्याची योजना क्रमांक ५६९ (बी) अन्वयें विदर्भांतील ग्रामीण प्रदेशांत विहिरी बांधण्याचें हातीं घेण्यांत आले आहे. २५ टक्के खर्च संबंधित प्रदेशातील जनपद सभा किंवा /आणि स्थानिक जनता यांनी मिळून दिलेल्या वर्गणींतून आणि उरलेला ७५ टक्के खर्च राज्यसरकारने राजनिधींतून द्यावयाचा आहे. सरकारचा ७५ टक्के इतका हिस्सा देण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील रु. ७·०५ लाखांची रक्कम नियुक्त केली आहे. ह्या योजनेकरितां कोणतेहि प्रत्यक्ष उद्दिष्ट ठेवण्यांत आलेलें नाहीं. या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या ३ वर्षात विहिरी बांधण्यासाठीं

सरकारनें दिलेल्या ७५ टक्क्याच्या अनुदानासाठीं रु. १,९२,९०३ इतका खर्च करण्यांत आला. १९५९-६० मध्यें, डिसेंबर १९५९ पर्यंत रु. ६४,६२३ इतका खर्च करण्यांत आला. योजना क्र. ५६९ (बी) नुसार हाती घेतलेल्या योजनांवरील खर्चाच्या सरकारनें द्यावयाच्या ७५ टक्क्यांच्या हिस्स्यासाठीं १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत रु. २,००,००० इतकी तरतूद करण्याचें योजिलें आहे. जनपद सभा व स्थानिक जनता २५ टक्के वर्गणी देण्यास पुढें न आल्यानें ह्या योजनेच्या खर्चांत बचत झाली आहे. विहिरी बांधल्यानंतर त्यांची व्यवस्था ठेवण्याची व दुरुस्ती करण्याची जबाबदारी घेण्याबाबत जनपद सभांनी नाखुषी दर्शविली आहे.

(५) मराठवाडा प्रदेशांतील विहिरी खणण्याच्या कार्यक्रमानुसार [योजना क्र. ५६९ (सी)] तीन योजना अंमलांत आहेत. ह्या योजना (ए) विहिरींचीं सर्वसाधारण बांधकामें, (बी) द्वि. पं. यो. अन्वयें विहिरी खणणें आणि (सी) औरंगाबाद जिल्ह्याच्या आमबड आणि पैठण तालुक्यांत विहिरी बांधणें; याप्रमाणें आहेत. ह्या तीनहि योजनांचा खर्च भागविण्यासाठीं द्वितीय पंचवार्षिक योजनेंत रु. ६९·७० लाख इतकी रक्कम नियुक्त केली आहे.

(ए) विहिरी बांधण्याच्या सर्वसाधारण कार्यक्रमानुसार, बीड आणि उस्मानाबाद ह्या दोन जिल्ह्यांत अंदाजे ३३·०० लक्ष रुपये खर्च करून ५४९ विहिरी बांधावयाच्या आहेत. ह्या योजनेनुसार, डिसेंबर १९५९ पर्यंत ७२ विहिरी बांधून झाल्या आहेत आणि ३१७ विहिरी बांधण्याचें काम चालू आहे. या पन्चवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत १३,८०,७६४ रु. चा एकूण खर्च झाला, आणि १९५९-६० मध्यें, डिसेंबर १९५९ पर्यंत ७,०८,१८१ रु. ची रक्कम खर्च करण्यांत आली. १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत ह्या कार्यक्रमाचा खर्च भागविण्यासाठीं रु. १० लाख इतकी तरतूद करण्याचें योजिलें आहे.

(बी) जेव्हां मराठवाडा प्रदेश मुंबई राज्यामध्यें आला तेव्हां द्वि. पं. योजनेंतील विहिरीविषयक कार्यक्रम तयार नव्हता. १९५६ च्या राज्यपुनर्रचनेनंतर सरकारी लोकस्वास्थ्य इंजिनीअरला (हल्लींचा सुप० इंजि० लोकस्वास्थ्य मंडळ, पुणें) हा कार्यक्रम सर्व बाबतींत तयार करावयाचा होता. सरकारी लोकस्वास्थ्य इंजिनीअरला १९५६ सालच्या राज्यपुनर्रचनेनंतर ह्या कार्यक्रमानुसार, पूर्वीच्या मुंबई सरकारनें, मराठवाडयातील पांचहि जिल्ह्यांत रु. १३·२० लाख इतका अंदाजे खर्च करून विहिरी बांधण्याचा निर्णय घेतला होता. डिसेंबर १९५९ पर्यंत तीन विहिरींचें काम पूर्ण झालें व १३८ विहिरींचें काम चालूं होतें. ह्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत रु. ३,३२,७५४ एवढा एकूण खर्च झाला. १९५९-६० मध्यें डिसेंबर १९५९ पर्यंत रु. ३,४२,८१२ इतका खर्च झाला. १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत ह्या कार्यक्रमाचा खर्च भागविण्यासाठीं रु ४,५०,००० ची तरतूद करण्याचें योजिलें आहे.

(सी) अम्बाड आणि पैठण तालुक्यांतील विहिरीविषयक योजनांनुसार, पूर्वीच्या हैद्राबाद राज्यानें, राष्ट्रीय पाणीपुरवठा कार्यक्रम व पाहणी प्रकल्प (ग्रामीण) ह्यानुसार, ग्रामीण प्रदेशांत ३०० विहिरी, १०० संडासांचें ब्लॉक्स् बांधण्याचें काम हातीं घेण्याचें योजिलें होतें. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ही योजना अंमलांत आणली नव्हती. १९५६ मध्यें, राज्याची पुनर्रचना झाल्यानंतर, पूर्वीच्या मुंबई राज्यानें ही योजना अंमलांत आणून २०५ खेड्यांत २२८ विहिरी व प्रत्येक खेडयांत ३० संडास या प्रमाणावर २२ खेडयांत संडास बांधण्याचा निर्णय घेतला. ह्या योजनेला अंदाजे रु. २३·५० लाख एवढा खर्च येईल व हा खर्च राज्यसरकारनें करावयाचा असून त्याबाबत भारत सरकारकडून ५० टक्के अनुदान-सहाय्य मिळेल. डिसेंबर १९५९ पर्यंत ८४ विहिरींचें बांधकाम चालूं होते आणि १४४ विहिरींच्या कामाला सुरुवात व्हावयाची होती. ह्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत या योजनेवर एकूण रु. २,४५,४६७ इतका खर्च आला. १९५९-६० मध्यें, डिसेंबर १९५९ पर्यंत

रु. २८,८११ इतका खर्च आला. १९६०-६१ मध्यें ह्या योजनेचा खर्च भागविण्यासाठीं रु. ६,५०,००० इतकी तरतूद करण्याचें योजिलें आहे.

द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील विहिरीविषयक कार्यक्रम आणि अम्बाड आणि पैठण तालुक्यांतील विहिरी, याबाबतच्या खर्चात बचत होण्याचा संभव आहे. राज्य पुनर्रचनेच्या वेळीं कोणतीहि योजना तयार नव्हती आणि अंमलबजावणी सुरुं करण्यापूर्वी, पुण्याच्या सुपरिंटेंडिंग इंजिनीअरला पहाणी इ० पासूनच कामाला सुरवात करावी लागली हें ही बचत होण्याचें कारण आहे.

(४) जत्रांकरितां संरक्षित पाणीपुरवठा करण्याची योजना ( योजना क्र. ५६७ ) फक्त विदर्भांतील प्रदेशांकरितांच हातीं घेतली आहे. सर्वसामान्यतः ज्या ठिकाणीं जत्रा व बाजार भरतात आणि ५०,००० किंवा त्याहून अधिक लोक जेथें जमतात अशा ठिकाणीं संरक्षितपाणी पुरवठा करण्याची सोय करून, लोकस्वास्थ्याचें रक्षण करणें, हा ह्या योजनेचा उद्देश आहे. योजनेमधील ह्या योजनेकरितां द्वितीय पंचवार्षिक योजनेंत रु. ४ ९७,००० इतकी रक्कम नियुक्त करण्यांत आली आहे. ह्या कार्यक्रमाखालील दोन योजना सरकारनें विचारांत घेतल्या आहेत. त्या योजना म्हणजे, चांदा जिल्ह्यांतील मारखडे देव जत्रेसंबंधीं योजना आणि अमरावती जिल्ह्यांतील कौंडिण्यपूर जत्रेसंबंधीं योजना ह्या होत. मारखडे देव जत्रेसंबंधींच्या योजनेकरितां खर्च रु. २,२०,००० (स्थूल) इतका असून कौंडिण्यपूर जत्रेबाबतच्या योजनेकरिता लागणारा (स्थूल) खर्च रु. १,१२,९०० इतका आहे. अजूनपर्यंत दोन्ही योजनांवर कोणताहि खर्च करण्यांत आलेला नाही आणि, योजना पूर्ण झाल्यानंतर येणारा, व्यवस्था ठेवण्याचा आणि दुरुस्तीचा खर्च कोणी सोसावा हें सरकारने ठरवावयाचें असल्यामुळें योजनांची सुरवात केलेली नाहीं. ह्या योजनांचा खर्च भागविण्यासाठीं १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत रु. ८०,००० इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

(२) जिल्हा स्थानिक मंडळें :—

सध्यां महाराष्ट्र राज्यांत मोडणाऱ्या राज्य पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्य प्रदेशांत १२ जिल्हा स्थानिक मंडळें, मराठवाडा प्रदेशांत ५ जिल्हा मंडळें आणि विदर्भ प्रदेशांत ३८ जनपद सभा आहेत. विदर्भांतील जनपद सभांच्या ऐवजी जिल्हा स्थानिक मंडळें स्थापन करण्याचा प्रश्न अजून सरकारच्या विचारांत आहे. स्थानिक पट्टीनिधी हें जिल्हा स्थानिक मंडळाच्या उत्पन्नाचें महत्त्वाचें साधन आहे. कांही जिल्हा स्थानिक मंडळे, व्यवसाय कर आकारतात आणि एक जिल्हा स्थानिक मंडळ रत्नागिरी येथील ऑक्ट्राय कर आकारतें. त्यामुळें ह्या मंडळांना बऱ्याच प्रमाणांत सरकारी अनुदानांवर अवलंबून रहावें लागतें. सरकारनें दिलेली मुख्य अनुदानें खालीलप्रमाणें आहेत :—

| | | १९६०-६१ साली तरतूद केलेली रक्कम हजार रुपये |
|---|---|---|
| (१) | ५ टक्के जमीन महसूल अनुदान ... ... | ३३·८० |
| (२) | २ टक्के वन महसूल अनुदान ... ... | ४·५३ |
| (३) | ५० टक्के महागाई भत्याबद्दलचें अनुदान ... ... | १५·११ |

हीं अनुदानें आतां, सर्व जिल्हा स्थानिक मंडळांना, जिल्हा मंडळांना आणि जनपद सभांना समान तत्त्वावर देण्यांत येतात. ही समानता १९५८-५९ या वर्षी करण्यांत आली असून, त्यापूर्वी राज्यांच्या निरनिराळ्या भागांतील ह्या मंडळांना हीं अनुदानें निरनिराळ्या तत्त्वांवर देण्यात येत असत. ह्या शिवाय, विदर्भांतील जनपद सभांना, मध्यप्रदेश आणि वऱ्हाड स्थानिक स्वराज्य अधिनियम, १९४८, च्या कलम ९७-अ (अ) ह्यानुसार लादण्यांत आलेल्या, स्टँप करावरील अतिरिक्त आकारणीच्या रकमेइतके अनुदान मिळतें. ह्या कारणाकरिता, १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत रु, ७,००,००० इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे वर उल्लेख करण्यात आलेल्या अनुदानांखेरीज, जुन्या मुंबई जिल्ह्यांतील, जिल्हा

स्थानिक मंडळांना निरनिराळ्या प्रकारच्या रस्त्यांचें बांधकाम करण्यांकरितां आणि ते सुस्थितींत ठेवण्यांकरितां अनुदानें देण्यांत येतात.

### (३) जिल्हा स्थानिक मंडळांना रस्त्यांकरिता अनुदानें :-

मुंबई स्थानिक मंडळांबाबत अधिनियम, १९२३ चें कलम ५० या अन्वयें जिल्हा स्थानिक मंडळाच्या अधिकारांतील रस्त्यांचे आणि दळणवळणाच्या इतर साधनांचें बांधकाम करणें आणि त्यांची व्यवस्था ठेवणें, हें त्या जिल्हा स्थानिक मंडळांचें एक आवश्यक कर्तव्य आहे. हें कर्तव्य त्यांना त्यांच्या निधीमधून शक्य असेल तितका खर्च करून पार पाडावयाचें आहे. जिल्हा स्थानिक मंडळाची आर्थिक उत्पादनाचीं साधनें मर्यादित असून ग्रामीण प्रदेशांतील दळणवळणाचा प्रश्न फार मोठ्या स्वरूपाचा आहे. ग्रामीण प्रदेशांतील दळणवळणाचा विकास करण्याकरिता स्थानिक संस्थांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानें, सरकारकडून खालील प्रकारच्या रस्त्यांच्या बांधकामांकरिता अनुदानें देण्यांत येतातः—

(१) स्थानिक सार्वजनिक बांधकामें.

(२) खेड्यांना जोडणारे रस्ते.

(३) राज्य परिवहन आणि इतर वाहनांच्या वाहतुकीमुळे खराब झालेल्या रस्त्यांची सुधारणा.

(४) सार्वजनिक बांधकाम विभागानें, जिल्हा स्थानिक मंडळांकडे सोपविलेल्या रस्त्यांची व्यवस्था आणि दुरुस्ती.

(५) अनुसूचित प्रदेशांतील आणि अविकसित प्रदेशांतील दळणवळणाची सुधारणा.

(६) समाज विकास प्रकल्प आणि राष्ट्रीय विस्तार सेवा कार्यक्रमाखालीं बांधण्यांत आलेल्या रस्त्यांची व्यवस्था.

(१), (२), (३) आणि (५) क्रमांकांच्या बाबींवर अनुदानाप्रीत्यर्थ करण्यांत आलेला खर्च हा योजनेत तरतूद केलेला खर्च असून इतर दोन बाबी म्हणजे (४) आणि (६) ह्या योजनेतर बाबी आहेत.

**योजनांतर्गत बाबीः—**

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें समाविष्ट असलेल्या क्र. ४५१ च्या योजनेप्रमाणे जिल्हा स्थानिक मंडळांना खालील कारणांकरितां अनुदानें देण्यांत येतात :-

(१) स्थानिक सार्वजनिक बांधकामें (२) खेड्यांना जोडणारे रस्ते आणि (३) राज्य परिवहन आणि इतर वाहनांच्या वाहतुकीमुळे खराब झालेले रस्ते. महाराष्ट्र राज्यांत आतां राहिलेलीं, पुनर्रचनापूर्व मुम्बई राज्यांतील जिल्हा स्थानिक मंडळेंच ह्या योजनेनुसार अनुदानास पात्र आहेत. विदर्भ आणि मराठवाड्याच्या प्रदेशांना ही योजना लागू करण्यांत आलेली नाहीं. द्वितीय पंचवार्षिक योजनेंत, ह्या ३ बाबींकरितां, एकत्रित मुंबई राज्याकरिता, रु. ३,३७,६०,००० इतकी एकूण तरतूद करण्यांत आली आहे.

(१) जिल्हा स्थानिक मंडळांना स्थानिक सार्वजनिक बांधकामांकरिता देण्यांत येणारी अनुदानें हीं खडीचे आणि बिनखडीचे ( उदा. मुरुमाचे ) रस्ते, ( जलसिंचित प्रदेशांतील बैलगाडीसाठीं असलेले मार्ग खेरीज करून इतर मार्ग ) आणि पूल यांचें बांधकाम आणि विशेष दुरुस्ती करण्याकरितां आणि मंडळांच्या दळणवळणावरील खर्चास हातभार लावण्याकरितां, म्हणून देण्यांत येतात. जर संबंधित जिल्हा स्थानिक मंडळे, यंत्रांच्या किंमतीचा अर्धा भाग भरण्यांस आणि त्याचप्रमाणें यंत्रसंच योग्य स्थितीत राहावा म्हणून त्याबद्दलचा घसारा आणि दुरुस्ती खर्च सुद्धां सोसण्यास तयार असतील तर जिल्हा स्थानिक मंडळांना सुद्धां अनुदानाच्या रकमेंतून रस्ता तयार करण्याकरिता लागणारीं यंत्रेसुद्धां खरेदी करतां येतील. ह्या योजनेच्या पहिल्या ३ वर्षांमध्यें, महाराष्ट्र राज्यांतील ११ जिल्हा स्थानिक मंडळांना द्यावयाच्या अनुदानादाखल रु. २०,६३,९९० इतका खर्च करण्यांत आला. १९५९-६० ह्या आर्थिक वर्षी रु. ६,८८,००० इतका खर्च करण्यांत आला.

(२) ग्रामीण प्रदेशांचा योग्य विकास करण्याकरितां, खेडीं आणि रेल्वे स्टेशनांना किंवा मुख्य आणि गौण रस्त्यांना जोडणाऱ्या दळणवळणाच्या चांगल्या आणि कार्यक्षम पद्धतीची आवश्यकता आहे. असे जोड-रस्ते बांधणें शक्य व्हावें म्हणून जिल्हा स्थानिक मंडळांना दरवर्षी अनुदाने देण्यांत येतात. जिल्हा स्थानिक मंडळांना अशाप्रकारचीं अनुदानें, खेडयांना जोडणारे रस्ते म्हणजे-प्रमुख किंवा गौण रस्ते किंवा रेल्वे स्टेशन किंवा बंदरे व खेडी यांना जोडणारे रस्ते-ह्याच्या बांधकामाकरिता आणि दुरुस्तीकरिता आणि जेथे आवशक्य असेल तेथे कॉजवे, कल्व्हर्ट आणि पूल बांधण्याच्या कामासारख्या खास बाबतीकरितां खर्च करतां येतील. ह्या योजनेच्या पहिल्या ३ वर्षात महाराष्ट्र राज्यातील ११ जिल्हा स्थानिक मंडळांना अशा प्रकारचीं अनुदानें देण्याकरितां, सरकारला रु. १८,१६,७९७ इतका खर्च आला आणि १९५९-६० मध्ये रु. ५,७७,००० इतका खर्च करावा लागला.

(३) राज्य वाहतूक आणि इतर वाहनांच्या वाहतुकीमुळें खराब झालेल्या रस्त्यांची सुधारणा, करण्याकरितां जिल्हा स्थानिक मंडळांना अनुदानें देण्यांत येतात. महाराष्ट्र राज्यांतील ११ जिल्हा मंडळांना अशा प्रकारचीं अनुदानें देण्याकरितां, ह्या योजनेच्या पहिल्या ३ वर्षामध्यें रु. १८,७५,८४१ इतका खर्च आला. १९५९-६० मध्यें रु. ६,३८,००० इतका खर्च करण्यांत आला.

वर उल्लेख केलेल्या तीनहि बाबींकरितां, १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत रु. २९,४४,००० इतक्या रकमेची तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

(४) अनुसूचित प्रदेश आणि अविकसित प्रदेशाच्या विकासाबाबतच्या योजनेनुसार (योजना क्र. ६७२) दळणवळणाची सुधारणा करण्याचा एक कार्यक्रम हातीं घेण्यांत आला आहे. ही केंद्र पुरस्कृत योजना आहे आणि तिच्याकरितां लागणारा सर्व खर्च भारत सरकार सोसणार आहे. ज्या जिल्हा स्थानिक मंडळांना जिल्ह्यांत अशा प्रकारचे प्रदेश आहेत त्यांना अनुदानें देण्यांत येतात आणि अनुसूचित प्रदेशांतील कल्व्हर्टस्, पादचाऱ्यांचे पूल, किंवा लहान पूल, स्थानिक सार्वजनिक बांधकामें यांसारख्या फक्त रस्त्याबाबतच्या बांधकामाकरितां ह्या अनुदानांचा उपयोग करावयाचा आहे.

महाराष्ट्राच्या राज्यांत मोडणाऱ्या जिल्ह्यांत ह्या योजनेकरितां, योजनेच्या पहिल्या ३ वर्षांमध्यें रु. ९७,९३९ इतका खर्च करण्यांत आला. सन १९५९-६० यावर्षी रु. ८६,००० इतका खर्च करण्यांत आला सन १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत रु. १,१७,००० इतक्या रकमेची तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**योजनेतर बाबीः—**

परिच्छेद १ मधील योजना अनुक्रमांक (४) आणि (६) ह्या रस्त्याबाबतच्या योजनेतर योजना असून, त्यानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागानें जिल्हा स्थानिक मंडळाच्या स्वाधीन केलेल्या रस्त्यांची आणि समाज विकास प्रकल्प आणि राष्ट्रीय विस्तार सेवा कार्यक्रमाखालीं बांधण्यांत आलेल्या रस्त्यांची व्यवस्था व दुरुस्ती यासाठीं जिल्हा स्थानिक मंडळांना अनुदानें देण्यांत येतात.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ते जिल्हा स्थानिक मंडळांच्या स्वाधीन करण्याबाबचे आदेश १९५४-५५ च्या मध्यांत देण्यांत आले होते आणि १९५५-५६ च्या आर्थिक वर्षापासून पुढें, सरकारनें, जिल्हा स्थानिक मंडळाना ही जादा जबाबदारी सांभाळण्याकरितां अनुदानें देण्याचें सुरू केलें. १९५८-५९ अखेर पर्यंतच्या पहिल्या ३ वर्षांमध्यें, हीं अनुदानें देण्याकरितां रु. ४५,२९,४५० इतका खर्च करण्यांत आला. महाराष्ट्राच्या राज्यांतील जिल्ह्यांकरितां १९५९-६० ह्या वर्षाकरितां रु. १९,२८,४०४ इतका खर्च करण्यांत आला. १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत रु. १९,३८,००० इतक्या रकमेची तरतूद करण्याचें योजिलें आहे.

जिल्हा स्थानिक मंडळाच्या ताब्यांत नसलेलें सर्व रस्ते म्हणजे प्रमुख जिल्हा रस्ते, इतर जिल्हा रस्ते, खेड्यांना जोडणारे रस्ते, आणि समाज विकास प्रकल्प आणि राष्ट्रीय विस्तार सेवा कार्यक्रमाखालील सरकारी काम म्हणून बांधण्यांत आलेले खेड्यांतील रस्ते, हे सर्व व्यवस्था आणि दुरुस्तीकरितां संबंधित जिल्हा स्थानिक मंडळांच्या स्वाधीन करण्याबाबतचे आदेश मार्च १९५६ मध्यें देण्यांत आले. जिल्हा स्थानिक मंडळांना, या जादा जबाबदारीचें काम पार पाडतां यावें म्हणून आर्थिक सहाय्य देण्याच्या उद्देशानें, सरकारनें अशा जिल्हा स्थानिक मंडळांना अनुदानें द्यावयाचें ठरविलें आहे. १९५९-६० अखेर पर्यंतच्या पहिल्या चार वर्षांमध्ये पूर्वीच्या मुंबई सरकारच्या सर्व जिल्ह्यांकरितां रु. ३,२५,००० इतका खर्च करण्यांत आला आहे. महाराष्ट्राकरितां वेगळे आंकडे उपलब्ध नाहींत. महाराष्ट्र राज्यांतील जिल्हा स्थानिक मंडळांना अशा प्रकारची अनुदानें मंजूर करण्याकरितां १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत रु. १,६६,००० इतक्या रकमेची तरतूद करण्याचें योजिले आहे.

## सहकार

योजनाबद्ध विकास कार्यक्रमाचा भाग म्हणून सहकार्य क्षेत्राचें संवर्धन करणें हे आपल्या "राष्ट्रीय योजनेंत" सांगितल्याप्रमाणें राष्ट्रीय धोरणाचें एक प्रमुख ध्येय आहे. हें तत्त्व ह्या राज्यांत जोरदारपणें अंमलांत आणण्यांत येत आहे.

सहकारी संस्था ह्या निरनिराळ्या प्रकारांनीं आदर्श अशा संस्था आहेत; आणि म्हणूनच लोकशाहीच्या मार्गानें आर्थिक विकास करण्याकरितां सहकारी तत्त्वाचा विविध स्वरूपांत उपयोग करण्यासाठीं एक विस्तृत क्षेत्र उपलब्ध होतें. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें सहकारी तत्त्वांचा विकासाचा कार्यक्रम मुख्यतः शेतकऱ्यांमध्यें सहकारी तत्त्वाचा प्रसार व्हावा इतपत होता. ह्या कार्यक्रमांत, कर्जासाठीं व क्रयविक्रयासाठीं सुधारलेल्या सोयी, सहकारी तत्त्वावर शेती करणें व यंत्रसिंचाईच्या सहकारी संस्थांची स्थापना, कर्ज देण्याबद्दल नियमावली तयार करणें व त्यांत शेतकऱ्यांना त्यांचें कर्ज कमी करण्याबद्दल सवलत देणारी तरतूद करणें; ह्यांचा अंतर्भाव होतो. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमाचा आरखडा व दिग्दर्शन समितीनें तयार केलेला "ग्रामीण पतविषयक पाहाणी समितीचा" अहवाल एकाच वेळीं प्रसिद्ध झाला. या अहवालांत सहकारी तत्त्वावर कर्ज मिळण्याच्या यंत्रणेची अगदीं वरच्या टोंकापासून तर ते खालच्या पातळीपर्यंत सामर्थ्य वाढवून व त्या संघटित करून त्या यंत्रणेची पुनर्रचना करावी ह्या मुद्यावर इतर बाबीपेक्षां जास्त जोर दिला आणि क्रयविक्रय, प्रक्रिया करणें, पैसे कर्जाऊ देण्याबद्दल नियमन, सरकारी व बिनसरकारी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण इत्यादि संबंधित शाखांचा विकास व्हावा म्हणून बऱ्याचशा शिफारसी केल्या आहेत व म्हणूनच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें समाविष्ट असलेल्या सहकारी विकास योजनांमध्यें ह्या, बऱ्याच मोठ्या व बहुसमावेशक अशा अहवालांतील बऱ्याचशा शिफारसी अगदीं क्रमप्राप्त अशा दिसतात. ग्रामीण कर्जाबाबत पाहणी करणाऱ्या समितीनें केलेल्या पुनर्रचनेच्या व विकासांच्या शिफारसीपैकीं मुख्य शिफारसी खालील प्रमाणें आहेत:—

(i) कर्ज देणाऱ्या सहकारी संस्था आर्थिक, प्रशासकीय आणि तांत्रिक दृष्ट्या सर्व थरांमध्यें संपन्न करणें.

(ii) राज्याकडून आवश्यक असे आर्थिक, प्रशासकीय आणि तांत्रिक सहाय्य देऊन क्रयविक्रय व प्रक्रिया करणें ह्या बाबतींत सहकारी तत्त्वावर प्रगतीशील पुनर्रचना करणें.

[iii] आवश्यक ते आर्थिक, प्रशासकीय आणि तांत्रिक सहाय्य राज्याकडून घेऊन ग्रामीण आर्थिक कार्यक्रमाची शक्य तितक्या व्यापक क्षेत्रांत सहकारी तत्त्वावर प्रगतिशील पुनर्रचना करणें.

[iv] वरील उद्दिष्ट साध्य करण्यास सहकारी विभाग व सहकारी संस्था यांना लागणाऱ्या नोकरवर्गाला प्रशिक्षण देण्याची पुरेशी व्यवस्था करणें.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें समाविष्ट असलेल्या सहकारी विकास कार्यक्रमामधील बऱ्याचशा भागांत वरील शिफारसींची अंमलबजावणी केली आहे. या राज्यांत विकास पावलेल्या सहकारी चळवळींत, कृषिविषयक कर्ज, सहकारी क्रय-विक्रय, शेतींत उत्पन्न होणाऱ्या मालाचा क्रय-विक्रय, घरगुती व शेतीसाठीं लागणाऱ्या आवश्यक वस्तूंची विक्री, कृषिविषयक विकास, शेतीमधून उत्पन्न झालेल्या मालावर प्रक्रिया करणें, दूध उत्पादकांच्या संस्था, व संघ स्थापन करणें, व मागासलेल्या वर्गांचें कल्याणाबाबतच्या इतर कार्यक्रमाचा अंतर्भाव होतो. राष्ट्रीय विकास परिषदेनें नोव्हेंबर १९५८ रोजीं भरलेल्या आपल्या सभेंत भविष्य-काळांत सहकारी चळवळीचा विकास करण्यासंबंधीं राज्यसरकारनें पाळावयाचे खालीं दिलेले महत्वाचे निर्देश असणारा सहकारी धोरणासंबंधीचा एक व्यापक ठराव पास केला:—

[१] लोकांची चळवळ म्हणून सहकारी चळवळीचा विकास करण्यासाठीं ग्रामीण समाज हा त्यांचा प्राथमिक घटक समजून सहकारी संस्थांचें संघटन होणें आवश्यक आहे.

[२] सर्व प्रकारच्या उत्पादन कार्याकरितां कर्जे देण्याच्या सोयीची वाढ करणें व जेमतेम किंवा हलाखीची आर्थिक स्थिति असणाऱ्या शेतकऱ्यांना उत्पादनाप्रीत्यर्थ कर्ज मिळण्याच्या सोयींत वाढ करून देणें, हा सहकारी चळवळीच्या अनेक उद्देशांपैकीं एक मुख्य उद्देश आहे. आणि कृषिविषयक उत्पादनाचा व पशुसंवर्धनाचा कार्यक्रम हातीं घेणें ही सहकारी संस्थांची खास जबाबदारी आहे.

[३] सहकारी संस्थांतर्फे कर्ज देण्याच्या कार्यक्रमाची कृषिविषयक उत्पादन व क्रय-विक्रय आणि त्यांचा सुसूत्र विकास यांच्याशीं सांगड घातली पाहिजे.

[४] प्रक्रियेच्या सहकारी कार्यक्रमाची गति वाढविली पाहिजे.

[५] प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाचा विस्तार केला पाहिजे आणि सर्व पातळीवर तो तीव्रतेनें करण्यांत यावा.

विभागानें आपल्या सहकारविषयक विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यांत विशेषत: गेल्या तीन वर्षांत बरेचसें यश संपादन केलें आणि राष्ट्रीय विकास समितींत आपल्या धोरणासंबंधींच्या ठरावांत रेखाटलेलीं उद्दिष्टें सहकारी तत्त्वावर पार पाडण्यासाठीं विभागानें १९६०-६१ सालाकरितां आतां फार मोठा कार्यक्रम आंखला आहे.

या राज्यांत अशा २९ योजना हातीं घेण्यांत आल्या असून त्या खालीं दिलेल्या विकासाच्या सदरांत आणि उप-सदरांत मोडतात :—

## [एक] कृषि आणि समाजविकास

(१) वखारी आणि क्रयविक्रय, (२) सहकार, (३) पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय-विदर्भातील दुग्धालयांच्या विकासाच्या एका योजनेबाबत, आणि (४) सर्वोदय विभागाच्या ग्रामीण विकास योजनांच्याबाबत समाज विकास, राष्ट्रीय विस्तार सेवा.

### [दोन] उद्योग आणि खाणकाम

(१) फक्त सहकारी साखर कारखान्याच्या योजनांसाठीं.

### [तीन] सामाजिक कार्ये

(१) गृहनिर्माण, (२) इतर सामाजिक विकास कार्ये.

योजनेमध्यें समाविष्ट केलेल्या योजनांच्या अंमलबजावणीची, योजनेच्या काळांतील गेल्या ४ वर्षांतील प्रगति व १९६०-६१ मधील योजलेला कार्यक्रम खालीं नमूद केला आहे :—

## (I) कृषि आणि समाजविकास

**वखारी आणि क्रयविक्रय :—**

३ ह्या उप-सदरांत अंतर्भाव केलेल्या सहा योजनांपैकीं, (१) क्रयविक्रयविषयक पाहाणी व संशोधन, (२) समन्वित बाजार वृत्त सेवा, आणि (३) प्रतवारी लावण्याच्या कार्याचा विकास करणें ह्या तीन केवळ नोकरवर्गासंबंधींच्या योजना आहेत. या योजना, एकतर सध्यां अस्तित्वांत असलेला नोकरवर्ग चालू ठेवणें किंवा कृषिविषयक विकास कार्यक्रमांचा विस्तार झाल्यानें तें काम करण्यासाठीं जादा नोकरवर्गाची निर्मीति करणें या संबंधींच्या आहेत. सर्व राज्यभर कृषिविषयक उत्पन्नाच्या क्रयविक्रयाबाबत पहाणी व संशोधनाच्या कामासाठीं विद्यमान प्रशासकीय यंत्रणा बळकट करणें हें क्रयविक्रय पाहणी व संशोधनाच्या योजनेचें उद्दिष्ट आहे. समन्वित क्रयविक्रय वृत्त सेवेच्या योजनेंत प्रादेशिक आकाशवाणी-केंद्रांद्वारें विनियमित बाजारपेठांतून मिळालेली किंमतीबाबतची माहिती गोळा करणें व तिचा प्रसार करणें ह्या गोष्टींचा समावेश होतो. प्रतवारी लावण्याच्या कार्याचा विकास योजनेमध्यें महाराष्ट्र राज्यांत प्रतवारी लावण्याच्या दोन प्रयोगशाळा स्थापन करण्याचें अभिप्रेत आहे. सोलापूर येथें एक व परसोडा येथें एक अशा दोन प्रयोगशाळा १९५८-५९ च्या शेवटीं स्थापन करण्यांत आल्या व त्यांच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे. विभागानें ह्या तीन योजनांच्या अंमलबजावणीकरितां केलेला खर्च व १९६०-६१ करतां प्रस्तावित केलेली तरतूद या गोष्टी खालील तक्त्यांत दाखविल्या आहेत :—

| | योजनेचें नांव | योजनेमध्यें केलेली तरतूद | १९५६-६० या ४ वर्षांतील खर्च | १९६०-६१ करतां तरतूद | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | (रुपये लाखांत) | | |
| १. | क्रयविक्रयविषयक पाहणी व संशोधन | ०·५७ | ०·३२ | ०·३१ | ०·६३ |
| २. | समन्वित बाजार वृत्त सेवा | १·८९ | ०·६० | १·०० | १·६० |
| ३. | प्रतवारी लावण्याच्या कार्याचा विकास | ०·७३ | ०·४० | ०·२४ | ०·६४ |
| | बेरीज... | ३·१९ | १·३२ | १·५५ | २·८७ |

**राज्य वखार कॉर्पोरेशन :—**

डिसेंबर १९५७ मध्यें राज्य वखार कॉर्पोरेशन स्थापन करण्यांत आली असून त्याचें मुख्य ठिकाण पुणे येथें आहे. या कॉर्पोरेशनकडे सहकारी क्रयविक्रय संस्थांना परवाने असलेल्या वखारींच्या सोयी करण्यासाठीं लहान क्रयविक्रय केन्द्रांत परवाने असलेल्या वखारी स्थापन करण्याचें काम सोंपवण्यांत

आलें आहे. एकत्रित मुंबई राज्याच्या अमदानींत ह्या कॉर्पोरेशनला सरकारकडून कॉर्पोरेशनच्या शेअर भांडवलासाठीं २० लाख रुपयांची वर्गणी दिली आहे. १९५९-६० च्या अखेरपर्यंत या कॉर्पोरेशननें उघडलेल्या वखारींपैकीं महाराष्ट्र राज्यांत सामील झालेल्या जिल्ह्यांमध्यें १५ वखारी अशा आहेत. कॉर्पोरेशनच्या वखारी स्थापन करण्याच्या कामांतील मंद प्रगति बघतां, चालू वर्षांतील अंदाजपत्रकांत, कोणतीही नवीन तरतूद करण्यांत आली नाहीं.

**कृषिविषयक क्रयविक्रयाचा विकास :-**

ह्या योजनेनुसार खालील दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमानुसार ८३ बाजारपेठांचें विनियमन करण्याचें योजिलें होतें. १९५९-६० अखेरपर्यंत ५८ बाजारपेठा नियंत्रित करण्यांत आल्या व १९६०-६१ या चालू वर्षांत आणखी ११ बाजारपेठांचें विनियमन होईल अशी अपेक्षा आहे. बाजार समित्यांना बाजारासाठीं जागा खरेदी करणें व तेथें आवश्यक त्या सोयींची तरतूद करणें शक्य व्हावें म्हणून त्यांना कर्जें व अर्थसहाय्य ह्यांद्वारें आर्थिक मदत करण्याचीहि तिच्यांत तरतूद आहे. नवीन बाजार समित्यांना प्रारंभींचा खर्च भागविण्यासाठीं अर्थसहाय्य देण्याबाबतची तरतूददेखील ह्या योजनेंत केलेली आहे. १९५९-६० अखेरपर्यंत, ४२ बाजार समित्यांना कर्जें देऊन व १७ बाजार समित्यांना अर्थसहाय्य देऊन आर्थिक मदत केली आहे. १९६०-६१ यावर्षी ३० बाजार समित्यांना कर्जें देऊन व दुसऱ्या २० बाजार समित्यांना अर्थसहाय्य देऊन आर्थिक मदत देण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. या योजनेच्या पहिल्या ४ वर्षांत एकूण ४०·०१ लाख रुपयांचा खर्च करण्यांत आला. योजनेमध्यें या कार्यक्रमासाठीं ४४·०७ लाखांची तरतूद करण्यांत आली असतां १९६०-६१ सालांतील होणारा संभाव्य रु. १४·७१ लाखांचा खर्च लक्षांत घेतां गेल्या पांच वर्षांच्या काळांत सुमारें ५५·४२ लाखांचा खर्च होईल.

**सहकारी क्रयविक्रयाचा विकास :—**

सर्व मोठ्या व लहान क्रयविक्रय केन्द्रांत सहकारी क्रयविक्रय संस्था स्थापन करणें आणि कृषि-विषयक उत्पन्नाचा सांठा करण्याबाबत सोयी करण्यासाठीं क्रयविक्रयाशीं सहकारी पत व्यवस्थेची परिणामकारक सांगड घालणे या बाबींचा या योजनेंत समावेश होतो. राज्यांत पांच वर्षांमध्यें ४९ क्रयविक्रय संस्थांची स्थापना करण्याचें उद्दिष्ट असतांना १९५९-६० अखेरपर्यंत ११७ (प्राथमिक आणि जिल्ह्याच्या) क्रयविक्रय संस्था संघटित करून नोंदविण्यांत आल्या. याशिवाय १९५८-५९ या सालीं मुंबई येथें मुख्यालय असलेली एक शिखर क्रयविक्रय संस्था स्थापन करण्यांत आली. १४३ क्रयविक्रय संस्थांना शेअर भांडवलांत वर्गणी देऊन सहाय्य केलें आहे आणि इतर ३० क्रयविक्रय संस्थांना व्यवस्थापनेच्या खर्चाबद्दल अर्थसहाय्य देण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें क्रयविक्रय व बहु-उद्देश संस्थांना २७ मोठ्या आकाराचीं, ७४ मध्यम आकाराचीं आणि ५७९ लहान आकाराचीं गुदामें बांधण्यासाठीं मदत देण्यांत आली आहे. मूळ योजनेंत ठरविलेल्या उद्दिष्टापेक्षां १९५९-६० अखेर पर्यंत बऱ्याच प्रमाणांत जास्त काम झालें आहे. १९६०-६१ च्या कार्यक्रमानुसार ३४ क्रयविक्रय (प्राथमिक व जिल्हानिहाय) संस्थांची संघटना करणें आणि ४ मोठ्या, ३० मध्यम व १५० लहान आकाराच्या गुदामांचें बांधकाम करण्याचें योजिलें आहे. शेअर भांडवलांत वर्गणी देण्यासाठीं व व्यवस्थापनाच्या खर्चाबद्दल अर्थसहाय्य देण्यासाठीं आवश्यक त्या आर्थिक मदतीची तरतूद करण्यांत

आली आहे. योजनेच्या काळामध्यें ह्या योजनेवर १२९·९९ लाख रुपये खर्च होतील तर ह्या राज्याला पंचवार्षिक योजनेमध्यें ११७·६० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**प्रशासकीय नोकर वर्गांत वाढ करणें:—**

१९४७ सालापासून सहकार विभागाच्या कामांत सतत वाढ झालेली आहे आणि द्वितीय पंचवार्षिक योजनेखालील सहकार विकास कार्यक्रमांत समाविष्ट केलेल्या ग्रामीण कर्जाबाबत पाहणी करणाऱ्या समितीच्या शिफारसीमुळें या विभागावर कामाचा बोजा फारच पडला आहे व त्या करितां विभागाच्या निरनिराळ्या उपविभागांतील प्रशासकीय नोकरवर्गांत वाढ करणें आवश्यक झालें आहे. १९६०–६१ सालांतील योजनांच्या कार्यक्रमान्वयें फक्त विद्यमान नोकर वर्ग चालू ठेवणे आहे असें नाहीं तर विद्यमान संवर्गांत बरीचशी भर टाकणें, महत्त्वाच्या संस्थांची वार्षिक हिशोबतपासणी पूर्ण करण्यासाठीं हिशोबतपासणी नोकरवर्ग वाढविणें, तसेंच साहाय्यक जिल्हा सहकारी अधिकारी व पर्यवेक्षक असा संघटनविषयक व पर्यवेक्षण विषयक नोकरवर्गाची वाढ करणे यामुळे वाढविलेल्या नोकरवर्गाचा या नियोजित जादा नोकरवर्गांत उल्लेख करतां येईल. पैसे कर्जाऊ देण्या-संबंधीच्या कायद्याची संपूर्ण राज्यांत अंमलबजावणी करण्यासाठीं लागणारा प्रशासकीय नोकरवर्ग वाढविणें-संबंधींच्या नोकरवर्गाचादेखील खास उल्लेख करावा लागेल. त्याचप्रमाणें योजनांची परिणामकारक व समाधानकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीनें मुख्यालयाची संघटना बळकट करावी लागेल. योजनेच्या पहिल्या चार वर्षांच्या कालावधींत रु. २१·६६ लाख एवढा खर्च आला आणि १९६०–६१ करितां नियोजित केलेली तरतूद रु. ३८·७५ लाख एवढी आहे.

**सहकारी प्रशिक्षण, शिक्षण व प्रचार :—**

या गटाखालीं येणाऱ्या अतिशय महत्त्वाच्या योजनांपैकीं ही एक महत्त्वाची योजना आहे. प्रशिक्षित नोकरवर्गाची गरज दिवसेंदिवस वाढतच आहे. राज्य सहकार संघ सुरवातीपासून राज्यांत सहकारविषयक शिक्षणाच्या सोयी वाढविण्याच्या दृष्टीनें मदत करीत आहे. या संस्थेकडून देण्यांत येणारें शिक्षण तीन प्रकारचें आहे. जिल्हा पातळीवर प्राथमिक संस्थांच्या चिटणीसांना, सदस्यांना व पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे वर्ग, प्रादेशिक पातळीवर सहकारी शाळा आणि राज्य पातळीवर सहकार प्रशिक्षण महाविद्यालय. सहकारी विभागाच्या आणि मुख्य सहकारी संस्थेच्या वरिष्ठ आणि मध्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांना महाविद्यालयांत प्रशिक्षण दिलें जातें. महाविद्यालयाकडून द्यावयाच्या पदव्युत्तर डिप्लोमाचा पाठ्यक्रम २ महिन्याचा व्यावहारीक प्रशिक्षण पाठ्यक्रम धरून, १२ महिन्यांचा आहे. अशा शाळांमध्यें तात्त्विक प्रशिक्षण देऊन त्यानंतर २ महिने व्यावहारिक प्रशिक्षण देण्यांत येतें. या शाळांतील शिक्षणाचें माध्यम प्रादेशिक भाषा आहे. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या चार वर्षांच्या कालावधींत म्हणजेच १९५६–६० या वर्षांत ५ नवीन शाळा उघडण्यांत आल्या आणि त्या कालावधींत व्यवस्था समिति आणि इतर सदस्य मिळून ६५,२८९ लोकांना प्रशिक्षण देण्यांत आलें, तर त्याच कालावधींत प्रशिक्षण दिलेल्या चिटणीसांची संख्या १४,९२१ इतकी आहे. या कालावधींत एकूण २२·२५ लाख रुपये एवढा खर्च आला.

सहकारी विभाग त्याचप्रमाणें सहकारी संस्था यांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाल्यानें सर्व खेडीं आणि ७५ टक्के ग्रामीण लोकसंख्या सहकारी कक्षेत आणण्याचे द्वितीय पंचवार्षिक योजनेतील ध्येय

गांठण्यासाठीं कामाची गति वाढविण्याचें संघानें योजिलें आहे. याकरितां प्राथमिक संस्थांचे ६,५०० चिटणीस आणि ग्रामप्रमुख आणि ५०० वरिष्ठ समाज कार्यकर्ते यांच्या प्रशिक्षणाची तरतूद करण्याकरितां, संघानें दोन व्यापक अशा योजना तयार केल्या आहेत. प्रशिक्षण देण्याच्या कार्यक्रमाचा चालू वर्षाचा खर्च रु. २०·८५ लाख एवढा आहे. १९६०–६१ वर्षी, या योजनेनुसार साध्य होण्याचा अपेक्षित विकास खालील आंकडेवारीवरून दिसून येईल:–

| | बाब | १९६०–६१ करितां साध्य करावयाचें उद्दिष्ट |
|---|---|---|
| १. | प्रशिक्षण देण्यांत येणाऱ्या मध्यम प्रकारच्या लोकांची संख्या | ६२ |
| २. | प्रशिक्षण देण्यांत येणाऱ्या दुय्यम प्रकारच्या लोकांची संख्या | १,०४० |
| ३. | नेमणूक करावयाच्या, प्रशिक्षण देणाऱ्या निरीक्षकांची संख्या... | ५० |
| ४. | चिटणीसांसाठीं भरावयाच्या वर्गांची संख्या ... | १३० |
| ५. | व्यवस्थासमिति आणि इतर सदस्य यांचेसाठीं भरवावयाच्या वर्गांची संख्या ... ... ... | १,३०० |
| ६. | प्रशिक्षण देण्यांत येणाऱ्या चिटणीसांची संख्या ... | २,६०० |
| ७. | देण्यांत यावयाच्या ढाली आणि बक्षिसें यांची संख्या ... | ३३८ |
| ८. | प्रशिक्षण देण्यांत येणाऱ्या व्यवस्थासमिति आणि इतर सदस्य यांची संख्या ... ... ... | ५२,००० |
| ९. | प्रशिक्षण देण्यांत येणाऱ्या चिटणीसांची आणि ग्रामप्रमुखांची संख्या ... ... ... | ३,९०० |
| १०. | प्रशिक्षण देण्यांत येणाऱ्या समाज कार्यकर्त्यांची संख्या | ५०० |

## कृषिविषयक कर्जाचा विस्तार

या गटांतील अत्यंत महत्त्वाची अशी ही एक योजना असून कर्ज देण्यायोग्य कामासाठीं आणि उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नांत वाढ करण्यासाठीं, सर्व शेतकऱ्यांना कर्जाच्या पुरेशा सोयी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पार पाडण्याकरितां सहकारी तत्वावर कर्जे देण्याच्या सध्यांच्या पद्धतीची पुनर्रचना करणें, हा या योजनेचा हेतु आहे. राज्याला त्यांत महत्त्वपूर्ण भाग घेऊन प्राथमिक तसेंच वरील पातळीवर रचनात्मक आणि अर्थविषयक बाबतींत कर्ज देण्याच्या यंत्रणेस बळकटी आणणें हा हेतु साध्य करावयाचा आहे. राष्ट्रीय विकास परिषदेच्या शिफारशीनुसार आतां, खेडे हा प्राथमिक घटक घेऊन त्या तत्त्वावर लहान स्वरूपाच्या सहकारी सेवा संस्था स्थापन करणें व सध्यांच्या कृषिविषयक पत संस्थांचें सहकारी सेवा संस्थांमध्यें पुनर्संघटना करणें व त्यांची त्याप्रमाणें पुनर्रचना करणें हें संघटनविषयक प्रयत्नांचें उद्दिष्ट असेल. ह्या नवीन ग्रामसंस्था संपूर्णतः सेवा सहकारी संस्था असतील आणि कर्ज, क्रयविक्रय, आणि पुरवठा यांसारखीं कामें व तशींच इतर सहसाध्य उपयुक्त अशी संबंधित कामें त्यांना हातीं घ्यावीं लागतील. चांगली व्यवस्था असलेल्या विद्यमान मोठ्या संस्थांत ढवळाढवळ करण्याचें योजिले नाहीं. सेवा सहकारी संस्था संघटित करण्याच्या कार्यक्रमास १९५९-६० मध्यें सुरुवात करण्यांत आली आणि त्या वर्षांत नवीन (२९३४) संस्थांचे संघटन करण्यांत येऊन किंवा कांहीं (६४७४) संस्थांचे पुनरुज्जीवन

किंवा रूपांतर करण्यांत येऊन एकूण ९,४०८ संस्था निर्माण करण्यांत आल्या. चिटणीसी खर्चादाखल ४,९८२ संस्थांना मदत द्यावयाचें उद्दिष्ट होतें. त्याऐवजीं ४,४९८ संस्थाना तशी मदत देण्यांत आली.

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस, सर्व खेडीं आणि ग्रामीण लोकसंख्येतील ७५ टक्के लोकसंख्या सहकारी कर्जविषयक कार्यक्रमाखालीं आणण्याचें उद्दिष्ट साध्य करण्याकरितां, १९५९-६० मध्यें प्रकर्षानें विकास करून हें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं सहा जिल्ह्यांची निवड करण्यांत आली होती, आणि १९६०-६१ मध्य त्याच कारणाकरितां आणखी ६ जिल्ह्यांची निवड करण्यांत येईल.

कुलाबा जिल्ह्याशिवाय सर्व जिल्ह्यांत जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँका आहेत. अलिबाग येथें जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक स्थापन करणें हें चालू वर्षाच्या कार्यक्रमाचें उद्दिष्ट आहे. अशा तऱ्हेनें योजनेच्या कालावधीच्या अखेरीस, प्रत्येक जिल्ह्याकरितां एक एक जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक असावी हें उद्दिष्ट पूर्ण होईल. १९५९-६० च्या अखेरपर्यंत योजनेंत नमूद केलेल्या अल्प मुदतीचीं कर्जें देणाऱ्या मध्यवर्ति अर्थसाहाय्य संस्थेच्या शाखा उघडण्याबाबतची प्रगती सुद्धां समाधानकारक आहे. ७५ शाखा उघडण्याच्या उद्दिष्टाऐवजीं प्रत्यक्षांत ८२ शाखा उघडल्या गेल्या असून, चालू वर्षात आणखी ३९ शाखा उघडल्या जाण्याची अपेक्षा आहे. कृषि-विषयक कर्जे देणाऱ्या प्राथमिक संस्थांची सभासद संख्या ६,९९,०००नीं वाढली असून चालू वर्षामध्यें सहकारी क्षेत्रांत आणखी ६ लाख सभासदांचा समावेश करण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणें द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस अल्प मुदतीच्या व मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या तरतुदीसंबंधींचें उद्दिष्ट पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. ह्या योजनेच्या पहिल्या चार वर्षांमध्यें, निरनिराळ्या पातळीवर अर्थसाहाय्याच्या रूपानें योजनेकरितां रु. ४२·२८ लाख इतका खर्च झालेला आहे; आणि भाग भांडवलांतील वर्गणीदाखल रु. ३७९·९ लाख इतका खर्च करण्यांत आला आहे. १९६०-६१ मध्यें अर्थसहाय्याच्या रूपानें अंदाजें रु. ३१·७९ लाख खर्च करण्याचें योजिलें असून, त्यापैकीं, सेवा सहकारी संस्थांकरितां रु. २०,९५,००० इतकी रक्कम आणि भाग भांडवलाच्या वर्गणीदाखल रु. १३३·३४ लाख, सेवा सहकारी संस्थांकरितां रु. ३३,३४,००० इतकी रक्कम असून जमीन गहाण ठेवणाऱ्या सर्वोच्च बँकांसाठीं तात्पुरती सोय म्हणून रु. १६,६७,००० एवढ्या रकमेची तरतूद केली आहे. १९६०-६१ करितां, योजनेखालीं ठरविलेलें प्रत्यक्ष उद्दिष्ट खालीं दिल्याप्रमाणें आहे:—

| | उद्दिष्टांबद्दलचा तपशील | १९६०-६१ करितां साध्य करावयाचें उद्दिष्ट | |
|---|---|---|---|
| (१) | सेवा सहकारी संस्थांची संघटना करणें ... ... | २,२७० | संस्था |
| (२) | संस्थांचें पुनरुज्जीवन करणें ... ... ... | ३६० | ,, |
| (३) | विद्यमान कृषिविषयक कर्जें देणाऱ्या संस्थांचें सेवा सहकारी संस्थेमध्यें रूपांतर करणें ... ... ... | ४,५३१ | ,, |
| (४) | नवीन सहकारी अर्थसहाय्य संस्था उघडणें ... ... | १ | ,, |
| (५) | स. अ. संस्थेच्या शाखा उघडणें ... ... ... | ३९ | शाखा |
| | **द्यावयाचीं कर्जें :—** | | |
| (६) | अल्प मुदतीचीं, लाख रुपयांत ... ... ... | ३,७३० | |
| (७) | मध्यम मुदतीचीं, लाख रुपयांत ... ... ... | ५४२ | |
| (८) | दीर्घ मुदतीचीं, लाख रुपयांत ... ... ... | ८१५ | |

### कृषिविषयक कर्जे ( कर्जनिवारण आणि हमी ) निधि आणि राज्य सहकारी विकास निधि :-

ग्रामीण पत पाहणी समितीच्या शिफारशीनुसार, सहकाराचा पुरस्कार करण्याकरितां, या राज्यांमध्यें निधीची स्थापना करण्यांत आली. सहकारी पत पेढ्यांनीं शेतकीविषयक कर्जे देण्याच्या सवलती मोठ्या प्रमाणांत वाढविल्यामुळें त्यांना जे धोके पत्करावे लागतील, त्यामुळें होणारें त्यांचें संभाव्य नुकसान भरून काढण्यासाठीं कृषिविषयक कर्जे ( कर्जनिवारण आणि हमी ) निधि सुरू केला आहे. तसेंच क्रयविक्रय आणि प्रक्रिया करणाऱ्या संस्थांना शेअर भांडवलांत वर्गणी देण्याकरितां, राज्य सहकारी विकास निधि सुरू करण्यांत आला आहे. कृषिविषयक कर्जे ( कर्जनिवारण आणि हमी ) निधींत वर्गणी देण्याकरितां १९६०-६१ मध्यें रु. ३·०० लाख एवढ्या रकमेची तरतूद करण्याचें योजिलें आहे. अलिकडेच या निधीच्या घटनेचे आणि प्रशासनाचे नियम तयार करण्यांत आले आहेत. या योजनेनुसार, या निधीकरितां देण्यांत आलेली वर्गणी ही योजनांतर्गत वांटणीपेक्षां जास्त झाल्यामुळें १९६०-६१ मध्यें, राज्य सहकार विकास निधीच्या योजनेकरितां कोणतीहि तरतूद करण्यांत आलेली नाहीं.

### धान्याच्या डेपोंचें संघटन :—

आदिवासीसहित मागासलेल्या जातींच्या सर्व लोकांना प्रत्येक वर्षाच्या ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यामध्यें त्यांचें लावणीचें काम पूर्ण झाल्यामुळें, उत्पन्नाचा दुसरा कोणताच मार्ग नसल्यानें, त्या कालावधींत त्यांना धान्य पुरवून मदत करण्याचें या योजनेचें उद्दिष्ट आहे. राज्यांतील विदर्भ आणि मराठवाडा या प्रदेशांनां ही योजना लागू करण्यांत आली आहे; आतांपर्यंत ३२३ धान्यडेपोंची संघटना करण्यांत आली असून सुमारें रु. ७·३४ लाख एवढी रक्कम कर्ज रूपानें मदतीदाखल देण्यांत आली आहे. चालू वर्षामध्यें जवळजवळ ५० धान्यांच्या डेपोंना मदत करण्याकरितां रु. २·०० लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

### सहकारी शेती :—

सहकारी शेतीचें संघटन करण्याच्या कार्यक्रमाला त्याच्या तिहेरी उद्दिष्टांमुळें विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे; तें असें :—

(१) कृषिविषयक उत्पादनांत वाढ;

(२) कृषिविषयक व त्याचप्रमाणें कृषिसंबंधित कार्यांत रोजगार मिळण्याच्या सोयींची वाढ करणें; आणि

(३) मागासलेल्या वर्गासह भूमिहीन लोकांच्या सामाजिक व आर्थिक समस्या सोडविणें.

१९६०-६१ च्या अखेरपर्यंत, योजनान्तर्गत उद्दिष्टाच्या ६५ संस्थाऐवजीं जवळजवळ १५२ शेतकी संस्था संघटित करण्यांत आल्या. चालू वर्षांत सुमारें ८५ शेतकी सहकारी संघटना करण्याचें योजिलें असून त्याकरितां रु. १२·६५ लाख एवढ्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

### सहकारी यंत्रसिंचन योजना:—

अधिक धान्य पिकवा मोहीम यशस्वी करण्यासाठीं, ज्या सहकारी संस्था यंत्रसिंचन योजना हातीं घेत आहेत, त्यांना आर्थिक साहाय्य देण्याचा ह्या कार्यक्रमाचा उद्देश आहे. राज्याच्या सर्व भागांतून ह्या

कार्यक्रम आतां समानतेनें लागू करण्यांत आला आहे. १९५९-६० सालअखेर पर्यंत सहकारी यंत्रसिंचन संस्थांनीं २१ योजना हातीं घेतल्या होत्या, आणि चालू वर्षी आणखी दहा योजना अंमलांत आणल्या जातील अशी अपेक्षा आहे. या योजनेनुसार आतांपर्यंत रु. २१·८५ लक्ष एवढी रक्कम खर्च करण्यांत आली असून चालू १९६०-६१ सालासाठीं ६·८८ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

### सहकारी मत्स्योद्योग:—

सहकारी विभागांतील लहान योजनांपैकीं ही एक योजना असून, मत्स्योद्योगाचा विकास करणें हा तिचा उद्देश आहे व त्यासाठीं मत्स्योद्योग सहकारी संस्थांना व्यवस्थाखर्चासाठीं अर्थसाहाय्य व कर्जे देण्याच्या त्यांच्या कार्याचा विस्तार करण्याकरितां सवलतीच्या दरानें कर्जे देण्यांत येतात. १९५९-६० अखेरपर्यंत सुमारें ३८ सहकारी मत्स्योद्योग संस्था संघटित करण्यांत येऊन त्यांना ६·५४ लक्ष रुपयांची कर्जे व अर्थसहाय्य अशा स्वरूपांत मदत देण्यांत आली. १९६०-६१ सालच्या कार्यक्रमांत इतर ७ मत्स्योद्योग संस्था संघटित करण्याचें अभिप्रेत आहे. व्यवस्थाखर्चासाठीं द्यावयाचें अर्थसाहाय्य आणि कर्जे मिळून ह्या वर्षी खर्च करावयाची रक्कम रु. ४·४१ लक्ष एवढी आहे.

### प्रक्रिया करणाऱ्या (साखर कारखान्यांखेरीज) आणि फळें व भाजीपाला टिकविणाऱ्या सहकारी संस्था :-

राष्ट्रीय विकास परिषदेनें आपल्या धोरणविषयक ठरावांत, प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्थांच्या विकासावर विशेष भर दिला आहे. १९५९-६० साल अखेरपर्यंत ४३ प्रक्रिया करणाऱ्या निरनिराळया प्रकारच्या ४३ संस्था संघटित करण्यांत आल्या. तसेंच शीतगृहाचे २ यंत्रसंच व फळें हवाबंद डब्यांत भरण्याचे ३ यंत्रसंच उभारले आहेत. कर्जे, अर्थसाहाय्य व भाग भांडवल अशा स्वरूपांत ह्या संस्थांना केलेली आर्थिक मदत, १९५९-६० साल अखेरपर्यंत, ४०·५३ लक्ष रुपये एवढी होती. १९६०-६१ सालच्या कार्यक्रमानुसार प्रक्रिया करणाऱ्या विविध तऱ्हेच्या इतर २२ सहकारी संस्था संघटित करण्याचें, तसेंच १ शीतगृह यंत्रसंच व फळें हवाबंद डब्यांत भरण्याचे ३ यंत्रसंच उभारण्याचें अभिप्रेत आहे. ह्या योजनेसाठीं १९६०-६१ सालीं रु. २·६७ लक्ष एवढी रक्कम खर्च करण्याचें योजिलें आहे.

### दुधाचें उत्पादन व वांटप करणाऱ्या संस्था :-

कांहीं मोठ्या शहरांतून व त्यांच्या जवळपास असणाऱ्या खेडयांतून सहकारी दुग्धालयें, सहकारी दूधसंघ, संयुक्त संस्था, प्रारंभिक दूध उत्पादक संस्था इत्यादींची स्थापना करून परवडणाऱ्या दरानें स्वच्छ, ताजें व निर्मळ दुग्ध पुरवितां यावें म्हणून सुसंघटित व शास्त्रशुद्ध पायावर दुग्धव्यवसायाची प्रगति करणें हा ह्या योजनेचा हेतु आहे. १९५९-६० अखेरपर्यंत २ संयुक्त संस्था, १० दूध संघ आणि ९२ पूरक संस्था संघटित करण्यांत येउन त्यांना कर्जे व अर्थसाहाय्य यांच्या रूपानें ९·८३ लक्ष रुपयांची मदत करण्यांत आली. १९६०-६१ सालीं दूध पुरविणाऱ्या ११ संस्था संघटित करावयाच्या असून त्यासाठीं १·८८ लक्ष रुपये खर्च करण्याचें योजिलें आहे.

### विदर्भांत सहकारी तत्त्वावर संत्र्यांचा क्रयविक्रयः-

नागपूर येथील विद्यमान मध्यप्रदेश ऑरेंज ग्रोअर्स असोशिअेशन या संस्थेस तिच्या शेअरभांडवलांत वर्गणी देऊन आणि व्यवस्थाखर्चासाठीं अर्थसहाय्य देऊन आर्थिक मदत देण्यासाठीं ही योजना आहे.

१९५९-६० च्या अखेरपर्यंत, ह्या संस्थेस शेअरभांडवल व व्यवस्थाखर्चासाठीं अर्थसहाय्य म्हणून १२·८० लक्ष रुपये देण्यांत आले. १९६०-६१ मध्यें या कार्यक्रमानुसार व्यवस्थाखर्चासाठीं अर्थसहाय्य म्हणून ६५,००० रुपये देण्याची तरतूद केली आहे.

**गुरांची पैदास करण्याचा धंदा करणाऱ्या भटक्या जमातींचें पुनर्वसनः—**

गुरांची पैदास करण्याचा धंदा करणाऱ्या रबारी आणि भारवड या जमातींचें पुनर्वसन करण्यासाठीं मूलतः ही योजना सुरूं करण्यांत आली होती. ही योजना गुजरातमधील जिल्ह्यांना लागूं केली होती. १९६०-६१ या चालूं सालीं वर्धा व औरंगाबाद जिल्ह्यांत ही योजना अमलांत आणण्याचें योजिलें आहे व या कालावधींत १·४९ लक्ष रुपये खर्च करण्याचें योजिलें आहे.

**नागपुरांतील दुग्धव्यवसायाचा विकासः--**

नागपूर शहर आणि त्याच्या आजूबाजूचीं खेडीं यांमध्यें संघटित आणि शास्त्रशुद्ध तत्त्वावर दुग्ध व्यवसायाचा विकास करणें या उद्देशानें जुन्या मध्यप्रदेश सरकारनें, अंदाजें २१·४४ लक्ष रुपये खर्चाची ही योजना तयार केली होती. ही योजना १९५९-६० सालीं पहिल्यानेंच अमलांत आणली गेली आणि या योजनेखालीं संघटित केलेल्या नागरी व ग्रामीण दुग्धव्यवसाय संस्थांना कर्जें व अर्थसहाय्य यांच्या रूपानें १·१० लक्ष रुपयांची रक्कम देण्यांत आली. या संस्थांना आर्थिक सहाय्य देण्यासाठीं, १९६०-६१ सालीं २·७७ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे.

**सर्वोदय विकासः-**

सर्वोदय विकास योजना १९४९-५० सालीं सुरूं करण्यांत आली. स्थानिक लोकांच्या सहकार्यानें सार्वजनिक उपयुक्ततेचीं कामें हातीं देण्यांत येतात आणि कार्यास लागणाऱ्या खर्चापैकीं २५ टक्के किंवा त्याहून अधिक रक्कम स्थानिक जनतेकडून रोख पैसे, मजुरी, सामुग्री इत्यादींच्या स्वरूपांत देतां येते. ह्या राज्यांत २६ सर्वोदय केंद्रें आहेत. १९६०—६१ सालीं ह्या केंद्रांना अनुदानें व आगाऊ रकमा देण्यासाठां १८·६२ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे.

**सहकारी साखर कारखानेः-**

सहकारी तत्त्वावर साखर कारखान्यांची संघटना ही एक अलीकडील घटना असून ती कृषिविषयक उत्पन्नाच्या प्रक्रिया क्षेत्रांत ऊंसाची लागवड करणाऱ्यांनीं दाखविलेला प्रारंभिक प्रयत्न दर्शविते. नोंदणी केलेल्या सहकारी साखर संस्था एकूण १५ असून, त्यापैकीं १२ संस्था १९५८—५९ च्या मोसमांत उत्पादन करूं लागल्या, व एक १९५९—६० च्या मोसमांत उत्पादन करूं लागली. राहिलेल्या २ संस्थांपैकीं, एक १९६०—६१ च्या मोसमांत व दुसरी १९६१-६२ च्या मोसमांत उत्पादन करू लागेल. चालू वर्षी आणखी ४ सहकारी साखर संस्था संघटित केल्या जातील अशी अपेक्षा आहे. १९६०-६१ सालीं संघटित करावयाच्या साखर कारखान्यांना भारत सरकारनें औद्योगिक परवाने मंजूर केल्यानंतर आणि आवश्यक ते शेअरभांडवल जमा झाल्यानंतर ताबडतोब, प्रत्येकीं २० लक्ष रुपये या हिशेबानें ह्या कारखान्यांना शेअर भांडवल मंजूर करण्यासाठीं तरतूद करावी लागेल.

## गृहनिर्माण आणि समाजकल्याण

**राज्य सहकारी गृहनिर्माणासाठीं द्रव्यबळ देणाऱ्या संस्थेच्या भागभांडवलांत वर्गणी देणें :—**

गेलीं आठ वर्षें 'राज्य सहकारी गृहनिर्माण अर्थसंस्था अस्तित्वांत आहे. आणि राज्यांतील संघटित केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना दीर्घ मुदतीचें आर्थिक सहाय्य मिळवून देण्याचें कार्य या

संस्थेकडे सोपविलें आहे. १९६०-६१ ह्या चालू आर्थिक वर्षी, ह्या संस्थेला ६७,००० रुपये भाग भांडवलाच्या वर्गणीदाखल देण्याची तरतूद करण्याचें योजिलें आहे.

**कमी उत्पन्नाच्या गटांसाठीं गृहनिर्माण योजना:—**

कमी उत्पन्नाच्या गटांच्या म्हणजेच ज्यांचें वार्षिक उत्पन्न ६,००० रुपयांपेक्षां कमी आहे अशा लोकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना भारत सरकारनें पुरस्कृत केलेल्या कमी उत्पन्नाच्या गटांच्या गृह-निर्माण योजनेखालीं वाजवी व्याजाच्या दरानें कर्जे देऊन मदत करण्यांत येत आहे. १९५९-६० च्या अखेरीस ३६९ गाळे बांधून तयार करण्यांत आले असून १९६०-६१ ह्या चालू वर्षी आणखी १०५ गाळे बांधून तयार होतील अशी अपेक्षा आहे. ह्या योजनेकरितां चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत, १०·४२ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजना:—**

ह्या योजनेप्रमाणें, कारखान्यांचे अधिनियम ज्यांना लागू होतात अशा औद्योगिक कामगारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था, कर्ज व अर्थसहाय्य ह्या मार्गानें आर्थिक मदत मिळविण्यास पात्र आहेत. आतांपर्यंत ह्या योजनेवर ७·३५ लक्ष रुपये खर्च झाला आहे, आणि १९६०-६१ सालांत ह्या योजनेवर आणखी ५·५५ लाख रुपये खर्च होतील अशी अपेक्षा आहे.

**मागासलेल्या वर्गासाठीं गृहनिर्माण योजना :—**

विमुक्त ज्ञाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती आणि इतर मागासलेल्या वर्गांच्या गृहनिर्माण संस्थांना बांधकामाच्या खर्चासाठीं स्थापनपरत्वें ठरविलेल्या श्रेणींच्या पद्धतीनुसार कर्जे व आर्थिक सहाय्य यांच्या रूपानें मदत देण्याचें ह्या योजनेचे उद्दिष्ट आहे. १९५९-६० सालापर्यंत अशा प्रकारच्या ६३ संस्थांना ४४·६४ लक्ष रुपयांची आर्थिक मदत देण्यांत आली आहे, १९६०—६१ ह्या चालू वर्षाकरितां ४३ संस्थांना आर्थिक मदत देण्यासाठीं म्हणून ९·८६ लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे.

**भटक्या व निमभटक्या जमातींसाठीं गृहनिर्माण योजना:—**

भटक्या व निमभटक्या जमातींच्या उन्नतिसाठीं केलेल्या योजनांपैकीं ही एक योजनाआहे. ह्या लोकांना राहण्यासाठीं घरें बांधण्याकरितां मदत देण्यासाठीं ही योजना आहे. १९५९-६० अखेरपर्यंत ४ गृहनिर्माण संस्थांना ३०,००० रुपयांची आर्थिक मदत दिलेली आहे; आणि १९६०—६१ सालांत आणखी ४ संस्थांना ८०,००० रुपयांपर्यंत मदत देण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

**अनुसूचित प्रदेशांतील सहकारी संस्थांचा विकास :—**

मुख्यत्वेंकरून अनुसूचित प्रदेशांतील मागासलेल्या वर्गांच्या उन्नतिसाठीं असलेल्या या योजनेप्रमाणें सहकारी संस्थांसाठीं कर्जे देण्याची व क्रयविक्रयाच्या सोयींचा विस्तार करण्यासाठीं त्या संस्थांना आर्थिक मदत दिली जाते. १९५९—६० अखेरपर्यंत ५७ सहकारी संस्थांना आवश्यक असलेली ४९,००० रुपयांची मदत दिली आहे. १९६०—६१ ह्या चालू वर्षांतील कार्यक्रमाप्रमाणें १५ संस्थांना मदत करण्यासाठीं ३५,००० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

१९६०—६१ सालांत निरनिराळ्या योजनांखालीं अंदाजपत्रकांत केलेल्या तरतुदी सोबत जोडलेल्या विवरण पत्रकांत दाखविल्या आहेत:—

द्वितीय पंचवार्षिक योजना, १९५६-६१.

१९६०-६१ सालचा सहकार विकास कार्यक्रम—आर्थिक रूपरेखा

महाराष्ट्र राज्य

( लाख रुपयांच्या आंकड्यांत )

| विकासाचे सदर | गट व योजना क्रमांक | योजनेचें नांव | १९६०-६१ सालासाठीं तरतूद | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नोकरवर्ग | अर्थसहाय्य | शेअर भांडवल | कर्जे | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| कृषि आणि समाज विकास | | वखारी आणि क्रयविक्रय | | | | | | |
| | ८३ | (१) क्रयविक्रयाची पहाणी व संशोधन. | ०·३१ | ... | ... | ... | ०·३१ | |
| | ८४ | (२) कृषिविषयक क्रयविक्रयाचा विकास. | ०·७१ | ०·७० | ... | १३·३० | १४·७१ | |
| | ८५ | (३) एकत्रित बाजार-वृत्त-सेवा. | १·०० | ... | ... | ... | १·०० | |
| | ८६ | (४) राज्य वखार कार्पोरेशन. | ... | ... | ... | ... | ... | १९६०-६१ सालासाठीं तरतूद केलेली नाहीं |
| | ८७, ८८ | (५) श्रेणींचा विकास. | ०·२३ | ... | ... | .... | ०·२३ | |
| | ८९, ९०, ९१ व २३५ | (६) सहकारी क्रयविक्रयाचा विकास. | १·४३ | ६·१० | १०·१७ | १९·०३ | ३६·७३ | |
| | | एकूण ... | ३·६८ | ६·८० | १०·१७ | ३२·३३ | ५२·९३ | |

## १९६०-६१ सालचा सहकार विकास कार्यक्रम-आर्थिक रूपरेखा (पुढें चालू)

| विकासाचे सदर | गट व योजना क्रमांक | योजनेचें नांव | १९६०-६१ सालासाठीं तरतूद: नोकरवर्ग | अर्थसहाय्य | शेअर भांडवल | कर्जे | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | **सहकार** | | | | | | |
| | २३० | (७) प्रशासन विषयक नोकरवर्गामध्यें वाढ. | ३८·७५ | ... | ... | ... | ३८·७५ | |
| | २३१ | (८) सहकारी प्रशिक्षण, शिक्षण आणि प्रचार. | २·०४ | २०·२१ | ... | ... | २२·२५ | |
| | २३२, २३३, २३४ २३५, २३६, २४० २४१, २४२ | (९) कृषिविषयक कर्जांची वाढ. | ... | ३१·७९ | ११३·३४ | १६·६७ | ३१·७९<br>१५०·०१ | |
| | २३८ | (१०) कृषिविषयक कर्जे (आर. आणि जी.) निधि. | ... | ३·०० | ... | ... | ३·०० | |
| | २३९ | (११) राज्य सहकार विकास निधि. | ... | ... | ... | ... | ... | १९६०-६१ सालासाठीं तरतूद केलेली नाहीं |
| | २४३ | (१२) धान्याचीं भांडारें | ... | ... | ... | २·०० | २·०० | |
| | २४४ | (१३) सहकारी शेती. | १·३३ | ३·०२ | ३·३४ | ४·७६ | १२·६५ | |
| | २४५ | (१४) सहकारी यंत्रसिंचन योजना. | २·३० | १·७५ | ... | २·८३ | ६·८८ | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २४७, २४९ आणि २५० | (१५) साखर कारखाने आणि फळें व भाजीपाला टिकविणाऱ्या सहकारी संस्थांखेरीज करून प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्था. | ०·१३ | ०·७८ | १६·७६ | ३·०० | २०·६७ | |
| | २४६ | (१६) सहकारी मत्स्योद्योग. | ०·१३ | ०·४६ | ... | ३·८३ | ४·४१ | |
| | २४८ | (१७) विदर्भांत संत्र्यांचा सहकारी क्रयविक्रय. | ... | ०·६६ | ... | ... | ०·६६ | |
| | २५१ | (१८) दूध उत्पादन आणि वांटप संस्था. | ०·४४ | ०·८८ | ... | ०·५६ | १·८८ | |
| कृषि व समाज विकास-चालू | २५३, २५४, २५५ | (१९) गुरांची पैदास करण्याचा धंदा करणाऱ्या भटक्या लोकांचें पुनर्वसन. | ०·०७ | ०·८४ | ०·३५ | ०·२३ | १·४९ | |
| | २५२ | (२०) विद्युत वांटप संस्था. | ... | ... | ... | ... | ... | १९६०-६१ पासून पुढें ही योजना बंद करण्यांत आली आली आहे. |
| | | एकूण ... | ४४·१३ | ६३·८७ | २०·४५ (११६·२३) | १७·२१ (१७·००) | १४५·६६ (१३३·२३) | |
| | | एकूण वखारी, क्रयविक्रय व सहकार ... | ४७·८१ | ७०·६७ | ३०·८२ (११६·२३) | ४९·५४ (१७·००) | १९८·६४ (१३३·२३) | |
| | | **पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास.** | | | | | | |
| | १४२ | (२१) विदर्भामध्यें दुग्धव्यवसायाचा विकास. | ०·१५ | ०·८४ | ... | १·७८ | २·७७ | |

## १९६०-६१ सालचा सहकार विकास कार्यक्रम–आर्थिक रुपरेखा (पुढें चालूं)

| विकासाचे सदर | गट व योजना क्रमांक | योजनेचें नांव | १९६०-६१ सालासाठीं तरतूद: नोकर वर्ग | अर्थ सहाय्य | शेअर भांडवल | कर्जे | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | **उद्योग व खाणकाम** | | | | | | |
| | ३७६ | (२२) सहकारी साखरकारखाने. | ... | ... | ... | ... | ... | |
| | | **समाजविकास/राष्ट्रीय विस्तार सेवा व ग्रामीण विकास.** | | | | | | |
| | २१९ | (२३) सर्वोदय विकास. | ०·२८ | १५·६४ | ... | २·७० | १८·६२ | |
| | | एकण... | ०·४३ | १६·४८ | ... | ४·४८ | २१·३९ | |
| | | **गृहनिर्माण** | | | | | | |
| | ६४८ | (२४) मुंबई गृहनिर्माण, अर्थसंस्थांच्या शेअर भांडवलांत वर्गणी देणें. | ... | ... | ०·६७ | ... | ०·६७ | |
| | ६४६ | (२५) कमी उत्पन्न असलेल्या गटासाठीं घरें बांधणें. | ... | ... | ... | १०·४२ | १०·४२ | |
| | २५६ व ६४२ (पी टी.) | (२६) अर्थसाहाय्यित औद्योगिक गृह–निर्माण. | ०·११ | १·७५ | ... | ३·६९ | ५·५५ | |

## समाजकल्याण.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६७२ (पी.टी.) | (२७) अनुसूचित प्रदेशांतील सहकारी संस्थांचा विकास. | ०·१० | ०·०९ | ... | ०·१६ | ०·३५ |
| ६७८ (पी.टी.) | (२८) मागासलेल्या वर्गासाठीं गृहनिर्माण संस्था. | ... | ३·८४ | ... | ६·०२ | ९·८६ |
| ६८२ (पी.टी.) | (२९) भटक्या व निम-भटक्या जमातींसाठीं गृहनिर्माण संस्था | ... | ०·३४ | ... | ०·४६ | ०·८० |
| | एकूण... | ०·२१ | ६·६२ | ०·६७ | २०·७५ | २७·६५ |
| | एकूण बेरीज... | ४८·४५ | ९३·५२ | ३१·२९ (११६·२३) | ७४·७७ (१७००) | २४८·०३ (१३३·२३) |

# कुटीर उद्योग विभाग

१ एप्रिल १९५७ पासून सरकारनें कुटीर उद्योग व औद्योगिक सहकारी संस्था विभाग अस्तित्वांत आणला असून त्याच्याकडे कुटीर उद्योगांचा विकास करणें व औद्योगिक सहकारी संस्था प्रस्थापित करण्यास प्रोत्साहन देणें हीं कामें सोंपविण्यांत आलीं आहेत आणि ह्या विभागाच्या निर्मितीपासून कारागिरांना औद्योगिक सहकारी संस्थेमध्ये संघटित करण्याचें काम करण्यांत येत आहे.

१९६०-६१ ह्या वर्षी, सरकारनें द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजनांसाठीं सबंध मुंबई राज्याकरितां एकूण ११३·०२ लाख रुपयांची तरतूद केली आहे; यांपैकीं ७२·५२ लाख रुपये महाराष्ट्र राज्याच्या वांट्यास आले आहेत. द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या कित्येक योजना ह्या विभागाकडून अमलांत आणल्या जात असून, त्याचा मुख्य उद्देश म्हणजे कुटीर उद्योगांच्या तंत्रामध्यें सुधारणा घडवून आणणें, त्याचप्रमाणें ग्रामीण विभागामध्यें रोजगाराबाबत पुरेशा सोयी उपलब्ध करून देणें हा आहे. जुन्या मुंबई राज्याच्या विभागांतील सध्यां अमलांत आणल्या जात असलेल्या योजनांपैकीं सुमारें १०६ योजना ह्याखालील सदरांमध्यें स्थूल मानानें विभागल्या आहेत.

(१) औद्योगिक सहकारी संस्था.
(२) हातमाग उद्योग.
(३) यंत्रमाग उद्योग.

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत औद्योगिक संस्थांच्या क्षेत्रांत प्राथमिक स्तरावर महत्त्वपूर्ण प्रगति झालेली आहे. राज्यामधील एकंदर १·८ लाख हातमागांपैकीं ८०,००० माग सहकारी गटांत येतात. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालांत विणकरांच्या १३० सहकारी संस्था स्थापन करण्याचें उद्दिष्ट असतांना, त्या कालांत १४७ संस्था संघटित करण्यांत आल्या आहेत. ह्या योजनेखालीं औद्योगिक सहकारी संस्थांच्या शेअर भांडवलांत वर्गणी देण्याच्या योजनेखालीं १९५९-६० च्या अंदाजपत्रकांत ७·११ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली होती, व १९६०-६१ सालीं ७ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली असून, त्यांपैकीं ६·२५ लाख रुपये महाराष्ट्राकरितां आहेत.

हातमाग उद्योग विकासासाठीं १९६०-६१ सालीं ४२·५० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे, त्यांपैकीं खालील रकमा ह्या महाराष्ट्र राज्याकरितां राखून ठेवण्यांत आल्या आहेत :—

| | | | |
|---|---|---|---|
| अनुदान | ... | ... | रु. २५·७० |
| कर्ज | ... | ... | रु. ६·७५ |
| | | एकूण | रु. ३२·४५ |

यंत्रमाग उद्योगासंबंधानें, द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत, ३,१०० माग बसविण्यासाठीं एकत्रित मुंबई राज्याला आर्थिक सहाय्य देण्यास भारत सरकारनें मंजुरी दिली होती. १९५७-५८ वर्षाच्या शेवटीं शेवटीं ही योजना अंमलांत आणण्यासाठीं हातीं घेतली गेली. आतांपर्यंत १,००७ यंत्रमाग मंजूर करण्यांत आले आहेत, त्यांपैकीं अंदाजें ८०० माग यापूर्वींच बसविले गेले आहेत व उरलेले बसविले जात आहेत. आतांपर्यंत ६७ सहकार संस्थांना १,००७ यंत्रमाग बसविण्यासाठीं, कर्जाच्या रूपानें ४६ लाख रुपये व

अनुदानाच्या रूपानें २·१७ लाख रुपये देण्यांत आले आहेत. १९६०-६१ सालीं, नवीन महाराष्ट्र राज्यांत ३३५ माग बसविण्याचें योजिलें आहे, व त्याकरितां कर्जाच्या रूपानें १४·९९ लाख रुपये व अनुदानाच्या रूपानें ०·८० लाख रुपये खर्च केले जातील.

कुटीर उद्योगाचं क्षत्र मोठें असल्यामुळें, सरकारला खादी, अंबर-चरखा, तेल, ताडाचा गूळ, इ. ग्रामोद्योग, मुंबई ग्रामोद्योग मंडळ ह्या संस्थेसारख्या वैधानिक संस्थांकडे सोंपविण्याची गरज भासली. महाराष्ट्र राज्यांतील औद्योगिक सहकारी संस्थांची संख्या, २,००० च्या बरीच वर असून त्यांची सदस्य संख्या १,५०,००० आहे.

ग्रामीण भागांत इतस्ततः विखुरलेल्या कारागिरांना व हस्त व्यावसायिकांना सहकारी संस्थेमार्फत एकत्र आणण्यांत आलें असून आतां ते लोक आर्थिक मदत, तांत्रिक मार्गदर्शन, सुधारलेल्या हत्यारांचा व उपकरणांचा उपयोग व तयार मालाच्या विक्रीच्या सोयी इत्यादींबाबत या विभागाच्या निरनिराळ्या योजनांखालीं देण्यांत आलेल्या सोयींचा लाभ घेऊं शकतात. औद्योगिक सहकारी संस्थांमध्यें हातमाग विणकर सदस्यांची संख्या सर्वांत जास्त आहे.

---

# कायदा व न्यायदान विभाग

१. कायदा व न्यायदान विभागाचीं कार्यें तांत्रिक स्वरूपाचीं असून त्यांत मुख्यतः खालील गोष्टींचा समावेश होतो—

(१) सरकारला व विभाग प्रमुखांना विधिविषयक सल्ला देणें.

(२) ज्या दाव्यांमध्यें सरकारचे किंवा सरकारी अधिकाऱ्यांचे संबंध किंवा हितसंबंध असतील, अशा दिवाणी व फौजदारी दाव्यांचें कामकाज चालविणें व त्यावर देखरेख ठेवणें. यामध्यें सर्वोच्च न्यायालयांतील लेखी हुकुमांचा व अपीलांचा समावेश होतो.

(३) राज्याला नेमून दिलेले विषय व समवर्ती विषय यासंबंधीच्या नव्या कायद्याबाबतचे मसुदे तयार करणें व इतर तांत्रिक गोष्टी व त्यासंबंधी सरकारला कायदेशीर सल्ला देणें.

(४) राज्यविधानसभेच्या सभासदांचे पगार, भत्ते, अधिकार, हक्क व स्वातंत्र्य, इत्यादि, राज्याच्या विधानसभेच्या कार्यपध्दतीचे नियम आणि संसदेशीं संबंधित असलेल्या गोष्टी.

(५) राज्याच्या सर्व कायदेविषयक अधिकाऱ्यांच्या नेमणुका, मेहनताने, फी, अंदाजपत्रक, इत्यादि.

(६) विधि विभागानें संपादित केलेल्या ग्रंथांची फेरतपासणी आणि अधिनियम, स्थानिक नियम व आदेश यांचें पुनर्मुद्रण.

(७) हुकुमनाम्यांतील कोणत्याहि वसूल न झालेल्या रकमा बुडीत खातीं टाकणें.

(८) राज्यांतील सरकारी हस्तांतरणांसंबंधीचें सर्व काम.

(९) ॲडमिरॅलिटी अधिकार दावे व आज्ञापत्रें आणि विधिविषयक व्यवसाय व १९५२ चा नोटरीज अधिनियम.

(१०) मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० ची अंमलबजावणी, धर्मादाय देणग्या अधिनियम, १८९० आणि संस्थाच्या नोंदणीबाबतचा अधिनियम, १८६० या अधिनियमांच्या संदर्भात विचारार्थ येणारी प्रकरणें.

(११) न्यायदान विभागाचें अंदाजपत्रक, हिशेबांचा मेळ, न्यायालयासाठीं जागा व इमारती, न्यायदान विभागाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या नोकरीच्या अटी, उपविभागीय मॅजिस्ट्रेट आणि विशेष कार्यकारी मॅजिस्ट्रेट यांच्या नेमणुका व क्रिमिनल प्रोसिजर कोडखालील अधिकाऱ्यांची तपासणी.

(१२) न्यायालयविषयक कायदे, न्यायालयांची स्थापना व त्यांच्यासाठीं नोकरवर्ग (फर्निचर व लेखनसाहित्य यांचा पुरवठा) मंजूर करणें, विनंतिपत्रें, कमिशनें इत्यादि.

१९५५ पासून १९५९ च्या अखेरपर्यंत विभागांत आलेल्या व निकालांत काढलेल्या बाबींची संख्या पुढीलप्रमाणें होती :–

| | आवक | जावक |
|---|---|---|
| १९५५ | ४३९७८ | ३१६९४ |
| १९५६ | ४९९४९ | ३०८६६ |
| १९५७ | ५०४७८ | ३६१२९ |
| १९५८ | ५७१२७ | ४१८१६ |
| १९५९ | ६१८८८ | ४१७९४ |

२. ह्या विभागातर्फे विनामूल्य विधिविषयक सहाय्य देण्याच्या खालील सहा योजन चालविण्यांत येत आहेत :–

(१) अनुसूचित जमातींच्या लोकांना विनामूल्य विधिविषयक सल्ला देण्याची एक योजना ह्या विभागाकडून बऱ्याच वर्षांपूर्वी तयार करण्यांत आली असून सध्यां ती संपूर्ण राज्यांत चालूं आहे. स्वतःच्या हक्काविषयीं कित्येकवेळां अज्ञानांत असलेल्या अनुसूचित जमातींना कांही प्रमाणांत संरक्षण देण्याचा या योजनेचा उद्देश आहे. ह्या योजनेन्वयें, जर अनुसूचित जमातींतील एखाद्या इसमाविरुद्ध कोणताहि दिवाणी दावा किंवा मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ या अन्वयेचा कोणताहि दावा दाखल करण्यांत आला असेल किंवा जर असा इसम कोणत्याहि सरकारी अधिकाऱ्यासमोर दुसऱ्या पक्षातर्फे वकील देण्यांत आलेल्या कोणत्याहि दाव्यांतील पक्षकार असेल, तर त्या न्यायालयानें किंवा अधिकाऱ्यानें अशा दाव्यामध्यें अशा इसमाकरितां एक वकील नेमून देणें आवश्यक आहे. चालूं आर्थिक वर्षांत ११ प्रकरणांत कायदेविषयक सहाय्य देण्यांत येऊन त्याबाबत ५२५·७२ रुपये इतका खर्च करण्यांत आला. ह्या योजनेकरितां ७०० रुपयांची तरतूद केली आहे.

(२) अनुसूचित जमातींतील ज्या इसमांकडून किंवा इसमांविरुद्ध फौजदारी दावा दाखल करण्यांत येतो त्या इसमांच्या बाबतींत कायदेविषयक सहाय्य देण्याची वरील योजना लागू होत नाहीं म्हणून अनुसूचित ज्या लोकांना एखाद्या गुन्हेगाराविरुद्ध फौजदारी दावे दाखल करण्याची इच्छा असेल किंवा ज्यांचेविरुद्ध फौजदारी दावे दाखल करण्यांत आले असतील अशा लोकांना योग्य खटल्यामध्यें विनामूल्य कायदेविषयक सहाय्य देण्याची एक नवीन योजना तयार करण्यांत आली, ती संपूर्ण राज्यांत चालूं आहे. चालूं आर्थिक वर्षांत ४३ खटल्यामध्ये कायदेविषयक सहाय्य देण्यांत येऊन त्याबाबत रु. २,२४९ एवढा खर्च झाला. या योजनेसाठीं ७०० रुपयांची तरतूद केली आहे.

(३) इतर मागासलेले वर्ग किंवा अनुसूचित जमाती यांच्या यादींत पूर्वीच अंतर्भूत नसलेल्या जवळजवळ सर्व गुन्हेगार जमातींचा, सन १९२४ चा गुन्हेगार जमातींबाबत अधिनियम रद्द करण्यांत आल्यापासून त्या यादींत अंतर्भाव करण्यांत आला असून या

राज्यात मागासलेल्या वर्गाना देण्यात येणाऱ्या सर्व शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सवलती मिळण्यास त्यांना पात्र ठरविण्यांत आलें आहे. आतां मागासलेल्या वर्गांच्या यादींत अंतर्भूत करण्यांत आलेल्या विमुक्त जातीतील (पूर्वीच्या गुन्हेगार जमाती) लोकांना कायदेविषयक सहाय्य देण्याची कोणतीहि योजना नव्हती आणि अनुसूचित जमातींना देण्यांत येणाऱ्या कायदेविषयक सहाय्याचा त्यांना लाभ घेतां येत नाहीं. यामुळें, सरकारनें विमुक्त जमातींतील (पूर्वीच्या गुन्हेगार जमाती) इसमांना योग्य प्रकरणी विनामूल्य विधिविषयक सहाय्य देण्याची एक योजना तयार केली आहे व ती संपूर्ण राज्यांत चालू आहे. चालू आर्थिक वर्षात केवळ एकाच प्रकरणांत विधिविषयक सहाय्य देण्यांत आलें व त्याबाबत रु. ३४ एवढा खर्च करण्यांत आला. या योजनेसाठीं १६०० रुपयांची तरतूद केली आहे.

(४) पिण्याचें पाणी घेऊं न देणें, मंदिरांत प्रवेश करूं न देणें, उपहारगृहामध्यें प्रवेश करूं न देणें इत्यादि गोष्टी करून अस्पृश्यतेचें पालन करण्याच्या ज्या बाबींमध्यें हरिजनांना त्रास सोसावा लागला असेल त्याबद्दल भरपाईची मागणी करण्याचे दिवाणी दावे दाखल करण्याची ज्या हरीजनांची इच्छा असेल त्यांना विनामूल्य कायदेविषयक सहाय्य देण्याची योजना ३० ऑगस्ट १९५८ पासून सुरू करण्यांत आली आहे. चालू आर्थिक वर्षात या योजनेसाठीं २,००० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

(५) हरिजनांना कायदेविषयक सहाय्य देण्याची व्यवस्था प्रत्येक राज्यांत झाली पाहिजे अशी शिफारास मध्यवर्ती हरिजन कल्याण सल्लागार मंडळानें केली. भारत सरकारनें ह्या शिफारसीचा स्वीकार करून चालू वर्षाच्या योजनेंत ह्या बाबीकरितां तरतूद करण्याची राज्य सरकारला विनंति केली. त्याप्रमाणें, अनुसूचित जातींमधील ज्या इसमांचें वार्षिक उत्पन्न १,८०० रुपयांपेक्षां अधिक नसेल आणि ज्यांना दिवाणी किंवा फौजदारी खटले दाखल करावयाचे असतील किंवा अशा खटल्यांत स्वतःचा बचाव करावयाचा असेल त्यांना विनामूल्य कायदेविषयक सहाय्य देण्याची योजना ३० ऑक्टोबर १९५८ पासून सुरू करण्यांत आली आहे. चालू आर्थिक वर्षात या योजनेसाठीं ६००० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

(६) जे गरीब असलेले आरोपी इसम त्यांच्या गरीबीमुळें सेशन्स खटल्यांत त्यांचा बचाव करण्यासाठीं वकील नेमूं शकत नसतील त्यांना विधिविषयक सहाय्य देण्याच्या दृष्टीनें एकत्रित मुंबई राज्याच्या सर्व जिल्ह्यांत १ एप्रिल १९५९ पासून एक योजना चालू करण्यांत आली आहे. १,८०० रुपयांपेक्षां जास्त वार्षिक उत्पन्न नसलेले जे गरीब आरोपी इसम जिल्ह्यांतील सेशन्स खटल्यांत स्वतःचा बचाव करूं शकत नसतील त्यांना या योजनेन्वयें विनामूल्य विधिविषयक सहाय्य देण्यांत येतें. १९५९-६० या आर्थिक वर्षात योजनेच्या अंदाजपत्रकांत २१,६०० रुपयांची तरतूद करण्यांत आली व ८,०३३ रुपयांइतका खर्च करण्यांत आला. राज्याचें विभाजन झाल्यानंतर ही योजना

संपूर्ण महाराष्ट्र राज्यांत चालू ठेवली आहे आणि पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या या योजनेदाखल १९६०-६१ मध्यें योजनेच्या अंदाजपत्रकांत १४,६६० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

३. वर उल्लेखिलेल्या सहाहि योजना १९६०-६१ या वर्षात संपूर्ण राज्यांत चालू ठेवण्यांत आल्या आहेत. द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या योजनांत त्यांचा अंतर्भाव केला आहे.

४. दिवाणी दावे:—

१९५९ या वर्षात उच्च न्यायालयांत सरकारविरुद्ध दाखल केलेल्या दाव्यांची संख्या ६ होती आणि लेखी विनंति अर्जांची संख्या $\frac{४२९}{\text{खास दि. अ.}}$ अधिक $\frac{७५}{\text{संकीर्ण विनंति अर्ज}}$ = ५०४ होती. सरकारविरुद्ध शहर दिवाणी न्यायालयांत दाखल केलेल्या दाव्यांची संख्या ७१ होती व लघुवाद न्यायालयांत दाखल केलेल्या दाव्यांची संख्या ९ होती. सर्वोच्च न्यायालयांत सरकारविरुध्द १४ लेखी विनंति अर्ज दाखल करण्यांत आले होते. त्यांची दखल घेण्यांत आली.

उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले महत्त्वाचे निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

(१) जमा ठरवून घेण्याची मुदत संपल्यानंतर, जमेच्या रकमेऐवजी संपूर्ण कर आकारणी करण्याच्या सरकारच्या हक्कांस हरकत घेणारे, तालुकदारी भूसत्ताप्रकार रद्द करण्याबाबतच्या अधिनियमान्वयें केलेले तीन लेखी विनंती अर्ज सर्वोच्च न्यायालयाकडून फेटाळून लावण्यांत आले.

(२) वाघाच इस्टेटीच्या तालुकदारानें एक लेखी अर्ज सादर केला होता आणि त्यांत उच्च न्यायालयानें सरकारविरुद्ध निर्णय दिला असून त्याच्या स्वतःच्या मालकीच्या जंगलांतील झाडांवरील त्याचा हक्क शाबित केला व त्याद्वारें अशा जंगलांतील झाडें, विलीन क्षेत्रें व प्रदेश ( जहागिरी रद्द करणें ) याबाबत अधिनियम याच्या ७ व्या कलमान्वयें, सरकारकडे तबदील करण्यांत आलेलीं नाहींत असा निर्णय दिला आहे. या विभागानें अगोदरच व्यक्त केलेल्या मतास उच्च न्यायालयाच्या निकालपत्रामुळें बळकटी आलेली आहे.

(३) सन १९४८ च्या मुंबई कुळवहिवाट अधिनियमान्वयें, एखादा इसम हा कूळ नाहीं असें घोषित करण्यासाठीं जमीनमालकानें केलेल्या अर्जाचा निकाल मामलेदार देऊं शकतो असा निर्णय मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या फुलबेंचनें दिलेला आहे.

(४) मुंबई कुळवहिवाट अधिनियमाचें सन १९५६ चा मुंबईचा अधिनियम क्र. १३ यानुसार दाखल केलेलें कलम ८४ सी हे, म्हणजेच बेकायदेशीरपणें हस्तांतरण केल्याबद्दल दंड करून, विक्रीचें उत्पन्न जप्त करण्याबाबतची तरतूद अवैध असल्याबाबतचा निर्णय मुंबई येथील उच्च न्यायाल्याने दिला. ही तरतूद गैरवाजवी व घटनेचीं कलमें १९ (१) (एफ) व ३१ यांस बाध आणणारी आहे असें ठरविण्यांत आलें.

(५) स्वत: शेती करणें याचा खास अर्थ घेऊन स्वत: शेती करण्यासाठीं कुळवहिवाट रद्द करण्याचा विधवेचा हक्क कुळवहिवाट अधिनियमाचें कलम ३१ असून देखील उच्च न्यायालयानें मान्य केला.

(६) उच्च न्यायालयांतील सन १९५३ चा दावा क्र.९२ बैरामजी जीजीभाई लिमिटेड, विरुद्ध मुंबई राज्य यांत सरकारला यश मिळालें व साष्टी बेटांतील वादीच्या खेड्यांना, सन १९४१ चा मुंबई साष्टी इस्टेट ( जमीन महसुलांची सूट रद्द करण्याबाबत ) अधिनियम लागू पडतो असा न्यायालयानें निर्णय दिला आहे.

(७) मजदूर महाजन संघ, विरुद्ध भारत विजय मिल्स व इतर या दाव्यांत, विलीन प्रदेशांतील सुती कापडाच्या व्यवसायास सन १९४७ चा मुंबईचा औद्योगिक संबंधांबाबत अधिनियम लागू आहे असा औद्योगिक न्यायालयानें निर्णय दिला.

बेकारीचें निवारण करण्याच्या योजना म्हणून सरकारनें पट्ट्यावर चालवावयास घेतलेल्या नरसिंगगिरजी मिल्स, लिमिटेड, सोलापूर. सक्सेरिया मिल्स, मुंबई. धनराज मिल्स, मुंबई व कारभार गुंडाळण्यात आलेली नागपूरची मॉडेल मिल्स ह्यांच्या बाबतींतील महत्त्वाचे व्यवहार व बाबी यांच्याकडे लक्ष पुरविलें गेलें.

५. १९५९ या वर्षांत जिल्हा न्यायालयांत मुंबई राज्याविरुध्द दाखल केलेल्या दाव्यांची एकूण संख्या ९२९ इतकी होती व अपिलें व इतर संकीर्ण खटले यांची संख्या ७०५ इतकी होती. त्याच काळांत, ९०१ खटल्यांमध्यें सरकारतर्फे बचाव करण्यांस मंजूरी देण्यांत आली. या खटल्यांमध्यें १९५८ या वर्षांत दाखल केलेल्या खटल्यांपैकीं, त्यावर्षीं निकाल न लागलेल्या ९८ खटल्यांचा अंतर्भाव होतो. तसेंच, या मुदतींत ७६ दावे दाखल करण्यास सरकारकडून मंजुरी देण्यांत आली. ( ह्या आंकड्यांत सौराष्ट्र व कच्छ, विदर्भ व मराठवाडा या प्रदेशांतील दाव्यांचा समावेश होत नाहीं. )

६. **फौजदारी अपिलें व अर्ज:—**

१९५९ या वर्षांतील व दि.१-१-१९६० ते ३०-४-१९६० या मुदतींतील अपिलांचा व अर्जांचा सारांश पुढें दिला आहे.

| वर्ष. | निर्दोषी म्हणून सोडून देण्याच्या आदेशां-विरुद्ध अपिलें करण्या-साठीं सादर केलेल्या प्रस्तावांची संख्या ( हायकोर्टाकडून व खाजगी पक्षांकडून विचारार्थ आलेल्या बाबींचा यांत समा-वेश होतो ). | दाखल केलेल्या अपिलांची संख्या. | फेरतपासणी अर्ज दाखल करण्यासाठीं सादर केलेल्या प्रस्ता-वांची संख्या. | दाखल केलेल्या फेर-तपासणीच्या अर्जांची संख्या. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १९५९ | ११४१ | ४९१ | १९३ | १६२ |
| १९६० ( १ जानेवारी ते ३० एप्रिल) | ४०४ | १०३ | ४८ | १७ |

याशिवाय, या विभागानें भारताच्या सर्वोच्च न्यायालयांत ३९ दाव्यांत खास परवानगी-बाबतचे विनंति अर्ज दाखल केले व आरोपी इसमांनीं सरकारविरुद्ध केलेल्या ६९ विनंति अर्जांना विरोध केला. संकीर्ण विनंति अर्ज धरून, आरोपी इसमांनीं दाखल केलेल्या २६ अपिलांच्या मामल्यांत सरकारनें बचाव दाखल केला.

७. (१) कायदे करणें– १९५९-६० या वर्षांत ७६ अधिनियम संमत झाल्यानंतर प्रकाशित करण्यांत आले. ह्या अधिनियमांत एकत्रीकरणाच्या व व्याप्ति वाढविण्याच्या ३२ कायद्यांचा समावेश होतो. मे १९५९ पासून ८१ बिलांचे (कायद्याच्या एकत्रीकरणाची व व्याप्ति वाढविण्याची २६ विधेयकें धरून) मसुदे तयार करण्यांत येऊन ते संबंधित विभागांना पुरविण्यांत आले. सर्व वैध अधिसूचना, नियम, आदेश, इत्यादि या विभागानें प्रथम सूक्ष्म तपासणी केल्यानंतर प्रशासकीय विभागांकडून काढण्यांत येतात.

(२) **कायद्याचें एकीकरण:**

राज्याच्या व केंद्र सरकारच्या विविध कायद्यांचें एकत्रीकरण करण्याच्या व ते लागू करण्याच्या कामांत बरीच प्रगती झालेली आहे. १९५६ पासून आतांपर्यंत ८६ अधिनियमांचें एकत्रीकरण करण्यांत आलें आहे. याशिवाय अगोदर नमूद केल्याप्रमाणें कायद्यांचें एकत्रीकरण व विस्तार करण्याकरितां व ते लागू करण्याकरितां २६ बिलांचे मसुदे तयार करून संबंधित विभागांना पाठविण्यांत आले. ज्या उपाययोजनांचें एकत्रीकरण झालें आहे, अशा उपाययोजनां-खालील दुय्यम कायद्यांचे एकत्रीकरण करण्याच्या कामाकडेहि लक्ष पुरविलें गेलें.

गृहनिर्माण मंडळ, वैद्यकीय अधिनियम, वैद्यकीय व्यवसायी, मुलें, भाडें, इमारती (नियंत्रण व बांधणी) औद्योगिक संबंध, लहान बंदरें, जमीनमहसूल, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, स्थानिक मंडळें, जलसिंचन, कृषिविषयक उत्पादनांचें बाजार, जिल्हा नगरपालिका व बरो नगरपालिका, कोर्ट ऑफ वॉर्डस्, मच्छिमारी व वेतन देणें, याबाबतच्या कायद्यांच्या एकत्रीकरणावर देखील सरकार कसोशीनें विचार करीत आहे.

(२ए) **कायद्याचें अनुकूलन :**

१ मे १९६० रोजीं अनुकूलन आदेश काढतां यावे म्हणून संपूर्ण मुंबई संहितेचें [१९४८ सालच्या अधिनियमांव्यतिरिक्त] गुजराथ व महाराष्ट्र या दोहोंसाठीं अनुकूलन करून घेण्यांत आले. इतर अधिनियम व इतर संहिता आणि केंद्रीय अधिनियमांचें अनुकूलन करण्या-बाबतचें काम चालू आहे.

(३) **वैधानिक कार्पोरेशन आदेश :**

मुंबई राज्याचे लवकरच होणारें विभाजन लक्षांत घेतां, संबंध मुंबई राज्यांत काम करीत असलेलीं व विभाजनानंतर जीं आंतरराज्यीय मंडळें झालीं असतीं अशा कांहीं विद्यमान वैधानिक कार्पोरेट मंडळांच्या जागीं [ उदा० मुंबई गृहनिर्माण मंडळ, खार जमिनी विकास मंडळ, चॅरिटी कमिशनर, मुंबई, मुंबई कामगार कल्याण मंडळ, व माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळ ] महाराष्ट्र व गुजराथ प्रदेशासाठीं तशाच स्वरुपाची वेगवेगळी कामें

करण्यासाठीं तत्सम प्रादेशिक मंडळें प्रतिस्थापित करणें आवश्यक असल्याचें आढळून आले. म्हणून १९५६ सालीं ज्याप्रमाणें आंतरराज्यीय कार्पोरेशन्स होतीं त्याप्रमाणें न होतां या दोन्हीं राज्यांत वेगवेगळ्या कार्पोरेन्शचें काम अगोदरपासूनच सुरू झालें.

(४) **प्रकाशन :**

(ए) ह्या कालावधीमध्ये मुंबई संहितेच्या रिप्लेसमेन्ट सेरीज क्र. २१ व २२ मुद्रित करण्यांत आली. ग संहितेच्या रिप्लेसमेन्ट सेरीज क्र. २३ व २४ ह्यांचे मुद्रण चालूं आहे. हैद्राबाद संहितेच्या रिप्लेसमेन्ट सेरीज प्रसिद्ध करण्याचेहि योजिलें आहे.

(बी) मुंबई अधिनियम व विनियम ह्यांची सूचि सुधारली जाऊन छापण्यांत आली.

(५) **भाषांतरें :**

(ए) मुंबई अधिनियम:– ७१ मुंबई अधिनियम व ९० बिलें यांचे मराठी, गुजराथी आणि हिंदींत भाषांतर करण्यांत आलें.

(बी) केन्द्रीय अधिनियम :– ४६ व ४१ केन्द्रीय अधिनियमांचे अनुक्रमें मराठींत व गुजराथींत भाषांतर करण्यांत आलें.

(सी) नियम, आदेश, अधिसूचना:–नियम, आदेश, आणि अधिसूचना ह्यांच्याशीं संबंधित अशा ११६ बाबींचे मराठींत, ११६ बाबींचे गुजराथींत व १०७ बाबींचे हिंदींत भाषांतर करण्यांत आलें.

**(१) मुंबईच्या सार्वजनिक विश्वस्थ अधिनियम, १९५० चें कामकाज.**

८. **(ए) सामान्यः––**

मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० हा तारीख २१ जानेवारी १९५२ पासून अंमलांत आला आहे. सदर अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठीं बृहन्मुंबई, अहमदाबाद, बडोदे, पुणें, कोल्हापूर आणि बेळगांव असे सहा प्रदेश निर्माण करण्यांत आले होते. बृहन्मुंबई आणि अहमदाबाद हे प्रदेश नायब धर्मादाय कमिशनरच्या अधिकाराखालीं होते तर उरलेले चार प्रदेश सहाय्यक धर्मादाय कमिशनरच्या अधिकाराखालीं होते. राज्यपुनर्रचना अधिनियम १९५६, अंमलांत आल्यामुळें अहमदाबाद प्रदेशाच्या अबू तालुक्याचा भाग व बेळगांव प्रदेशाचा भाग हे अनुक्रमें राजस्थान आणि म्हैसूर राज्याचे भाग झाले आहेत. भारत सरकारनें मुंबई सार्वजनिक विश्वस्त ( कार्पोरेशन ) आदेश १९५९, नांवाचा आदेश काढल्यामुळे हे प्रदेश १ एप्रिल १९५९, धर्मादाय कमिशनर, मुंबई यांच्या अधिकारक्षेत्राखालीं राहिले नाहींत. मुंबई वैधनिक कार्पोरेशन ( प्रादेशिक पुनर्रचना ) अधिनियम, १९६०, याअन्वयें, १९६० च्या मुंबई पुनर्रचना अधिनियमांतील कलम ३ [१] यांत नमूद केलेले, सौराष्ट्र व कच्छ प्रदेश यांच्या व्यतिरिक्त, प्रदेश निर्माण करण्यांत आले, आणि २८ एप्रिल १९६० रोजीं महाराष्ट्र प्रदेशासाठीं एक व गुजरात प्रदेशासाठीं एक याप्रमाणें दोन धर्मादाय कमिशनरांची निर्मिति करण्यांत आली. मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० अंमलांत आल्यानंतर, महाराष्ट्र राज्यांत ( १ ) बृहन्मुंबई ( २ ) पुणें व

(३) कोल्हापूर असे तीन प्रदेश आहेत. महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा व विदर्भ ह्या प्रदेशांत मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० लागू करण्याचें योजिले आहे आणि ह्यामुळें वरील तीन प्रदेशांशिवाय आणखी तीन प्रदेश निर्माण होतील.

**(बी) सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांची नोंदणीः-**

मार्च १९६० च्या अखेरपर्यंत, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० ह्या अन्वयें सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणीसाठीं धर्मादाय संघटनेकडे आलेल्या अर्जांची संख्या ( यांत ३१ मार्च १९५९ पर्यंत बेळगांव प्रदेशाचा समावेश होतो ) सुमारें ६०,३३१ इतकी होती. त्यापैकीं ५८,४८३ अर्ज निकालांत काढण्यांत आले. ३१ मार्च १९६० पर्यंत नोंदणी करण्यांत आलेल्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांची एकूण संख्या ५४,९९२ इतकी होती. ( यापैकीं १०,३१० बेळगांव प्रदशापैकीं होत ).

**(सी) हिशेबाचा गोषवाराः-**

धर्मादाय संघटनेने रु. १००० पेक्षां अधिक वार्षिक उत्पन्न असलेल्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या हिशेबाचे गोषवारे तयार करण्याचें काम हातीं घेतलें. सदर गोषवाऱ्यांत संबंधित कायदेविषयक तपशील, स्थावर मालमत्ता, अविक्रुत व इतर गुंतविलेल्या रकमा, रोख रक्कम, बँकेतील रक्कम, वार्षिक प्राप्ती आणि मिळालेल्या देणग्या, धार्मिक व इतर बाबीं-वरील खर्च आणि शिल्लक उरलेलें जादा उत्पन्न ह्या बाबी दर्शविल्या जातात. तथापि, ह्या गोषवाऱ्यांचा पुरेसा खप होत नसल्यामुळे व त्यांच्या छपाईला बराच कालावधी लागत असल्याचे आढळून आल्याकारणाने सदर प्रकाशनांच्या मुद्रणाचे काम बंद करण्यांत यावे असा निर्णय धर्मादाय संघटनेच्या अधिकाऱ्यांच्या जुलै १९५८ मध्ये भरलेल्या परिषदेंत घेण्यात आला. खालीं तपशील दिल्याप्रमाण १९५९-६० सालीं हिशेबाचे गोषवारे प्रसिद्ध करण्यांत आले आहेत :-

**१९५३ या वर्षाकरितां**

पुणें व कुलाबा जिल्ह्यांकरितां.

**१९५४ या वर्षाकरितां**

साबरकांठा व बनासकांठा जिल्ह्यांकरितां

**१९५५ या वर्षाकरितां**

अहमदाबाद व मेहसाणा जिल्ह्यांकरितां.

**(डी) जमलेली शिलकी रक्कम —**

जमलेल्या शिलकी उत्पन्नाचा उपयोग विश्वस्त निधींच्या उद्देशानुसार किंवा त्याच्याशीं सुसंगत अशा पद्धतीनें धर्मनिरपेक्ष शिक्षणासाठीं आणि/किंवा वैद्यकीय मदतीसाठीं करतां यावा या दृष्टीनें हिशेबतपासणी झालेल्या हिशेबाच्या विवरणपत्रांची तपासणी करण्याचें काम १९५९-६० मध्यें चालू ठेवण्यांत आले. १ एप्रिल १९५९ ते ३१ मार्च १९६० या कालावधींत, ५४ सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांबाबत चौकशी करण्यांत येऊन त्यांच्याकडे

६०,१४,३४४ इतकी शिल्लक रक्कम उरली असल्याची माहिती प्रादेशिक अधिकाऱ्यांनी दिली. यापैकीं ११ विश्वस्त व्यवस्थांनीं धर्मादाय कमिशनरचा सल्ला मान्य केला आणि रु. १,७६,००४ एवढी जमलेली शिल्लक विश्वस्त निधींची उद्दिष्टें पार पडण्याकरितां व रु. ३,१८,३८२ एवढी रक्कम धर्मनिरपेक्ष शिक्षणाकरितां खर्च करण्याचें कबूल केलें. १८ प्रकरणांत ५९ व्या कलमाखालीं नोटिसा देण्यांत आल्या व धर्मादाय कमिशनरनें ५५ व्या कलमाखालीं ८ प्रकरणांबाबत न्यायालयांत अर्ज दाखल केले आणि ५९ व्या कलमाखालीं नोटिसा मिळाल्यावर ३ प्रकरणांबाबतच्या विश्वस्त व्यवस्थांनीं निर्देशन मिळण्याकरितां न्यायालयांत अर्ज दाखल केले. प्रादेशिक अधिकाऱ्यांनीं चौकशी चालू ठेवली आहे.

### इ) विश्वस्त निधि गुंतविणें:—

विश्वस्त निधींचे गोळा झालेले आणि खर्च न केलेलें उत्पन्न अधिनियमाच्या कलम ३५ मधील तरतुदीनुसार रीतसर गुंतविण्यांत यावें या दृष्टीनें, भरीव वार्षिक उत्पन्न असलेल्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या हिशेबांची कसोशीनें व तपशीलवारपणें तपासणी करण्याचें कार्य ह्या संघटनेमार्फत चालूं होतें. १९५९-६० सालीं, सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांनीं धर्मादाय कमिशनरांच्या सांगण्यावरून ५,४०,३५० रुपयांची रक्कम, ४ टक्क्यांचीं ट्रेझरी बचत ठेवींची प्रमाणपत्रें व अल्पबचत योजनेनुसार १२ वर्षांची राष्ट्रीय योजना बचत प्रमाणपत्रें, यामध्यें गुंतविली.

### (एफ) दाव्यांबाबतचें काम:—

डिसेंबर १९५९ अखेरपर्यंतच्या वर्षांत मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० या अन्वयें धर्मादाय कमिशनर हे ज्यांमध्यें एक पक्षकार होते असे ३९६ दावे उच्च व इतर न्यायालयांत दाखल करण्यांत आले. यापैकीं २८ दावे धर्मादाय कमिशनरनें दाखल केले होते. या वर्षांत निकालात काढण्यांत आलेल्या दाव्यांची संख्या २१८ होती.

### (२) धर्मादाय देणग्या—

मुंबई विश्वस्त अधिनियम, १९५० च्या कलम ४३ अन्वयें, धर्मादाय कमिशनर हे धर्मादाय देणग्या अधिनियम, १८९० (१८९० चा अधिनियम ६ वा) च्या तरतुदीनुसार नेमण्यांत आलेले मुंबई राज्याचे धर्मादाय देणग्याचे खजिनदार असल्याचें समजण्यांत येतें व तसें ते नेहमींच काम करीत आले आहेत. प्रस्तुत अहवालाच्या वर्षांत, धर्मादाय कमिशनर, धर्मादाय देणग्यांचे खजिनदार हे मुंबई राज्यांतील म्हणून काम करीत होते. तसेंच भारताच्या धर्मादाय देणग्यांच्या खजिनदारांचे एजंट म्हणून देखील ते काम करीत होतें.

महाराष्ट्र राज्यांतील, त्यांच्याकडे सोंपविलेल्या देणग्यांची एकूण संख्या ५६२ इतकी असून त्यांचें एकूण उत्पन्न रु. १,४९,८०,७७० इतकें होते व केंद्रीय देणग्यांची एकूण संख्या २२ असून त्यांचें उत्पन्न रु. १,११,३६,५०० इतकें होते.

(३) संस्थांची नोंदणी करण्याबाबत अधिनियम, १८६० ची अंमलबजावणी.

प्रस्तुत अहवालाच्या वर्षी धर्मादाय कमिशनर हे, संस्थांची नोंदणी करण्याबाबत अधिनियम, १८६० ची अंमलबजावणी करण्याचे काम करीत होते; व पूर्वीचें मुंबई राज्य, विदर्भ, सौराष्ट्र, कच्छ व मराठवाडा हे प्रदेश मिळून बनलेल्या संपूर्ण मुंबई राज्यासाठीं संस्थांचे रजिस्ट्रार म्हणून तें काम करीत होते.

९. अन्दाजपत्रकांतील तरतुदी:—

१९६०-६१ च्या अंदाजपत्रकात कायदा व न्यायदान विभागाकरितां व त्याच्या नियंत्रणाखालील अधिकाऱ्यांकरितां पुढीलप्रमाणें तरतुदी करण्याचें योजिलें आहे:-

| | | |
|---|---|---|
| २९--सामान्य प्रशासन-के-७ (ए) कायदा व न्यायदान विभाग. | ... | ६,००,००० |
| २७--न्याय प्रशासन-बी-इलाख्यांतील विधिविषयक अधिकारी व ज़िल्ह्यांतील सेवकवर्ग. | .... | ६,९९,७०० (इलाख्यांतील विधि-विषयक अधिकारी) |
| | | ४,९०,६०० (जिल्ह्यांतील सेवक वर्ग.) |
| | | ११,९०,६०० |
| २९--सामान्य प्रशासन-के-७ (बी) धर्मादाय कमिशनर | .... | २,४९,००० |
| वजा -सार्वजनिक विश्वस्त प्रशासन निधींतून वसूल होण्याजोगी रक्कम. | .... | २,४९,००० |
| २९--सामान्य प्रशासन-के-७ (सी)-संस्थांची नोंदणी करण्याबाबतच्या अधिनियमाची अंमलबजावणी | ... | १०,००० |
| २९--सामान्य प्रशासन-जिल्हा प्रशासन-क्यू १ (सी) धर्मादाय कमिशनरचा प्रादेशिक नोकरवर्ग. | ... | १,२४,३०० |
| वजा—सार्वजनिक विश्वस्त प्रशासन निधींतून वसूल करण्याजोगी रक्कम. | ... | १,२४,३०० |
| ९७—संकीर्ण-संस्थांना देणग्या, मुंबईच्या विधिविषयक साहाय्य देणाऱ्या संस्थेला अनुदान साहाय्य. | ... | १,२०० |
| चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटचे न्यायालय, मुम्बई येथील गरीबाकरितां मदतीच्या पेट्या | ... | ९१७ |
| ९७--संकीर्ण-जी-अनुदान साहाय्य, देणग्या, इ. धर्मादाय देणग्या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठीं अनुदान. | .... | ४,१३० |
| इतर अनुदान साहाय्य. | ... | १७,२०८ |
| केंद्रीय देणगी निधीस अनुदान-साहाय्य. | .... | १,९२० |
| सरकारकडे जमा करण्यांत आलेल्या, महसूलाबाबतच्या दंडाच्या रकमाबाबत स्थानिक मंडळाला अनुदान साहाय्य | ... | ४,९९,३३३ |

# कृषि आणि वन विभाग

कृषि-विभागाचें मुख्य काम म्हणजे, शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणांत आर्थिक दृष्ट्या कशा प्रकारें वाढ होईल आणि त्याचा दर्जा कसा सुधारेल यासंबंधीच्या पद्धतींची प्रयोग, तपासणी व संशोधन याद्वारें खात्री करून घेणें व त्या पद्धती प्रत्यक्ष अंमलांत आणणें हें आहे. कृषि-विभागाच्या कार्याचें वर्गीकरण खालीलप्रमाणें आहे.

(ए) शेतकी उत्पादन

(बी) जमिनींचा विकास.

(सी) जलसिंचनाचीं लहान कामें.

(डी) भू-संरक्षण.

**(अ) द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजना.**

**(अ) कृषिविषयक उत्पादन :—**

**(१) नोकरवर्गाबाबतच्या योजना:-**

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीकरितां अगोदरच मंजूर केलेल्या जादा नोकरवर्गाची मुदतवाढ करण्यासाठीं रु. १·२९ लाखाची तरतूद करण्यांत आली आहे.

**(२) कृषिविषयक शिक्षण :-**

कृषिबाबतच्या उच्च शिक्षणाच्या सोयीकरितां होत असलेली वाढती मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीनें, सरकारनें पुणें, नागपूर, अकोला व परभणी येथील चार कृषिविषयक महाविद्यालयांमधील पदवीपूर्व पाठ्यक्रमासाठीं प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ४१७ वरून ६३२ पर्यंत वाढविली आहे. तसेंच पश्चिम खानदेशमधील धुळें येथें एक कृषि महाविद्यालय सुरू करण्याचें देखील योजिले आहे. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं १७ कृषि शाळा स्थापन करण्यांत येतील. त्यांमध्ये ७३० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. यामध्यें विदर्भातील दोन व मराठवाड्यांत १९६०-६१ सालीं उघडण्यांत यावयाच्या कृषि शाळांचा समावेश होतो.

१९६०-६१ मध्यें, कृषिविषयक शाळांच्या विस्ताराकरितां रु. १२·९४ लाखांची व कृषि महाविद्यालयांकरितां रु. ३९·९३ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

**(३) ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रें :-**

विकास गटाच्या व्यवस्थेकरितां विस्तार पद्धतीचें प्रशिक्षण घेतलेल्या बऱ्याचशा ग्रामसेवकांची नेमणूक करणें जरूरीचें आहे. त्यानुसार, ग्रामसेवकांकरितां, (१) मांजरी, (२) कोल्हापूर, (३) सिंदेवाही, (४) थारसा, (५) अमरावती, (६) परभणी, (७) जळगांव, (८) बादनापूर आणि बुलढाणा येथें ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रें या नांवाच्या संयुक्त प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. प्रत्येक केन्द्रांत १४० विद्यार्थ्यांच्या

प्रशिक्षणाची सोय केलेली आहे. (पहिल्या वर्षाच्या वर्गात ७० आणि दुसऱ्या वर्षाच्या वर्गात ७० विद्यार्थी). मांजरी, सिंदेवाही आणि अमरावती येथें ४० विद्यार्थी असलेली ग्रामसेविका प्रशिक्षण केन्द्रें (गृहशास्त्र शाखा) देखील चालविण्यांत येत आहेत.

याशिवाय, मांजरी व सिंदेवाही येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांत दोन वर्कशॉप शाखा जोडण्यांत आल्या आहेत. तेथें द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं सुमारें ७५ ग्रामीण कारागिरांना प्रशिक्षण मिळेल. नागपूर आणि पुणें येथील कृषि महाविद्यालयांत देखील विस्तार शाखा स्थापन करण्यांत आल्या आहेत.

१९६०--६१ मध्यें ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, गृह विज्ञान शाखा, कृषिविषयक वर्कशॉप्स इ. करितां एकूण २४·७६ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

(४) बी-बियाण्यांची तालुका केंद्रें:—

उत्कृष्ट दर्जाच्या बी-बियाण्यांचे उत्पादन करणें हा उत्पादन कार्यक्रमाचा आधारभूत पाया आहे. उच्च प्रतीच्या बी-बियाणांचें उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीनें, बी-बियाणांच्या तालुका केंद्रांची स्थापना करण्याची योजना सरकारनें हातीं घेतली आहे. महाराष्ट्र राज्यांत सुमारें २३० तालुके आहेत. जवळजवळ १८० तालुक्यांमध्यें स्थापन करण्याचें योजिलेल्या बी-बियाण्यांच्या २०२ केंद्रांपैकीं १८६ केंद्रे अगोदरच स्थापन करण्यांत आलेलीं आहेत व याशिवाय ४२ केंद्रें स्थापन करण्याचें ठरविले असून त्यापैकीं प्रत्येकीं सुमारें ६५ ते १०० एकरपर्यंत क्षेत्रफळ असलेली २१ केंद्रें १९६०–६१ मध्यें स्थापन करण्यांत येतील. ज्या ठिकाणीं एकाद्या केंद्राचें क्षेत्रफळ अधिक असेल त्या ठिकाणीं ते केंद्र शेजारच्या तालुक्याच्या गरजा भागविल. अशा रीतीनें १९६०–६१ च्या अखेरीस जवळजवळ सर्व तालुक्यांचा ह्या योजनेंत समावेश होईल.

बी-बियाण्यांची तालुका केंद्रें, तालुका गुदामें यांच्या स्थापनेकरितां आणि बी-बियाण्याबाबत योजनांकरितां १९६०–६१ मध्यें एकूण रु. ४३·३४ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

(५) संशोधन योजना:—

१९५९–६० सालीं चालू असलेल्या सर्व संशोधन योजना १९६०–६१ मध्यें चालू राहातील. शेतकऱ्यांच्या शेतावर साध्या खताचें आणि रासायनिक खताचें आणि निरनिराळ्या प्रकारचीं प्रात्यक्षिकें करण्याबाबतच्या योजना १९६०–६१ मध्यें देखील चालू राहातील. निरनिराळ्या संशोधन योजनांकरितां १९६०–६१ सालीं एकूण २१·०६ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

(६) प्रायोगिक व प्रात्यक्षिक केंद्रें:—

धान्योत्पादन वाढविण्याचा एक खात्रीचा मार्ग म्हणजे जलसिंचनाचें मुख्य, मध्यम प्रकारचे आणि लहान प्रकल्प, यांपासून मिळूं शकणाऱ्या पाण्याचा शेतकरी संपूर्णतया उपयोग करून घेतात, याबाबत खात्री करून घेणें हा आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि कृषिविभाग ह्यांच्यातील सहकार्याचा अभाव, जलसिंचनाच्या पाण्याचा वापर करण्याची शेतकऱ्यांची तयारी नसणें, इत्यादि गोष्टींमुळें जलसिंचनाचे पाणी वापरण्यांत दिरंगाई होते. ही परिस्थिति सुधारण्याचा उपाय म्हणून प्रात्यक्षिक व प्रायोगिक केंद्रें स्थापन करण्याबाबतची योजना हातीं घेण्यांत आली आहे आणि ती १९६०–६१ सालींहि पुढें चालू ठेवण्यांत येईल. उस्मानाबाद जिल्ह्यांतील खासापूर प्रकल्पाखालील केंद्रें, पूर्णा, ढेकू आणि बोडसूरा यांपैकीं प्रत्येक प्रकल्पाखालील एक केंद्र आणि

बीड जिल्ह्यांतील कृषिविषयक ( कोरडवाहू शेतीचें ) क्षेत्र यांसारख्या केंद्रांकरितां एकूण रु. ४·९३ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

(७) खतें आणि रासायनिक खतें:—

भारत सरकारनें वांटून दिलेली रासायनिक खतें शेतकऱ्यांना ना नफा ना तोटा या तत्त्वावर वाटण्यांत येतात. हें वांटप सहकारी संस्थांमार्फत केले जाऊन त्यायोगें खाजगी व्यापाऱ्यांना त्यांत भाग घेऊं दिला जात नाहीं. रासायनिक कृत्रिम खतांचा एकंदरीत तुटवडा असल्यामुळें त्यांचे दर नियंत्रित करण्यांत आले आहेत. आणि रासायनिक खतें व त्यांचे मिश्रण ह्यांचा दर्जा व किंमती यांवर नियंत्रण असण्याच्या दृष्टीनें भारत सरकारचा १९५७ चा रासायनिक खतांबाबतचा ( नियंत्रण ) आदेश सर्व राज्यभर अंमलांत आणण्यांत आला आहे. जेथें सघन शेतीच्या मार्गदर्शी योजना सुरूं केल्या आहेत, त्याठिकाणीं या वर्षी सहकारी संस्थांमार्फत शेतकऱ्यांना रासायनिक खतें उधारीनें विकण्यात आलीं आहेत.

कोणतें खत, विशेषतः रासायनिक खत, योग्य आहे तें शोधून काढण्याच्या तसेंच हल्लीच्या वांटप पद्धतींत आणखी सुधारणा करण्याच्या दृष्टीनें भारत सरकारनें तयार केलेल्या "आदर्श योजनेच्या" धर्तीवर सरकारनें एका तज्ज्ञाच्या हाताखालीं एक वर्कशॉप सुरूं करण्याचें ठरविलें आहे. त्यानुसार रासायनिक खताच्या तज्ज्ञाच्या हाताखाली एक संघटना उभारण्यांत येईल.

रासायनिक खतांच्या तुटवड्याची अडचण दूर करण्यासाठीं, अर्थसाहाय्यित तत्त्वावर खताविषयक स्थानिक साधनांचा उपयोग करण्याचें प्रयत्न करण्यांत येत आहेत. शेतांत उपयोग करण्यासाठीं शेतकऱ्यांना स्थानिक खतें मिळावींत म्हणून निरनिराळीं मिश्रखतें व मैला वापरण्याच्या योजना तसेंच खतांचा पुरवठा करण्याची मार्गदर्शी योजना सुरूं करण्यांत येत आहेत. तसेंच कृषिविषयक उत्पादन वाढविण्यासाठीं सेंद्रिय खतांबरोबरच कृत्रिम खतांचा वापर करण्यासाठीं शेतकऱ्यांची मनें वळविण्यांत येत आहेत.

सुपरफॉस्फेटचें अर्थसाहाय्यित वांटप करण्याची योजना १९६०–६१ मध्यें चालूं आहे आणि त्यासाठीं रु. ६·४५ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे. खतें आणि रासायनिक खतें याकरितां १९६०–६१ मध्यें एकूण रु. ७·८० लाखांची तरतूद करण्याचें योजिलें आहे.

(८) वनस्पतींचे संरक्षण :—

वनस्पतींचें संरक्षण करण्यासाठीं शेतकऱ्यांना, लागणारीं उपकरणें विभागाकडून त्यांना भाड्यानें किंवा विकत देण्यांत येत असतात. शेतकऱ्यांना अर्थसाहाय्यित तत्त्वांवर कीटकनाशक द्रव्येंदेखील देण्यांत येतात. हीं उपकरणें व कीटकनाशक द्रव्यें ही तालुका केन्द्रांत ठेवण्यांत आली आहेत. कांहीं ठिकाणीं झाडांवर हवेंतून फवारे देखील उडविण्यांत येतात. १९५९-६० मध्ये सुमारें १९,७८० एकर जमिनीवर फवारे उडविण्यांत आले.

वनस्पतींच्या संरक्षणाकरितां १९६०-६१ मध्ये एकूण ११·४५ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

(९) बागायती कामें कापूस, ऊंस इ. चा विकास :--

या पिकांच्या विकासाच्या सर्व विद्यमान योजना सन १९६०-६१ मध्ये चालू ठेवणे आवश्यक आहे.

(१) बागायती पिकें :--

दुर्गम प्रदेशांतील नैसर्गिक साधनांचा विकास करून तो स्वयंपूर्ण बनविण्याबद्दल दुर्गम प्रदेश समितीने केलेल्या शिफारशी लक्षांत घेतां, तसेच परदेशी हुंडणावळ मिळविण्याच्या बाबतींतील काजूंचे मूल्य लक्षांत घेतां काजूंच्या लागवडीची विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यांत बऱ्याच प्रमाणांत वाढ करण्यांत आली आहे. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं ह्या काजूच्या लागवडीचा प्रदेश ९००० पासून ८९,००० एकरापर्यन्त वाढविण्याचे योजिलें आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील काजूच्या लागवडीचा विस्तार आणि विकास करण्याच्या योजनेकरित १९६०-६१ मध्ये रु. ३·२६ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे. १९६०-६१ मध्ये बागायती पिकांच्या विकासाकरितां एकूण रु. १३·१४ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

(२) कापूसः—

कापसाचा दर्जा, शुद्धता, आणि ख्याति राखण्याकरितां सध्या अंमलांत असलेल्या कापूस नियंत्रण अधिनियम १९४२, या अन्वयें, "संरक्षित" प्रदेशांत, राज्याच्या कृषि विभागानें शिफारस केलेल्या जातीच्या कापसाशिवाय, इतर कोणत्याहि जातीच्या कापसाची लागवड करण्यास मनाई आहे. ह्या राज्याच्या सर्व महत्त्वाच्या प्रदेशांना लागू करण्यांत आलेल्या कापूस वाहतूक अधिनियमानुसार देखील कृषि संचालकानें परवाना दिला असल्याखेरीज, संरक्षित प्रदेशांत कापसाची आयात करण्यास मनाई केलेली आहे. राज्यांतील सुधारलेल्या जातीच्या सरकीचें उत्पादन आणि वांटप करण्याकरितां भारतीय मध्यवर्ती कापूस समितीकडून अंशतः किंवा पूर्णतः अर्थसहाय्य मिळणाऱ्या कापूसविषयक योजनाहि अंमलांत आणलेल्या आहेत. या योजनांपैकीं कांही योजना खालीं दिल्या आहेतः-

खानदेशः—(१) १९७-३ या जातीच्या कापसाच्या बियाण्याच्या उत्पादनांत वाढ करण्याची आणि त्याचें वांटप करण्याची योजना.

(२) कापसाची पैदास करण्याची नवीन योजना, खानदेश.

विदर्भः-- (१) कापूस विस्तार योजना, विदर्भ

(२) ०३९४ बुरी या जातीच्या कापसाच्या उत्पादनांत वाढ करण्याची व त्याचें वांटप करण्याची योजना.

(३) १९५९-६० पासून सुरू केलेली १९७।३ विरनार या जातीच्या कापसाच्या उत्पादनांत वाढ करण्याची आणि त्याचें वांटप करण्याची योजना.

मराठवाडाः—(१) कापूस विस्तार योजना, मराठवाडा.

(२) कापूस विस्तार योजना, नांदेड.

(३) कापसाची सुधारणा करण्याबाबतची योजना, परभणी; नांदेड जिल्ह्यांतील किनवट येथे अमेरिकन कापूस योजना आणि

(४) उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यांत १४२२ गांवरानी कापसाच्या उत्पादनांत वाढ करण्याची आणि त्याचें वांटप करण्याची योजना.

कापसाची सुधारणा करण्यासाठीं सन १९६०-६१ करितां एकूण ८·२४ लाख रुपयांची तरतूद केलेली आहे.

(३) ऊस :—

भारतीय मध्यवर्ति ऊस समितीनें पाडेगांव येथील ऊसविषयक संशोधन केंद्रामध्यें ऊसविषयक कामांचें केंद्रीकरण केलें आहे. उंसाच्या धंद्याचा विकास करण्याच्या योजनेस ऑक्टोबर १९५८ मध्यें मंजुरी मिळाली होती. या योजनेकरितां ५ वर्षांत रु. ११,२०,९५८ इतका अंदाजे खर्च येणार होता. या योजनेसाठीं येणाऱ्या खर्चाच्या निम्मे खर्च, भारतांतील उंसाच्या धंद्याच्या विकासाकरितां भारत सरकारनें अगोदरच वेगळ्या काढून ठेवलेल्या रु. १२५ लाख इतक्या रकमेंतून भारत सरकार करणार आहे. या योजनेंत इतर गोष्टींबरोबरच ( उंसाची ) रोपें लावण्याच्या बागा तयार करण्यासाठी व उंसाच्या सुधारलेल्या जाती साखरेच्या कारखान्यांना व शेतकऱ्यांना पुरविण्याकरितां उंसाच्या उत्पादनांत वाढ करण्यासाठी तरतूद करण्यांत आली आहे. दरवर्षी या योजनेची मुदतवाढ करण्यांत येत आहे.

उंसावर व्यापक संशोधन करण्याबाबतच्या योजनेसाठीं, सन १९६०–६१ ह्या वर्षाकरितां रु. ९·६० लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आलेली आहे. सन १९६०–६१ मध्यें उंसाच्या विकासाकरितां रु. १८·३१ लाख इतक्या एकूण रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

(४) इतर व्यापारी पिकें :-

केळयाबाबतच्या संशोधन योजनेनुसार, केळ्यावरील शास्त्रीय संशोधनाकरितां कोपरगांव ( जिल्हा अहमदनगर ) येथें प्रथमतः एका उपकेंद्राची स्थापना केली होती. त्यानंतर तें उपकेंद्र कोपरगांवाहून खडकी येथें हालविण्यांत आलें. गणेशखिंड येथील केळ्याबाबतच्या संशोधन योजनेकरितां सन १९६०–६१ मध्यें रु. ०·२ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

गळिताच्या धान्यांच्या विकासाकरितां सन १९६०-६१ मध्यें रु. २·०७ लाख इतक्या रकमेची एकूण तरतूद केली आहे.

(१०) यंत्राच्या सहाय्यानें शेती करणे आणि ट्रॅक्टरच्या सहाय्यानें जमीन नांगरणें:—

ट्रॅक्टरच्या सहाय्यानें जमीन नांगरण्याबाबत सरकारनें खालील उपाययोजना हातीं घेतल्या आहेत.

(अ) ट्रॅक्टरच्या सहाय्यानें जमीन नांगरण्याचें काम पुन्हां सुरू करण्याच्या योजनेखालील पथकांमध्ये २ जादा नवीन ट्रॅक्टर्सची भर घालण्यांत येईल.

(ब) विदर्भातील यंत्रचलित ट्रॅक्टर केन्द्र योजनेनुसार सरकारनें त्या योजनेची सुधारणा करून सध्याच्या ट्रॅक्टरच्या संख्येंत ८ पासून ११ पर्यंत वाढ केली आहे.

(क) निरनिराळ्या प्रदेशांतील ट्रॅक्टरच्या संख्येंत भर घालण्यासाठीं ४० ट्रॅक्टर खरेदी करण्यास देखील सरकारनें मंजुरी दिली आहे.

सन १९६०-६१ मध्यें, यांत्रिक शेतीच्या विभागाकरितां एकूण रु. ४२·७९ लाख रुपयांची तरतूद केली आहे.

**(११) भातशेतीच्या प्रदेशांत सघन शेतीची मार्गदर्शी योजना :**

फार मोठया प्रदेशांत व त्याचप्रमाणें आतापर्यंत कर्ज देण्यास पात्र नसलेल्या शेतकऱ्यांसह सर्व शेतकऱ्यांना जपानी पद्धतीनें भातशेतीची सघन लागवड करण्याचें काम हातीं घेणें शक्य व्हावें म्हणून सरकारनें १९५७ साली मार्गदर्शी योजना सुरू केली. कर्ज देण्यास अपात्र ठरलेल्या शेतकऱ्यासह सर्व शेतकऱ्यांच्या पिकांसंबंधीच्या संपूर्ण आर्थिक गरजा भागवण्यासाठी कर्जाची तरतूद करणें आणि जपानी पद्धतीने भातशेतीच्या सघन लागवडीकरतां आवश्यक असलेले बी–बियाणें, रासायनिक खते आणि तांत्रिक मार्गदर्शन करणें, हीं ह्या योजनेचीं प्रमुख वैशिष्ट्यें आहेत.

आधीच नमूद केल्याप्रमाणें, ही योजना १९५७ च्या खरीपाच्या हंगामांत राज्यांतील ४ मार्गदर्शी भातशेती गटांत सुरू करण्यांत आली आणि तिच्याखाली ३१,००० एकर जमिनीचा समावेश करण्यांत आला. सन १९५८ मध्ये ही योजना आणखी ४ जादा मार्गदर्शी भातशेती गटांना लागू करण्यात आली आणि या ८ गटाखाली एकूण १,१०,००० एकर जमीन आणण्यांत आली. याचे सुपरिणाम दृष्टोत्पत्तीस आल्यामुळे सन १९५९ मध्यें ही योजना २,६८,००० एकर क्षेत्रफळाच्या आणखी १२ गटांना लागू करण्यांत आली आहे. सन १९६० मध्यें ही योजना आणखी ८ गटांना लागू करण्यांत आली आहे. गटांची एकूण संख्या २८ झाली असून त्याखाली ४,०१,००० एकर जमीन मोडते. ह्या योजनेखालीं सुमारे ९,७०० खेड्यांचा समावेश होतो. ह्या खेड्यांत सुमारे १,९९० सहकारी संस्था काम करीत असून त्यांची सदस्यसंख्या १,१९,००० इतकी आहे. ह्यामुळें सन १९५७ मध्यें २,४५,००० बंगाली मण, सन १९५८ मध्यें १०,६७,००० बंगाली मण आणि १९५९ मध्यें १६,९४,००० बंगाली मण इतकें भाताचे जादा उत्पादन झाले होतें. ही योजना कृषि आणि सहकार विभागांकडून संयुक्तपणें अंमलांत आणली जात आहे. ही योजना चालू केल्यामुळें मिळणारे प्रमुख फायदे पुढीलप्रमाणें आहेत:–(१) भाताच्या उत्पादनांत वाढ; (२) कर्ज देण्यास अपात्र ठरलेल्या शेतकऱ्यासह सर्व शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा; (३) उत्पादनाच्या सुधारलेल्या पद्धतींचा स्वीकार आणि (४) सहकारी चळवळीची वाढ. ज्वारी आणि बाजरीच्या सघन शेतीच्या दोन योजनांना देखील सन १९५९–६० पासून मंजुरी देण्यांत आली आहे.

भातशेतीच्या सघन लागवडीच्या मार्गदर्शी योजनेकरितां रु. १३,१४ लाख इतक्या रकमेची आणि इतर दोन योजनांकरितां रु. ६४,००० इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

(१२) खरीप आणि रब्बी पिकांच्या मोहिमाः—

सन १९५८ मधील रब्बीच्या हंगामांत अन्नोत्पादन वाढविण्याकरितां प्रमुख पिकांच्या उत्पादनांत वाढ करण्यासाठीं, भारत सरकारनें सुरूं केलेल्या राष्ट्रव्यापी योजनेचा एक भाग म्हणून राज्यसरकारनें दोन प्रमुख रब्बी पिकांचें म्हणजे ज्वारी आणि गहूं यांचें उत्पादन वाढविण्याची एक समन्वित मोहीम सुरूं केली होती. ह्याकरितां कांहीं योग्य प्रदेशांत सघन लागवडीचें काम हातीं घेणें, इतर कांहीं भागांत व्यापक प्रमाणावर लागवड करणे आणि उरलेल्या प्रदेशांत सर्वसाधारण प्रचाराचें काम हातीं घेणें, अशी त्रिविध मोहीम हातीं घेण्यांत आली. हया मोहिमेचे चांगले परिणाम दिसून आल्यामुळें, सरकारनें त्यानंतर दोन मोहिमा चालू केल्या. त्या म्हणजे १९५९ मधील खरीपांच्या पिकांबाबतची मोहीम आणि रब्बी पिकांच्या बाबतची सन १९५९ मधील मोहीम ह्या होत. खरीप पिकांच्या मोहिमेनुसार एकूण २९·२८ लाख एकर जमीन सघन आणि व्यापक प्रमाणावर करावयाच्या लागवडीखालीं आणण्याचें उद्दिष्ट होतें. ह्या मोहिमेमुळें, जादा उत्पादनाच्या स्वरूपांत, रु. ७·४५ कोटी इतक्या रकमेचें जादा उत्पन्न मिळालें असावें अशी अपेक्षा होती. सन १९५९ च्या रब्बी पिकांच्या मोहिमेनुसार ३०·११ लाख एकर जमिनीचें उद्दिष्ट ठरविलें होतें. ह्या योजनेकरितां १९६०-६१ मध्यें रु. ४·९४ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

(बी) जमीनींचा विकासः—

ह्या सदराखालीं, सरकारी पडीत जमिनींचा उपयोग करण्याबाबत पाहणी करणें आणि डोंगरउतरणीच्या प्रदेशांत शेतांच्या कडेकडेनें बांध घालणे हीं कामें हातीं घेण्यांत आलीं आहेत. ह्या योजनेकरितां सन १९६०–६१ ह्या वर्षांत एकूण १८·६३ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहेत.

(सी) जलसिंचनाचीं गौण कामें:—

(१) विहिरी बांधण्याची योजनाः—

अन्नोत्पादन वाढविण्याचें एक जलद साधन म्हणजे विहिरींच्या योजना होय. म्हणून स्वाभाविकपणेंच नवीन विहिरी बांधणें आणि जुन्या विहिरींची दुरुस्ती करणें याबाबतची योजना शेतकऱ्यांमध्यें फार लोकप्रिय होत आहे. ह्या योजनेनुसार शेतकऱ्याला (१) नवीन विहिरी बांधण्याकरितां रु. २,५०० पर्यंत कर्ज; (२) जुन्या विहिरींची दुरुस्ती करण्याकरितां कांहीं अटींवर रु. १,००० पर्यंत कर्ज देण्यांत येतें.

कांहीं अटी पाळून कामाच्या दोन हंगामांत, नवीन विहीर यशस्वीपणें बांधून पूर्ण झाल्यावर रु. ५०० इतकें अर्थसाहाय्य देण्यांत येतें. १९५८ पासून, विदर्भांतील जिल्हे आणि

रत्नागिरी जिल्ह्याशिवाय सर्व जिल्ह्यांतील जमिनीच्या गहाणावर कर्जे देणाऱ्या बँकामार्फत, कर्जे देण्याचें काम करण्यांत येतें. सन १९६०-६१ मध्यें ही कार्यपद्धति नागपूर विभागाच्या सर्व जिल्ह्यांत लागूं करण्यांत आली आहे. सन १९६०-६१ ह्या वर्षाकरितां एकूण रु. ६४·४० लाखाची तरतूद करण्यांत आली आहे.

(२) पंपिंग सेट योजनाः—

कृषि–विभागाची ही आणखी एक महत्त्वाची योजना आहे. ह्या योजनेनुसार नवीन ऑईल इंजिनें व पंपिंग सेटस् यांच्या खरेदीसाठीं, एका ऑईल इंजिनामागें वहातुकी-संबंधीच्या विशिष्ट परिस्थितीनुसार कमाल ४,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत कर्जे देण्यांत येतात. यांबरोबरच प्रत्येक इंजिनाबरोबर लागणारे पंपिंग सेट्स इत्यादींच्या प्रत्यक्ष किंमतीदाखल ५०० रुपयांचे तगाई कर्जदेखील मंजूर करण्यांत येतें. सरकारी खजिन्यावरील भार कमी करतां यावा आणि सहकारी चळवळीस उत्तेजन मिळावें म्हणून जमिनीच्या गहाणावर कर्जे देणाऱ्या बँकेच्यामार्फत ह्या योजनेची अंमलबजावणी रत्नागिरी जिल्हा व विदर्भांतील जिल्हे सोडून इतर सर्व जिल्ह्यांतून होत आहे. सन १९६०-६१ ह्या वर्षाकरितां ह्या योजनेसाठीं ४१·६० लाख रुपये इतकी तरतूद करण्यांत आली आहे.

कृषि–विभागानें हातीं घेतलेल्या जलसिंचनाच्या निरनिराळ्या प्रकारच्या छोट्या योजनांमुळें सन १९६०-६१ सालीं ७६,००० एकर जमीन लागवडीखालीं येईल अशी अपेक्षा आहे.

याशिवाय जलसिंचनाच्या विहिरींची बोअरिंगच्या सहाय्यानें व सुरुंगाच्या सहाय्यानें खडक फोडून सुधारणा करण्याच्या योजनादेखील १९६०-६१ मध्यें चालू ठेवण्यांत आल्या आहेत.

(डी) भू-संरक्षणः—

राज्यांतील जमिनीच्या धुपीच्या प्रश्नाचें गांभीर्य लक्षांत घेऊन शेताच्या कडे-कडेनें बांध घालण्याच्या (नियमित व दुष्काळी) कामाबाबतची योजना सन १९४२-४३ पासून सुरू करण्यांत आली होती. सन १९४२ पासून महाराष्ट्रांतील १२,४५,१९९ एकर जमिनीवर तालीचे बांध घालण्यांत आले आहेत. नियोजन मंडळाच्या निर्देशानुसार आणि राज्य विकास समितीच्या शिफारसीनुसार, सरकारने ह्या योजनेची व्याप्ति १९५७-५८ पासून वाढविण्याचें ठरविलें आहे.

महाराष्ट्रांतील भू-संरक्षण विभाग व उप-विभाग ह्यांची संख्या अनुक्रम ४ व ४१ आहे. आणखी कांही विभाग निर्माण करण्याबद्दलच्या प्रश्नावर सरकार विचार करीत आहे.

शेताच्या कडे-कडेने बांध घालण्याच्या कामाकरितां १९६०-६१ मध्ये एकूण रु. १९७·०९ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

सोलापूर व औरंगाबाद येथील भू-संरक्षण प्रशिक्षण संस्थांशिवाय अशीच एक जादा संस्था विदर्भांत केलापूर येथे अलीकडेच स्थापन करण्यांत आली आहे. या सर्व संस्था

१९६०-६१ सालामध्यें चालूं राहतील. ह्या कामाकरितां १९६०-६१ सालामध्यें रु. ७.२० लाखाची तरतूद करण्यांत आली आहे.

विदर्भांतील, स्थानिक भू-संरक्षण प्रश्नाबाबतच्या उपाययोजना, प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांच्या योजना १९६०-६१ मध्ये चालूं राहतील व त्यांच्याकरितां रु. १·१२ लाखाची तरतूद करण्यांत आली आहे.

**(बी) योजनेंत समाविष्ट नसलेल्या योजनाः—**

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून चालूं असलेल्या योजना १९६०-६१ मध्येंही चालूं राहतील. या योजनांखालील कार्याची रूपरेषा खालीं दिलेली आहेः—

**(१) नोकरवर्गासंबंधींच्या योजना—**

या योजनेखालीं अधिक धान्य पिकवा योजना, कापूस विस्तार योजना ( तरतूद रु. ४१,००० ), लोखंड व पोलाद वांटप योजना ( तरतूद रु. ७१,००० ), विदर्भांतील आंकडेवारी विभागाचा विस्तार ( तरतूद रु १९,००० ), मराठवाड्यांतील जिल्हा कृषिविस्तार सेवकवर्ग चालूं ठेवणें ( तरतूद रु. ७,४७,००० ), विदर्भांत कृषिविभागाचा विस्तार करण्यासाठीं जादा सेवकवर्ग ( तरतूद रु. २,३९,०००), इत्यादि योजनांसाठीं मंजूर केलेला नोकरवर्ग १९६०-६१ मध्येंहि चालूं राहील.

**(२) प्रशिक्षणः—**

कृषिविषयक शाळा, विस्तार प्रशिक्षण केंद्रें, पुणें येथील कृषि महाविद्यालयाची विस्तार शाखा ( तरतूद रु. ९८,०००), मांजरी येथील कारखानाविषयक प्रशिक्षण केन्द्र ( तरतूद रु. ३३,००० ), आणि कृषिसाहाय्यकांसाठीं उजळणी पाठ्यक्रम ( तरतूद रु. ६,००० ), हे सर्व १९६०-६१ मध्येंहि चालूं राहतील.

**(३) सुधारलेल्या जातींचें बी-बियाणेंः—**

या योजनेनुसार गव्हाच्या तांबेरा प्रतिबंधक बियाण्याची खरेदी आणि वांटप ( तरतूद रु. १,७९,००० ), विदर्भांतील शेंगदाण्याच्या सुधारलेल्या बियाणाची वाढ व वांटप करण्याची योजना ( तरतूद रु. २,२०,००० ), विदर्भ आणि मराठवाडा विभागांतील कापूस विकास योजनेतील सुधारलेले बी-बियाणें व खतें यांची खरेदी व वांटप करण्याची योजना ( तरतूद रु. २२,१३,००० ), मराठवाड्यांतील ज्वारी, गहूं आणि डाळी यांच्या सुधारलेल्या बियाण्याची वाढ व वांटप करण्याची योजना ( तरतूद रक्कम रु. ९,७४,४०० ) या सर्व योजना १९६०--६१ मध्यें चालूं राहतील.

**(४) संशोधन योजनाः—**

सन १९६०--६१ मध्यें चालूं ठेवण्यांत यावयाच्या योजनांपैकीं कांहीं महत्त्वाच्या योजना खालीं नमूद केल्या आहेत:—

बदनापूर येथील गव्हावरील तांबेरा प्रतिबंधक समन्वित योजना ( रु. १७,००० ) केळीं, द्राक्षें व कांदे यांच्या उत्पादनाचा अंदाज घेण्याकरितां नमुने घेण्याचें

योग्य तंत्र शोधून काढण्याची योजना ( रु. २८,००० ), औरंगाबाद येथील फळांवर संशोधन करण्याची योजना ( रु. ३४,००० ), बदनापूर येथील ज्वारी व गहूं यांच्या सुधारलेल्या जाती तयार करण्यासंबंधाचें संशोधन केंद्र ( रु. ७९,००० ), तांदळाच्या वाढीची व संशोधन कार्याची योजना ( रु. ३,४०,००० ), डाळी व गळिताची धान्यें याखेरीजच्या इतर धान्याची शास्त्रीय पद्धतीनें सुधारणा करण्याची योजना ( रुपये १,१९,००० ), कुलाबा जिल्ह्यांतील टेल वॉटर व्हॅली मधील प्रयोग व प्रात्यक्षिक कृषिक्षेत्रें ( रुपये २६,००० ), सुपारीच्या झाडावर पडणारा बॅन्ड नांवाच्या रोगावर संशोधन ( रु. १९,००० ), जंतूमुळें तांदळांत होणाऱ्या रोगाचें संशोधन ( रु. ९,००० ).

**(५) खतें आणि रासायनिक खतें:—**

मराठवाड्यांतील मिश्रखतांच्या विकासाची व ग्रामीण मिश्रखतांची योजना ह्यांच्या अन्वयें ग्रामीण मिश्रखतांचें उत्पादन, शेतांमधील खतांच्या खड्डयांची सुधारणा यांकरितां प्रचाराच्या द्वारें प्रोत्साहन दिलें जातें. या योजनेसाठीं १९६०–६१ मध्यें रु. ९३,००० तरतूद करण्यांत आली आहे.

**(६) पिकांचें संरक्षण:—**

टोळधाड विरोधी संघटना चालू ठेवणें आवश्यक आहे. या कामासाठीं १९६०-६१ मध्यें रु. ९४,००० तरतूद केली आहे.

**(७) बागाईत शास्त्र, कापूस, ऊंस इत्यादींचा विकास:—**

रोपांच्या सरकारी बागेंत तयार झालेल्या उत्तम जातीच्या फळझाडांच्या छोट्या रोपांचा फलोत्पादन करणाऱ्या लोकांना पुरवठा करण्याचें काम कृषि–विभागाकडून करण्यांत येते. तसेंच भाजीपाल्याच्या विश्वसनीय दर्जाच्या बियांचा पुरवठा करण्याचें काम " ना नफा ना तोटा " या तत्त्वावर हातीं घेण्यांत आले आहे. औरंगाबाद येथें द्राक्षें व लिंबाच्या जातीची फळें यांची निवड करण्याचे कार्य चालू आहे. ऊसविषयक संशोधन व त्याचा विकास या योजनेखाली ( तरतूद ७९,००० रु. ), कृषिविषयक मृत्तिकाशास्त्र, पिकांवरील कीड, इत्यादींवरील विविध प्रकारची संशोधनाचीं कामें चालू आहेत. कापडाच्या धंद्याकरितां जास्त चांगल्या प्रकाराच्या कापसाचा पुरवठा करण्याची मागणी पुरी करतां यावी, या दृष्टीनें कापसाचें योजनाबद्ध रीतीनें उत्पादन करण्याची योजना ( रु. ९९,००० ) चालू आहे.

**(८) संकीर्ण योजना:—**

ह्या गटामध्यें, मराठवाड्यामध्ये ट्रॅक्टरच्या सहाय्यानें नांगरणी करून पडीत जमीन लागवडीखाली आणणें ( रु. २,२३,००० ), लॅारीतून वहातूक ( रु. ४२,००० ), शेतीच्या सुधारलेल्या अवजारांसाठीं बक्षिसें ( रु. ४,००० ), कुरणांची सुधारणा ( रु. ९,००० ), जपानी पद्धतीनें भाताची सघन लागवड करण्यासाठीं नोकरवर्ग

( रुपये ६९,००० ) ह्यांचा अंतर्भाव होतो. शेवटच्या योजनेनुसार १९६०-६१ मध्यें ९,००,००० रुपयांपर्यंत अल्पमुदतीचीं कर्जें देण्यांत येतील.

(सी) १९६०-६१ मधील कृषिविषयक उत्पादनाबाबतचीं उद्दिष्टें:—

विभागानें हातीं घेतलेल्या विविध उपाययोजनांमुळें १९६०-६१ सालांत खालीं दाखविल्याप्रमाणें ६,०८,००० टनांइतकें अन्नधान्याचें जादा उत्पादन होईल अशी अपेक्षा आहे.

| महत्त्वाच्या पिकांचें उत्पादन | १९६०-६१ या वर्षाकरितां उद्दिष्टें जादा टन [ आंकडे सहस्र टनामध्यें आहेत ] |
|---|---|
| १) तांदुळ | १९० |
| २) गहूं | ७३ |
| ३) ज्वारी व बाजरी | ३६७ |
| ४) डाळी | १८ |
| | ६०८ |

| योजनांचे गट | | |
|---|---|---|
| १ | जलसिंचनाची मोठी कामें ... ... ... | — |
| २ | जलसिंचनाचीं लहान कामें .... .... ... | १९ |
| ३ | जमिनीचा विकास .... ... ... | १९ |
| ४ | खतें व रासायनिक खतें ... ... ... | ९९ |
| ९ | सुधारलेलें बीं-बियाणें .... ... .... | ३९७ |
| ६ | पिकांचें संरक्षण .... ... ... | — |
| ७ | शेतीच्या सुधारलेल्या पद्धती ... .... ... | ११२ |
| | | ६०८ |

## पशुसंवर्धन विभाग

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीस पूर्वींच्या पशु-वैद्यकीय विभागाची पुनर्रचना करण्यांत आली असून गुरें, मेंढ्या आणि कोंबड्या व बदकें यांच्याबाबतचें पशुधन विकास विभाग त्याला जोडण्यांत आले असून पशुसंवर्धन विभाग असें त्याचें नवीन नामाभिधान करण्यांत आलें आहे.

ह्या विभागाच्या कार्यक्रमाचें स्थूलमानानें पुढीलप्रमाणें वर्गीकरण करतां येईल:—

(१) पशुवैद्यकीय सहाय्य व रोगनियंत्रण.

(२) चांगल्या जातीची पैदास व पशुधनामध्यें सुधारणा.
(३) शिक्षण.
(४) संशोधन.

## (५) योजनांतर्गत योजनाः

**(१) पशुवैद्यकीय साहाय्य व रोगनियंत्रण :**

राज्यांतील गुरांच्या दवाखान्यामध्यें, आजारी गुरांवर औषधोपचार केले जातात. राज्यांतील दूरदूरच्या कोनाकोपऱ्यांत सुद्धां पशुवैद्यकीय साहाय्य मिळावें म्हणून निरनिराळया जिल्हा विकास मंडळाच्या साहाय्यानें गुरावर प्रथमोपचार करण्याच्या औषधांच्या पेट्या पुरविण्यांत आल्या आहेत. पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारती बांधण्याची व्यापक योजना हें १९५९-६० मध्यें हातीं घेण्यांत आलेलें सर्वांत महत्त्वाचें कार्य आहे. जागांची निवड करणे, आकृतिलेखनाचे नमुने पुरविणें, तपशीलवार अंदाज तयार करणें, टेंडर्स दाखल करणें, बांधकाम कुणामार्फत करावयाचें तें निश्चित करणें, इ० विषयींचें प्राथमिक काम बऱ्याच प्रमाणांत झालें आहे. या योजनेसाठीं अंदाजें रु. २४ लाख खर्च येईल असें गृहीत धरून ती प्रथम मंजूर करण्यात आली होती परन्तु, मोठ्या प्रमाणावरील मागणी विचारांत घेऊन योजनेचा एकूण खर्च रु. ४२ लाख इतका वाढवून या जादा दवाखान्यांना सरकारनें मंजुरी दिली. १९५९-६० मध्यें ही योजना उशीरां मंजूर केल्यामुळें ह्या कामासाठी रु. १.५० लाख इतकी प्रतीकात्मक तरतूद करण्यांत आली आहे. परंतु, वर्षामध्यें आवश्यक असलेल्या प्रत्यक्ष निधीचें योग्य व पक्के अन्दाज तयार केल्यानंतर त्यामध्यें बरीच वाढ करावी लागेल: हें काम चालू वर्षाच्या कालावधींत करण्यांत येईल. रक्तस्राव होणारे विषव्रण, आवरी ह्यांसारख्या विविध संसर्गजन्य रोगांविरुद्ध, मोठ्या प्रमाणांत गुरांना रोगमुक्त करणारी योजना १९६०-६१ सालीं चालू ठेवण्यांत येईल व तिच्याकरितां रु. २·३४ लाख इतक्या रकमेची तरतूद केली आहे.

पशुमारीच्या उच्चाटनाची योजना (रु. ९.९९ लाख) देखील १९६०-६१ मध्यें चालू ठेवण्यांत येईल. रोगामुळें बरीच हानि होते, आणि त्यामुळें गुरांच्या जीविताला सतत धोका असतो. शिवाय, तांतडीच्या वेळी लस व व्हॅक्सिन्स बाहेरून मिळविणें शक्य नसते. ह्या अडचणींतून पार पडण्यासाठीं, मुंबईमध्यें जीवशास्त्रविषयक उत्पादन करण्याची एक संस्था १९४८ मध्यें स्थापन करण्यांत आली होती. सध्या ह्या संस्थेंत रक्तस्राव होणारे विषव्रण व आवरी यांच्या लसीचें ९ लाख, गोट पॉक्सचें १,२०००, गोट व्हायरस व्हॅक्सीनचें ६ लाख, राणीखेड रोग व्हॅक्सीनचें १३ लाख डोस तयार होतात. ही संस्था नुकतीच पुण्याजवळ औंध येथें नवीन बांधलेल्या इमारतींत हलविण्यांत आली आहे. राज्यांच्या गरजा भागविण्यासाठीं योजनेच्या कार्यक्रमाचा विस्तार करण्यांत येईल. १९६०-६१ मध्यें योजनेच्या विस्तरित भागाकरितां रु. १·७७ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

**(२) चांगल्या जातीच्या गुरांची पैदास व पशुधनाची सुधारणा :**

**(ए) गुरांची सुधारणा :–**

निरनिराळ्या गुरांच्या अधिक चांगल्या जाती निर्माण करण्यासंबंधींचें कार्य सरकारी पशु–पैदास केंद्रामध्यें हातीं घेण्यांत आलें आहे. खाजगी संस्थांना व गोशाळांना भरीव स्वरुपाची

मदतहि देण्यांत आली आहे. खेड्यांतील गुरांचा दर्जा वाढविण्यासाठीं पशुपैदास केंद्रांतील चांगल्या जातीचे बैल खेड्यामध्ये ठेवण्यात आले आहेत.

(१) कृत्रिम रेतन योजना :—

सध्यां राज्यांत पुणें व नागपूर येथें दोन मुख्य कृत्रिम रेतन केन्द्रें व ११ उपकेन्द्रें, काम करीत आहेत. पहिल्या ३ वर्षांमध्ये ह्या केंद्रांमध्ये १२३३९ गुरांचें कृत्रिम रेतन, ४२३९ गाभण गुरांची चिकित्सा व १२६९ वंध्य गुरें यांच्यावर उपचार करण्यांत आले. १९६०-६१ मध्यें ह्या कामासाठीं रु. १·२४ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

(२) प्रमुख ग्रामयोजना :—

ह्या योजनेनुसार विदर्भ आणि मराठवाडा यांत १४ प्रमुख ग्रामयोजना स्थापन करण्यांत आल्या आहेत. भारत सरकारच्या योजनेच्या धर्तीवर मुंबई व पुणें विभागांतील विद्यमान् कृत्रिम रेतन केन्द्रांचा विस्तार करण्यांत आला असून दोन जादा कृत्रिम रेतन केन्द्रें स्थापन करण्यांत आली आहेत. १९६०–६१ मध्ये त्या योजनेकरितां रु. ४·३९ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

(३) पशुपैदास केन्द्रें—

चांगल्या जातीतील अधिक चांगल्या दर्जाच्या बैलांचा पुरवठा करण्यासाठीं व गुरांच्या पैदाशीबाबत प्रयोग करण्याचे एक काम हातीं घेण्यासाठीं खिल्लार जातीच्या गुरांची पैदास करण्याचे एक केन्द्र सोलापूर जिल्ह्यांत स्थापन करण्यांत आले आहे. ७० गायींची खरेदी आधींच करण्यांत आली असून चालूं वर्षी आणखी ३० गाई विकत घेण्यांत येतील. सोलापूर जिल्ह्यांतील जुनोनी येथील ९९० एकर खाजगी जमीन व दक्षिण सातारा जिल्ह्यांतील जत येथील ९.३० एकर जमीन निश्चित करण्यांत आली असून ती लवकरच संपादन करण्यांत येईल.

(४) गोशाळा विकास योजना :—

योजनेच्या उद्दिष्टांतील १७ गोशाळांपैकीं १४ गोशाळांना विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशांत मदत दिली जात आहे. १९६०–६१ मध्ये उरलेल्या तीन गोशाळांची स्थापना करण्यांत येईल. १९६०–६१ मध्ये योजनेकरितां रु. ९९,००० ची तरतूद केली आहे.

त्याशिवाय १९६०–६१ सालीं वळूबाबतची योजनाहि सुरू करण्यांत येईल.

१९६०–६१ मध्यें, गुरांचें संशोधन व विकास याकरितां एकूण रु. ९·१९ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

(बी) मेंढ्यामध्यें सुधारणाः

कृषिसंशोधनाच्या भारतीय परिषदेच्या आश्रयानें १९३७ मध्यें, पुणे येथें मेंढी पैदास व संशोधन केन्द्र स्थापन करून, राज्यामध्यें मेंढ्यांची सुधारणा करण्याचें कार्य हातीं घेण्यात आलें. लोंकरीच्या प्रतीचा अभ्यास करण्यासाठीं व प्राण्यांची निवड करण्याबाबत मार्गदर्शन करण्या-

साठीं संशोधन केंद्राला एक उत्तम तऱ्हेने सुसज्ज केलेली लोंकर संशोधन प्रयोगशाळाहि जोडण्यांत आलेली आहे. अशा तऱ्हेची भारतांतील ही एकच प्रयोगशाळा आहे. पुणें येथील लोंकरसंशोधन प्रयोगशाळेमध्यें वर्षाकांठीं जवळजवळ ८०० लोंकरीच्या नमुन्यांचें पृथक्करण केलें जाते. त्याशिवाय लोंकरीबाबतच्या विविध प्रश्नांचें संशोधन व मेंढ्यांची पैदास करण्या-संबंधींचे जीवशास्त्र यासंबंधीचे संशोधन केलें जातें.

चालू वर्षी, अमरावती जिल्ह्यांत पोहरा येथें व उस्मानाबाद जिल्ह्यांत उदगीर येथें मेंढ्याची पैदास करण्याच्या केंद्राचे काम पुढें सुरू ठेवण्यांत येईल. मराठवाड्यांतील मोमीनाबाद, पाडेगांव आणि हिंगोली येथें असलेली मेंढ्यांची सुधारणा करण्याच्या तीन केंद्रांचे कामदेखील ह्या वर्षी पुढें चालू ठेवण्यांत येईल. उद्दिष्ट पूर्णपणे साध्य करण्यासाठीं मेंढ्यांची सुधारणा करणारीं ९ केन्द्रे स्थापन करण्याचा कार्यक्रम १९६०–६१ या वर्षात हातीं घेण्यांत येईल.

पुणे येथील, मेंढी पैदास केन्द्रांमधील विद्यार्थ्यांना मेढ्यांच संवर्धन करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यांचेंहि योजिलें आहे.

मेंढ्यांची सुधारणा करणाऱ्या अखिल भारतीय योजनेनुसार, मेंढ्या व लोंकर यांची वाढ करणारी चार केन्द्रें स्थापन करण्यांत आली असून तीं १९६०-६१ मध्यें चालूं राहतील. १८ केंद्रें स्थापन करण्याचें उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जुन्या मुंबई प्रदेशांत १९६०-६१ मध्यें आठ जादा केंद्रें स्थापन करण्याचे योजिलें आहे.

१९६०-६१ मध्यें मेंढ्यांमध्यें सुधारणा करण्यासाठी व त्यासंबंधींचे संशोधन करण्याकरितां एकूण रु. ९·७७ लाखांची तरतूद केली आहे.

(सी) कोंबड्या व बदकें पाळण्याच्या व्यवसायाचा विकास करणें :

खडकी, धुळे व कोल्हापूर येथे स्थापन केलेल्या अंडीं उबविण्याच्या मध्यवर्ती केंद्रांचें काम १९६०–६१ मध्यें चालू राहील. अंडीं उबविण्याच्या वरील केंद्रांनीं आतांपर्यंत २९,२४७ उबविण्यालायक अंडी, ३७,९१० मोठी पिल्ले, १,०९६ बदके आणि ६४,४६९ बदकांची अंडी पुरविली आहेत. योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्याकरितां राज्यांत कोंबड्या–बदकें पाळण्याची सात केंद्रें ( मराठवाड्यांत ६ व विदर्भात १ ) स्थापन करणें हा १९६०-६१ मधील कार्यक्रम आहे आणि १९५९-६० मध्यें उघडण्यांत आलेलीं मराठवाड्यांतील ९ व विदर्भातील ७ केंद्रें पुढें चालूं ठेवण्यांत येणार आहेत.

खडकी व धुळे येथे कोंबड्या-बदके यांचे संवर्धन व सुधारणा करण्याचें प्रशिक्षण देणारे प्रशिक्षण वर्ग स्थापन करण्यांत आले आहेत. ह्या केंद्रामध्ये गेल्या तीन वर्षात, राष्ट्रीय विस्तार सेवा, समाजविकास गट यांत काम करणाऱ्या ३४७ पशुपालांना प्रशिक्षण देण्यांत आलें आहे. आणखी एक केंद्र स्थापन झाले असून त्यांत १९५८–५९ मध्यें ९७ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळालें आहे. १९६०–६१ मध्ये या तीनहि केन्द्रांचे काम पुढे चालू राहील.

१९६०-६१ मध्ये कोंबड्या व बदकें पाळण्याच्या व्यवसायाचा विकास करण्याकरितां व त्याबाबत संशोधन करण्याकरितां एकूण रु. ८·३९ लाख इतकी तरतूद करण्यांत आली आहे.

(डी) इतर गुरांची सुधारणा :

डुकरे पाळण्याच्या व्यवसायाच्या १९५९-६० मध्यें स्थापन झालेल्या लहान केंद्राचें काम १९६०-६१ मध्यें चालू राहील व त्यासाठीं रु. ०·४० लाख इतकी तरतूद केली आहे.

(३) शिक्षण

मुंबई व नागपूर येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयांमध्यें पशुवैद्यकीय शास्त्राचें प्रशिक्षण दिलें जाते. तेथील पाठ्यक्रम ४ वर्षांचा असून इण्टर सायन्स (बी गट) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ४ वर्षांच्या पदवी पाठ्यक्रमासाठीं प्रवेश दिला जातो.

त्याशिवाय मराठवाड्यांतील विद्यार्थ्यांसाठीं हैद्राबाद महाविद्यालयांत आणि विदर्भ प्रदेशांतील विद्यार्थ्यांसाठीं जबलपूर महाविद्यालयांत जागा राखून ठेवल्या आहेत. पशुवैद्यकीय विज्ञानशास्त्राच्या पदव्युत्तर प्रशिक्षणाकरितां निर्माण करावयाच्या प्रादेशिक केन्द्रांपैकीं एक प्रादेशिक केन्द्र म्हणून मुंबई येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयाचा विकास करण्याचें ठरविले आहें आणि १९६०-६१ या शैक्षणिक वर्षापासून पदव्युत्तर पाठ्यक्रम सुरू करण्यांत येईल. मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयांत पदव्युत्तर पाठ्यक्रमासाठीं, वसतिगृहाच्या इमारती आणि प्रयोगशाळा बांधण्याकरितां रु. २०,०००/-- इतक्या रकमेच्या तरतूदीसह एकूण रु. १,८०,०००/-- इतक्या रकमेची तरतूद केलेली आहे. १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत, पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यासाठीं इमारत बांधण्याकरितां रु. ५०,०००/- इतकी रक्कम धरून एकूण रु. ९·७३ लाखांची तरतूद केलेली आहे.

नागपूर, कोल्हापूर, हिंगोली आणि पोहरा येथे पशुपालांच्या प्रशिक्षणाकरितां चार केंद्रे आहेत आणि तेथें २५० पशुपालांच्या प्रशिक्षणाची सोय केली आहे. या कारणाकरितां १९६०–६१ साली एकूण रु. ९०,००० ची तरतूद करण्यांत आली आहे.

(४) संशोधन

गुरांच्या रोगावर नियंत्रण घालण्यासाठीं निवारक आणि प्रतिबंधक उपाययोजना करीत असतानाच राज्यानें गुरांचें संरक्षण करण्याकरितां विद्यमान गुरांच्या जातींची सुधारणा करण्याकरितां खास संशोधनाचें कार्य हातीं घेतले आहे.

गुरांच्या आंचळाच्या रोगाबाबतचें संशोधन

गुरांच्या आंचळाच्या रोगाबाबतचें संशोधन आणि तपासणी मुंबई येथें करण्यांत येते. १९५८–५९ सालीं पुणे येथें एक आणि १९५९–६० सालीं नागपूर येथे एक अशीं दोन रोगनिदान केंद्रें स्थापन करण्यांत आली. या कारणाकरितां रु. २८,००० इतक्या रकमेची तरतूद केलेली आहे.

**पशुवंध्यत्वाबाबतचा अभ्यास**

मुंबईच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना पशुविषयक प्रसूतिशास्त्र आणि मादांच्या रोगांचें शास्त्र, शिवाय कृत्रिम रेतन-पद्धति यांचें सैद्धांतिक आणि व्यावहारिक प्रशिक्षण देणें हा या योजनेचा उद्देश आहे. तसेंच भारतीय कृषिसंशोधन परिषदेने आंखलेल्या कार्यक्रमानुसार पशुवैद्यशीच्या निवडक केंद्रांत वंशोत्पादनाच्या प्राकृतिक रोगनिदान शास्त्राबाबतचे निरीक्षण पुढें चालूं ठेवणें, हा देखील ह्या योजनेचा हेतू आहे. याकरितां रु. ३७,०००/- ची तरतूद केली आहे.

**रोगसंशोधन केंद्र**

रोपजीवी जंतूमुळे होणाऱ्या रोग जमेस धरून, गुरांच्या इतर रोगावर बरेचसें संशोधन करणें आवश्यक आहे. प्रत्यक्ष क्षेत्रांत जाऊन काम करणाऱ्या नोकरवर्गाला अधिक स्वस्त व अधिक परिणामकारक सेरा व लस उपलब्ध व्हावी म्हणून ती तयार करण्याच्या कार्यावर संशोधन करण्याचे कार्य हातीं घ्यावें लागलें. १९६०–६१ सालांत पुणे येथे रोगसंशोधन केंद्र स्थापन करण्यासाठीं इमारती बांधण्याकरितां १९६०–६१ मध्यें रु. २०,००० ची तरतूद करण्यांत आली आहे.

**(बी) योजनेतर योजनाः—**

**[१] पशुधन सुधारणेच्या विस्तृत कार्यक्रमाबाबतची योजनाः—**

ही योजना १९४४–४९ सालापासून अमलांत आहे. योग्य जातींच्या जनावरांची पैदास करण्याकरितां, शेतकऱ्यांत आस्था निर्माण करण्यासाठीं, जिल्ह्यांत हिरव्या चाऱ्याचे खड्डे बांधणे, वंशोत्पादनासाठीं आवश्यक असलेल्या वळूंची खरेदी करणे, जिल्ह्यांत गुरांचें प्रदर्शन आणि मेळे भरविणे याकरितां अर्थसाहाय्य देण्याची तरतूद या योजनेंत आहे. १९६०-६१ सालाकरितां रु. १,१९,०००/- ची तरतूद केली आहे.

**[२] कोंबड्या व बदकें पाळण्याच्या धंद्याचा विस्तार करण्याची योजनाः—**

१९६०–६१ सालीं या योजनेकरितां रु. ४२,०००/- इतक्या रकमेची तरतूद केलेली आहे.

**[३] इतर योजनाः—**

त्याशिवाय खडकी आणि धुळे येथील कोंबड्या व बदके यांची पैदास करण्याच्या केंद्रांत, कोंबड्या व बदके पाळण्याच्या बाबतचे प्रशिक्षण घेणाऱ्या मागासलेल्या जातींच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्याची योजना, ( रु. २,००० ), गुरांना रोगांपासून मुक्त करण्याची विदर्भांतील योजना ( रु. १,९०,००० ); अनुसूचित प्रदेशांत कोंबड्या व बदकें पाळण्याच्या धंद्याची सुधारणा करण्याची योजना ( रु. १०,००० ); १७ पशुवैद्यकीय दवाखाने चालूं ठेवण्याची योजना ( रु. ९९,००० ); कोपरगांव येथें गीर जातीच्या गुरांची पैदास करण्याचें केंद्र आणि इगतपुरी येथें डांगी जातीच्या गुरांची पैदास करण्याचें केंद्र यासंबंधींची योजना ( रु. १,०७,००० ); अनुसूचित विभागांत चांगल्या प्रतीच्या वळूंच्या केंद्राबाबतची योजना ( रु. ३७,००० ); तेलंखेडी येथील कोंबड्या व बदकें पाळण्याचें केंद्र ( रु. ८१,००० );

नागपूर येथें पशुवंशशास्त्र-तज्ञांचें केंद्र ( रु. ९८,००० ); अनुसूचित प्रदेशांत पशुवैद्यकीय दवाखानें काढण्याची योजना ( रु. ९२,००० ); समाजविकास प्रकल्प, गट बंद केल्यानंतर पशुवैद्यकीय कामकाज चालू ठेवण्याची योजना ( रु. १,३२,००० ); कोंबड्या व बदकें यांच्या रोगाबाबतचें संशोधन करण्याची योजना (रु. १०,०००); पुणें येथील प्राणीजन्य पदार्थ विषयक संस्था ( रु. २,९८,००० ); भूतपूर्व समाजविकास प्रकल्प विभागांतील पशु-वैद्यकीय मदतीचीं केंद्रें ( रु. ४८,००० ); आणि विदर्भातील दूरवर्ति पशुवैद्यकीय दवाखानें ( रु. ७२,००० ) इत्यादि कांहीं योजना महत्त्वाच्या असून त्या १९६०-६१ सालीं चालू ठेवण्यांत येतील.

## दुग्धव्यवसाय विकास विभाग

राज्यांतील दुग्धव्यवसायाचा विकास आणि दूधपुरवठा योजनांचा विकास यांची गति वाढविण्याच्या उद्देशानें सरकारनें १९५८-५९ या वर्षी दुग्ध-व्यवसायविकास या नांवाचा वेगळा विभाग स्थापन केला.

**(अ) पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजना**

या विभागानें पुणें, नागपूर, नाशिक, सोलापूर यांसारख्या महत्त्वाच्या शहरांत दूध-पुरवठा-योजना अगोदरच हातीं घेतलेल्या आहेत. मुंबई शहराची दुधाची संपूर्ण गरज भागविण्याच्या दृष्टीनें विद्यमान मुंबई दूध योजनेंतदेखील पुष्कळ प्रमाणांत विस्तार करावयाचा आहे. ह्याबाबतचें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं अंदाजें तीन कोटी रुपये खर्चाच्या वरळी येथील दुसऱ्या दुग्धालय प्रकल्पास मंजुरी देण्यांत आली आहे. वरळी येथील ह्या दुसऱ्या दुग्धालय प्रकल्पाचें बांधकाम चालू असून १९६१ च्या प्रारंभीं हें दुग्धालय उत्पादनाच्या कार्यास प्रारंभ करूं शकेल अशी अपेक्षा आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत हातीं घ्यावयाच्या पुष्कळशा नियोजित नवीन दुग्धालय योजनांसाठीं योग्य प्रशिक्षण घेतलेल्या माणसांची सध्यां फार उणीव भासते. ही अडचण दूर करण्यासाठीं, आरे येथें रु. ११,७०,००० एवढा खर्च येणारी दुग्धालय तंत्रविज्ञान संस्था स्थापन करण्यास सरकारनें मंजुरी दिली आहे. ह्या संस्थेंत (आय. डी. डी. तंत्रविषयक) पाठ्यक्रमासाठीं प्रत्येकीं २९ विद्यार्थी आणि प्रमाणपत्र पाठ्यक्रमासाठीं एकाच वेळीं २० विद्यार्थ्यांपर्यंत किंवा पहिल्या वर्षी १४९ व दुसऱ्या वर्षानंतर १७० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिलें जाईल. यासाठीं १९६०-६१ करितां एकूण रु. १·२१ लाखाची तरतूद करण्यांत आली आहे.

वरळी येथील दुसऱ्या दुग्धालय प्रकल्पासाठीं दुधाचा पुरेसा पुरवठा असणें आवश्यक आहे. म्हणून त्या केंद्रांत थंड केलेलें दूध मुंबईस आणलें जाईल. ग्रामीण प्रदेशांत दूध गोळा करण्याचीं केंद्रें उघडण्याचें योजिलें असून मुंबईला दूध पाठविण्यासाठीं दररोज सुमारें २०० ते ४०० मण दुधाचा व्यवहार ह्या केंद्रांतून केला जाईल. ह्या केंद्रांत दुधाचा पुरवठा होण्यासाठीं नवीन दूध उत्पादनाच्या नवीन प्रदेशांचा विकास केला जाईल. म्हणून सफाळें व पालघर येथें दूध थंड

करण्याचे दोन डेपो स्थापन करण्याचें योजिले आहे आणि त्यासाठीं १९६०-६१ करितां रु. १,००,००० ची तरतूद करण्यांत आली आहे.

१९६०-६१ साठीं या विभागाच्या कार्यक्रमासाठीं सुचविलेली सर्वतोपरी नवीन योजना म्हणजे मिरज येथील कृष्णा खोरें दुग्ध प्रकल्प होय. दुधाचा क्रयविक्रय करण्याकरितां योग्य व आवश्यक ती व्यवस्था करण्याचें योजिलें तर ह्या प्रदेशांत फार मोठ्या प्रमाणांत दुधाचें उत्पादन होण्याची शक्यता आहे.

ज्यावेळीं हा प्रकल्प पुरा होईल त्यावेळीं त्यामध्यें १५०० ते २००० मण दुधाचें उत्पादन होईल अशी अपेक्षा आहे. योग्य अशा अवस्थांमधून हा प्रकल्प हातीं घेण्यांत येईल. १९६०-६१ करितां रु. १३,६०,००० (रु. १०,६०,००० एवढी रक्कम "८९-ए भांडवली खर्च इ. सदराखालीं") एवढ्या रकमेची तरतूद केली आहे. पुणे येथें मिरजच्या आसपासच्या प्रदेशांतून दररोज ८००० मण दुधाचा पुरवठा करणें हें ह्या योजनेचें उद्दिष्ट आहे.

याशिवाय १९६०--६१ मध्यें मार्गदर्शी दूध पुरवठा योजना, धुळ (रु. ६,४७,९०० ह्यामध्यें '८९--ए भांडवली खर्च' या सदराखालील रु.४,९७,९०० एवढ्या रकमेचा अंतर्भावहोतो.), तळेगांवच्या आसपासच्या दूध उत्पादनाच्या प्रदेशाचा विकास (रु. २·२७ लाख) आणि महाराष्ट्रांतील दुधाच्या प्रदेशाची पाहणी (रु. ३९,०००) या नवीन योजना देखील हातीं घेण्यांत येतील.

याव्यतिरिक्त आरे दूध वसाहतींतील कामगारांसाठीं सुखसोयी उपलब्ध करण्याचें योजिलें आहे. यासाठीं १९६०--६१ सालाकरितां रु. ५०,००० ची नाममात्र तरतूद करण्यांत आली आहे. (रुग्णालय बांधणें रु. ०·२०; घरें बांधण रु. ०·१५, मुलांसाठीं उद्यान रु. ०·०५ पोहण्यासाठीं तलाव रु. ०·०५, करमणुकीसाठीं केंद्र रु. ०·०५) अकोला व अमरावती येथें दुग्धालय व्यवसायाचा विकास करण्याकरितां, व त्या शहरात मार्गदर्शी दूध पुरवठा योजना सुरू करण्याचें ठरविले असून १९६०-६१ करिता प्रत्येकी रु. ८,२१,००० इतक्या एकूण रकमेची तरतूद केली आहे.

**(ब) योजनेतर योजना**

बृहन्मुंबईतील कमी मिळकत असलेल्या गटांतील लोकांना मदत व्हावी ह्या हेतूनें, अर्थसहाय्यित दरानें अल्प चरबी व विपुल प्रोटीन असलेल्या दुधाचें वांटप करण्याबाबतची एक योजना सरकारनें नुकतीच मजूर केली आहे. वरळी येथील दुग्धालयांतून उत्पादन होईपर्यंत दर दिवशीं सुमारें १९,००० लिटर (५०० मण) दूध बृहन्मुंबईतील गरीब व मध्यम वर्गीय लोकांना विकलें जाईल. यासाठीं १९६०-६१ करितां रु. २३,९६,००० (रु. २२·८६ लाख "८९-ए-भांडवली खर्च" या सदराखालीं व १·१० लाख रुपये "४७-संकीर्ण विभाग" या सदराखालीं) ची तरतूद करण्यांत आली आहे.

चालू वर्षी सरकारी दूध वसाहतीतील परवाने असलेल्या इसमांना (रु.३०,००,०००) कर्ज देण्याबाबतची योजना चालू ठेवण्यांत येईल. त्याचप्रमाणें १९६०-६१ मध्यें मुरा जातीच्या रेड्यांच्या वंशचांचणीबाबतची संशोधन योजना (रु. ३३,०००) सरकारी दुग्ध वसाहतींतील (रु. १६,०००) मलई, शर्करायुक्त व स्वादयुक्त दुधाचें निर्जंतुकीकरण करण्याबाबतच्या, भारतीय कृषि संशोधन परिषदेनें पुरस्कृत केलेल्या योजना देखील चालू राहतील.

# वन–विभाग

वनांचें संरक्षण करणें, त्यांची निगा राखणें, त्यांचा उपयोग व विकास करणें हीं वन–विभागाचीं मुख्य कार्यें आहेत. जमिनीची धूप थांबविण्यासाठीं झाडें लावणें, वनविकास शास्त्रांतील संशोधन व जंगलांच्या पुनरुज्जीवनाला उपकारक ठरणारे इतर उपाय योजणें हेंहि विभागाच्या कार्यकक्षेंत येतें.

भारत सरकारनें अवलंबिलेल्या राष्ट्रीय वनविषयक धोरणांनुसार अनुषंगानें, राज्य सरकारनें रेताड व ओसाड जमिनींत वन वर्धन करणें, रोपांच्या बागा लावणें, वन्य पशु-पक्षांचें संरक्षण करणें, व सागवान लांकूड आणि आगपेट्यांना लागणारें लांकूड ( मॅचवुड ) यांचीं रोपें लावणें, यांसारख्या जादा योजना हातीं घेतल्या आहेत.

१९६०-६१ करितां ( वनशास्त्रविषयक योजनांसाठीं रु. ४०·१७ लाख आणि जमीन संरक्षण योजनांसाठीं रु. ४·४४ लाख ) रु. ४४·६१ लाखांची एकूण तरतूद केली आहे.

### [ए] नोकरवर्गाबाबत योजना

१९६०-६१ मध्यें नोकरवर्गाबाबतच्या योजनांसाठीं रु. ९·९६ लाखांची एकूण तरतूद केली आहे.

ठाणें येथील जंगल प्रदेश व नाशिकच्या पूर्व व पश्चिम विभागांतील रान जमीन यांची व्यवस्था पाहण्यासाठीं मंजूर केलेला नोकरवर्ग, बेकायदा झाडें तोडण्याला पायबंद घालण्यासाठीं ठाण्याच्या पश्चिम व उत्तर विभागांत हद्दीचे जादा रक्षक, तीन फिरत्या पथकांसाठीं नोकरवर्ग, विदर्भांत जादा संरक्षण मंडळ, मंडळांच्या विस्ताराची व पुनर्घटनेची योजना, विदर्भांतील विभाग व रेंज कार्यालयें, वनभूव्यवस्था विषयक कार्य, कारकुनांचें प्रशिक्षण, औरंगाबाद व नांदेड विभागांतील प्रादेशिक नोकरवर्गाची वाढ, या गोष्टी १९६०-६१ मध्यें चालू राहतील.

जंगलांतील उत्पन्नाची बेकायदा वाहतूक शोधून काढण्यासाठीं, कुलाबा व जंजिरा उप-विभागांतील खाड्यांतून गस्त घालण्याकरितां यंत्रावर चालणाऱ्या ९ होड्या खरेदी करण्याचेंहि योजिलें आहे.

### [बी] प्रशिक्षण योजना

रेंजर्स, फॉरेस्टर्स व वनरक्षक यांच्या प्रशिक्षणाची योजनाहि १९६०-६१ मध्यें चालू राहणार असून तिच्यासाठीं रु. १·३४ लाखांची तरतूद केली आहे.

वनविषयक विविध विषयांत नुकत्याच झालेल्या सुधारणांचे प्रशिक्षण देण्यासाठीं, विस्तारित तांत्रिक साहाय्य कार्यक्रम, हिंदी-फ्रेंच तांत्रिक कार्यक्रम व कोलंबो योजना, याअन्वयें वनाधिकाऱ्यांना परदेशीं पाठविण्याचें योजिलें आहे व त्यासाठीं १९६०-६१ मध्यें रु. १६,००० इतकी नाममात्र तरतूद केली आहे.

## (सी) संशोधनविषयक योजना

वनविकासविषयक संशोधन व वनविकासाच्या सुधारलेल्या पद्धतींच्या माहितीचा प्रचार करणें ही योजना १९६०-६१ मध्यें सुरू होणार असून तिच्याकरितां रु. ३१,००० इतकी तरतूद केली आहे.

## (डी) विकास योजना

**(१) वनसंवर्धनविषयक योजना :--**

वनप्रदेशांची सतत निगा न राखल्यामुळे जंगलाचे मोठमोठे पट्टे अजिबात नष्ट झाले असून, तेथील वनछाया विरळ झाली आहे, व तेथील जमिनीची झीज होत असून परिणामीं हे पूर्णपणें ओसाड होऊन कोणतीहि वनस्पति वाढण्यास अयोग्य होण्याचा संभव आहे. सोलापूर जिल्ह्यांतील म्हाळशिरस, बार्शी; व सांगोला हे तालुके, सातारा तालुका, द. साताऱ्यामधील जत, अहमदनगर जिल्हा, पुणें विभागांतील खडकवासला, पूर्व, पश्चिम आणि उत्तर खानदेश विभाग, पूर्व व पश्चिम नाशिक विभाग आणि जंजिरा उपविभाग या भागांतील विविध वन-संवर्धनविषयक योजना प्रगतिपथावर आहेत. १९६०-६१ करितां रु. ३·७९ लाख इतकी एकूण तरतूद केली आहे. त्याशिवाय, औरंगाबाद विभागांतील अजिंठा आणि वेरूळ येथील लेण्यांच्या भोंवतालीं झाडें लावण्याकरितां रु. ४६,००० इतकी एकूण तरतूद केली आहे.

पश्चिम खानदेश विभागांतील धुळें; पिंपळनेर आणि साक्री रेंजमध्यें वनसंवर्धन आणि तेथील कुरणांचें पुनर्वसन करणें व त्यांत पाळीपाळीनें गुरें चारणें या प्रगतिपथावर असलेल्या योजनांसाठीं रु. ३,०४,००० ची तरतूदहि करण्यांत आली आहे.

महाबळेश्वर येथें प्रतापसिंह बागेची अधिक सुधारणा करण्यासाठीं रु. ३१,००० ची तरतूदहि करण्यांत आली आहे.

**(२) वृक्षारोपण :--**

या वर्गांत, सागवानी वृक्ष, आगपेटयांना लागणारें लांकूड (मॅचवुड) आणि आगव्याचें लांकूड (ॲगेव्ह) यांसारखीं खास जातीचीं झाडें लावण्याचें काम हातीं घेतलें आहे. या कामाची प्रगति होत असून १९६०-६१ करितां रु. २·९४ लाख ( सागवानी जातीचीं झाडें लावण्या-करितां रु. १·६९ लाख, आगव्या जातीचीं झाडें लावण्याकरितां रु. ३०,००० आणि आगपेटयांना लागणाऱ्या लांकडाकरितां रु. ९९,००० ) इतकी तरतूद केली आहे.

१९६०-६१ मध्ये हिरड्या रोपांच्या बागांची निगा राखण्याकरितां रु. २,०९,००० ची तरतूद करण्यांत आली आहे.

**(३) लाखेचें उत्पादनः--**

ह्या योजनेचे दोन भाग होतात. (ए) खेड्यांतील लोकांना शास्त्रीय पद्धतीचें प्रात्यक्षिक करून दाखविणे व त्यांच्यांत त्या पद्धतींचा प्रचार व (बी) जंगल विभागांत अधिक प्रमाणांत लाखेचें उत्पादन करणे. लाखेच्या उत्पादनाच्या पद्धतीचें प्रात्यक्षिक व प्रचार करण्याचें काम खास नोकरवर्गाकडून केले जात आहे. या कामासाठीं १९६०-६१ करितां रु. २६,००० ची तरतूद केली आहे.

(४) नोकरवर्गासाठीं सुखसोयीः—

जंगलांत इमारती बांधणें व दुय्यम नोकरवर्गासाठीं रहाण्याच्या जागेची सोय करणें ह्या-संबंधींची योजना प्रगतिपथावर असून १९६०-६१ मध्यें ह्या योजनेसाठीं रु. २·२३ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे. नांदेड येथील विभागीय वन अधिकाऱ्यांच्या कार्यालयाकरितां व औरंगाबाद येथील विभागीय वन अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाकरितां इमारती बांधण्याचेंहि योजिलें आहे; व त्यासाठीं १९६०-६१ मध्यें रु. ४७,००० ची तरतूद केली आहे.

(५) दळणवळणः—

ओझार-सायवान रस्ता बांधण्याचें काम चालू असून त्यासाठीं १९६०-६१ मध्यें रु. ७१,००० ची तरतूद करण्यांत आली आहे. जंगलांतील रस्ते बांधण्यासाठीं १९६०-६१ मध्यें रु. २.११ लाखांची तरतूदहि केली आहे.

(६) रत्नागिरी जिल्ह्यांतील दुर्गम प्रदेशांचा विकासः—

भारत सरकारनें नेमलेल्या, दुर्गम प्रदेशांबाबतच्या समितीच्या अहवालांतील शिफारशी-नुसार १९६०-६१ मध्यें रत्नागिरी जिल्ह्यांतील दुर्गम प्रदेशाचा विकास करण्यासाठीं खालील सुधारणा करण्याचें योजिलें आहे.

(१) ७९,००० एकरांच्या जादा प्रदेशांचा ताबा घेणें व त्यांची पाहणी करणें व त्यांच्या सीमा ठरविणे.

(२) ६०० एकर जमिनींत काजूंची लागवड करणें.

(३) १,२०० एकरांमध्यें पावसाळ्यापूर्वीची कामें करणें.

(४) १२ हिरव्या रोपांच्या बागांमध्यें बी पेरण्याचें काम हातीं घेण व

(५) हिरव्या रोपांच्या १२ जादा बागा तयार करण्यासाठीं पावसाळ्यापूर्वीचीं कामें करणें.

त्यानुसार, ह्या योजनेकरितां १९६०-६१ मध्यें रु. १,४६,९९६ ची तरतूद केली आहे.

(७) जमीन संरक्षणः—

वन-विभागाच्या जमीन-संरक्षण योजनांकरितां १९६०-६१ सालीं एकूण रु. ४·३२ लाखांची तरतूद केली आहे. रत्नागिरी जिल्ह्यामध्यें जमीन-संरक्षण करणे ही महत्त्वाच्या योजनांपैकीं एक योजना असून ९०,००० एकरामध्यें वृक्षारोपण करणें हा या योजनेचा उद्देश आहे. २२,००० एकरांमध्यें वृक्षारोपण करण्याच्या योजनेच्या मूळ उद्दिष्टा-पैकीं १९,००० एकर जमिनीमध्यें वृक्षारोपण करण्याचें काम सुरूहि झालें आहे. या योजने-करितां १९६०-६१ मध्यें रु. २·१६ लाखांची एकूण तरतूद केली आहे. औरंगाबाद व नांदेड विभागांत कोरड्या व झीज झालेल्या जमिनीची झीज होण्यास प्रतिबंध करणें व तिच्यांत वृक्षारोपण करणें (रु. ४७,०००) विदर्भातील पाणलोटाच्या प्रदेशांत वृक्षारोपण करणें (रु. ४३,०००) आणि राज्यांतील शहरें व गांवें त्यांच्या परिसरांत, जमीन-संरक्षण करणारीं व त्याबाबत प्रात्यक्षिकें करून दाखविणारीं केन्द्रें स्थापन करण्याची योजना (रु. ३९,०००) ह्या इतर महत्त्वाच्या योजना असून त्या प्रगतिपथावर आहेत.

## उद्यानें व बागा याबाबतचा विभाग

राष्ट्रीय उद्यानें व बागा तयार करण्यासाठीं १९६०-६१ मध्यें रु. ७·२३ लाख इतक्या एकूण रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

पुण्याजवळील सिंहगड येथें आणि मुंबई जवळील घारापुरी बेटावर राष्ट्रीय उद्यानें तयार करणें या, ह्या विभागाच्या महत्वाच्या योजनान्तर्गत योजना आहेत. मुंबई व पुणें या शहरांत राहणाऱ्या बहुसंख्य लोकांना सहज जातां येईल अशीं हीं ठिकाणें असून हौशी प्रवाश्यांनाहि त्यांचें बरेंच आकर्षण आहे. १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत ह्या योजनांसाठीं रु. ४,७९,४१९ (नोकरवर्गाकरितां रु. ४८,४१९ व कामांकरितां रु. ४,३१,००० ) आणि रु. १,०६,०३४ (नोकरवर्गाकरितां रु. १९,०३४ व कामाकरितां रु. ८७,०००) इतक्या रकमांची तरतूद करण्यांत आली आहे.

## मत्स्योद्योग विभाग

महाराष्ट्र राज्याला सुमारें ४९० मैलांचा समुद्रकिनारा आहे. त्याशिवाय, २,००० मैल लांबीच्या नद्या आणि जिथें कृत्रिम पद्धतीनें मत्स्यसंवर्धन करण्याच्या उद्योगाच्या विकासाची बरीच शक्यता आहे असे विपुल अंतर्गत जलाशय आहेत. १९५८-५९ मध्यें महाराष्ट्रांतील सुमारें १·६ लाख टन वजनाचे मासे समुद्रांतून पकडण्यांत आले असावे असा अंदाज आहे. याच वर्षीं सुमारें १०,००० टन वजनाचे गोड्या पाण्यांतील मासे पकडण्यांत आले असावे असा अंदाज आहे. राज्यांतील खाऱ्या व गोड्या पाण्यांतील माशांच्या प्राथमिक विक्रीची एकूण किंमत सुमारें ४ कोटी रुपये आहे.

मत्स्योद्योग विभागाच्या प्रमुख कार्यांची वर्गवारी खालीलप्रमाणें करतां येईल.

(ए) सागरी मत्स्योद्योग:- या प्रकारच्या मत्स्योद्योगाच्या विकासांत मच्छीमारीच्या होड्यांचें यांत्रिकीकरण, माल उतरवण्याच्या जागांची व बंदरांची सुधारणा इत्यादींचा समावेश होतो.

(बी) गोड्या पाण्यांतील मत्स्योद्योग:- ह्या वर्गवारींत, गोड्या पाण्याचे सांठे व छोटे मासे ठेवण्याचीं तळीं निर्माण करणें, ह्यांचा समावेश होतो.

(सी) क्रयविक्रय योजना:-- मासे खारविण्याच्या जागा, क्रयविक्रय, वाहतुक, मासे टिकविणें, इ. बाबी या वर्गवारींत येतात.

(डी) शिक्षण, संशोधन, प्रात्यक्षिक इ. यांसारख्या इतर योजना

### (ए) द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजना

१९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत ह्या योजनांसाठीं रु. ३९·३६ लाखांची तरतूद केली आहे.

(१) मच्छीमारीच्या होड्यांचे यांत्रिकीकरणः--

महाराष्ट्र राज्य हें मुख्यत्वेंकरून सागरी राज्य आहे. त्यामुळें अर्थातच सागरी मच्छीमारी धंद्याच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करण्यासाठीं प्रयत्न केले जात आहेत. कोळी लोकांनीं मच्छीमारीच्या जुन्या पद्धती टाकून, डिझेल इंजिनें लावून होड्यांचें यांत्रिकीकरण करणें, संयोगिक नायलॉन आणि तागाच्या दोऱ्यांनीं विणलेलीं जाळीं वापरणें आणि मच्छीमारीच्या आधुनिक तंत्राचा अवलंब करणें, यांसारख्या अधिक कार्यक्षम पद्धति स्वीकाराव्या यासाठीं त्यांचीं मनें वळविण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे. सरकारी सहाय्य घेऊन यंत्रें बसविलेल्या होड्यांची संख्या सुमारें १,२०० आहे. ही योजना ह्या वर्षी चालू रहावयाची असून तिच्याअन्वयें कर्जे व अर्थसहाय्य देण्यासाठीं रु. ९,३७,१९० ची तरतूद केली आहे

(२) कमी विकास झालेल्या प्रदेशांत मच्छीमारीचें प्रात्याक्षिकः—

यांत्रिक होड्यांनीं मच्छीमारी करणें हें साध्या होड्यांतून मच्छीमारी करण्यापेक्षां फायद्याचें कसें असतें, ह्याबाबतचें प्रात्यक्षिक मागासलेल्या प्रदेशांतील कोळ्यांना दाखविण्यासाठीं सरकारनें एक यांत्रिक होडी तयार केली आहे. ही होडी जेथें यांत्रिकीकरण अजून लोकप्रिय झालें नाहीं अशा कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांत वापरून दाखविण्यांत येईल. चालू वर्षी रु. ९०,२०० ची तरतूद केली आहे. मच्छीमारांना डिझेल इंजिनें वापरण्याचें व यांत्रिक होड्यांच्या चालविण्याच्या पद्धतीचें शिक्षण देणारें प्रशिक्षण केंद्र वेसावें येथें उघडण्यांत आलें आहे. १९६०–६१ मध्यें रु. ४२,३९४ ची तरतूद केली आहे.

(३) माल उतरविण्याच्या जागांची व बंदरांची सुधारणा :—

होड्या सुरक्षित जागीं नांगरणें, त्या चालविणें व पकडलेली मासळी उतरविणें, ह्यासंबंधींच्या विद्यमान सोयी अगदींच अपुऱ्या आहेत. बंदरें सुधारणें, मार्गदर्शक दीपस्तंभ इ. साठीं एक योजना आंखली आहे. पाज ( रत्नागिरी जिल्हा ) येथें एक आदर्श बंदर बांधणें आणि सुरुंग लावून खडक फोडणें ह्यासंबंधींचें काम लवकरच सुरू होईल व त्याकरितां १९६०–६१ मध्यें रु. ३७,१०० ची तरतूद केली आहे.

(४) मासे टिकविणें, त्यांची वहातूक करणें व त्यांचा क्रयविक्रय :—

मासे लवकरच खराब होत असल्यामुळें उत्पादन वाढविण्याच्या उपाययोजनांबरोबरच ते टिकविण्याची, त्यांची वाहतुक व क्रयविक्रय करण्याची व्यवस्था करणेंहि आवश्यक आहे. यामुळें सातपाटी, वेसावें आणि मालवण येथील मच्छीमार सहकारी संस्थांना अशा प्रकारच्या मत्स्योद्योगगृहांसाठीं कर्जे व अर्थसहाय्य देण्याचें मंजूर झालें आहे.

मासळीची जलद वाहतूक करण्याच्या दृष्टीने, बाजाराच्या ठिकाणीं मासळी नेण्यासाठीं ट्रक खरेदी करण्याकरितां कोळ्यांच्या संस्थाना कर्जे देण्यांत येतात. मासळीची अशा रीतीने वाहतूक करण्यासाठीं इन्स्युलेटेड व्हॅन्स चालविण्याचें देखील योजिलें आहे.

नवीन मासळीबाजार बांधण्यासाठीं व जुन्या मासळीबाजारांची सुधारणा करण्यासाठींहि एक योजना तयार करण्यांत आली आहे. १९६०–६१ या वर्षांत एकूण २,६०,०९० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**(५) गोड्या पाण्यांतील मत्स्योद्योगः–**

गोड्या पाण्यांतील मत्स्यसंवर्धनाचा विकास करण्यास खूपच वाव आहे. गोड्या पाण्यांतील मत्स्योद्योगाचा विकास करण्यासाठीं हातीं घेतलेल्या महत्त्वाच्या योजना पुढीलप्रमाणें:–

१) अंतर्गत जलाशयामध्यें कार्प माशांच्या छोट्या पिल्लांचें संवर्धन करणें. (तरतूद रु.२,३८,६६९ ). २) खोल तळयांमधील मच्छीमारीच्या व्यवसायाचा विकास करणें. ( तरतूद रु. ७१,२०८). ३) विदर्भात माशांचीं छोटी पिल्लें वाढविण्याचें जलाशय. (तरतूद रु. ३९,८२४)

**(६) शिक्षण व संशोधनः—**

कोळ्यांना शिक्षण देणें ही या विभागाच्या कार्यक्रमांपैकीं एक महत्त्वाची बाब आहे. १९५९-६० या वर्षात कुलाबा जिल्ह्यांतील बागंदळ येथें एक नवीन मत्स्योद्योग शाळा स्थापन करण्यांत आली आहे. प्राथमिक शाळांमध्यें शिकविल्या जाणाऱ्या इतर विषयांबरोबरच, मत्स्योद्योग शाळा या व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शाळा असल्यामुळें, त्यांत सुतारकाम, जाळी विणणें, नावा तयार करणें, मासळीवर प्रक्रिया करणें इत्यादि मच्छिमारीच्या धंद्याशीं प्रत्यक्ष संबंध असलेल्या विषयांचें प्रशिक्षण देण्यांत येतें. १९६०–६१ या वर्षात या योजनेकरितां रु. २०,१२३ इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

मच्छिमारीच्या व्यवसायाशीं संबंध असलेल्या प्रश्नांबाबत संशोधन करण्यासाठीं मुंबई व रत्नागिरी येथें संशोधन केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत. रत्नागिरी येथील संशोधन केंद्राचें कार्य १९५८--५९ मध्यें सुरू झालें. मोती काढण्याच्या व्यवसायाचा विकास होणें कितपत शक्य आहे, याबाबत तपासणी करण्याची एक योजना देखील हातीं घेण्यांत आली आहे. गोड्या पाण्यांतील मासळीची कृत्रिम रीतीनें पैदास करून व खाद्य पुरवून उत्पादन वाढविण्याचे प्रयोगहि चालू आहेत.

**(७) इतर कार्यक्रम :—**

परदेशांतून कॉडलिव्हर ऑईलची आयात बंद झाल्यामुळें शार्क लिव्हर ऑईलची मागणी खूपच वाढली व ससून डॉक येथें असलेल्या सरकारी तंत्रविषयक प्रयोगशाळेस जनतेची व राज्य व केंद्र सरकारच्या वैद्यकीय संस्थांची शार्क लिव्हर ऑईलची मागणी पुरी करण्यासाठीं बरेंच काम करावें लागलें. या विभागानें माल्ट एक्स्ट्रॅक्टयुक्त शार्क लिव्हर ऑईल नांवाचें एक नवीन तेल बाजारांत विक्रीस आणलें असून तें बाजारांत अल्पावधींत लोकप्रिय झालें आहे.

कोंकण प्रदेशांत मत्स्योद्योगाचा विकास करण्याच्या खास योजना सुरू करणें हा या वर्षातील प्रमुख कार्यक्रमांपैकीं एक कार्यक्रम होता; व त्यासाठींरु. २५ लाख इतका अंदाजें खर्च आला. त्यापैकीं रु. १३·८४ लाख इतक्या रकमेची तरतूद १९५९-६० मध्यें करण्यांत आली होती. ह्या योजना मध्यम प्रतीच्या दोन मच्छीमारीच्या नावा सुरू करण, मासळीची ने-आण करण्याच्या नावा चालू करणें, शीतगृहाचा यंत्रसंच, मासे खारविण्याची केंद्रें स्थापन करणें व शार्क लिव्हर ऑईल काढण्याचीं पथकें चालू करणें यांसंबंधींच्या आहेत. या योजनांच्या

बाबतींतील प्राथमिक कामें १९५९ मध्येंच सुरू करण्यांत आलीं असून त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच काम पुढील वर्षीं हातीं घेण्यांत येईल. वरील कार्यक्रमासाठीं १९६०-६१ मध्यें रु. ९.८४ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्याचें योजिलें आहे. याशिवाय नोकर-वर्गाला प्रशिक्षण देण्याचें केंद्र स्थापन करण्याची योजना (रु. १७,३०९) व तृतीय पंच-वार्षिक योजनेंतील प्रारंभिक कामें पूर्ण करण्यासाठीं प्रकल्प पथक स्थापन करण्याची योजना (रु. ७,७०९) अशा दोन योजना १९६०-६१ मध्यें हातीं घेण्याचें योजिलें आहे.

### (बी) योजनेतर योजना

**१) मासे खारविण्याचीं केंद्रें:—**

या योजनेन्वयें मासे खारविण्याच्या सोयींची तरतूद करण्यांत आली आहे. या विभागातर्फे, रत्नागिरी जिल्ह्यांत, किनाऱ्यालगतच्या मच्छीमारीच्या केंद्रांमध्यें मासे खारविण्याच्या २१ केंद्रांची व्यवस्था ठेवली जाते. या केंद्रांत कोळ्यांना वाजवी दरानें मीठ पुरविण्यांत येतें. आरोग्यास हितावह अशा पद्धतीनें मासे खारवितां यावेत म्हणून कोळ्यांसाठीं कॉंक्रीटचे चबुतरे व ताजें पाणी यांबाबतच्या सोयीहि केलेल्या आहेत. या योजनेसाठीं १९६०–६१ मध्यें रु. १,५८,३०० तरतूद केली आहे.

**२) मुंबई येथील तारापोरवाला मत्स्यालय:—**

या विभागातर्फे मुंबई येथील तारापोरवाला मत्स्यालयाची व्यवस्था ठेवण्यांत येते. शैक्षणिक दृष्टया त्याला असलेलें महत्त्व सोडलें तरी, तें राज्याच्या राजधानीच्या ठिकाणचें एक प्रवाशांचें आकर्षण बनलें आहे. प्राणिशास्त्राविषयक प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना व संशोधकांना सागरी जीवशास्त्रविषयक प्रश्नांवरील पदव्युत्तर संशोधन करण्यासाठीं सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. मत्स्यालयाशीं संलग्न असलेल्या संस्थेला मुंबई विद्यापीठाकडून पदव्युत्तर संशोधनासाठीं मान्यता मिळाली आहे.

या कारणासाठीं १९६०–६१ मध्यें रु. १,१७,३०० ची तरतूद केली असून या मत्स्यालयापासून प्रवेश-फीच्या रूपानें दरवर्षीं अन्दाजें ७०,००० रुपयांचें उत्पन्न मिळतें, व त्या उत्पन्नामुळें हा सर्वच खर्च जवळजवळ भरून निघतो.

**३) मत्स्योद्योग शाळा स्थापन करणें:—**

मत्स्योद्योग शाळा म्हणजे कोळ्यांच्या मुलांना प्राथमिक शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळा होत. प्रत्येक शाळेंत, मत्स्योद्योगाच्या मूलभूत प्रशिक्षणाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या अशा विषयांचें व्यावहारिक प्रशिक्षण देणाऱ्या कारखान्यांची सोय केलेली आहे. या योजनेअन्वयें, रत्नागिरी जिल्ह्यांतील मिथबाव, जैतापूर व देवबाग येथील या शाळांसाठीं १९६०-६१ या वर्षाकरितां रु. ४९,००० इतक्या रकमेची तरतूद केली आहे.

**४) इतर योजना:—**

जकात, बर्फ निर्मितीचे यंत्रसंच, नायलॉन इत्यादींच्या टी. सी. एच. साधनसामुग्रीवरील अनुषंगिक खर्च यांचा मेळ घालण्यासाठीं, १९६०-६१ मध्यें रु. ६०,००० इतक्या रकमेची तरतूद केली आहे.

मासे खारविण्याचीं केंद्रें, मत्स्योद्योग शाळा व तारापूरवाला मत्स्यालयांतील मुख्य कार्यालय येथील लहान कामासाठीं, १९६०-६१ मध्यें रु. ३३,६०० इतक्या रकमेची तरतूद केली आहे.

# मुलकी पुरवठा विभाग

## [ए] अन्नधान्यविषयक धोरण

(१) सामान्य उपाययोजनाः–

सध्यां अंमलांत असलेल्या अन्नधान्याच्या वाहतुकीसंबंधींच्या प्रमुख उपाययोजना थोडक्यांत खालीलप्रमाणें आहेत:—

(ए) गहूं

दि. ७-२-५९ पासून आंतर विभागीय गहूं वाहतूक (नियंत्रण) आदेश १९५७, य अन्वयें गहूं विभाग ३— यांत राजस्थान, मध्यप्रदेश व पूर्वींचें मुंबई राज्य यांचा समावेश होतो— याचें राजस्थान, मध्यप्रदेश व पूर्वीचें मुंबई राज्य अशा तीन स्वतंत्र विभागांत विभाजन करण्यांत आलें. गहूं किंवा गव्हाचे पदार्थ यांची एका विभागांतून दुसऱ्या विभागांत निर्यात किंवा आयात करण्यास बंदी घालण्यांत आली आहे. मुंबईचा गव्हाची वाहतूक करण्यावर नियंत्रण ठेवण्याबाबतचा आदेश, १९५६, या अन्वयें गहूं व गव्हाचे पदार्थ यांची, बृहन्मुंबईतून राज्याच्या कोणत्याहि भागांत निर्यात करण्यावर घालण्यांत आलेली बंदी अजूनही चालू आहे.

(बी) तांदूळ

मद्रास, आंध्रप्रदेश, म्हैसूर, केरळ आणि पांदिचरी राज्य ह्यांचा समावेश असलेला दक्षिण तांदूळ विभाग निर्माण करण्यांत आला असून ह्या विभागांतून तांदुळाची निर्यात करण्याची परवानगी नाहीं. त्याचप्रमाण, पंजाब, ओरिसा, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश इत्यादि इतर राज्यांतून तांदुळाची निर्यात करण्यास बंदी आहे. बृहन्मुंबईतून तांदुळाची निर्यात करण्यास बंदी आहे. भारत सरकार परदेशी गव्हाचा व तांदुळाचा पुरवठा करीत असलें तरी तांदुळाचा पुरवठा त्यामानानें कमीच आहे.

(२) स्वस्त धान्याचीं दुकानेंः—

मे १९६० अखेर जिल्ह्यांमध्यें ९६९० व बृहन्मुंबईमध्यें १२९० अशीं स्वस्त धान्याचीं दुकानें होतीं. स्वस्त धान्याचीं दुकानें चालविण्याच्या बाबतींत खाजगी व्यापाऱ्यांपेक्षा सहकारी संस्था, ग्रामपंचायती, व इतर निम-सार्वजनिक संस्था यांना प्राधान्य देण्यांत आलें होतें. अशा-तऱ्हेच्या व्यवस्थेमध्यें अनुसूचित जातींचा समावेश असलेल्या संस्थांना अग्रमान देण्यांत येईल. हें कार्य हातीं घेण्यास सहकारी संस्था व ग्रामपंचायती यांना प्रोत्साहन मिळावें म्हणून दर मणामागें १२ नवे पैसे खास सूट देण्यांत आली असून धान्य खरेदीसाठी ग्रामपंचायतींना रु. १,००० इतक्या रकमेचें कर्जहि देण्यांत आलें आहे.

स्वस्त धान्याच्या दुकानांना उपलब्ध असलेल्या गव्हाच्या व तांदुळाच्या सांठ्याचें सारखें वांटप व्हावें आणि उपयुक्त वस्तु खऱ्या ग्राहकांना उपलब्ध व्हाव्या म्हणून बृहन्मुंबई व नागपूर शहरांमध्यें घरांघरांतून वापरासाठीं व संस्थांसाठीं, अन्नधान्याच्या शिधापत्रिकांची पद्धत सुरू

करण्यांत आली असून पुणें, कोल्हापूर, अहमदनगर, सोलापूर, उल्हासनगर व नाशिक या ठिकाणीं ती लागू करण्यांत आली आहे.

(३) सांठे जाहीर करणें :-

" मुंबईचा अन्नधान्य विषयक ( सांठे जाहीर करणें ) आदेश, १९५७ " हा रद्द करण्यांत आला असून त्याऐवजीं सरकारनें " मुंबईचा व्यापाऱ्यांना अन्नधान्यविषयक लायसेन्स देण्याबाबत आदेश, १९५८, " हा अंमलांत आणला आहे. या आदेशानुसार, लायसेन्स धारण करणाऱ्या प्रत्येक व्यापाऱ्यास, विक्रीकरितां सांठविलेला १०० मणांहून अधिक असलेला अन्नधान्याचा सांठा दर्शविणारें पत्रक दर पन्धरा दिवसांनीं सादर करावें लागतें.

(४) तांदळाबरोबरच गव्हाचाहि पुरवठा करणें:—

तौलनिक दृष्ट्या तांदूळ कमी प्रमाणांत उपलब्ध असल्यामुळें पुरेशा प्रमाणांत उपलब्ध असलेला गहूं लोकप्रिय करण्याच्या हेतूनें सरकारनें शहरांतून व जिल्ह्यांतून तांदळाबरोबरच गव्हाचाहि पुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले आहे. जिल्हा सल्लागार समित्यांशीं विचार विनिमय करून या धोरणाचा अवलंब करण्यांत येत आहे. परंतु, बृहन्मुंबईमध्यें घराघरांतून अन्नधान्य-शिधापत्रिका उपयोगात आणण्याच्या पद्धतीचा अवलंब केल्यापासून तांदुळाबरोबरच गव्हाचाहि पुरवठा करण्याची पद्धति बंद करण्यांत आली आहे.

(५) विक्रीची किंमतः-

जुलै १९५७ पर्यंत एफ. ओ. आर. ( घाऊक व्यापाऱ्यांची ) योजना अंमलांत होती. विक्रीच्या किंमती धान्याच्या खरेदीची किंमत, त्याच्या ने-आणीचा व वाहतुकीचा खर्च, अभिकृत, घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांना वाजवी नफा या गोष्टींच्या आधारानें प्रत्येक ठिकाणासाठीं जिल्हाधिकाऱ्यांनीं विक्रीच्या किंमती ठरवून दिल्या होत्या. एफ. ओ. आर. पद्धतीनुसार पुरवठ्याबद्दल खात्री देतां न आल्यामुळें जुलै १९५७ मध्यें सरकारनें धान्य वांटप करण्याचीं स्वतःचीं गुदामें उघडण्याचें ठरविलें. स्वस्त धान्याच्या दुकानांना अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठीं धान्य सांठविण्याकरितां आवश्यक तितकीं गुदामें उघडण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यांत आली आहे. आतापर्यंत अशा प्रकारचीं २४९ गुदामें उघडण्यांत आलीं आहेत. रत्नागिरी जिल्ह्यांतील बरेच भाग पावसाळ्यांत बरेचसे दुर्गम होत असल्यामुळें, तेथें खास व्यवस्था करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें इतर दुर्गम प्रदेशासाठींहि व्यवस्था करण्यांत आली आहे.

जुलै १९५७ पर्यंत सरकारी गुदामांतून देण्यांत येणाऱ्या धान्यांचे निरनिराळे भाव ठरविण्यात आले होते. ह्या किंमती आनुषंगिक आणि इतर खर्च यांवर आधारलेल्या असून रेल्वे स्टेशन व गुदामकेंद्रे यांतील अंतराप्रमाणें त्यांत बदल होत असे. ऑगस्ट १९५९ मध्यें सरकारनें असें ठरविलें कीं, स्वस्त धान्याच्या दुकानांच्या योजनेनुसार वांटप केलेल्या अन्नधान्यांच्या किरकोळ विक्रीची सर्वंत्र राज्यांत सारखीच किंमत असली पाहिजे. त्यानुसार पुढील दर ठरविण्यांत आले आहेत.

| अनुक्रमांक | प्रकाराचें नांव | भारत सरकारचा एफ्. ओ. आर. विक्रीचा दर | | राज्य सरकारचा गुदामाबाहेरील दर | | स्वस्त धान्याच्या दुकानांतील किरकोळ विक्रीचा दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. | | रु. | | रु. | |
| १ | ब्रम्ही तांदूळ | १६ | ०० | १८ | ०० | १८ | ४० |
| २ | चांगल्या प्रतीचा अमेरिकन तांदूळ | २० | ०० | २२ | ०० | २२ | ४० |
| ३ | अमेरिकन मध्यम प्रतीचा तांदूळ | १६ | ०० | १८ | ०० | १८ | ४० |
| ४ | पंजाब दारा | १६ | ०० | १८ | ०० | १८ | ४० |
| ५ | आंध्र कुसुम | १६ | ०० | १८ | ०० | १८ | ४० |
| ६ | आंध्र अकुलू | १६ | ०० | १८ | ०० | १८ | ४० |
| ७ | आंध्र खिचडी | २२ | ०० | २० | ०० | २२ | ४० |
| ८ | बेगमी (पंजाब) | १८ | ०० | २० | ०० | २० | ४० |
| ९ | बसमती (पंजाब) | ३० | ०० | ३२ | ०० | ३२ | ४० |
| १० | दिल्ली भोगम | २० | ०० | २२ | ०० | २२ | ४० |
| ११ | एस्. के. के. | २० | ०० | २२ | ०० | २२ | ४० |
| १२ | के-१२ | २० | ०० | २२ | ०० | २२ | ४० |
| १३ | सिमा कुसमा (आंध्र) | २० | ०० | २२ | ०० | २२ | ४० |
| १४ | बी. टी. ( भांगर थागलू ) आंध्र | २५ | ०० | २७ | ०० | २७ | ४० |
| १५ | गारिका ( आंध्र ) | १६ | ०० | १८ | ०० | १८ | ४० |
| १६ | परमल | २५ | ०० | २७ | ०० | २७ | ४० |
| १७ | हंसराज | २५ | ०० | २७ | ०० | २७ | ४० |
| १८ | चिना | १६ | ०० | १८ | ०० | १८ | ४० |
| १९ | नाल्लारोलू | १६ | ०० | १८ | ०० | १८ | ४० |
| २० | ससंगी | १६ | ०० | १८ | ०० | १८ | ४० |
| २१ | एम. पी. कोअर्स (सामान्य) | १६ | ०० | १८ | ०० | १८ | ४० |
| २२ | गहूं | १४ | ०० | १४ | ६० | १५ | ०० |
| २३ | ज्वारी | — | | १२ | ४० | १३ | ०० |
| २४ | अमेरिकन सोरगम आणि मका | ११ | ०० | १२ | २० | १२ | ६० |

गव्हाचा दर हा अर्थसाहाय्यित आहे. परंतु तांदळाचा दर मात्र वाजवी ठरविण्यांत आला आहे.

(६) अन्नधान्य सल्लागार समित्या :—

धान्यवांटप पद्धती व इतर संबंधित गोष्टी यासंबंधीच्या विविध बाबींविषयी सरकारला सल्ला देण्यासाठीं बृहन्मुंबईकरितां एक सल्लागार समिती स्थापन करण्यांत आली आहे. ह्या सल्लागार समितीची एक स्थायी समितीदेखील स्थापन करण्यांत आली आहे व तिची साधारणत: महिन्यांतून एकदां बैठक भरते. अन्नधान्यविषयक धोरणाबाबत सरकारला सल्ला देण्यासाठीं विधानमंडळाच्या सभासदांची एक सर्वपक्षीय अन्नधान्य सल्लागार समितीदेखील स्थापन करण्यांत आली आहे.

तसेंच कौटुंबिक व संस्थांची शिधापत्रकांची पद्धत सुरू करण्यांत आलेल्या शहरांमध्यें शहर सल्लागार समित्या देखील स्थापण्यांत आल्या आहेत. बाकीच्या भागांकरितां, कलेक्टरला अन्नधान्यविषयक बाबतींत सल्ला देण्याचें काम जिल्हा विकास मंडळाच्या उप-समितीकडे सोंपविण्यांत आलें आहे.

(७) काटकसरीच्या उपाययोजना:—

तांदळाचा पुरवठा कमी असल्यामुळें त्याची बचत करण्याच्या दृष्टीनें काटकसरीच्या उपाययोजना सुरू करण्यांत आल्या आहेत. मेजवानी व समारंभाच्या प्रसंगीं भात किंवा तांदळाचे पदार्थ वाढावयाचे असल्यास जेवणाऱ्यांची संख्या साधारणत: ५० पुरतीच मर्यादित राहील व लग्नसमारंभ व अंत्यसंस्कारानंतरच्या प्रसंगीं ही संख्या १०० पुरती मर्यादित राहील. नगरपालिकेच्या हद्दींत असलेल्या सर्वच सार्वजनिक आहारभवनांत भात आणि त्यापासून केलेले पदार्थ मंगळवारी व शुक्रवारी वाढण्यास असलेली बंदी २७-४-१९६० पासून उठविण्यांत आली आहे.

बी अन्नधान्य पुरवठ्याबाबतची परिस्थिति

वाढत्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीनें, या सरकारनें, भारत सरकारजवळ उपलब्ध असलेलें अन्नधान्य आयात केलें आणि त्याचें स्वस्त धान्याच्या दुकानांमार्फत वांटप केलें. याबाबत "८९ भांडवली खर्च" या सदराखाली चालू वर्षांत एकूण रु. १७·२३ कोटीची तरतूद करण्यांत आली आहे.

१) तांदूळ:—

महाराष्ट्र राज्याचा १९६० या वर्षाचा वार्षिक वांटा ९८,८८० टन एवढा आहे. यापैकीं ९४,९४० टन तांदळाचा सांठा सरकारनें मे १९६० पर्यंत जिल्ह्यांना वांटून दिला आहे.

मुंबई शहराव्यतिरिक्त इतर ठिकाणासाठीं लागणारा तांदळाचा १९६० या वर्षाचा वांटा ९६,००० टन एवढा आहे. एप्रिल १९६० च्या अखेरपर्यंत यापैकीं ३१,६३८ टन सांठा खपून गेला आहे.

सामान्यपणें, तांदळाचा सांठा अपुरा असल्याचें आढळतें आणि भारत सरकारनें तांदळाचा जादा सांठा दिला नाहीं तर जिल्ह्यांची संपूर्ण गरज भागविणें राज्य सरकारास अशक्य आहे.

२) गहूं:—

गव्हाच्या बाबतींत महाराष्ट्र राज्याचा वांटा ४,२१,१८८ टन एवढा आहे. सरकारनें आतांपर्यंत मध्यप्रदेशाचा गहूं धरून १,९२,८०० टन गव्हाचें जिल्ह्यांमध्यें वांटप केलें आहे.

मुंबई शहरांत मध्यप्रदेशाचा गहूं धरून ९६,८७९ टन गहूं खपला आहे. शहराला वर्षासाठीं साधारणत: १,४४,००० टन गहूं लागतो.

गहू पुरवठयाच्या बाबतींत कांहींच अडचण उद्भवत नाहीं.

३) जाडेंभरडें धान्य:-

१९६० सालाकरितां भारत सरकारनें अद्यापपावेतों कोणतेंच जाडेभरडें धान्य महाराष्ट्र राज्याच्या वांट्यास दिलें नाहीं.

४) इतर राज्यांकडून धान्य खरेदी करणें:—

सरकारनें भारताच्या इतर राज्यांकडून अन्नधान्याची खरेदी करण्याचा कार्यक्रम हातीं घेतला आहे. आतांपर्यंत मध्यप्रदेश सरकारकडून गव्हाची खरेदी करण्यांत आली. तसेंच पंजाब व उत्तरप्रदेश सरकारकडून अशाच प्रकारची खरेदी करण्यासंबंधींची तरतूद करण्यांत आली आहे. "८५-ए भांडवली खर्च इत्यादि" या सदराखालीं या कारणासाठीं रु. ९ कोटींची तरतूद करण्यांत आली आहे.

५) गुदामें बांधणें:—

जिल्ह्यांत अन्नधान्याचा सांठा करण्यासाठीं जागेची कमतरता असल्याचें सरकारच्या अनुभवास आलें आहे. म्हणून महाराष्ट्र राज्यांतील प्रत्येक जिल्ह्यांत ५०० टन धान्य मावेल अशीं प्रत्येकीं रु. ९९,००० किंमतीचीं सुमारें ३० गुदामें बांधण्याचें ठरविलें आहे.

## [सी] साखर

मुंबईच्या साखरव्यापाऱ्यांना लायसेन्स देण्याबाबतचा आदेश १९५९ हा १ जून १९५९ पासून अंमलांत आलेला आहे. १ मे १९६० पर्यंत तो त्या वेळच्या मुंबई राज्याला लागूं करण्यांत आला होता आणि आतां तो सर्व महाराष्ट्र राज्याला लागू करण्यांत आला आहे. सदरहू आदेशान्वयें, एका वेळीं १२७ मणापेक्षां (म्हणजे ५० गोणी) जास्त साखरेचा व्यापार करणाऱ्या साखरव्यापाऱ्यांनीं लायसेन्स मिळविणें आवश्यक आहे. अशा रीतीनें हा सर्व व्यापार परवान्याच्या शर्तींनुसार चालविण्यांत येत आहे.

२. १९५८–५९ या वर्षीच्या साखरेच्या तुटवड्याच्या दृष्टीनें भारत सरकारनें प्रत्येक राज्याला जुलै १९५९ पासून ठराविक वांटा देण्याचें जाहीर केलें. पूर्वीच्या मुंबई राज्यांत चालूं असलेली योजना महाराष्ट्र राज्यांत पण चालूं राहील. महाराष्ट्र राज्याकरितां निश्चित केलेला वांटा द. म. सुमारें ३१,००० टन एवढा आहे. भारत सरकारकडून या राज्याला देण्यांत आलेला वांटा, न्याय्य प्रमाणांत मुख्यत: लोकवस्तीच्या प्रमाणावर जिल्ह्यांमध्यें वांटून देण्यांत येतो. बृहन्मुंबईला, शहराच्या गरजेच्या प्रमाणांत दर महिन्याकरितां साखरेचें कांहीं

प्रमाण निश्चित करण्यांत आलें असून तेवढी साखर वांटून देण्यांत येते. ग्रामीण विभागांत वाजवी दरानें साखर खुल्या बाजारांत मिळूं शकेल यासंबंधीं लक्ष पुरविण्यासंबंधींचे आदेश कलेक्टरांना देण्यांत आले आहेत.

३. सरकारकडून करण्यांत आलेल्या वेगवेगळया उपाययोजनांमुळें साखरवांटप पद्धतीस स्थैर्य प्राप्त झालें आहे. प्रत्येक जिल्ह्याला आपला वांटा वेळच्यावेळीं व पुरेशा प्रमाणांत मिळतो. त्याच्या किंमती स्थिर झालेल्या आहेत. आतां साखरेचें वांटप कलेक्टराच्या देखरेखीखालीं होत असल्यामुळें साखरेच्या किरकोळ किंमती समपातळीवर आल्या आहेत, व तिच्यांत दर शेरास १ रु. १० न.पैसे ते १ रु. १४ न.पैसे एवढाच बदल होतो.

## खार जमीन विकास मंडळ

### "खार व खाजण जमीन लागवडीस आणण्याची योजना"

महाराष्ट्राच्या किनारापट्टीवर एक लाख एकरांपेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेली खार व खाजण जमीन आहे. ह्या जमीनीवर बान्ध घालून, ते सुव्यवस्थित ठेवून व त्यांची दुरुस्ती करून ती शेतीच्या लागवडीस योग्य करतां येऊ शकेल. अशा जमीनी लागवडीखालीं आणण्यासाठीं, खार जमीन अधिनियम रत्नागिरी, कुलाबा व ठाणें ह्या किनारापट्टीच्या जिल्हयांना लागूं करण्यात आला आहे.

योजनेच्या भांडवली खर्चापैकीं ४० टक्के रक्कम सरकार अर्थसहाय्य म्हणून देतें; आणि हया योजनेचा ज्यांना फायदा मिळतो अशा ज़मीन-मालकांकडून व कुळांकडून योजनेचा ६० टक्के खर्च वसूल केला जातो. सेवकवर्गाचा सर्व खर्च सरकारकडून केला जातो. शिवाय, सरकारी खार जमिनीबाबतच्या या योजनेच्या कामाचा १०० टक्के प्रारंभिक खर्च सरकार करतें; आणि ज्यावेळीं खार जमीन लागवडीस आणली जाते, त्यावेळीं ज्यांना ती जमीन देण्यांत येते त्यांच्याकडून ६० टक्के खर्च वसूल केला जातो.

पंचवार्षिक योजनेमधील खार जमीन सुधारण्याच्या योजनेंत, नवीन खार व खाजण जमीन लागवडीस आणणें आणि खाऱ्या पाण्याखालीं जाऊन फुकट गेलेल्या जुन्या खार व खाजण जमिनींचें संरक्षण व विकास करणें एवढ्या गोष्टींचा अंतर्भाव होतो.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत रु. १७,९८,००० एवढा खर्च करून ३१,२२७ एकर जमीन लागवडीस योग्य करण्यांत आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत रु. २८,०९,७०० एवढा खर्च करून, ९०,००० एकर खार जमीन लागवडीस योग्य करणें, हें खार जमीन विकास मंडळाच्या कार्यक्रमाचें उद्दिष्ट आहे.

जानेवारी १९६० च्या अखेरपर्यंत रु. ४२,४२,९०० एवढा खर्च करून ६१,३३६ एकर जमीन लागवडीस योग्य करण्याच्या एकंदर १४० योजना ह्या मंडळानें पुऱ्या केल्या आहेत.

खालील तक्ता, प्रत्येक जिल्ह्यांत प्रत्यक्ष लागवडीखालीं आणलेला प्रदेश व लागवडीस योग्य करण्यालायक असलेली खार जमीन दर्शवितो:—

| जिल्हा | अधिनियम लागू करण्यांत येईल तेव्हां प्रत्येक जिल्ह्यांत खार आणि खाजण जमीन किती असेल याचा अदमास | आजतागायत लागवडीस योग्य केलेली जमीन |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | एकर गुंठे | एकर |
| कुलाबा | ६४,९६०-०-० | ३९,३९४ |
| ठाणें | २८,९९१-०-० | १०,१८७ |
| रत्नागिरी | ८,८९८-०-० | २,७८९ |
| एकूण | १,०२,४४९-०-० | ४८,३३० |

१९६०-६१ सालीं खार व खाजण जमीन लागवडीस योग्य करण्याच्या योजनेसाठीं एकूण रु. ४·७३ लाख एवढ्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

# शिक्षण आणि समाजकल्याण विभाग

पूर्व-प्राथमिक शिक्षणापासून ते पदव्युत्तर पातळीपर्यंतच्या शिक्षणापर्यंतचे कार्यक्रम शिक्षण संचालकांच्या नियंत्रणाखालीं येतात. मात्र या शिक्षणांत तांत्रिक शिक्षण व कलाविषयक उच्च शिक्षण यांचा समावेश होत नाहीं. स्थूलमानानें त्यांचें स्थूलवर्गीकरण खालीलप्रमाणें आहे:—

१. पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षण.

२. माध्यमिक शिक्षण—यांत व्यावसायिक शिक्षणाचा समावेश होतो.

३. विश्वविद्यालयीन व उच्च शिक्षण.

४. मागासलेल्या वर्गांच्या उन्नतीसाठीं उपाययोजना

५. संकीर्ण.

स्थूलमानानें वरील वर्गवारीमध्यें मोडणाऱ्या द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील योजनांचा खालीं थोडक्यांत आढावा घेण्यांत आला आहे:—

## (एक) पूर्व-प्राथमिक व प्राथमिक शिक्षण

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजनांत खालील बाबींचा समावेश होतो:—

१. सक्तीचें प्राथमिक शिक्षण आणि प्राथमिक शिक्षणाचा विस्तार;

२. प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देणें;

३. सर्वसाधारण प्राथमिक शाळांचें मूलोद्योग शाळांत रूपांतर करणें;

४. प्राथमिक शाळांसाठीं इमारती बांधणें;

५. पूर्व–प्राथमिक शाळा उघडणें, पूर्व–प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देणें, शिक्षकांच्या वेतनमानांत सुधारणा करणें, तपासणीच्या व देखरेखीच्या कामांत कार्यक्षमता यावी म्हणून निरीक्षक नोकरवर्गांत वाढ करणें ह्या संबंधीच्या संकीर्ण योजना.

जुन्या मुंबई राज्याच्या प्रदेशांत, १९४७–४८ या वर्षापासून संघटित स्वरूपांत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणास प्रारंभ करण्यांत आला त्यावेळीं कांहीं प्रदेशांस ही सक्ति लागू करण्यांत आली होती. या योजनेंत मूळच्या (विलीनीकरणापूर्वीच्या) १९ जिल्ह्यांपैकीं १५ जिल्ह्यांचा समावेश करण्यांत आला; आणि त्यांमध्यें, ७-८ वर्षें वयाच्या मुलांच्या गटासाठीं १९४१ च्या शिरगणतीप्रमाणें १,००० किंवा अधिक लोकसंख्या असलेल्या सर्व ठिकाणांचादि अंतर्भाव करण्यांत आला. या योजनेचा क्रमाक्रमानें विस्तार करण्यांत येऊन १९५०-५१ मध्यें, तिच्यामध्यें ७ ते ११ या वयोमर्यादेच्या मुलांचा समावेश करण्यांत आला. या योजनेचा विस्तार करून ती मूळच्या १९ जिल्ह्यांपैकीं उरलेल्या ४ जिल्ह्यांतील ७ ते ११ वर्षें वयाच्या मुलांच्या बाबतींत लागू करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत स्थानिक संस्थांना ऐच्छिक तत्त्वावर जादा सवलतींची तरतूद करण्याकरितां अथवा पंचवार्षिक योजनेंत तरतूद केल्याप्रमाणें सक्तीचें शिक्षण सुरू करण्याकरितां स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदानें देण्यासाठीं केलेल्या जादा खर्चामुळें प्राथमिक शिक्षणाच्या वाढीस विशेष प्रेरणा मिळाली. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सुशिक्षितांमधील बेकारी नष्ट करण्याचा भारत सरकारच्या योजनेनुसार १२,९७९ प्राथमिक शिक्षकांची नेमणूक करण्यांत आल्यामुळें, प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारास आणखी चालना मिळाली. प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांची एकूण संख्या १९५०-५१ मध्यें सुमारें ३४·३६ लाख होती. ती १९५५-५६ अखेर ४१ लाखांपर्यंत वाढली. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत प्राथमिक शाळांच्या संख्येंतहि सुमारें २८,५०० वरून सुमारें ३५,००० पर्यंत वाढ झाली. त्याचप्रमाणें या काळांत प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांची संख्या

सुमारें ४२,००० वरून सुमारें ६१,००० पर्यंत वाढली. प्रशिक्षित शिक्षकांचेंहि प्रमाण सुमारें ४८ टक्क्यां-पासून सुमारें ५८ टक्क्यांपर्यंत वाढलें. त्याचप्रमाणें, जिल्हा शाळा मंडळाच्या मालकीच्या प्राथमिक शाळांच्या इमारतींची संख्या, मुख्यतः, शाळा मंडळांना इमारती बांधण्याकरितां कर्जे देण्याच्या योजनेमुळें सुमारें ६,६२४ वरून ८,००० च्या वर गेली. ज्या शाळांमध्यें हस्तव्यवसायाचे शिक्षण सुरू करण्यांत आलें होतें त्या शाळांची संख्या योजनेच्या काळांत सुमारें २,६७४ वरून सुमारें ३,००० पर्यंत वाढली. खालील तक्त्यावरून जुन्या मुंबई राज्यांत पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत झालेल्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रगतीची कल्पना येईल :—

| | | १९४७–४८ | १९५०–५१ | १९५५–५६ |
|---|---|---|---|---|
| १. | शाळांची संख्या ... ... | २१,०८४ | २८,५५४ | ३५,६८१ |
| २. | विद्यार्थ्यांची संख्या ... ... | २०,७८,९१३ | ३४,३६,४२९ | ४१,७१,२८८ |
| ३. | शिक्षकांची संख्या | | | |
| | (एक) प्रशिक्षित ... ... | २४,९४२ | ४२,२४७ | ६१,३३८ |
| | (दोन) अप्रशिक्षित ... ... | ३१,१८० | ४५,७४४ | ४६,८१९ |
| ४. | रोजची सरासरी हजेरी ... | १४,८८,९३१ | २१,५१,०३२ | ३०,७६,२५३ |

उपलब्ध असलेल्या मर्यादित निधींमध्यें, विकासाची सर्व क्षेत्रांतील गति कायम राखण्याकरितां द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील शैक्षणिक योजना तयार करण्यांत आल्या होत्या. म्हणूनच, प्राथमिक शिक्षणांचा विकास करण्याच्या कार्यक्रमांत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची आणि प्राथमिक शिक्षणाचा विस्तार करण्याची योजना ही केंद्रबिंदू मानण्यांत आली होती.

पूर्वीच्या मुंबई राज्य प्रदेशांत क्रमाक्रमानें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात करणें, विदर्भातील नागरी प्रदेशांत व कांहीं राष्ट्रीय-विस्तार सेवा प्रदेशांत संपूर्ण सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू करणें आणि मराठवाड्यांत प्राथमिक शिक्षणाच्या सोयी वाढविणें हे प्राथमिक-शिक्षण-विस्तार योजनेचें द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधींतील उद्दिष्ट आहे. जुन्या मुंबई प्रदेशांतील मराठी भाषिक जिल्ह्यांमध्यें १००० हून कमी लोकवस्ती असलेल्या खेड्यांतील ७ ते ११ वर्षे वयाच्या गटांतील विद्यार्थ्यांना सक्तीचें प्राथमिक शिक्षण लागू करण्यांत आले आहे. मात्र या खेडयांमधून २०० हून कमी लोकवस्ती असलेली एका बाजूस पडलेली खेडीं वगळलीं आहेत. योजनेच्या पहिल्या दोन वर्षांमध्यें ७ ते ९ या वयाच्या मुलांनाहि सक्तीचें शिक्षण लागू करण्यांत आलें. परंतु १९५८-५९ मध्यें ७ ते १० या वयोमर्यादेंतील मुलांना ही योजना लागू करण्याचें काम लांबणीवर टाकण्यांत आलें. १९५९-६० च्या अखेरपर्यंत, ह्या कामाकरितां ३,४९९ शिक्षकांची नेमणूक करण्यास मंजुरी देण्यांत आली आहे. २०० ते ९९९ एवढी लोकसंख्या असलेल्या खेड्यांतील ७ ते ११ वर्षे वयाच्या मुलांच्याबाबतींत १९६०-६१ मध्यें सक्तीचें शिक्षण लागू करण्याचें योजिलें आहे. सुशिक्षित बेकारांना सहाय्य देण्याच्या भारत सरकारच्या योजनेन्वयें पुरेशी मदत घेण्यांत आली आहे. ह्या योजनेनुसार महाराष्ट्राकरितां, १९१३ शिक्षक आणि ३६ सहाय्यक जिल्हा शिक्षण निरीक्षकांच्या नेमणुका करण्यास मंजुरी देण्यांत आली आहे. मराठवाडा व विदर्भ प्रदेशांतील बहुसंख्य खेडयांमध्यें व वस्त्यांमध्यें शाळा नाहींत. या प्रदेशांच्या शिक्षणविषयक विकासासाठीं, आतां, २५०० शिक्षक व ५० सहाय्यक जिल्हा शिक्षण निरीक्षक यांचा उपयोग करून घ्यावयाचें ठरविलें आहे.

विदर्भात प्राथमिक शिक्षकांच्या कमतरतेवरील उपाययोजना म्हणून आतांपर्यंत ५०३ शिक्षकांची नेमणूक केली असून, पुढील वर्षी नवीन शाळा उघडण्याकरितां तसेंच विद्यमान शाळांमध्यें शिक्षकांची नेमणूक

करण्याकरितां २२०० शिक्षक नियुक्त करण्याचें योजिलें आहे. निरीक्षण करणारा नोकरवर्गही योग्य प्रमाणांत नियुक्त करण्यांत येईल. ह्या प्रस्तावांकरितां रु. २० लाख इतका खर्च येईल असा अंदाज आहे. जानपद सभा आणि नगरपालिका समित्या यांना प्राथमिक शिक्षणाकरितां १९५९–६० मध्यें अधिक अनुदानें वांटून दिली असून १९६०–६१ ह्या वर्षी ह्या कारणास्तव पुरेशी तरतूद करण्याचें योजिलें आहे

मराठवाड्यामध्यें अनुदान सहाय्य मिळणाऱ्या बिनसरकारी शाळा ताब्यांत घेणें, एकच शिक्षक असलेल्या नवीन शाळा उघडणें, अपुरा शिक्षकवर्ग असलेल्या विद्यमान शाळांमध्यें जादा शिक्षकवर्गाची तरतूद करणें हीं प्राथमिक शिक्षणाचा विस्तार करण्याच्या योजनेची उद्दिष्टें आहेत. १९५६-५९ ह्या कालावधींत १०१२ शिक्षकांची नेमणूक करण्यांत आली होती. ह्या शिक्षकांना १९६०-६१ मध्येंहि कामावर ठेवण्यांत येईल. मागील वर्षाची तूट लक्षांत घेऊन, १९५९-६० मध्यें ६३० जादा प्राथमिक शिक्षक नेमण्यास मंजुरी देण्यांत आली असून १९६०-६१ मध्येंहि त्यांना कामावर टेवण्यांत येईल. १९६०-६१ मध्यें ४१२ शिक्षकांची नेमणूक करण्याचेहि योजिले आहे.

### प्राथमिक शिक्षकांचें प्रशिक्षणः—

प्राथमिक शिक्षणांचा जलदीनें विस्तार करण्याच्या सध्यांच्या कार्यांत मूलोद्योग शिक्षणाभिमुख विशेषतः योग्य अशा प्रशिक्षित शिक्षकांची गरज आहे, ही गोष्ट नजरेसमोर ठेवण्यांत आली आहे. जुन्या मुंबई राज्यांत तीन प्राथमिक प्रशिक्षण महाविद्यालयांत जादा वर्ग उघडण्याकरिता योग्य तीं उपाययोजना करण्यांत आली असून स्त्रियांच्या व पुरुषांच्या बिनसरकारी प्राथमिक प्रशिक्षण महाविद्यालयांना त्यांच्या अनुदानाचा दर ५० ते ६० टक्क्यांपासून ६६ २/३ टक्के या सर्वसामान्य पातळीपर्यंत वाढवून प्रोत्साहन देण्यांत आलें आहे. वसतिगृहांत राहणें सक्तीचें असल्यामुळें, जुन्या मुम्बईराज्याच्या मराठी भाषिक जिल्ह्यांमधील ३१ बिनसरकारी प्राथमिक प्रशिक्षण महाविद्यालयांना अधिक प्रमाणांत अनुदानें देण्यांत आली होती.

भारत सरकारच्या योजनेनुसार १९५९–६०, मध्यें महाराष्ट्र प्रदेशांत, केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या शंभर टक्के साहाय्याच्या आधारें १३ नवीन प्राथमिक प्रशिक्षण महाविद्यालयें सुरूं करण्यांत आली. १९६०-६१ मध्यें, विदर्भामध्यें चार आणि मराठवाड्यांत दोन अशीं सहा जादा प्रशिक्षण महाविद्यालयें जुन्या मुंबई राज्याच्या मराठी भाषिक प्रदेशांत उघण्याचें योजिलें आहे. विदर्भामध्यें आठ खाजगी प्राथमिक प्रशिक्षण महाविद्यालयांना अनुदानें देण्यांत आलीं व चांदा येथील पुरुषासाठीं असलेल्या सरकारी प्रशिक्षण महाविद्यालयांत तेलगू शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची सोय करण्यांत आली आहे. मराठवाड्यांत, योजनेच्या प्रत्येक वर्षी २७६ शिक्षकांना प्रशिक्षण देणें हे योजनांतर्गत योजनेचें उद्दिष्ट असून तें पहिल्या चार वर्षांत अंमलांत आलें आहे व १९६०–६१ मध्येंहि त्याची अंमलबजावणी चालू राहील.

### मूलोद्योग शिक्षणः—

सरकारच्या धोरणास अनुसरून आतांपर्यंत जुन्या मुंबई राज्यांतील, मराठी भाषिक जिल्ह्यांतील पूर्णावस्थेंतील ९९ शाळांचें आणि एकच शिक्षक असलेल्या ७३५ शाळांचें मूलोद्योग शाळांमध्यें रुपांतर करण्यांत आलें आहे. हस्तव्यवसाय आणि समाजजीवन ह्यांवरील सुधारलेल्या पाठ्यक्रमास जून १९५७ पासून सुरुवात करण्यांत आली आहे. शाळा आणि समाज यांमधील एक दुवा म्हणून काम करणारी १६३ समाज केंद्रें, १९५९-६० मध्यें महाराष्ट्र प्रदेशांत उघडण्यांत आलीं असून १९६०–६१ मध्यें सुद्धा हीं केंद्रें चालू ठेवण्याचें योजिलें आहे. मराठवाड्यांत शाळांचें मूलोद्योग शाळामध्यें रूपांतर करण्याच्या प्रश्नावर विचार करण्यांत येत आहे.

### प्राथमिक शाळांच्या इमारती बांधणें:—

जुन्या मुंबई राज्यांतील जिल्हा शाळा मंडळांना, इमारती बांधण्यासाठीं कर्जें देण्याची योजना १९५३–५४ पासून अंमलांत आहे. १९५९–६० पर्यंत २८८३ वर्गांच्या खोल्या बांधण्यांत आल्या आणि

१९५९-६० ह्या वर्षी १४९ शाळांची विशेष दुरुस्ती करण्यांत आली. १९६०-६१, मध्यें ६०० वर्गांच्या खोल्या बांधण्याचें योजिलें आहे. विदर्भामध्यें, खाजगी प्राथमिक शाळांना, इमारती आणि साधनसामुग्री यांकरितां अनुदानें देण्यांत येत होतीं. स्थानिक स्वराज्यसंस्थांना, त्यांनीं केलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या, ५० टक्के अनुदान देऊन इमारतींकरितां कर्जें देणें आवश्यक झालें आहे. १९६०-६१ मध्यें आवश्यक तीं अनुदानें देण्याचें योजिलें आहे. मराठवाड्यांतसुद्धां, प्राथमिक शाळांच्या इमारती बांधण्याचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला आहे.

## (दोन) माध्यमिक शिक्षण

माध्यमिक शिक्षणाचें क्षेत्र विस्तृत करण्याच्या कार्याखेरीज, महाराष्ट्र राज्यांतील माध्यमिक शाळा विविध प्रकारच्या आणि त्या समृद्ध करण्यासाठीं, प्रयत्न चालू आहेत. माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रांतील स्वेच्छेनें काम करणाऱ्या खाजगी संस्थांना राज्याच्या उत्पन्नांतून जेवढें आर्थिक सहाय्य देतां येणें शक्य असेल तेवढें आर्थिक सहाय्य देऊन त्या संस्थांना मदत करून प्रोत्साहन देणें हें सरकारचें धोरण होतें आणि हेंच धोरण पुढें चालू राहील. माध्यमिक अवस्थेंतील शिक्षणाच्या कारभारासंबंधीच्या विद्यमान पद्धतीची पाहणी करणें तसेंच निरनिराळ्या शैक्षणिक पाठ्यक्रमांची व माध्यमिक शाळेंतील शिक्षकांचे पगार, अनुदानसाहाय्य, इ. प्रश्नांचा समावेश असलेल्या प्रशासकीय पद्धतीची तपासणी करणें याकरितां नेमण्यांत आलेल्या एकत्रीकरण समितीच्या शिफारशीनुसार बिन-सरकारी माध्यमिक शाळांतील शिक्षकांचें वेतनमान दि. १-११-१९५९ पासून सुधारण्यांत आलें आहे. कार्यक्रमाच्या मुख्य वैशिष्ट्याचा आणि आतांपर्यंत केलेल्या प्रगतीचा तपशील पुढील परिच्छेदांत दिला आहे:-

### माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण:—

बहुउद्देश उच्च विद्यालयांतील शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठीं, निरनिराळ्या विषयांच्या शिक्षकांकरितां सुमारें चार महिने मुदतीचे-अल्पमुदतीचे पाठ्यक्रम सुरू करण्याचें ठरविलें आहे. अशा तऱ्हेचे दोन पाठ्यक्रम, एक माध्यमिक प्रशिक्षण महाविद्यालय, मुंबई येथें आणि दुसरा एस्. एम. टी. टी. कॉलेज, कोल्हापूर येथें १९५८-५९ मध्यें सुरू करण्यांत येऊन निरनिराळ्या विषयांच्या १६ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यांत आले. १९५९-६० मध्यें माध्यमिक प्रशिक्षण महाविद्यालय, मुंबई, आणि एस्. एम्. टी. टी. कॉलेज, कोल्हापूर या दोन्हीं ठिकाणीं चार महिने मुदतीचे, अल्प मुदतीचे दोन पाठ्यक्रम संघटित करण्यांत आले. त्याच धर्तीवर, १९६०-६१ मध्ये या दोन महाविद्यालयांत चार पाठ्यक्रम सुरू करण्याचें योजिले आहे. प्रत्येक पाठ्यक्रमाकरितां ३० शिक्षकांना प्रवेश द्यावयाचा आहे. प्रशिक्षणाकरितां नियुक्त केलेल्या शिक्षकांना विद्यावेतनें देण्यांत येतील. माध्यमिक शाळेंतील शिक्षकांची कार्यक्षमता वाढवण्याबाबतच्या इतर प्रकल्पांची व्यवस्था करणें आणि त्यांना नोकरी चालू असतांनाच प्रशिक्षण देणें ह्यासाठीं आखलेले अखिल भारतीय माध्यमिक शिक्षण परिषदेनें एस. टी. कॉलेज, मुंबई, एस. एम. टी. टी. कॉलेज, कोल्हापूर, टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणें, आणि युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कॉलेज, नागपूर येथें एक विस्तार सेवा विभाग सुरू केला आहे. १९६०-६१ या वर्षांत या योजनेकरितां नियुक्त केलेल्या शिक्षकांचा प्रवासभत्ता आणि महागाईभत्ता याकरितां या योजनेवर रु. २५,००० इतका एकूण खर्च येईल असा अंदाज आहे.

प्रशिक्षित पदवीधरांबाबतची वाढती मागणी पुरी करण्यासाठीं १९५६-५७ या वर्षांत विदर्भ प्रदेशांत अकोला येथें एक बी. टी. कॉलेज स्थापन करण्यांत आलें आहे. शिक्षकवर्गावर येणाऱ्या खर्चाखेरीज या महाविद्यालयांत प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीं करितां विद्यावेतनें मंजूर करण्यांत आलीं आहेत. १९६०-६१ या वर्षांतहि हीं विद्यावेतनें चालू राहतील. मराठवाड्यांतील बी. एड्. कॉलेजची पुनर्संघटना करण्याच्या योजनेचा उद्देश योजनेच्या कालावधींत महाविद्यालयांत प्रवेश द्यावयाच्या प्रशिक्षणार्थींची संख्या ५० वरून

१११ पर्यंत वाढविणें व जादा नोकरवर्गाची तरतूद करणें आणि विद्यमान नोकरवर्गाचा दर्जा वाढविणें हा आहे. विद्यापीठाच्या गरजा भागविण्यासाठीं, १९५८-५९ मध्यें मुंबई शैक्षणिक सेवा वर्ग ३ मधील तीन सहाय्यक उप-प्राध्यापकांच्या जागांचा दर्जा मुंबई शैक्षणिक सेवा, वर्ग २ असा वाढविण्यांत आला आहे १९५९-६० मध्यें महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची संख्या ५० वरून ८० पर्यंत वाढविण्यांत आली. सहाय्यक उप-प्राध्यापकांच्या तीन जादा जागा आणि आवर्तक आणि अनावर्तक नैमित्तिक खर्च यांना मंजुरी देण्यांत आली आहे. नोकरवर्ग आणि नैमित्तिक खर्च चालू ठेवण्यासाठीं चालू वर्षांत तरतूद करण्याचें योजिलें आहे. १९६०-६१ मध्यें महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची संख्या ८० पासून १०० पर्यंत वाढविण्याचें योजिल्यामुळें शिक्षणाच्या उप-प्राध्यापकांच्या दोन जादा जागा, कनिष्ठ कारकूनांची एक जागा आणि पट्टेवाल्याची एक जागा यांसाठीं तसेंच, नैमित्तिक खर्च या सदराखाली अनुदानें मंजूर करण्याचीहि आवश्यकता राहील.

### बहुउद्देश शाळांची स्थापना :-

मराठी भाषिक जिल्ह्यांतील सरकारी त्याचप्रमाणें बिन-सरकारी माध्यमिक शाळांमध्यें कृषि, गृहशास्त्र, ललितकला आणि वाणिज्य यांतील विविध पाठ्यक्रमाचें शिक्षण देण्यास सुरवात केली आहे. या शाळांना विविध पाठ्यक्रमाचें शिक्षण देतां येणें शक्य व्हावें म्हणून साधनसामुग्री व फर्निचर खरेदी करण्यासाठीं व इमारती बांधण्यासाठीं अनावर्तक अनुदानें मंजूर केलीं आहेत.

वर उल्लेखिलेल्या कामाखेरीज, एच. सी. पी. हायस्कूल, पुणें यांचें आदर्श बहुउद्देश विद्यालयांत रूपांतर करण्यासाठीं ललितकला आणि वाणिज्य यांतील दोन पाठ्यक्रम त्या विद्यालयांकडे देण्यांत आले आहेत. हीं कामें १९६०-६१ मध्येंहि चालू राहतील.

विदर्भांत, ५ सरकारी उच्च विद्यालयांत आणि ५ बिन-सरकारी उच्च विद्यालयांत बहुउद्देश पाठ्यक्रम सुरू करण्यांत आले असून ते पुढील वर्षींहि चालू ठेवण्यांत येतील. ५ बिन सरकारी उच्च विद्यालयांचें बहुउद्देश उच्च विद्यालयांत रूपांतर करण्यासाठीं निरनिराळे १० पाठ्यक्रम त्या विद्यालयांना नेमून दिले आहेत. हे पाठ्यक्रम १९५९-६० मध्यें सुरू करण्यांत आले आहेत. पांढरकवडा आणि वाशीम येथील बहुउद्देश उच्च विद्यालयाच्या इमारतीचें बांधकाम चालू आहे. १९५९-६० मध्यें, विदर्भांतील चार सरकारी उच्च विद्यालयांत १२ निरनिराळे पाठ्यक्रम शिकविण्यासाठीं साधनसामुग्री खरेदी करण्याकरितां खर्च करण्यात आला. १९६०-६१ मध्येंहि हा सर्व कार्यक्रम चालू ठेवण्यांत येईल.

१९५६-५७ मध्यें मराठवाड्यांतील जालना येथील सरकारी उच्च विद्यालयाचें बहुउद्देश उच्च विद्यालयांत रूपांतर करण्यांत आलें आहे. १९५९-६० मध्यें, सरकारी माध्यमिक शाळामध्यें वाणिज्य आणि गृहशास्त्र यांतील विविध पाठ्यक्रम शिकविण्याकरितां साधनसामुग्रीची खरेदी करण्यांत आली. त्याचप्रमाणें २ बिन-सरकारी माध्यमिक शाळांना ललितकला आणि शास्त्र यांतील पाठ्यक्रम सुरू करण्यासाठीं इमारत आणि साधनसामुग्री याकरितां अनुदानें देण्यांत आलीं. हे पाठ्यक्रम सुरू करण्यासंबंधींची जनतेची वाढती मागणी लक्षांत घेऊन, १९६०-६१ मध्यें सरकारी व बिन-सरकारी शाळांतून कृषि, ललितकला, आणि वाणिज्य यांतील निरनिराळे अधिक पाठ्यक्रम सुरू करण्याचें योजिलें आहे.

### माध्यमिक शिक्षणाच्या सोईचा विस्तार आणि विद्यमान माध्यमिक शाळांची सुधारणा :—

माध्यमिक शिक्षणाच्या सोयींचा विस्तार करतां यावा म्हणून विद्यमान शाळांचा दर्जा वाढविण्याकरितां आणि बिन-सरकारी माध्यमिक शाळांचीं अनुदानें वाढविण्याकरितां तरतूद करण्यांत आली आहे. माध्यमिक शिक्षणाचा विस्तार करण्याच्या कार्यक्रमानुसार विदर्भांतील शाळांचा दर्जा सुधारण्यांत आला आणि

मराठवाड्यांतील सरकारी माध्यमिक शाळांमध्यें जादा वर्ग उघडण्यांत आले आहेत. माध्यमिक शिक्षणाचा विस्तार करण्याचा हा कार्यक्रम १९६०-६१ मध्येंहि चालूं राहील.

नवीन माध्यमिक शाळा उघडण्यासाठीं जेथें पुरेशा खाजगी संस्था पुढें आल्या नव्हत्या अशा मराठवाडा प्रदेशांतील, जादा माध्यमिक शाळा उघडण्याबाबतची मागणी पुरी करण्याच्या दृष्टीनें, या संस्थांना १९५९-६० मध्यें सढळपणें अनुदान-सहाय्य देण्यांत आलें. हीं अनुदानें १९६०-६१ मध्येंहि चालूं राहतील.

**इमारती बांधणें:—**

माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळें, माध्यमिक शाळांकरितां जादा इमारतींची तीव्रतेनें गरज भासूं लागली आहे. शाळांकरितां नवीन इमारती बांधण्याकरितां आणि विद्यमान शाळांच्या इमारतींचा विस्तार करण्याकरितां राज्य सरकारनें खाजगी माध्यमिक शाळांच्या व्यवस्थापक मंडळास कर्जे देण्याची योजना पुरस्कृत केली आहे. त्यानुसार, जुन्या मुंबई राज्याच्या महाराष्ट्रांतील जिल्ह्यांमधील शाळांकरितां तसेंच विदर्भ आणि मराठवाडा यांमधील माध्यमिक शाळांकरितांहि कर्जे मंजूर करण्यांत आलीं आहेत.

ग्रामीण जनतेंत माध्यमिक शिक्षणाचा प्रसार करण्यास उत्तेजन देण्याकरितां, ग्रामीण प्रदेशांतील विद्यार्थ्यांकरितां वसतिगृहांची अत्यंत आवश्यकता भासत आहे. त्यानुसार, १९५८-५९ या वर्षापासून, जुन्या मुंबई राज्यांतील मराठी भाषिक जिल्ह्यांमधील शाळांना अनुदानें मंजूर करण्यांत आलीं आहेत. विदर्भांत, बिन-सरकारी माध्यमिक शाळांना इमारती बांधण्याकरितां आणि साधनसामुग्रीची खरेदी करण्याकरितां आर्थिक सहाय्य देण्यांत आलें होतें. मराठवाड्यांत, माध्यमिक शाळांमधील वर्गांच्या खोल्या बांधण्याचा कार्यक्रम पार पाडण्यांत येत आहे. १९५९-६० मध्यें जुन्या मुंबई राज्यांतील मराठी भाषिक जिल्ह्यांमधील २३२ बिन-सरकारी माध्यमिक शाळांना, इमारती बांधण्याकरितां आणि / किंवा शाळांच्या सध्यांच्या इमारतींचा किंवा वसतिगृहांचा विस्तार करण्याकरितां कांहीं ठराविक शर्ती आणि अटी यांवर सवलतीच्या दरानें अनुदानें देण्यांत आलीं.

## (तीन) विद्यापीठांमधील उच्च शिक्षण

युद्धोत्तर पुनर्रचनेच्या काळांत व पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत उच्च शिक्षणाच्या कार्यक्रमांत प्रादेशिक विद्यापीठांची स्थापना करण्याचा प्रामुख्यानें समावेश झाला आहे. परंतु, मुंबई राज्याच्या पुनर्रचनेच्या निरनिराळ्या अवस्थांत राज्याच्या अधिकारक्षेत्रांतील विद्यापीठांच्या संख्येत तदनुसार बदल झाला आहे. गुजराथ आणि कर्नाटक प्रदेशाच्या शैक्षणिक गरजा भागविणारीं विद्यापीठें आतां महाराष्ट्र राज्याच्या अधिकार-क्षेत्राबाहेर गेली आहेत; व नागपूर विद्यापीठ आणि लोकांच्या प्रादेशिक महत्त्वाकांक्षा दर्शविणारें मराठवाडा विद्यापीठ हीं दोन विद्यापीठें राज्याच्या अधिकाराखालीं आलीं आहेत. याप्रमाणें महाराष्ट्र राज्यांत खालील विद्यापीठें आहेत:—

(१) मुंबई.
(२) पुणें.
(३) शेठ नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ.
(४) नागपूर.
(५) मराठवाडा.

वर निर्दिष्ट केलेलीं सर्व विद्यापीठें द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या विकासकार्यक्रमांत भाग घेत आहेत.

विद्यापीठांच्या विकासकार्यक्रमास विद्यापीठ अनुदान मंडळाची मंजुरी मिळाली असून त्यासाठीं हें मंडळ सरळ विद्यापीठांना अनुदानें मंजूर करतें आणि अशा संमत केलेल्या योजनांकरितां राज्य सरकार विद्यापीठांना तशाच प्रकारचीं अनुदानें देतें.

विद्यापीठ अनुदान मंडळानें जुन्या मुंबई राज्याच्या मराठी भाषिक जिल्ह्यांत विद्यापीठविषयक कांहीं योजनांना मान्यता दिली आहे. त्यासाठीं रु. ८३,३०,००० इतका खर्च येणार असून राज्य सरकारनें या अनुदानांतील आपला हिस्सा देण्याकरितां योग्य ती तरतूद करण्याचें योजिलें आहे.

अशाच प्रकारचीं अनुदानें नागपूर विद्यापीठास विद्यापीठ अनुदान मंडळानें स्वीकृत केलेल्या विकास योजनांकरितां देण्यांत आलीं आहेत.

१९५६-५७ मध्यें, मुंबई विद्यापीठाला त्याच्या शताब्दिनिमित्त रु. १० लाख इतक्या रकमेचें खास अनुदान देण्यांत आलें. या अनुदानांतून या विद्यापीठाला भारत सरकार, मुंबई महापालिका, इत्यादींकडून मिळणाऱ्या अनुदानांतून हें विद्यापीठ द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालांत आपल्या विकासयोजनांचा खर्च करील अशी अपेक्षा आहे.

मराठवाडा विद्यापीठ १९५८-५९ मध्यें स्थापन झालें असून मराठवाडा प्रदेशाच्या द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या तरतुदींतून त्याला अनुदानें देण्यांत येतात. हीं अनुदानें विद्यापीठाच्या सुव्यवस्थेकरितां आणि त्याच्या विकासकार्यक्रमाकरितां आहेत.

विद्यापीठाच्या, क्रमिक पुस्तकें प्रकाशित करण्याच्या कार्यक्रमाला उत्तेजन देण्याकरितां गेल्या वर्षी रु. १ लाख इतक्या रकमेची बिनव्याजी कर्जे मंजूर करण्यांत आलीं होतीं. या वर्षाकरितांहि योग्य ती तरतूद करण्यांत आली आहे.

## सरकारी महाविद्यालयांत आवश्यक त्या सोयी करणें :-

निरनिराळ्या सरकारी महाविद्यालयांत, वसतिगृहें, उपहारगृहें, पॅव्हिलियन इत्यादींची सोय करणें, ग्रंथालयांची सुधारणा करणें, प्रयोगशाळांचा विस्तार करणें इत्यादींसारख्या कांहीं आवश्यक सोयी करणें हा महाराष्ट्र राज्यांतील योजनेचा उद्देश आहे. खालील कामें अगोदरपासूनच सुरू असून चालू वर्षी आवश्यक ती तरतूद करण्याचें योजिलें आहे:-

१. कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयाच्या इमारतींत वाढ व फेरबदल करणें.

२. मुंबई येथील सरकारी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांकरितां वसतिगृह बांधणें.

३. मुंबई येथील एल्फिन्स्टन महाविद्यालयांत विजेच्या नवीन तारा बसविणें आणि तेथील विद्युत उभारणीचें डी. सी. मधून ए. सी. मध्यें रूपांतर करणें.

अंधेरी येथील इस्माईल युसूफ महाविद्यालयाच्या आवाराची भिंत बांधण्याच्या नवीन कामाकरितां तरतूद करण्यांत आली आहे.

विदर्भामध्यें, विज्ञान महाविद्यालय नागपूर, आणि नागपूर महाविद्यालय नागपूर येथील वसतिगृहें बांधण्याबाबत चालू असलेल्या कामांसाठीं चालू वर्षी, तरतूद करण्यांत आली आहे.

औरंगाबाद येथील सरकारी साहित्य व विज्ञान महाविद्यालयाची नवीन इमारत बांधण्याकरितां "८१, मुलकी कामें" ह्या सदराखालीं रु. २ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे. सरकारी महाविद्यालयाच्या स्थितीची सुधारणा करण्यासाठीं "८१ मुलकी कामें" या सदराखालीं एकूण रु. १४·७४ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

**सरकारी महाविद्यालयांतील पदव्युत्तर प्रशिक्षण व संशोधन ह्यांचा विस्तार :-**

मुंबई येथील विज्ञान संस्थेमध्यें पदव्युत्तर प्रशिक्षण व संशोधन यासाठीं जादा सोयींची तरतूद केली आहे, आणि तेथें ३३ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे. ही योजना ह्या वर्षीहि चालू राहील. विदर्भांतील सरकारी महाविद्यालयांत संगीत, मानसशास्त्र, हिंदी, गणनाशास्त्र आणि इंग्रजी ह्यासारख्या विषयांसाठीं खास तरतूदहि केलेली आहे. विदर्भांतील सरकारी महाविद्यालयांत ३ वर्षांचे पदवी पाठ्यक्रम सुरू करण्याचेंहि योजिलें आहे. कांहीं सरकारी महाविद्यालयामध्यें जादा वर्ग उघडण्याकरितां खास उपाययोजन हि करण्यांत आली आहे.

**बिन-सरकारी महाविद्यालयें:-**

१९५९-६० मध्यें इमारतीसाठीं रु. १४·५६ लाखापर्यंत कर्जे देण्याची तरतूद करण्यांत येऊन महाराष्ट्र राज्यांतील सर्व प्रदेशांतील बिनसरकारी महाविद्यालयांच्या गरजांकडे योग्यप्रकारें लक्ष देण्यांत आलें. १९५९-६० मध्यें, ह्या महाविद्यालयांना इमारती, साधनसामुग्री, ग्रंथालय आणि स्त्रियांसाठीं वसतिगृह बांधण्याकरितां, सुमारें २६·४७ लाख रुपयांचीं सवलतीच्या दरानें अनुदानें देऊन मदत करण्यांत आली. ही योजना ह्यावर्षी देखील चालू राहील.

**पुणें येथील डेक्कन महाविद्यालयाच्या पदव्युत्तर आणि संशोधन संस्थेच्या विभागाचा विस्तार :-**

भाषाशास्त्रविषयक एम्. ए. पदवी आणि मानववंश शास्त्राचा एम्. ए. पदवी आणि डिप्लोमा पाठ्यक्रम सुरु करण्याच्या दृष्टीनें डेक्कन महाविद्यालयाच्या पदव्युत्तर आणि संशोधन संस्थेच्या कांहीं विभागांत वाढ करण्यांत आली आहे व त्यास अनुदानें देण्यांत आलीं आहेत.

**संशोधन आणि सांस्कृतिक संस्था यांना इमारती, साधनसामुग्री आणि व्यवस्था यासाठीं अनुदानें -**

मान्यता मिळालेल्या संशोधन व सांस्कृतिक संस्था यांना या योजनेनुसार अनुदाने देण्यांत येतात. स्वीकृत होऊं शकणाऱ्या आवर्तक खर्चाच्या २५ टक्के इतकें अनुदान सामान्यत: देण्यांत येतें. अनुदानाचें प्रमाण २५ टक्क्यांपासून ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे योजिलें आहे. १९५९-६० मध्यें वाढत्या दरानें अनुदानें देण्यांत आलीं व १९६०-६१ मध्येंहि देण्यांत येतील.

**शिष्यवृत्त्या:-**

उच्चशिक्षणाच्या सर्व शाखांमध्यें अभ्यास करणाऱ्या गरीब परंतु लायक विद्यार्थ्यांच्या गरजा भागविण्यासाठीं शिष्यवृत्त्या व कर्जाऊ शिष्यवृत्त्या देण्यासाठीं पुरेशी तरतूद केली आहे.

## (चार) मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठीं उपाययोजना

मागासलेल्या वर्गाच्या कल्याणासाठीं असलेल्या खालील योजना सध्यां शिक्षण विभागानें हातीं घेतल्या आहेत.

**१. अनुसूचित जमातीसाठीं असलेल्या आश्रमशाळांचा विकास:-**

ठरविलेल्या उद्दिष्टाप्रमाणें १९५९-६० मध्यें अनुसूचित जमातींच्या २४ आश्रमशाळांचा विकास करावयाचा होता. १९५९-६० मध्यें त्यांपैकीं २३ आश्रमशाळांचा हळूहळू विकास करण्यांत आला. चालू वर्षी, (१९६०-६१) गुजराथ राज्यांत गेलेल्या शाळा वगळून, बाकी सर्व आश्रमशाळांचा योजनेबरहुकूम विकास करण्यांत येत आहे.

**२. द्वितीय पंचवार्षिक योजनेअन्वयें अनुसूचित जमातीसाठीं सुरूं करण्यांत आलेल्या आश्रमशाळांची व्यवस्था:-**

द्वितीय पंचवार्षिक योजनेन्वयें अनुसूचित जमातीसाठीं सुरू करण्यांत आलेल्या १५ आश्रमशाळांची व्यवस्था ठेवणें हे १९५९-६० मधील उद्दिष्ट होतें. त्या वर्षी, सर्व आश्रमशाळांची व्यवस्था ठेवण्यांत आली. गुजराथ राज्यांत गेलेल्या आश्रमशाळा वगळून ह्या आश्रमशाळा (१५) व त्याशिवाय १९५९-६० मध्यें उघडण्यांत आलेल्या जादा आश्रमशाळा यांची व्यवस्था चालूं वर्षी ठेवण्यांत येईल.

**३. अनुसूचित जमातीकरितां जादा आश्रमशाळा उघडणें:—**

१९५९-६० मध्यें ५ आश्रमशाळा उघडण्यास सरकारनें मान्यता दिली होती. पांचहि आश्रमशाळांना अनावर्तक अनुदानें मंजूर करण्यांत आली होती. त्यांपैकीं तीन आश्रमशाळा गेल्या वर्षी सुरूं झाल्या व बाकीच्या चालू वर्षी सुरू होणार आहेत. १९६०-६१ मध्यें ह्या कामासाठीं सरकारनें रु. १,६०,००० इतक्या रकमेची तरतूद केली आहे.

**४. अनुसूचित प्रदेशांत काम करणाऱ्या शिक्षकांसाठीं अल्पकालिक प्रशिक्षण पाठ्यक्रम:—**

गेल्या वर्षी, नाशिक जिल्ह्यात एक पाठ्यक्रम घेण्यात आला होता. ह्या वर्षीहि असा पाठ्यक्रम घेण्यात येण्याची अपेक्षा आहे. ज्यांनी हा पाठ्यक्रम पूर्ण केला अशा शिक्षकांना खास पगार देण्यांत आला. हा विशेष पगार ह्यावर्षीहि देण्यांत येईल.

**५. अनुसूचित प्रदेशांतील प्राथमिक शिक्षकांना निवृत्तिवेतनासाठीं विचारांत घेतला न जाणारा खास पगार:-**

अनुसूचित प्रदेशांत काम करणाऱ्या शिक्षकांना निवृत्तिवेतनासाठीं विचारांत घेतला न जाणारा खास पगार गेल्या वर्षी देण्यांत आला. ह्या वर्षीहि तो देण्यांत येईल.

**६. विमोचित जातींसाठीं असलेल्या आश्रमशाळांचा विकास:-**

१९५९-६० मध्यें विमोचित जातींसाठीं असलेल्या तीनहि आश्रमशाळांचा हळूंहळूं विकास करण्यांत आला. चालूं वर्षी महाराष्ट्र राज्यांतील आश्रमशाळांचा विकास करण्यांत येईल.

**७. विमोचित जातींसाठीं असलेल्या आश्रमशाळांची व्यवस्था:—**

१९५९-६० मध्यें उत्तर सातारा जिल्ह्यांतील गोंडवले येथें विमोचित जातींसाठीं एका आश्रमशाळेची व्यवस्था ठेवण्यांत आली होती. तशी व्यवस्था चालूं वर्षीहि ठेवण्यांत येईल.

**८. भटक्या जमातींच्या आश्रमशाळांची व्यवस्था:-**

भटक्या जमातीसाठीं असलेल्या तीन आश्रमशाळांची व्यवस्था ठेवणें हें १९५९-६० मधील उद्दिष्ट होतें. गेल्या वर्षी ह्या आश्रमशाळांची व्यवस्था ठेवण्यांत आली होती. ह्या वर्षी महाराष्ट्र राज्यांतील आश्रमशाळांचीहि व्यवस्था ठेवण्यांत येईल.

**९. केंद्रीय कायद्यानुसार सुरूं केलेल्या अनुसूचित जमातींच्या आश्रमशाळांची व्यवस्था:-**

१२ आश्रमशाळांपैकीं, १९५९-६० मध्यें ११ आश्रमशाळांची व्यवस्था ठेवण्यांत आली होती. एक आश्रमशाळा अजूनहि सुरू झालेली नाहीं. ती यावर्षी सुरू करण्याचें योजिलें आहे. गुजरात राज्यांत गेलेल्या आश्रमशाळा सोडून बाकी सर्व आश्रमशाळा या वर्षी चालूं ठेवण्यांत येतील.

## संकीर्ण योजना

### व्यवसाय मार्गदर्शन ब्यूरोची वाढ करणें :-

ह्या योजनेनुसार मुंबई येथील व्यवसायविषयक मार्गदर्शी ब्यूरोचा विस्तार करण्यांत आला असून पुणें येथें ब्यूरोची एक उपशाखा स्थापन करण्यांत आली आहे. चालू वर्षीहि त्यासंबंधीचीं कार्ये चालू राहतील.

### राष्ट्रीय छात्रसेना वरिष्ठ विभाग व सहाय्यक छात्रसेना यांचा विस्तार :-

राष्ट्रीय छात्रसेना व सहाय्यक छात्रसेना यांचा विस्तार करण्याच्या कार्यक्रमाबाबत पुढें पाऊल टाकण्यांत आलें आहे. १९५९-६० मध्यें महाराष्ट्रांत ७ पायदळ पथकें, ३ तांत्रिक पथकें, ४ मुलींचीं पथकें, विदर्भांत एक तांत्रिक पथक आणि एक मुलींचे पथक, आणि मराठवाड्यामध्यें एक तांत्रिक पथक ह्याप्रमाणें पथकें उभारण्यांत आलीं. १९६०-६१ मध्यें महाराष्ट्रांमध्यें राष्ट्रीय छात्रसेना वरिष्ठ विभागाची ३ तांत्रिक पथकें आणि राष्ट्रीय छात्रसेना कनिष्ठ विभागाची ३० पथकें उभारण्याचें योजिलें आहे. सशस्त्र दलांमध्यें नियुक्त केलेले अधिकारी म्हणून प्रवेश करण्यांस तरुण विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठीं प्रत्यक्ष उपाययोजना करण्यासंबंधीं विशेष विचार करण्यांत आला. याबाबतींत वरिष्ठ विभाग छात्रसेनेचें अधिकाऱ्यांसाठीं एक प्रशिक्षण पथक उभारून योग्य ती सुरुवात केलेली आहे.

### राष्ट्रीय शिस्त योजना :—

केंद्र सरकारनें पुरस्कृत केलेली राष्ट्रीय शिस्त योजना राज्य सरकारच्या मदतीनें नवीन राज्यांत सुरू करण्यांत आली आहे. ह्या योजनेनुसार शारीरिक प्रशिक्षण अनुदेशकहि नेमण्यांत आले आहेत. तरुण पिढीमध्यें स्वावलंबन, नेतृत्व आणि शिस्त बाणविणें हें या योजनेचें उद्दिष्ट आहे. १९५९-६० च्या अखेरपर्यंत, भारत सरकार आणि राज्य सरकार यांच्याकडून अनुक्रमें ३९७ आणि ३४२ शारीरिक प्रशिक्षण अनुदेशक नेमण्यांत आले. १९६०-६१ मध्यें, विद्यमान शारीरिक प्रशिक्षण अनुदेशकांसाठीं एक उजळणी पाठ्यक्रम आणि मुख्य शिक्षकांकरितां असलेल्या राष्ट्रीय शिस्त व सेवा योजनेंतील एक विषयाभिमुख पाठ्यक्रम असे दोन प्रशिक्षण पाठ्यक्रम चालविण्याचें योजिलें आहे.

शारीरिक शिक्षणाच्या ह्या कार्याशिवाय, राज्यांतील खेळांचा योजनापूर्वक आणि सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीनें राज्य क्रीडा परिषद स्थापन करण्यांत आली आहे. राज्यांतील क्रीडा मंडळांना योग्य तें अनुदान साहाय्य देणें, हें या परिषदेच्या प्रमुख कार्यांपैकीं एक कार्य आहे. विदर्भामध्यें, जिल्हा व विभागीय सामने भरविण्याकरितां सुद्धां संस्थांना अनुदानें देण्यांत येत आहेत.

### हिंदीचा प्रचार :—

प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांसाठीं चार महिन्याच्या कालावधीचे अल्प मुदतीचे हिंदी पाठ्यक्रम मंजूर करण्यांत आले असून १९५५ पासून त्याचे ८ वर्ग सुरू करण्यांत आले आहेत. प्राथमिक शाळांतून हिंदी शिकविणें शक्य व्हावें म्हणून, प्रत्येक वर्षी २४० शिक्षकांना ह्या योजनेनुसार प्रशिक्षण देण्यांत येतें. अल्पकालीन मुदतीचे पाठ्यक्रम आंखण्याबरोबर जुन्या मुंबई राज्याच्या मराठी भाषिक जिल्ह्यांतील कांहीं लहान व मोठया निवडक दुय्यम शाळांना आणि कांहीं निवडक महाविद्यालयांना योजनेच्या प्रत्येक वर्षी पुस्तकें खरेदी करण्यासाठीं अनुदानें देण्यांत येतात. मराठवाड्यांमध्यें ५१ हिंदी शिक्षकांना सरकारी दुय्यम शाळांतून नेमण्यांत आलें असून ७२ शाळांना हिंदी पुस्तकें देण्यांत आलीं आहेत. आतांपर्यंत नेमण्यांत आलेल्या शिक्षकांची नेमणूक १९६०-६१ मध्येंहि चालू राहील. हिंदींतील पाठ्यक्रम चालविण्यासाठीं हिंदी शिक्षक सनद वर्गांनाहि अनुदानें देण्यांत येतात.

**ग्रंथालयें:—**

विदर्भामधील ग्रंथालयांचा विस्तार करण्याच्या योजनेनुसार १९५६-५७ मध्यें प्रदेशाच्या प्रत्येक जिल्ह्याला १० ग्रंथालयें, याप्रमाणें ८० ग्रंथालयें स्थापन करण्यांत आलीं. १९५८-५९ मध्यें ८० जादा ग्रंथालयें मंजूर करण्यांत आलीं आणि १९५९-६० मध्यें त्यांत आणखी ८० ग्रंथालयांची भर घालण्यात आली. १९६०-६१ मध्यें देखील त्याच प्रमाणावर ग्रंथालयें उघडण्याचें योजिलें आहे. मार्गदर्शी प्रकल्पाकरितां पुस्तकांच्या पुरेशा सांठ्याची तरतूद करण्याच्या दृष्टीनें जिल्हा ग्रंथालयें अधिक संपन्न करण्यासाठीं विदर्भांत १९६०-६१ मध्यें प्रत्येक ग्रंथालयाला रु. २,००० प्रमाणें रक्कम देण्याचें योजिलें आहे.

**समाज शिक्षण:—**

विदर्भामध्यें, १९५९-६० मध्यें १००० समाज शिक्षण वर्ग चालविण्यांत आले. आणि १९६०-६१ मध्यें १५०० वर्ग चालविण्याचें योजिलें आहे.

पुणें, मुंबई, मराठवाडा व विदर्भ या प्रदेशांत समाज शिक्षणविषयक कार्य करण्यासाठीं चार जिल्हा समाज शिक्षण अधिकारी देखील नेमण्यांत आले आहेत.

## तांत्रिक शिक्षण

जुनी इंजिनिअरिंग महाविद्यालयें, विविध-तंत्रशाळा, तांत्रिक उच्च शाळा, औद्योगिक शाळा यांचा विस्तार नवीन इंजिनिअरिंग महाविद्यालयें, विविध-तंत्रशाळा, तांत्रिक उच्च शाळा यांची स्थापना, मुद्रण तंत्रशास्त्र संस्थेची स्थापना, मुद्रणशास्त्र संस्थेच्या महाविद्यालयाचा विकास करणें, मुंबई येथील आर्किटेक्चर महाविद्यालय व अॅप्लाईड आॅर्टस् संस्था यांचा विकास करणें, खासगी इंजिनिअरिंग महाविद्यालयें, विविध-शिल्प संस्था, तांत्रिक उच्च शाळा, औद्योगिक शाळा ह्यांना सरकारी संस्थेप्रमाणें त्यांचा विकास व्हावा म्हणून अनुदान सहाय्य देणें, शिष्यवृत्त्या देणें, गरजू विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या देणें, भारत सरकारच्या प्रशिक्षण संस्थांमध्यें संस्थांच्या अनुदेशकांना प्रतिनियुक्त करणें वगैरेसंबंधीच्या योजनांकरितां एकूण रु. २९,४९७ लाख खर्च करणें, हा महाराष्ट्र राज्याच्या तांत्रिक शिक्षण विभागाच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा उद्देश आहे. 'शिक्षण व समाजकल्याण' या विकासविषयक सदराखालील द्वितीय पंचवार्षिक योजनांतर्गत योजनांच्या अंमलबजावणीसाठीं द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या ४ वर्षांत रु. १६२·५२ लाख खर्च करण्यांत आले. (१९५९-६० चा अंदाजी खर्च सुमारें रु. ९२·२८ लाख इतका आहे).

१९५९-६० मध्यें झालेली प्रगति आणि १९६०-६१ या वर्षाकरितां ठरविलेल्या गोष्टी खालील परिच्छेदांत सारांशरूपानें देण्यांत आल्या आहेत.

**पदव्युत्तर आणि पदवी शिक्षण :—**

पुणें येथील इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या विकास कार्यक्रमानुसार खालील पदव्युत्तर पाठ्यक्रम सुरू करण्यांत आले होते.

(१) प्रगत धातुशास्त्रांतील पदव्युत्तर पाठ्यक्रम

(२) प्रगत इलेक्ट्रॉनिक्समधील पदव्युत्तर पाठ्यक्रम.

(३) प्रगत हायड्रॉलीक्स, जलसिंचन व धरणाचे बांधकामविषयक पदव्युत्तर पाठ्यक्रम.

(४) प्रगत स्ट्रक्चरल् इंजिनिअरिंग आणि कॉंक्रीट टेक्नालॉजी यामधील पदव्युत्तर पाठ्यक्रम.

वरील पाठ्यक्रम १९५९-६० मध्यें चालू ठेवण्यांत आले होते व ते १९६०-६१ मध्येंहि चालू ठेवण्यांत येतील. पुणें येथील इंजिनिअरिंग महाविद्यालयामध्यें १९६०-६१ पासून सॉईल मशीन्स फौंडेशन इंजिनिअरिंग हा पदव्युत्तर पाठ्यक्रम सुरू करण्याचें योजिलें आहे.

इंजिनिअरिंग पर्सनेल कमिटीच्या शिफारशीनुसार, १९५७–५८ पासून पुणें येथील इंजिनिअरिंग महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या १५० पासून २९० पर्यंत वाढविण्यांत आली होती व १९५९-६० मध्यें ती संख्या तशीच ठेवण्यांत आली होती आणि १९६०-६१ मध्यें सुद्धां ती संख्या तशीच ठेवण्यांत येईल.

पुणें येथील इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या सर्वसाधारण विस्तार कार्यक्रमानुसार, भूगर्भशास्त्रविषयक वस्तुसंग्रहालयाच्या विस्ताराची योजना हातीं घेण्यांत आली आहे. या कार्यक्रमानुसार दरवर्षी देशाच्या महत्त्वाच्या भागांत दौरे काढून ऑक्टोबरच्या सुट्टीमध्यें पाषाणाचे सुमारे १०० नमुने जमा करण्यांत येतात. धातुशास्त्राच्या विभागाची इमारत व वसतिगृह यांचें बांधकाम पूर्ण करण्यांत आलें आहे.

१९५६–५७ मध्यें नागपूर येथ १२० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळूं शकेल असे एक इंजिनिअरिंग महाविद्यालय सुरू करण्यांत आलें आहे. परंतु प्रत्यक्षांत सोयींच्या अभावाच्या अडचणीमुळें फक्त ६० विद्यार्थ्यांनाच तेथें दरवर्षी प्रवेश देण्यांत येतो. भारत सरकारनें २४० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळूं शकेल असे त्यांच्या प्रादेशिक इंजिनिअरिंग महाविद्यालयांपैकीं एक महाविद्यालय नागपूर येथें सुरू करण्याचे योजिलें आहे. ह्या केन्द्रपुरस्कृत योजनेनुसार १९६०-६१ सालीं पुरेसा नोकरवर्ग नेमण्याचे व साधनसामुग्री खरेदी करण्याचे योजिलें आहे.

राज्य-योजनांतर्गत योजनेनुसार १९६०-६१ मध्यें कऱ्हाड व औरंगाबाद येथें दोन नवीन इंजिनिअरिंग महाविद्यालयें उघडण्याचें योजिलें आहे.

### डिप्लोमा शिक्षणक्रम :—

राज्य सरकारच्या योजनेनुसार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश देऊं शकणाऱ्या, सिव्हिल, मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग या पाठ्यक्रमाच्या दोन विविध तंत्र शाळा सोलापूर (१९५६-५७) व कऱ्हाड (१९५७-५८) येथें सुरूं करण्यात आल्या आहेत. १९५६–५७ मध्यें सुरूं करण्यांत आलेल्या फक्त ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देऊं शकणाऱ्या सोलापूर येथील विविध तंत्र शाळेची १९५९-६० मध्यें १२० विद्यार्थ्यांस प्रवेश मिळूं शकेल इतकी वाढ करण्यांत आली आहे. १९५७-५८ च्या शेवटी सुरूं करण्यांत आलेले कऱ्हाड येथील विविध तंत्र शाळेच्या इमारतीचें बांधकाम यावर्षी पूर्ण करण्यात आलें व १८० विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृहाच्या इमारती आणि नोकरांच्या गाळ्यांचें बांधकाम हातीं घेण्यांत आले आहे. सोलापूर येथील इमारतीचें बांधकाम चालूं आहे. १९६०-६१ मध्यें मुंबई व जळगांव येथें अनुक्रमें ३०० व १२० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळूं शकेल अशा दोन विविध-शिल्प संस्था सुरूं करण्याचें योजिलें आहे.

इंजिनिअरिंग पर्सनेल कमिटीच्या शिफारसीनुसार, पुणे येथील इंजिनिअरिंग महाविद्यालयामधून इंजिनिअरिंगविषयक डिप्लोमा पाठ्यक्रम निराळा काढण्यांत आला असून तो केन्द्रपुरस्कृत योजनेखालीं १९५७-५८ सालीं स्थापन झालेल्या विविध तंत्र शाळेकडे सोंपविण्यांत आला आहे. ह्या विविध तंत्र शाळेच्या इमारतीचें बांधकाम चालूं आहे व तें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्यें पूर्ण करण्यांत येईल वरील कार्यक्रमाशिवाय नागपूर, अमरावती आणि औरंगाबाद येथील सरकारी विविध तंत्रशाळा तसेंच खार येथील प्रशिक्षण संस्था, मुंबई येथील जे. जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अॅप्लाईड आर्ट यांच्या विस्ताराचा कार्यक्रम १९५९-६० सालीं हातीं घेण्यात आला असून तो १९६०-६१ सालीं पुढें चालू ठेवण्यांत येईल.

### माध्यमिक शिक्षण :—

माध्यमिक शिक्षण समितीच्या शिफारसीनुसार, पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षी, जुन्या मुम्बई राज्यांतील जिल्ह्यांच्या मुख्य ठिकाणीं व इतर प्रमुख शहरीं तंत्रविषयक माध्यमिक शाळा केंद्रें स्थापन

करण्यांत आलीं होती. या शाळांच्या विकासाचा कार्यक्रम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें हातीं घेण्यांत आला आहे. या कार्यक्रमानुसार, प्रत्येक तंत्रविषयक माध्यमिक शाळा केंद्रासाठीं इमारती व आवश्यक तो नोकरवर्ग यांची तरतूद करण्यांत आली आहे. दादर केंद्राखेरीज बाकीच्या बऱ्याचशा केंद्रांच्या इमारतींचें काम पूर्ण झालें असून दादर येथील इमारतीचें काम १९६०–६१ मध्यें हातीं घेण्यांत येईल.

**संकीर्ण योजना :—**

१९५९–६० मध्यें खालील संकीर्ण योजना हातीं घेण्यांत आल्या होत्या व १९६०–६१ मध्यें त्या चालूं ठेवण्यांत येतील.

(१) मुंबईच्या तांत्रिक शिक्षण संचालकाच्या कार्यालयाचा विस्तार.

(२) कोनी, बिलासपूर व पुणें येथील भारत सरकारच्या प्रशिक्षण केंद्रांमध्यें अनुदेशकांची प्रतिनियुक्ति.

(३) अमरावती येथील कलानिकेतनाचा विस्तार.

(४) बिनसरकारी इंजिनिअरिंग महाविद्यालयें, विविध तंत्रशाळा, तंत्रविषयक माध्यमिक शाळा आणि औद्योगिक शाळा यांना अनुदान साहाय्य देणें.

(५) नगररचना आणि मूल्यांकन याबाबतचा दोन वर्षांचा पाठ्यक्रम सुरूं करणें.

**कारागीर प्रशिक्षण योजनाः—**

१९५९–६० सालीं, महाराष्ट्र राज्यांत, खालील नवीन औद्योगिक प्रशिक्षण केन्द्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत—

| | ठिकाण | प्रवेश संख्या |
|---|---|---|
| (१) | सातारा | १२८ |
| (२) | धुळें | ८८ |
| (३) | अमरावती | १८४ |
| (४) | कऱ्हाड | २४० |
| | | ६४० |

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्यें स्थापन केलेल्या औद्योगिक प्रशिक्षण केन्द्रांच्या इमारतींचें बांधकाम हातीं घेण्यांत आलें असून तें योजनेच्या काळामध्यें पूर्ण करण्यांत येईल. ऑगस्ट १९६० मधील अधिवेशनापासून अहमदनगर, नाशिक, जळगांव व सोलापूर येथें नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करून ऑगस्ट १९६० पासून सुरूं होणाऱ्या सालापासून जादा ५७२ विद्यार्थ्यांची सोय करण्याचे देखील योजिलें आहे. तसेंच विद्यमान संस्थेंत खालीं दर्शविल्याप्रमाणें जादा जागांची सोय करण्याचें योजिलें आहे.

| ठिकाण ( नवीन संस्था ) | विद्यार्थी संख्या | वाढविलेली प्रवेश संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| नाशिक | २८ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धुळें | ६४ |
| अहमदनगर | २८ | ,, ,, ,, कोल्हापूर | २८ |
| सोलापूर | १६० | ,, ,, ,, रत्नागिरी | ३६ |
| जळगांव | ८४ | ,, ,, ,, सातारा | १४४ |
| | ३०० | | २७२ |

उमेदवारांना प्रशिक्षण देण्याबाबतच्या राष्ट्रीय योजनेनुसार मुंबई येथें ६०० व नागपूर येथें १२० जागांची सोय करण्याचें योजिलें आहे. आतांपर्यंत मुंबई येथें ४०९ व नागपूर येथें ५० जागांची सोय करण्यांत आली आहे. १९६०-६१ मध्यें उरलेल्या जागांची सोय करण्यांत येईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें औद्योगिक कामगारांकरितां संध्याकाळचे वर्ग चालविण्याच्या योजनेनुसार एकूण ३०० कामगारांची सोय करण्याचें योजिलें आहे. १९५९-६० अखेरपर्यंत १०० जागांची सोय करण्यांत आली आहे. १९६०-६१ मध्यें उरलेल्या जागांची सोय करण्यांत येईल.

## मागासलेल्या वर्गांचें कल्याण

महाराष्ट्र राज्यांत मागासलेल्या वर्गांची लोकसंख्या सुमारें ६३·३६ लाख आहे. त्यांच्या शैक्षणिक आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक उन्नतीच्या योजना गेली तीस वर्षे चालू आहेत.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती यांच्या कल्याणाकरितां संयुक्त मुंबई राज्यांत रु. ३३३ लाख खर्च करण्यांत आले.

मागासलेल्या वर्गांच्या कल्याणाकरितां दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें ४४९·६६ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. केंद्रपुरस्कृत कार्यक्रमानुसार याशिवाय रु. ३०७·४६ लक्षची तरतूद करण्यांत आली आहे. १९५९-६० च्या अखेरीस राज्य योजनेनुसार रु. ३२६ लाख व केन्द्रपुरस्कृत कार्यक्रमानुसार रु. १८३ लाख खर्च झाले आहेत.

मागासलेल्या वर्गांच्या कल्याणाकरितां असलेल्या महत्त्वाच्या योजनांपैकीं अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांमधील विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट न ठेवतां नादारी व परीक्षा फी वगैरे देणें, शिष्यवृत्त्या देणें, मागासलेल्या वर्गांकरितां असलेल्या सरकारी वसतिगृहांची व्यवस्था ठेवणें; स्वेच्छेनें काम करणाऱ्या संस्थेकडून चालविण्यांत येणाऱ्या मागासलेल्या वर्गांच्या वसतिगृहांना अनुदानसहाय्य देणें, सर्व धर्मीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाकरितां अनुदान देणें, मागासलेल्या वर्गांच्या विद्यार्थ्यांकरितां वसतिगृहांच्या इमारतीकरितां अनुदानें देणें, प्रचार कार्य व संस्कार केन्द्रे चालवण्यासाठीं स्वेच्छेनें काम करणाऱ्या संस्थांना अनुदानें देणें, बालवाडी आणि समाज व करमणूक केन्द्रें, घरें बांधणें व बांधकामाच्या साधनसामुग्रीचा पुरवठ करणें, सहकारी गृहनिर्माण मंडळें व कामगारांची सहकारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था, करारानें कामगार पुरविणाऱ्या संस्था यांना आर्थिक सहाय्य देणें, अनुसूचित जाती व जमाती असलेल्या विभागांत दळणवळणाच्या साधनांची वाढ करणें, अनुसूचित जमातींच्या विभागांत फिरत्या वैद्यकीय केन्द्रांची स्थापना करणें, विहिरी खणणें आणि पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची दुरुस्ती करणें, जमिनीचा विकास करणें व जलसिंचनाच्या विहिरी बांधणें, आणि कुटीर उद्योगधंदे यांच्यासाठीं व दुभतीं जनावरें, नांगराचे बैल, बीं-बीयाणें व अवजारें इत्यादींच्या खरेदीसाठीं आर्थिक सहाय्य देणें, या योजना आहेत.

**योजनांचें समानीकरणः—**

मागासलेल्या जातींच्या कल्याणाच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा ११ योजना पूर्वी वेगवेगळ्या रीतीनें व साहाय्याच्या विविध प्रमाणांत कार्यन्वित केल्या जात असत. १९५९-६० मध्यें त्या योजना साहाय्याच्या एकाच प्रमाणांत व एकाच रीतीनें कार्यान्वित केल्या. योजनांच्या समानीकरणाचा एक अत्यंत महत्त्वाचा फायदा असा झाला कीं अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांमधील सर्व विद्यार्थ्यांना, त्यांच्या उत्पन्नाचा व वयाचा विचार न करतां, शिक्षणाच्या सर्व अवस्थांमध्यें परीक्षा फी माफ करण्यांत आली. अनुसूचित जाती व जमातींच्या वसतिगृहांच्या व्यवस्थेकरितां स्वेच्छेनें काम करणाऱ्या संस्थांना परिणामी द्यावयाच्या अनुदानांमध्यें राज्याच्या पुष्कळशा भागांत बरीचशी वाढ करण्यांत आली आहे. परिणामी वसतिगृहांत राहणाऱ्यांना जेवण्याच्या व राहण्याच्या चांगल्या सोयी उपलब्ध होऊं शकतील.

**नवीन योजना :—**

कांहीं महत्त्वाच्या योजनांबाबत समान कार्यपद्धतीचा अवलंब करणें व समान अनुदानें देणें याशिवाय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांची आर्थिक उन्नति झपाट्यानें होण्याच्या दृष्टीनें दुसऱ्या कांहीं योजना अंमलांत आणण्यांत आल्या आहेत.

निर्वाहासाठीं जवळजवळ कोणतींच साधनें उपलब्ध नसलेल्या अनुसूचित जाती आणि जमातींतील लोकांना छोटे आणि कुटिरोद्योग, व इतर व्यवसाय सुरू करण्यांत तसेंच गाई व म्हशी खरेदी करण्यास कर्ज व अर्थसहाय्य देण्याच्या योजनेमुळें त्यांत जरूरीपुरतीं अर्थोत्पादनाचीं साधनें उपलब्ध होतील. नागपूर येथें मागासलेल्या जातींच्या मुलींकरितां वसतिगृहाची स्थापना व आय. ए. एस्. व आय. पी. एस्. आणि इतर चढाओढींच्या परीक्षाकरितां अनुसूचित जाती व जमातींची तयारी करण्यासाठीं शिक्षणवर्ग चालू करणें ह्या इतर अतिशय महत्त्वाच्या योजना आहेत. नागपूर हें राज्यांमधील एक मोठें शैक्षणिक केन्द्र आहे. त्या ठिकाणीं मुलींच्या वसतिगृहाची उणीव दिवसेंदिवस प्रकर्षानें जाणवत होती. सरकारी वसतिगृह सुरू केल्यानें ही फार दिवसांची निकड पूर्ण झालेली आहे. मागासलेल्या वर्गांतील मुलींकरितां पुणें येथें एक वसतिगृह अगोदरच उघडण्यांत आलें आहे. आय. ए. एस्. व आय. पी. एस्. व केन्द्रीय व राज्यांतील प्रथम श्रेणीच्या नोकऱ्यांमध्यें अनुसूचित जातींच्या व जमातींच्या व्यक्तींसाठीं जरी कांहीं टक्के जागा राखून ठेवण्यांत आल्या आहेत तरीसुद्धां त्यांची टक्केवारी अतिशयच कमी असते. अनुसूचित जाती व जमातींच्या उमेदवारांचा अभ्यास अत्यंत कच्चा असल्यामुळें व त्यांच्याजवळ सामान्य ज्ञानाचा अभाव असल्यामुळें एक तर ते चढाओढीच्या परीक्षेमध्यें नापास होतात किंवा वैयक्तिक चांचणीमध्यें तितकेसे यशस्वी होत नाहींत. ह्या उणीवा भरून काढण्यासाठीं व त्यांना खास व सखोल ज्ञान देण्यासाठीं राज्याच्या प्रत्येक महसूल विभागाच्या ठिकाणीं खास वर्ग चालवण्यांत येतात. पुणें व नागपूर येथील मागासलेल्या वर्गांतील मुलांच्या वसतिगृहांचा याच उद्देशानें विकास केलेला आहे.

वसतिगृह विकास योजनेनुसार वर्गामध्येंच नव्हे तर, वसतिगृहांमध्यें सुद्धां बारकाईनें वैयक्तिक लक्ष पुरविलें जातें आणि एवढ्याकरितां प्रत्येक वसतिगृहामध्यें प्रथम श्रेणींतील राजपत्रित वेतनमान असलेला एक हाऊस-मास्टर आणि साहित्य विषयांकरितां एक व शास्त्र विषयांकरितां एक असे दोन पर्यवेक्षक नेमले आहेत. विद्यार्थ्यांना मोफत भोजनाची व राहाण्याची सोय असते, एवढेंच नव्हे तर त्यांना पुस्तकें, कपडे, बिछाने व चादरी सुद्धां मोफत मिळतात. तसेंच त्यांच्या छंदांना व सहलींनाहि वाव मिळेल अशा सुखसोयीहि केल्या आहेत. विद्यार्थी ज्या विषयांत कच्चे आहेत ते विषय त्यांना खाजगी रीतीनें शिकविण्याची सोयही केली आहे.

**अस्पृश्यता निवारण :—**

एकत्रित मुंबई राज्याच्या १० निवडक जिल्ह्यांमध्यें १९५८–५९ मध्यें अस्पृश्यता निवारणाची तीव्र चळवळ सुरू करण्यांत आली. १९५९-६० मध्यें ही चळवळ आणखी १० जिल्ह्यांमध्यें वाढविण्यांत आली, व प्रचारकांच्या नेमणुकीकरितां आणि सहभोजनें घडवून आणण्याकरितां जास्त अनुदानें मंजूर करण्यांत आलीं. ही चळवळ सुरू असलेल्या २० जिल्ह्यांपैकीं १२ जिल्हे महाराष्ट्रांतील आहेत. १९६०-६१ मध्यें ही चळवळ ह्या १२ जिल्ह्यांमध्यें चालू राहील व आणखी ६ जिल्ह्यांमध्यें हिचा प्रसार करण्यांत येईल. अशा रीतीनें द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं, ज्या जिल्ह्यांमध्यें अस्पृश्यता मोठ्या प्रमाणांत पाळली जाते, असे एकूण १८ जिल्हे ह्या चळवळीनें व्यापले जातील.

**उत्पन्नाच्या आधारें इतर मागासलेल्या जमातींचें वर्गीकरण :—**

वर्ग आणि जातिविरहित समाजस्थापनेसाठीं १९५९-६० मध्यें जातींवर आधारलेलें जुनें वर्गीकरण रद्द करून त्याऐवजीं उत्पन्नमानावर आधारलेला इतर मागासलेल्या जमातींचा नवीन वर्ग अस्तित्वांत

आणून एक दूरगामी पाऊल पुढें टाकण्यांत आलें. १९५९-६० मध्यें ह्या नवीन वर्गांमधील विद्यार्थ्यांना सर्व पातळीच्या शिक्षणासाठीं फी माफ करण्यांत आली. १९५९-६० मध्यें ज्यांचें वार्षिक उत्पन्न ९०० रु. च्या खालीं आहे अशा लोकांना ह्या नवीन मागासलेल्या वर्गांतील समजण्यांत येऊं लागलें. ह्या उपाययोजनेमुळें साधारणपणें १,८५,००० विद्यार्थ्यांचा फायदा झाला. एकत्रित मुंबई राज्यांमध्ये १९५९-६० मध्यें ह्याकरितां ९३ लाख रु. खर्च करण्यांत आला. महाराष्ट्रामध्यें अशा तऱ्हेनें फायदा झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १,१२,८८४ इतकी होती; आणि त्यांच्यावर एकूण रु. ६२,७६,१९४ इतका खर्च झाला. १९६०-६१ मध्यें उत्पन्नाची ही मर्यादा १,२०० रु. वार्षिक इतकी वाढविण्याचें ठरविलें आहे. जे ९०० रु. किंवा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या गटांत बसत नाहींत अशा बहुसंख्य गरीब लोकांना ह्या उपाययोजनेमुळें फायदा मिळणार आहे. नादारीबाबत मिळालेल्या सवलतीमुळें साधारणपणें ५,४५,००० विद्यार्थ्यांचा फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

**झाडूवाल्यांच्या स्थितीबाबत सुधारणा :-**

झाडूवाल्यांच्या राहणीच्या स्थितीबाबत चौकशी करण्याकरितां मुंबई सरकारनें नियुक्त केलेल्या बर्वे समितीनें, त्यांच्या राहणीमानांत व कामाच्या स्थितींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं एक विशेष अधिकारी नेमावा अशी शिफारस केली. त्यानुसार ह्या खास कामाकरितां सरकारनें एक विशेष अधिकारी नेमला आहे. हा अधिकारी राज्यांतील नगरपालिका, स्थानिक संस्था ह्यांच्या सहकार्यानें झाडूवाल्यांना राहण्याकरितां चांगली जागा उपलब्ध करून देण्याचा व मैला वाहून नेण्याची घाणेरडी प्रथा बंद पाडण्यासाठीं मैला वाहून नेण्यासाठीं ढकलगाड्या व हातगाड्या पुरविण्याचा प्रयत्न करील. राज्य सरकारनें आपल्या अंदाजपत्रकांत झाडूवाल्यांसाठीं घरें बांधण्याची तरतूद आधींच केली आहे आणि केंद्र पुरस्कृत कार्यक्रमानुसार स्थानिक संस्थांना ढकलगाड्या व हातगाड्या पुरविण्यासाठीं भारत सरकार अनुदानें देत आलें आहे.

**बहुउद्देश प्रकल्प :-**

गृह मंत्रालय आणि समाजविकास व सहकार मंत्रालय यांजकडून अनुदानें घेऊन मध्यवर्ती सरकारनें पुरस्कृत केलेल्या कार्यक्रमाप्रमाणें अनुसूचित जमातींचें कल्याण व अनुसूचित विभागांचा विकास यांसाठीं चालू केलेल्या बहुउद्देश प्रकल्पांची चांगली प्रगति होत आहे. हे प्रकल्प १९६०-६१ सालीं सुद्धां तसेंच चालू राहतील.

**मध्यवर्ती सरकारकडून पुरस्कृत केलेल्या आणखी कांहीं योजना :-**

विदर्भ आणि मराठवाडा विभागांतील मागासलेल्या जमातींच्या कल्याणासाठीं भारत सरकारनें १९५९-६० सालांकरितां अधिक अनुदान म्हणून रु. ३ लक्ष मंजूर केलें आणि राज्यांतील अविकसित ग्रामीण विभागांच्या विकासासाठीं रु. १७·४२ लक्ष मंजूर केले. भारत सरकारनें मंजूर केलेल्या पैशांमधून घरें बांधणें, विहिरी खोदणें, दळणवळणाच्या साधनांची सुधारणा करणें, जमिनीचा विकास करणें; बैल, बी-बियाणें व अवजारें, गाड्या आणि दुभतीं जनावरें पुरविणें; जलसिंचनाच्या कामाकरितां विहिरी बांधणें, हीं कामें हातीं घेण्यांत आलीं.

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या जातींना नादारीकरितां मंजूर केलेल्या रु. ५९,६३,८०० या रकमेशिवाय १९६०-६१ सालांकरितां मागासलेल्या जातींच्या कल्याणाकरितां ५७·७५ लक्ष रुपयांची अधिक तरतूद केलेली आहे. मागासलेल्या जातींच्या कल्याणासाठीं ६९·६९ लक्ष रुपयांची तरतूद मध्यवर्ती सरकारनें पुरस्कृत केलेल्या कार्यक्रमाप्रमाणें केलेली आहे.

**इतर वैशिष्ट्यें :-**

राज्याच्या निरनिराळ्या भागांत मागासलेल्या जमातीसाठीं योजिलेल्या विकास कार्यक्रमांतील उरलेल्या योजनांची एकसूत्रीपणें अंमलबजावणी करणें हा चालू वर्षाच्या विकास कार्यक्रमाचा सर्वांत अधिक महत्त्वाचा

विशेष आहे. राज्याच्या फक्त एकाद-दुसऱ्या भागांत अंमलांत येत असलेल्या योजना यापुढें इतर प्रदेशांतहि अंमलांत आणल्या जातील. १९५९-६० मध्यें अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रथमपासूनच शिक्षणासाठीं फी व परीक्षा-फी यांची माफी होती. तीच सवलत १९६०-६१ मध्यें भूतपूर्व-गुन्हेगार जमात, भटक्या व निम-भटक्या जमातीसाठीं चालू ठेवण्याचें ठरविलें आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आंखणीसाठीं मुंबई सरकारनें नेमलेल्या अभ्यासमंडळानें अशी शिफारस केली आहे कीं, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें भूतपूर्व गुन्हेगार जमाती, भटक्या जमाती व निम-भटक्या जमाती ह्या सर्व एका श्रेणीच्या समजल्या जाव्या आणि त्यांच्या कल्याणासाठीं आंखलेला कार्यक्रमहि समान असावा. भूतपूर्व गुन्हेगार जमाती, भटक्या जमाती व निम-भटक्या जमाती ह्या जमातींचे लोक राज्यांत जरी सर्वत्र आढळून येत असले, तरी राज्याच्या पुष्कळशा घटक भागांत त्यांची जमातवार अशी एक समान यादी केलेली नाहीं; त्यामुळें अभ्यास मंडळानें अशी शिफारस केली आहे कीं, अशी यादी तयार करण्यासाठीं तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमधील वेळ मोडला जाऊं नये, त्यासाठीं काळजीपूर्वक पाहणी आतांपासूनच सुरूं करावी. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अगदी सुरवातीलाच अभ्यास मंडळानें केलेल्या शिफारशी अंमलांत आणण्यासाठीं भूतपूर्व गुन्हेगार जमाती, भटक्या जमाती व निम-भटक्या जमाती यांची जमातवार यादी करण्यासाठीं एक विशेषाधिकारी नेमण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

## समाज—कल्याण

समाज कल्याण संचालनालयाच्या समाज कल्याणाच्या बाबतींतील प्रमुख कामामध्यें मुख्यत: पुढील कार्यक्रमाचा अंतर्भाव आहे:—

### (१) बाल-अधिनियमांखालील काम :–

अधिनियमाच्या कक्षेंत बसणाऱ्या मुलांना ठेवण्यासाठीं बालसुधारगृहें व प्रमाणित शाळा उघडणें व त्या चालू ठेवणें ह्या गोष्टी बाल-अधिनियमांच्या अंमलबजावणींत मोडतात. स्वेच्छेनें काम करणाऱ्या व्यक्तींकडून चालविल्या गेलेल्या संस्थानाही बाल-अधिनियमाखालीं मुलांना दाखल करून घेण्यासाठीं मान्यता मिळालेली आहे आणि अशा मुलांच्या भरणपोषणाचा खर्च त्यांना दिला जातो. ह्या कायद्यामध्यें अनाथ, उपेक्षित आणि गुन्ह्याला बळी पडलेल्यांच्या, त्याचप्रमाणें तरुण गुन्हेगारांच्या निवाऱ्याची, संरक्षणाची व त्यावर करावयाच्या उपाययोजनेची तरतूद केलेली आहे. अधिनियमाच्या कक्षेंत बसणाऱ्या मुलांना दाखल करून घेण्यासाठीं मान्यता मिळालेल्या वेगवेगळ्या संस्थांतून सध्यां जवळ जवळ ३५०० मुलें राहत आहेत आणि १९६०-६१ मध्यें ह्या कामासाठीं लागणारा अंदाजी खर्च रुपये २१·१० लाख आहे.

### (२) मुंबईचा भिकाऱ्यासंबंधीच्या अधिनियमाखालील काम :–

मुंबईचा भिकाऱ्यासंबंधीचा अधिनियम ह्या सध्यां फक्त मुंबई शहरालाच लागू आहे; परंतु १९६०-६१ मध्यें तो पुणें शहरालाहि लागू करण्याचें ठरविलें आहे. ह्या अधिनियमाखालीं ताब्यांत घेतलेले भिकारी, भिकारी-गृहामध्यें ठेवले जातात. सध्यां वेगवेगळ्या भिकारी-गृहांमध्यें असलेल्या अशा भिकाऱ्यांची संख्या जवळ जवळ २५०० आहे. ह्या कामासाठीं लागणारा १९६०-६१ मधील अन्दाजी खर्च रुपये १२·८४ लाख आहे.

### (३) अपंगांचें कल्याण :–

आंधळे, बहिरे-मुके आणि पांगळे अशा अपंग व्यक्तींच्या शिक्षणासाठीं हें काम आहे. अपंग व्यक्तींसाठीं सरकार काहीं संस्था चालवितें; त्याचप्रमाणें अपंगांच्या कल्याणासाठीं स्वेच्छेनें काम करणाऱ्या संस्थांना अनुदान-सहाय्य देतें. १९६०-६१ मधील ह्या कामावरचा अन्दाजी खर्च रुपये २ लाख आहे.

## द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या योजना.

द्वितीय पंचवार्षिक योजनेमधील योजनांसाठीं २२·३८ लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. जुन्या योजना चालू ठेवणें, त्याचप्रमाणें १९६०-६१ मध्यें नवीन योजनांची सुरवात करणें यांचाहि ह्या तरतूदीमध्यें समावेश होतो. गेल्या चार वर्षांतील ह्या योजनांची प्रगति वाढत्या प्रमाणांत समाधानकारक आहे आणि प्रत्येक वर्षी नवीन योजनांचा त्यामध्यें समावेश केला जात आहे. १९६०-६१ साठीं असलेल्या महत्त्वाच्या नवीन योजनांचें पुढें थोडक्यांत वर्णन केले आहे:—

**(१) प्रमाणित शाळेंतून बाहेर पडलेल्या मुलांना कर्ज व अर्थसहाय्य (तरतूद रु. १०,४००) :—**

ही योजना शिक्षण संस्थेतून बाहेर पडलेल्या मुलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठीं आणि त्यांच्या उदरनिर्वाहाचें साधन उपलब्ध होण्यासाठी आर्थिक सहाय्य देते. संस्थेतून बाहेर पडलेल्या लोकांचे पुनर्वसन व्हावें यासाठीं ही नवीन उपाययोजना आहे.

**(२) लहान मुलांसाठीं सुट्टींतील शिबिरें (रु. १७,६७०):—**

ह्या योजनेद्वारें शिक्षण संस्थेतील, प्रामुख्यानें प्रमाणित शाळेंतील मुलांसाठीं सुट्टीतील शिबिरें उघडली जातात. प्रमाणित शाळेतील पुष्कळशा मुलांना सुट्टींत जाण्यासाठीं योग्य अशी स्वतःची घरें नसतात; त्यांना संस्थेतील वातावरणापासून बदल घडण्याची जरूरी असते. ही योजना अशा मुलांसाठीं सुट्टींतील शिबिरें उघडण्याची व्यवस्था करते. महाबळेश्वर येथें एक व अमरावती जिल्ह्यांतील चिखलदरा येथें दुसरें अशीं दोन सुट्टींतील शिबिरें उघडण्यांत आलीं आहेत.

**(३) नोकऱ्या करणाऱ्या स्त्रियांसाठीं वसतिगृहें (तरतूद २२,८०० रुपये) :—**

मुंबई सारख्या मोठ्या शहरांत ज्यांना आपल्या उपजीविकेचें साधन उपलब्ध आहे, पण ज्यांना रहावयास जागा नाहीं अशा पुष्कळ स्त्रिया असतात. रहावयास योग्य अशी जागा नसल्यामुळें त्यांना फार हालअपेष्टा भोगावयास लागतात आणि कधीं कधीं तर त्यांच्यावर शारीरिक व नैतिक आपत्ति येतात. ह्या योजनेप्रमाणें सुरू होणाऱ्या वसतिगृहामुळें नोकऱ्या करणाऱ्या स्त्रियांना आवश्यक असणाऱ्या सोयी उपलब्ध होतील.

**(४) मराठवाड्यांत अपंगासाठीं एक संस्था उघडणें (तरतूद रु. १५,००० ):—**

मराठवाड्यांत आंधळे, बहिरे व मुके यांना शिक्षण देणारी सरकारी संस्था नाहीं. या योजनेप्रमाणें अशा लोकांसाठीं मराठवाडा विभागांत एक संस्था उघडली जाण्याची तरतूद होईल.

**(५) मुके, बहिरे व पंगु अशा लोकांसाठीं सरकारी आश्रयाखालील कारखान्याची स्थापना (तरतूद रु. ३३,५०० ) :—**

ह्या योजनेनुसार मुक्या, बहिऱ्या व अपंग लोकांसाठीं खास कारखानें उघडण्यांत येतील. या कारखान्यांत अपंग लोकांना योग्य अशा सोयी उपलब्ध करून त्यांना योग्य ते व्यवसाय व कला शिकण्याचीं व्यवस्था केली जाईल व त्यांना उपजीविकेचें साधन उपलब्ध होईल असा व्यवसाय करण्यासाठीं शिक्षण दिलें जाईल.

# उद्योग व कामगार विभाग

## (ए) उद्योग विभाग

(एक) योग्य तो सल्ला आणि मदत देऊन, राज्यांत नवे उद्योगधंदे सुरू करण्यास उत्तेजन देणें हें उद्योग विभागाचें प्रमुख कार्य आहे. ह्या विभागाच्या सध्यांच्या कार्यक्रमांचे स्थूल मानानें दोन भागांत वर्गीकरण करतां येईल तें असें— (१) द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील योजनांची अंमलबजावणी, आणि (२) सामान्य दैनंदिन कार्यक्रम पार पाडणें. पहिल्या वर्गवारींतील ह्या विभागाच्या महत्त्वाच्या योजना पुढीलप्रमाणें आहेतः— (१) औद्योगिक वसाहतींची स्थापना, (२) लहान प्रमाणावरील उद्योगधंदे व कुटीरोद्योग यांना आर्थिक साहाय्य, (३) औद्योगिक संशोधनाच्या प्रयोगशाळांची स्थापना, (४) औद्योगिक संशोधनाकरितां आर्थिक साहाय्य. ह्या विभागाच्या दैनंदिन कार्यक्रमांत पुढील गोष्टींचा समावेश होतोः— (१) उद्योग (विनियमन व विकास) अधिनियमान्वयें, राज्यांत उद्योगधंदे सुरू करण्यासाठीं भारत सरकारकडे केलेल्या अर्जांची शिफारस करणें, (२) वजनें व मापें याबाबतच्या अधिनियमाची अंमलबजावणी करणें आणि दशमान पद्धतीचा प्रारंभ करण्याबाबतचें काम करणें, (३) मुंबईचा इमारतीबाबत (उभारण्याबाबत नियंत्रण) अधिनियम, १९४८, या अन्वयें, उद्योगधंद्यासंबंधींचें काम करणें, (४) मध्यवर्ति भांडार खरेदी संघटना, (५) आयात करणाऱ्या लायसेन्सधारींना आवश्यक तीं प्रमाणपत्रें देणें, (६) लोखंड व पोलाद ह्यांसारख्या नियंत्रित वस्तूंच्या सांठ्याचें वांटप करणें, (७) मुंबई गॅस पुरवठा अधिनियमान्वयें गॅस पुरवठा करण्यासंबंधींचें काम.

(दोन) उद्योग (विकास आणि विनियमन) अधिनियम, १९५१ ह्या अन्वयें लायसेन्सें देण्यासाठीं भारत सरकारकडे अनेक अर्जांची शिफारस करण्यांत आली. १९५९-६० मध्यें महाराष्ट्रांतील औद्योगिक उपक्रमांना दिलेल्या परवान्यांची संख्या ३२४ इतकी असून ह्यांपैकीं १०४ लायसेन्सें नवीन औद्योगिक उपक्रमांच्या स्थापनेसाठीं, ९२ लायसेन्सें सध्यांच्या औद्योगिक उपक्रमांची पुरेशी मोठ्या प्रमाणांत वाढ करण्यासाठीं आणि १२८ लायसेन्सें सध्यांच्या औद्योगिक उपक्रमांतून नवीन वस्तूंचें उत्पादन करण्यासाठीं दिलेली आहेत.

(तीन) राज्याच्या औद्योगीकरणासाठीं मास्टरप्लान तयार करण्याचें उल्लेखनीय कार्य १९५९-६० मध्यें करण्यांत आलें.

(चार) राज्यांत औद्योगिक वसाहती स्थापन करण्यासाठीं रु. ४५·७७ लाख इतक्या रकमेची तरतूद योजनेंत केलेली आहे. लहान औद्योगिक संस्थांच्या स्थापनेसाठीं निवडलेल्या जागांची सुधारणा करणें आणि तेथें उद्योगधंदे सुरू करण्यासाठीं लोक तयार व्हावे म्हणून वीज, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्ते, कारखान्यांसाठीं शेडस् वगैरे सोयींची तरतूद करणें हा योजनेचा उद्देश आहे. ११ वसाहतींचा विकास करण्याचें उद्दिष्ट असून त्यांपैकीं (१) कराड, (२) नागपूर, (३) अमरावती, (४) अटाळें, (५) मालेगांव व (६) परळी-वैजनाथ येथील वसाहतींचा विकास परस्पर सरकारकडून करण्यांत येईल. उरलेल्या (१) बाप्टी रोड [मुंबई], (२) कुर्ला, (३) कोल्हापूर, (४) हडपसर, आणि (५) नांदेड येथील वसाहती स्थानिक स्वराज्य आणि सहकारी संस्था यांसारख्या इतर एजन्सीमार्फत संघटित केल्या जात आहेत. कांहीं वसाहतींनीं केलेल्या प्रगतीचा आढावा पुढीलप्रमाणें आहेः—

(१) कऱ्हाड :—१२ एकर जमीन संपादन केलेली आहे. एक विद्युत्-गृह बांधण्यांत आलें असून विद्युत् शक्ति निर्माण करणारा यंत्रसंच उभारण्यांत आला आहे. प्रत्येकीं ८ छपऱ्या असलेले दोन गट जवळ जवळ तयार आहेत. प्रत्येकीं १२ छपऱ्या असलेल्या दोन गटांचें बांधकाम चालू आहे. ह्या योजनेवर आतांपर्यंत रु. १·८० लक्ष इतकी रक्कम खर्च करण्यांत आली आहे.

(२) **नागपूर**:—जवळ जवळ २२ एकर जमीन संपादन करण्यांत आली असुन २८ शेडस् बांधण्याचें योजिलें आहे. काम चालू आहे. जोड रस्त्यावरील उंच पातळीवरचा पुल जवळ जवळ पूर्ण होत आला आहे. आतांपर्यंत १·४१ लक्ष रुपये खर्च करण्यांत आले आहेत.

(३) **अमरावती** :— जवळ जवळ ३१ एकर जमीन संपादन केली असून बांधकाम नुकतेंच सुरू झाले आहे. ४८ छपऱ्या बांधण्याचें योजिलें आहे.

(४) **अटाळें** (कल्याणनजीक) :— जवळ जवळ २,५०० एकर जमिनीचे भाग (प्लॉट) पाडून त्या प्रदेशाचा विकास करून तेथें औद्योगिक वसाहती स्थापन करणें व ते प्लॉट महत्त्वाच्या रासायनिक उद्योगधंद्यांना विकणें हा मूळ उद्देश होता, त्यानंतर ह्या प्रदेशाचा औद्योगिक प्रदेश म्हणून विकास करावयाचा आणि सल्लागार सर्व्हेयरनें तयार केलेल्या व जवळ जवळ पूर्ण होत आलेल्या विकास योजनेनुसार तो प्रदेश खाजगी संस्थांना खुला ठेवावयाचा असें ठरविण्यांत आलें आहे. ह्या ठिकाणाऐवजीं कल्याण-भिवंडी रस्त्याजवळील प्रदेशांत औद्योगिक वसाहत स्थापन करण्याचें योजिलें आहे.

(५) **परळी-वैजनाथ** :— ३० छपऱ्या बांधण्यासाठीं १३ एकर जमीन संपादित करण्याचें योजिलें आहे. भारत सरकारकडून प्रशासकीय मान्यता मिळाली असून भूमिसंपादनाचीं कामें चालू आहेत.

(६) **कुर्ला** :— सहकारी एजन्सीमार्फत येथील वसाहतीचा विकास करण्यांत येत आहे. छपऱ्या बांधण्यासाठीं जवळ जवळ १० एकर जमीन संपादित केली आहे. कारखान्यांसाठीं १७ छपऱ्या बांधण्याचें काम चालू आहे. आतांपर्यंत रु. ८ लक्ष इतकी रकम संस्थेला आगाऊ देण्यांत आली आहे.

(७) **हडपसर** :— हडपसर येथील औद्योगिक वसाहतीचा विकास करण्याचें काम पुणें महापालिका पहात आहे. भूमिसंपादनाचें काम झालें आहे. विकसित केलेल्या जमिनींच्या ५५ तुकड्यांपैकीं (प्लॉट) ४७ विकले गेले आहेत. जवळजवळ ३०० कामगारांना रोजगार देणारे ४ कारखाने स्थापन केले आहेत. ४ कारखान्यांच्या छपऱ्या बांधण्याचें काम चालू आहे. याकरितां पुणें महापालिकेला रु. ६ लाखांचें कर्ज देण्यांत आलें आहे.

(८) **कोल्हापूर** :— येथील औद्योगिक वसाहत सहकारी संस्थेकडून स्थापन केली जात आहे. ६० छपऱ्यांसाठीं ४२ एकर जमीन संपादित केली आहे. २७ कारखान्यांच्या छपऱ्या बांधून तयार झाल्या आहेत व त्यांतील २४ छपऱ्या वापरावयास सुरवात झाली आहे. ११२ पेक्षां जास्त कामगारांना रोजगार देणारे १८ कारखाने सुरू झालें आहेत. आतांपर्यंत संस्थेला ६·७६ लाख रुपयांचें कर्ज दिलें आहे.

(९) **नांदेड** :— जमीन संपादित केली आहे. रस्त्यांचें बांधकाम चालू आहे. ह्या वसाहतीचा विकास करण्याचें काम नांदेड नगरपालिका करीत आहे. नगरपालिकेला २ लाख रुपयांचें कर्ज दिलें आहे.

### (पांच) आर्थिक सहाय्य देण्याची योजना:—

छोटे उद्योगधंदे व कुटीर उद्योग यांचा विकास व्हावा म्हणून सन १९३५ च्या छोटे उद्योगधंदे व कुटीरोद्योग यांना राज्य साहाय्य देण्याच्या नियमानुसार उद्योग व कुटीरोद्योग विभागाकडून संस्थांना १०,००० रुपयांपर्यंतचीं कर्जे देण्यांत येतात.

गेल्या चार वर्षांत रु. ३९·८६ लक्ष इतक्या रकमेचीं कर्जे देण्यांत आलीं असून १९६०-६१ मध्यें रु. १६ लक्ष इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

रु. १०,००० हून अधिक व रु. ७५,००० पर्यंतच्या (अपवादात्मक बाबतींत रु. १ लाख पर्यंत) रकमेच्या कर्जांकरितां करण्यांत आलेल्या अर्जांचा मुंबई राज्य आर्थिक कॉर्पोरेशनकडून एजन्सी व्यवस्थेखालीं विचार केला जातो. ह्या एजन्सी व्यवस्थांची सरकारनें ऑक्टोबर १९५९ मध्यें सुधारणा केली आहे.

१९५९-६० या वर्षांत रु. ३६,१२,५०० एवढ्या रकमेसाठीं करण्यांत आलेले ८९ अर्ज कार्पोरेशननें मंजूर केले आणि रु. ६·२९ लाख इतकी रक्कम त्या काळांत वितरित करण्यांत आली. केंद्रीय साहाय्याच्या कारणांसाठीं भारत सरकारनें कांहीं महिन्यांपूर्वीच लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांची व्याख्या बदलली आहे. तेव्हापासून राज्यानें त्या सुधारणेचा स्वीकार केला असून साहाय्य देण्याच्या पद्धतींत त्या अनुकूल बदल केला आहे. असें केल्यानें फक्त रुपये २५,००० पर्यंतच्या कर्जासाठी व्याजाचे सवलतीचे दर ठेवण्याबाबतचा केंद्र सरकारचा निर्णय मानला जाईल. ग्रामोद्योग चालण्यासाठी स्वतंत्र कारागीर, हस्तव्यवसाय करणारे इसम सुशिक्षित बेकार, आणि मागासलेल्या वर्गांतील कारागीर यांनाहि आर्थिक मदत देण्यांत येते. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या ४ वर्षांत देण्यांत आलेल्या आर्थिक साहाय्याचा तपशील खालीलप्रमाणें आहे.—

| | साहाय्य केलेल्या संस्थांची संख्या | दिलेलें सहाय्य रुपये |
|---|---|---|
| (एक) विभागाच्या सर्वसाधारण योजना खाली. | ६९० | ४,९५,४३० |
| (दोन) स्वतंत्र कारागीर आणि सहकारी संस्था यांना हत्यारें व साधनें देण्याकरितां अर्थसाहाय्य म्हणून. | ३२८ | ३४,५६,९२२ |

(सहा) माटुंगा येथील औद्योगिक संशोधन प्रयोगशाळेमध्यें एक चांचणी-गृह बांधण्यासाठीं पंचवार्षिक योजनेमध्यें १·१८ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. चांचणी-गृहाची स्थापना करण्यांत आली असून ०·१६ लाख रुपयांची साधनसामग्री विकत घेतली आहे. प्रयोगशाळेमध्यें खनिजद्रव्यें, रसायनें, गळिताचीं धान्यें, पेंड, टरफलें, जळण, इत्यादींबाबतची चांचणी करण्याचें व परीक्षणोत्तर दाखले देण्याचें काम सुरू करण्यांत आलें आहे. कुर्ला येथील एकाद्या नव्या इमारतींत हें चांचणी-गृह हलविण्याचें योजिलें आहे. जमीन ताब्यांत घेण्याबाबतचें काम हातीं घेण्यांत आलें असून नकाशे व अंदाज तयार केले जात आहेत.

पुणें येथें रसायनशास्त्र प्रयोगशाळा स्थापन करण्यांत येत असून १·८५ लाख रुपये खर्च करून एक इमारत बांधण्यांत आली आहे. ०·१४ लाख रु. ची साधनसामग्री खरेदी करण्यांत आली आहे. नोकरवर्गाच्या नेमणुकीस मंजुरी देण्यांत येऊन त्यांची नेमणूक केली जात आहे. १९६०–६१ करतां ०·९८ लाख रु. ची तरतूद करण्यांत आली आहे.

(सात) औद्योगिक संशोधन-कार्य हातीं घेण्यासाठीं विभागाकडून अनुदानें देण्यांत येतात. आतापर्यंत २·०४ लाख रु. चीं अनुदानें देण्यांत आलीं असून १९६०–६१ मध्यें ०·९० लाखांची तरतूद करण्याचें योजिलें आहे. हीं अनुदानें सल्लागार समितीनें केलेल्या शिफारशीनुसार व मार्गदर्शी यंत्रसंच योजनांच्या बाबतींत तज्ञांच्या सल्लागार मंडळाच्या शिफारशीवरून देण्यांत येतात.

विदर्भात खनिज, लोखंड आणि कोळसा उपलब्ध असलेल्या प्रदेशांत कच्चें लोखंड तयार करण्याच्या शक्यतेसंबधींचा अभ्यास करण्यासाठीं सरकारच्या सूचनेवरून राष्ट्रीय धातुसंशोधन प्रयोगशाळा मार्गदर्शी प्रयोग करीत आहे. ह्या चांचणीसाठीं लागणारा कच्चा माल सरकारनें पुरवला असून या चांचणीचा निष्कर्ष काय निघतो हें पहावयाचें आहे.

(आठ) नाशिक येथील सध्यां अस्तित्वांत असलेल्या दारू गाळण्याच्या भट्टीऐवजीं अहमदनगर जिल्ह्यामध्यें चितळी येथें दरवर्षी २·७ दशलक्ष गॅलन दारू गाळतां येऊं शकेल अशी भट्टी उभारण्यांत येत आहे. दारुभट्टीच्या इमारतीचें व नोकरवर्गाच्या निवासस्थानाचें बांधकाम पूर्ण झालें असून यंत्रसामुग्री उभारण्यांत येत आहे. विद्युत् उत्पादक यंत्रसामग्री उभारण्यांत आली आहे. पाणीपुरवठ्यासाठीं नळ टाकण्यांत आले आहेत. सन १९६०–६१ करितां ३८·६८ लाख रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्याचें योजिलें आहे.

## कुटीर उद्योग विभाग

**(एक)** लहान प्रमाणावरील उद्योगधंदे व कुटीर उद्योग यांना या देशाच्या अर्थ व्यवस्थेंत फार महत्त्वाचें स्थान आहे. हे उद्योगधंदे सहकारी तत्त्वावर चालविले जावेत, यासाठीं त्यांना उत्तेजन देण्याचें भारत सरकारचें धोरण आहे. कारागिरांना सुधारलेलीं अवजारें व हत्यारें वापण्याबद्दल प्रशिक्षण देणें, कुटीर उद्योगांबाबत संशोधन करणें, औद्योगिक सहकारी संस्थांची प्राथमिक, जिल्हानिहाय व राज्य पातळीवर स्थापना करणें आणि खादी व ग्रामोद्योग मंडळांसारख्या संस्थांना त्यांच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठीं उत्तेजन देणें, हीं या विभागांचीं प्रमुख कार्ये होत. सरकारी मदतीनें तांत्रिक शाळा चालवून व उत्पादन केंद्रें चालू करून, मागासलेले वर्ग, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या लोकांना तांत्रिक शिक्षण देऊन त्यांच्या उन्नतीच्या कार्यांतहि या विभागानें सक्रीय भाग घेतला आहे.

**(दोन)** कुटीर उद्योगाच्या योजना खालील गटांत विभागण्यांत आल्या आहेतः

| | १९६०-६१ च्या अंदाज पत्रकांतील तरतूद ( रुपये लाखांत ) |
|---|---|
| (१) लहान प्रमाणावरील उद्योगधंदे. | ३२·११ |
| (२) हस्तव्यवसाय. | १·९६ |
| (३) काथ्याचा उद्योग. | ०·१४ |
| (४) रेशीम व रेशमाचें उत्पादन. | ०·५७ |
| (५) खादी आणि ग्रामोद्योग योजना. | ५·४९ |
| | ४०·०७ |

**(तीन)** पहिल्या गटांत [औद्योगिक सहकाराच्या योजना धरून] ७८ योजना आहेत. त्यांपैकीं कांहीं अधिक महत्त्वाच्या योजना खालीलप्रमाणें आहेतः—

( अ ) या गटांत १३ योजना आहेत. ह्यांपैकीं कांहीं योजनांनुसार लहान प्रमाणांवरील उद्योग व कुटीर उद्योग यांतील उत्पादन तंत्र सुधारण्यासाठीं पुणे येथें या विभागाकडून स्थापिलेल्या संशोधन संस्थेंत संशोधनाचें व प्रयोगाचें काम हातीं घेण्यांत येतें. या कार्यांतून निघणारे उपयुक्त निष्कर्ष कारागिरांना व सहकारी संस्थांना प्रत्यक्षांत आणण्यासाठीं कळविले जातात. ह्या संस्थेनें आतापर्यंत निरनिराळ्या बाबतींत प्रयोगासाठीं ५० यंत्रें तयार केलीं किंवा त्यांच्यांत सुधारणा केल्या. त्यांपैकीं कांहीं बाबी म्हणजे तेलापासून साबण तयार करणें, प्लास्टर ऑफ पॅरीस, शाळेंत लागणारे खडू, पेन्सिली कार्बन पेपर, मेणबत्त्या, प्रतिकृति तयार करण्याचें सामान, बूट पॉलिश तयार करणें व तंतूवरील प्रक्रिया ह्या होतः—

योजनेच्या उरलेल्या कालावधींत खालील बाबी हातीं घेण्याचें योजिलें आहे.

( अ ) कागदाच्या लगद्यापासून वस्तु तयार करणें.

( ब ) लांकडावर लाखेचें काम करणें.

( क ) लांकडापासून मद्यार्क गाळण्यासाठीं प्रारंभिक यंत्रसंच.

( ड ) पेंडेपासून तेल मिळविणें.

( इ ) प्रसाधनोपयोगी साबण तयार करणें.

( फ ) रंग व मिश्र रंग तयार करण्यासाठीं रंगीत मातीचा उपयोग करणें.

( ग ) शिशाच्या पेन्सिली तयार करण्यासाठीं अमेरिकन देवदार लांकडाऐवजीं योग्य देशी लांकूड वापरणें.

नागपूर येथील मध्यवर्ति कापड संस्थेमध्यें आणि औद्योगिक संस्थेमध्यें जिज्ञासू कारागिरांना कापड विणणें, रंगाई, ब्लीचिंग, शिवणकाम, सुतारकाम, लोहारकाम इत्यादि विषयांचें प्रशिक्षण दिलें जातें.

(ब) **प्रशिक्षण-उत्पादन केंद्रें :–**

निरनिराळया उद्योगधंद्यासाठीं अशीं एकूण २१ केन्द्रें आहेत. या केन्द्रांमध्यें विद्यावेतनें देऊन कापड विणणें, लोहारकाम, कांचेचीं खेळणीं बनवणें, सुतारकाम, कुलपें व विजेऱ्यांचे बल्ब बनविणें, शिवणकाम, इत्यादि विषयांचें प्रशिक्षण दिलें जातें. पाठ्यक्रम एक महिना ते दोन वर्षांपर्यंतचे असतात. पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या ४ वर्षांत ५३४ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यांत आलें आहे. या केन्द्रांची कार्यक्षमता पूर्णपणें उपयोगांत आणली जात असल्यामुळें ३२५ विद्यार्थी ह्या योजनेचा फायदा घेतील अशी अपेक्षा आहे. प्रशिक्षार्थ्यांना त्यांनीं प्रशिक्षण घेतलेल्या धंद्यामध्यें त्यांचा जम बसावा म्हणून कुटीर उद्योग आणि औद्योगिक सहकारी संस्था विभागाकडून शक्य तें आर्थिक व संघटनात्मक सहाय्य दिलें जात आहे.

(क) **उत्पादन केन्द्रें :–**

जेथें केवळ उत्पादनच करण्यांत येतें अशीं हीं १५ केन्द्रें आहेत. ह्यामध्यें ज्यांनी अगोदरच प्रशिक्षण घेतलें आहे अशा लोकांकडून जेथें उत्पादनकार्य हातीं घेतलें जातें अशा केन्द्रांचा अंतर्भाव होतो. बाकीचीं केन्द्रें केवळ उत्पादनासाठींच चालविलीं जातात. कांचेचें सामान, सुतारकाम, लोहारकाम, लोकरीचें विणकाम, छत्र्या तयार करणें हें उद्योग या केन्द्रांतून चालविले जातात. या केन्द्रांमध्यें सध्यां महिनेवारीनें किं रोजदारीनें काम करणारे असे १३१ कामगार काम करीत आहेत.

**(चार)** हस्तव्यवसायाच्या एकूण २४ योजना आहेत. या गटांत येणाऱ्या कांहीं महत्त्वाच्या हस्तव्यवसाय योजनानुसार तयार होणाऱ्या मालाच्या क्रयविक्रयाबाबतची प्रगति पुढें दिल्याप्रमाणें आहे :–

सिताबर्डी, नागपूर व औरंगाबाद येथें वस्तुभांडारें चालू करण्यांत आलीं आहेत. हातमागासहित इतर तयार मालाचा क्रयविक्रय करण्याचें काम ह्या वस्तुभांडारांतून फारच चांगल्या प्रकारें चाललें आहे.

**(पांच)** काथ्यापासून वस्तु तयार करण्यासंबंधींच्या तिसऱ्या गटांत शाळा स्थापन करणें, संस्थांना कर्जे देणें, आणि काथ्याच्या वस्तूंच्या विक्रीवर वटाव देणें, तसेंच काथ्याच्या मालाचे नमुने खरेदी करणें व त्यांचा पुरवठा करणें ह्या गोष्टींचा अंतर्भाव होतो. ठाणें जिल्ह्यामध्यें एक शाळा उघडण्यांत येऊन तेथें १४ विद्यार्थ्यांना यापूर्वीच प्रशिक्षण देण्यांत आलें आहे. आतांपर्यंत काथ्याच्या उद्योगाच्या २ संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत.

**(सहा)** चांदा जिल्ह्यामध्यें रेशीम व रेशमाच्या किड्यांची जोपासना या क्षेत्रांत टसर जातीच्या रेशमाचा विकास करण्याचें काम चालू आहे. या योजनेसाठीं मध्यवर्ति रेशीम मंडळामार्फत केंद्र सरकारकडून सहाय्य मिळतें. नाशिक येथील ग्राम-राज्य संस्थेस रेशमाच्या किड्यांची जोपासना करण्याबाबतचें एक प्रशिक्षण व प्रात्यक्षिक केंद्र चालविण्यासाठीं आर्थिक सहाय्य दिलें जात आहे.

**(सात)** आतांपर्यंत खादी व ग्रामोद्योग योजनांची अम्मलबजावणी, मुम्बई ग्रामोद्योग मंडळ व सौराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळ यामार्फत होत असे; परंतु विदर्भ आणि मराठवाडा हे प्रदेश सदरहू मुम्बई मंडळाच्या कार्यकक्षेंत येत नसल्यामुळें तेथील काम कुटीर उद्योग व औद्योगिक सहकारी संस्था यांच्या विभागाकडून हातीं घेतलें जातें. दि. २६ फेब्रुवारी १९६० रोजीं एका वटहुकमान्वयें उपरिनिर्दिष्ट दोन्ही मंडळांचें विसर्जन करण्यांत आलें. त्यानंतर पूर्वीच्या मुंबई सरकारनें २७ फेब्रुवारी १९६० रोजीं एक अधिसूचना काढून खादी व ग्रामोद्योग मंडळ ( मुंबई, पुणें आणि पूर्व खानदेश ) आणि खादी व ग्रामोद्योग मंडळ ( अहमदाबाद, राजकोट आणि कच्छ ) अशीं दोन वेगळीं मंडळें स्थापन केलीं. राज्यमंडळाकडून

अंमलांत यावयाच्या योजनांतर्गत योजनांसाठीं सन १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत ३·७४ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. त्याबरोबरच योजनेतर योजनांसाठीं सन १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत आणखी ५·३३ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. खादी आणि ग्रामोद्योग कमिशनकडून राज्य-मंडळाला कमिशनच्या अधिकारक्षेत्राखालीं येणाऱ्या योजनांच्या अम्मलबजावणीसाठीं देखील आर्थिक सहाय्य मिळतें.

### (एक) विद्युत् शक्तीचा विकासः--

राज्यांत विद्युत् शक्ति निर्माण करणें, ती वाहून नेणें व तिचें वांटप करणें ह्या कामांचा समन्वित विकास करण्याचें काम राज्य विद्युत् मंडळाकडे आहे. सरकारनें नुकतेंच महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ स्थापन केलें आहे. या मंडळाकडून अंमलांत आणलेले विद्युत् विषयक प्रकल्प पुढीलप्रमाणें आहेत.

(१) कोयना सोलापूर योजना (योजना क्र. २६०).

(२) नोकऱ्या मिळण्याबाबतच्या संधीमध्यें वाढ करण्यासाठीं २९२ कोटी रुपये कर्जाऊ देण्याची योजना (योजना क्र. ३४९).

(३) विदर्भांतील दक्षिण ग्रिडचा विकास (योजना क्र. ३६२).

(४) विदर्भांतील ग्रामीण प्रदेशांत वीज पुरवण्याची योजना (योजना क्र. ३६५).

(५) मराठवाड्यांतील ग्रामीण प्रदेशांत वीज पुरवण्याची योजना (योजना क्र. ३६६).

(६) नांदेड–परभणी योजना (योजना क्र. ३६७).

(७) चोला विद्युत केंद्राच्या विक्रीच्या उत्पन्नांतून आर्थिक साहाय्य द्यावयाच्या योजना.

(८) ग्रामीण प्रदेशांस वीज पुरवण्याबाबतच्या जादा योजना व संकीर्ण योजना.

१९५९-६० मध्यें शेवटच्या, म्हणजे, ग्रामीण प्रदेशांत अधिक विजेचा पुरवठा करण्याच्या योजनेस पंचवार्षिक योजनेंतील द्रव्यबळाची फेरवांटणी करून मंजुरी देण्यांत आली.

### (दोन) कोयना-सोलापूर योजनाः—

परदेशी चलन उपलब्ध नसल्यामुळें कोयना-सोलापूर योजनेचें काम सुरू होण्यास विलंब लागला. आय. बी. आर. डी. शीं. कर्जाबाबत तडजोड केल्यापासून ही अडचण दूर झाली आहे.

पोफळी ते कऱ्हाड या रस्त्यावर २२० किलोवॅटची लाईन व कऱ्हाड-सातारा आणि कऱ्हाड-विक्रमबाग रस्त्यांवर ११० किलोवॅटसची लाईन घालण्याचें काम हातीं घेण्यांत येईल. १९६१-६२ मध्यें पहिला संच येईपर्यंत हें काम पुरें व्हावें अशा रीतीनें या प्रत्यक्ष कामाची आंखणी करावयाची आहे. गडहिंग्लज ते नीरा या प्रदेशांत भाटनगर ते वाई व पांचगणीपर्यंत ३३ किलोवॅटची लाईन घालण्याचें काम पूर्ण करण्याचे योजिलें आहे.

### (तीन) नोकऱ्या मिळण्याबाबतची संधी वाढविण्याची योजना :–

नोकऱ्या मिळण्याबाबतच्या संधीमध्यें वाढ करण्याची योजना म्हणजे अकलूज शहरांत विद्युतीकरण करणें होय. या वर्षी ह्या ठिकाणी डिझेलचें विद्युत्-गृह उभारण्यांत येईल.

### (चार) दक्षिण ग्रीडचा विकास :–

१९६०–६२ मध्यें विदर्भांतील दक्षिण ग्रीडच्या विकासाबाबतच्या योजनेची सर्व प्रमुख उद्दिष्टें जवळजवळ पूर्ण होतील मे १९६० मध्यें टरबोआल्टरनेटचा जादा संच खापरखेडा येथें उभारण्यांत आला आणि डिसेंबर १९६० मध्यें पारस (आकोल्याजवळ) येथें ३० एम. डब्ल्यू. विद्युत् केन्द्र उभारण्यांत येईल असा अंदाज आहे. दुसरें अमरावती ते पारसपर्यंतचे ६६ किलोवॅट सर्किट पुरें करण्यांत आलें आहे.

**(पांच) नांदेड-परभणी योजना :—**

१९६०-६१ मध्यें नांदेड येथें नवीन डिझेल विद्युत्-गृह सुरू करण्यांत येईल. परभणीच्या (१९५९-६० मध्यें उभारलेल्या) विद्युत्-गृहांतील डिझेलवरील बाकीच्या विद्युत् उत्पादन संचांचीहि उभारणी करण्यांत येईल. परभणी ते पूर्णापर्यंतचें ११ किलोवॅटचा विद्युत् मार्ग पूर्ण करण्यांत येऊन पूर्णा शहराला विजेचा पुरवठा करण्यांत येईल.

**(सहा) ग्रामीण प्रदेशाचें विद्युतीकरण :—**

मंडळाच्या ग्रामीण प्रदेशाच्या विद्युतीकरणाच्या कार्यक्रमांत योजनांतर्गत व योजनेतर योजनांचा समावेश होतो. योजना क्र. ३६५ व ३६६ ह्या योजनांतर्गत योजना आहेत. १९५९-६० मधील योजनांतर्गत योजनेच्या खर्चावरील मंडळास उपलब्ध असलेल्या निधींतून मंडळानें हातीं घेतलेल्या योजना ह्या योजनेत्तर योजना आहेत. ह्या विविध कार्यक्रमानुसार, १९६०-६१ मध्यें, एकूण ११३ खेडेगांवांना वीजपुरवठा करण्याचें योजिलें आहे. ह्यामध्ये मराठवाड्यांत १३ ठिकाणीं डिझेलचे संच उभारण्याच्या बाबींचा सामावेश होतो. सात संच अगोदरच मागविले आहेत.

**(सात) चोल विद्युत्-गृहाच्या विक्रीच्या उत्पन्नामधून अर्थसहाय्य मिळावयाच्या योजना :—**

(अ) कोल्हापूर-विश्रामबाग प्रदेशांतील विद्युत् यंत्रसंचाची क्षमता वाढवणें आणि सांगली-मिरज प्रदेशांतील १० खेड्यांना व आठ एल. आय. संस्थांना विद्युत् पुरवठा करणें. विश्रामबाग विद्युत्-गृह येथें बाकीचे डिझेलचे संच उभारणें आणि १९६०-६१ मध्यें १० खेड्यांना व आठ एल. आय. संस्थांना विद्युत् पुरवठा करणें.

(ब) नवीन डिझेल विद्युत् गृहांतून कऱ्हाड औद्योगिक वसाहतीस लवकरच विद्युत् पुरवठा करण्यांत येईल. ह्या जागेवर विद्युत् उत्पादन संच उभारण्यांत येतील.

(क) चालू वर्षी, पाहणी व साधनसामग्री संपादन याबाबतचें कुलाबा विद्युतीकरण योजनेचें काम चालू करण्यांत येईल.

(ड) जवाहर, वाई, जंजिरा, धवरगांव व चोपडा येथें जादा डिझेलचे संच बसविण्याचें काम जवळजवळ पुरें करण्यांत येईल.

**(८) विदर्भातील यंत्रसिंचन योजना:—**

भूतपूर्व मध्यप्रदेश सरकारनें, " अधिक धान्य पिकवा " मोहिमेचा एक भाग म्हणून ही योजनेतर योजना हातीं घेतली, परंतु ती आता योजनेंत समाविष्ट करण्यांत आली आहे. प्रथमतः सुरुवातीस समाज विकास गटांस लागू असलेली ही योजना आतां सबंध विदर्भ प्रदेशांत विस्तारित करण्यांत आली आहे. ह्या योजनेनुसार यांत्रिक जलसिंचनासाठीं पाणी काढण्यास शेतकऱ्यांना विजेची कनेक्शन्स दिलीं जातात. याबाबतच्या अटींची फेरतपासणी करण्यांत आली आहे. आतां ग्राहकांनीं हमीदाखल द्यावयाची कमींतकमी रक्कम प्रतिवर्षी रु. २०० ही होय. भांडवलावर १५ टक्के स्थूल उत्पन्न मिळेल अशी मंडळाची अपेक्षा आहे. मंडळास अर्थसहाय्य म्हणून २०० रुपये व १५ टक्के उत्पन्न यामधील फरक हा सरकारनें सोसावयाचा आहे.

विविध तऱ्हेच्या विद्युत् योजनांवर मंडळानें खर्च करावयाच्या बाबतींचीं दोन विवरण-पत्रकें सोबत जोडण्यांत आलेलीं आहेत.

## तक्ता-I

सदर — महाराष्ट्र

विकासाचें उप-सदर : जलसिंचन आणि विद्युत्

| क्रमांक | योजना | १९६०-६१ चा प्रकल्प महसूल | भांडवल | बेरीज |
|---|---|---|---|---|
| २६६ | कोयना सोलापूर योजना | ... | १६४·७३ | १६४·७३ |
| | लायसेन्सींचा धंदा ताब्यांत घेणें. | ... | १५·७९ | १५·७९ |
| | ग्रामीण भागांतील विद्युतीकरण आणि महाराष्ट्र प्रदेशांतील नूतनीकरण | ... | १०९·०० | १०९·०० |
| | | | २८९·५२ | २८९·५२ |
| | चोला निधींतून खर्च करावयाच्या योजना. | ... | ४०·०० | ४०·०० |
| | तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें समाविष्ट असलेल्या योजना. | ... | १०·०० | १०·०० |
| | | ... | ३३९·५२ | ३३९·५२ |
| ३६१ | दक्षिण ग्रिडचा विकास. | ... | १३०·८८ | १३०·८८ |
| | ग्रामीण भागांत विद्युतीकरण योजना. | (योजना क्र. ३६१ मध्यें अन्तर्भाव केला आहे.) | | |
| ३७२ | प्रशासकीय कार्यालयाची इमारत बांधणें. | ... | ३·१२ | ३·१२ |
| | यंत्र-सिंचन योजना. | ... | ३५·९१ | ३५·९१ |
| | लायसेन्सीचा धंदा ताब्यांत घेणें. | ... | ९·०९ | ९·०९ |
| | ग्रामीण विद्युतीकरणाच्या जादा योजना. | ... | ४०·०० | ४०·०० |
| | तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या योजनावरील खर्च. | ... | २५·०० | २५·०० |
| | विदर्भ. | ... | २४४·०० | २४४·०० |

### मराठवाडा विभाग

| क्रमांक | योजना | महसूल | भांडवल | बेरीज |
|---|---|---|---|---|
| ३६६ | ग्रामीण विद्युतीकरणाच्या योजना. नांदेड-परभणी विद्युतीकरण योजना. | ... | ३·०६ | ३·०६ |
| | ग्रामीण विद्युतीकरणाच्या योजनांमध्यें तवदील करणाच्या आणि जादा योजना. | | | |
| | | ... | ७३·०० | ७३·०० |

## तक्ता-II

### केन्द्राकडून सुरूं झालेल्या योजना

सदर — महाराष्ट्र

विकासाचें उप-सदर : जलसिंचन आणि विद्युत्

| क्रमांक | योजना | १९६०-६१ ची तरतूद महसूल | भांडवल | बेरीज |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्रांत नोकऱ्या मिळवून देण्याबाबत संधी मिळवून देणारी योजना (अकलूज). | ... | २·०० | २·०० |
| | | ... | २·०० | २·०० |

महाराष्ट्र

| विभाग | दुसरी पंचवार्षिक योजना | तिसरी पंचवार्षिक योजना | नोकऱ्या मिळवून देण्याबाबत संधी मिळवून देणारी योजना | चोला योजना | बेरीज |
|---|---|---|---|---|---|
| जुन्या मुंबई राज्यांतील महाराष्ट्र विभाग | २८९·५२ | १०·०० | २·०० | ४०·०० | ३४१·५२ |
| विदर्भ | २१९·०० | २५·०० | ... | ... | २४४·०० |
| मराठवाडा | ७३·०० | ... | ... | ... | ७३·०० |
| बेरीज... | ५८१·५२ | ३५·०० | २·०० | ४०·०० | ६५८·५२ |

# सी—भूगर्भशास्त्र व खाणकाम विभाग

(एक) ह्या विभागामार्फत राज्य सरकार खाणी व खनिजपदार्थ (आर. व डी.) अधिनियम १९५७ व खनिजपदार्थाबाबत सवलतीचे नियम १९४९ ह्यांचे नियोजन करतें व खाजगी संस्थांना राज्यांत सांपडणाऱ्या वेगवेगळ्या प्रमुख खनिज पदार्थाबाबत मान्यतेचीं प्रमाणपत्रें, खनिज पदार्थ संशोधन अधिकारपत्रें देऊन खाणी मुदतीनें देतें. शिवाय, मुंबई गौण खनिज पदार्थ उत्खनन नियम १९५५ चें नियोजन करून त्यानुसार वाळू, इमारती दगड चुना इत्यादींसाठीं उत्खननाचे परवाने मंजूर करते.

खाणीची व खाणकामाची तपासणी करून खाणी मुदतीनें देणें व खाणकामाबाबतच्या अटी व शर्तीनुसार चालतात कीं नाहीं ह्याची आणि सरकारला योग्य स्वामित्वशुल्क मिळत आहे ह्याची खात्री करून घेणें हीं कामें ह्या विभागाला करावी लागतात.

खाजगी उपक्रम करणारांना मदत व्हावी म्हणून आणि राज्यांतील महत्त्वाच्या खनिज पदार्थांच्या ठेव्याचा शोध लागावा ह्या दृष्टीनें गेल्या कांहीं वर्षांत राज्यांतील निरनिराळ्या ठिकाणीं विभागाने खनिज पदार्थांचे विभागीय संशोधन सुरूं केलें आहे.

योजना क्रमांक ४३९ (भूगर्भशास्त्र विभागाच्या विस्तार) आणि योजना क्र. ४३९-ए (राज्याचे उपयोगासाठीं राखीव असलेल्या खनिज पदार्थांचे तपशीलवार संशोधन हातीं घेण्याची योजना) यामध्यें वरील कार्यक्रमांचा अंतर्भाव होतो.

(दोन) ह्या योजनांसाठीं योजनेंतील एकूण तरतूद रु. ३,९५,३०० एवढी होती. ह्या विभागानें केलेल्या जलद प्रगतीमुळें ह्यांत लवकरच वाढ झाली आणि वेळोवेळीं त्यासाठी पुरवणी करणें भाग पडलें.

(तीन) एकत्रित राज्यांत, निरनिराळ्या ठिकाणीं १९५८-५९ व १९५९-६० या वर्षी विभागीय खनिजपदार्थांचें संशोधन करण्याबाबत आठ योजना सरकारनें आंखल्या. ह्यांपैकीं, रत्नागिरी जिल्ह्यांतील रेडी येथील खनिज लोखंड व नागपूर जिल्ह्यांतील कामटी येथील कोळशाचें संशोधन ह्या गोष्टींचा येथें उल्लेख करणें इष्ट आहे. याशिवाय कोल्हापूर जिल्ह्यांतील उद्गेरीजवळील बॉक्साइटचाहि उल्लेख करणे इष्ट आहे. ह्या प्रयत्नामुळें मिळालेली माहिती खाजगी उद्योगपतींना व परदेशी चलन मिळण्याच्या दृष्टीनें केन्द्र सरकारलाहि फार मोलाची ठरली आहे.

(चार) कामटी येथें केलेल्या ड्रीलिंगच्या कामावरून सुमारें ३०० दशलक्ष टनाचा उत्तम प्रतीचा कोळसा त्या प्रदेशांत उपलब्ध असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें. हें काम अजून चालू असून कदाचित् कामटी सौनेर–बोखारा प्रदेशांत नवीन सुमारे १००० दशलक्ष टन पर्यंत साठे सापडूं शकतील. उमरेड (नागपूर) येथें केलेल्या कोळशाच्या संशोधनावरून तेथें विपुल कोळसा मिळूं शकेल असें दिसतें. त्यामधील चार थरांचा तळ असलेला भाग पहिल्या प्रतीचा आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांतील रेडी येथें अशुद्ध लोखंडाचे सांठे शोधून काढण्याचें काम चालूं असतां तेथें सुमारें १० दशलक्ष टनांचा सांठा आहे असें आढळून आलें. अधिक शोध केल्यास ह्या प्रदेशांत सुमारें ५० दशलक्ष टन खनिज लोखंडाचा सांठा सापडूं शकेल असा अंदाज आहे. त्याचप्रमाणें चांदा जिल्ह्यांतील फुसार येथील खनिज लोखंडाच्या संशोधनांत, तेथें ६५ टक्के लोखंड, थोडीशी सिलिका व थोडेसें गंधक असलेलें उत्कृष्ट दर्जाचें खनिज लोखंड असल्याचें आढळून आलें आहे.

कोल्हापूर जिल्ह्याच्या उदगेरी टेकड्यांवरील बॉक्साइट संशोधनांतून तेथें सुमारें ५·७ दशलक्ष टनांचें सांठे असल्याचें आढळून आलें आहे. अॅल्युमिनियम यंत्रसंचासाठीं ह्या सांठ्यांचा उपयोग होईल. त्यासाठीं परवाना द्यावयाच्या प्रश्नावर भारत सरकारचा विचार चालूं आहे. नांदेड जिल्ह्याच्या किनवट तालुक्यांतील चुनखडी संशोधनांत तेथें सुमारें १० दशलक्ष टन चुनखडी असल्याचें आढळून आलें आहे. परंतु ही चुनखडी हलक्या प्रतीची असून तिचा उपयोग मोठ्या प्रमाणावरील कोणत्याहि उद्योगधंद्यांत करतां येणार नाहीं.

(पांच) कामटी येथील कोळसा, रत्नागिरी जिल्ह्यांतील रेडी येथील व चांदा जिल्ह्यांतील फुसार येथील अशुद्ध लोखंड शोधून काढण्याचें काम १९६०-६१ मध्यें पुढें चालू ठेवण्याचें योजिलें आहे. राज्यांतील, इतर ठिकाणीं खालील पदार्थ शोधून काढण्याच्या योजना हातीं घेण्याचें योजिलें आहे.

(सहा) लवकरच भूगर्भशास्त्र व खाणकाम विभाग वाढविण्याचा व वाणिज्य व उद्योगधंदे याकरितां लागणाऱ्या विविध खनिज पदार्थांच्या वाढत्या मागण्यांना तोंड देण्यासाठीं ह्या विभागाच्या कार्याचा विस्तार करण्याचा सरकारचा हेतु आहे.

## कापड शाखा

नुकसानींत असलेल्या सुती कापडाच्या गिरण्यांना मदत करण्यासाठीं सरकारनें खालील उपाययोजना अवलंबिल्या आहेतः-

१. बेकारीनिवारण योजना म्हणून कापडगिरण्या ताब्यांत घेणें व चालविणें :- सरकारनें आतांपर्यंत तीन गिरण्या ताब्यांत घेतल्या आहेत. (१) एन्. जी. मिल्स, सोलापूर, (२) सेक्सेरिया कापड गिरणी, आणि (३) धनराज मिल्स.

**एन्. जी. मिल्स सोलापूर :—**

वरिष्ठ न्यायालयाच्या अधिकृत ऋणपरिशोधकानें २४ डिसेंबर १९५८ रोजीं ही गिरणी भाड्यानें घेतली. ह्या मिलचें काम वेळोवेळीं सरकारनें चालू ठेवलें आहे आणि सध्यां ही गिरणी रजेच्या व लायसन्सच्या तत्त्वावर, अनिश्चित कालावधीपर्यंत चालू ठेवण्यांत आली आहे. कुठल्याहि बाजूनें दिलेल्या सहा आठवड्यांच्या नोटिसीनें या मुदतीची समाप्ति होऊं शकेल. चालू भांडवल म्हणून सरकारनें रु. ४५ लाख आगाऊ दिले आहेत. त्याशिवाय, ह्या गिरणीला रु. ३५ लाख इतकी रोख कर्जे देण्याकरितां, सरकारनें स्टेट बँक ऑफ इंडियाला हमी दिली आहे.

**सक्सेरिया कापड गिरणी, मुंबई :—**

बेकारी निवारण योजनेनुसार मुंबईच्या उच्च न्यायालयाच्या अधिकृत ऋणपरिशोधकाकडून चालविण्यासाठीं ही गिरणी सरकारनें आक्टोबर १९५८ पासून ताब्यांत घेतली होती. ह्या गिरणीची मालकी सध्या रजेच्या व लायसन्सच्या तत्त्वावर आधारित आहे, व लायसन्सचा कालावधी २५ जुलै १९६० पर्यंत वाढविला आहे. सरकारनें ह्या गिरणीला चालू भांडवल म्हणून रु. ४५ लाखांची रक्कम आगाऊ दिली आहे आणि रु. ३५ लाखांचा रोख कर्जाबाबतच्या व्यवस्थेसाठीं स्टेट बँक ऑफ इंडियाला हमीहि दिली आहे.

**धनराज मिल्स, मुंबई :—**

१५ मार्च १९६० पासून, ९ महिन्याच्या निश्चित कालावधीकरता आधिकृत ऋणपरिशोधकाचा प्रतिनिधी म्हणून सरकार ही गिरणी चालवित आहे. गिरणीच्या कामापासून तोटा आल्यास तो सरकारला सोसावा लागेल व फायदा आल्यास तो अधिकृत ऋणपरिशोधकाला देण्यांत येईल. सरकारनें चालू भांडवलाकरितां रु ३० लाख आगाऊ दिले आहेत व ह्या गिरणीकरितां रु. ३५ लाखापर्यंत रोख कर्जाची व्यवस्था करण्यासाठीं स्टेट बँक ऑफ इंडियाला हमी देण्याचें योजिलें आहे.

२. १९५१ चा उद्योग ( विकास आणि विनियमन ) अधिनियमन, यान्वयें, भारत सरकारनें ज्या गिरण्यांची व्यवस्था हातीं घेतली आहे अशा गिरण्या परत सुरू करण्यासाठीं व चालू ठेवण्यासाठीं चालू भांडवलाची तरतूद करणें उद्योग ( विकास आणि विनियमन ) अधिनियमानुसार, भारत सरकारनें नेमलेल्या प्राधिकारी नियंत्रकानें नागपूर येथील मॉडेल मिल्स ताब्यांत घेतली आहे. ही गिरणी २९ आक्टोबर १९५९ पासून सुरू झाली आहे. भारत सरकारनें, रु. १५० लाखापर्यंतची रक्कम आगाऊ देण्यासाठीं स्टेट बँक ऑफ इंडियाला हमी दिली आहे.

भारत सरकारनें गिरण्यांकरितां एक सल्लागार मंडळाची नेमणूक केली असून (अर्थ) मंत्री हे ह्या मंडळाचे अध्यक्ष आहेत.

३. आर्थिक साहाय्याकरितां सरकारनें आंखलेल्या योजनेनुसार चालू भांडवलाकरितां व यंत्रसामुग्रीचें आधुनिकीकरण व पुनर्वसन याकरितां आर्थिक सहाय्य देणें ह्याबाबत आंखलेल्या योजनेनुसार, स्टेट बँक ऑफ इंडियाला आगाऊ कर्जे देण्याबाबतची हमी देण्याआधीं, गिरण्यांकडून आलेले अर्ज तपासण्यांत आले आहेत. बिन-सरकारी कापड तज्ञ, स्टेट बँक ऑफ इंडिया, प्रतिनिधी व अर्ज केलेल्या प्रत्येक गिरणीबाबत विशेष कर्तव्य (कापडविषयक) अधिकारी यांची एक समिति नेमण्यांत आली आहे. समितीच्या शिफारसी सरकारकडे मंजुरीसाठीं सादर करण्यांत आल्या आहेत. अशा प्रकारच्या गिरण्यांचे कामकाज पाहण्यासाठीं सरकारी संचालकांची नेमणूक केली आहे.

**४. सरकारी मालकीची गिरणी :—**

कोल्हापूरची शाहू छत्रपती मिल्स ही कापड गिरणी सरकारच्या मालकीची आहे. तिची व्यवस्था त्या कामासाठीं नेमलेल्या, मेसर्स बुधगांव ट्रेडिंग कंपनी, प्रायव्हेट लिमिटेड, माधवनगर ह्या प्रतिनिधी-

कडून पाहिली जाते व हे प्रतिनिधी (अर्थ) मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कार्य करणाऱ्या व्यवस्थापक समितीच्या संपूर्ण नियंत्रणाखालीं काम करतात. ह्या गिरणीकडे रु. १७,५०,००० इतके चालू भांडवल आहे. तसेंच चालू भांडवलाकरितां रु. ४० लाखापर्यंत रोख कर्जाच्या व्यवस्थेसाठीं सरकारनें स्टेट बँक ऑफ इंडियाला हमी देखील दिलेली आहे.

५. खाजगी गिरण्यांमध्यें सरकारी पैसे गुंतविणें किंवा त्यांस कर्जे देणें.

| गिरणीचें नांव | सरकार नियुक्त संचालक | गुंतविलेली रक्कम |
|---|---|---|
| | | रु. |
| १. उस्मानाबाद मिल्स् नांदेड. | विशेष कर्तव्य ( कापडविषयक )-वरील अधिकारी श्री. नामजोशी, सरकारी नायब सचिव, अर्थ विभाग. | ७,७०,६०० ( प्रत्येकीं रु. १०० प्रमाणें ७७०६ शेअर्स ) |

सोलापूर येथील स्पिनिंग आणि विव्हिंग मिल्स लिमिटेडला,सरकारनें रु. ९४ लाखांचे कर्ज दिलें आहे. तसेंच, सरकार यंत्रमागांचे विनियमन करण्याच्या कामाचा टेक्स्टाईल कमिशनरनें दिलेल्या आदेशांशीं समन्वय साधतें.

## कामगार

'मजूर' विषयक क्षेत्रांमध्यें सरकारी कार्यक्रमाचा संबंध मुख्यतः विविध केंद्रीय व राज्य कामगार अधिनियमांची अंमलबजावणी करणें इ. कार्यांशीं येतो. हे अधिनियम कामगारांचे कल्याण, जखमी कामगारांना नुकसानभरपाई देणें, औद्योगिक कलहाबाबत तडजोड, वेतनाच्या बाकी राहिलेल्या रकमेची वसुली, किमान मजुरी ठरविणें, दुकानें व इतर संस्था ह्यामधील नोकऱ्यां बाबतच्या शर्ती, व्यापारी संघांची नोंदणी, प्रसुति संबंधांतील फायदे, कामगार निर्वाह निधि, राज्य विमा, वैद्यकीय प्रकरणें व तसेंच पंचवार्षिक योजनेतील कामगारांच्या कल्याणाबाबतच्या विविध योजनांची अंमलबजावणी, ह्या सर्व बाबींशी संबंधित आहेत.

२. वर निर्देश केलेल्या कार्यक्रमासंबंधीच्या महत्वाच्या बाबी पुढीलप्रमाणें:—

(१) भारतीय व्यापार संघ अधिनियम, १९२६:-१९५९-६० मध्यें ३४५ संघांचीं नोंदणी करण्यांत आली आणि सध्यां महाराष्ट्र राज्यांत १४१२ व्यापार संघ आहेत.

(२) किमान मजुरी अधिनियम १९४८:– अतिश्रमाच्या मजुरीला व मजुरीचा अवास्तव उपयोग करण्याला आळा घालणें व मजुरांसाठीं किमान मजुरी निश्चित करणें हा या कायद्याचा उद्देश आहे. ह्या अधिनियमाचा व्याप अधिनियमाच्या सूचीमध्यें समाविष्ट केलेल्या कांहीं व्यवसायांच्या बाबतींत मर्यादित असून मजुरांसाठीं ह्या अधिनियमांअन्वयें किमान मजुरीचे दर निश्चित केले आहेत. पूर्वीच्या मुंबई राज्याच्या प्रदेशाशी संबंधित असलेल्या, पांच जादा व्यवसायांचा समावेश राज्य सरकारनें या सूचींत केला आहे. सरकारनें आतांपर्यंत १३ व्यवसायांच्या बाबतींत किमान वेतन निश्चित केलें आहे. त्याशिवाय, पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारनें, विदर्भ प्रदेशासाठीं किमान मजुरींचे दर निश्चित केलेले असे ४ व्यवसाय आहेत. पूर्वीच्या हैद्राबाद सरकारनें या अधिनियमाच्या सूचीमध्यें बटनाच्या धंद्याचा समावेश केला आहे, परंतु किमान मजुरीचे दर अद्याप निश्चित करण्यांत आलेले नाहींत.

१९५९-६० सालीं, सरकारनें, एक लाख किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांतील कोणत्याहि दुकानांतील किंवा व्यापारी संस्थेंतील रोजगाराचें किमान वेतन निश्चित केलें आहे. पूर्वीच्या हैद्राबाद सरकारनें राज्याच्या मराठवाडा प्रदेशांतील कोणत्याहि स्थानिक संस्थेखालील नोकरीमधील आणि सार्वजनिक मोटर परिवहनांतील नोकऱ्यांकरितां सुद्धां किमान वेतनें ठरवून दिलेलीं नसल्यानें तीं आतां

ठरविण्यात आलेलीं आहेत. त्या प्रदेशांतील, विडी कामगारांचें किमान वेतन ह्या वर्षी सुधारण्यात आलें आहे.

राज्यांतील इतर भिन्नभिन्न उद्योगधंद्यांनाहि ह्या अधिनियम लागू करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां, राज्य सरकारनें इतर निरनिराळ्या उद्योगधंद्यांमधील सामाजिक-आर्थिक परिस्थितीची चौकशी करण्याचें योजिलें आहे.

(३) सन १९४८ चा मुंबईचा दुकानें आणि संस्था याबाबतचा अधिनियम—१९५९मध्यें, ह्या अधिनियमाची व्याप्ति, तो आणखी ३ नगरपालिका क्षेत्रांना लागू होईल इतकी वाढवण्यांत आली होती. १९५९ च्या अखेरीस ह्या कायदा एकूण ९३ शहरांना लागू करण्यांत आला. ह्या शहरांपैकीं ५० शहरें सध्यांच्या महाराष्ट्र राज्यांत आहेत.

नगरपालिकेच्या हद्दींत, नगरपालिकांकडून ह्या अधिनियमांची अम्मलबजावणी केली जाते २५,००० किंवा त्याहून जास्त लोकवस्तीच्या प्रदेशांच्या नगरपालिकांना ह्या अधिनियमांची अम्मलबजावणी करण्या-करितां, त्यांनीं वसूल केलेल्या दंडाइतकें अनुदान सहाय्य मिळतें. मात्र अधिनियमाच्या प्रशासनाकरितां प्रत्यक्ष झालेल्या खर्चाइतकेंच हें अनुदान सहाय्य मर्यादित असतें. २५,००० पेक्षां कमी लोकवस्ती असलेल्या प्रदेशां-तील नगरपालिकांना त्यांनीं वसूल केलेला दंड किंवा अधिनियमाच्या प्रशासनाकरितां आलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% यापैकीं जी रक्कम जास्त असेल, तितकें परंतु प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेइतक्याच रकमेचे अनुदान-सहाय्य मिळूं शकते. सन १९६०–६१ सालीं निरनिराळ्या प्रदेशांत अंमलांत असलेले दुकानें आणि संस्था याबाबतचे निरनिराळे अधिनियम एकत्रित करण्याचें योजिलें आहे.

(४) सरकारी औद्योगिक प्रशिक्षण कारखाने, औद्योगिक कामगार आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या इसमांना, त्यांच्या फावल्या वेळांत, निरनिराळ्या तांत्रिक व्यवसायांचें प्रशिक्षण देणें हा ह्या कारखान्यांचा उद्देश आहे. त्यामुळें अशा इसमांना, त्यांच्या बेकारीच्या काळांत, त्यांना मिळालेल्या तांत्रिक प्रशिक्षणाचा उपयोग उदरनिर्वाहाकरतां करून घेतां येईल. (कुर्ला) मुंबई येथें एक आणि सोलापूर येथें एक, असे दोन कारखाने ह्या राज्यांत आधींच चालू झालेले आहेत. सोलापूर येथील कारखान्यांत टर्नरच्या पाठ्यक्रमांची सुरवात करण्याबाबतच्या प्रस्तावासंबंधीं सरकारचा विचार चालू आहे उपलब्ध असलेली मर्यादित जागा लक्षांत घेतां प्रत्येक पाळीमध्यें, प्रथमतः फक्त ८ च विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचें योजिलें आहे. ह्या कारखान्यावरील (अहमदाबाद येथील कारखाना धरून) १९५९–६० मधील खर्च रु. २,०३,७२० इतका होता.

(५) सरकारच्या कारखानेविषयक निरीक्षक कार्यालयाचीं कामें मुख्यतः, कारखान्यासंबंधीचा अधि-नियम, वेतन देण्यासंबंधीचा अधिनियम, प्रसूति संबंधीच्या लाभासंबंधीचा अधिनियम, मुंबई कॉटन जिनिंग आणि प्रेसिंग कारखाना अधिनियम, आणि मुलांच्या नोकऱ्यासंबंधीच्या अधिनियम यांच्या प्रशासनाच्या कामांशीं संबंधित आहेत. ह्याशिवाय, कामगारांना भरपाई मिळवून देण्यास सहाय्य करणें, वैद्यकीय मदत, शिक्षण, करमणूक आणि खेळ इत्यादि बाबतींत, कामगारांना मदत करण्याचें कामसुद्धां हें निरीक्षक कार्यालय करीत असतें. हीं कामें १९६०–६१ ह्या वर्षी चालू ठेवण्यांत येतील.

(६) स्टीम बॉयलर्सच्या निरीक्षक कार्यालयाची नागपूर येथें एक आणि सोलापूर येथें एक अशी दोन प्रादेशिक कार्यालयें असून, मुंबई येथें मुख्य कार्यालय आहे. इंडियन बॉयलर्स अधिनियम आणि मुंबईच्या धुरापासून होणाऱ्या उपद्रवाबाबतच्या अधिनियमाच्या प्रशासनासंबंधीचें काम मुख्यतः ह्या निरीक्षक कार्यालयां-कडून केलें जातें. तसेंच बॉयलर अॅटेंडंट म्हणून आणि इंजिनियर म्हणून नैपुण्यादाखल प्रमाणपत्रें मिळविण्याची इच्छा असलेल्या इसमांकरितांसुद्धां, ह्या कार्यालयाकडून परीक्षा घेण्यांत येतात. ह्या परीक्षा

मुंबईमध्यें वर्षांतून तीनदां घेण्यांत येतात. मध्यप्रदेश बॉयलर अॅटेंडंट नियम, १९५३--यानुसार बॉयलर अॅटेंडंटच्या कार्यक्षमतेबाबतच्या परीक्षा, नागपूर येथें वर्षांतून तीनदां घेण्यांत येतात.

सन १९५८ चें मुंबई इकॉनॉमायझर नियम लागू करण्यांत आल्यानंतर कार्यालयानें इकॉनॉमायझरची नोंदणी करण्याचें आणि तपासणी करण्याचें काम सुरूं केले आहे.

ही सर्व कामें १९६०-६१ ह्या वर्षी चालूं ठेवण्यांत येतील.

(७) बॉंबे लेबर इन्स्टिट्यूट, मुंबई :—

जुलै १९५९ पासून इन्स्टिट्यूट ऑफ लेबर वेल्फेअर, मुंबई या संस्थेचें नांव बदलून बॉम्बे लेबर इन्स्टिट्यूट असें ठेवण्यांत आलें आहे, आणि मुंबई विद्यापीठ अधिनियम १९५३ च्या कलम ५२ नुसार, मुंबई विद्यापीठाच्या कामगार कल्याण या विषयांतील दोन वर्षांच्या डिप्लोमा पाठ्यक्रमाकरितां (डी. एल. डब्ल्यू ) विषय विशिष्ट, पदव्युत्तर-शिक्षण देणारी संस्था, म्हणून मान्यता देऊन ह्या संस्थेचा दर्जा वाढविण्यांत आला आहे. ह्या संस्थेनें, राज्य सरकारच्या वतीने, कामगारांच्या शिक्षणाकरितां मार्गदर्शी प्रकल्प सुरूं केला आहे. सुमारे १२० प्रशिक्षणार्थी कामगारांचे मिळून एक अधिवेशन, ह्याप्रमाणें अजूनपर्यंत ३ अधिवेशनें पूर्ण झाली आहेत. परीक्षा झाल्यानंतर २३३ प्रशिक्षणार्थी कामगारांना कामगारांच्या शिक्षणाबाबतची प्रमाणपत्रें देण्यांत आलीं.

१९६०-६१ ह्या वर्षी खालील कामें हातीं घेण्याचें योजिलें आहे. त्यापैकीं कांहीं कामें पूर्ण झाली आहेत किंवा पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत.

(अ) संपादन केलेल्या जमिनीच्या प्लॉटसवर संस्थेकरितां आणि संस्थेच्या वसतिगृहाकरितां रु. १,५३,८९८·३५ इतक्या किंमतीची नवीन इमारत बांधण्याचें काम चालूं वर्षी पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

(ब) कामगारविषयक अर्थशास्त्रांतील एक आणि औद्योगिक समाजशास्त्र ह्या विषयांतील एक अशा प्राध्यापकांच्या दोन जागांची निर्मिती करण्यांत आली आहे.

(क) ह्या संस्थेनें नियोजन मंडळाच्या सूचनेनुसार हातीं घेतलेले, व्यक्तिगत प्रकरणांचा अभ्यास करण्याचें काम चालूं वर्षी पुन्हां करण्यांत येईल.

(ड) कार्यकर्त्यांच्या शिक्षणाबाबतच्या योजनेचें पुढील अधिवेशन ४ जुलैपासून सुरूं करण्याचें यादींमध्यें सूचित केलें आहे आणि ह्या वर्षाचें दुसरें अधिवेशन १४ नोव्हेंबरपासून सुरूं होईल.

(इ) औद्योगिक आणि धंदेविषयक व्यवस्थापन, कामगार संघटना, मालक-कामगार संबंध इत्यादिबाबतचे पाठयक्रम आणि त्याचप्रमाणें पत्रव्यवहार आणि त्यामधील उपपाठयक्रम याबाबतचे उजळणी पाठयक्रम यासंबंधीची तरतूद करण्याच्या उद्देशाने, तृतीय पंचवार्षिक योजनेनुसार ह्या संस्थेचा कामगारविषयक विविध तंत्रशाळा म्हणून विकास करण्याचें पूर्वतयारीचे काम पूर्ण होईल.

(फ) अमेरिकेच्या संयुक्त संस्थानामधील मॅकोंब येथील वेस्टर्न इलिऑनॉइस विद्यापीठामध्यें, पहिलेच भेट देणारे आंतरराष्ट्रीय उपप्राध्यापक म्हणून १ सप्टेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंतच्या मुदतीकरितां संस्थेच्या संचालकाला पाठविण्याचें योजिले आहे. डेन्मार्क आणि जिनेव्हामध्यें भरलेल्या कार्यकर्त्यांच्या शिक्षणावरील आंतरराष्ट्रीय चर्चामंडळांत भाग घेण्याकरितां, भारत सरकारनें ह्या संचालकाची नेमणूक केली होती. त्यावर्षी केलेल्या अभ्यास-दौऱ्याच्या धर्तीवर यंदासुद्धा तसाच अभ्यास-दौरा काढण्याचे ह्या संचालकानें योजिलें आहे. मसुरी येथें मे महिन्यांत भरलेल्या समाज-कार्यविषयक शिक्षणावरील चर्चामंडळांत ह्या संचालकाने भाग घेतला होता अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील तांत्रिक सहकारी मिशननें हें चर्चामंडळ स्थापन केलें होतें.

(ग) उत्तर प्रदेश सरकारच्या मूल्यांकन समितीनें (सरकारी कामगार कल्याण कार्य) ह्या संस्थेला ८ जून १९६० रोजीं भेट दिली आणि संचालकाबरोबर चर्चा केली.

(ह) प्रत्येक वर्षी प्रवेश दिलेल्या ४० विद्यार्थ्यांमध्यें मागासलेल्या वर्गाचे सरासरी चार विद्यार्थी लाभ करून घेणारे आहेत. एप्रिल–मे १९६० मध्यें घेण्यांत आलेल्या परिक्षेकरितां बसलेल्या ४ विद्यार्थ्यांपैकीं २ विद्यार्थी यशस्वी झाले.

## (८) औद्योगिक संबंध :–

सन १९४६ च्या मुंबई औद्योगिक संबंध अधिनियमाचा, महाराष्ट्र राज्याच्या मुंबई विभागांत अंमल चालू आहे. मालक आणि कामगार यांमधील संबंधाचें नियमन करण्याची आणि औद्योगिक कलहांत तडजोड करण्यासंबंधीची तरतूद ह्या अधिनियमान्वयें करण्यांत आली आहे. हा अधिनियम कापडाच्या उद्योगधंद्याला (कापूस, रेशमी, लोकरी आणि होजियरी), सुती कापडावर प्रक्रिया करण्याचा धंदा, साखरेचा धंदा, महाराष्ट्र राज्याच्या बाहेर एकही शाखा नसलेल्या अशा बँकिंग कंपन्या, बृहन्मुंबईच्या स्थानिक प्रदेशांत आणि अहमदनगर जिल्ह्याच्या नगर तालुक्यांतील, विद्युत्शक्तीची निर्मिति आणि/किंवा विद्युत्शक्तीचा पुरवठा करणाऱ्या संस्थांना, आणि बृहन्मुंबईतील ट्रामनें, किंवा बसनें प्रवास करणाऱ्या सार्वजनिक उतारू वाहतूक सेवेची व्यवस्था ठेवणें व ती चालू ठेवण्याचें काम करणाऱ्या औद्योगिक संस्थांना, हा अधिनियम लागू करण्यांत आला आहे ह्या शिवाय, सन १९४७ च्या औद्योगिक तंट्याबाबतच्या अधिनियमाचाहि ह्या राज्यांत अंमल चालू आहे. मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ च्या नियंत्रणाखाली असलेले सर्व उद्योगधंदे सोडून, इतर उद्योगधंद्यांना हा अधिनियम लागू करण्यांत आलेला आहे. ह्या अधिनियमानुसारहि औद्योगिक तंट्याबाबतची तपासणी आणि तडजोड करण्याची तरतूद करण्यांत आली आहे. औद्योगिक तंट्याबाबतची तडजोड करण्याकरितां ह्या दोन अधिनियमाखालीं सरकारनें कामगार अधिकारी, लवाद, कामगार न्यायालयें, वेतन मंडळे, आणि औद्योगिक न्यायालय व न्यायाधिकरणें, याप्रमाणें निरनिराळे प्राधिकारी व न्यायालयें नेमलेली आहेत.

औद्योगिक न्यायालयें, औद्योगिक न्यायमंडळ, कामगार न्यायालयें, आणि यामध्ये १९५९ साली दप्तरी दाखल करण्यांत आलेल्या प्रकरणांची संख्या, निकालांत काढलेल्या प्रकरणांची संख्या आणि अनिर्णित राहिलेल्या प्रकरणांची संख्या खालीं दिलेल्या तक्त्यामध्यें दिली आहे:—

| तपशील | १ जानेवरी १९५९ रोजीं अनिर्णित असलेलीं | १९५९ सालीं संपविण्यात आलेलीं | १९५९ मध्यें निकालीं काढलेलीं | ३१ डिसेंबर १९५९ रोजीं अनिर्णित असलेलीं |
|---|---|---|---|---|
| (I) औद्योगिक न्यायमंडळासंबंधी बाबी— | | | | |
| (अ) १९४७ च्या औद्योगिक कलह अधिनियमाखालील प्रकरणें | ४११ | ६३८ | ६६१ | ३८८ |
| (ब) १९५५ च्या श्रमिक पत्रकार (नोकरी बाबतच्या शर्ती) आणि इतर संकीर्ण तरतूदीं अधिनियम, याखालील प्रकरणें | ... | २ | २ | ... |
| (II) औद्योगिक न्यायालयासंबंधी बाबी— | | | | |
| (अ) १९४६ चा मुंबईचा औद्योगिक संबंधाबाबतचा अधिनियम, या खालील प्रकरणें | ५६५ | ७६३ | ७०० | ६२८ |
| (ब) १९४६ चा औद्योगिक नोकऱ्यांबाबत (स्थायी आदेश) अधिनियम याखालील प्रकरणें | ... | ... | ... | ... |
| बेरीज...... | ९७६ | १४०३ | १३६३ | १०१६ |

मुंबईच्या औद्योगिक संबंधाबाबतच्या अधिनियमाच्या ९ व्या कलमान्वयें सरकारनें दोन कामगार न्यायालयें स्थापन केलीं आहेत. औद्योगिक कलह अधिनियम करितां ह्या न्यायालयांना कामगार न्यायालयें म्हणून ओळखलें जाते. म्हणून १९५९ सालीं ह्या २ कार्यालयांनीं केलेल्या अर्जांची तपशीलवार माहिती खालील तक्त्यामध्यें दिली आहे.

| | | |
|---|---|---|
| १९५९ च्या सुरवातीस अनिर्णित असलेलीं प्रकरणें | ... | ६४४ |
| या वर्षी दाखल करण्यांत आलेलीं प्रकरणें | ... | १७४० |
| चालू सालीं निकालांत काढलेलीं प्रकरणें | ... | ११७४ |
| वर्षाच्या अखेरीस अनिर्णित राहिलेलीं प्रकरणें | ... | १२१० |

सरकारनें आणखी एक कामगार-न्यायालय स्थापन करण्याचें योजिलें आहे. त्या न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नेमणूक करण्यासाठीं योग्य इसमाची निवड होतांच ह्या न्यायालयाचें कामकाज सुरूं होईल.

औद्योगिक न्यायालय व कामगार न्यायालय यामध्यें वेतन मंडळाप्रमाणेंच, बिन-सरकारी सदस्य व मालक आणि नोकर ह्यांचे प्रतिनिधी असतात.

वर्षाच्या सुरवातीला कापडधंद्याकरितां नेमलेल्या वेतन मंडळापाशीं अनिर्णित असलेल्या ४० प्रकरणांखेरीज नवीन ४२ प्रकरणें १९५९ सालीं आलीं. मंडळानें या ८२ प्रकरणांपैकीं १९५९ सालीं ३३ प्रकरणें निकालांत काढलीं.

रेशीम धंद्याच्या वेतन मंडळाकडे, वर्षाच्या सुरवातीला अपूर्ण असलेल्या ३१ प्रकरणांखेरीज १९५९ सालीं नवीन १३ प्रकरणें आलीं. या ४४ प्रकरणांपैकीं १९५९ सालीं २० प्रकरणें मंडळानें निकालांत काढली, असून वर्षाच्या अखेरीस २४ प्रकरणें शिल्लक राहिली आहेत.

१९५९ सालीं साखर धंद्याच्या वेतनमंडळाकडे, वर्षाच्या सुरवातीला अपूर्ण असलेल्या ९ प्रकरणां-खेरीज ३ प्रकरणें आलीं. मंडळानें या १२ प्रकरणांपैकींहि, १९५९ सालीं ५ प्रकरणें निकालांत काढलीं असून वर्षाच्या अखेरीस ७ प्रकरणें शिल्लक राहिलीं आहेत.

राज्याच्या विदर्भ विभागांत, १९४६ चा मध्यप्रांत आणि वऱ्हाडचा औद्योगिक कलह निवारण अधिनियम चालू आहे. लांकडाच्या गिरण्या, खाणी, केंद्र सरकारच्या अधिकाराखालीं किंवा सरकारमार्फत चालविला जाणारा कोणताहि उद्योगधंदा खेरीजकरून इतर सर्व उद्योगधंद्यांना हा अधिनियम लागू आहे. औद्योगिक कलहाबाबतच्या अधिनियमाच्या तरतुदी यानुसार बदलतां येण्याजोग्या आहेत.

या नियमांत तरतूद केल्याप्रमाणें, सरकारनें कापडधंद्यासाठीं जिल्हा औद्योगिक न्यायालयें, राज्य औद्योगिक न्यायालय आणि वेतन मंडळ स्थापलें आहे. १९५९ मध्यें नागपूर राज्य औद्योगिक न्यायालयाकडे दाखल झालेल्या प्रकरणांची संख्या व त्या काळांत निकालांत काढण्यांत आलेल्या प्रकरणांची संख्या खालीं दिल्याप्रमाणें आहे.

| | |
|---|---|
| १९५९ च्या सुरवातीला अनिर्णित असलेलीं प्रकरणें | १६७ |
| १९५९ सालीं दाखल केलेलीं प्रकरणें | ३५२ |
| १९५९ सालीं निकालांत काढलेलीं प्रकरणें | २०८ |
| १९५९ सालच्या शेवटीं अनिर्णित राहिलेलीं प्रकरणें | ३११ |

कांहीं महिने नागपूरच्या राज्य औद्योगिक न्यायालयाला पूर्णकालिक सदस्य न मिळाल्यानें तेथें काम सांचून राहिलें आहे. लवकरच संपूर्ण वेळ काम करणारा सदस्य तेथें नेमला जाईल.

नागपूर येथील जिल्हा औद्योगिक न्यायालयामध्यें कामाच्या केंद्रीकरणाचें व काम साचून रहाण्याचें प्रमाण अधिक असल्यामुळें तेथें स्वतंत्र अधिकारी नेमण्याच्या प्रश्नावर सरकारचा विचार चालूं आहे.

(९) तडजोडी :—

(१) १९४६ चा मुंबईचा औद्योगिक संबंधाबाबतचा अधिनियम :—

१९४६ च्या मुंबईच्या औद्योगिक संबंधाबाबतच्या अधिनियमानुसार, मागील वर्षापासून सुरूं असलेलीं ३९१ प्रकरणें धरून, १९५९ सालीं एकूण १,५६९ प्रकरणांबाबत तडजोड करण्यांत आली. ह्या १,५६९ प्रकरणांपैकीं, १,०३८ प्रकरणें चालू वर्षात निकालांत काढण्यांत आलीं व डिसेंबर १९५९ च्या शेवटीं ५३१ प्रकरणें शिल्लक राहिलीं आहेत.

(२) मध्यप्रांत आणि वऱ्हाड औद्योगिक कलह तडजोड अधिनियम :—

१९५९ सालीं तडजोडीकरितां ठेवलेलीं १७ प्रकरणें व ८५ प्रकरणें आलेलीं आहेत. ह्या १०२ प्रकरणांपैकीं १९५९ च्या अखेरीस ८२ प्रकरणें निकालांत काढण्यांत आलीं व २० प्रकरणें शिल्लक आहेत.

(३) १९४७ चा औद्योगिक कलहविषयक अधिनियम :—

१९५८ च्या शेवटीं अनिर्णित राहिलेलीं ४३० प्रकरणें धरून, १९५९ सालीं २,७६२ प्रकरणें दाखल करण्यांत आलीं. ह्या २,७६२ प्रकरणांपैकीं १,८३७ प्रकरणें निकालांत काढण्यांत आलीं आहेत व १९५९ च्या शेवटीं ९२५ प्रकरणें शिल्लक राहिलीं आहेत.

(४) नवीन कायदे करणें :—

बेकारी निवारणाचा उपाय म्हणून सरकारनें स्वत: चालविलेल्या किंवा सरकारच्या अधिकाराखालीं चालविण्यांत येणाऱ्या उपक्रमांना १९५८ चा मुंबईचा खास उपक्रम (खास तरतूद) अधिनियम लागू करण्यांत आला आहे. ह्या अधिनियमाची १९५९ च्या मुंबई साहाय्यक उपक्रम (खास तरतूद) (दुरुस्ती) अधिनियमाद्वारें दुरुस्ती करण्यांत येऊन त्याच्या कक्षेंत जे चालविण्यासाठीं राज्य सरकारकडून केवळ अर्थ-सहाय्य दिले गेलें आहे किंवा बँकांसारख्या मध्यस्थ संस्थांनीं ज्यांना पुरविलेल्या कर्जाला सरकारकडून हमी देण्यांत आलेली आहे असे उपक्रमच आणलें गेले.

१९६० मध्यें, १९४६ चा मुंबईचा औद्योगिक संबंधाबाबतचा अधिनियम आणि १९४७ चा मध्यप्रांत आणि वऱ्हाड औद्योगिक कलह निवारण अधिनियम एकत्रित करण्याचें योजिलें आहे.

## दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें समाविष्ट असलेल्या योजना अथवा प्रकल्प

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें समाविष्ट केलेल्या "कामगार कल्याण" या संबंधींच्या योजनांची प्रगति खालीं दिल्याप्रमाणें आहे. शक्य तेथें या योजनांची फलनिष्पत्तीहि दर्शविली आहे.

### सामाजिक-आर्थिक चौकशी :—

सामाजिक-आर्थिक चौकशी मध्यें खालील चार उपयोजना येतात :—

(ए) "आंकडेवारी गोळा करण्याबाबतचा अधिनियम १९५३" यानुसार सुमारें १०,००० कारखाने आणि ट्राम कंपनी आणि मुंबईच्या गोदी विभागाकरितां कामगारांना रोजगार देणाऱ्या ५०० संस्था ह्यांच्याकडील औद्योगिक आंकडेवारी गोळा करणें.

(बी) १६ निवडक धंद्यांमध्यें मिळणाऱ्या वेतनाची माहिती गोळा करणें.

(सी) कामगारवर्गाच्या कौटुंबिक जीवनमानाची पाहणी करणें.

(डी) ३९ निवडक धंद्यांमधील आणि नोकऱ्यांमधील किमान-वेतनाची पाहणी करणें.

### [ अ ] कामगार वर्गाच्या कौटुंबिक जीवनमानाची पाहणी:–

भारत सरकारच्या इतर केन्द्रामधील कामगारवर्गाच्या कौटुंबिक जीवनमानाच्या पाहणीच्या धर्तीवर कामगारवर्गाच्या कौटुंबिक उत्पन्न व खर्च विषयक पाहाणीचा विस्तार करण्यांत आला असून तो कामगारवर्गाच्या जीवनमानाच्या सर्व पातळीपर्यंत वाढवण्यांत आला आहे. ह्या पाहणीस आतां "कामगार वर्गाच्या कौटुंबिक जीवनमानाची पाहाणी" असें म्हणण्यांत येतें.

कुटुंबाच्या उत्पन्न व खर्च विषयक चौकशीचा उद्देश, किंमतीच्या चढउताराच्या प्रमाणांत पगाराची पातळी समतोल राखतां येईल यादृष्टीनें ग्राहक किंमतीचे निर्देशांक तौलनिक पायावर तयार करणें हा आहे. आणखीहि इतर कारणाकरितां ह्या चौकशा उपयोगी पडतील. राष्ट्रीय उत्पन्नाबाबतचा अभ्यास, क्रयविक्रय संशोधन, आहाराबाबतचा अभ्यास, कामगार आणि सामाजिक व आर्थिक विकासाच्या इतर अनेक शाखा याकरितां योजना आंखणें, यासारख्या क्षेत्रांतील, कुटुंबाचे उत्पन्न व खर्चाची पद्धत याबाबतची आधारभूत माहिती उपलब्ध करून देण्यासाठीं नित्यनियमित मागणी केली जात आहे.

जीवनमानाची पाहणी करण्याचा उद्देश कामगारांचें शारीरिक स्वास्थ्य, त्यांच्या शैक्षणिक किंवा सांस्कृतिक गरजाची पूर्ती, समाजविषयक कार्यक्रमांत भाग घेणें, सामाजिक हक्कांचा उपभोग घेणें, इत्यादींचा संपूर्णतः अभ्यास करणें हा आहे. कामगार वर्गाच्या जीवनमानाची पातळी वाढविण्याची योजना तयार करण्यासाठीं या अभ्यासक्रमांतील विषयांची तरतूद केली आहे.

#### (१) मुम्बई राज्यांतील कुटुंबिक उत्पन्न व खर्च याबाबतची चौकशी जलद गतीनें पार पाडणें :–

पाहणीचें काम सर्व दृष्टीनें पूर्ण झालेलें आहे. वरील पाहणीच्या निष्पत्तीच्या अभ्यासाकरितां आणि त्यावर कराव्या लागणाऱ्या शिफारसीकरितां सरकारकडून नेमण्यांत आलेल्या तज्ञ समितीनें त्याबाबतचे अहवाल सरकारकडे सादर केले आहेत.

#### (२) कामगार वर्गाच्या कुटुंबाच्या जीवनमानाबाबतची पाहणी :—

राज्यांतील निवडण्यांत आलेल्या ८ केंद्रांची १२ फेऱ्यांत पाहणी करण्याबाबतचें क्षेत्रांतील काम पूर्ण झालें आहे. पाहणी करतांना गोळा केलेली माहिती ही सूक्ष्म रीतीनें तपासली होती. या मिळालेल्या माहितीचें पद्धतशीर एकसूत्रीकरण अर्थ गणनालयाकडून चालू आहे. आर्थिक वर्षाच्या कालावधींत पाहणीबाबतचे अहवाल पूर्ण होण्याची शक्यता आहे.

### [बी] किमान–वेतनविषयक पाहणी :–

किमान वेतनाविषयक पाहणीचे दोन प्रकार आहेत :-- १ ला प्रकार--पूर्व तयारीचें किंवा प्राथमिक पाहणीचें काम करण्याबाबतचा आणि दुसरा प्रकार किमान दरानें ठरविलेल्या मजुरीच्या परिणामाची अजमावणी करण्याबाबत आहे. प्राथमिक किमान-वेतन पाहणी करण्याचा उद्देश मजुरीबाबतची माहिती गोळा करणें, कामाबाबतच्या शर्ती आणि कांहीं विवक्षित व्यवसायांतील संबंधित गोष्टींची पाहणी करणें हा आहे. किमान वेतन अधिनियमाअन्वयें किमान दरानें मजुरी निश्चित करण्याकरितां योग्य त्या साधनसामुग्रीची तरतूद या पाहणीमुळें करतां येईल. ही पाहणी अशा तऱ्हेनें त्या त्या धंद्याशीं संबंधित अशा कामगारांच्या जीवनमानाची परिस्थिति सुधारण्यास मदत करील. किमान दरांनीं मजुरी निश्चित करण्याचा उद्देश, कमींत कमी दराची मजुरी निश्चित केल्यानें होणारा परिणाम पाहण्याचा आहे. किमान वेतन अधिनियमाखालीं, प्रत्येक ५ वर्षांनी ठरवून दिलेले दर निश्चित करण्यासाठीं किंवा त्याची फेर तपासणी करण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या समित्या आणि मंडळें यांच्या विचारासाठीं अत्यावश्यक असलेली माहिती या पाहणींतून उपलब्ध होते.

## १९५९-६० सालीं साध्य केलेलीं उद्दिष्टें :—

मुंबई राज्यांतील कापडांस रंग देण्याच्या आणि छापण्याच्या धंद्यामधील कामाविषयींची व मजुरी-बाबतची पाहणी यासंबंधींचें काम पूर्ण झालें आहे. क्षेत्र सूचींची सूक्ष्म तपासणीसुद्धां पूर्ण झाली आहे. मुंबईच्या अर्थ गणनालयांत माहिती तपासली जात आहे. १९६०-६१ मध्यें सरकारकडे पाहणीबाबतचा अहवाल सादर करण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. तसेंच मुंबई राज्यांतील स्थानिक प्राधिकाऱ्यांच्या नोकऱ्यांतील मजुरांना किमान वेतन अधिनियम लागूं करण्याबाबतच्या परिणामाच्या अजमावणीसंबंधी आर्थिक व सामाजिक चौकशी करण्यासंबंधींचें क्षेत्रांतील काम देखील पूर्ण करण्यांत आलें होतें. त्या संबंधींच्या माहितीची कार्यालयांत छाननी करण्यांत आली. १९५९-६० सालीं हातीं घेण्यांत आलेलें राज्यांतील हातमागावर आणि यंत्रांवर चालविण्यांत येणारे माग विणण्याच्या व्यवसायाबाबतचे क्षेत्रकाम अजूनहि चालूं आहे.

सिनेमागृहें, प्लॅस्टिक, स्टुडिओ आणि जरीच्या कामासंबंधी उद्योग याबाबतच्या पाहणीच्या कालावधींत गोळा करण्यांत आलेल्या माहितीची छाननी करण्यांत आली असून ती वर्षभर चालूं राहील. वर निर्देश केलेल्या पाहणीबाबतचे अहवाल लिहिण्याच्या कामांत प्रगति आहे. तसेंच, रुग्णालयाच्या पाहणीबाबत गोळा केलेल्या माहितीची छाननी करण्यांत आली. मुंबईच्या अर्थ गणनालयांत तीच छाननी करण्याचें काम चालूं राहील.

रबर, कांच, दोर आणि ट्वाईनचा दोरा, कागदाचा पुठ्ठा आणि गवतापासून तयार केलेला पुठ्ठा याबाबतच्या सामाजिक आर्थिक कामाची चौकशी करण्याबाबतच्या प्रगत योजनेचें काम जवळजवळ पूर्ण झालें आहे आणि वरील व्यवसायासंबंधींची पाहणी करण्याचें काम १९६०-६१ सालीं पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. तसेंच, कॉटन जीन आणि प्रेस, शेत मजुरी, तेलाच्या गिरण्या, मातीचें आणि कांचेचें सामान याबाबतचें मूल्यमापनात्मक पाहणीचें काम करण्याकरितां सुरूं असलेल्या प्रगत योजनेचे काम चालूं आहे आणि १९६०-६१ सालीं पाहणीचें काम हातीं घेण्यांत येईल अशी अपेक्षा आहे.

## १९६०-६१ सालाकरितां कार्यक्रम :—

१९६०-६१ सालांत, खालील पाहणीचीं कामें हातीं घेण्याचें योजिलें आहे :-

**(ए) मूल्यमापनात्मक पाहणी :–**

(१) कृषि.
(२) प्रिंटिंग प्रेस.
(३) कॉटन जीन्स ॲण्ड प्रेसेस.
(४) तेल.
(५) फक्त विदर्भांतील कांच.
(६) ,, ,, उपाहारगृह.
(७) ,, ,, लाख.

**(बी) व्यवसाय विषयक आणि वेतन विषयक पाहणी ( प्राथमिक पाहणी ):–**

(१) कांच.
(२) रबर.
(३) कागदाचे पुठ्ठे, गवतापासून तयार होणारे पुठ्ठे आणि खोके तयार करणें.
(४) दोरा आणि ट्वाईन तयार करणे.

वरील गोष्टींत भर म्हणून, १९६०-६१ सालांत खालील पाहणीसंबंधींचें अहवाल सरकारकडे सादर करण्याची अपेक्षा आहे:—

(१) सिनेमागृहें, (२) प्लॅस्टिक, (३) स्टुडिओ, (४) जरी, (५) कापड रंगविणें आणि छापणें, (६) रुग्णालयें, (७) काम करणाऱ्या वर्गाच्या कुटुंबाच्या जीवनमानाची पाहणी.

**(२) मुंबई कामगार संस्था आणि त्यांचे रुग्णालय याकरितां इमारतीचें बांधकाम :—**

या संस्थेची स्वतःची अशी इमारत नाहीं, त्याकरितां संस्थेसाठीं एक इमारत बांधण्याचें योजिलें आहे. या इमारतीसाठीं आवश्यक असणारी जमीन आधींच मिळविण्यांत आली आहे. मुख्य इंजिनियर, पी. डब्ल्यू डी. ( रस्ते आणि इमारती ), मुंबई यांनी (१) पाणीपुरवठा आणि आरोग्यविषयक व्यवस्था, (२) रिझरव्हॉयर, (३) पंप-घर, (४) पृष्ठभागावरील गटार, (५) आवाराची भिंत, (६) आंतला रस्ता, (७) पायाचा पुढे आलेला भाग, (८) झेंडा लावण्याची जागा आणि संकीर्ण इ. बाकी इतर सोडून, खालच्या बांधकामाकरितां अंदाज आणि नकाशे तयार करण्यासाठी तांत्रिक मंजुरी आणि मुख्य इमारतीचा वरचा भाग बांधण्याकरितां अंदाज आणि नकाशे तयार करण्यासाठीं अंशतः तांत्रिक प्रशासकीय मान्यता दिली आहे. इमारतीचें बांधकाम केव्हांच सुरू झालें असून थोड्याच दिवसांत इमारत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

## भूतपूर्व मुंबई राज्याचा प्रदेश

**(३) दुकानें आणि संस्था यांच्या प्रशासनावर देखरेख ठेवण्याबाबतचा अधिनियम :—**

दुकानें आणि संस्था अधिनियमाच्या प्रशासनाबाबत सुधारणा करण्याकरितां नेमण्यांत आलेल्या समितीनें केलेल्या शिफारसींचा परिणाम म्हणून सन १९४८ चा मुंबईच्या दुकानें आणि संस्था याबाबतच्या अधिनियमाच्या प्रशासनावर देखरेख ठेवणें, हा मुंबई सरकारनें सुरू केलेल्या या योजनेचा उद्देश आहे. देखरेखीबाबतच्या योजनेच्या प्रगतीची फेरतपासणी खालीं केली आहे:—

नगरपालिकेकडून प्रशासनाच्या अधिनियमाची पद्धत समजावून घेण्याच्या उद्देशानें, लेबर कमिशनरच्या हाताखालील अधिकाऱ्यांनीं, अनुक्रमें त्यांच्या त्यांच्या हद्दींतील नगरपालिकेला भेट दिली. आणि १९५९-६० सालांत, लेबर कमिशनरच्या हाताखालील २८ अधिकाऱ्यांनीं, नेमणूक केलेल्या निरीक्षकांची संख्या, अधिनियमाखालीं येणाऱ्या नोकरवर्गाची संख्या, दुकान निरीक्षकानें संस्थांना (दुकानांना) दिलेल्या भेटींची संख्या, खटल्यांची संख्या, मिळालेल्या दंडाची आणि वसूल केलेल्या फीची रक्कम इ. बाबतींत प्रत्यक्ष माहिती गोळा करण्याकरितां ९२ नगरपालिकांना २२१ वेळां भेटी दिल्या.

तपासणीची पद्धत सुधारण्याच्या दृष्टीनें, लेबर कमिशनरच्या हाताखालील देखरेख ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांनीं दुकान निरीक्षकांसमवेत संस्थांना भेटी दिल्या. १९५९-६० सालांत, मुंबई लेबर कमिशनरच्या हाताखालील १८ अधिकाऱ्यांनीं २२३४ संस्थांना (दुकानांना) भेटी दिल्या. दुकानाबाबतचा अधिनियम मोडणारे मालक शोधून काढण्यासाठीं, दुकान निरीक्षकांशीं सहकार्य करून या अधिकाऱ्यांनींहि आकस्मिकरीत्या तपासणी केली. आकस्मिकरीत्या तपासणी करण्याची व्यवस्था मुंबई, पुणें यासारख्या मोठया शहरांत तसेंच, महाड, लोणावळा या सारख्या लहान गांवांतहि केली होती.

वैय्यक्तिक तसेंच गटांच्या अडचणी दूर करण्याच्या उद्देशानें त्यांची चर्चा करून त्याबाबतचा दृष्टिकोन आणि अनुभव यांची देवघेव करण्याच्या दृष्टीनें, आणि चांगली कार्यपद्धति शोधून काढून ती अंमलांत आणण्यासाठीं, दुकान निरीक्षक आणि इतर नगरपालिका अधिकारी यांची जिल्हा परिषद बोलविण्यांत आली.

१९५९-६० सालीं या राज्याच्या नाशिक, ठाणें, सोलापूर, कोल्हापूर, दक्षिण सातारा, अहमदनगर, कुलाबा, रत्नागिरी या जिल्ह्यांत आणि आतां गुजरात राज्याकडे गेलेल्या सुरत, बडोदें, पंचमहाल, अहमदाबाद, आणि साबरकांठा या जिल्ह्यांत अशा परिषदा भरविण्यांत आल्या होत्या.

डिसेंबर १९५९ मध्यें दुकान निरीक्षकांकरितां प्रशिक्षण पाठ्यक्रम सुरू करण्यांत आला होता व ४४ निरीक्षक त्या पाठ्यक्रमास हजर होते. त्या पाठयक्रमांत सैद्धान्तिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिलें जातें.

नगरपालिकांनी, दुकानें व संस्था याबाबतच्या अधिनियमांच्या निरनिराळ्या महत्त्वपूर्ण तरतुदींबाबत प्रादेशिक भाषांमध्यें स्पष्टीकरण करणाऱ्या पुस्तिका व पत्रकें याद्वारें पुरेशी प्रसिद्धी द्यावी, यावर पहाणी अधिकाऱ्यांनी भर दिला.

मालकांच्या निरनिराळ्या संस्थांना, अधिनियमाच्या निरनिराळ्या तरतुदींनुसार चालण्याची आवश्यकता, त्यांच्या सदस्यांच्या नजरेस आणण्यासाठीं पत्रकें वाटून विनंतीहि करण्यांत आली आहे.

### (४) उद्योगजन्य रोग आणि आरोग्यास अपायकारक उद्योगधंदे याबाबतचें संशोधन :-

उद्योगजन्य रोग आणि आरोग्यास हानीकारक उद्योगधंदे या बाबतचें संशोधन करण्याची योजना या राज्यांत अंमलांत आणण्यांत आली आहे. हें काम पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत हातीं घेण्यांत आलें व तें मुंबई शहरांतील कारखान्यापुरतेंच मर्यादित होतें. वैद्यकीय व्यवसायिकांना शरीरशास्त्रीय अपायाची जंतुशास्त्रदृष्ट्या पहाणी करतां येणें शक्य व्हावें म्हणून प्रयोगशाळेच्या कार्याची व्याप्ति वाढविण्याचें योजिलें आहे.

उद्योगजन्य रोग आणि आरोग्यास अपायकारक धंदे याबाबत संशोधन करण्यासाठीं कारखाना विभागानें एक साधनसामुग्रीनें सुसज्ज अशी प्रयोगशाळा स्थापन केली आहे. टायर बनविणें, यांत्रिक उपकरणें, कापड छपाई आणि कापडाच्या गिरण्या यासारख्या कांहीं कारखान्यांतील वातावरणाचें उष्णतामान तसेंच उत्पादनांच्या प्रक्रियांमध्यें शिशापासून होणारी विषबाधा या बाबींचा या प्रयोगशाळेंत प्रामुख्यानें अभ्यास केला जातो. या प्रयोगशाळेंत मिळालेल्या माहितीच्या आधारावर आवश्यक तेथें कारखान्यांतील कामगारां-भोंवतालच्या वातावरणांत सुधारणा करण्याची व्यवस्थापकांना विनंति करण्यांत आली आहे.

रक्ताच्या तपासणीचे परिणाम पाहण्याच्या दृष्टीनें तसेंच प्रतिबंधक उपाय सुचविण्याच्या दृष्टीनें, कारखान्यासभोंवतालच्या वातावरणांतील हवेचें पृथक्करण करण्यांत आलें. ह्यामुळें कारखान्याच्या आवारांत अपायकारक वायू जमा होतात कीं काय ह्याबाबत विभागाला खातरजमा करणें शक्य झालें. बऱ्याचशा बाबतींत कामाबाबतची भोंवतालची परिस्थिति सुधारण्यांत आली.

कारखान्यांत जमा होणाऱ्या धुळीचें प्रमाण अजमावण्यासाठीं संशोधन करण्यांत आलें. फारशा समाधानकारक नसलेल्या एक्झॉस्ट सिस्टिममध्यें सुधारणा करण्यांत आली. त्यामुळें कामाच्या बाबतींत सुरक्षितता आली.

भोंवतालची परिस्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें बऱ्याचशा कारखान्यांतील उष्णतामान मोजण्यांत आलें. अशा प्रकारचीं कामें सध्यां चालू आहेत.

### ५. औद्योगिक स्वास्थ्य, आरोग्य आणि सुरक्षितता यांकरितां बिनसरकारी मंडळें:-

१९४८ च्या कारखान्यांबाबतचा अधिनियम व त्याअन्वयें केलेले नियम ह्यांमध्यें कामगारांचें स्वास्थ्य, आरोग्य व सुरक्षितता याबाबत तपशीलवार तरतूद केलेली आहे व शक्य तेथें या तरतुदीचा लाभ घेता येईल अशी प्रमाणें ठरवून देण्यांत आलीं आहेत. जरी आरोग्य, सुरक्षितता इ. करितां आवश्यक त्या किमान कायदेशीर गरजांची कारखान्याबाबतच्या अधिनियमानुसार तरतूद केलेली असली, तरी वरच्या दर्जाचें स्वास्थ

राखण्याच्या दृष्टीनें या पेक्षां कितीतरी जास्त गोष्टींची आवश्यकता आहे. इतर देशांतील अनुभव पाहतां, मालक आणि कामगार ह्यांस कारखान्यांतील स्वास्थ्य, आरोग्य व सुरक्षितता या बाबतच्या उपाययोजना सुधारण्याबाबत शिक्षण देण्यासाठीं बिन-सरकारी संस्थांनीं आपल्या कार्यक्रमाचा विकास केला तर बरेचसें उद्दिष्ट साध्य होईल.

या कारणासाठीं सरकारनें कारखान्यांतील औद्योगिक कामगारांचें स्वास्थ्य, आरोग्य व सुरक्षितता याबाबतच्या कामाकरितां औद्योगिक सुरक्षितता परिषद या नांवाचें एक बिनसरकारी परिषद स्थापन केली आहे. चित्रपट, व्याख्यानें, पत्रिका इ. द्वारें प्रचार करण्याकरितां आणि तसेंच कारखान्यांत सुरक्षिततेच्या उपाय योजण्याकरितां व आरोग्य राखण्याकरितां मालकांशीं संपर्क ठेवणें, त्याबाबत त्यांचें मन वळविणे व मार्गदर्शन करणें याकरितां या मंडळाला अनुदानें देण्यांत येतात. हें मंडळ वेळोवेळां कारखान्यांतील विशिष्ट अपघातांबाबत सूचना देते व हे अपघात टाळण्यासाठीं उपाययोजना सुचवितें.

**(६) कामगारांच्या शिक्षणाबाबतची योजना-कामगार शिक्षणाचे उद्देश :-**

(अ) भारतीय समाजाचे घटक म्हणून कामगारांना सुजनता, दक्षता व समाजोपयोगी नागरिक होण्याबाबत शिक्षण देणें.

(ब) औद्योगिक संबंध चांगल्या तऱ्हेनें वाढवणे व कामगारांना आपल्या कामांत जास्त वाकबगार बनविणें.

(क) सुधारणेच्या आधुनिक प्रवृत्ति कामगारांना समजावून देणें.

(ड) कामगारांना शिस्तीचें वळण लावणें व त्यांची विचारशक्ति व सुप्त गुणांचा विकास करणें.

(ई) नोव्हेंबर १९५८ मध्यें एक मार्गदर्शी योजना सुरू करण्यांत आली होती व अत्यंत यशस्वी झाली होती. तीच योजना पुढें चालू ठेवण्याचें योजिलें होतें. दरवर्षी जुलैमध्यें एक व नोव्हेंबरमध्यें एक अशीं दोन अधिवेशनें भरतात. प्रत्येक अधिवेशनाला सुमारें १२० कामगारांना प्रवेश दिला जातो व त्यावेळीं कामगारांच्या अत्यंत हिताच्या व प्रत्यक्ष कामकाजाबाबत व जीवनाच्या तऱ्हेबाबतचे विषय शिकविले जातात.

**७. कामगार-मालक संबंधामधील प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्र अभ्यास :-**

कामगार-मालक संबंधाच्या प्रकरणांचा अभ्यास मुम्बई कामगार कल्याण कार्यकर्त्यांच्या संस्थेकडून इंडिया युनायटेड मिल्स लि. मिल नं. १ मध्यें यशस्वी रीतीनें करण्यांत आला. तो भारत सरकारच्या सूचनेवरून करण्यांत आला होता. वेगवेगळ्या कारखान्यांतील औद्योगिक संबंध निकोप ठेवण्यांस आवश्यक असलेल्या गोष्टींचा अभ्यास करण्यासाठीं द्वितीय पंचवार्षिक योजनेनुसार १९६०-६१ मधील नवीन योजना म्हणून जादा तीन प्रकरणांचा अभ्यास करण्याचें योजिलें आहे. रेशीम, रासायनिक व इंजिनियरींग विषयक उद्योगधंद्याचा अभ्यास करण्याचें काम हातीं घेण्यांत येणार आहे.

**८. मुंबई कामगार कल्याण कार्यकर्त्यांकरितां उघडलेल्या संस्थेची वाढ करणें:—**

ही योजना १९६०-६१ पासून सुरू करावयाची आहे. त्या योजनेनुसार, ह्या संस्थेस जोडलेल्या सध्याच्या नोकरवर्गाचा दर्जा वाढवावयाचा आहे व संस्थेंत जादा नोकरवर्ग नेमावयाचा आहे.

**९. डि-कॅज्युअलायझेशन योजना :—**

सध्याच्या योजनेचा विस्तार करण्याचें उद्दिष्ट असलेली ही योजना पुढें ढकलण्यांत आली आहे.

**१०. बहु-उद्देश संस्था उघडणें (विदर्भ) :-**

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत विदर्भातील निरनिराळ्या औद्योगिक शहरांत १७ बहु-उद्देश संस्था उघडण्याचें योजिलें आहे. १९५६-५७ मध्यें अशा दोन बहु-उद्देश संस्था उघडण्यांत आल्या.

१९५७-५८ मध्यें दोन, १९५८-५९ मध्यें चार व १९५९-६० मध्यें २ अश बहु-उद्देश संस्था उघडण्यांत आल्या. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या ४ थ्या वर्षाच्या अखेरीपर्यंत नागपूर येथें दोन व अचलपूर, पुलगांव, अकोलें, बडनेरा, चांदा, हिंगणाघाट, गोंदिया व खामगांव येथें प्रत्येकीं एक याप्रमाणें एकंदर १० बहु-उद्देश संस्था उघडण्यांत आल्या. १९५९-६० मध्ये दोन बहु-उद्देश संस्था उघडण्याचें उद्दिष्ट अशा तऱ्हेनें साध्य झालें आहे.

नागपूर येथें दोन आणि अमरावती, अकोला, बुलढाणा, भंडारा व यवतमाळ या ठिकाणीं प्रत्येकीं एक याप्रमाणें राहिलेल्या सात बहु-उद्देश संस्था, १९६०–६१ या वर्षी उघडण्यांत येतील.

ह्या बहु-उद्देश संस्थांमध्यें बैठे व मैदानी खेळ यांची सोय असते. प्रौढ शिक्षण, हस्तव्यवसाय, भरतकाम, संगोपन शास्त्र यांचे वर्ग ह्या संस्थांत घेतले जातात. मनोरंजक विषयांवरील पुस्तकें असलेलीं वाचनालयें देखील ह्या संस्थांना जोडलीं आहेत.

### (११) कारखाने इ. ताब्यांत घेऊन बेकारी निवारणार्थ त्यांचें संघटन करणें :–

ही योजना रद्द करण्यांत आली आहे.

### (१२) कामगार कल्याण केंद्राची स्थापना ( मराठवाडा ):–

या योजनेनुसार, द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत मराठवाड्यांत ८ कामगार कल्याण केंद्रें उघडावयाचीं आहेत.

१९५९-६० या वर्षी, पार्ली, परभणी व हिंगोली या ठिकाणीं प्रत्येकीं एक याप्रमाणें एकूण तीन कामगार कल्याण केंद्रें स्थापन करण्यांत आलीं. आणि अशारीतीनें त्या वर्षीचें ठरविलेलें उद्दिष्ट पुरें करण्यांत आलें. याशिवाय, १९५८–५९ या वर्षी औरंगाबाद, जालना, सैली, नांदेड आणि लातूर येथें प्रत्येकीं एक याप्रमाणें एकूण पांच केंद्रें सुरू करण्यांत आलीं व १९५९-६० सालीं तीं सुरू ठेवण्यांत आलीं. अशा रीतीनें मराठवाड्यांत १९५९-६० अखेरीस सहा कामगार कल्याण केंद्रें चालू होतीं. ह्यामुळें द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या चौथ्या वर्षाचें उद्दिष्ट साध्य झालें. १९६०–६१ मध्यें हीं केंद्रें चालू ठेवण्यांत येतील.

ह्या कामगार कल्याण केंद्रांत बैठे व मैदानी खेळ यांची सोय करण्यांत आली आहे. बैठ्या खेळांत कॅरम, बुद्धिबळ, सोंगट्या, सर्प आणि शिडी, लुडो, रिंग बोर्ड इ० सारखे बैठे खेळ व व्हॉलीबॉल, फूटबॉल, टेनी–कॉईट इ० मैदानी खेळ खेळले जातात. व्यायामासाठींदेखील व्यवस्था करण्यांत आली असून यासाठीं डबल बार, चेस्ट एक्सपांडर, स्प्रिंगचें डंबेल व लोखंडी डंबेल, वजनें उचलण्याचे संच यांचीहि व्यवस्था केलेली आहे. कामगारकल्याण केंद्रांत "भजनां"ची देखील व्यवस्था केली आहे आणि त्यासाठीं या केंद्रांत पेटी व तबला ठेवण्यांत आलेले आहेत. लहान मुलांसाठीं लगोरीचा संच, उड्या मारण्यासाठीं दोऱ्या, लेझिम यांचीहि व्यवस्था केली आहे. कामगारांसाठीं शिवणकाम व भरतकामाचें वर्ग घेण्यांत येतात. ह्या केंद्रांत वाचनालयासाठीं एक खोली असून तींत लोकप्रिय वर्तमानपत्रें व पाक्षिकें मिळूं शकतात.

### (१३) औद्योगिक कामगारांसाठीं वाचनालयाची स्थापना (मराठवाडा) :—

द्वितीय पंचवार्षिक योजनेनुसार, मराठवाड्यांत आठ वाचनालयें स्थापन करावयाचीं आहेत. ठरविण्यांत आलेलें उद्दिष्ट पूर्ण करण्याकरितां १९५९-६० या वर्षी, पार्ली, परभणी व हिंगोली या ठिकाणीं प्रत्येकीं एक याप्रमाणें, तीन वाचनालयें उघडण्यांत आलीं. १९५८-५९ सालीं उघडण्यांत आलेली पांच वाचनालयें, १९५९-६० मध्यें चालू ठेवण्यांत आलीं. अशा तऱ्हेनें, द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या चौथ्या वर्षीचें उद्दिष्ट साध्य होऊन, औरंगाबाद, जालना, सैली, नांदेड, लातूर, पार्ले, परभणी व हिंगोली या ठिकाणीं प्रत्येकीं एक याप्रमाणें, १९५९-६० च्या अखेरीस आठ वाचनालयें स्थापन करण्यांत आलीं. ही

वाचनालयें ह्या ठिकाणीं स्थापन झालेल्या कामगार कल्याण केंद्राला सलग्न असून, त्यांत मनोरंजक विषयांवरील हिंदी, मराठी व उर्दू पुस्तकें असतात. १९६०-६१ मध्यें हीं वाचनालयें चालू राहतील.

## १४. कामगारांकरितां साक्षरता-वर्गाची स्थापना (मराठवाडा) :—

७६ साक्षरता-वर्ग उघडण्याच्या उद्दिष्टापैकीं, १९५९-६० वर्षी, औरंगाबाद, जालना, नांदेड, लातूर, परभणी, पार्ली, सैली व बीड या ठिकाणीं २१ साक्षरता-वर्ग सुरू करण्यांत आले. अधिकाऱ्यांकडून चांगले प्रयत्न होऊनदेखील लोकांकडून फारच कमी प्रमाणांत प्रतिसाद मिळाला, हें ठरविलेलें उद्दिष्ट पूर्ण न होण्याचें प्रमुख कारण होय. उतारवयांत अक्षर ओळख करून घेण्यास कामगार तयार नसतात. तथापि याहून सुपरिणाम व्हावेत म्हणून प्रयत्न चालू असून यावर्षीहि ते चालू ठेवण्यांत येतील.

## १५. कामगार कल्याण केंद्रासाठीं इमारती बांधणें (मराठवाडा) :—

१९५९-६० सालीं कामगार कल्याण केन्द्रासाठीं औरंगाबाद येथें इमारती बांधण्यासाठीं सरकारनें मंजुरी दिलेली आहे आणि याबाबतचे नकाशे व रु. ३३,००० चे अंदाज यांस प्रशासकीय मान्यता मिळविण्यांत आली.

बरेचसे प्रयत्न करूनहि इमारतीसाठीं योग्य अशी जागा मिळूं शकली नाहीं. म्हणूनच १९५९-६० सालीं बांधकामाबाबतचें काम हातीं घेण्यांत आलें नाहीं. योग्य अशी जमीन मिळविण्यासाठीं बरेच प्रयत्न करण्यांत येत असून, १९६०-६१ सालीं बांधकाम हातीं घेण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. या इमारतीशिवाय, १९६०-६१ सालीं कामगार कल्याण केन्द्रासाठीं जालना, नांदेड, लातूर व सेलू येथील प्रत्येकीं एक इमारत याप्रमाणें चार जादा इमारती बांधण्यांत येतील.

## १६. मराठवाडा येथें सरकारी औद्योगिक प्रशिक्षण वर्कशॉप चालूं करणें :—

१९६०-६१ या वर्षी अंमलांत आणावयाची ही एक नवीन योजना आहे. निरनिराळ्या व्यवसायाबाबत मुख्यत्वें औद्योगिक कामगार व त्यांच्यावर अवलंबून असलेले इसम यांना प्रशिक्षण देण्यासाठीं, मराठवाड्यांत सरकारी औद्योगिक प्रशिक्षण वर्कशॉप उघडण्याचें योजिलें आहे. यामुळें कामगारांना फावल्या वेळांत नवीन कामें शिकतां येऊन सक्तीच्या बेकारीचा काळ घालवितां येईल. प्रत्येकीं ४८ कामगार असलेल्या दोन तुकड्यात मिळून एकूण ९६ कामगारांना प्रशिक्षण देण्यांत येईल.

## नोकरी विनिमय संचालनालय

ह्या संचालनालयाकडून १९६०-६१ सालीं खालील विकास योजना हातीं घेण्यांत येतील:—

(१) नोकरी मिळवून देण्याच्या कार्याचा विस्तार.

(२) नोकऱ्यांच्या उपलब्धतेविषयींची माहिती गोळा करणाऱ्या केंद्राची स्थापना.

(३) विनिमय केन्द्रामध्यें युवकांना नोकऱ्या मिळवून देणारी शाखा स्थापन करणें.

### (१) नोकरी मिळवून-देण्याच्या कार्याचा विस्तार

मराठवाड्यांतील २६ जिल्ह्यांपैकीं प्रत्येक जिल्ह्यासाठीं नोकरी विनिमय केंद्राला ही एक प्रकारें मदतच होय. सध्यां दक्षिण सातारा, उस्मानाबाद व परभणी ह्या तीन जिल्ह्यांखेरीज सर्व जिल्ह्यांत, त्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणीं नोकरी–विनिमय केंद्रें आहेत. १९६०–६१ सालीं बाकी राहिलेल्या तीन जिल्ह्यांत प्रत्येकीं एक नोकरी–विनिमय केंद्र उघडण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्यामुळें ठरलेलें उद्दिष्ट साध्य होईल.

### (२) नोकऱ्यांच्या उपलब्धतेविषयींची माहिती गोळा करणाऱ्या केन्द्रांची स्थापनाः—

राज्याच्या निरनिराळ्या भागांत प्रत्यक्ष उपलब्ध असलेल्या व पुढें उपलब्ध होऊं शकणाऱ्या नोकऱ्या किती आहेत आणि त्यासाठीं कोणत्या पात्रतेचे कामगार लागतील या संबंधींची माहिती निश्चित करणें

आणि कामगारांचा पुरवठा व मागणी यांचें गुणात्मक व संख्यात्मक मूल्यमापन करणें, हें ह्या केंद्राचें काम आहे. या पथकाला नोकऱ्यांच्या उपलब्धतेसंबंधींच्या माहितीचें संकलन व पृथक्करण करून आणि त्यावरून काढलेल्या निष्कर्षांचा राष्ट्रीय पातळीवर समन्वय करण्यासाठीं ती माहिती डायरेक्टर जनरल ऑफ री-सेटलमेंट अँड एम्प्लॉयमेण्ट यांच्याकडे पाठवावी लागते.

गोळा केलेली माहिती ही बिगर शेतकी उद्योगधंद्यांतील नोकऱ्यांसंबंधींची असेल, ज्यांना नोकऱ्या आहेत त्यांचाहि तींत समावेश होईल. सध्यां नोकरी विनिमय केंद्रें सार्वजनिक क्षेत्रांतील सर्व संस्थांकडून माहिती गोळा करीत असतात. खाजगी उद्योग क्षेत्रातील माहिती मात्र फक्त नागपूर जिल्ह्यांतील संस्थांकडूनच मिळविली जाते. जून १९६० च्या अखेरीस खाजगी उद्योग क्षेत्रांतील माहिती सोलापूर व पुणें जिल्ह्यांतूनहि गोळा केली जाईल. चालू आर्थिक वर्षी खाजगी क्षेत्राच्या अभ्यासाचा खालील जिल्ह्यांमध्यें विस्तार केला जाईलः—

(१) बृहन्मुम्बई.
(२) कोल्हापूर.
(३) जळगांव.
(४) औरंगाबाद.
(५) वर्धा.
(६) नाशिक.

## (३) विनिमयांमध्यें युवकांना नोकऱ्या मिळवून देणारी शाखा स्थापन करणें :—

युवकांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठीं एक खास विभाग असून तो दुय्यम शाळेंत जाण्याचें वय ओलांडलेले तरुण, माध्यमिक शाळेंतून बाहेर पडलेले, मॅट्रिक झालेले व पांढरपेशा समाजांतील तरुण यांना त्यांच्या लायकी व आवडीनुसार आपला व्यवसाय निवडण्यांत मदत करण्याकरितां सुरू केला आहे. मार्गदर्शन केलेल्या तरुणांना योग्य उद्योग मिळवून देणें हें नोकरी-विनिमय केंद्राचें प्राथमिक कार्य आहे. सध्यां राज्यांत ६ केंद्रें काम करीत आहेत. १९६०-६१ यावर्षी खालील नोकरी विनिमय केंद्रांत आणखी आठ केंद्रें उघडण्याचें योजिलें आहे.

(१) सोलापूर
(२) नाशिक
३) रत्नागिरी
४) अकोला
५) चांदा
६) यवतमाळ
७) नांदेड
८) बीड.

# जलसिंचन व विद्युत् विभाग

जलसिंचन व विद्युत् विभागांत खालील योजना अंमलांत आणणें आणि त्यांची व्यवस्था पाहणें हीं काम करण्यांत येतात—

एक– जलसिंचन, जलनिस्सारण व बंधारे याबाबतच्या योजना.

दोन– पूर नियंत्रण योजना.

तीन– लोकस्वास्थ्याचीं बांधकामें.

चार– जलविद्युत् व बहुउद्देश्य प्रकल्प.

पांच– मुंबई शहरांतील खाड्या बुजवून जमीन निर्माण करण्याच्या योजना.

सहा– इंजिनीयरिंग विषयक संशोधन.

**एक– जलसिंचन, जलनिस्सारण व बंधारे याबाबतच्या योजना**

पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सुरू केलेला महाराष्ट्र राज्याचा, अल्प व दीर्घ मुदतीचा विस्तृत जलसिंचनाचा कार्यक्रम वेळापत्रकानुसार पूर्ण करण्यासाठीं सरकारनें आपले सर्व प्रकारचे प्रयत्न तीव्रतर केले आहेत. जलसिंचनाच्या सोयींची वाढ झाल्यास अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें आणि अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण होणें ह्या गोष्टी साध्य होणें शक्य होईल.

**अ. प्रमुख व मध्यम स्वरूपाचीं जलसिंचनविषयक कामें**

द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील, फेर आंखणी केलेल्या उर्वरित तसेंच नवीन प्रमुख व मध्यम स्वरूपाच्या जलसिंचनविषयक कामांसाठीं रु. ३,८९९·७६ लाख इतकी तरतूद केलेली आहे. त्यापैकीं, द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील पहिल्या चार वर्षांत, म्हणजे १९५६-५७, १९५७-५८, १९५८-५९ आणि १९५९-६० या वर्षांत या कामांवर रु. १,८७९·०० लाख इतकी रक्कम खर्च झाली असेल असा अंदाज आहे. बांधकामविषयक कार्याची गति वाढविल्यामुळें, द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षांत सुमारें १,७०० लाख रुपये (सेवकवर्ग धरून) खर्च येईल अशी अपेक्षा आहे. दोन्ही पंचवार्षिक योजनांच्या कालावधींतील कांहीं कामें पूर्ण झाल्यामुळें आणि ज्या कार्याचें बांधकाम प्रगत अवस्थेंत आहे अशा कांहीं बांधकामांतून प्रत्यक्ष जलसिंचनाचें कार्य सुरू झाल्यामुळें १९५८-५९ वर्षाच्या शेवटीं ८१,९०० एकर इतका जादा प्रदेश जलसिंचनाखालीं येण्याची यशक्यता निर्माण झाली आहे. अशाप्रकारें जलसिंचनाखाली येणें शक्य असलेल्या जमिनीपैकीं सुमारें ९६,००० एकर जमिनींत प्रत्यक्षांत जलसिंचन करण्यांत आलें. १९५९-६० च्या अखेरपर्यंत १,०४,००० एकर जमीन जलसिंचनाखालीं येईल अशी अपेक्षा आहे. आणि जलसिंचनाखालीं येणाऱ्या जमिनीचें प्रमाण उत्तरोत्तर वाढत जाईल.

(प) महाराष्ट्र प्रदेशः—

(एक) जलसिंचनाचीं मोठीं कामें:—

(१) गंगापूर प्रकल्प, अवस्था १ (२) रानंद तलाव, आणि (३) घोड, हीं तीन जलसिंचनाचीं मोठीं कामें पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सुरूं करण्यांत आलीं आहेत.

या कामांपैकीं रानंद तलावाचें काम पूर्ण झालें आहे. गंगापूरच्या पहिल्या टप्प्याचें काम जवळजवळ पूर्ण झालें आहे. घोडविषयीं पहातां, प्रत्यक्ष धरणाचें बांधकाम जवळजवळ पूर्ण झालें आहे; फक्त धरणांतील जादा पाणी वाहून जाण्याकरतां दरवाजे बसविण्याचें काम तेवढें बाकी आहे. घोड डाव्या तीरावरील कालव्याचें बांधकाम बरेंच प्रगत अवस्थेत असून पहिल्या २० मैलांत जलसिंचन अगोदरच चालूं झालें आहे. घोड उजव्या तीरावरील कालव्याचें मातीचें कामहि चालूं झालें आहे.

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत हातीं घेतलेल्या जलसिंचनविषयक मोठ्या कामाची सद्यःस्थिति खालीलप्रमाणें आहे:—

(१) वीर धरण प्रकल्पः—

वीर येथील मुख्य चिरेबंदी धरण आणि तिसांगी येथील पिछाडीचा तलाव कोणी बांधावयाचें तें ठरविण्यांत आलें असून त्याबाबतचें काम समाधानकारकपणें चालूं आहे. पूर्वी ठरविण्यांत आलेल्या जून १९६२ पूर्वी, जून १९६१ मध्येंच मुख्य धरण बांधून पूर्ण करण्यासाठीं प्रयत्न चालूं आहेत.

(२) खडकवासला प्रकल्प :—

पाणशेत धरण येथील खिंड बुजविण्याचें काम १९५९ च्या पावसाळ्यापूर्वींच पूर्ण करण्यांत आलें होतें. पूर्वी ठरविण्यांत आलेल्या १९६२ च्या पूर्वींच, जून १९६१ मध्यें पाणशेत धरणाचें काम पूर्ण करण्याचें योजिलें आहे. मुठा उजव्या तीरावरील कालव्याच्या वेगवेगळ्या मैलांवरचीं कामें चालूं आहेत. पाणशेत धरण तयार होतांच त्याचें पाणी वापरांत आणतां यावें म्हणून पुण्यापर्यन्तचें पहिल्या १२ मैलांचें कालव्याचें कठीण असलेलें काम जून १९६१ पूर्वी पूर्ण करण्याचें आणि कालव्याचें पुढील ७० मैलांचें बांधकाम जून १९६२ पर्यंत पूर्ण करण्याचें योजिलें आहे.

(३) मुळा प्रकल्पः—

धरणासाठीं निवडलेली जागा बांधकामाच्या दृष्टीनें बरीच अडचणीची असल्याचें दिसून आल्यामुळें त्या जागेऐवजीं इतर जागाबाबत विचार करण्यांत आला आणि आतां बोरेगांव-नोंदूर येथें मातीचें धरण बांधण्याचें निश्चित करण्यांत आलें आहे. खणलेल्या खंदकांतून माती-दगड उकरून काढण्याचें काम सुरूं केलें आहे आणि त्याची प्रगति होत आहे. मुळा उजव्या तीरावरील कालव्याचें ६-७, १०-१३, १९-२२, २४ आणि २८ या मैलांवरील मातीचें काम आधींच सुरूं केलेलें आहे आणि जून १९६२ पर्यंत पहिल्या ३६ मैलांत वांटप पद्धतीनें मुख्य कालव्याचें काम पूर्ण करण्याचें योजिलें आहे.

(४) गिरणाः—

पायाचें बांधकाम आणि पंझान धरणाच्या वरच्या भागावरचें जादा असलेलें पाणी वाहून जाण्यासाठीं ठेवलेल्या वरील भागांपैकीं कांहीं भागांचें बांधकाम व जामडा आणि दहिगांव येथील जलग्राही बांध यांचें बांधकाम कोणामार्फत करावयाचें हें निश्चित ठरविलें असून कामाला सुरवात झाली आहे. पंझान धरणाच्या जोड भिंतीचें काम पूर्ण झालें आहे. जामडा डाव्या तीरावरील कालव्याची पुनर्रचना आणि वाढ यांबाबतचें काम जोरांत सुरू आहे. आणि तें बांधकाम जून १९६२ पर्यंत सर्व दृष्टीनें पूर्ण करावयाचें आहे. प्रकल्पाच्या सर्व अंगाचें काम १९६०-६१ मध्यें जोरांत चालू राहील.

(५) वारणा प्रकल्प :—

एकूण खर्च कमी करण्याच्या दृष्टीनें वारणा प्रकल्पाची आमूलाग्र सुधारणा करण्यांत आली आहे. आणि अशा त्या सुधारलेल्या प्रकल्पास नुकतीच प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे. या सुधारलेल्या प्रकल्पानुसार चांदोली येथें सांठवणीचें धरण बांधण्याचें आणि नदीच्या दोन्ही तीरावरच्या बाजूनें जलसिंचनासाठीं पाणी घेतां यावें म्हणून धरणाच्या खालच्या बाजूला पाणी अडविण्याचें ५ ते ६ जलग्राही बांध बांधण्याचें योजिलें आहे. कादोली येथें एका जलग्राही बांधाचें काम पूर्ण झालें आहे. चिंचोली येथें दुसऱ्या जलग्राही बांधाच्या कामाला अगोदरच सुरवात झालेली आहे आणि हरगुडवाडी व कुंदलवाडी येथील जलग्राही बांधाचें बांधकाम हें, आवश्यक तीं प्राथमिक कामें पुरीं होतांच सुरू करण्यांत येईल. प्रमुख धरणाचें बांधकाम चालू पावसाळ्यानंतर हातीं घेण्यात येईल अशी अपेक्षा आहे.

(६) कुर्नूर प्रकल्प :—

पूर्वीच योजिलेल्या प्रकल्पामुळें सुपीक जमिनीचा बराचसा भाग हा पाण्याखालीं जात होता. यामुळें, ज्या जमिनीस जलसिंचनाचा लाभ मिळू शकेल त्या जमिनीच्या क्षेत्रफळाशीं तुलना करतां पाण्याखालीं जात असलेल्या जमिनीचें क्षेत्रफळ कमी करण्याच्या दृष्टीन या प्रकल्पांत सुधारणा करण्यांत आली. सुधारणा करण्यांत आलेल्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याच्या दृष्टीनें तो सरकारकडून तपासला जात आहे. सुधारणा करण्यांत आलेला प्रकल्प हा आतां तयार असल्यानें, प्रारंभिक कामें पूर्ण होतांच त्या प्रकल्पाचें काम चालू वर्षीं सुरू करण्यांत येईल अशी अपेक्षा आहे.

(७) कोयना जलसिंचन प्रकल्प :—

विद्युत् निर्मितीसाठीं आवश्यक असलेल्या पाण्यापेक्षां, १९६२ नंतर उपलब्ध होऊं शकणाऱ्या जादा पाण्याच्या सांठ्याचा उपयोग करून घेण्यासाठीं, तृतीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या या प्रकल्पाचीं प्राथमिक कामें हीं या वर्षीं हातीं घेण्याचें योजिलें आहे. आणि त्याकरितां चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत रु. १० लाखांची तरतूद करण्यांत आली आहे.

[दोन] जलसिंचनाचे मध्यम प्रकल्पः—

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत एकूण ८ मध्यम जलसिंचन प्रकल्पांचा समावेश केलेला आहे. त्यापैकीं ७ योजना ह्या उर्वरित योजना असून १ योजना नवीन आहे. उर्वरित ७ योजनांपैकीं

६ योजना पूर्ण करण्यांत आल्या आहेत आणि १ योजनेचें, म्हणजे कृष्णा कालव्याचा विस्तार करण्याच्या योजनेचें बांधकाम प्रगत अवस्थेंत आहे. नवीन योजना, म्हणजेच गंगापूर योजना, अवस्था दोन, हिचें बांधकामहि प्रगत अवस्थेंत आहे.

(बी) विदर्भ प्रदेश:–

**(एक) जलसिंचनाचे मोठे प्रकल्प–वाघ, इतियाडोह, काटेपूर्णा व दिना :–**

भूतपूर्व मध्य प्रदेश सरकारकडून या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. तथापि ह्या प्रकल्पांची संपूर्णत: फेरआंखणी करणें आवश्यक आहे असें दिसून आलें. आवश्यक ती तपासणी पूर्ण झाली असून विचार चालूं असलेल्या दिना नदी प्रकल्पाखेरीज इतर सुधारलेल्या प्रकल्पांच्या प्रतिवृत्तांना प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे. हे प्रकल्प मध्यवर्ति जल आणि विद्युत् कमिशनकडे निर्णयासाठीं पाठविण्यांत आले आहेत. दरम्यानच्या काळांत जाण्यायेण्याचे रस्ते, तात्पुरत्या इमारती इ. बांधण्याचीं कामें सुरूं आहेत.

**बोर:–**

कालव्याचें २ ते ९ मैलापर्यंतचें खोदकाम पूर्ण झालेलें आहे आणि ६ ते १४ मैलापर्यंतचें खोदकाम चालूं आहे. १५ ते १९ मैलापर्यंतच्या कालव्याच्या आंखणीस मान्यता मिळालेली आहे. मातीच्या धरणाचे नकाशे आणि खर्चाचे अंदाज यांना नुकतीच तांत्रिक मंजुरी मिळाली आहे आणि थोड्याच दिवसांत कामाला सुरवात केली जाईल. चर खोदण्यांचें काम पुरें होत आलें आहे. या प्रकल्पामुळें ज्यांचें नुकसान होण्याचा संभव आहे अशा लोकांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं पुनर्वसाहत समिति नेमण्यांत आली आहे.

**नळगंगा:–**

मातीच्या मुख्य धरणाच्या खोदलेल्या खंदकांतून दगडमाती उकरून काढण्याचें काम चालूं आहे. त्याचप्रमाणें जादा पाणी वाहून नेणाऱ्या कालव्याच्या कायम व तात्पुरत्या खोदकामांत देखील बरीचशी प्रगति झाली आहे. २ ते १८ मैलांपर्यंतचें मुख्य कालव्याचें मातीचें बांधकाम चालूं आहे. ज्या लोकांचें नुकसान होण्याचा संभव आहे, अशा लोकांचा प्रश्न सोडविण्यासाठीं पुनर्वसाहत समिति नेमण्यांत आली आहे.

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत या प्रदेशांतील फक्त दोन मध्यम योजनांचाच समावेश केला आहे. या दोन योजनांचें काम केव्हांच सुरू करण्यांत आलें आहे.

**(सी) मराठवाडा :—**

**(१) प्रमुख जलसिंचन प्रकल्प–पूर्णा :—**

येलदारी आणि सिद्धेश्वर येथील दोन्हीहि धरणांवरील काम जोरांत चालूं आहे. पहिल्या १८ मैलांमध्यें कालवे खोदण्याचें काम चालूं आहे.

**मनोर :—**

धरणावरील व त्याचप्रमाणें कालव्याच्या पहिल्या ६ मैलांतील काम चालूं आहे. धरणाची जागा बदलण्यासाठीं दुर्दैवानें अविचारी आंदोलन चेतविण्यांत येत आहे. तथापि, इतर सर्व

जागांचे गुणदोष लक्षांत घेऊन सरकारनें, वारवंत येथें धरणाची जागा निश्चित केली आहे. या धरणामुळें ज्यांचें नुकसान झालें आहे अशा इसमांच्या पुनर्वसनाचा प्रश्न हाताळण्याकरितां सरकारनें आधींच एक पुनर्वसन समिति स्थापन केली आहे आणि जेव्हां नुकसान पोहोंचलेल्या इसमांना त्यांच्या योग्य पुनर्वसनासंबंधीं निश्चिति वाटेल त्यावेळीं कालांतरानें हें आंदोलन बंद होईल अशी आशा आहे.

**(२) जलसिंचनाचीं मध्यम कामें:—**

ह्या प्रदेशांत, द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेले, जलसिंचनाचे एकूण २२ मध्यम प्रकल्प ( ९ उर्वरित आणि १३ नवीन योजना ) आहेत. ३ उर्वरित कामें पूर्ण झालीं असून बाकीचीं कामें चालू आहेत. १३ नवीन प्रकल्पांपैकीं ५ प्रकल्पांच्या कामांस सुरवात करण्यांत आली आहे. उरलेल्या ८ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता आणि तांत्रिक मंजुरी मिळाली असून त्यांच्या अंमलबजावणीस सुरवात केली आहे.

सर्व कामांना प्रशासकीय मान्यता आणि क्रमाक्रमानें तांत्रिक मंजुरी मिळाल्यावर ह्या कार्यक्रमास गति मिळेल आणि त्यांत समाधानकारक प्रगति होईल.

**पुनर्वसन :—**

ह्या प्रकल्पांत बऱ्याच मोठ्या क्षेत्रफळाची जमीन जाणार असल्यामुळें कित्येक लोकांना स्थलांतर करावें लागणार आहे. त्यांच्या पुनर्वसनाची योग्य रीतीनें सोय करण्याकरितां सरकारनें वीर, खडकवासला, गिरणा, पूर्णा, मनोर, बोर आणि नळगंगा प्रकल्पांकरितां पुनवसन समित्या स्थापन केल्या आहेत. इतर प्रकल्पांकरितां सुद्धां योग्य वळीं अशाच तऱ्हेच्या समित्या स्थापन करण्यांत येतील. जेथें पुनर्वसनाचें काय आधींच पूर्ण झालें आहे, असे खडकवासला आणि वीर हे प्रकल्प पुनर्वसनाच्या अवस्थेपर्यंत गेले असून या प्रकल्पांबाबत मिळालेल्या अनुभवावरून असें दिसून आलें आहे कीं, अशा प्रकारच्या समित्यांमुळें हा प्रश्न सुटण्यास बरीच मदत होते.

**बी. जलसिंचनाचीं लहान कामें** ( जलनिस्सारणाच्या कामासहित ):—

**(ए) महाराष्ट्र प्रदेश:—**

कृषिविषयक उत्पादनाची वाढ करण्याच्या मोहिमेंतील, जलसिंचनाच्या छोट्या कामांनीं बजावलेली महत्त्वपूर्ण कामगिरी लक्षांत घेऊन, सरकारनें, द्वितीय पंचवार्षिक योजनेंत जलसिंचनाच्या छोट्या कामांकरितां रु.३२१·१४ लाख रुपयांची तरतूद (सुधारलेली) केली आहे.

पहिल्या तीन वर्षांत ( १९५६–५७ ते १९५८-५९ ) रु. १०९·८६ लाख इतकी रक्कम खर्च करण्यांत आली आणि १९५९–६० ह्या वर्षांत सुमारें १०९ लाख रुपये खर्च केले असावेत असा अंदाज आहे. १९६०–६१ ह्या वर्षाकरितां योजिलेली अंदाजपत्रकीय तरतूद रु. १०३·०३ लाख इतकी आहे.

**(बी) विदर्भ:—**

विदर्भ प्रदेशांतील जलसिंचनाच्या लहान कामांकरितां, द्वितीय पंचवार्षिक योजनेमध्यें रु. ११९·६४ लाख इतकी सुधारलेली तरतूद करण्यांत आली आहे. (नलिका विहिरींकरितां

केलेल्या तरतुदींतून तबदील करण्यांत आलेल्या ३९ लाख रुपयांचा समावेश करून योजनेंतील वांटणी रु. ५९·२९ लाख इतकी आहे). द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत रु. ५४·२९ लाख इतका खर्च करण्यांत आला. १९५९-६० मधील अंदाजें खर्च रु. ४३·९६ लाख इतका आहे, आणि १९६०-६१ ह्या वर्षाकरितां रु. ३०·०५ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्याचें योजिलें आहे. पहिल्या दोन वर्षांत ( १९५६-५७ आणि १९५७-५८ ) १९१४ एकर इतकी जादा जमीन जलसिंचनाखालीं आणली गेली.

**(सी) मराठवाडा:—**

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत जलसिंचनाच्या लहान कामांकरितां रु. ६६·०० लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यांत आलेली आहे. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत कामांची प्रगति फारशी दिसून आली नाहीं; कारण जलसिंचनाचीं लहान कामें, पाहाणी व तपासणी यांच्या अवस्थेंत होतीं. तथापि, द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या तिसऱ्या वर्षामध्यें आठ योजनांना प्रशासकीय मान्यता आणि तांत्रिक मंजुरी मिळाली असून, यांपैकीं कांहीं कामांच्या बांधकामासुद्धां प्रारंभ करण्यांत आला आहे. योजनेच्या पहिल्या तीन वर्षांमध्यें रु. ७·७० लाख इतका खर्च करण्यांत आला आहे. १९५९–६० मधील खर्चाचे सुधारलेले अंदाज रु. ३०·९६ लाख इतके आहेत. चालू वर्षाकरितां रु. ३३·३० लाख इतक्या रकमेची तरतूद करण्याचें योजिलें आहे.

**(डी) जलसिंचनाच्या संभाव्य सोयींचा पूर्णपणें उपयोग करून घेण्याकरितां केलेली उपाययोजना:-**

जलसिंचनाचा पूर्णपणें विकास घडवून आणण्याकरितां आणि पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग करण्याकरितां, सरकार वेळोवेळीं आवश्यक त्या उपाययोजना हातीं घेत आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पूर्वींच चालू असलेल्या जलसिंचनाच्या जुन्या कामांचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें. कांहींच प्रश्न संभवत नाहीं; कारण ह्या कामांमुळें उपलब्ध होणाऱ्या, पाण्याच्या पुरवठ्याचा, पूर्णपणें उपयोग केला जात आहे. हीं कामें अनेक वर्षें चालू ठेवल्यानंतरच ह्या कामांपासून मिळणाऱ्या जलसिंचनाचा पूर्ण विकास झाला आहे. शतकानुशतकें कोरडवाहू पद्धतीनें शेती करण्याची संवय असलेल्या शेतकऱ्यांना जलसिंचित शेतीच्या पद्धतीची माहिती करून घ्यावयाची असल्यामुळें, जलसिंचनाचा विकास होण्यास वेळ लागतो.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत आणि द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत जलसिंचनाचीं अनेक कामें बहुतेक पूर्ण होत आलीं असून त्यांपासून लोकांना जलसिंचनाचा फायदा मिळूं लागला आहे. संभाव्य जलसिंचन उपलब्ध होऊं शकलें म्हणजे त्याचा पूर्णपणें उपयोग करून घेण्याचे मार्ग आणि उपाययांचा विचार करणें आवश्यक झालें आहे.

अद्यापपर्यंत, सरकारनें ह्या दिशेनें केलेल्या कांहीं उपाययोजना खालीं दिल्या आहेत:—

(१) आधींच उपलब्ध असलेल्या पाण्याचा संपूर्ण प्रमाणांत उपयोग करून घेण्यास ज्या अडचणींमुळें किंवा अडथळ्यांमुळें प्रतिबंध होतो, त्या अडचणींचा किंवा अडथळ्यांचा अभ्यास करणें, त्यांचें पृथःकरण करणें आणि त्या नष्ट करण याकरितां सरकारनें, जलसिंचनाच्या लहान कामांकरितां राज्य जलविनियोग समिति, कृषिविषयक उप-समिति, व स्थायी समिति, इत्यादि समित्यांची नेमणूक केली आहे.

(२) जेथें ५,००० एकरांपेक्षां जास्त जमिनींत जलसिंचन करतां येणें शक्य आहे परंतु सध्यां तेथे जलसिंचन करण्यांत येत नाहीं अशा प्रदेशांत पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याकरितां पूर्णकालीन काम करणारे अधिकारी म्हणून खास मामलेदार नेमण्याचे राज्य जल-विनियोग समितीनें ठरविलें आहे. ह्या ठरावानुसार, बीड जिल्ह्यांत अशा खास अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली आहे. हा खास अधिकारी जलसिंचनाच्या सुधारलेल्या पद्धतीनें शेती करण्याकरितां, शेतकऱ्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न करील.

(३) (ए) अधिक फायदेशीर अशा कोणत्या नवीन पिकांची लागवड करावी आणि (बी) अतिशय काटकसरीनें जलसिंचित-शेतीची पद्धत कशी हातीं घेतां येईल आणि त्यापासून जास्तींत जास्त फायदे मिळवितां येतील यांबाबत शेतकऱ्यांना माहिती करून देण्याकरितां प्रायोगिक व प्रात्यक्षिक केंद्रेंसुद्धां सरकार स्थापन करीत आहे. कृषि विभागाकडून अनेक ठिकाणीं हीं प्रात्यक्षिक केंद्रें उघडण्यांत येत आहेत.

(४) शेतकऱ्यांनीं जलसिंचित पद्धतीनें शेती करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून त्यांचें मन वळविण्यासाठीं व कोरडवाहू शेतीपेक्षां जलसिंचित शेतीच्या पद्धतीचे फायदे कोणकोणते आहेत हें शेतकऱ्यांना स्वतःच्या अनुभवानें पटावें म्हणून जलसिंचनाच्या पूर्ण झालेल्या नवीन कामांच्या पहिल्या तीन वर्षांत, जलसिंचनाच्या कार्याकरितां लागणारा पाण्याचा पुरवठा सवलतीच्या दरानें करण्यासाठीं नुकतेच आदेश देण्यांत आले आहेत. देण्यांत येणाऱ्या सवलती पुढीलप्रमाणें आहेत:—
[१] पहिल्या वर्षी अन्नधान्य आणि चारा यांच्या पिकांकरितां कांहींच पाणीपट्टी आकारण्यात येणार नाहीं, दुसऱ्या वर्षी वाजवी दराच्या १/३ इतकी पाणी-पट्टी आकारण्यांत येईल, व तिसऱ्या वर्षी २/३ इतकी पाणी-पट्टी आकारण्यांत येईल आणि जलसिंचनास सुरुवात केल्यापासून चौथ्या वर्षी मात्र संपूर्ण दरानें पाणीपट्टी आकारण्यांत येईल.
[२] इतर पिकांकरितां पहिल्या वर्षांत वाजवी दराच्या निम्मे पाणी-पट्टी आकारली जाईल आणि दुसऱ्या वर्षांत पाणी-पट्टी पूर्ण दरानें आकारली जाईल.

(५) कांहीं कसणाऱ्या कुळांच्या आर्थिक अडचणींचें निवारण करण्याकरितां, पाणीपट्टी देण्याची हमी म्हणून आवश्यक असलेल्या जमीनमालकाच्या सहीशिवाय, अशा शेतकऱ्यांना पाणीपुरवठा करण्याकरितां स्थानिक अधिकाऱ्यांना आदेश देण्यांत आले आहेत.

(६) सरकारी कालव्यापासून, स्वतःच्या शेतांपर्यंत पाणी वाहून आणण्याकरितां बऱ्याच लांबीचा पाट बांधणें आवश्यक असल्यामुळें, कांहीं शेतकरी, जलसिंचनाच्या उपलब्ध सोयींचा उपयोग करून घेण्यास नाखूष आहेत असें आढळून आलें होते. ह्या

अडचणीचें निवारण करण्याकरितां, सरकारनें कांहीं दिवसांपूर्वी, पाण्याचे पाट कशा प्रकारचे असावेत हें ठरवून दिलें असून ते बांधण्याबाबतची सरकारची व जलसिंचनासाठीं पाणी घेणाऱ्या शेतकऱ्यांची जबाबदारी स्पष्ट करून दिली आहे. अशा प्रकारें ठरवून दिल्यामुळें जलसिंचनाचें पाणी घेणाऱ्या शेतकऱ्यांना, सरकारी कालव्यांमधून, त्यांच्या स्वतःच्या शेतांत पाणी वाहून आणण्याकरितां, १/२ ते १ मैल लांबी पेक्षां जास्त लांबीचे पाट बांधावे लागणार नाहींत. अशा पाटांमधून १ ते १½ क्युसेक्स पाणी घेतां येईल; व त्यायोगें १०० ते १५० एकर जमिनीच्या तुकड्यांवर जलसिंचन करतां येईल.

(७) जलसिंचनाच्या पाण्याचा उपयोग करण्याबाबत, जलसिंचनाचें पाणी वापरणाऱ्या शेतकऱ्यांचें संपूर्ण सहकार्य मिळविण्यासाठीं जिल्हा आणि त्या खालच्या पातळीवर जलसिंचन समित्यांची नेमणूक करण्यांत आली आहे.

(८) सध्यां चालू असलेल्या जलसिंचनाच्या नवीन प्रकल्पांपासून, जलसिंचनासाठीं शक्य तितक्या लवकर पाणी मिळावें म्हणून, सांठवणीचे बांध, जलग्राहक बांध, कालवे, इत्यादींचें बांधकाम, पाणी सांठवून होतांच त्यापासून जलसिंचनाचे फायदे प्रत्ययास यावे या दृष्टीनें, एकाच वेळीं करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. पोट कालव्यांच्या शेवटच्या भागांचें बांधकाम चालू असतांनाच त्यांच्या सुरुवातीच्या भागापर्यंत पाणी पोंचवितां येऊं शकेल अशा रीतीनें पोटकालव्याचें बांधकाम त्यांच्या प्रारंभीच्या भागापासून शेवटच्या भागापर्यंत विभागशः पूर्ण करण्यांत येत आहे. अशा प्रकारें जलसिंचनाचा हळुहळूं विकास होत जातो व संपूर्ण प्रकल्प जरी पूर्ण झाला नसला तरीसुद्धा प्रत्यक्ष जलसिंचनास बांधकाम चालू असतांनाच सुरुवात करतां येते.

(९) जलसिंचनाचें पाणी वापरणाऱ्या शेतकऱ्यांची, त्यांच्या जमिनीला खत मिळण्याबाबतची अडचण अंशतः दूर करण्यासाठीं सरकारनें, महाराष्ट्र प्रदेशांत हिरवें खत पिकवण्यासाठीं कालव्याचें पाणी सवलतीच्या दरानें पुरवण्याबाबत, आदेश दिले आहेत. हे आदेश इतर भागांनासुद्धां लागू करण्याबाबतच्या प्रश्नावर विचार चालू आहे.

(१०) कालव्याच्या पाण्याचा पूर्णपणें उपयोग होण्यासाठीं खास प्रयत्न करण्याचें महत्त्व निरनिराळ्या संबंधित विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांवर बिंबवण्याच्या प्रत्येक संधीचा उपयोग सरकार पूर्णपणें करीत आहे. तसेंच, जलसिंचित पिकांची लागवड करून, उत्पादन–विशेषतः अन्नधान्याचें–वाढवण्यासाठीं सरकारशीं सहकार्य करण्याची आवश्यकता व इष्टता शेतकऱ्यांच्या मनांत ठसविण्याच्या प्रत्येक संधीचा उपयोग सरकार करतें.

**(डी) जलसिंचनविषयक प्रशासकीय कार्य :–**

कोल्हापूर जिल्ह्यांतील भोगावती व पंचगंगा नद्यांवरील सरकारी यंत्रसिंचन योजनेचा फायदा घेणाऱ्या शेतकऱ्यांना, स्थानिक निधि पट्टी भरण्याबाबत सवलत देण्यांत आली होती ह्या शेतकऱ्यांना पूर्वी पंपाबाबतच्या आकारणीसहित पाणीपट्टी भरावी लागत होती. परंतु सरकारनें पाणीपट्टी व पंपाबाबतची आकारणी निरनिराळी करण्याबाबत आदेश दिल्यामुळें, आतां भरावयाची स्थानिक निधि पट्टी ही केवळ पाणीपट्टीवरच द्यावी लागेल.

जलसिंचनाच्या प्रशासकीय कार्यपद्धतीच्या संबंधांत शेतकऱ्यांच्या अनुभवास येणाऱ्या अडचणी समजावून घेण्यासाठीं, दक्षिणेंतील कालव्याचें पाणी वापरणाऱ्या शेतकऱ्यांची, बहुतेक वर्षांतून एकदां परिषद भरविण्यांत येते. कालव्याचें पाणी वापरणाऱ्या शेतकऱ्यांनीं निदर्शनास आणलेल्या आणि १९५८ च्या परिषदेमध्यें चर्चा करण्यांत आलेल्या अशा बऱ्याच अडचणी दूर करण्यांत आल्या. अशीच एक परिषद ऑक्टोबर १९५९ मध्यें भरविण्यांत आली होती व ह्या परिषदेमध्यें उपस्थित केलेल्या मुद्यांवर लवकरच आदेश काढण्यांत येतील. तसेंच, वेळोवेळीं दृष्टीस पडणाऱ्या जल सिंचनविषयक अडचणींचें त्वरित निवारण करण्याचा नेहमींच प्रयत्न करण्यांत येतो.

(ई) संकीर्ण:—

[एक] मध्यवर्ति आकृती रेखन संघटना :—

मध्यवर्ति आकृति रेखन संघटना गेल्या दोन वर्षांपेक्षां अधिक काळ समाधानकारक कार्य करीत आहे. जें एरवीं लवकर पूर्ण होणें शक्य नव्हतें असें वारणा, कुरनूर, मुळा, पूर्णा, मानाग, बोर, नळगंगा, बाग, इतियाडोह, दिना, काटेपूर्णा, करवन्द इत्यादि अनेक प्रकल्प लवकर पूर्ण होण्यास ह्या संघटनेच्या निर्मितीमुळेंच मदत झाली. विशेष हें कीं, तांत्रिकदृष्ट्या उच्च दर्जा राखण्यांत आला असून पुष्कळ प्रमाणांत काटकसरदेखील साध्य झाली आहे. ह्या संघटनेनें नमुन्यांच्या दर्जाचें तपशीलवार आकृतिलेखन करून, प्रशिक्षणाचे वर्ग घेऊन, कालव्यांच्या नकाशांची माहितीपत्रकें प्रसिध्द करून, जलसिंचन व विद्युत् विभागाला बरीच मदत केली आहे. निरनिराळ्या प्रदर्शनांत ठेवण्यांत आलेल्या ( कालव्याच्या ) प्रतिकृती तयार केल्यामुळें प्रासिध्दीच्या क्षेत्रांतदेखील ह्या संघटनेची बरीच मदत झाली आहे. या संघटनेला थोड्याच काळांत ज्यांची जबाबदारी घ्यावी लागणार आहे अशा तृतिय पंचवार्षिक योजनांच्या प्रकल्पाची व्याप्ति लक्षांत घेतां, ह्या संघटनेच्या नोकरवर्गाच्या संख्येंत योग्य ती वाढ करावी लागेल. ह्याबाबतच्या प्रस्तावावर सरकार विचार करीत आहे.

[दोन] यंत्रविषयक संघटना:—

जरी मातीचीं मोठीं धरणें बांधण्याचा राज्याचा कार्यक्रम भव्य असला तरी ह्या कामासाठीं लागणाऱ्या मातीची वाहतूक करण्याच्या व इतर प्रकारच्या कोट्यावधी रुपयांच्या यंत्रसामुग्री-बाबत फारच त्रोटक स्वरूपाची व्यवस्था होती म्हणूनच, सरकारला तसेंच जरुरीचें वाटल्यावरून जवळ असलेल्या यंत्रांची दुरुस्ती करणें, कालांतरानें त्यांची तपासणी करणें, यंत्रदुरु-स्तीचें सुसज्ज मशीन-शॉप, तसेंच, नवीन यंत्रसामुग्री व त्यांचे सुटे भाग खरेदी करणें या कामांची योजनाबद्ध आंखणी करणें ह्यांसाठीं एक संघटना निर्माण केली आहे. निरनिराळ्या जलसिंचनाच्या ठिकाणीं लागणारे जड किंवा हलके दरवाजे तयार करण्याचें कामदेखील ह्याच संघटनेला करावें लागणार आहे. ह्या संघटनेच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली असून तिचा कारभार सुपरिंटेंडिंग इंजिनिअरच्या दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे

सोपविण्यांत आला आहे व या संघटनेनें सुसंगत अशी माहिती गोळा करण्याबाबत बरेचसें प्राथमिक कार्य केलें आहे. या संघटनेचें कार्य योग्य तऱ्हेनें होण्यास आवश्यक असलेल्या मध्यवर्ति व प्रादेशिक कारखाने स्थापन करण्याबाबत योग्य ती तजवीज करण्यांत येत आहे. जलसिंचनाच्या व रस्त्याच्या निरनिराळ्या प्रकल्पांत वापरण्यांत येत असलेल्या सर्व यंत्रसामुग्रीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें सर्व यंत्रसामुग्रीचा कारभार एकसूत्रित करून तो या यांत्रिक संघटनेच्या नियंत्रणाखालीं आणणें इष्ट समजण्यांत आलें असून सरकारनें ह्याबाबत योग्य ती उपाययोजना करण्याचें योजिलें आहे.

**[तीन] पाणीपुरवठ्याच्या साधनांचें संशोधन मंडळ:—**

पाणीपुरवठ्याचीं साधनें म्हणून राज्यांतील महत्त्वाच्या नद्यांच्या खोऱ्यांचा क्रमवार अभ्यास करण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेल्या पाणीपुरवठ्याच्या साधनांच्या तपासणी मंडळानें भीमेच्या खोऱ्याचा अभ्यास पूर्ण केला असून त्याबद्दलचा मास्टर प्लॅन निश्चित केला आहे. त्याचप्रमाणें गोदावरी, कृष्णा आणि तापी या नद्यांच्या खोऱ्यांच्या तशाच प्रकारचे मास्टर प्लॅन लवकरच पूर्ण करण्यांत येतील, आणि त्यानंतर इतर नद्यांच्या खोऱ्यांच्या मास्टर प्लॅनचें काम हातीं घेण्यांत येईल. सदरहू मंडळानें तृतीय पंचवार्षिक योजनेमध्यें समाविष्ट करण्यासाठीं मोठ्या व मध्यम प्रकारच्या जलसिंचनाच्या योजनांबाबत आवश्यक ती माहिती गोळा केली आहे. कृष्णा आणि गोदावरी या नद्यांच्या पाण्याबाबत ह्या राज्याचा भाग निश्चित करण्यासाठीं लागणारी आवश्यक ती माहिती गोळा करण्यांत सध्यां हें मंडळ गुंतलेलें आहे.

**[चार] जलसिंचन आणि विद्युत् यांसाठीं अभ्यास मंडळ :—**

सरकारनें, मोठ्या व मध्यम जलसिंचनाच्या व विद्युत्प्रकल्पाच्या योजनांच्या संबंधांत तृतीय पंचवार्षिक योजनेचें स्वरूप निश्चित करण्यासाठीं, जलसिंचन व विद्युत्विभागाच्या (त्यावेळचा सार्वजनिक बांधकाम विभाग) सचिवाच्या अध्यक्षतेखालीं, एक अभ्यास-मंडळ नेमलें होतें. मंडळानें आपल्या शिफारशी नक्की करून सरकारकडे विचारार्थ पाठविल्या आहेत.

**[पांच] जलसिंचन प्रकल्प तपासणी मंडळ :—**

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या बऱ्याचशा प्रकल्पांची त्वरित अंमलबजावणी झाली नाहीं. या प्रकल्पांबाबत तपशीलवार पूर्व तपासणी झालेली नव्हती त्यामुळें हा विलंब लागला. तसेंच मध्यवर्ति जल व विद्युत् मंडळाकडून व नियोजन मंडळाकडून त्याबाबत अंतिम निर्णय घेण्यास उशीर लागल्यामुळेंहि या प्रकल्पांची अंमलबजावणी तांतडीनें होऊं शकली नाहीं. म्हणूनच सरकारनें ह्या वेळेला, तृतीय पंचवार्षिक योजनेमध्यें समाविष्ट करण्याची संभाव्यता असलेल्या येणाऱ्या प्रकल्पांची आतांपासून तपासणी करण्याचें योजिलें आहे व अशा रीतीनें तृतीय योजनेचा कालावधि सुरू होण्याच्या सुमारास तपशीलवार प्रकल्प तयार ठेवण्यांत येतील व त्यांवर नियोजन मंडळाचा निर्णय देखील प्राप्त करून घेतला जाईल. यामुळें तृतीय योजनेच्या सुरवातीपासूनच प्रत्यक्ष प्रकल्पाचें काम सुरू करणें सरकारला शक्य होईल. ह्याकरतां सरकारनें एक स्वतंत्र प्रकल्प तपासणी मंडळ निर्माण केलें असून त्याच्या कार्यास केव्हांच सुरवात झाली आहे.

(दोन) पूर नियंत्रणाचीं कामें :--

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत अन्दाजें २७·९८ लक्ष रुपये खर्चाचीं पूर नियंत्रणाचीं चार कामें समाविष्ट केलेलीं आहेत. ह्या कामांना राज्य पूर नियंत्रण मंडळाची मंजुरी मिळाली असून चालू वर्षांत त्या कामांस सुरवात करण्यांत येईल. याशिवाय राज्य पूर नियंत्रण मंडळाची त्याबाबत मंजुरी घेण्यांत आल्यानन्तर आणखी थोड्याशा पूर नियंत्रण कामास चालू वर्षी सुरवात करण्यांत येईल.

(तीन) लोकस्वास्थ्य योजना :—

घरगुती वापरासाठीं पाणीपुरवठ्याची सोय करणें ही प्रामुख्यानें स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी असून राज्य सरकार अनुदान सहाय्य व/किंवा कर्जे देऊन त्या संस्थांना अशीं कामें हातीं घेण्यास उत्तेजन देतें. जेव्हां जेव्हां अशा कामांच्या योजना आंखून त्यांवर अंमलबजावणी करणें हें आवश्यक त्या इंजिनिअरिंग तज्ज्ञांच्या कमतरतेमुळें स्थानिक संस्थांना कठीण जातें, तेव्हां तेव्हां जलसिंचन व विद्युत विभागाची लोकस्वास्थ्य शाखादेखील त्यांना त्याबाबत मदत करते. यात्रांचीं ठिकाणें, थंड हवेचीं ठिकाणें व इतर कांहीं अपवादात्मक बाबींत अशा योजनांसाठीं पैसा खर्च करणें स्थानिक संस्थांना शक्य नसतें; अशा परिस्थितींत मुख्य बांधकामेंदेखील सरकार स्वतःच्या खर्चानें करून स्थानिक संस्थांच्या हद्दींत पाण्याचें वांटप करण्यासाठीं त्यांना पाणी पुरवितें.

पश्चिम महाराष्ट्र प्रदेशांतील ८ मोठ्या उर्वरित सरकारी योजना, ९ नव्या मोठ्या योजना व ३८ इतर कामें पूर्ण करण्यासाठीं द्वितीय पंचवार्षिक योजनेंत २८८·४९ लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे.

मराठवाडा प्रदेशांत सध्यां अंमलबजावणी होत असलेल्या पाणी पुरवठयाच्या ९ सरकारी योजनांसाठीं द्वितीय पंचवार्षिक योजनेंत ४०·९४ लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. तीन जादा योजना द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत आल्या असून त्या तपासणीच्या व मंजुरीच्या अवस्थेंत आहेत.

लोकस्वास्थ्य विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीची गति वाढविण्याच्या उद्देशानें ह्यावर्षी एक नवीन लोकस्वास्थ्य बांधकाम विभाग निर्माण करण्यांत आला असून त्याचें मुख्यालय सोलापूर येथें आहे. याच उद्देशानें निरनिराळ्या प्रदेशांत चार नवे उपविभागदेखील निर्माण करण्यांत आले आहेत.

पहिल्या तीन वर्षांत रु. ९८ लक्ष इतका खर्च झाला असून १९५९-६० मध्यें रु. ३९·०० लक्ष इतका खर्च करण्यांत आला आहे. १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत पाणी पुरवठ्याच्या सरकारी योजनांकरितां ६२·३९ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजना ह्या वर्गणीरूप ठेवीच्या योजना असून त्या नागरी विकास व लोकस्वास्थ्य विभागाच्या अधिकारांत मोडतात.

**(चार) जल-विद्युत व बहुउद्देश प्रकल्पः—**

**(अे) कोयना जलविद्युत प्रकल्पः—**

कोयना नदीवर दगडकाँक्रीटचें धरण व भूमिगत विद्युत्-गृह बांधणें, तुर्भे येथील टाटा विद्युत् पद्धतीशीं जोडण्यासाठीं ट्रॉम्बेला २२० किलोवॅटसच्या दुहेरी तारा टाकणें हें कोयना जल-विद्युत् प्रकल्पाचें उद्दिष्ट आहे. त्याचा सुधारलेला खर्चाचा अंदाज ३८·२८ कोटी रुपये इतका आहे. ह्या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यांत प्रत्येकीं ६०,००० किलोवॅट शक्ति निर्माण करणारीं चार यंत्रें बसविण्यांत येतील. सुधारलेल्या कार्यक्रमानुसार ऑक्टोबर १९६१ मध्यें पहिलें विद्युत् निर्मिति यंत्र वीज निर्मितीस आरंभ करील अशी अपेक्षा आहे आणि त्यानंतर दर सहा महिन्यांनीं एक, अशीं बाकीचीं तीन यंत्रें वीज निर्मिति करूं लागतील.

प्रकल्पाच्या सर्व प्रमुख बाबींचीं टेंडरें स्वीकारलीं आहेत. सर्व कामांची प्रगति वेगानें आणि समाधानकारकरित्या चालूं आहे. जोडणारा टनेल ( २,८९० फूट ), व्हेन्टीलेशन टनेल ( १,२०९ फूट ), टेलरेस टनेल ( ७,४९० फूट ) आणि हेडरेस टनेल ( १२,३०० फूट ) हीं पूर्ण झाला आहेत. धरणाचें कॉंक्रीटचें बांधकाम प्रगतिपथावर असून २८ मे १९६० पर्यंत ३६,४३९ दशलक्ष घनफुटांपैकीं १८·७३ दशलक्ष घनफुटाचें काम झालें आहे. १ व २ नंबरच्या प्रेशर शाफटस्चें सर्व खोदकाम झालें असून ग्रॅन्ट्री कॉलम्सचें आणि यंत्रगृहाच्या प्रथमावस्थेच्या भागांतील तुळयांचें काँक्रीटचें काम पूर्ण झालें आहे. टेलरेस टनेलचें कॉंक्रीटचे थर देण्याचें काम आणि इनटेक टॉवर कॉलमचें कॉंक्रीटचे थर देण्याचें काम ऑक्टोबर १९५९ मध्यें सुरूं करण्यांत आलें आहे.

ह्या धरणामुळें ७३ खेडीं पूर्णपणें किंवा अंशतः पाण्याखालीं जाणार असल्यामुळें सुमारें २६,००० लोकांच्या पुनर्वसनाचा मोठा प्रश्न ह्या प्रकल्पामुळें उत्पन्न होतो. या प्रकल्पा-मुळें ज्या इसमांचें नुकसान होणार आहे त्यांच्या पुनर्वसाहतीच्या प्रश्नावर सरकारनें काळजी-पूर्वक विचार केला आहे. ह्या प्रकल्पामुळें नुकसान झालेल्या लोकांची पुनर्वसाहत करण्याकरितां सरकारनें एक पुनर्वसाहत अधिकारी नेमला आहे. पाटण व जाओली तालुक्यांतील २९ खेड्यांची नवीन ठिकाणीं पुनर्वसाहत झाली आहे. जाओली तालुक्यांतील तीन खेडीं त्यांच्या नवीन जागीं स्थलांतर करण्याच्या अवस्थेंत आहेत. नुकसान पोहोंचलेल्या खेड्यांच्या पुनर्वसाहतीचा कार्यक्रम पार पाडण्यांत पुनर्वसाहत अधिकाऱ्याला मदत करण्यासाठीं सरकारी व बिन-सरकारी लोकांची पुनर्वसाहत सल्लागार समिति नेमण्यांत आली आहे. या खोऱ्यांतील रहिवाश्यांची, ह्या प्रकल्पावर नोकरी देण्याबाबत प्रथम निवड केली जाते आणि ह्या खोऱ्यांतून स्थलांतर करावें लागणाऱ्या कुटुंबांतील मुलांना तांत्रिक शिक्षण देण्यासाठीं त्यांना विशेष सवलती देण्यांत येतात.

काम चालूं झाल्यापासून ३१ मार्च १९६० पर्यंतचा या प्रकल्पाचा एकूण खर्च १९२०·३२ लक्ष रुपये झाला. १९६०-६१ च्या अंदाजपत्रकांत ह्या प्रकल्पासाठीं ७९० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

ह्या प्रकल्पासाठीं लागणाऱ्या परदेशीय चलनासाठीं जागतिक बँकेनें २९ दशलक्ष डॉलरचें कर्ज दिलें आहे.

(वी) पूर्णा जल-विद्युत् प्रकल्प :–

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत पूर्णा जल-विद्युत् प्रकल्पासाठीं ७६·७० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या प्रकल्पासाठीं अंदाजें २१३·८३ लाख रुपये खर्च येईल. हा प्रकल्प मध्यवर्ति जल आणि विद्युत् मंडळाकडे तांत्रिक तपासणीसाठीं सादर करण्यांत आला होता. त्या मंडळानें कांहीं फेरबदल सुचविले. मध्यवर्ति जल आणि विद्युत् मंडळाच्या आदेशानुसार ह्या केंद्रांतील विद्युत् शक्ति ४५०० किलोवॅटपर्यंत वाढविण्यांत आली. म्हणून जलसिंचनविषयक पद्धतींची सुधारणा करण्यांत आली. ह्या प्रकल्पाच्या प्रतिवृत्तांतांत आमूलाग्र सुधारणा करण्याचें काम हातीं घेण्यांत आले आणि १९५९-६० या अर्थवर्षाच्या अखेरीस ह्या कामांत बरीच प्रगति झाली आहे.

घरें, भांडाराच्या शेडस् इत्यादि बांधणें, ह्यांसारखीं प्राथमिक काम हातीं घेण्यांत आलीं आहेत.

(सी) जलविषयक मंडळ:––

कोयना व पूर्णा प्रकल्प हातीं घेऊनहि तृतीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत राज्यांत विद्युत्शक्ति कमी पडेल अशी भीति वाटते. ही अडचण दूर करण्यासाठीं व पुढील योजनांच्या काळांत अशा तऱ्हेची शक्यता टाळण्यासाठीं, तृतीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत पुष्कळसे जल-विद्युत् प्रकल्प हातीं घेण्याबाबत अभ्यास मंडळानें शिफारस केली आहे. ह्या प्रकल्पांची सविस्तर तपासणी करण्याचें व प्रकल्पांचें प्रतिवृत्त तयार करण्याबाबतचें काम जलमंडळाकडे सोंपविण्यांत आलें आहे.

(पांच) समुद्र व खाड्या बुजवून जमीन निर्माण करण्याबाबतची योजना :–

मुंबई शहरांतील वाहतुकीची गर्दी, मोकळ्या जागांची व खेळाच्या मैदानांची उणीव, घरांचा तुटवडा आणि वाजवीपेक्षां जास्त प्रमाणांत उद्योगधंदे समकेंद्रित होणें यांसंबंधींच्या समस्यांचा विचार करण्यासाठीं मुंबई सरकारनें, मार्च १९५८ मध्यें अभ्यास मंडळाची नेमणूक केली. मुंबई महानगरपालिका, मुंबई पोर्ट ट्रस्ट, रेल्वे, व्यापारी वर्ग, आणि इतर हितसंबंधित पक्ष यांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेल्या ह्या अभ्यास मंडळानें, शहरवासीयांसाठीं आवश्यक असलेल्या घरें, उद्यानें, खेळांचीं मैदानें, शाळा, रुग्णालयें इत्यादींसारख्या नागरी सुखसोयी करणें आणि शहरांतील वाहतुकीची गर्दी कमी करणें यांसाठीं मुंबई शहरांत फारच थोडी जमीन उपलब्ध आहे असा निष्कर्ष काढला, म्हणून या गटानें १९५९ मध्यें सरकारकडे सादर केलेल्या आपल्या अहवालांत अशी शिफारस केली आहे कीं, उद्योगधंदे इतरत्र हलविण्यासारख्या उपाययोजनांबरोबरच खालील ठिकाणच्या खाड्या, समुद्रांचा भाग वगैरे बुजवून या बेटाच्या जमिनीचा विस्तार करण्याची आवश्यकता आहे. याबाबतच्या खर्चाचा कच्चा अंदाज व त्यापासून होणारे आर्थिक परिणाम सोबत जोडलेल्या विवरणपत्रांत दाखविले आहेत:–

| योजना<br>१ | एकरांत क्षेत्रफळ<br>२ | अंदाजी खर्च रुपये लाखांत<br>३ | जागा विकल्यानें होणारी मिळकत रुपये लाखांत<br>४ | योजना पुरी होण्यासाठीं अंदाजे लागणारा वेळ<br>५ |
|---|---|---|---|---|
| एकः-बॅक-बे येथील समुद्र बुजविण्याची योजना, ब्लॉक ३ ते ४. | ५७० | १,९३१ | ३,४०० | अनुसरलेल्या पद्धतीनुसार ५ ते १० वर्षें |
| दोनः-बांद्रा व कुर्ल्याचा उत्तर भाग व माहीमचा दक्षिण भाग यांमधील सखल व दलदलीची जमीन. | २,१३५ | १,०५१ | १,७५६ | ५ वर्षें |
| तीनः-वडाळा व चेंबूर यांमधील मिठागरें व इतर सखल आणि दलदलीची जमीन. | ३,१४० | १,४३० | २,२७५ | ५ वर्षें |
| एकूण... | ५,८४५ | ४,४१२ | ७,४३१ | कमींत कमी ५ वर्षें |

ह्या योजना हातीं घेण्याच्या दृष्टीनें समुद्राचा भाग व खाड्या बुजवून जमीन निर्माण करणारें एक खास पथक, सुपरिंटेंडिंग इंजिनीयरच्या दर्जाच्या अधिकाऱ्याच्या हाताखालीं निर्माण करण्यांत आलें असून जमीन निर्माण करण्याच्या निरनिराळया योजनांसाठीं तपशीलवार प्रकल्प प्रतिवृत्त तयार करण्यासाठीं हॉलंडचे खास सल्लागार मेसर्स नेडेको यांना आवश्यक ती माहिती गोळा करण्याच्या कामीं मदत करण्यासाठीं, त्या पथकाखालीं लवकरच एक प्रकल्प विभागाची निर्मिति करण्यांत येईल.

**(सहा) इंजिनीअरिंग विषयक संशोधनः—**

इंजिनीयरिंगच्या उद्भवलेल्या निरनिराळ्या समस्या हाताळण्यासाठीं एक मध्यवर्ति इंजिनीयरिंग संशोधन संस्था स्थापन करण्याचा सरकारचा विचार होता; ती संस्था आतां स्थापन करण्यांत आली आहे. नाशिक येथें या संस्थेच्या मुख्य इमारतीचा पायाभरणी समारंभ ७ जुलै १९५९ रोजीं मुख्य मंत्र्यांच्या हस्तें साजरा करण्यांत आला. संस्थेच्या मुख्य इमारतीचें बांधकाम प्रगतिपथावर असून संस्थेचें कार्य लवकरच सुरू होईल अशी आशा आहे.

# इमारती आणि दळणवळण विभाग

इमारती आणि दळणवळण विभागाकडून पुढील विषयांच्या संबंधांतील कामें केलीं जातात :-

एक — दळणवळण;

दोन — इमारती;

तीन — लहान बंदरें;

चार — उद्यानें आणि बागा ( यांत राष्ट्रीय उद्यानें व बागा यांचा समावेश केलेला नाहीं ).

**एक–दळणवळण**

महाराष्ट्र राज्याच्या, तीनहि प्रदेशांतील दळणवळणाचे मार्ग लांबीनें अपुरे आहेत व सध्यांच्या वाहतुकीच्या गरजा पुऱ्या करण्यास ते कांहींसे अयोग्य आहेत. तसें पहातां, पूर्वीच्या मुंबई राज्यांतील विदर्भ आणि महाराष्ट्र या प्रदेशांत तुलनात्मक दृष्ट्या अधिक चांगली दळणवळणाची सोय आहे परंतु, मराठवाड्यामधील सोयी मात्र संपूर्णतया अपुऱ्या आहेत. कांहीं ठिकाणीं तालुक्याचीं ठिकाणें आणि शहरें यांना जोडणारे रस्तेहि आढळत नाहींत. ह्या विभागामधील लोहमार्गहि फारच अपुरे आहेत.

म्हणून, प्रत्येक जिल्ह्याच्या अगदी आंतल्या भागांतहि दळणवळणाच्या पुरेशा सोयी उपलब्ध करून देणें, हें सरकारचें आद्य कर्तव्य होतें. त्यामुळें शेतकी उत्पादन आणि तयार केलेला माल बाजारपेठांमध्यें वाजवी दरानें आणणे शक्य होते.

हें उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेवून सरकारनें तीनहि विभागांमध्यें अनेक रस्ते बांधण्याचें काम हातीं घेतलें असून कामाला तत्परतेने सुरुवात झाली आहे. जरी मोठ्या कार्यक्रमांना मंजुरी मिळाली असली तरी या विभागाला बऱ्याच अडचणींना तोंड द्यावें लागलें. नकाशे व खर्चाचे अंदाज तयार करणाऱ्या प्रकल्प विभागांचा व यंत्रसामुग्रीचा अपुरेपणा, ह्या त्या अडचणी होत्या.

पूर्वीच्या मुंबई राज्याच्या महाराष्ट्र विभागांत ह्या दोनहि गोष्टींची उणीव होती. विदर्भामध्यें नोकरवर्गाचा बराच तुटवडा होता आणि यंत्रसामुग्रीहि अपुरी होती. पथ प्रकल्पाच्या तयारीचें काम हातीं घेण्यासाठीं त्यांच्याकडे प्रकल्प विभागहि नव्हते. मराठ-वाड्यामध्यें तर ही अडचण अधिकच तीव्र होती. जादा बांधकामें हातीं घेण्यासाठीं, पुरेसा कार्यकारी नोकरवर्गहि नव्हता. सुदैवानें, गेल्या तीन वर्षांच्या कालावधींत, पुष्कळशा उणिवा दूर करण्यांत आल्या आहेत; त्यांची अंमलबजावणी करण्याचीहि विभागाची पूर्ण तयारी आहे. प्रकल्पाची तयारी जलद व कार्यक्षम रीतीनें करण्याच्या दृष्टीनें विभागांची रचना आंखण्यांत आली आहे.

प्रत्येक विभागाच्या कामाच्या गतीची सर्वसामान्य कल्पना देतां यावी म्हणून तीनहि विभागांपैकीं प्रत्येक विभागाचा गेल्या चार वर्षांतील संभाव्य खर्चहि दर्शविला आहे. विदर्भाच्या बाबतींत असें दिसून येतें कीं, योजनेचें मूळ उद्दिष्ट आम्हीं आधींच पार पाडलें असून मुंबई प्रदेशांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षी हें उद्दिष्ट पार पाडलें जाईल. विदर्भ मराठवाड्यामध्यें खालीं दिलेल्या रकमांपेक्षां अनुक्रमें रु. २९० लाख आणि रु. १९० लाख याप्रमाणें जादा खर्च करण्याचा निर्णय सरकारनें घेतलाहि आहे, हें येथें नमूद करतां येईल.

गेल्या वर्षी असें आढळून आलें आहे कीं, महाराष्ट्रांतील योजनांतर्गत योजनांवरील खर्चांतून कांहीं बचत उपलब्ध होईल. योजनेंतील सर्व तरतूद उपयोगांत आणण्यासाठीं, यापैकीं कांहीं बचत कुलाबा आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील दळणवळणाचा विकास करण्यासाठीं वापरावी असें ठरविलें होते. या जिल्ह्यांमध्यें मध्यवर्ति स्थान असलेल्या पश्चिम किनारा रस्त्याशीं ह्या जिल्ह्यांतील त्यानुसार बहुतेक महत्त्वाचीं बंदरें जोडण्यासाठीं, बारमाही चालूं रहाणारे रस्ते बांधण्याचें काम हातीं घेतलें आहे. ह्या रस्त्यांचें काम पूर्ण झाल्यावर पश्चिम किनारा रस्त्याशीं व मुंबई शहरांशी जिल्ह्याचा संबंध जोडणाऱ्या बारमाही दळणवळणाच्या सोयी उपलब्ध होतील.

योजनेच्या पहिल्या चार वर्षांमध्यें ह्या विभागानें केवळ योजनेचें उद्दिष्टच पार पाडलें असें नाहीं तर कांहीं प्रदेशांवर खालीं दिलेल्या विवरणपत्रकांत दर्शविल्याप्रमाणें जादा खर्च केला आहे.

| | योजनेंतील तरतूद (रुपये लाखामध्यें) | खर्च (हिशेब तपासणी न झालेला) (रुपये लाखामध्यें) |
|---|---|---|
| महाराष्ट्र राज्यातील जुना मुंबई प्रदेश | ६९३·९९ | ६३०·९९ |
| मराठवाडा | १९७·३० | १९९·०७ |
| विदर्भ | १८९·६८ | २८६·१७ |

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें, २१२८ मैल रस्ते बांधण्याचें उद्दिष्ट निश्चित करण्यांत आलें आहे आणि त्यापैकीं १८०४ मैलांचे रस्ते अगोदरच बांधून झाले आहेत. ८१ पूल बांधण्याच्या उद्दिष्टांपैकीं ६९ पूल बांधून झाले आहेत. उरलेलें काम योजनेच्या शेवटच्या वर्षामध्यें पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

महाराष्ट्र राज्याच्या निरनिराळ्या प्रदेशांत बारमाही दळणवळण चालूं रहावें म्हणून निरनिराळ्या जिल्ह्यांना जोडणारे अनेक रस्ते बांधण्याचें काम हातीं घेतलें होतें, त्यापैकीं बऱ्याच रस्त्यांचें काम जोरांत सुरू आहे. पुढील दोन वर्षांत, निरनिराळ्या प्रदेशांत

योग्य रीतीनें बारमाही दळणवळण चालू शकेल. ह्यापैकीं कांहीं महत्त्वाचे उल्लेखनीय मार्ग असे आहेत:—

यवतमाळ – माहूर – किनवट रस्ता.
हातगांव – तमसा रस्ता.
सेसेंल – पिंपरी – कलमनूर रस्ता.
बुलढाणा – अजिंठा रस्ता.
मलकापूर – बोदवड रस्ता.
पुणें – औरंगाबाद रस्त्यावर गोदावरीला टोका येथील पूल.
अहमदनगर – औरंगाबाद रस्ता ( अहमदनगर जिल्हा ) डांबरी करणें.

वरील जोडरस्त्यांचें काम जोरांत चालू आहे.

भारत सरकारकडून संपूर्णपणें किंवा, भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार ह्यांनीं मिळून अर्थसहाय्य दिलेल्या रस्त्यांचीं बांधकामें.

**(ए) राष्ट्रीय राजमार्ग :—**

नांदुरा व मलकापूर आणि मूर्तिजापूर व लोणी यांना जोडणारे रस्ते आतां बहुतेक पूर्ण होत आले आहेत. मुंबई-पुणे रस्ता रुंद करणें व त्यावरील जलनिस्सारणाच्या सध्याच्या कामात सुधारणा करणें, हीं इतर महत्त्वाचीं कामें आहेत. ह्या सुधारणा अंमलांत आणण्यासाठी लागणारी जमीन रुंदीनें अपुरी असल्यामुळें ह्या कामांची प्रगति खुंटली आहे. आवश्यक तेवढी जमीन सम्पादन करण्यासाठीं संबंधित जिल्ह्यांच्या कलेक्टरांकडे आवश्यक ते प्रस्ताव पाठविले आहेत.

**(बी) जलद वाहतुकीचे राजमार्ग :—**

मुंबई शहराबाहेर जाण्याच्या, विद्यमान ' मुंबई--आग्रा रस्ता ' ह्या एकमेव रस्त्यावरील वाहतुकीचा ताण इतक्या प्रमाणांत वाढला आहे कीं, वाहतुकींत अधिक वाढ झाल्यास दळणवळणाची व्यवस्था खात्रीनें कोसळून पडेल. ह्या रस्त्यावरील गर्दी नाहींशी करण्यासाठीं, मुंबई सरकारनें, मुंबई महापालिका आणि भारत सरकार ह्यांच्या सहकार्यानें मुंबई शहराबाहेर जाणारे दोन जलद वाहतुकीचे राजमार्ग बांधण्याचें काम हातीं घेतलें होते. ह्या भागांतील बहुतेक काम सुरू झालीं असलीं तरी जमीन संपादनाबाबत व बांधकामाबाबत नवीन अडचणींना तोंड द्यावें लागत आहे. वरिष्ठ न्यायालयाच्या अनेक मनाई हुकुमांमुळें चालू असलेल्या कामांना अडथळा झाला. ह्या अडचणी दूर झाल्यावर सर्व भागांतील काम सुरू करतां येईल अशी सरकारची अपेक्षा आहे. ह्या रस्त्यांचें काम हातीं घेणें तांत्रिक दृष्टया कठीण आहे, कारण रस्त्याचा बराच भाग पाणथळ व दलदलीच्या प्रदेशांतून जातो. जमीन चिखलाची असल्यानें ह्या ठिकाणीं जाणेंहि अत्यंत कठीण आहे. म्हणून रस्ता मजबूत बनविण्यासाठीं योग्य ती तांत्रिक दक्षता घेण्यांत आली आहे. कामाच्या ठिकाणीं बांधलेल्या प्रयोगशाळेंत आणि दिल्ली येथील मध्यवर्ति पथसंशोधन प्रयोगशाळेंत अनेक प्रयोग करून ह्या अडचणी दूर करण्यांत येत आहेत.

(सी) पश्चिम किनारा रस्ता :–

पावसाळयांत जेव्हां बोटी बंद पडतात तेव्हां कुलाबा आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील लोकांना ज्या अडचणींना तोंड द्यावें लागतें त्या अडचणींची सरकारला जाणीव आहे. वर्षातील अतिशय प्रतिकूल हवामानांतहि अखंडित रहदारी चालू ठेवण्यासाठी कॉंक्रीटचा पृष्ठभाग असलेले, मोटारी जातील असे बारमाही रस्ते बांधण्याचें काम हातीं घेतलें आहे. कुलाबा जिल्ह्यांत बहुतेक रस्ता पूर्ण झाला आहे, त्यांचप्रमाणे रत्नागिरी जिल्ह्यांत उरलेला रस्ता कॉंक्रीटचा करण्यासहि मंजुरी मिळाली आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत योग्य असे कंत्राटदार मिळत नसल्यामुळें कांही भागांतील काम अद्यापि सुरू व्हावयाचें आहे. परंतु १९६१ या वर्षाच्या शेवटीं, म्हणजेच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालामध्यें रत्नागिरी जिल्ह्यांतील रस्त्याचा मोठा भाग कॉंक्रीटचा केला जाईल. त्याबरोबरच जलनिस्सारणाच्या नाल्या बांधण्याचें कामहि सरकार करीत आहे, आणि कांहीं वर्षांच्या कालावधींत, संबंध देशांत हा सर्वांत जास्त लांबीचा कॉंक्रीटचा रस्ता होईल.

( डी ) मध्यवर्ति पथनिधींतून करावयाचीं कामें :–

हीं कामें मंजूर करण्याचा अधिकार भारत सरकारचा आहे. जर हीं कामें राष्ट्रीय किंवा प्रादेशिक महत्त्वाचीं असलीं आणि जर लोहमार्ग–विरहित व रस्तेविरहित असे नवे प्रदेश दळणवळणानें जोडले जात असतील, तर अशा कामांना भारत सरकारकडून मंजुरी मिळते. या राज्याच्या जुन्या कार्यक्रमांत रु. २७९ लाख खर्च येणाऱ्या ५३ कामांचा समावेश होतो. ह्या कामांपैकीं १९ कामें पूर्ण झालीं असून, ३३ कामें प्रगतिपथावर आहेत आणि एक अद्यापि सुरू व्हावयाचें आहे.

अलीकडेच रु. २२४·८९ लाख खर्च करून दुसरा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला आहे व त्यांत मध्यवर्ति पथनिधि वांटप कार्यक्रमाखालील ४८ कामांचा आणि मध्यवर्ति पथनिधि राखीव कार्यक्रमाखालील ९ कामांचा समावेश होतो.

१९६०-६१ मध्यें मध्यवर्ति पथ-निधींतून करावयाच्या कामांकरितां रु. ९२·६० लाखांची तरतूद आहे. गोदावरी नदीवर टोका येथें पूल बांधणें आणि भुसावळ येथें तापी नदीला पूल बांधणें हे मध्यवर्ति पथ-निधींतून करावयाचे हातीं घेतलेले उल्लेखनीय प्रकल्प आहेत.

(इ) ऊंसपट्टी निधि :—

सरकारनें योजनेखालीं प्रथम मंजूर केलेल्या रु. ९९ लाखांपेक्षां रु. १९० लाख अधिक रक्कम देण्याचें कबूल केलें आहे.

संबंधित प्रदेशांतून मिळणाऱ्या कराच्या संभाव्य रकमेच्या प्रमाणांत व खालील गोष्टी आधारभूत धरून रस्त्याची कामें हातीं घेण्यांत आलीं आहेत:—

जवळच्या रेल्वेस्टेशनपासून थेट निरनिराळ्या कारखान्यांपर्यंत कार्यक्षम अशा दळण-वळणाची सोय करणें.

एकाहून अधिक कारखान्यांपर्यंत जाणारे रस्ते आधुनिक धर्तीचे करणे.

उंसाच्या शेतामधून कारखान्यापर्यंत उसाची जलद वहातूक होण्यासाठीं कांहीं अंतर्गत रस्त्यांची सोय करणे.

पूर्वीच्या मुंबई राज्यांतील साखर कारखान्यांच्या प्रदेशांत रस्ते बांधण्यासाठीं रु. ३३६ लाख खर्च येणारा नवीन कार्यक्रम आंखला होता, त्यापैकीं महाराष्ट्र राज्याचा हिस्सा रु. २९९·९५ लाख होता. सध्यां ऊसपट्टी निधींतून १९६०–६१ मध्यें १२९ रस्ते बांधण्यासाठीं, रु. २९ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या कार्यक्रमांतील, महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांमध्यें प्रगति होत आहे आणि दौंडनगर–मनमाड रस्ता, कोल्हापूर–रत्नागिरी–गैबी रस्ता आणि पुणें-पंढरपूर रस्त्यावरील साखरकारखान्यांना जवळ असलेला भाग, हे रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे केले जात आहेत.

## दोन--इमारती

१९६०-६१ मध्यें, पोलिस, वैद्यकीय, शिक्षण, कृषि, इत्यादी विविध विभागांच्या इमारतींविषयक गरजा भागविण्यासाठीं सुमारें रु. ७·५८ कोटी खर्चाचा कार्यक्रम सरकारनें हातीं घेतला आहे. ह्या कार्यक्रमामध्यें, राज्याच्या समाजकल्याण व प्रशासन क्षेत्रांतील विस्तृत कार्यांच्या गरजा भागविण्यासाठीं हातीं घेतलेल्या लहानमोठया बांधकामांचा समावेश होतो. ह्या बांधकामांमध्यें जे. जे. हॉस्पिटलची फेरबांधणी, औरंगाबाद येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला व परभणी येथें कृषि महाविद्यालयासाठीं इमारती, मुंबईचें सी. ई. एम. दंत-महाविद्यालय यांसारखीं कांहीं महत्त्वाचीं कामें येतात व इतर कामाबरोबरच तीं कामें चालू आहेत.

२. पुणें, औरंगाबाद यांसारख्या महत्त्वाच्या शहरांत व गांवांत, आणि सबंध राज्यांतील कांहीं तालुक्यांच्या मुख्य ठिकाणीं वाजवी भाड्यानें जागा मिळत नसल्यामुळें, कार्यालयासाठीं लागणाऱ्या जागेची अतिशय टंचाई आहे. त्यामुळें कार्यालयें निरनिराळ्या ठिकाणीं पसरलीं असून तीं अत्यंत गैरसोयीच्या जागीं ठेवावीं लागत आहेत. त्यामुळें जनतेची, तसेंच प्रशासनाची फार गैरसोय होते. म्हणून महत्त्वाच्या ठिकाणीं, मध्यवर्ति कार्यालयाच्या इमारती बांधण्याचें ठरविले असून प्रथमतः पुणें व औरंगाबाद येथें कार्यालयीन इमारती बांधण्याचें काम हातीं घेण्यात आलें आहे. त्याशिवाय, चालू आर्थिक वर्षांत, परभणी, बीड, नांदेड, बुलढाणा, यवतमाळ आणि चांदा येथें प्रशासकीय इमारती बांधण्याचेंहि योजिले आहे.

३. चालू वर्षी, रत्नागिरी, ठाण जिल्ह्यांतील विक्रमगड व उस्मानाबाद जिल्ह्यांतील नीलगंगा येथें तीन जादा निरीक्षण बंगले बांधण्याचेंहि योजिलें आहे.

४. सिमेंट, पोलाद इत्यादींसारख्या आवश्यक मालाचा अपुरा पुरवठा ध्यानांत घेतां, विभागाच्या ठरवून दिलेल्या सांठ्यातील न वापरलेल्या रकमेंतून एक राखीव रक्कम उभारणें आवश्यक वाटल्यावरून मुंबई, औरंगाबाद, नागपूर, अमरावती अित्यादि निवडक ठिकाणीं, दुर्मिळ मालाचा सांठा करण्यासाठीं गुदामें बांधण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

५. सरकारी नोकरांकरितां राहाण्याच्या घरांची सोय करणें:—

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें, मुंबई शहरांत, रहाण्याच्या इमारतीसंबंधीचीं खालील बांधकामें हातीं घेतलीं आहेत; आणि त्यासाठीं रु. १९६·४ लाखांची योजनानियुक्त तरतूद करण्यांत आली आहे. (पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या अधिकाऱ्यांचीं घरें बांधण्यासाठीं रु. ८६·४ लाख आणि तिसऱ्या व चौथ्या वर्गाच्या नोकरवर्गाची घरें बांधण्यासाठीं रु. ७० लाख ) :–

(एक) पहिल्या वर्गाच्या अधिकाऱ्यांसाठीं रु. २४ लाख खर्च येणारे ४२ फ्लॅटस्.

(दोन) २ ऱ्या वर्गाच्या अधिकाऱ्यांसाठीं रु. ४१ लाख खर्च येणारे १९२ फ्लॅटस.

(तीन) ३ ऱ्या व ४ थ्या वर्गाच्या नोकरांसाठी रु. २०३ लाख खर्च येणारे १६०० गाळे.

वर उल्लेखिलेल्या कामांपैकीं, २ ऱ्या वर्गाच्या अधिकाऱ्यांचे १९२ फ्लॅटस आणि ३ ऱ्या व ४ थ्या वर्गाच्या नोकरांचे १००० गाळे बांधून झाले आहेत. उरलेलें काम चालूं असून चालूं आर्थिक वर्षात तें पूर्ण करावयाचें आहे.

१९५९-६० व १९६०–६१ मध्यें मुंबई शहरांत, सरकारी नोकरांसाठी घरें बांधण्याचा जादा कार्यक्रम हातीं घेण्यासाठी सरकारनें योजनानियुक्त तरतुदीपेक्षां रु. २ कोटी जादा दिले आहेत. कार्यक्रमांत समाविष्ट केलेली रु. ३३·९० लाख खर्चाचीं बांधकामें चालूं आहेत. रु. १००·१४ लाख खर्च येणारी कामें कोणत्या संस्थेमार्फत करावयाचीं, तें निश्चित झालें आहे व तीं लवकरच सुरू होतील. शिल्लक राहिलेलें काम चालूं आर्थिक वर्षात हातीं घेण्यांत येईल.

जिल्ह्याच्या ठिकाणांकरितां, पुणें, नाशिक, सोलापूर आणि औरंगाबाद ह्या महत्त्वाच्या ठिकाणीं वर्ग ३ व ४ च्या नोकरांकरितां रु. ६८१·०० लाख खर्च येणारा घरें बांधण्याचा कार्यक्रम आंखला आहे. वरील ठिकाणीं रु. ३१·९९ लाखांची बांधकामें चालूं आहेत. अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजनेनुसार औरंगाबाद येथें बांधलेले २०० गाळे सरकारनें वर्ग ४ च्या नोकरांची रहाण्याची सोय करण्याकरितां रु. ९·६० लाख किंमत देऊन खरेदी केले आहेत. कार्यक्रमांत समाविष्ट केलेली उर्वरित कामें चालूं आर्थिक वर्षात हातीं घेतलीं जातील.

६. सुट्टीच्या काळांतील विश्रांतिस्थानें:–

थंड हवेच्या ठिकाणीं आणि सुट्टीतील इतर विश्रांतिस्थानीं, ज्यांना महाग वसतिगृहांत आणि खाजगी ठिकाणीं रहाणें परवडत नाहीं अशा लोकांची सोय करण्याकरितां सरकारनें निरनिराळया थंड हवेच्या ठिकाणीं व अितर ठिकाणीं सुट्टीतील विश्रांतिस्थानें बांधण्याचा कार्यक्रम हातीं घेण्याचा निर्णय घेतला आहे. आतांपर्यंत १० ठिकाणीं अशा तऱ्हेचीं विश्रांतिस्थानें स्थापन करण्याचें निश्चित करण्यांत आलें आहे. त्यापैकीं ८ ठिकाणीं विश्रांतिस्थानें सुरूहि झालीं असून उरलेल्या दोन ठिकाणचें बांधकाम चालूं आहे.

कुलाबा जिल्ह्यांतील मुरूड येथें विश्रांतिस्थान स्थापन करण्याच्या प्रस्तावावर विचार चालूं आहे.

**७. हौशी प्रवाशांसाठीं योजनाः—**

कमी उत्पन्न असलेल्या गटांतील कुटुंबांना सोयीस्कर होतील अशा साप्ताहिक सुटीच्या दिवसांतील छोट्या सफरी औरंगाबाद, वेरूळ, अजिंठा येथें नियोजित करण्याचें काम चालू झाले आहे मुंबईभोंवतालच्या रमणीय ठिकाणी अर्ध्या दिवसाच्या सहलीहि काढल्या जातात.

## तीन–लहान बंदरें.

महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम किनाऱ्यावर ४९ बंदरें आहेत. ह्या बंदरांमध्यें रत्नागिरी ह्या एका मध्यम प्रतीच्या बंदराचाहि समावेश होतो. मुंबई बंदराचा कारभार, मुंबई पोर्ट ट्रस्ट ह्या स्वायत्त संस्थेकडून पाहिला जातो.

पूर्वीच्या मुंबई राज्याच्या मध्यम व लहान बंदरांचें प्रशासन राज्य सरकारच्या वतीनें केंद्रीय अबकारी करांच्या मुंबईच्या कलेक्टरकडून केलें जात होतें. राज्य सरकारकडून १४ बंदरें अगोदरच ताब्यांत घेण्यांतहि आलीं असून उरलेल्या ३५ बंदरांविषयीं नुकतेच आदेश देण्यांत आले आहेत.

ह्या विभागानें लहान बंदरांची एक संघटना स्थापन केली असून सोयिस्कर व कार्यक्षम प्रशासनाकरितां, महाराष्ट्र राज्याच्या सर्व बंदरांचे, दोन गट पाडले आहेत. बांद्रे येथील बंदर-अधिकाऱ्याच्या ताब्यांत २० बंदरे असून रत्नागिरी येथील बंदर-अधिकाऱ्याच्या ताब्यांत इतर २९ बंदरें आहेत. केंद्रीय अबकारी कर-कलेक्टरांच्या प्रशासनाखालीं असलेलीं राज्याचीं सर्व बंदरें ताब्यांत घेण्याचाहि सरकारनें निर्णय घेतला आहे.

द्वितीय पंचवार्षिक योजनेत, एकत्रित मुंबई राज्यांतील बंदरांच्या विकासाकरितां रु. १८९·२० लाखांची ( ह्या तरतुदींत कोंकण विकास कार्यक्रमाच्या १ कोटी रुपयांचा समावेश होतो ) तरतूद आहे, त्यापैकीं महाराष्ट्र राज्याच्या बंदरांचा हिस्सा सुमारें रु. ६९ लाख आहे.

पूर्वीच्या मुंबई राज्याचीं बंदरें खाड्यांमध्यें वसलेलीं व गाळानें भरून गेलेलीं आहेत, त्यामुळें यंत्रानें गाळ काढण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे. गाळ काढण्याच्या दोन यंत्रांच्या संचांची खरेदी करण्याबाबत आदेशहि देण्यांत आले असून तिसऱ्या अधिक मोठ्या संचाबाबतचीं टेंडरें मिळालीं आहेत व त्यांची तपासणी चालू आहे. गाळ काढण्याच्या यंत्रांच्या संचांचा अंदाजें खर्च सुमारें ३० लाख आहे.

## चार – उद्यानें आणि बागा

उद्यानें व बागा विभागानें, आवश्यक असेल त्या वेळीं, संबंधित विभागांच्या एक्झिक्युटिव्ह इंजिनीअरच्या सहकार्यानें निरनिराळ्या ठिकाणच्या सरकारी बागांची व्यवस्था ठेवली होती. सरकारी बागांची सुव्यवस्था राखणें याव्यतिरिक्त या विभागानें बागायतीसंबंधींच्या सर्व गोष्टींबाबत जनतेला सल्ला दिला आहे. या विभागानें निरनिराळ्या सरकारी समारंभांच्या

वेळीं फुलापानांची सजावट केली. तसेंच त्यानें वनमहोत्सवाकरितां नेहमींप्रमाणें रोपेंहि पुरविलीं होतीं.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत, शोभेच्या झाडांच्या रोपट्यांच्या बागेसंबंधींची योजना अंतर्भूत केली आहे. वरील योजनेनुसार पुणें येथील रोपांची मध्यवर्ति बाग व सांगली येथील प्रादेशिक रोपांची बाग यांवर रु. ४९,६०० इतकी रक्कम खर्च करण्यांत येईल.

**योजनेतर कामें :—**

बागा आणि उद्यानें विभागानें नवीन सरकारी बागा व उद्यानें यांचीं कामें हातीं घेतलीं आहेत. चालू वर्षीं, खालील कामें हातीं घेण्याचें योजिलें आहे.

(१) फोरशोअर रोड, मुंबई येथें एक बाग.
(२) मध्यवर्ति आकृतिरेखन संघटना, मुंबई येथें एक बाग.
(३) सचिवालयाच्या जोड इमारतींभोंवतालीं बाग.
(४) फोरशोअर रोड, मुंबई येथील 'सी' पद्धतीच्या घरांभोंवतीं बाग करणें.
(५) मध्यवर्ति अबकारी इमारती, मुंबई येथें बाग.
(६) सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स येथें बाग.
(७) फोरशोअर रोड, मुंबई येथें रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडें लावणें.
(८) प्रतापगड येथें बाग.
(९) राजभवन, नागपूर येथें मुलांसाठीं बाग.
(१०) रायवुड उद्यान, लोणावळा.
(११) अजिंठा गुंफांच्या पायथ्याशीं नदीकांठीं बाग करणें.

---

शासन मुद्रणालय, कोल्हापूर.